# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक १२-०४-१९९६ ते २१-०९-१९९६**

**रजिष्टर क्र. ०३**

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १२-४-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी सभेचे इतिवृत्त.**

**दिनांक १२.४.९६ रोजी दुपारी ३.०० वाजता स्थायी समिती सभागृहात सभापती (स्थायी समिती) ची निवड करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. सभेस निम्ननिर्दिष्ट सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.खरात गौतम भागाजी | सदस्य |
| २ | डॉ.कराड भागवत किशनराव | सदस्य |
| ३ | सौ.जोशी रजनी रमेश | सदस्य |
| ४ | श्री.बैनाडे कंवरसिंग किशनसिंग | सदस्य |
| ५ | कु.लाडवाणी माया लिंबाजी | सदस्य |
| ६ | डॉ.विजयकुमार गजानन मेहेर | सदस्य |
| ७ | श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलिक | सदस्य |
| ८ | श्री.हमीदउद्यीन ताबा फसियोद्यीन | सदस्य |
| ९ | श्री.घडामोडे भगवान देविदास | सदस्य |
| १० | श्री.टाकळकर सुभाष भिकाजी | सदस्य |
| ११ | श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव | सदस्य |
| १२ | श्री.भालेराव अभिमन्यु रामभाऊ | सदस्य |
| १३ | श्री.नवपुते कचरू चंद्रभान | सदस्य |
| १४ | श्री.जैन विकास रतनलाल | सदस्य |
| १५ | श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव | सदस्य |
| १६ | श्री.अब्दुल रशिदखान (मामू) | सदस्य |

सभा मा. आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली ३.०० वाजता सुरू झाली. सर्व प्रथम सभापती निवडीबाबतची पध्दत व प्रक्रिया मा. आयुक्तांनी विषद केली. उपस्थित सभासदांमधून निवडणूक प्रक्रियेसाठी तात्पुरत्या सभापतीची निवड करण्याबाबतचा प्रस्ताव सर्वप्रथम सभागृहात ठेवण्यात आला. स.सदस्य श्री.गिरजाराम हाळनोर यांनी तात्पुरत्या सभापती पदासाठी डॉ.विजयकुमार मेहेर यांचे नाव सुचित केले. त्यास स.सदस्य श्री.महादेव सुर्यवंशी यांनी अनुमोदन दिले श्री.रशिद खाँन मामू यांनी श्री. हमीदउद्यीनताबा यांचे नाव सुचविले. तात्पुरत्या सभापती पदासाठी दोन नावे सुचविण्यात आल्याने उपस्थित सभासदांनी हात वर करून डॉ.विजयकुमार मेहेर यांच्या नावांत बहुमत दर्शविल्याने तात्पुरत्या सभापती पदी डॉ.विजयकुमार मेहेर यांची निवड करण्यात आली.

सभापती यांनी स्थायी समिती सभापती पदासाठी नामनिर्देशन पत्रे दाखल केलेल्या उमेदवारांची नांवे सभागृहात वाचून दाखविली ती खालील प्रमाणे.

१ श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
२ श्री.खरात गौतम भागाजी
३ श्री.डॉ.कराड भागवत किशनराव

नामनिर्देशन पत्र परत घेवू इच्छिणाऱ्या उमेदवारासाठी १५ मिनिटांचा अवधी ३.१० वाजता देण्यात आला. ३.२५ वाजता सभेचे कामकाज पूर्ववत सुरू झाले. नामनिर्देशन पत्र

परत घेतल्यानंतर खालील दोन उमेदवार सभापती पदाच्या निवडणूकीसाठी उभे असल्याचे मा.सभापती यांनी सांगितले.

१) श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
२) श्री.खरात गौतम भागाजी

३.३० वाजता मतपत्रिका बनविण्यासाठी १५ मिनिटांसाठी सभा तहकुब करण्यात आली. ३.४५ वाजता निवडणूक प्रक्रिया सुरू झाली व ३.५५ वाजता मतदान प्रक्रिया सुरू झाली. सभापती पदासाठी उभ्या असलेल्या उमेदवारांनी श्री.गिरजाराम हाळनोर यांच्या वतीने श्री.महादेव सुर्यवंशी तर श्री.गौतम खरात यांच्या वतीने श्री.रशिद खॉंन मामू यांची प्रतिनिधी म्हणून नांव सुचित केले. मतमोजणी अंती ४.०५ वाजता स.सभापती श्री.गिरजाराम हाळनोर यांना ११ व श्री. गौतम खरात यांना ०५ मते पडल्याचे व श्री.गिरजाराम हाळनोर यांची सभापती ,स्थायी समिती पदी बहुमताने निवड झाल्याचे जाहिर केले.

राष्ट्रगितानंतर सभेचे कामकाज संपन्न झाल्याचे स. सभापतींनी जाहीर केले.

स्वाक्षरित/-
नगर सचिव
महानगरपालिका,ओरंगाबाद

स्वाक्षरित/-
मा.सभापती
स्थायी समिती, महानगरपालिका
औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २४-५-९६ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिका स्थायी समिती सभेचा वृत्तांत. शुक्रवार दिनांक २४ मे १९९६ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. सभापती श्री,गिरजाराम हाळनोर यांचे अध्यक्षतेखाली समिती सभागृहात स्थायी समिती सभेस सुरूवात झाली.**

या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १ | मा.कु.लाडवाणी माया लिंबाजी | सदस्य |
| २ | मा.श्री.मेहेर विजयकुमार गजानन | सदस्य |
| ३ | मा.श्री.हमीदउद्यीन ताबा | सदस्य |
| ४ | मा.श्री. भगवान घडामोडे | सदस्य |
| ५ | मा.श्री.टाकळकर सुभाष भिकाजी | सदस्य |
| ६ | मा.श्री.अभिमन्यु भालेराव | सदस्य |
| ७ | मा.श्री.नवपुते कचरू चंद्रभान | सदस्य |
| ८ | मा.श्री.अ.रशिद खान मामू | सदस्य |

**संवाद:**

शहरातील सध्याच्या पाणी टंचाईच्या अनुषंगाने पाणी प्रश्नावर विचार विनिमय करणे.

**मा.श्री.हमीदुद्दीन ताबा:** महापौर बंगल्यावरील काही सामान चोरीस गेल्याचे वृत्त प्रसिध्द झाले आहे त्याबाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती:** आजची सभा पाणी प्रश्नावर विचार विनिमय करण्यासाठी बोलवण्यात आली आहे. त्याबाबत सभासदांनी चर्चा करावी. महापौर बंगल्यावरील सामानाबाबत माहिती घेण्यात येईल.

**श्री.अब्दुल रशिद खान मामू:** मा.सभापती यांनी पत्रकार परिषद घेतल्याची माहिती मिळाली. हया पत्रकार परिषदेत स्थायी समितीच्या सभासदांचा समावेश नव्हता हे योग्य आहे का? तेव्हा कालच्या पत्रकार परिषदेचा अर्थ काय?

**मा.सभापती**: पत्रकार परिषदेत कामाबाबत स्थायी समितीत निर्णय होईल असे म्हटले आहे.

**श्री.हमीदउद्यीन ताबा**

**श्री.अब्दुल रशिद खान मामू:** स्थायी समितीचे सभासद, सभापती आणि अधिकारी यांनी एकत्र बसून कामाविषयी निर्णय घेतला तर ते योग्य होईल. मा.सभापती वैयक्तिक काम करून घेवू शकतात का ?

**डॉ.विजयकुमार मेहेर:** सभासदांनी प्रथम पाणी प्रश्नावर चर्चा करावी. नंतर हया विषयावर बोलता येईल.

**मा.सभापती :** स्थायी समितीचे सभापती पद धारण केल्यानंतर कालच गाडी (कार ) मिळाली आहे. पुढील वर्षाचे काळात काय काम करणार याची माहिती पुढे ठेवली.

**मा. आयुक्त :** पत्रकार माझ्याकडेही येतात. पारदर्शक प्रशासन कसा असावा तसा माझा प्रयत्न असतो. एखादया धोरणात्मक बाबीवर महापालिकेने निर्णय घेतल्यानंतर त्याबाबत कोणीही माहिती देवू शकतो. उदा.रंगारगल्लीतील काही नागरीक न्यायालयात गेले होते. त्याबाबतचा निर्णय लागला आहे. पत्रकाराने एखादे काम का थांबले असे विचारले तर माहिती देणे योग्य आहे या उलट महानगरपालिकेने ज्या प्रकरणात निर्णय घेतला नाही असे कोणतेही विधान करत नाही. वृक्षरोपण या कार्यक्रमाचा मी अध्यक्ष आहे

त्याबाबत मी विधान करू शकतो. तेव्हा मी जे विधान केलेत ते माझ्या अधिकारात आहेत.

प्रशासनावर आरोप करणाऱ्या मा.सभापतीचा निषेध व्यक्त करून स.नगरसेवक श्री. हमीदउद्दीन ताबा यांनी ४.०० वाजता सभात्याग केला. सभात्याग केलेले स.नगरसेवक यांनी पुन्हा ४.०२ वाजता सभागृहात प्रवेश केला.

**मा.सभापती :** शहराच्या कोणत्याही भागात पाणी टंचाई जास्त आहे असे वाटत नाही. तरी पण बोअरवेल खोदणे विहिरीचा गाळ काढणे इत्यादी कामाविषयी माहिती घेण्याकरीता आजची सभा बोलावण्यात आली आहे. त्याच बरोबर भविष्यातील पाणी पुरवठयाबाबत विचार करण्याचीही गरज आहे.

**श्री.कचरू नवपुते:** चिकलठाणा (ग्रामीण) भागात कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे त्या भागात दोन पाण्याच्या टाक्या आहेत. गेल्या ५/६ वर्षापासून एक टाकी बांधून तशीच पडली आहे, हया टाकीचे बांधकाम ७.०० लाख रूपये झाले आहेत, याकडे संबंधित अधिकाऱ्याने ५ वर्षापासून लक्ष घातले नाही ही बाब योग्य नाही.

**जलगृह अभिंयता-२:** स.सभासदांनी खुलासा केलेल्या टाकीच्या जागेचा वाद आहे. जागेचा मोबदला दिलेला आहे. या जागेचा वाद मिटल्यानंतर सदर टाकी सुरू करता येईल.

**मा.आयुक्त :** चिकलठाणा भागातील टाकीचे काम परिसर अभियांत्रिकी विभागाकडे आहे. ते काम महापालिकेचे नाही, ज्यावेळी या टाकीला पाण्याचे कनेक्शन दिले जाईल त्यावेळी या टाकीतून पाणी पुरवठा करता येईल.

**श्री.कचरू नवपुते :** महापालिकेने ही टाकी बांधलेली आहे. श्री.गणेश जैस्वाल जागेचे मालक आहेत. गावातील राजकारणाने टाकीतून पाणी पुरवठा सुरू झालेला नाही.

**श्री.अभिमन्यु भालेराव:** चिकलठाणा येथील पाण्याच्या टाकी बाबतची अडचण येण्यापूर्वी सर्व कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक होते.

**श्री.कचरू नवपुते :** चिकलठाणा भागात अत्यंत कमी दाबाने पाणी येते. पाण्यासाठी नागरिकांना ५-६ फुट खडडे् केले आहेत, पाणी कमी असल्यामुळे नागरिकांचे मोर्चे नगरसेवकांकडे येतात. तेव्हा बंद असलेली पाण्याची टाकी सुरू केल्यास या अडचणी कमी होतील.

**श्री.अभिमन्यु भालेराव:** वॉर्ड क्र.१४ ची परिस्थिती बिकट आहे. २०० नळ कनेक्शन घेतल्यानंतर सार्वजनिक नळ देण्यांत येईल असे मा. आयुक्तांनी सांगितले होते. त्या प्रमाणे हया भागात २००/२५० नळ कनेक्शन दिलेले आहेत. वार्ड क्र.१४ ची करण्यांत यावी व रोडचे बाजूला ड्रेनेज पाणी लाईन टाकता येईल का ते पहावे. या वार्डातील गल्ल्या लहान लहान आहे त्या ठिकाणी पाईप लाईन टाकता येत नाही. येथील पाण्याची टाकीची व गावाची लेव्हल योग्य नाही. त्यामुळे पाण्याला घाण येत नाही. नविन लाईन टाकली आहे. तीच योग्य चालते वार्ड क्र.१४ मध्ये रोड क्रॉसिंगवर सिमेंट पाईप टाकला आहे. तो वारंवार फुटतो त्याची अनेक वेळा दुरूस्ती करण्यात येते. हया कामामुळे महापालिकेचा खर्च विनाकारण होतो. किरकोळ काम करणारे कंत्राटदार नगरसेवकांनी बोलू नये असे सांगतात हे योग्य आहे का ? वार्ड क्र.१४ हा भाग एमआयडीसी चा आहे येथून एमआयडीसीची ही पाईप लाईन टाकलेली आहे ही लाईन फुटल्यामुळे रस्त्यावर खडडे् पडतात तेव्हा ही लाईन ताब्यात

घेता येईल का ? याचाही विचार व्हावा. प्रत्येक पाण्याच्या टाकीवर वॉचमन देण्यात यावा. याशिवाय रस्ते तयार करण्यापूर्वी पाणी ड्रेनेज लाईन टाकावयाची आहे का ? या बाबींचा विचार करूनच रस्त्याचे काम हाती घेण्यात यावे.

**मा.सभापती :** प्रत्येक पाण्याच्या टाकीवर वॉचमन आहे. रस्ता तयार करण्यापूर्वी पाणी /ड्रेनेज लाईन टाकावयाची आहे काय ? याचा विचार करण्याची सूचना योग्य आहे पाणी / ड्रेनेज व इतर कामाबाबत कोऑर्डिनेशन अधिकाऱ्यांचे एक पद निर्माण करण्याची गरज आहे. झोपडपट्टी भागातील रस्ते लहान आहे. ही बाब खरी असली तरी स.सभासदांनी सहकार्य केले तर अतिक्रमण दूर करता येईल.

**श्री.अ.रशिद खान मामू :** पाणी पुरवठयाच्यादृष्टीने शहरात किती बोअरवेल खोदण्यात आल्या किती बोअरवेल खोदणे बाकी आहे याचा खुलासा व्हावा.

**मा.आयुक्त :** २७ बोअरवेल होणे आणि ४१ विहिरींचा गाळ काढणे इ. बाबत शासनाची आर्थिक मदत मिळणार होती ती पण तशी मदत आता मिळणार नाही.

**उप अभियंता (यांत्रिकी) पापु:** २७ बोअरवेल पैकी २३ बोअरवेलला पाणी लागले आहे. यापैकी १३ बोअर वेलवर हँडपंप बसविण्यात आले ५ बोअरवर येत्या २/३ दिवसात हँडपंप बसविण्यात आले ५ बोअरवर येत्या २/३ दिवसात हँडपंप बसविण्यात येतील.

**श्री.रशिद खान मामू:** खोदण्यात आलेल्या बोअरवेलला किती पाणी आहे.

**कार्यकारी अभियता :** खोदण्यात आलेल्या बोअरवेलला कमीत कमी ३/४ " व जास्तीत जास्त १" पाणी लागले आहे.

**मा.आयुक्त** :बोअरवेल आणि विहिरीचा गाळ काढणे या कामाबाबतची सविस्तर माहिती कार्यकारी अभियता यांना स.सभासदांना दयावी.

**श्री.हमीदउद्यीन ताबा:** विहिरीचा गाळ काढण्याचे काम महापालिका करत असली तरी या विहिरींवर स्लॅब टाकण्यात आलेला नाही. त्यामुळे नागरिक विहिरीत केरकचरा टाकतात. त्यामुळे पुढील काळात पुन्हा गाळ काढण्याचा खर्च करावा लागेल.

**मा.सभापती :** संबंधित विभागाने विहीरींना कठडा करणे जाळी बसविणे अशी कामे करून घ्यावीत.

**श्री.अभिमन्यु भालेराव:** मसनतपूर येथील विहिरीचे बांधकाम ढासळण्याची शक्यता आहे. तेव्हा त्या विहीरीचा गाळ काढणे व्यास मोठा करणे आणि विहीर खोल करणे इ. कामे केल्यास या भागातील नागरिकांना भरपूर पाणी मिळेल. मसनतपूर स्मशान भूमी येथील बोअर बाबत मा. आयुक्तांचे प्रमाणे काम झाले नाही.

**मा.आयुक्त:** जि.एल.डी.अे. विभागाचा सल्ला घेवून कार्यकारी अभियंता यांनी सदर प्रकरणी कार्यवाही करावी.

**श्री.कचरू नवपुते :** चिकलठाणा भागात भरपूर पाणी असलेल्या ४ विहीरी आहेत या विहिरींवर विद्युत पंप बसविण्यात यावे व त्यासाठी कर्मचारी नेमण्यात यावा म्हणजे नागरीकांना भरपूर पाणी मिळू शकेल.

**डॉ.विजयकुमार मेहेर:** आजची सभा ज्या विषयावर चर्चा करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे त्याबाबतची प्राथमिक माहिती देण्यात यावी.

**मा.आयुक्त :** औरंगाबाद शहरास जायकवाडी हर्सूल नहरे अंबरी या ठिकाणाहून पाणी पुरवठा करण्यांत येतो. शासनाच्या नियमाप्रमाणे दरडोई ९८७ एमएलडी पाणी लागते हर्सूल व नहरे अंबरी येथील पाणीसाठा संपलेला आहे. जायकवाडी धरणातून ही डेउ वॉटर मधून पाणी घेतले जात आहे त्यात थोडा जरी फरक पडता तरी सामान्य नागरीकांना चार तास उशिरा पाणी दिले जाते विद्युत दाब कमी होतो सिडको विभागाकरीता स्वतंत्र ७०० मी.मी. ची नविन लाईन टाकल्यानंतर सिडको शहर पाण्याचा प्रश्न सुटेल शासनाच्या पत्रकानुसार सन २००५ मध्ये जी लोकसंख्या असेल ती समोर ठेवून योजना तयार करण्यात यावी. जलनि:स्सारण मंडळाची पाईप लाईन महापालिकेकडे हस्तांतर करण्याबाबत शासन आणि महापालिकेचा विचार असला तरी जलनि:स्सारण मंडळ यांचे कर्मचारी सामावून घेण्याचा आग्रह करत आहे. महापालिकेला दरवर्षी ४ कोटी रूपये खर्च येतो. मंडळाने या लाईनवर बऱ्याच कंपन्यांना कनेक्शन दिलेले आहेत हया कनेक्शनचे पैसे मंडळाकडे जमा होतात आणि मात्र महापालिकेकडून वसूल केले जाते याबाबत कंपन्यांना दिलेल्या कनेक्शनचा बिलाची रक्कम वजा जाता महापालिका विद्युत बिलाची रक्कम भरेल असा प्रस्ताव मंडळाकडे दिला आहे लाईन कुठली तर नागरीक महापालिकेला दोष देतात.

**मा.सभापती :** प्रशासनाचा जो प्रस्ताव आहे त्यावर सर्वसाधारण सभेत निर्णय घेतला जाईल.

**श्री.हमीदोद्दीन ताबा:** जायकवाडी येथील पाणी पुरवठयावर अंवलंबून न रहाता महापालिकेने नवीन तलावाचा जो प्रस्ताव सर्वसाधारण सभेत केला त्याचे पुढे काय झाले .

**मा.सभापती :** पानचक्कीचे पाणी नाल्यातून वाहून जाते हे पाणी नाल्यात वाहून जाता उपयोगात आणता येईल का याचा विचार करण्यात यावा असे वाटते.

**श्री.अ.रशिद खान मामू:** शहरात येणारे नहरचे पाणी नागरीक चोरून वापरतात हा प्रकार बंद झाला तर पानचक्की नहरे अंबरी श्हानूर या तिन्ही ठिकाणी पाणी येवू शकेल.

**मा.सभापती:** पाणी पुरवठा विभागाने कार्यकारी अभियता , उप अभियंता यांनी विटभटटी विहीर अशा विविध ठिकाणी चोरून पाणी घेत असलेल्या सर्व भागाची पाहणी आठ दिवसात पूर्ण करून त्याचा अहवाल सादर करावा.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** रू.१.७५ खर्च करून ही वॉर्ड क्र.७४ मध्ये पाण्याच्या टाकीत पाणी टाक्ले जात नाही याबाबत खुलासा व्हावा.

**कार्यकारी अभियता (पापू):** वार्ड क्र.७४ मधील नागरीक पाण्याच्या टाकीत पाणी टाकू देत नाही या भागाकरीता २६ टँकर पाणी देण्यात येते.

**मा. आयुक्त :** महापालिकेतर्फे पूरविलेले पाणी साठवून नागरीक बांधकामासाठी वापरतात.

**मा.सभापती :** दुष्काळी परिस्थिती असतांनाही महापालिका प्रशासनातर्फे शहरास योग्य प्रमाणात पाणी पुरवठा केला गेला याबद्यल प्रशासनाच्या सर्व अधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात येते.

"जन गण मन " या राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

स्वाक्षरित/-
महानगरपालिका औरंगाबाद

स्वाक्षरित/-
स्थायी समिती ,
महानगरपालिका औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २८-६-९६ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिका स्थायी समिती सभेचा वृत्तांत. शुक्रवार दिनांक २८-६-१९९६ रोजी दुपारी ३.३० वाजता मा. सभापती श्री,गिरजाराम हाळनोर यांचे अध्यक्षतेखाली समिती सभागृहात स्थायी समिती सभेस सुरूवात झाली.**

या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १ | मा.श्री.गौतम भागाजी खरात | स.सदस्य |
| २ | मा.सौ.जोशी रजनी रमेश | स.सदस्य |
| ३ | मा.श्री.कवरसिंग बैनाडे | स.सदस्य |
| ४ | मा.कु.माया लाडवाणी | स.सदस्य |
| ५ | मा.श्री.विजयकुमार मेहेर | स.सदस्य |
| ६ | मा.श्री.महादेव सुर्यवंशी | स.सदस्य |
| ७ | मा.श्री.हमीदुद्दीन ताबा | स.सदस्य |
| ८ | मा.श्री.भगवान घडामोडे | स.सदस्य |
| ९ | मा.श्री.सुभाष टाकळकर | स.सदस्य |
| १० | मा.श्री.त्र्यंबक तुपे | स.सदस्य |
| ११ | मा.श्री.अभिमन्यु भालेराव | स.सदस्य |
| १२ | मा.श्री.नवपुते कचरू चंद्रभान | स.सदस्य |
| १३ | मा.श्री.जैन विकास रतनलाल | स.सदस्य |
| १४ | मा.श्री.भागवत कराड | स.सदस्य |
| १५ | मा.श्री.अ.रशिद खान मामू | स.सदस्य |

सभेची सुरूवात "वंदे मातरम " या गिताने करण्यात आली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंचालक श्री.बाळासाहेब देवरस यांच्या दु:खद निधना निमित्त सभागृहा तर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी असा प्रस्ताव स.सदस्य श्री.महादेव सुर्यवंशी यांनी मांडला त्यानुसार ००.०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून सभागृहातर्फे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंचालक श्री.बाळासाहेब देवरस यांना श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली यावी असा, प्रस्ताव स.सदस्य श्री. महादेव सुर्यवंशी यांनी मांडला त्यानुसार ००.०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून सभागृहा तर्फे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंचालक श्री.बाळासाहेब देवरस यांना श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.

**श्री.गौतम खरात :** औरंगाबाद महानगरपालिकेचे लोकप्रिय आयुक्त श्री.भोगे साहेब यांचे काम करण्याच्या विशिष्ट हातोटीच्या पध्दतीने शहराचा विकास होण्यास मदत झाली आहे. महापालिकेमध्ये काम करतांना श्री.भोगे साहेब यांनी महापालिका एक कुटुंब आहे असे समजुन सर्वांच्या अडचणीचा विचार करून शहराच्या विकासाची विविध कामे हाती घेतली ही कामे हाती घेत असतांना पदाधिकारी / नगर सेवक यांची संमूती घेतली आहे. श्री.भोगे साहेब यांनी महापालिका एक कुटुंब आहे असे समून सर्वांच्या अडचणीचा विचार करून शहराच्या विकासाची विविध कामे हाती घेतली ही कामे हाती घेत असतांना पदाधिकारी/ नगरसेवक यांची संमती घेतली आहे. श्री.भोगे साहेब हे एक कुशल प्रशासक आहेत त्यांच्या कार्याचा ठसा या शहरावर उमटला आहे.

पण काही राजकीय मंडळी यामुळे नाराज झाली म्हणून अशा कुशल अधिकाऱ्यांची बदली करण्याचा कट काही मंडळींनी सुरू केला आहे. तेव्हा कुशल प्रशासक असलेले भोगे साहेब यांची महापालिकेतून बदली होता कामा नये यासाठी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांना एक निवेदन देण्यांत यावे.

**मा.सभापती :** श्री.भोगे साहेब एक कुशल आयुक्त / प्रशासक आहेत. अशा कुशल अधिकाऱ्यांची महाराष्ट्र शासनास गरज आहे. शासनास श्री.भोग साहेब यांची आवश्यकता किंवा बढती होत असेल तर काही हरकत नाही.

**श्री.कचरू नवपुते :** महापालिका आयुक्त श्री.भोगे साहेब यांची बदली झाली आहे का ?

**श्री.गौतम खरात :** पावसाळा सुरू होवून एक महिना झालेला आहे शहरात पाण्याची परिस्थिती बिकट आहे अशा परिस्थितीत नविन अधिकाऱ्यांना या शहराची माहिती घेण्यास सहा महिन्याचा काळ लागेल.

**श्री.अभिमन्यु भालेराव :** महाराष्ट्र शासनाचा विचार या शहराचे सभापती व मा.पालक मंत्री करतात हे योग्य आहे पण या शहराचा विकास झाला का ? नावाडी चांगला असला तरी मुळात नाव चांगली नसेल तर काय उपयोग ? तेव्हा या शहराच्या विकासाचा विचार करता श्री.भोगे साहेब यांना आणखी सहा महिने तरी या महापालिकेत ठेवण्यांत यावे.

**श्री.भगवान घडामोडे :** महापालिका आयुक्त श्री.भोगे साहेब यांची बदली झाली नाही तर या विषयावर विनाकारण चर्चा का करण्यांत येत आहे. स.सदस्य यांनी सुचविल्या प्रमाणे सहा महिनेच काय पण एका वर्षाकरीता महापालिका आयुक्त श्री.भोगे यांना महापालिकेत ठेवावे असे आपण सर्वांनी मा.पालक मंत्र्यांना निवेदन द्यावे.

**डॉ.भागवत कराड :** स.सदस्य श्री.घडामोडे यांनी मांडलेल्या सुचनेप्रमाणे शहराच्या विकासाचा विचार करता सर्वांनी मा. पालक मंत्री यांना निवेदन दयावे व या प्रकरणी शिष्टमंडळही नेमण्यात यावे.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी जी मांडलेलया सुचने बाबत सहमत आहे सर्व सदस्य मिळून या प्रकरणी मा.पालकमंत्री यांची भेट घेवू.

**श्री.हमीद्योद्यीन ताबा:** शिक्षकांची भरती करण्याची कार्यवाही गेल्या एक वर्षापासून सुरू आहे. महापालिका शाळेत शिक्षकांची संख्या कमी आहे. एक शिक्षक ४/४ वर्ग सांभाळत आहे. या बाबींचा विचार करता शिक्षकांची पदे भरण्यास आणखी किती वेळ लागेल.

**शिक्षणाधिकारी :** शिक्षकांची पदे भरण्या बाबतची कार्यवाही चालू आहे. मध्यंतरीच्या काळात आचार संहिता लागू होती. शिक्षक भरती बाबतची टिप्पणी सर्व सभासदांना माहितीस्तव दिली आहे.

**श्री.हमीद्योद्यीन ताबा :** महापालिका शाळेत वीस मुख्याध्यापक आणि सुपरवायझरच्या जागा गेल्या दोन वर्षापासून रिक्त आहेत. त्यामुळे मुलांचे शैक्षणिक नुकसात होत आहे.

**शिक्षणाधिकारी :** सुपरवायझर पदाच्या तीन जागा भरण्याबाबत मागणी करण्यात आली आहे. या पदासाठी नुकतीच शासनाची मान्यता नुकतीच मिळाली आहे त्यानुसार या जागा भरण्यात येतील.

**मा.सभापती :** विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी येत्या ३० जुलै ९६ पर्यंत मुख्याध्यापकांची नेमणूक होईल अशी व्यवस्था शिक्षणाधिकारी यांनी करावी

तसेच शासनाकडून मंजुरी मिळालेल्या सुपरवायझर या पदासाठी तात्पुरती व्यवस्था म्हणून सहा महिन्याचे आदेश देवून नियमाप्रमाणे सुपरवायझर या पदावर नेमणूक करण्यांत यावी.

**श्री.गौतम खरात :** पिरबाजार आठवडी बाजारचे काम सध्या थंडावलेले आहे. पिरबाजार येथे आठवडी बाजाराच्या जागेचे भूमिपूजनाचा समारंभ संबंधित वार्डाचे नगरसेवक यांचे हस्ते पार पाडला त्यानंतर ३/४ नागरिकांना सदर जागेचा मालकी असल्याचे सांगितले. पिरबाजार येथील आठवडी बाजारा बाबतचा प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवतांना संबंधित अधिकाऱ्यांनी या जागेच्या मालकी हक्का बाबतची सविस्तर माहिती घेतली होती का ? याची माहिती घेण्यासाठी एका अधिकाऱ्यांची नेमणूक करावी आणि पिरबाजार येथील नियोजित जागेवर आठवडी बाजार सुरू करण्याची व्यवस्था करावी.

**मा.सभापती :** स.सदस्य यांनी सुचविल्या प्रमाणे पिरबाजार येथील आठवडी बाजाराच्या कामास सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली आहे. त्यानुसार नियोजित जागेवर भुमिपुजनाचा कार्यक्रमही झाला. आज १० नागरिकांजवळ या जागचे पी.आर.कार्ड आहेत.स.सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे पिरबाजार आठवडी बाजार या प्रकरणात मा.सहाय्यक संचालक नगर रचना यांनी लक्ष घालावे त्यासाठी शहर अभियता आणि उप अभियंता (इमारती) यांनी स.संचालक नगर रचना यांना मदत करावी व या प्रकरणी लवकरात लवकर कार्यवाही करावी.

एकनाथ नगर येथील शाळेच्या कामासाठी तीन वेळा निविदा मागविण्यात आल्या आहेत. तथापि दर भरलेल्या निविदा प्राप्त झाल्या नाहीत हे योग्य नाही. तरी पण या प्रकरणी योग्य कार्यवाही कशी करता येईल याचा शहर अभियता यांनी विचार करावा.

**श्री.भगवान घडामोडे:** चिकलठाणा भागात पाण्याची टाकी बांधून तयार झाली आहे, परंतु या टाकीतून पाणी पुरवठा सुरू झालेला नाही. नागरिकांना पाणी कमी प्रमाणात पुरवठा होत अहो तेव्हा या टाकीतून पाणी पुरवठा सुरू करण्यांत यावा.

**कार्यकारी अभियता (पापु व ज.नि):** चिकलठाणा येथील टाकीच्या जागे बाबत वाद आहे. त्यादृष्टीने पोलिस मदत मिळण्याबाबत पत्रही दिले आहे पोलिस मदत मिळाली म्हणजे टाकीतुन पाणी पुरवठा सुरू करता येईल.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** नारेंगांव भागात इंधन विहितून १९८८ पासून पाणी पुरवठा करण्यांत येत होता. या इंधन विहीरीचे पाणी आटले आहे. नारेगांव भागात सध्या गॅस्ट्रो सारखे साथीचे रोग सुरू झालेले आहेत. गेल्या एक वर्षापासून अशा प्रकारचा पाणी पुरवठा सुरू झालेला नाही. तेव्हा येत्या एक महिन्याच्या आत नारेगांव भागात जायकवाडी जलाशयातुन पाणी पुरवठा सुरू झालेला नाही. तेव्हा येत्या एक महिन्याच्या आत नारेगांव भागात जायकवाडी जलाशयातुन पाणी पुरवठा झाली नाहीत तर आमरण उपोषण करावे लागेल.

**मा.सभापती :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) (सी) प्रमाणे काम सुरू केले तरी स.सभासदांच्या मागणी नुसार एक महिन्याच्या आत काम होईल असे वाटत नाही. तथापि याबाबत कार्यकारी अभियंता यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियता (पापु व ज.नि):** नारेगांव येथे पाण्याच्या टाकीचे पाच लाखाचे कामासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या याप्रकरणी सर्वसाधारण सभेत चौकशी करण्याची मागणी करण्यांत आली म्हणून सदर काम थांबले होते. तरी पण

स.सदस्यांच्या मागणी नुसार एक महिन्यात काम करण्याचे प्रयत्न करण्यांत येतील. मात्र तसे आश्वासन देत नाही. सध्या हर्सुल/ खाम या धरणाचे पाणी आटले आहे त्यामुळे शहरास जायकवाडी जलाशयातूनच पाणी पुरवठा केला जात आहे.

**डॉ.भागवत कराड :** सध्या शहरात पाणी टंचाई आहे पावसाळा सुरू होवून ही पाऊस पडलेला नाही. तरी पण शहरातील सार्वजनिक नळांना तोटया लावलेल्या नाहीत त्यामुळे पाणी वाया जात आहे. तेव्हा सार्वजनिक नळांना तोटया बसविल्यास पाण्याची बचत होईल.

**मा.सभापती :** सार्वजनिक नळांना पाणी वाया जावू नये या उद्येशाने अशा नळांना वेल्डींग करून तोटया बसवण्यात आल्या होत्या, अशा तोटयांही नागरिकांनी काढून टाकल्या आहेत. तेव्हा ज्या ठिकाणी सार्वजनिक नळ आहे त्या ठिकाणी जवळ राहणाऱ्या नागरिकांवर सार्वजनिक नळांच्या तोटयांची जबाबदारी सोपवावी.

**श्री.अभिमन्यु भालेराव :** सार्वजनिक नळांना तोटया बसविण्यात आल्या होत्या असा खुलासा सभागृहात केला आहे. तेव्हा स्थायी समितीच्या पांच सदस्यांनी सार्वजनिक नळांच्या तोटया अनधिकृत नळ कनेक्शन, घाण पाणी या बाबत पाहणी करावी.

**मा.सभापती :** सार्वजनिक नळांची संख्या कमी करण्यांत यावी. यासाठी ज्या स्लम भागातील नागरिक नळ घेवू इच्छित असतील अशा नागरिकांना खाजगी नळ कनेक्शन घेण्यासाठी काही सवलत देता येईल का या बाबत मा. उप आयुक्त यांनी विचार करावा , अशी सवलत देतांना पाणीपट्टीच्या दराचा समावेश त्यात करता येणार नाही.

**मा.सभापती, श्री.गौतम खरात,श्री.हमीदोदीन ताबा :** महापालिकेतील उप आयुक्त-१ या पदाची जागा गेल्या अनेक दिवसांपासून रिक्त आहे तेव्हा महापालिका कर्मचाऱ्यातुनच पदोन्नती देवून ही जागा भरण्यांत यावी.

**उप आयुक्त-१:** या पदा बाबत मा. आयुक्त यांचेशी चर्चा करून शासनास पत्रव्यवहार करण्याची विनंती केली होती पत्रव्यवहार झाला का ? या बाबत येत्या १ तारखेनंतर माहिती घेता येईल.

**श्री.कचरू नवपुते :** श्रीमती बनकर यांनी स्वामी विवेकानंद यांच्या पुतळा महानगरपालिकेस दिला त्याबदद्ल त्यांचे अभिनंदन करण्यांत यावे.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** स.सदस्यांच्या सुचनेस अनुमोदन.

**मा.सभापती :** स.सदस्य श्री.कचरू नवपुते यांच्या सुचनेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेस स्वामी विवेकानंद यांचा पुतळा अर्पण करणाऱ्या श्रीमती निर्मलाताई जगन्नाथ बनकर यांचे या सभागृहा तर्फे अभिनंदन करण्यात येते. उप अभियता (उद्यान) आणि उद्यान अधिक्षक यानीं सदर पुतळा नियोजित ठिकाणी बसवून सदर भाग सुशोभित करण्याचे काम त्वरीत हाती घ्यावे. संबंधित विभागास उक्त काम करण्यासाठी जो अपेक्षित खर्च येईल त्यास सभागृहाची कार्योत्तर मंजुरी मिळेल.

**श्री.हमीदोद्यीन ताबा:** पशुधन विकास विभागातर्फे प्राणी संग्रहालयातील प्राण्यांसाठी पशुखाद्य खरेदी बाबत दर पत्रके मागवून दोन महिन्यांचा कालावधी झालेला आहे, तरी पण पशुखाद्या खरेदी बाबतचे दरपत्रक मंजुरीसाठी उद्या पर्यंत सभागृहापुढे मंजुरीसाठी ठेवण्यात आले नाही या बाबत खुलासा व्हावा.

**मा. उप आयुक्त :** पशुधन विभागातर्फे पशुखाद्य खरेदी बाबत दरपत्रके मागविण्यांत आली आहेत. तथपि सदर दरपत्रके मंजुरीसाठी सभागृहापुढे का ठेवण्यांत आली नाही बाबतची माहिती एक तारखे नंतर देता येईल.

**श्री.कँवरसिंग बैनाडे :** जाधववाडी (सिडको ) भागात विद्युत पोल उभारण्यात आले आहेत. परंतु या पोलवर विद्युत तारा ओढलेल्या नाही तसेच या भागात सार्वजनिक संडासची व्यवस्था नाही या याबाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** विद्युत पोलवर तारा ओढण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची परवानगी मिळाल्यानंतर हे काम करता येईल. सार्वजनिक संडासा ऐवजी नागरिकांनी खाजगी संडास बांधुन घेणे योग्य होईल.

**श्री.हमीदोद्दीन ताबा :** यशोधरा कॉलनी येथे जुन ९५ मध्ये शाळेसाठी चार रूम भाडयाने घेण्यात आल्या, या ठिकाणी जुन ९६ मध्ये प्रत्यक्षात शाळा सुरू झाली. शहरात प्रत्यक्षात ४००/५०० रूपये भाडे असतांना केवळ एका अधिकाऱ्यांच्या मित्राची इमारत असतांना या इमारतीस जादा भाडे दें्यात आले त्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान झाले आहे. तेव्हा या बाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** स.सदस्य यांनी सुचविल्या प्रमाणे वृत्तपत्रात बातमी आल्यावर या प्रकरणी मा. आयुक्त यांचेशी दुरध्वनी वरून चर्चा केली असता या प्रकारणाची चौकशी करण्यात येईल असा खुलासा करण्यांत आला आहे.

**श्री.हमीद ताबा :** टेलिफोन विभागातर्फे शहराच्या विविध भागात काम चालू आहे. याबाबत चौकशी केली असता या कामामुळे खराब होणाऱ्या रस्त्याबाबत संबंधितांकडून पैसे वसूल केले जातील असे सांगण्यात आले. सध्या पावसाळा चालूच आहे. नजीकच्या काळात मीलकॉर्नर येथील सुशोभित करण्यांत आलेले आयलँड टेलिफोन विभगाने तोडून टाकले आहे. याबाबत काय कार्यवाही झाली.

**श्री.गौतम खरात :** पैठणरोड भागात रोशनाचे काम मनपातर्फे करण्यात येत आहे. या कामानिमित्त गुत्तेदाराने सार्वजनिक बांधकाम विभागाचा रोड फोडला. त्यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाने काम करणाऱ्या गुत्तेदाराचे कामगारांना पोलिसांच्या ताब्यात दिले. यासाठी महापालिकेला काही रक्कम भरावी लागली तेव्हा सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे उदा. कांचनवाडी पडेगांव इ. महापालिकेच्या रस्त्यावरील झाडे विना परवानगीने तोडण्यांत येतात. अशा प्रकरणी महापालिकेतर्फे सार्वजनिक बांधकाम विभागावर कार्यवाही करण्यात यावी.

**मा.सभापती :** जागतिक बँकेतर्फे नॅशनल हायवेवर काम चालू आहे. त्या विभागातर्फे गुत्तेदाराच्या कामगारावंर कार्यवाही करण्यांत आली आहे. या प्रकरणांत महापालिकेने पैसे भरणे नसून संबंधित गुत्तेदारामार्फत रक्कम भरणा केली आहे. रस्त्याची योग्य दुरूस्ती झाल्यानंतर गुत्तेदारासाठी सदर रक्कम (अनामत ) परत मिळणार आहे या खुलाशामुळे स.सदस्यांचा गैरसमज दुरू होईल असे मला वाटते.

**श्री.गौतम खरात :** या शहरात बराच मोठा स्लम भाग आहे. या भागांना सुविधा देण्यासाठी महापालिकेतर्फे तीन स्लम उप विभाग कार्यरत आहे. यापैकी एका विभागात उप अभियंता / कर्मचारी नाहीत. शहरातील मोठया प्रमाणावरचा स्लम भाग विचारात घेता या स्लम भागातील नागरिकांना योग्य प्रमाणात नागरी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी स्लम भागाचे विविध कामासाठी स्वतंत्र कार्यकारी अभियता या पदाची नेमणूक करण्यांत यावी.

**श्री.हमीदउद्यीन ताबा :** माझ्या माहिती प्रमाणे अर्थसंकल्पात स्लम विभागासाठी जी तरतुद केली जाते ती पूर्णपणे खर्च होत नाही आणि पर्यायाने स्लम भागातील गरीब नागरिकांना तीन / तीन महिने मागणी करून या नागरीकांना वेळेवर सुविधा उपलब्ध होत नाही.

या उलट कॉलनी भागातील नागरिकांनी मागणी करताच त्यांना सुविधा उपलब्ध होतात. याचा विचार करता स्लम विभागासाठी स्वतंत्र कार्यकारी या पदाची गरज आहे. हे लक्षात येईल.

**श्री.हमीदउद्यीन ताबा:** टेलिफोन विभागातर्फे खोदलेल्या रस्त्याचे पैसे वसूल करण्याबाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** मागील सभेत महानगरपालिकेतर्फे तयार करण्यांत आलेला रस्ता पाणी, ड्रेनेज अथवा अन्य कारणासाठी खोदला जातो पर्यायाने महापालिकेचे आर्थिक नुकसान होते. यावर उपाय योजना म्हणून सर्व विभागाच्या कामात समन्वये यावा या दृष्टीने महापालिका प्रशासनात को-ऑर्डिनेशन ऑफिसरची नेमणूक करण्याचा विचार झाला. तो अधिकार मा. आयुक्तांचा आहे. त्यात मागील काळात आचार संहिता लागू होती त्यामुळे यावर विचार झाला नाही म्हणून आपण महापालिकेचे अति.शहर अभियंता यांची को-ऑर्डिनेशन अधिकारी म्हणून नेमणूक करत आहोत. अति.शहर अभियंता यांनी रस्त्याच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करतांना या रस्त्यावरील ड्रेनेज / पाणी पुरवठा लाईन व इतर कामे याबाबत संबंधित विभागाशी संपर्क साधून थोडया परिस्थीतीत रस्त्याचे काम हाती घ्यावे जेणेकरून भविष्यात या रस्त्याच्या कामावर मनपाचा जादा खर्च होणार नाही. याच कामाबरोबर टेलिफोन विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग व यासारखे इतर विभाग यांच्याकडून रस्ता तयार झाल्यानंतर पुन्हा खोदकाम होणार नाही याचीही काळजी घ्यावी व आवश्यक खर्च वसुलीची कार्यवाही करावी.

स.स.श्री.गौतम खरात यांनी स्लम विभागाचे कामाबाबत प्रश्न उपस्थित केला आहे. तथापी मनपाच्या अर्थसंकल्पाचे मनाने कर्मचारी वर्ग अपुरा आहे ही बाब विचारात घेवूनच सहा.संचालक नगर रचना सुप्रीटेंडींग इंजिनियर या पदाचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेमध्ये ठेला असता अशा पदाचे निर्मितीसाठी स्टॉफिंग पॅर्टन समितीची नेमणूक करण्यांत आली आहे. या कमेटीचा पाठपुरावा करून आवश्यक ती पदे निर्माण करण्याचा विचार करण्यांत येईल.

**श्री.कचरू नवपुते :** समतानगर भागातील अतिक्रमण काढण्यासाठी मनपा कर्मचारी गेला असता तेथील एक नागरिक त्यास मज्जाव करीत आहे. मनपा शहराचा भागातील अतिक्रमण काढण्याचे काम करीत असतांना याच भागात ही परिस्थिती का आहे ?

**मा.सभापती :** समतानगर भागात खाजगी मालकीच्या जागेवर बांधकाम झालेले आहे. खाजगी मालमत्तेवरील अतिक्रमण काढण्याचे काम करत असतांना याच भागात ही परिस्थती का आहे .

**श्री.अभिमन्यु भालेराव :** मनपा वार्ड क्र.१४ मधील शाळा पूर्ण उध्दवस्त होत आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे महाराष्ट्र डिस्टलरी कंपनीचे सांडपाणी या इमारतीच्या पायात घुतले त्यामुळे या इमारतीस तडे जात आहेत. मागील दोन महिन्यापूर्वी या इमारतीचे जवळून पाईप लाईन टाकण्याचे काम करण्यांत येत होते. याची

माहिती मा. आयुक्त व शहर अभियंता यांना दिली . त्यावेळी संबंधित कंपनी किंवा गुत्तेदार यांना मनपाची परवानगी घेंतली नव्हती म्हणून सदर खर्च वसूल झाला का ? खुलासा व्हावा.

**शहर अभियंता :** स.स.यांनी उपस्थित केलेल्या प्रशनाचे संदर्भात खर्च वसूलीबाबतच्या पत्राचा मसुदा तयार करण्यात आला आहे.

**श्री.हमीदउद्यीन ताबा:** काही दिवसांपूर्वी एक नगरसेवकांनी निविदा हिसकावल्या अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली आहे. या विषयी खुलासा करावा.

**मा.सभापती :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे असा प्रकार घडला असेल तर ती मान्य नाही. सध्या मनपामध्ये मुख्य लेखा परिक्षक यांचेकडे निविदा स्विकारण्याचे अधिकार आहेत असे प्रकार घडू नये यादृष्टीने विचार झाल्यास निविदा स्विकारण्याचे अधिकार यापुढे मनपा आयुक्तांपुढे देण्याबाबत विचार करावा लागेल.

**श्री.हमीदउद्यीन ताबा:** गेल्या एक वर्षापासून जकात विभागाचा फोन बंद आहे. त्यामुळे जकात विभागाच्या कामावर परिणाम होत आहे. याशिवाय जकात अधिक्षक पदाचा पदभार ४ महिने पासून प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे आहे. याबाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** जकात विभागाचे अधिक्षक श्री.कुलकर्णी हे रजेवर असल्यामुळे अधिक्षक पदाचा भार प्रशासकीय अधिकारी यांचेकडे दिला आहे. दुसरा मुद्या फोन बाबतचा आहे तर जकात विभागाकरीता आपणा सर्वांची संमती असेल तर वायरलेस सेट बसविण्याचा विचार आहे. हा वायरलेस सेट आधुनिक पध्दतीचा असेल यात या नाक्यावरून त्या नाक्यावर फोन करता येईल. वायरलेस एक कनेक्शन मा. महापौर / मा.आयुक्त व मा. सभापती यांचेकडे जोडलेले असतील त्यामुळे वायरलेसवर कोणत्या नाक्यावर कोणत्या काय संभाषण चालले आहे याची माहिती मिळेल . वायरलेसचे मुख्य कनेक्शन सेंट्रल नाका येथे राहिल व जकात निरिक्षक यांचेकडे वॉकीटॉकीचे कनेक्शन राहील.

**डॉ.विजयकुमार मेहेर:** जकात नाक्यावर दुरध्वनी असणे अत्यंत आवश्यक आहे. एखादया व्यापाऱ्याला त्याची ट्रक केव्हा येणार किंवा ज्या व्यापाऱ्याला माल आला आहे त्याचेशी वाहन चालकाला सूपूर्द करणे यासाठी जकात नाक्यावर फोन असणे अत्यंत गरजेचे आहे.

**मा.सभापती :** जकात नाकयावर फोनची सुविधा असेल तर त्याचा दुरूपयोग होतो, याशिवाय वाहन चालक नजिकच्या (खाजगी) दुरध्वनी वरून व्यापाऱ्यांशी संपर्क करू शकतात.

**डॉ.विजयकुमार मेहेर:** जकात नाक्यावर फोन असणे गरजेचे आहे. वाटल्यास या दुरध्वनीला एस.टी.डी. ची सुविधा ठेवण्यांत येवू नये.महानगरपालिका अनेक फोन वापरते त्यात एक फोन जकात विभागासाठी ठेवणे आवश्यक आहे. आवश्यकता वाटल्यास त्यास कुलुप ठेवण्यांत यावे.

**डॉ.भागवत कराड:** जकात विभागाचा फोन बंद झाल्या पासून जकात उत्पन्नात काही फरक पडला आहे.

**मा.सभापती :** जकात विभागाचा फोन बील न भरल्यामुळे काढला नसून त्याचा दुरूपयोग होत होता म्हणून काढला आहे. फोन काढल्यामुळे जकात उत्पन्नात फार मोठा फरक पडला आहे. सर्व सभासदांनी वाढीचा विकासाचा जसा विचार

करतो त्याच प्रमाणे महानगरपालिका तिजोरीत भर कशी पडेल याचाही विचार करावा.

**श्री.रशिद खान (मामू):** छावणी आठवडी बाजाराची हर्रासी होतांना त्या रिंग करण्यात आली त्यामुळे नेहमी २० लाख रूपये उत्पन्न देणारा छावणीचा आठवडी बाजार यामुळे यावेळी १२ लाख रूपयात हर्रास झाला. छावणीच्या आठवडी बाजाराचा काही शेअर्स महानगरपालिकेला मिळतो. रिंग पध्दती हर्रास झाल्यामुळे यातुन मिळणारा महानगरपालिका शेअर्स सुध्दा कमी मिळणार आहे. तेव्हा या हर्रासीची चौकशी करण्यांत यावी असा ठराव घेण्यात यावा. यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

**मा.सभापती :** मा. उप आयुक्त यांनी पुढील बैठकीत सदर प्रकरणी माहिती द्यावी.

**विषय :२/१**

दिनांक २४.५.१९९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव:**

दिनांक २४.५.९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय : ३/२**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, गारखेडा येथील जयभवानी को.ऑ.हौ.सोसायटी येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दर सुचीनुसार रक्कम रू.१,९२,५९६/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च भांडवली कामाची तरतुदीमधून करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा येथील जयभवानी नगर कॉ.ऑ.हौ.सोसायटी येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची जलवाहीनी टाकण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या परिसर अभियांत्रिकी विभाग दरसुचीनुसार ९४-९५ नुसार रक्कम रू.१,९१,५९६/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच हा खर्च भांडवली कामाची तरतुद म्हणून करण्यात मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय :४/३**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, गारखेडा येथील एस.टी.कॉलनी येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दर सुचीनुसार र.रू.२,७०,०३०/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधून करण्यात येणार आहे. ारी अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा येथील एस.टी.कॉलनी येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता परिसर अभियांत्रिकी विभागाच्या सन

९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रू. २,७०,०३०/- च्या अंदाजपत्रकास व सदरचे काम भांडवली कामाच्या तरतुदीमधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्याते येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय :५/४**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, राहुलनगर येथे १०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाच्या सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.१,८१,९८९/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधून करण्यांत येणार आहे. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राहुलनगर येथे १०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकण्याचे कामा करीता परिसर अभियांत्रिकी विभगाचाी दरसुचीनुसार सन ९४-९५ तयार करण्यांत आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रू.१,८१,९८९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. ैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय :६/५**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, भवानीनगर येथे १०० ते १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.१,०३,३००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरच्या कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधून करण्यांत येणार आहे. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भवानीनगर येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता परिसर अभियांयत्रिकी विभाग सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.१,०३,३००/- च्या अंदाजपत्रकास व सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधून करण्यांत सर्वानुमते मंजुरी देण्यात`यते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय :७/६**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, शास्त्री नगर येथे १०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभिंयांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.२,४२,५५५/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली तरतुदीमधून करण्यांत येणार आहे. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शास्त्री नगर येथे १०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.२,४२,५५५/-च्या अंदाजपत्रकास व सदर कामाचा खर्च भांडवली तरतुदी मधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय :८/७**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, चाऊस कॉलनी शहाबाजार येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रू. २,९५,६००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतुदीमधून करण्यांत येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चाऊस कॉलनी शहाबाजार येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रू. २,९५,६००/- एवढयाचे अंदाजपत्रकास व सदर कामाचा खर्च हा भांडवली तरतुदीमधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय:९/८**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, पहाडसिंगपूरा येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.२,७१,७००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतुदीमधून करण्यांत येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पहाडसिंगपूरा येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.२,७१,७००/- ला व सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतुदीमधून करण्यांस सर्वानुमते मुंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय : १०/०९**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, उल्कानगरी येथे १०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकावयाची आहे. तयासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार र.रू.१,७२,७५७/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतुदीमधून करण्यांत येणार आहे. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उल्कानगरी येथे १०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार र.रू.१,७२,७५७/- एवढयाचे अंदाजपत्रकास व सदर कामाचा खर्च भांडवली कामाच्या तरतुदीमधून सर्वानुंमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय : ११/१०**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, ठाकुरदास गिरणी येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहीनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची ९४-९५ च्या दरसुचीनुसार र.रू.१,७८,२००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतुदमधून करण्यांत येणार आहे. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ठाकुरदास गिरणी येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहीनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची ९४-९५ च्या दरसुचीनुसार र.रू.१,७८,२००/- एवढयाचे अंदाजपत्रकास व सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतुदमधून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय : १२/११**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, रेल्वे स्टेशन हमालवाडा येथील १०० व १५० मी.मी.व्यासाची ए.सी. जलवाहीनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसुची नुसार रक्कम रू.४,४४,०७७/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधून करण्यांत येणार आहे. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. रेल्वेस्टेशन हमालवाडा येथे १०० ते १५० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकण्याच्या कामासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.४,४४,०७७/- च्या अंदाजपत्रकास व सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतुदीमधून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय : १३/१२**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, गारखेडा येथील गुरूकृपा व दत्तकृपा हौ.सो.येथील १०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकावयाची आहे त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.२,६०,२७५/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधून करण्यांत येणार आहे. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा येथील गुरूकृपा व दत्तकृपा हौ.सो.येथील १०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकावयाची आहे त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.२,६०,२७५/- एवढयाचे अंदाजपत्रकास व सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय : १४/१३**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे, शहानुरवाडी येथील शिवराज को.ऑ.हौ. सोसायटी येथे १०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.१,०४,६४५/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधून करण्यात येणार आहे. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहनुरवाडी येथील शिवराज को.ऑ.हौ. सोसायटी येथे १०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.१,०४,६४५/- एवढयाचे अंदाजपत्रकास व सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधून करण्यांत सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय: १५/१४**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, जलशुध्दीकरण केंद्र हर्सुल व विविध जलकुंभावरील जलशुध्दीकरणासाठी सन १९९६-९७ हया वित्तीय वर्षामध्ये ५० मेट्रीक टन तुरटी (निरंजन पावडर) खरेदी करावयाची आहे. त्यासाठी रक्कम रू.१,५२,८००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून मा. आयुक्त यांची मंजुरी घेण्यांत आलेली आहे.

तरी ५० मेट्रीक टन तुरटी ही दैनिक वर्तमान पत्रात निविदा प्रसिध्द करून उत्पादक किंवा अधिकृत विक्रता यांचेकडून निविदा मागवून खरेदी करण्यांतस अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जलशुध्दीकरण केंद्र हर्सुल व विविध जलकुंभावरील जलशुध्दीकरणासाठी सन १९९६-९७ हया वित्तीय वर्षामध्ये ५० मेट्रीक टन तुरटी खरेदीस (निरंजन पावडर) खरेदी करावयाची आहे.त्यासाठी रक्कम रू.१,५२,८००/- ला व सदर तुरटी खरेदी करण्यांकरीता दैनिक वर्तमान पत्रात निविदा प्रसिध्द करून उत्पादक किंवा अधिकृत विक्रता यांचेकडून निविदा मागवून खरेदी- करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय :१६/१५**

कार्यकारी अभियंता यांनी महानगरपालिका विभाग क्र.३ अंतर्गत प्रभाग "अ" मधील देखभाल व दुरूस्तीसाठी महाराष्ट्र परिसर अभियांत्रिकीचे सन ९४-९५ चे दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रू.२,८१,८००/-चे तयार करण्यात आले आहे.

सदरील काम देखभाल दुरूस्ती सन ९६-९७ या लेखा शिर्षातून प्रस्तावित आहे. सदरील कामास मा. आयुक्तांनी दिनांक १५-६-९६ ला प्रशासकीय मंजुरी दिली आहे.

तरी सदरील प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका विभाग क्र.३ अंतर्गत विभाग क्र.३ अंतर्गत प्रभाग"अ"मधील देखभाल व दुरूस्तीसाठी महाराष्ट्र परिसर अभियांत्रिकीचे सन ९४-९५ चे दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रू.२,८१,८००/-ला व

सदरचे काम कामाचा खर्च सन ९६-९७ या लेखा शिर्षातून देखभाल व दुरूस्ती या तरतुदी मधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय :१७/१६**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांना महानगरपालिका विभाग क्र.३ अंतर्गत प्रभाग "ब" करीता अस्तित्वात असलेल्या गटारींची देखरेख व दुरूस्तीच्या कामाकरीता सन ९६-९७ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र परिसर अभियांत्रिकी सन ९४-९५ चे दरसुचीनुसार रक्कम रू.२,३२,०००/- चे अंदाजपत्रक सादर केले आहे.

सदरील काम देखभाल व दुरूस्ती सन ९६-९७ या शिर्षकातून प्रस्तावित आहे. सदरील कामास मा. आयुक्तांनी दिनांक १५.६.९६ ला मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव मंजुरी विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका विभाग क्र.३ अंतर्गत प्रभाग "ब" करीता अस्तित्वात असलेल्या गटारींची देखरेख व दुरूस्तीच्या कामाकरीता सन ९६-९७ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र परिसर अभियांत्रिकी सन ९४-९५ चे दरसुचीनुसार रक्कम रू.२,३२,०००/- च्या अंदाजपत्रकास व सदरील काम सन ९६-९७ करीता असलेल्या देखभाल व दुरूस्तीच्या लेखा शिर्षातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय : १८/१७**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.ठाकूरदास जिनिंग मिल येथे १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. जलनिलःस्सारण वाहिनी टाकणेच्या कामाकरीता परिसर अभियांत्रिकी विभागाची दर सुची ९४-९५ च्या मंजुर दरपत्रकानुसार अंदाजपत्रक रक्कम रू.२,०६,०००/- चे तयार करण्यांत आले आहे.

सदरील काम भांडवली तरतुद १९९६-९७ या लेखा शिर्षातून प्रस्तावित आहे. सदरील प्रस्तावात मा. आयुक्तांनी दिनांक ३.६.९६ ला मंजुरी दिली आहे तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.ठाकुरदास जिनिंग मिल येथे १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. जलनिःस्सारण वाहिनी टाकण्याच्या कामाकरीता परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुचीनुसार ९४-९५ तयार करण्यांत आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रू.२,०६,०००/- सर लेखा शिर्षातून करण्यांस सर्वानुमते मंजुरी घेण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय : १९/१८**

कार्यकारी अभिंयता पाणी पुरवठा व जलनिःस्सारण यांनी प्रस्ताव सादर केला कि, महानगरपालिका विभाग क्र.३ अंतर्गत प्रभाग "क" साठी अस्तित्वात असलेल्या ड्रनेज लाईनची देखभाल व दुरूस्तीसाठी सन ९४-९५ या दरसुचीनुसार परिसर अभियांत्रिकी च्या सन १९९६-९७ या आर्थिक वर्षासाठी अंदाजपत्रक रक्कम रूपये ३,८६,५००/- खर्चाचे तयार केलेले आहे.

सदरील प्रभागामध्ये चेलीपूरा चौक मार्ग ते आझाद चौक, किराडपूरा कटकटगेट , सिध्दार्थनगर, फुलेनगर, हर्सुल , गणेशकॉलनी इत्यादी मोहल्ल्याचा अस्तित्वात असलेल्या जलनिःस्सरण वाहिनीचा देखभाल व दुरूस्तीवर खर्च होणार आहे.

सदरील प्रस्तावास मा. आयुक्तांनी दिनांक ११.६.९६ ला मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका विभाग क्र.३ अंतर्गत प्रभाग "क" साठी अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज लाईनची देखभाल व दुरूस्तीसाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ दरसुची नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रूपये ३,८६,०००/- ला व सदर कामाचा खर्च सन ९६-९७ या आर्थिक वर्षात असलेल्या तरतुद मधून करण्यांस व या प्रभागामध्ये चेलीपूरा चौक मार्ग ते आझाद चौक, किराडपूरा, कटकटगेट, सिध्दार्थनगर, फुलेनगर, हर्सुल, गणेश कॉलनी इत्यादी मोहल्ल्यात करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय :२०/१९**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःस्सारण यांनी महानगरपालिका विभाग क्र.३ मधील प्रभाग "ब" साठी १९९६-९७ या आर्थिक वर्षासाठी अस्तित्वात असलेल्या जलनिःस्सारण वाहीनीची दुरूस्ती व देखभाल करणेसाठी परिसर अभियांत्रिकीच्या सन ९४-९५ चे दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कम रू.४,२१,०००/- इतक्या रक्कमेचे सादर केलेले आहे. सदरील काम देखभाल व दुरूस्ती ९६-९७ या शिर्षकाखाली प्रस्तावित आहे.

सदरील प्रस्तावास मा. आयुक्तांनी दिनांक १५.६.९६ ला मंजुरी दिलेली आहे तरी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र.३ मधील प्रभाग "ब" साठी १९९६-९७ या आर्थिक वर्षासाठी अस्तित्वात असलेल्या जलनिःस्सारण वाहीनीची दुरूस्ती व देखभाल करणेसाठी परिसर अभियांत्रिकीच्या विभागाचे दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेल्या अंदाजपत्रकीय रक्कम रू.४,२१,०००/- ला व सदर काम ९६-९७ करीता असलेल्या देखभाल व दुरूस्ती या लेखा शिर्षातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय : २१/२०**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःस्सारण यांनी महानगरपालिका विभाग क्र.३ मधील प्रभाग "अ" मध्रील ड्रेनेज लाईनचा सन १९९६-९७ या आर्थिक वर्षात देखभाल व दुरूस्ती काम करण्यासाठी परिसर अभियांत्रिकीच्या सन ९४-९५ चे दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कम रू.३,९७,०००/-चे तयार कराण्यात आले आहे.

सदरील काम देखभाल व दुरूस्ती ९६-९७ मधून प्रस्तावित असून मा. आयुक्तांनी दिनांक १५.६.९६ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे तरी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका विभाग क्र.३ अंतर्गत प्रभाग"अ" मधील अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज लाईनची सन ९६-९७ या आर्थिक वर्षात देखभाल व दुरूस्तीची काम करण्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ नुसार तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रू.३,९७,०००/- ला व सदर कामाचा खर्च हा सन ९६-९७ या

वर्षाकरीता असलेल्या देखभाल व दुरूस्तीच्या लेखा शिर्षातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय : २२/२१**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:स्सारण यांनी महानगरपालिका विभाग क्र.३ मधील प्रभाग "क" मधील अस्तित्वात असलेल्यागटारींची देखभाल दुरूस्तीसाठी अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,९१,०००/- चे महाराष्ट्र परिसर अभियांत्रिकी चे सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले आहे.

सदरील काम देखभाल व दुरूस्ती ९६-९७ च्या लेखा शिर्षातून प्रस्तावित असून सदरील कामास मा. आयुक्तांनी दिनांक १५.६.९६ ला प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. तरी सदरील प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका विभाग क्र.३ अंतर्गत प्रभाग "क" मधील अस्तित्वात असलेल्या गटारींची देखभाल व दुरूस्ती साठी महाराष्ट्र परिसर अभियांत्रिकी सन ९४-९५ चे दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.१,९१,०००/- ला व सदर कामाचा खर्च हा सन ९६-९७ या वर्षाकरीता असलेल्या
देखभाल व दुरूस्ती या लेखा शिर्षातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३/२२**

मा.कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, उल्कानगरी येथे मालखरे गार्डन समोर दगडी गटार बांधणे बाबत या कामासाठी रू.२,०७,५००/- चे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी यांचें दरसुची ९४.९५ नुसार बनवण्यात आलेले आहे.

तरी उपरोक्त कामासाठी बनविण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय रक्कम रू.२,०७,५००/- स मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उल्कानगरी येथे मालखरे गार्डनसमोर दगडी गटार बांधणेच्या कामासाठी परिसर अभियांत्रिकी यांची सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रू.२,०७,५००/- ला सर्वानुमकते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४/२३**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, बायजीपूरा येथील मनपा यांत्रिकी कार्यशाळेमध्ये नविन रोड आणि रूम बांधणेच्या कामासाठी सन ९५-९६ च्या सा.बां. खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रू.३,५०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून मा. आयुक्तांनी दिनांक ३१.५.९६ ला स्थायी समिती समोर ठेवण्याकरीता मंजुरी दिलेली आहे.

सबब सदर कामासाठी रक्कम रू.३,५०,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर. सदरचा खर्च व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षामधून सन ९६-९७ या वर्षात करण्यात येईल.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार बायजीपूरा येथील मनपा यांत्रिकी कार्यशाळेमध्ये नविन शेड आणि रूम बांधणेच्या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रू.३,५०,०००/- ला व सदरचा खर्च व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षामधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५/२४**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.इंदिरानगर बायजीपूरा वार्ड क्र. २३ स्लम येथील उर्वरित रस्त्याचे खडीकरण करणे बाबतच्या कामाकरीता सा.बां.खातेच्या वर्ष ९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रू. २,५१,१९७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदरील काम खडी रस्ते आणि कलव्हर्ट रू.४५.०० लाख या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांना दिनांक २६.२.९६ ला प्रशासयकीय मान्यता दिली आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रक्कम रू.२,५१,१९७/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.इंदिरानगर बायजीपूरा वार्ड क्र.२३ स्लम येथील उर्वरित रस्त्यांचे खडीकरण करणे बाबत सा. बां. खात्याचे सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेले रक्कम रू.२,५१,१९७/- च्या अंदाजपत्रकास व सदर कामाचा खर्च खडी रस्ते आणि कल्व्हर्ट रू.४५.०० लाख या शिर्षकातून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६/२५**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.भिमनगर भावसिंगपूरा स्लम येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण व नविन डांबरीकरण करणे बाबत कामा करीता सा.बां. खात्याच्या सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रू.११,३६,३००/-( अकरा लक्ष छत्तीस हजार तिनशे) चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचे खर्च पुर्नखडीकरण रू.१०० लाख या शिर्षकामतून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दिनांक १२.२.९६ ला प्रशासकीय मान्यता दिली असून प्रस्तावित कामासाठी निविदा पत्रके मागविण्यांत आली असता अंतिम तारखे पर्यंत एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १ | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ९.५६% कमी |
| २ | पी.जे.तमखाने | ७.९७% कमी |
| ३ | खाजा मोईनोद्दीन | दर लिहिलेले नाही. |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.५६ % कमी दराची निविदा श्री. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची आहे. करीता अंदाजपत्रक रक्कम रू.११,३६,३००/- व सदर कामाची एजन्सी श्री.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.५६% कमी दराची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.भिमनगर भावसिंगपूरा स्लम येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण व नविन डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रूपये ११,३६,३००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.५६% कमी दराच० तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.६६% कमी दराचे गुत्तेदार श्री.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७/२६**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, मो.शारदाश्रम कॉलनी येथे वाचनालय बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.३५९/१८/ दिनांक ६.१.९६ अन्वये र.रू.३,७३,७५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदर काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/६३/ दिनांक १९.२.९६ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा भरून प्राप्त झाल्या त्या दिनांक १४.३.९६ ला उघडण्यांत आल्या, त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.आर.एल.बारवाल | ८% जास्त दराने |
| २ | श्री.मे.अमित कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने |
| ३ | श्री.सिध्दीकी एस.झेड | १.०९% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०९% कमी दराची श्री.एस.झेड सिध्दीकी यांची निविदा आहे. सबब सदर कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०९% कमी दराची श्री.एस.झेड.सिध्दीकी यांची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

सदर स्थळाची पहाणी करण्यांत यावी. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.२८/२७**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, मो.रमानगर येथे ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. अर्धगोलाकार गटार बांधणे व अस्तित्वात असलेली गटार दुरूस्त करणे करीता र.रू.७,९५,१००/- चे अंदाजपत्रक सा.बां. खात्याच्या सन ९४-९५ च्या दर सुची नुसार तयार करण्यांत आले असून मा. आयुक्त यांनी दिनांक १.१२.९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून सदरील कामाकरीता स्थानिक वर्तमान पत्रात पसिध्दी देवून प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांक २६.२.९६ पर्यंत एकूण सात कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारणेच्या तारीख ४.३.९६ रोजी एकूण तीन मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या, त्या दिनांक १४.३.९६ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडल्या असता गुत्तेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.शेख उमर | अं.प. दरापेक्षा ०.१० % कमी |
| २ | मे.ट्री स्टर कन्स्ट्रक्शन | अं.प. दरापेक्षा ५ % जास्त |
| ३ | श्री.आर.एल.बारवाल | अं.प. दरापेक्षा ७ % जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री शेख उमर यांची निविदा आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. रमानगर येथे ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. अर्धगोलाकार गटार बांधणे व अस्त्त्विात असलेली गटार दुरूस्त करणे करीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराचे गुत्तेदार श्री. शेख उमर यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२९/२८**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, मो. ढोरपूरा येथील अस्थ्तित्वात असलेली तळ मजल्याची इमारत तोडून त्या जागेवर शाळेसाठी यपुन्हा तळमजला व पहिला मजला बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.४९७/४५ दिनांक २९.२.९६ अन्वये र.रू.४,६७,५००/-च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरील काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेख/नि/७०/९६/ दिनांक १४.३.९६ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण चार निविदा विक्री झाल्या निविदा सिवकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण फक्त एकच निविदा दर भरून प्राप्त झाली. ती दिनांक ८.४.९६ ला उघडण्यात आली असता श्री.एस.झेड सिध्दीकी यांची अ.प. दरापेक्षा १.०९% कमी दराची असून त्यास मा. आयुक्तांनी दिनांक १४.५.९६ ला मंजुरी दिली आहे. सबब सदर कामासाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०९% कमी दराची श्री.एस.झेड सिध्दीकी यांची निविदा स्विकारणेस प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : प्रस्तावित मोहल्याचे पुर्वीचे नांव बदलण्याचा ठराव सर्वसाधारण सभेत मंजुर झालेला आहे त्या प्रमाणे संबंधित विभागाने नोंद घेवून कार्यवाही करावी.

ठराव: प्रस्तुत कामाची स्थळ पाहणी करण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.३०/२९**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, हनुमाननगर येथे १०० व १५० मी मी. व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रू. ७,०३,१८०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले होते त्यास सर्वसाधारण सभा ठराव क्र.१०७/२८ अन्वये सदर भागात विशेष पाणी पुरवठा योजना राबविण्यास मंजुरी देण्यांत आलेली आहे.

कार्यालयीन निविदा सूचना क्र.५८७९५-९६ जी की दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दीस देंण्यांत बी-१ निविदा मागविण्यांत आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण ११ कोऱ्या निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण चार सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.मो.अहमद सिध्दीकी | १६% कमी |
| २ | श्री.बी.ए.काल्डा | १८.८० % कमी |
| ३ | मे.खर्डीकर कन्स्ट्रक्शन | ११.५१ % कमी |
| ४ | मे.रामेश्वर कन्स्ट्रक्शन | २३.२१ % कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.२१% कमी दराची श्री.रामेश्वर कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. तरी रामेश्वर कन्स्ट्रक्शन यांची अं.प. दरापेक्षा २३.२१% कमी दराची निविदा स्विकृतीस प्रस्ताव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हनुमान नगर येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.२१% कमी दराचे मे.रामेश्वर कन्स्ट्रक्शन यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३१/३०**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, पुंडलिकनगर पार्ट "अ" व मातोश्रीनगर येथे १००,१५०,२५०,३००,३५०,४०० व ६०० मी.मी. व्यासाची ए.सी. व सी.आय. जलवाहिनी टाकणेच्या कामा करीता परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार र.रू.१४,४३,२६०/- चे अंदाजपत्रकास सर्व साधारण सभेस ठराव क्र.१०७/२८ अन्वये सदर भागात विशेष पाणी पुरवठा योजना राबविण्यास मंजुरी देण्यांत आलेली आहे.

कार्यालयीन निविदा सुचना क्र.५०/९५-९६ (बी-१) जी की, दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दीस देवून बी-१ निविदा मागविण्यांत आल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण सहा कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण दोन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १ | मे.पारस कन्स्ट्रक्शन कं.१०% जास्त | |
| २ | श्री.एस.एम.हक्क | ०.०१% कमी |

वरील तुलनात्मकदृष्या सर्वात कमी दर श्री.एस.एम.हक्क यांची आहे परंतु त्यांचा दर कार्यालयात जास्त वाटल्यामुळे मा. आयुक्तांच्या दालनात दराबाबत वाटाघाटी करण्यांत आल्या. त्यामध्ये सदरचे काम २% कमी हया दरामध्ये ठेकेदार तयार असल्याने त्यांनी लेखी दिले असून मा. आयुक्तांनी त्यास मान्यता दिलेली आहे. करीता वाटाघाटी अंतीच्या दराची म्हणजेच अ.प.दरापेक्षा २% कमी दराची श्री.एस.एम.हक्क यांची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पूंडलिक नगर पार्ट "अ" व मातोश्री नगर येथे १००,१५०,२५०,३००,३५०,४०० व ६०० मी.मी. व्यासाची ए.सी.व सी.आय.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व वाटाघाटी अंतीच्या दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराचे गुत्तेदार श्री.एस.एम.हक्क यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२/३१**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, मो.रोजेबाग स्लम येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन ९४-९५ च्या दर सुचीनुसार र.रू. ३,९२,२११/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम पुनडांबरीकरण रू.१००.०० लाख या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दिनांक १२.२.९६ ला प्रशासकीय मान्यता दिली असून प्रस्तावित कामासाठी निविदा पत्रके मागविण्यांत आली असता अंतिम तारखेपर्यंत एक निविदा प्राप्त झाली आहे. त्याचा दर अ.प.दरापेक्षा ५% कमी असून श्री.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची आहे.

तरी सदरील कामा करीता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रू.३,९२,२११/- व सदरील कामाची एजन्सी श्री.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.रोजेबाग स्लम येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामा करीता सा.बां. खात्याच्या दरसुची सन ९४-९५ नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.३,९२,२११/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी प्राप्त झालेल्या रक्कम रू.३,९२,२११/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराचे गुत्तेदार श्री. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३/३२**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, सेव्हन हिल कॉर्नर ते पुंडलिक नगर येथील जलकुंभापर्यंत ५०० मी.मी. व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकावयाची आहे, त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९४-९५ च्या दर सुचीनुसार रक्कम रू.७,९८,७९८/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर भागात विशेष पाणी पुरवठा योजना द्वारे जलवाहिनी टाकण्याच्या कामास सर्व सारधारण सभेचा ठराव क्र.१०७/२८ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे.

कार्यालयाची बी.१ निविदा सुचना क्र.५८/९५-९६ जी की दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दीस देण्यांत येवून बी-१ निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण (चार)४ कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस दोन (२) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.व्ही.आर महाजन | अंदाजपत्रकीय दराने |
| २ | श्री.कुलवंतसिंग | ८% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया कमी दर श्री.व्ही.आर महाजन यांचे आहे परंतु त्यांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे मा. आयुक्त यांच्या दालनात दरा बाबत वाटाघाटी करण्यासाठी बोलावण्यांत आले असता ठेकेदार श्री.व्ही.आर महाजन यांची वाटाघाटी अंतीचा दर म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी हया दरामध्ये काम करण्यास तयार असल्याचे लेखी दिले त्यास मा. आयुक्त यांचे मंजुरी घेण्यांत आलेली आहे.

तरी ठेकेदार श्री.व्ही.आर महाजन यांची वाटाघाटी अंतीचा दर म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सेव्हनहिल कॉर्नर ते पुंडलिकनगर येथील नियोजित जलकुंभा पर्यंत ५०० मी.मी. व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व वाटाघाटी अंतीचा दर म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराचे गुत्तेदार श्री.व्ही.आर. महाजन यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३४/३३**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, पुंडलिकनगर पार्ट बी व गजानन नगर येथे १००,१५०,२००,२५०,३०० मी.मी. व्यासाची ए.सी.व सी.आय.जलवाहिनी टाकणे आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९४-९५ च्या दर सुचीनुसार रक्कम रू. १७,४०,६४०/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले. सदर भागात विशेष पाणी

पुरवठा योजना द्वारे जलवाहिनी टाकण्याच्या कामास सर्वसाधारण सभेचा इराव क्र.१०७/२८ अन्वये मंजुरी देण्यांत आली आहे. कार्यालयाची बी-१ निविदा सुचना क्र.५८/९५-९६ जी कि, दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दीस येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या.कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण नऊ (९) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस दोन (२) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | बी.ए.काल्डा | १३.८०% कमी |
| २ | मे.खर्डीकर कन्स्ट्रक्शन | ११.६८% कमी |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया कमी दर हा श्री.बी.ए.काल्डा यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.८०% कमी असा दर दिलेला आहे.

तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.८०% कमी दराची श्री.बी.ए.काल्डा यांची निविदा स्विकृतीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पुंडलिकनगर पार्ट बी गजाननगर येथे १००,१५०,२००,२५०,३०० मी.मी. व्यासाची ए.सी.व सी.आय. जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.८०% कमी दराचे गुत्तेदार श्री.बी.ए.काल्डा यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३५/३४**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, मो.कटकटगेट वार्ड क्र.३३ मनपाच्या मोकळया जागेवर फंक्शन हॉल बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक ८.३.९६ ठराव क्र.५३८/३ अन्वये रक्कम रू.५,००,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर काम हाती घेण्यासाठी कार्यालयाने बी-१ निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/७०/९६ दिनांक १४.३.९६ अन्वये निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण ६ निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (३) निविदा दर भरून प्राप्त झाल्या त्या दिनांक ८.४.९६ ला उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.एस.ए. नवाब | ५.३% कमी दराने |
| २ | श्री.कादरी एस.क्यु. | १.६५% कमी दराने |
| ३ | श्री.शेख मुजिब मुसा | ८ % कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% कमी दराची श्री.शेख मुजीब मुता यांची निविदा आहे. सदरच्या हॉलला विविध मंजुरीचा प्रस्ताव मा. आयुक्तांकडे सादर केला असता मा. आयुक्तांनी सदरच्या फंक्शन हॉल "बहुउद्येशिय सभागृह " या नावाने मंजुरीसाठी प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवा असे दिनांक ३०.५.९६ ला आदेशित केले. सबब सदर फंक्शन हॉलला "बहुउद्येशिय सभागृह" संबोधण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ सादर तसेच सदर कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% कमी दराची श्री.शेख मुजिब मुता यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तुत कामाची स्थळ पाहणी करावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.३६/३५**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, दादा कॉलनी (कैलासनगर) येथे दवाखान्यासाठी व वाचनालयासाठी इमारत बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.३४८/७ दिनांक ६.१.९६ अन्वये रक्कम रूपये ४,५०,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/७०/९६ दिनांक १४.३.९६ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखे पर्यंत एकूण फक्त एकच निविदा दर भरून प्राप्त झाली ती दिनांक ८.४.९६ ला उघडण्यात आल्या सदरची निविदा मे.अंबावाला ए.एच.एन.यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची आहे. एकच निविदा प्राप्त झाल्याने स्पर्धात्मक दर प्राप्त झाले नाहीत त्यामुळे संबंधितास आणखी दर कमी करण्यासाठी मा.आयुक्तांचे दालनात दराचे वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले दिनांक ३.६.९६ ला मा. आयुक्त यांचे समवेत दराचे वाटाघाटी होवून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% दराऐवजी २% कमी दराने करण्याबाबत मा. आयुक्तांनी दिनांक ३.६.९६ अन्वये मंजुरी दिली व त्यास मक्तेदाराने ही लेखी संमती दिली.

सबब सदर कामासाठी प्राप्त निविदा मे.अंबावाला ए.एच.एन. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% (दराचे वाटाघाटी अन्वये) दराची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तुत कामाची स्थळ पाहणी करण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.३७/३६**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, मो.सिध्दार्थ नगर नविन ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. गटार बांधणे, दगडी गटार बांधणे आणि अस्तित्वात असलेल्या गटाराची विशेष दुरूस्ती करणे या कामा करीता रक्कम रू.४,४५,१००/- चे अंदाजपत्रक सा.बां. विभाग औरंगाबाद यांची दर सहुची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यांत आले असून मा. आयुक्त यांनी दिनांक २१.२.९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून सदरील कामा करीता कार्यालयाची प्रकट निविदा सुचना क्र.मनपा/मुलेप/नि/७०/९६ दिनांक १४.३.९६ अन्वये मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांक १९.३.९६ पर्यंत एकूण (२४) चोवीस कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या अंतिम तारखे पर्यंत पाच (५) निविदा मोहरबंद प्राप्त झाल्या व त्या खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.एम.एन.हक्क | २२.३% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| २ | श्री.अब्दुल खालेक | १९.१% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| ३ | श्री.मो.रऊफ | १९.१% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| ४ | मे.जयश्री कन्स्ट्रक्शन | १७.६५% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| ५ | मे.ट्री स्टार कन्स्ट्रक्शन | १६.२% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |

वरील निविदा दिनांक ८.४.९६ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.३% अंदाजपत्रकीय दराची असलेली निविदा श्री.एम.एन.हक्क यांची निविदा आहे. करिता विचारार्थ सादर.

**ठराव:** प्रस्तुत प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.३८/३७**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.भिमनगर भावसिंगपूरा स्लम येथे नविन अर्धगोलाकार गटार बांधणे व गटारीची दुरूस्ती करणे बाबत कामा करीता सा.बां. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार रू. २,५०,७६९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम ५% कमकुवत घटक योजना रू.५०.०० लाख या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दिनांक १८.४.९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामा करीता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रू. २,५०,७६९/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. भिमनगर भावसिंगपूरा स्लम येथे नविन अर्धगोलाकार गटार बांधणे व गटारीची दुरूस्ती करणे बाबतचे कामा करीता सा.बां. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दर सुचीनुसार तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू. २,५०,७६९/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३९/३८**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.हमालवाडा स्लम भागात डांबरी रस्ते तयार करणे करीता रक्कम रू.६,२८,०००/- चे अंदाजपत्रक सा.बां.विभाग , औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यांत आले असून मा. आयुक्त यांनी दिनांक ५.६.९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामाकरीता महानगरपालिकेच्या सन ९६-९७ अर्थसकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत "डांबरीरस्ते " या शिर्षाअंतर्गत ७०.०० लाखाची तरतुद केली आहे. करीता प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. हमालवाडा स्लम भागात डांबरी रस्ते तयार करणेंच्या कामाकरीता सा.बां.विभाग औरंगाबाद यांचे दर सुची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.६,२८,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४०/३९**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो. समता नगर (दक्षिण) भागात गल्लीमध्ये शहाबाद फरशी बसविणे या कामाकरीता अंदाजपत्रक रक्कम रू.१,२८,३००/- सा.बा.विभाग ,औरंगाबाद यांचठी दरसुची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यांत आले असून मा.आयुक्त यांना दिनांक ६.६.९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदरील कामाकरीता महानगरपालिकेचे सन ९६-९७ अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत "खांडकी (फरशी) रस्ते" या शिर्षाअंतर्गत १८,००,०००/- तरतुद केली आहे. प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.समतानगर (दक्षिण) भागात गल्लीमध्ये शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरीता सा.बा. विभाग, औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.१,२८,३००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१/४०**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि , मो. क्रांतीनगर स्लम भागात डांबरी रस्ते तयार करणे करीता रक्कम रू.४,६२,०००/- चे अंदाजपत्रक सा.बां.विभाग औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामा करीता महानगरपालिकेच्या ९६-९७ अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत "डांबरी रस्ते " या शिर्षा अंतर्गत रू.७०.०० लाखाची तरतुद केली आहे.प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.क्रांतीनगर स्लम भागात डांबरी रस्ते तयार करणेचे कामा करीता सा.बां. ,औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये ४,६२,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४२/४१**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.क्रांतीनगर स्लम भागात शहाबाद फरशी गल्ल्यामध्ये बसविणे करीता रक्कम रू. २,१९,५००/- चे अंदाजपत्रक सा.बां. विभाग, औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यांत आले असून मा. आयुक्त यानी दिनांक ३०.५.९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामा करीता महानगरपालिकेचे सन ९६-९७ अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत खांडकी रस्ते या शिर्षाअंतर्गत रू.१८.०० लाखाची तरतुद केली आहे. प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.क्रांतीनगर स्लम भागात शहाबाद फरशी गल्ल्यांमध्ये बसविणे करीता सा.बां. विभाग, औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.२,१९,५००/- चे अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३/४२**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो. तक्षशिला नगर स्लम येथे नविन शहाबाद फरशी बसविणे बाबत कामा करीता सा.बां. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक रू.४,४४,१९०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदरील काम नविन खांडकी बसविणे रू.३५.०० लाख या शिर्षकातुन करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दिनांक ५.६.९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामा करीता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रक्कम रू.४,४४,१९०/- यांस मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.तक्षशिल नगर स्लम येथे नविन शहाबाद फरशी बसविणे बाबतचे कामासाठी वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यांत आलेले रक्कम रू.४,४४,१९०/- चे अदांजपत्रकास सर्वानुंमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४/४३**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.शहाबाजार येथे खडी रस्ता तयार करणे हा अर्धगोलाकार गटार बांधणे बाबत कामा करीता सा.बां. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक रू.१,७२,७५४/- चे तयार करण्यांत आले आहे. सदरील काम ५% कमकुवत घटक योजना रू.५०.०० लाख या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दिनांक १०.६.९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामा करीता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रू.१,७२,७५४/-यांस मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.शहाबाजार येथे खडी रस्ता तयार करणे व अर्धगोलाकार गटार बांधणे बाबतचे कामा करीता सा.बां. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेले रक्कम रू.१,७२,७५४/-चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४५/४४**

प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे कि, सावित्रीबाई फुले (दत्तक) विद्यार्थ्यांना सहाय्य योजनेतून इयत्ता ६ वी व ७ वीच्या मुलींसाठी क्रमिक पुस्तके पुरविण्याचा प्रस्ताव सादर केला आहे, त्यासाठी रू.२,१०,०००/- च्या दरम्यान रक्कम लागेल.

इयत्ता ३ री ते ७ वी च्या उर्वरित मुलांना क्रमिक पुस्तके मोफत पुरविल्यास मनपातील १००% विद्यार्थ्यांना क्रमीक पुस्तकांचा पुरवठा केला जावू शकेल.

क्रमिक पुस्तके व विज्ञान साहित्यासाठी रू.४,००,०००/- ची तरतुद उपलब्ध आहे. यातुन रू.८५,०००/- चा खर्च झाला आहे शिल्लक रू.३,१५,०००/-

सदरील पुस्तके घेतल्यास रू.४३,०००/- जादा खर्च होईल. हा जास्तीचा सुधारीत अंदाजप पत्रकात अथवा इतर लेखा शिर्षातून क्रमिक पुस्तके या लेखा शिर्षाखाली वळता करून द्यावा लागेल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा शाळेतील इयत्ता ३ री ते ७ वी पर्यंतच्या उर्वरित मुलांना क्रमिक पुस्तके खरेदीसाठी एकूण रक्कम रू.३,५८,०००/- च्या सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

क्रमिक पुस्तके व विज्ञान साहित्य खरेदीसाठी असलेल्या तरतुदीत रू.३,१५,०००/- ची शिल्लक असल्यामुळे वरील प्रमाणे पुस्तके खरेदीसाठी लागणारी रक्कम रू.४२,०००/- च्या जादा खर्चाची तरतुद सुधारीत अंदाजपत्रकात अथवा अन्य लेखा शिर्षकातून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४६/४५**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांच्या मंजुरी प्रस्ताव सादर केला आहे कि, नाथ सुपर मार्केट येथील तळमजल्यावरील दुकाने खालील लोकांना वर्ष १९९० मध्ये भाडयाने दिली होती भाडेपटट्‌ा करारनामातील अटी व शर्ती नुसार दर पाच वर्षानी भाडे दरात वाढ करण्याची तरतुद नसल्यामुळे सहा.संचालक , नगररचना मनपा औरंगाबाद यांच्या अभिप्रायानुसार मागविण्यात आला होता त्यांनी भाडयाच्या दरात प्रती चौरस मीटर ५०% वाढ करण्यात यावी म्हणून अभिप्राय दिला आहे.

| अ. क्र | दुकान भाडयाने घेणाऱ्याचे नांव | दुकान क्र. | सध्याचे भाडयाचे दर दरमहा प्रती चौ.मी. | सुधारीत भाडे दर महा प्रती चौ.मी. | भाडयानी दिलेली तारीख | सुधारित भाडे आकारावयाची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्री.शंकर सखाहरी उबाळे | १ | १११/- | १६७/- | २७.८.९० | २७.८.९५ |
| २ | श्री.ओमप्रकाश जगन्नाथ | २ | १०५.२०/- | १५८/- | १८.८.९० | १८.८.९५ |
| ३ | श्री.तेजलाल मिश्रीलाल गांधी | ३ | १३५/- | २०३/- | ३१.१०.९० | ३१.१०.९५ |
| ४ | श्रीमती जयश्री प्रभाकर स्वामी | ४ | ९५.२५/- | १४३/- | २८.८.९० | २८.८.९५ |
| ५ | श्री.अभयकुमार संघवी | ५ | १००/- | १५०/- | ३१.१०.९० | ३१.१०.९५ |
| ६ | श्री.राजेश्वर नारायण बासटवार | ६ | १८०/- | २७०/- | १८.८.९० | १८.८.९५ |
| ७ | श्री.राजेश्वर नारायण बासटवार | ७ | १८०/- | २७०/- | १७.८.९० | १७.८.९५ |
| ८ | श्री.राजपाल बनारसी दास | ८ | १३६/- | २०४/- | १८.८९० | १८.८.९५ |
| ९ | श्री.सुमेरचंद बनारसी दास | ९ | ९५/- | १४३/- | ८.११.९० | ८.११.९५ |

तरी भाडेपटट्‌ा करारनामातील अटी व शर्ती नुसार भाडे दर प्रती चौ.मी.प्रति महिना ५०% वाढ वरील प्रमाणे भाडयाने दिल्याचे तारखेपासून ५ वर्षानंतर करणेस प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**विषय क्र.४७/४६**

मा.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो. राहुल नगर स्लम भागात अर्धगोलाकार आर.सी.सी. सरफेस गटार बांधणे या कामाकरीता एकूण रू.६,९३,०००/- चे अंदाजपत्रक सा.बां.विभाग, औरंगाबाद यांची दरसुची ९३-९४ अनुसार तयार करण्यांत आले असून मा. आयुक्त यांनी दिनांक ६.२.९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून सदरील कामासाठी निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/७०/९६ दिनांक १४.३.९६ पर्यंत एकूण (१९) एकोन्नीस कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्यांच्या अंतिम दिनांक २८.३.९६ पर्यंत एकूण (६) सहा मोहरबंद निवि९दा प्राप्त झाल्या व त्या दिनांक ८.४.९६ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडल्या असता तुलनात्मकदृष्टया गुत्तेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.जयश्री कन्स्ट्रक्शन | १३.६५% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| २ | श्री.शेख शरिफ | १२.७८६% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्री.बी.ए.काल्डा | १२.३% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| ४ | श्री.आर.एल.भाटीया | ११.८०% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| ५ | श्री.आर.एल.बारवाल | ११% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| ६ | श्री.ट्री स्टार कन्स्ट्रक्शन | ७% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |

तुलनात्मकदृष्टया व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.६५% कमी दराची मे.जयश्री कन्स्ट्रक्शन यांची असून सदरील काम महानगरपालिका झोपडपटट्री सुधारणा कार्यक्रम अंतर्गत " खुली गटार" या शिर्षा अंतर्गत करण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.राहुलनगर स्लम भागात अर्धगोलाकार आर.सी.सी. सरफेस गटार बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.६५% कमी दराचे मे.जयश्री कन्स्ट्रक्शन यांचे निविदा पत्रकास तसेच सदरील काम महानगरपालिका झोपडपटट्री सुधारणा कार्यक्रमा अंतर्गत "खुली गटार " या शिर्षा अंतर्गत करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४८/४७**

मो.मुकुंदवाडी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र बांधणेच्या कामासाठी स्थायी समीती ठराव क्र. ३९२/१४ दिनांक १९.१.९६ अन्वये रक्कम रू.४,५०,०००/- चे अंदाज यपत्रकास सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरील काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/९६ दिनांक १४.३.९६ अन्वये बी-१ निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखे पर्यंत एकूण आठ (८) निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण (४) निविदा दर भरून प्राप्त झाल्या त्या दिनांक ८.४.९६ ला उघडण्यात आल्या, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १ | मे.अमित कन्स्ट्रक्शन | ६.६६% कमी दराने |
| २ | श्री.एम.के.तोनगिरे | ३.९६% कमी दराने |
| ३ | श्री.एस.जे.जाधव | १% कमी दराने |
| ४ | श्री.मनोजकुमार घोडके | १०% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दराची निविदा आहे. त्यास दिनांक २७.५.९६ ला मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. सबब सदर कामाची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दराची श्री.मनोजकुमार घोडके यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तुत कामाची स्थळ पाहणी करण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.४९/४८**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.सादात नगर व राहुलनगर स्लम नाला ट्रेनिंगचे काम करणे करीता रक्कम रू.२४,९४,०००/- चे अंदाजपत्रक सा.बां.विभाग, औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यात आली असून मा. आयुक्त यांनी दिनांक ८.१.९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून स्थानिक वर्तमानपत्रात रितसर प्रसिध्दी देवून प्रगट निविदा सुचना मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांक २६.२.९६ पर्यंत एकूण (२४) चोविस कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व

स्विकारण्याच्या दिनांक ४.३.९६ रोजी फक्त (७) मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या दिनांक १९.३.९६ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडल्या असता गुत्तेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मे.बसरा कन्स्ट्रक्शन | १८.९९९% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| २ | मे.पारस कन्स्ट्रक्शन | १६.१०% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| ३ | मे.एलोरा कन्स्ट्रक्शन (अनामत रक्कम भरली नाही) | १५.1% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| ४ | श्री.बारवाल आर.एल. | १४.९% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| ५ | श्री.शेख शरिफ | ११.८७६% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| ६ | श्री.सैय्यद सिराजोद्यीन | १०% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| ७ | श्री.एस.एच.असोसिएट | ८.५९% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |

तुलनात्मकदृष्टया कमी व अयंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.९९९ % कमी दराची निविदा मे.बसरा कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.

सदरील कामा करीता संबंधित गुत्तेदार यांचे कडून दरपृ:थकरण मागविले असता त्यांनी सदरील दर परवडणार आहे असे सांगून गुत्तेदाराकडून चांगले गुणवत्ता असलेले काम करून घेण्याकरीता हमीपत्र घेवून नंतर काम सुरू करण्यांत येईल.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.सादातनगर व राहुलनगर स्लम भागात नाला ट्रेनिंगचे काम करणे करीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.९९९% कमी दराचे गुत्तेदार श्री.मे.बसरा कन्स्ट्रक्शन यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५०/४९**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मछली खडक,कुंभारवाडा येथील ड्रेनेज लाईन अप्रुटींग करणे व ४५०/३००/२५०/ मी. मी. व्यासाची ड्रेनेज टाकणे कामासाठी रू.४,८१,२५०/- इतक्याचे अंदाजपत्रक बनविण्यात आले होते. सदरील अंदाजपत्रकास ठराव क्र. ४८५/३३ दिनांक ८.३.९६ नुसार मंजुरी मिळाली त्यानुसार उपरोक्त कामासाठी निविदा बोलावण्यांत आल्या एकूण कोऱ्या विक्री झालेल्या ७ निविदा पत्रका पैकी श्री. शेख शरीफ यांची ४.७८६% कमी दराची निविदा प्राप्त झाली आहे. उपरोक्त एजन्सीस २% अनामत रक्कम भरणेसाठी पत्रही दिले त्यानुसार त्यांनी रक्कम भरली आहे. तरी श्री.शेख शरीफ यांना उपरोक्त काम देणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मछलीखडक, कुंभारवाडा येथील डेनेज लाईन अप्रुटींग करणे व ४५०,३००,२५०,मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी विक्री झालेल्या निविदा पत्रकापैकी श्री.शेख शरीफ यांची ४.७८६% कमी दराचे एकच निविदा पत्रक प्राप्त झाले व त्यांना २% अनामत रक्कम भरणेसाठी पत्र दिल्या नुसार त्यांनी भरणा केल्या नुसार सदर काम शेख शरीफ यांना देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५०/५१**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, हुसेन कॉलनी येथे १००,१५०,२०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर

अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसुची नुसार रक्कम रू.१२,५७,४४५/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.१०७/२८ नुसार सदर भागात विशेष पाणीपुरवठा योजना राबविण्यास मंजुरी देण्यांत आलेली आहे.

१ श्री.मन्नान खान ०.४% कमी

वरील प्रमाणे श्री.मन्नान खान यांचीच निविदा असून त्यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.४% कमी असा दर दिलेला होता. परंतु वाटाघाटी अंती दर कमी करण्यांस ठेकेदारांस सांगितले असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराने करण्यांस तयार असल्या बाबत ठेकेदार श्री.मन्नान खान यांनी संमती दर्शविली आहे.

तरी दराच्या वाटाघाटी नुसार अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २% कमी दर श्री.मन्नान खान यांची निविदाचा प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हुसेन कॉलनी येथे १००,१५०,२०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी दराचे वाटाघाटी नुसार अंदापजपत्रकाच्या दरापेक्षा २% कमी दराचे गुत्तेदार श्री.मन्नान खान यांचे निविदा पत्रकास सर्वानुमे मंजुरी देण्यांत येते.

**-:ऐनवेळचे विषय :-**

**विषय क्र.५१**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत पांढरा हाफशर्ट , खाकी हाफपॅन्ट , निळा स्कर्ट, पांढरे पोलके (ब्लाउज) शर्ट / सलवार मनपाच्या सर्व शालेय विद्या ार्थ्यांना वरील प्रमाणे गणवेश शिलाई करून पुरवठा करावयाचे आहेत. सदर गणवेश कापड खरेदीसाठी स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यांत आल्या. चार पुरवठाधारकांच्या निविदा नमुन्यासह प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा व नमुने मा. आयुक्त यांच्या सुचने नुसार मा. सभापती, स्थायी समितीचे सदस्य कापडांची पसंती करण्यास्तव उपस्थित होते. सर्वानुमते प्राप्त दरपत्रकातील कापडाचे नमुने व दर लक्षात घेवून मेसर्स कामधेनु यांचे नमुने पसंत केले. निवडलेले गणवेशाचे नमुने मा. सभापतींनी स्वाक्षरी करून दिले ते या प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कापडाचे नांव | पना | दर प्रति मिटर | एजन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | खाकी कापड (सुझुकी) | १३७ से.मी. | ७९.९० | कामधेनू |
| २ | निळे कापड (ऑलिंपीक) | १३७ से.मी. | ६०.७० | कामधेनू |
| ३ | पांढरे कापड (इनस्टॉईल) | ८९ से.मी. | ३५.०० | कामधेनू |

तरी वरील प्रमाणे दर मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद**

**प्रकल्प अधिकारी :** शहराच्या विविध गरीब वसाहतीमध्ये प्रकल्प विभागाच्या माध्यमातून ज्या महिलांना शिलाईचे प्रशिक्षण दिलेले आहे अशा महिलांना प्रस्तुत गणवेश शिलाईचे दरपत्रक ज्या संस्थेचे मंजुर होईल अशा संस्थेने अशा प्रशिक्षित महिलांकडून गणवेश शिलाईचे काम करून घ्यावे असे आदेश संबंधितास दिल्यास प्रशिक्षणाचा योग्य उपयोग होईल असे वाटते.

**मा.सभापती :** मनपा शालेय विद्यार्थ्या ाना गणवेश बाबत प्रकल्प अधिकारी यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी, तसेच येत्या १५ ऑगस्ट पुर्वी मनपा

शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करणे, गणवेश शिलाई इत्यादी प्रकारच्या सर्व कामारीता खालील स.सभासदांचा समावेश असलेली एक उप समिती नेमण्यांत येते.

१ स.सभासद श्री.महादेव सुर्यवंशी

2 स.सभासद, श्री.हमीदउद्दीन ताबा

3 स.सभासद श्री.कंवरसिंग बैनाडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना वाटप करावयाच्या गणवेशासाठी लागणारे खालील प्रकारचे कापड खरेदीसाठी मेसर्स कामधेनु यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | कापडाचे नांव | पना | दर प्रति मिटर | एजन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | खाकी कापड (सुझुकी) | १३७ से.मी. | ७९.९० | कामधेनू |
| २ | निळे कापड (ऑलिंपीक) | १३७ से.मी. | ६०.७० | कामधेनू |
| ३ | पांढरे कापड (इनस्टॉईल) | ८९ से.मी. | ३५.०० | कामधेनू |

गणवेश खरीसाठी होणारा खर्च ३० लाखाचे तरतुदी मधुन करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५३/५२**

अतिरिक्त शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला कि, मोहल्ला भवानीनगर व ठाकूरदास गिरणी यांना जोडणारा पुल तयार करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.३,५२,०९०/- अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च सन १९९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध तरतुदी मधून करण्यांत येईल.

सदरील कामासाठी निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण सोळा (१६) निविदा पत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण फक्त दोन निविदा पत्रके दर भरून प्राप्त झाली त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१ श्री.मन्नान खान ०.०२% कमी दराने

२ श्री.अब्दुल खलिक ३% जास्त दराने

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी श्री.मन्नान खान यांच्या निविदा पत्रकाचे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०२% कमी दराने आहेत.

तरी सदर कामा करीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम यरू.३,५२,०९०/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतच्या तसेच सदरील काम श्री.मन्नान खान यांचे कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०२% कमी दराने करून घेणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला भवानीनगर व ठाकुरदास गिरणी यांना जोडणारा पुल तयार करणेचे कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रू.३,५२,०९०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय

दरापेक्षा ०.०२% कमी दराचे गुत्तेदार श्री.मन्नान खान यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५४/५३**

सांस्कृतिक कार्य अधिकारी, महानगरपालिका, ओरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, महानगरपालिकेच्यावतीने घेण्यांत आलेलया महिला विकास परिषदेस सहभागी झालेल्या महिलांना दोन दिवसांचा प्रति महिला रू. २०(वीस) प्रमाणे भत्ता द्या ावा असे मा. महापोर व मा. पदाधिकारी यांनी सुचित केले आहे अशा प्रकारचे द्या ावयाच्या भत्त्याची रक्कम १६,४००/- (रू.सोळा हजार चारशे ) इतक्या खर्चाची आहे. त्यामुळे विशेष बाब म्हणून महिलांना सदरील भत्ता देण्या बाबतचा व त्या अनुषंगाने येणाऱ्या उपरोक्त खर्चाचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या वतीने घेण्यांत आलेल्या महिला विकास परिषदेस सहभागी झालेल्या महिलांना दोन दिवसांचा प्रति महिला रू.२०(वीस) प्रमाणे भत्ता द्यावा असे मा. महापौर व मा. पदाधिकारी यांनी सुचति केल्या नुसार अशा प्रकारे द्यावयाच्या भत्त्याची रक्कम रू. १६,४००/- चे खर्चास विशेष बाब म्हणून महिलांना सदरील भत्ता देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५५/५४**

प्रस्तावात सादर करण्यांत येतो कि, सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षात मनपा शाळेतील १००% विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके विनामुल्य पुरविणार आहे.

इयत्ता १ ली व २ री तील सर्वसाधारण घटक योजनासाठी रू.३५,०००/- व विशेष घटक योजनेसाठी रू.५०,०००/- अशी आर्थिक तरतुद शासनाने उपलब्ध करून दिली आहे. त्याच प्रमाणे डी.पी.ई.पी. अंतर्गत १ ली व ५ वी मधील सर्व मुलींना क्रमिक पुस्तके विनामुल्य पुरविली जाणार.

मनपा मध्ये सावित्रीबाई दत्तक पालक योजना चालू असून इ.६ वी ७ वी मधील केवळ मुलींना या योजनेमधून क्रमिक पूस्तके विकत घेवून वाटप करता येवू शकतील. या योजनेसाठी ८,००,०००/- रूपये आर्थिक तरतुद केलेली आहे.

वरील प्रमाणे इ.६ वी व ७ वी मधील मुलींची संख्या इ.६ वी १५६९ व ७ वी १११९ असून सर्व मुलींना एकेक संच विनामुल्य पुरविण्यासाठी रू.२,१०,७४९/- खर्च अपेक्षित आहे. मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सावित्रीबाई दत्तक पालक योजनतून इ.६ वी व ७ वी च्या महानगरपालिकेतील सर्व शाळातील मुलींना मोफत क्रमिक पुस्तके खरेदी करून विनामुल्य पुरवठा करण्यासाठी रू.२,१०,७४९/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

"जनगणमन " या राष्ट्र गिता नंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी जाहिर केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव
महानगरपालिका,औरंगाबाद

स्वाक्षरित/-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १०-७-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी सभेचे इतिवृत्त. दिनांक १०.७.९६ रोजी दुपारी ३.०० वाजता मा.सभापती श्री.गिरजाराम हाळनोर यांचे अध्यक्षतेखालील समिती सभागृहात स्थायी समिती सभेस सुरवात झाली. या सभेमध्ये कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.खरात गौतम भागाजी | सदस्य |
| २ | श्री.बैनाडे कंवरसिंग किशनसिंग | सदस्य |
| ३ | सौ.जोशी रजनी रमेश | सदस्य |
| ४ | डॉ.कराड भागवत किशनराव | सदस्य |
| ५ | डॉ.विजयकुमार गजानन मेहेर | सदस्य |
| ६ | श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलिक | सदस्य |
| ७ | श्री.हमीदउद्यीन ताबा फसियोद्यीन | सदस्य |
| ८ | श्री.घडामोडे भगवान देविदास | सदस्य |
| ९ | श्री.टाकळकर सुभाष भिकाजी | सदस्य |
| १० | श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव | सदस्य |
| ११ | श्री.भालेराव अभिमन्यु रामभाऊ | सदस्य |
| १२ | श्री.नवपुते कचरू चंद्रभान | सदस्य |
| १३ | श्रीअब्दुल रशिद खान (मामू) | सदस्य |
| १५ | श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव | सदस्य |
| १६ | श्री.अब्दुल रशिदखान (मामू) | सदस्य |

**संवाद**

सभेची सुरवात "वंदे मातरम्" या गिताने करण्यांत आली.

औरंगाबाद महानगरपालिकेचे महापौर यांचे पुतणे आणि महानगरपालिकेस स्वामी विवेकांनद यांचा पुतळा अर्पण करण्याऱ्या श्रीमती नर्मदा बनकर यांचे दुखद निधनानिमित्त श्रध्दांजली अर्पण करण्याची सुचना स.सभासद श्री.महादेव सुर्यवंशी यांनी मांडली यास सभागृहाच्या अनुमतीनुसार संबंधितास सभागृहातर्फे ००.०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रंध्दांजली अर्पण करण्यांत आली.

**मा.सभापती :** सभागृहातील पत्रकार कक्षातील पत्रकारांना सध्याच्या व्यवस्थेनुसार सभागृहातील कामाकाजाचे व्यवस्थीतपणे निरिक्षण करणे व संभाषण ऐकावयास येत असलेला अडथळा दुर करून यथायोग्य व्यवस्था करणेस सुचना दिल्या होत्या त्याबाबत संबंधित विभागाने खुलासा दयावा.

**उप अभियंता :** पुढील बैठकीपुर्वी सुचनेप्रमाणे व्यवस्था करण्यांत येईल.

**श्री.कचरू नवपुते:** शहर सौंदर्यीकरणाच्या कामावर रू.४० लाख खर्च झाले या कामात भ्रष्टाचार झाल्याचे वृत्त प्रसिध्द झाले आहे. हे खरे आहे का ? महानगरपालिकेच्या कामांना स्थायी समितीमध्ये मंजुरी दिली जाते. याबाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** शहर सौंदर्यीकरणाच्या कामात भ्रष्टाचार झाला असे मी बोललेलो नाही. शहर सौंदर्यीकरण करणेही आवश्यक आहे. परंतु हे काम वेगवेगळया कंपन्यांकडून करता आले असते. व या कामासाठी खर्च झालेली रक्कम शहराच्या इतर योग्य कामासाठी वापरता आली असती. या जिल्हयातील नागरिकांचा माजी सभापतीवर विश्वास दाखवला आहे. हे मी त्यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप करूच शकत नाही. माजी सभापतींची कारकिर्द चांगली होती.

**श्री.कचरू नवपुते :** शहर सौंदर्यीकरणाच्या कामात एकाच कामाच्या २/३ निविदा मंजुर केल्या हेखरे आहे का ? या कामाच्या सर्व संचिका सभासदांना दाखविण्यांत याव्यात.

**मा.सभापती:** शहर सौंदर्यीकरणाच्या कामाच्या प्राप्त माहिती मी पाहिल्या आहेत. वेगवेगळी नांवे दिले तरी प्रत्यक्षात जागा एकच दिसते. यासाठी एक समिती नेमण्यांत येते. या समितीने या प्रकरणी आपला अहवाल पुढील सभेत द्यावा. या समितीमध्ये स.स.श्री.गौतम खरात ,डॉ.विजयकुमार मेहेर, डॉ.भागवत कराड, श्री.कंवरसिंग बैनाडे , श्री.हमीदउद्यीन ताबा आणि श्री.अब्दुल रशिद खान मामु यांचा समावेश राहील.

**श्री.हमीदउद्यीन ताबा :** मागील स्थायी समितीच्या काळात आम्ही सभासद होतो. वृत्तपत्रातील बातमीमुळे बदनामी झाली याचा विचार करता काय उपाय योजना केली खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** वृत्तपत्रातील बातमी बाबत पत्रकार परिषद घेवून खुलासा करण्यांत आला पण ती बातमी वृत्तपत्रात आली नाही.

**श्री.हमीदउद्यीन ताबा:** पत्रकार परिषद घेवूनही योग्य खुलासा प्रसिध्द झाला नाही. या बार्बीचा मा.सभापतीनी निषेध करावा.

**श्री.अब्दुल रशिद खान (मामू):** मा.सभापतींना प्राप्त झालेली फक्त माहिती पहिली. या कामाच्या संचिका पहिल्या नाहीत. माजी आयुक्त चांगले काम करीत नव्हते. तर मा.पालकमंत्री यांनी माजी आयुक्तांना सिडकोवर पदभारावर का घेतले ?

**मा.सभापती:** स.स.श्री.हमीदउद्यीन यांच्या विचाराशी सहमत आहे पत्रकार परिषद घेवून योग्य खुलासा वृत्तपत्रात प्रसिध्द झाला नाही.

**श्री.कचरू नवपुते:** दैनिक सामना वृत्तपत्रात " " या मथळयाचे वृत्त प्रसिध्द झाले आहे. त्या बाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती:** वृत्तपत्रातील बातमी वाचली. महानगरपालिकेचे कर्मचारी श्री.वाईकर यांचे अपघातात निधन झाले. त्यांच्या कुटुंबीयांनी केली कि वाईकर यांचे आई/वडील वृध्द आहे त्यांच्या घरात कोणीही कमवता व्यक्ती नाही, म्हणून अनुकंपा धर्तीवर त्यांच्या भावास नोकरी देण्यांत यावी. मा.खासदार यांचेसह वाईकर यांचे कुटुंबियाचीं परिस्थिती बघीतली अनुकंपा धर्तीवर करण्यांत आलेल्या नियुक्तीत काहीही नियमबाहय काही वेतनवाढ आणि इतर कामे यात नियमबाहय कार्यवाही झालेली आहे का ? याबाबत मा. आयुक्त यांनी चौकशी करावी उप आयुक्त -२१ खुलासा करतील.

**डॉ.भागवत कराड, श्री.हमीदउ्दीन ताबा, श्री.अभिमन्यु भालेराव :** नियमाप्रमाणपे अनुकंपा धर्तीवर भावाला आणि तेही तांत्रिक कर्मचारी म्हणून नोकरीवर घेता येत

नाही. भावाचे लग्न झाल्यानंतर तो वेगळा झाला आणि मयताच्या पत्नीने पुन्हा नोकरीची मागणी केली तर अशा प्रकरणी काय करणार ?

**उप आयुक्त -२:** मयत वाईकर हे विद्युत विभागात काम करीत होते. ते अविवाहित होते. त्यांचे आई/वडील वृध्द आहेत. अनुकंपा धर्तीवर नियुक्ती देण्यांस माजी आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे. मध्यंतरीच्या काळात आचारसंहिता लागू झाली याबाबत मा.जिल्हाधिकारी यांना पत्र दिले त्याबाबत खुलासा प्राप्त झाला नाही. त्यानंतर मा. आयुक्तांनी नेमणूक करण्यांस मंजुरी दिली. शासनाचे नियमाप्रमाणे अविवाहित भावास अनुकंपा धर्तीवर कामावर घेता येते. त्या नुसार मयत वाईकर यांचे भावास दुय्यम आवेक्षक या पदावर नेमणूक दिली. त्यांची प्रत स.सभासदांना दिली जाईल.

**श्री.अब्दुल रशिद खान (मामू), श्री.हमीदउद्यीन ताबा:** शासनाच्या आदेशाचा खुलासा व्हावा.

**श्री.हमीदउद्यीन ताबा:** या सर्व प्रकरणांत चुकीची कार्यवाही झाली आहे. तेव्हा याबाबत चौकशी व्हावी.

**श्री.भगवान घडामोडे:** उप आयुक्त-२ सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. अनेक प्रकरणात उप आयुक्त -२ वादग्रस्त आहेत. कर आकारणी प्रकरणात अनेक नागरिकांना त्रास झाला आहे. या सर्व प्रकारणाबाबत चौकशी करावी.

**श्री.अब्दुल रशिद खान (मामू),श्री.हमीउदद्यीन ताबा:** उप आयुक्त -२, यांनी रातोरात नेमणूकीचे आदेश दिले आहेत. तेव्हा करण्यात आलेली नेमणूक रदद् करावी.

**मा.सभापती:** नेमणूकीचे आदेश रदद् करता येणार नाहीत. या प्रकरणाची सर्व माहिती पुढील सभेत ठेवण्यांत येईल.

**श्री.अ.रशिद खान मामू:** महानगरपालिकेत यापुर्वीही अनेक कर्मचारी हृदय विकार व इतर रोगाने मयत झाले आहेत. महानगरपालिकेच्या २०० वर्ग -४ च्या जागांना शासन मंजुरी देत नाही. मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांना नेमणूकीचे आदेश देण्यांत यावेत.

**मा.सभापती :** दिनांक ६-१०-८९ च्या शासन निर्णयानुसार अनुकंपा धर्तीवर झालेली नेमणूक योग्य आहे (दिनांक ६-१०-८९ चा शासन ) निर्णय सभागृहात वाचून दाखवण्यांत आला)

**डॉ.भागवत कराड:** दैनिक महानगर या वृत्तपत्रात " " या मथळयाखाली वृत्त प्रसिध्द झाले. त्याबाबत खुलासा व्हावा.

**श्री.कँवरसिंग बैनाडे :** रॉक्सी सिनमागृह येथे महानगरपालिकेची किती दुकाने आहेत. त्यापैकी किती दुकाने भाडयाने दिली आहेत या दुकानात काही नागरिक शेळया / जनावरे बांधत आहेत.

**मालमत्ता अधिकारी :** सब्जीमंडी दुकान केंद्रात एकूण ३७ दुकाने आहेत. यापैकी ३६ दुकाने भाडयाने दिली आहेत एक दुकान रिकामे आहे.

**मा.सभापती:** भाडयाने दिलेल्या दुकानात जनावरे बांधणे हा प्रकार योग्य नाही.

**सौ.रजनी जोशी:** सध्या पावसाळा सुरू झाला आहे. शहरात एकूण सहा झोन कार्यरत आहेत. प्रत्येक झाने करीता प्रत्येकी एक या प्रमाणे स्वच्छता निरिक्षक वाढवून देण्यांत यावेत.

**मा.सभापती :** नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. शहरात डासांचे प्रमाण वाढले आहेत. शहराच्या वेगवेगळया भागात गटारी / नाले आणि नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड येथे घाण साचलेली दिसते त्यामुळे

रोगराई होण्याचा संभव आहे याचा विचार करता प्रशासनास आवश्यकता भासत असेल तर प्रत्येक झोनसाठी एक या ऐवजी किमान दोन झोन करीता एक याप्रमाणे स्वच्छता निरिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली "डास निर्मूलन सप्ताह" आयोजित करून डासाचा नायनाट करावा.

**श्री.अब्दुल रशिद खान मामू :** डास निर्मूलन सप्ताह चालू केल्यावर आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी स्वत: त्यावर नियंत्रण ठेवावे.

**मा.सभापती :** मी स्वत: प्रत्यक्ष पाहणी केली इमारतींची उंची ५ फुटापेक्षा जास्त आहे. तथपि प्रत्यक्षात नाल्यात पडलेले बांधकाम साहित्य न उचलल्यामुळे उरंची कमी झाली त्यातुळे ही परिस्थीती निर्माण झाली. कोणत्याही प्रकरणात कार्यवाही करतांना ती डोळसपणे करावी असे माझे मत आहे. या ठिकाणच्या पुलाची उंची कमी आहे. याप्रकरणी अति. शहर अभियता / शहर अीींयता यांनी पहाणी करतांना बांधकाम परवानगी / बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र कसे दिले याचाही विचार करावा. नगर रचना विभागात या प्रकरणी चौकशी करून योग्य तो बदल करावा.

**श्री.गौतम खरात :** शहरातील काही गृहनिर्माण संस्था स्वत: विकास कामे करतात बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र देतंना पाणी /ड्रेनेज हया इ.योग्य आहे का याची प्रत्यक्ष पाहणी न करता पुर्णत्वाचे प्रमाणपत्र दिले जाते. काही दलाल आहेत या सर्व बाबींचा विचार करता नगर रचना विभागात बदल झालाच पाहिजे. सभागृहाने या बाबी विशेष लक्ष पाहिजे.

**मा.सभापती :** बदल करण्यांचे सर्व अधिकार मा. आयुक्तांना आहेत.

**नगर रचना :** प्रत्यक्षात कोणत्या बांधकाम प्रकरणात स.सभासदांना माहिती हवी याची माहिती मिळाल्यावर पुढील सभेत देता येईल बांधकाम प्रकरणात स.सभासदांना माहिती हवी याची माहिती मिळाल्यावर पुढील सभेत देता येईल. बांधकाम परवानगीची एक प्रत संबंधित झोन आणि कर आकारणी विभागात दिली जाते.

**श्री.अब्दुल रशिद खान मामू:** बांधकाम परवानगी दिल्यानंतर तीन वर्षाच्या काळात या विभागातर्फे काय कार्यवाही केली जाते. बांधकाम झाल्यानंतर या इमारतीत भाडेकरु वास्तव्य करतात.तथापी याची तपासणी केली जात नाही. स्वत: विकास करणाऱ्या गृहनिर्माण संस्था किंवा तात्पुरता भू अभिन्यास मंजूर झालेलया प्रकरणात स्थायी समिती पहाणी करतील. या व्यतिरिक्त मा.आयुक्त, मा.उप आयुक्त, सभागृह,सभापती,मा.महापौर, यांचे दालनातील विद्युत पुरवठा खंडीत झाल्यानंतर त्याबाबत पर्यायी व्यवस्था करण्याची सूचना संबंधित विभागास करण्यांत आली आहे. त्याबाबत काय कार्यवाही झाली या प्रकरणी मा.आयुक्त यांची मंजुरी घेवून आठ दिवसांचे आत योग्य ती कार्यवाही संबंधित विभागाने करावी.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** स.सभासद श्री.कराड यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे घरपट्टी / पाणीपट्टी बाबत मालमत्ता धारकांना पासबुक देण्याच्या योजने बाबत काय कार्यवाही झाली. अनेक नागरिक बांधकाम परवानगी घेतात.इमारत तयार झाल्यानंतर पुर्णत्वाचे प्रमाणपत्र घेत नाही. याचा विचार करण्यात यावा. अनधिकृत बांधकाम आज मालमत्ता कर लावला जात नाही. परंतु अशा घरांना मालमत्ता कर आकारणी करण्यात आल्यावर लगेच मालमत्ता कराचा संबंधित नागरीक भरणा करतात तेव्हा अशा नागरिकांनी कर आकारणी

बाबत अर्ज केला तर अशा मालमत्तांना कर आकारणी करण्यांत यावी. शहरातील घराचे नंबरही योग्य नाहीत. एका वर्षात एक घर नंबर एका ठिकाणी असला तर त्या नंतरचा दुसरा घर नंबर दुसऱ्या ठिकाणी असतो. त्यामुळे अनेक प्रकरणांच्या नोटीसा तामिल होत नाहीत. या सर्व बाबींचा विचार करून सभागृहाने संगणक व्यवस्था सुरू होवूनही मालमत्ता / पाणीपटट्री करा बाबतच्या नोटीसेबाबत काहीच कार्यवाही झालेली दिसत नाही.

**श्री.गौतम खरात :** शहरातील अनधिकृत वसाहतींना नळ/लाईट/ड्रेनेज/रस्ते अशा नागरी सुविधा महानगरपालिकेतर्फे देण्यांत येतात. या बाबत खर्च करण्यास महानगरपालिका काहीच विचार करत नाही. मग अशा मालमत्तांना कर आकारणी का करण्यांत येत नाही.

**श्री.कचरू नवपुते:** काही नळ कनेक्शन धारकांना पाणी पटट्रीची बिले देण्यांत आली आणि काही नळ कनेक्शन धारकांना अशी बिले देण्यांत आलेली नाहीत. तेव्हा सर्व मालमत्ता धारकांना बिले दिले जातील अशी व्यवस्था करावी.

**डॉ.विजयकुमार मेहेर:** पुंडलिकनगर भगात ४ कोटी रूपये खर्चाची योजना महानगरपालिकेतर्फे राबविण्यांत येत आहे. यासाठी या भागातील नागरिकांकडून २५% रक्कम तीन हप्त्यात भरून घेण्यात येत आहे. आजही या भागातून फक्त ३/८ लाख रूपये जमा झाले आहे. वस्तुतः यापेक्षाही जास्त रक्कम जमा व्हावयास हवी होती. पुंडलिकनगर भागातून पाणी पुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेतर्फे दररोज ३० टँकर पाणी पुरविले जाते. स. सभासदांची सुचना योग्य आहे. त्यासाठी घरोघर जावून रक्कम वसूलीची कार्यवाही झाली पाहिजे.

**श्री.अ.रशिद खान (मामू):** वार्डाचा नगरसेवक म्हणून वार्डात फिरून मालमत्ता करा बाबतचे फॉर्म संबंधिताकडून भरून घेतले व मालमत्ता कराची आकारणी करून घेतली त्याचप्रमाणे इतर स.सभासदांनी कार्यवाही करावी व घरांना कर आकारणी करून द्यावी घरांना नंबर देण्यांत यावेत मालमत्ता कर आणि पाणी पटट्री यांचे एकत्रित मागणी नोटीस नागरिकांना देण्यांत यावी. याबाबत गेल्या आठ वर्षापासून मागणी करण्यात येत आहे. यासाठी विविध शहराच्या कार्यपध्दतीची माहिती देण्यात आली आहे.

**मा.सभापती :** अनधिकृत वसाहतींना मालमत्ता कराची आकारणी न केल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. माजी आयुक्तांनी कर आकरणी करण्याचे आदेश दिले आहेत. तथापि आचरसंहिता लागू असल्याने हे काम झाले नाही. विकास आराखडयात राखीव असलेल्या वसाहती मालमत्ता कराची आकारणी सुरू करू नये अशा प्रशासनाची धारणा असली तरी सर्व अनधिकृत वसाहतींना मालमत्ता कराची आकारणी करावी असा ठराव सर्वसाधारण सभेत मंजुर झालेला आहे. मालमत्तेच्या एन.आर.व्ही. मध्ये बदल करण्याचा कोणासही अधिकार नाही उप आयुक्त -२ यांनी मालमत्तांना नंबर देणे/ वाढीव बांधकामाना आकारणी करणे इ.बाबत कालबध्द कायक्रम हाती घेवून मालमत्ता कराची आकारणी करावी.

**डॉ.विजयकुमार मेहेर:** मुख्य निर्धारण अधिकारी श्री.राजपूत यांचेशी घर नंबर बाबत चर्चा केली आहे. एका वार्डात उदा २००० घरे असतील तर या घराचे पाच भाग करावेत. आणि या घरांना ७७ अ, ७८ ब असे नंबर देण्यांत यावे. या घर

नंबरमुळे नागरिकाने निश्चित पत्ते सापडतील व नागरिकांना त्याचे पत्रही मिळतील.

**श्री.अभिमन्यु भालेराव:** झोपडपट्टी भागात १०X१० किंवा १०X१५ ची घरे आहेत. या उलट शहरी भागात १०० X १०० घरे आहेत. या घरांना ३०० रू.आणि झपाडपट्टी भागातील कमी आकाराच्या घरांना सुध्दा रू.३०० घरपट्टी आहे अशी परिस्थिती आहे. तेव्हा उपलब्ध जागेप्रमाणे कर लावण्यात यावा. अशा कर आकारणीमुळे झोपडपट्टी भागावर अन्याय होत आहे.

**मा.सभापती :** मालमत्ता कर आकारणी बाबत सभागृहात झालेली चर्चा विचारात घेता" जसे घर तसा "कर जो पर्यंत घर तोपर्यंत कर " अशी घोषणा करण्यात येते.

**श्री.सुभाष टाकळकर :** सिडको हडको भागात फक्त २०% २५% नागरिक मालमत्ता कर भरतात. तथापि या भागातील नागरिकांना महानगरपालिकेतर्फे

**सौ.रजनी जोशी:** सुविधा दिल्या जात नाही. महानगरपालिकेतर्फे फक्त पाणी पुरवठा व्यवस्था केली जाते. या कामा व्यतिरिक्त इतर कामावर या भागातील नगर सेवकांना स्वेच्छा निधी खर्च करता येत नाही.

**मा.सभापती :** सिडको प्रशासनाकडून महानगरपालिकेत ज्या अमेनिटीची रक्कम घेणे बाकी आहे अशा अमेनिटी व्यतिरिक्त इतर कामावर या भागातील नगरसेवकांना स्वेच्छा निधी खर्च करता येईल.

**डॉ.भागवत कराड:** सध्या शहरातून चालू झालेल्या कामानिमित्त महानगरपालिका शाळेस भेट देण्याची संधी मिळाली. महानगरपालिका शाळेत कुठल्याही सुविधा नाहीत. महानगरपालिका शाळेचे स्टँडर्डही योग्य नाही. चौथीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास पाचांचा पाढा येत नाही. अशा विद्यार्थ्यांचे भावी भवितव्य काय याचा विचार करणे आवश्यक आहे. या शाळेतपटावर एकूण ७५० विद्यार्थी असलेल्या विद्यार्थ्यांपैकी फक्त ३०० विद्यार्थी हजर होते. शाळेची वेळ ७.३० ची असतांनाही या शाळेचे शिक्षक ९.०० वाजता शाळेत येतांना दिसते.

**मा.सभापती :** स.सभासदांनी सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे महानगरपालिका शाळांची स्थिती योग्य नाही. महानगरपालिका शाळेस भेट दिली असता इयत्ता सातवित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांस व्यवस्थीत वाचता येत नाही. महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांच्या ड्रेस /पुस्तक यावर महानगरपालिका भरपूर खर्च करत आहे. स्थायी समितीचे तीन सभासद आणि वार्डात महानगरपालिकेची शाळा असेल त्या वार्डाचे संबंधित नगर सेवक असा ग्रुप तयार करण्यात येत आहे. या ग्रुपमधील सभासद केव्हाही महापालिकेच्या शाळांची पाहाणी करतील या समितीला महापालिकेच्या शाळांची तपासणी करण्यांचे सर्व अधिकार देण्यांत येतात.

**श्री.अ.रशिद खान मामू :** महापालिका शाळेचे स्टॅंडर्ड फारच ढासळलेले आहे. त्यामुळे नागरिक आपल्या मुलांना महापालिका शाळेत प्रवेश देणे म्हणजे कमीपणा समजतात तेव्हा महानगरपालिका शाळेतील शिक्षकांच्या बदल्या केल्याशिवाय शाळांचे स्टँडर्ड सुधारणार नाही.

**मा.सभापती :** एकाच शाळेत जास्त काळ सेवा केलेल्या सर्व शिक्षकांच्या बदल्या शिक्षणाधिकारी यांनी कराव्यात अशा बदल्या करत असतांना ८० नगरसेवकांनी प्रशासनाच्या आदेशात कोणताही बदल करण्याची मागणी करू नये. अशी मागणी एखादया नगरसेवकांने केली तरी मा.आयुक्त यांनी

त्यात कोणताही बदल करून नये. जास्त काळ यासाठी तीन वर्षाचा कालावधी ग्राहय धरण्यात यावा.

**श्री.हमीदउद्दीन ताबा:** महानगरपालिकेतील शाळेत बहुतांश महिला शिक्षक काम करतात. यात विशेष म्हणजे शिक्षकांच्या घराजवळील शाळेतच काम करतात. हे शिक्षक विद्यार्थ्यांकडून भाजी आणणे. व इतर काम करून घेतात याशिवाय महिला शिक्षक शाळेत घरच्याच गप्पा मारतांना दिसतात.

**डॉ.भागवत कराड:** महानगरपालिकेत ३.०० ते ५.०० ही वेळ नागरिक /नगरसेवक यांच्या विविध कामासाठी ठरवून दिली आहे. तरी पण यावेळेत काही अधिकारी कार्यालयात भेटत नाहीत. आणि भेटलेच तर उद्या काम करतो असे सांगतात. या अधिकाऱ्यांच्या उद्या कधीच येत नाही. अशा परिस्थितीत नगर सेवकांकडून काही अनुचित प्रकार घडला तर त्याबाबतचा दोष नगर सवेकांना देण्यांत येवू नये.

**मा.सभापती :** मा.आयुक्त यांनी दुपारी २.३० नंतर सर्व अधिकाऱ्यांनी त्यांचे दालनच उपस्थित राहावे असे आदेश दिले आहेत. याच बरोबर सर्व विभागाच्या कनिष्ठ अभियंता यांनी दुपारनंतर कार्यालयात हजर असावे. ज्या कनिष्ठ अभियंताना दुपारचे काळात कामानिमित्त कार्यालय सोडून बाहेर जाणे आवश्यक असेल अशा कनिष्ठ अभियंतानी त्याबाबतची नोंद कार्यालयीन रजिस्टरमध्ये करावी. व संबंधित अधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेतल्यानंतर कार्यालय सोडावे. नगरसेवक पदाधिकारी यांनी भेट दिली असता वरील प्रकारची नोंद करता जर एखादी अधिकारी अथवा कनिष्ठ अभियंता कार्यालयात हजर नसल्याची माहिती मिळाली तर मा. आयुक्त यांनी नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. एखाद्या प्रकरणात नगरसेवकांनी पत्र दिली असेल तर आठ दिवसांचे आंत त्याविषयी खुलासा करावा. किंवा वस्तुस्थिती समोर ठेवावी. नागरिक किंवा नगरसेवक/ यांची दिशाभुल करू नये.

**डॉ.विजयकुमार मेहेर:** अनेकवेळा फोन केल्यावरही बरेच अधिकारी कार्यालयात नसतात याबाबतची माहिती दिल्यानंतरही मा. आयुक्त यांनी अशा अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी.

स.सभासदांच्या सुचनेनुसार ४.३० वाजता सभेचे कामकाज काही काळापर्यंत तहकुब करण्यांत येत असल्याची घोषणा मा.सभापती यांनी केली.

तहकूब करण्यात आलेली सभा ५.०० वा. पुन्हा सुरू झाली.

**श्री.गौतम खरात :** महानगरपालिकेतील शाळेतील तीन वर्षापर्यंत एकाच शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांच्या बदल्या करण्याचा निर्णय सभागृहात घेतला गेला आहे. याच बरोबर महानगरपालिका कार्यालयातील वर्ग १ व ३ पर्यंतच्या सर्व अधिकारी आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यांत याव्यात. याबाबतचे प्रकरणी माजी आयुक्तांचे काळात कार्यवाही करण्यात आलेली आहे.

**मा.सभापती :** स.सभासदांच्या सुचनेशी सहमत आहे. महापालिका कार्यालयात एकाच विभागात तीन वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त काळ काम करीत असलेल्या वर्ग १ व ३ पर्यंतच्या सर्व अध्किाारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्याबाबत मा. आयुकत यांनी कार्यवाही करावी.

**श्री.अ.रशिद खान मामू :** सभागृहात महानगरपालिका कार्यालयातील वर्ग १ व ३ पर्यंतच्या सर्व अधिकारी कर्मचारीच्या बदल्या करण्याबाबतच्या निर्णय घेण्यात आला आहे. या बदल्या करतांना सध्या जे कर्मचारी कार्यालयाचे साईटवरील काम

करतात अशा कर्मचाऱ्यांना साईटवर काम करण्यांची संधी मिळेल अशा प्रकारे बदल्या करण्यांत याव्यात.

**श्री.गौतम खरात :** जकात विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दुसरा / चौथा शनिवार च्या कामाचा मार्च ९५ पर्यंत मोबदला देण्यांत मंजुरी दिली आहे. यापैकी सन १९९४-९५ च्या काळातील मोबदला दिला आहे. व ९६-९४ च्या कामाचा मोबदला देणे बाकी आहे. सध्या महापालिकेची आर्थिक परिस्थीती चांगली आहे. तेव्हा जकातच्या कर्मचाऱ्यांना बाकी असलेला मोबदला देण्यांत यावा.

**मा.सभापती :** सदर प्रकरणी प्रशासनाने र्याय ती कार्यवाही करावी. जकात विभागाचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने या विभागाकरीता वायरलेस सेट बसविण्याचा निर्णय घेंण्यात आला आहे. असा वायरलेस सेट बसविण्याच्या दृष्टीने जलगृह अभिंयता यांचे तर्फे सर्व्हे करण्यांत आला आहे. त्याबाबतचा अहवाल सभागृहापुढे ठेवण्यांत यावा.

**श्री.भगवान घडामोडे:** माजी आयुक्तांनी महानगरपालिकेच पदभार सोडला नंतर जकात विभागाचे उत्पन्न कमी झाले ही बाब खरी आहे काय ? याचा खुलासा करावा.

माजी आयुक्त यांनी महानगरपालिकेचा पदभार सोडला त्यावेळी महानगरपालिचे जकात उत्पन्न हे रू.८.०० लक्ष इतके होते.

**मा.सभापती :** २.७.९६ ला जकातीचे उत्पन्न रू.९.०० लक्ष होते जकातीचे उत्पन्न हे मालाच्या आयातीवर अवलंबून असते.

**श्री.अ.रशिद खान मामू:** मागील वर्षाच्या स्थायी समितीचे काळात जकात विभागाच्या उत्पन्ना बाबतचा माहिती सभागृहात देण्यांत येत होती. तसा अहवाल सभागृहात मिळत नाही.

**मा.सभापती :** महापालिका प्रशासनास जकात आणि इतर विभागातर्फे मिळणाऱ्या उत्पन्न बाबतचा अहवाल किमान आठ दिवसातून एकदा या प्रमाणे सभागृहाला याबाबतची माहिती देण्यांत यावी.

**श्री.अ.रशिद खान (मामू ):** कटकटगेट भागात महानगरपालिकेची पाच एकर जमिन आहे. या जागेचा मालकी हक्काबाबतचा मनाई हुकूम काढून घेण्यात आला आहे.(त्याची प्रत मा.सभापती यांना देण्यात याली.) याशिवाय गारखेडा स.नं. ५२ येथेही महानगरपालिकेच्या मालकिची जमिन आहे. याठिकाणी एका नागरिकांने खोलीचे बांधकाम केले आहे. याठिकाणी एका नागरिकाने खोलीचे बांधकाम केले आहे. या बाबतची माहिती सहा. संचालक नगर रचना श्री चौथाई यांना दिली आहे. याचप्रमाणे विवेकानंद कॉलेज येथील महानगरपालिकेच्या जागेवर दुाकन केंद्र बांधण्याचाही निर्णय झालेला आहे. अशा शहराच्या विविध भागातील महापालिकेच्या जागांची योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे. महापालिकेच्या यजागेचा मालकी हक्काबाबतची अनेक प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत या प्रकरणांची महापिालका पॅनलवरील विविध योग्य ती पैरवी करत नाहीत. अशा प्रकरणात महापालिकेचे वकिल बदलण्यात यावेत.

**श्री.कचरू नवपुते :** महानगरपालिकेच्या पॅनलवर काम करणारे विधिज्ञ त्यांच्याकडील प्रकरणात महानगरपालिकेची बाजु मजबुत करण्या ऐवजी विरूध्द पार्टी च्या

व्यक्तीस मदत करतात याचा विचार करता पॅनलवरील वकील बदलण्यात यावेत.

**मा.सभापती :** स.सभासदांच्या सुचना विचार करता महानगरपालिका पॅनलवरील विधिज्ञ बदलण्या बाबत मा. आयुक्त विचार करावा तसेच स.स.श्री.अ.रशिद खान मामू यांनी ज्या महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेबाबत सुचना केलेली आहे त्या तया प्रकरणात बाबत  नगर रचना यांनी नोंद घ्यावी व त्याबाबतची सविस्तर माहिती पुढील सभेत ठेवावी.

**नगर रचना अधिकारी :** सुचने प्रमाणे योग्य ती नोंद घेण्यांत आली आहे.

**श्री.महादेव सुर्यवंशी:** विद्युत पुरवठा खंडीत झाल्यानंतर व्यवस्था व्हावी यादृष्टीने महानगरपालिकेतर्फे किती इमरजन्सी लॅम्प खरेदी करण्यांत आले आहेत. त्यापेकी किती लॅम्प अस्तित्वात आहे. त्यांची सध्याची स्थिती काय आहे. याची माहिती देण्यांत यावी.

**मा.सभापती :** संबंधित विभागाने विद्युत लॅम्प बाबातची सविस्तर माहिती पुढील सभेत द्यावी.

**सौ.रजनी जोशी:** महानगरपालिकेमध्ये रोजंदारीवर काम करणाऱ्या रोजंदारी कर्मचारी एकाच संवर्गाचे असल्याने लिपीकांनाही रू.६५/- याप्रमाणे रोजंदारी देण्यांत यावी.

**मा.सभापती :** स.नगरसेवीकेच्या सुचने बाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी व त्या बाबतचा अहवाल सभागृहासमोर ठेवावा.

स.नगरसेविकेच्या सुचने बाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी व त्या बाबतचा अहवाल सभागृहासमोर ठेवावा.

**श्री.महादेव सुर्यवंशी, श्री.गौतम खरात :**सेवा भरती नियमाचा फायदा फक्त १३७ कर्मचाऱ्यांना झाला आहे. यामुळे अन्य कर्मचारी सेवा भरती नियमांच्या फायदयापासून वंचित राहीले आहेत. या प्रकरणी चर्चा करण्यांत येईल असे ठरले होते.

**श्री.कचरू नवपुते :** त्याप्रमाणे सेवाभरती नियमाबाबत माहिती देण्यांत यावी.  या प्रकरणी महानगरपालिका कर्मचारी संघटनेमार्फत पत्र देण्यांत आले आहे. महानगरपालिकेने बारा वर्षाचा सेवाकाळ धरून कार्यवाही केलली आहे. त्याऐवजी सेवाभरती नियमाप्रमाणे सात वर्षाचा सेवाकाळ धरून कार्यवाही करावी म्हणजे सर्व महानगरपालिका कर्मचाऱ्यांना त्याचा फायदा होईल. सेवाभरती नियम करतांना प्रशासनाने समयश्रेणी व निवडश्रेणीचा गोंधळ करून कर्मचाऱ्यांवर अन्याय केलेला आहे.तेव्हा सात वर्षाचा सेवाकाळाचा फायदा सर्व कर्मचाऱ्यांना होईल असा निर्णय घेण्यांत यावा.

**मा.सभापती :** सन १९९४ मध्ये शासनाने सेवाभरती नियम मंजुर केले आहे. त्या नियमाप्रमाणे प्रशासनात कार्यवाही होत असेल या नियमाप्रमाणे काही कर्मचाऱ्यांना सेवाभरती नियमाचा फायदा मिळाला नाही. सात वर्षाचा सेवाकाळ याप्रमाणे किती कर्मचाऱ्यांना फायदा होईल व त्यासाठी किती खर्च येईल याची माहिती तयार करण्यांत यावी.

**उप आयुक्त -२:** १९९४ मध्ये जे सेवाभरती नियम मंजूर झालेले आहे त्यानुसारच्या खर्चासहित माहिती दिनांक १५.७.९६ रोजी सविस्तर टिप्पणी तयार करून मा. आयुक्तांकडे सादर करण्यात येईल.

श्री.अ.रशिद खान (मामू ): सेवाभरती नियम मंजुर करतांना शासनाच्या फायनान्स विभागाची मंजुरी घेतलेली नाही. महानगरपालिका प्रशासनास काही कर्मचाऱ्यांचा पगार

शासनाकडून मिळतो.सेवाभरती नियमाच्या फायदया बाबत वृत्तपत्रात फक्त दोन कर्मचाऱ्यांच्या नावाची बातमी प्रसिध्द होते. वस्तुतः सिडको हस्तांतर झाल्यानंतर सेवाभरती नियम लागू करावेत असा आदेश आहे. सध्या महानगरपालिका प्रशासनाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचे पगार शासनाने रोखून ठेवल्याची माहिती मिळाली आहे. महानगरपालिकेतील शिक्षक/कनिष्ठ अभियंता यांना शासनाच्या नियमाप्रमाणे पगार दिला जातो. अशा कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवाभरती नियमाप्रमाणे फायदा देणार का ? याचाही विचार करणे आवश्यक आहे. महानगरपालिका कर्मचाऱ्यांना कोणत्या नियमाप्रमाणे पगार दिला जावा यासाठी कोणता नियम वापरण्यांत यावा हे निश्चित झाले पाहिजे.

**सहाय्यक आयुक्त-१:** पदोन्नती देतांना सेवाभरती नियम उपयोगात आणला जातो.

**मा.सभापती:** सन १९९४ ला सेवाभरती नियम मंजुर झालेले आहेत.महानगरपालिकेत काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना एकच नियम असावा सेवाभरती नियमा प्रमाणे ज्या ज्या कर्मचाऱ्यांना फायदा होत असेल अशा सर्व कर्मचाऱ्यांना सेवाभरती नियमाचा फायदा नियमाप्रमाणे देण्यांत यावा. तसेच सेवाभरती नियमाची प्रतसर्व सभासदांना माहितीसाठी देण्यांची व्यवस्था संबंधित विभागाने करावी.

**डॉ.भागवत कराड:** महानगरपालिकेने शहरातील फैंटनच्या दिव्याची व्यवस्था वार्षिक करारावर एजन्सीला देण्याची व्यवस्था केली आहे या कराराप्रमाणे दिव्यांची व्यवस्था केली जात नाही. क्रांतीचौक भागातील दिव्यांची व्यवस्था बंद आहे.

**उप अभियंता (विद्युत):** सदरील एजन्सीला बोलावून ताकीद देण्यांत येईल.

**मा.सभापती :** शहरात मोठया प्रमाणावर अनधिकृत बांधकामे चालू आहेत. मागील सभेत समतानगरभागातील अनधिकृत बांधकामे चालू आहेत. मागील सभेत समतानगर भागातील अनधिकृत बांधकामा बाबत चर्चा झाली आहे. संबंधित अधिकारी सभागृहात उपस्थित नाहीत. आणि त्यांच्याकडून माहितीही प्राप्त झाली नाही. इमारत निरिक्षकांच्या कामाबाबत अनेक तक्रारी आहेत. तेव्हा तीन वर्षाचा सेवाकाळ पूर्ण झाला नसला तरी इमारत निरिक्षकांच्या बदल्या करण्यांत याव्यात.

**श्री.गौतम खरात :** अस्थापना विभागात कोणत्याही प्रकारची माहिती नसतांना अनधिकृत बांधकामासाठी सदर भाग मुस्लीम भाग असलयाने या विभागातील अनधिकृत बांधकामावर मुस्लीम इमारत निरिक्षक श्री.कुरैशी यांची बदली करण्यांत यावी. असा स्पष्ट उल्लेख संचिकेत करण्यांत आल्याची माहिती मिळाली आहे. व त्याप्रमाणे संबंधितची इमारत निरिक्षक पदावर बदलीही झाली आहे. ही बाब योग्य नाही.

**मा.सभापती :** स.सभासदांनी सुचविल्याप्रमाणे इमारत निरिक्षकांच्या बदली बाबतची संबंधित संचिका सभागृहापुढे ठेवण्यांत यावी.

**श्री.अ.रशिद खान (मामू ):** छावणी आठवडी बाजार हर्रास प्रकरणी पुढील सभेत माहिती देण्यांत यावी असा निर्णय मागील सभेत घेण्यांत आलेला आहे. त्याबाबत खुलासा व्हावा.

**उप आयुक्त -२:** छावणी आठवडी बाजाराची हर्रासी कॅटॉनमेंट बोर्डातर्फे करण्यांत येते कोंटनमेंट बोर्ड हे केंद्रशासनाच्या अधिपत्याखाली काम करते. याचा विचार करता अशी चौकशी महानगरपालिकेला करणे योग्य होणार नाही.

**मा.सभापती :** छावणी आठवडी बाजार हर्रास प्रकरणी नियमाप्रमाणे विनंती पत्र देण्यांत यावे.

**श्री.हमीदउद्दीन ताबा:** दिनांक २०.६.९६ च्या सभेत यशोदा कॉलनी येथील इमारत महानगरपालिकेच्या शाळेसाठी भाडयाने घेण्या बाबतच्या प्रकरणी चौकशी करण्यांत येईल. इसा निर्णय झाला आहे. ही इमारत भाडयाने घेण्याच्या प्रकरणात महानगरपालिकेचे सुमारे २८ हजार रूपयाचे आर्थिक नुकसान झ ाले आहे.

**मा.उप आयुक्त :** यशोधरा कॉलनी येथील इमारत महानगरपालिका शाळेसाठी भाडयाने घेतांना वाटाघाटी नुसार इारतीचे भाडे निश्चित करण्यांत आले आहे.

**मा.सभापती :** माजी आयुक्त यांना या प्रकरणाची चौकशी बाबतची माहिती होती. त्यांची बदली झाली आहे म्हणून नुतन आयुक्त यांनी या प्रकरणी चौकशी करून अहवाल पुढील सभेत द्यावा.

**डॉ.भागवत कराड:** दिनांक २८-६-९६ च्या सभेत सार्वजनिक नळांना तोटया बसविण्याच्या निर्णय घेण्यांत आला आहे. आज १२.०० वाजेपर्यंत तरी अशी व्यवस्था झाली नाही. त्यामुळे पाणी वाया जात आहे.

**कार्यकारी अभियंता :** सार्वजनिक नळांना तोटया बसविण्या बाबत यापुर्वीही चार वेहा प्रयोग करण्यांत आला आहे वेल्डींग करून बसविण्यांत आलेल्या तोटया सुध्दा नागरिक काढून नेतात. तरीसुध्दा प्रायोगिक तत्वावर स.स.श्री.कराड यांच्या वार्डात पुन्हा तोटया बसविण्यांत येतील.

**प्रशासकीय अधिकारी :** समतानगर भागात खाजगी जागेवर अनधिकृत टपरी आहे. या टपरीला विद्युत मीटरचा पुरवठा केलेला आहे. त्या संबंधिचे कागदपत्र मागविण्यांत आले असून सोमवार पर्यंत कागदपत्र प्राप्त होतील. त्यानंतर सदर प्रकरणी कार्यवाही करता येईल. याठिकाणी बांधकाम झालेले नाही.

**मा.सभापती:** बांधकामा बाबतची व्याख्या नगर रचना यांनी सभागृहात सांगावी आणि समतानगर येथील या टपरीसाठी मीटर कसे मिळाले याची चौकशी करावी.

**नगर रचना अधिकारी :** बांधकाम म्हणजे कोणतेही स्ट्रक्चर मग असे स्ट्रक्चर जे की कायम स्वरूपाचे असो किंवा तात्पुरत्या स्वरूपाचे असो त्यास बांधकाम म्हणता येईल.

**श्री.हमीदउद्दीन ताबा:** दिनांक २८.६.९६ च्या सभेत महानगरपालिका शाळेकरीता शिक्षक भरती बाबत चर्चा करण्यात आली आहे. त्यावर काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**सहाय्यक आयुक्त -१:** नियमाप्रमाणे शिक्षक भरतीसाठी उमेदवाराची यादी प्राप्त झाली आहे. महानगरपालिकेमध्ये कर्मचारी भरती बाबत समिती गठीत करण्यात आली आहे. या समिती मार्फत निवड करण्यात येते. आणि त्याप्रमाणे आदेश दिले जातात.

**श्री.हमीदउद्दीन ताबा:** महानगरपालिका शाळेत १०० शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत यासाठी ३० शिक्षकांना आदेश दिले आहेत. मा.आयुक्त असतांना शिक्षक भरती बाबतचे सर्व प्रकरण तयार झालेले आहे. परंतु मा. आयुक्तांची बदली झाल्याबरोबर सर्व प्रकरण प्रलंबित ठेवले आहे हे कसे ?

**श्री.हमीदउद्दीन ताबा:** महानगरपालिका शाळेतील शिक्षक भरती बाबतचे आदेश निघाले नाही तर मला उपोषणास बसावे लागेल. प्रशासनात योग्य प्रकारे काम होत नाही म्हणून उपोषणाची धमकी दयावी लागत आहे.

**श्री.अब्दुल रशिद खान मामू:** शिक्षकांची भरती करतांना जिल्हा परिषदेत अथवा अन्य संस्थांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना काम देण्यांत येणार असा निर्णय घेण्यांत आला आहे. तयाची अंमलबजावणी करण्यात यावी.

**मा.सभापती :** दि.२८.६.९६ च्या सभेत ज्या प्रकरणात पाहणी करण्यांत यावी असा निर्णय घेण्यात आला आहे त्या प्रकरणांची पाहणी स.सभासदा मार्फत करण्यांत आली असून या पहाणी अहवाला नुसार विषय क्र.२७,२९,३६,३७,५० या विषयांच्या कामांना मंजुरी देण्यांत येते. आणि विषय क्र.३५ आणि ४८ या कामाचे गुत्तेदार काम करू शकत नाही असे सभासदांचे मत आहे. या कामाकरीता पुन्हा दरपत्रक मागविण्यात यावीत असा निर्णय घेण्यांत येत आहे.

**विषय क्र.५६/१**

दिनांक २८.६.९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव:**

दिनांक २८.६.९६ च्या सभेचे इतिवृत्त कायम करतांना पाहणी करण्यात आलेल्या विषया बाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यांत येतात.

१ विषय क्र.२७ बाबत झालेल्या पाहाणी अहवाला नुसार प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.शारदाश्रम कॉलनी येथे वाचनालय बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०९% कमी दराचे गुत्तेदार श्री.एस.झेड सिद्यीकी यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

२ विषय क्र.२९ बाबत झालेल्या पाहणी अहवाल नुसार प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा. ढोरपुरा येथील अस्तित्वात असलेली तळ मजल्याची इमारत तोडून त्या जागेवर शाळेसाठी पुन्हा तळमजला व पहिला मजला बांधणेच्या कामासाठी प्राप्त जागेवर शाळेसाठी पुन्हा तळमजला व पहिला मजला बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेले एकमेव दरपत्रक गुत्तेदार एस.झेड सिद्यीकी यांचे अदांजपत्रकीय दरापेक्षा १.०९% चे निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

३ विषय क्र.३६ ची पाहणी झाली सअून अहवाल नुसार प्रस्तावात दर्शविलया प्रमाणे दादा कॉलनी (कैलासनगर) येथे दवाखान्यासाठी व वाचनालयासाठी इमारत बांधणेच्या कामासाठी प्राप्त निविदा मे.अंबावाला ए.एच.एन. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी ( दराचे वाटाघाटी अन्वये) दराचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

४ विषय क्र.३७ ची पाहणी झाली असून अहवाला नुसार प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.सिध्दार्थनगर येथे नविन ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. गटार बांधणे, दगडी गटार बांधणे आणि अस्तित्वात असलेल्या गटारची विशेष दुरूस्ती करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.३% कमी दराचे निविदा गुत्तेदार श्री.एम.एन.हक्क यांचे निविदा पत्रकाचे सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

याशिवाय दिनांक २८.६.९६ च्या सभेतील विषय क्र.३५ आणि ४८ चे काम संबंधित गुत्तेदार करू शकणार नसल्याने या कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावीत असे सर्वानुमते ठरले.

वरील प्रमाणे दुरूस्ती व वाढ यासह दिनांक २८.६.९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती व सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र ५७/२:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, संजयनगर येथे १०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.३,२२,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधून करण्यात येणार आहे तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर येथे १०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यंत आलेले र.रू.३,२२,०००/- चे अदंाजपत्रक तसेच सदर खर्च भांडवली कामाचे तरतुद मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५८/३:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, लोटा कारंजा येथे २०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसुची नुसार रक्कम रू.२,६७,३७८/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधून करण्यांत येणार आहे. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लोटाकारंजा येथे २०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रू.२,६७,३७८/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५९/४:**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.कटकटगेट येथे एस.टी.कॉलनी जवळ नाला संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता परिसर अभियांत्रिकी विभागाच्या दरसुची ९४-९५ च्या दरत्रकानुसार अंदाजपत्रकीय रक्कम रू. ५,०५,०००/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दिनांक १९.१२.९५ ला मंजुरी दिलेली होती व सदरील कामास स्थायी समितीत विषय क्र.३२४/२० दिनांक २८.१२.९५ ला मंजुरी मिळाली होती. तसेच स्थायी समिती ठराव क्र.४३८/१४ नुसार सदरील काम गुत्तेदार श्री.एम.ए.सिद्यीकी यांच्या कडून ३% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने करून घेण्यास मंजुरी मिळाली होती. सदरील ठिकाणी दिनांक ३१.८.९५ च्या मुसळधार पावसामुळे एस.टी.कॉलनी मध्ये पाणी शिरून प्रचंड प्रमाणावर तेथील रहिवाश्यांचे नुकसान झाले होते संभाव्य पुरावे पाण्याचा धोका पुन्हा निर्माण होवू नये म्हणून सदरील काम आर्थिक तरतुद कमी असल्यामुळे मंजुर निविदेच्या रक्कमेतून पुढे १५० आर.एम.टी. काम करणे शक्य आहे, त्यामुळे पुर्ण वसाहतीसाठी संरक्षित भिंत बांधणे शक्य होणार नाही. करीता १०० आर.एम.टी.संरक्षित भिंतीचे वाढीव बांधकाम करणे अत्यावश्यक आहे.

तरी सदरील वाढीव बांधकामासाठी रक्कम रू.३,००,०००/- वाढीव तरतुद आवश्यक आहे. सदरील काम शासकीय अनुदानाचे १०० कोटीचे १ कोटी मधील रू.३,००,०००/- ची बचती मधून प्रस्तावित आहे.

तरी रू.३,००,०००/- चे वाढीव आर्थिक खर्चास तसेच गुत्तेदार श्री.एम.अे.सिध्दीकी त्यांच्या कडून करून घेण्यांस प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.कटकटगेट येथे एस.टी.कॉलनी जवळ नाला संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता तसेच १००० आर.एम.टी. संरक्षित भिंतीचे वाढीव करणे अत्यावश्यक असल्याने व सदरील वाढीव बांधकामासाठी रक्कम रू.३,००,०००/- चे वाढीव आर्थिक खर्चास तसेच सदर काम गुत्तेदार श्री.एम.अे.सिध्दीकी यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६०/५:**

अति.शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, भवानीनगर रोहीदास नगर भागात डांबरीकरण व ट्रेंचिंगचे खडीकरण करणे या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रू. ७,७०,३२०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या रस्ता देखभाल व दुरूस्ती या लेखा शिर्षकात उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.७,७०,३२०/- चे अंदाजपत्रकास मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भवानीनगर रोहीदासनगर भागात डांबरीकरण व ट्रेंचिंगचे खडीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रू.७,७०,३२०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामाचा खर्च सन ९६-९७ च्या रस्ता देखभाल व दुरूस्ती देखभाल व दुरूस्ती या लेखा शिर्षकात उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६१/६:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, औरंगपूरा भाजी मंडी प्रणव प्लाझा समोर ५० फुट विकास रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार रक्कम रू.१,९८,३९३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यांत येईल. तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले र.रू.१,९८,३९३/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगपूरा भाजी मंडी प्रणव प्लाझा समोर ५० फुट विकास रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रू.१,९८,३९३/-

चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र.६२/७:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि. प्राथमिक शाळा हर्सुल ते श्री.संत ज्ञानेश्वर वेद विद्या प्रतिष्ठान पर्यंत खडी रस्ता यार करणे या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रूपये ५,१९,२२०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रू.५,१९,२२०/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्राथमिक शाळा हर्सुल ते श्री.संत ज्ञानेश्वर वेद विद्या प्रतिष्ठान पर्यंत खडी रस्ता यार करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रूपये ५,१९,२२०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६३/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, मालजीपूरा येथील रास्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार रक्कम रू.१,१०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रू.१,१०,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मालजीपुरा येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.१,१०,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही.

**विषय क्र.६४/९:**

मा.जिल्हाधिकारी यांनी त्यांचे पत्रक्र.९६/पुरवठा/सुभाके/का.वि.दिनांक २.२.९६ अन्वये कळविले आहे. कि, मो.चिकलठाणा येथे झुणका भाकर केंद्र अहिल्या देवी महिला मंडळ आडगांव यांचे नांवे मंजुर करण्यात आले आहे तरी या केंद्रास मो. चिकलठाणा येथे प्रथम प्राधान्याने १०X१२ अशी १२० चौ.मी. जागा उलपब्ध करून द्यावी त्यानुसार चिकलठाणा येथील भाजी मंडई शेडच्या शेजारी उत्तरेस १०X१२ फुट (१२० चौ.फुट) जागा खालील अटी शर्ती नुसार देता येवू शकेल.

१ सदरील जागेची महानगरपालिकेस जेव्हा गरज पडेल त्यावेळी जागा महानगरपालिकेच्या ताब्यात दयावी लागेल.

तरी वरील अटी व शर्ती नुसार प्रस्ताव स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव सादर.

**संवाद:**

**श्री.अ.रशिद खान मामू:** झुणका भाकर केंद्रासाठी जागा देण्याबाबत टेंडर मागविण्यांत यावे.

**मा.सभापती :** झुणका भाकर केंद्रासाठी संबंधित मोफत जागा उपलब्ध करून दयावी असे शासनाचे परिपत्रक आहे. तथापी स.सभासदांची सुचना योग्य वाटते असे शासनास कळविण्यात यावे.

**श्री.अ.रशिद खान मामू:** महानगरपालिकेने मंजुर केलेल्या टपरी कमिटीच्या अहवाला नुसार ८०% १००" रस्त्यावर टपरीसाठी जागा देण्यांत यावी अशी सुचना या अहवालात केलेली आहे. उदा. बस स्थानकाजवळील टांगा स्टँड या मोकळया जागेत सध्या दोनच टपरीधारक व्यवसाय करत आहेत वस्तुतः या ठिकाणी आणखी २५/३० टपऱ्या बसू शकतील अशी जागा आहे.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** मंजुर झालेला टपरी कमिटीच्या अहवालात असा नियम असला तरी मध्यवर्ती बस स्थानक जिल्हाधिकारी कार्यालय यासारख्या महत्वाच्या ठिकाणी टपऱ्यासाठी जागा देण्यांत यावी अशी सुचना या अहवालात केलेली आहे. उदा.बस स्थानका जवळील टांगा स्टॅड या मोकळया जागेत सध्या दोनच टपरी धारक व्यवसाय करत आहे. वस्तुतः या ठिकाणी आणखी २५/३० टपऱ्या बसू शकतील अशी जागा आहे.

**मा.सभापती :** झुणका भाकर ही शासनाची योजना आहे. ही योजना शासन गोरगरीब नागरिकांसाठी राबवत आहे याचही विचार करणे आवश्यक आहे.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.जिल्हाधिकारी यांचे पत्रक क्र.९६/पुरवठा/ झुभाकें/का.वि /दिनांक २.२.९६ अन्वये मो.चिकलठाणा येथे अहिल्या देवी महिला मंडळ, आडगांव यांचे नावे झुणका भाकर केंद्र मंजुर करण्यात आल्याचे कळविले असून या केंद्रास चिकलठाणा येथील भाजी मंडई शेडच्या शेजारी उत्तरेस १०X१० फुट (१२० चौ.फुट) जागा सदरील जागेची महानगरपालिकेस जेव्हा गरज पडेल, त्यावेळी सदर जागा महानगरपिालकेस ताब्यात द्यावी लागेल या अटी व शर्ती नुसार अहिल्यादेवी मंडळ आडगांव यांचे नावे मंजुर करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६५/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, सिध्दार्थ उद्यानातील नाल्या लगत उर्वरित रिटनिंग वॉल बांधणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रू.१,९६,९००/- चे सा.बां. खात्याचे सन ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यांत आले सदर खर्च नविन उद्याने या तरतुदी मधून करण्यांत येणार आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्या ानातील नाल्या लगत रिटेनिंग वॉल बांधणेचे कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रू.१,९६,९००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च नविन उद्याने या तरतुदी मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६६/११:**

मा.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे, मो. नुर कॉलनी स्लम येथे फरशी बसविणे व ढापे टाकणे,स्लॅब टाकणे बाबत कामा करीता सा.बां.खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार रू. १,६३,६७६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम खांडकी बसविणे रू.३५.०० लाख या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दिनांक २७.५.९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले अदांजपत्रक रू.१,६३,६७६/- यांस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. नुर कॉलनी स्लम येथे फरशी बसविणे व ढापे टाकणे,स्लॅब टाकणे बाबत कामा करीता सा.बां.खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार रू. १,६३,६७६/- चे अंदाजपत्रक तसेच सदरील काम खांडकी बसविणे रू.३५.०० लाख या शिर्षकातून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६७/१२:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, हर्सुल येथील गट नं.१८२/२(आदित्यनगर) येथे खडी रस्ते तयार करणे या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार रक्कम रू.१,६२,६१०/- चे अंदापजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यांत येईल.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रू.१,६२,६१०/- अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल येथील गट नं.१८२/२ (आदित्यनगर) येथे खडी रस्ते तयार करणे या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.१,६२,६१०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६८/१३:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, टाऊन हॉल ते मकाई गेट या रोडचे पुर्नडांबरीकरण करणे या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.४,३२,३५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते देखभाल व दुरूस्ती या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असणाऱ्या तरतुदी मधून करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रू.४,३२,३५०/-चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टाऊन हॉल ते मकाईगेट या रोडचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रू.४,३२,३५०/- चे अंदाजपत्रकास

तसेच सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते देखभाल दुरूस्ती या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असणाऱ्या तरतुदी मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६९/१४:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, दत्त नगर भागातील रोडचे डांबरीकरण करणे या कामासाठी सा.बां. खात्याचे सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.४,०८,५६२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या रस्ते देखभाल व दुरूस्ती या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रू.४,०८,५६२/-चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

ठराव:

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दत्त नगर भागातील रोडचे डांबरीकरण करणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रू.४,०८,५६२/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या रस्ते देखभाल व दुरूस्ती या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७०/१५:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, समर्थनगर प्लॉट नं.३-२२ वृंदावन कॉलनी, पुष्पनगरी भागातील अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार रक्कम रू.३,५०,२८०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या रस्ते देखभाल व दुरूस्ती या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध तरतुदी मधून करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रू.३,५०,२८०/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समर्थनगर (प्लाट नं.३-२२) वृंदावन कॉलनी, पुष्पनगरी भागातील अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.३,५०,२८०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या रस्ते देखभाल व दुरूस्ती या लेखा शिर्षकाखालील उपलब्ध तरतुदी मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७१/१६:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, लक्कडमंडी येथील रोडचे डांबरीकरण करणे या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.२,५७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रू.२,५७,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लक्कडमंडी येथील रोडचे डांबरीकरण करणे च्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रू.२,५७,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखाशिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७२/१७:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, दत्तनगर भागात खडी रस्ते तयार करणे या कामासाठी सा.बां.,खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार रक्कम रू.१,५६,१८४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यांत आलेले रक्कम रू.१,५६,१८४/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दत्तनगर भागात खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रू.१,५६,१८४/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रसते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७३/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, उध्दवराव पाटील चौक ते हिमायतबाग व सावित्रीबाई फुले नगर भागात रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार रक्कम रू.१,७३,१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रू.१,७३,१००/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उध्दवराव पाटील चौक ते हिमायतबाग व सावित्रीबाई फुले नगर भागात रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रू.१,७३,१००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७४/१९:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.सिध्दार्थ नगर वार्ड क्र.५९ येथे खडी रस्ते तयार करणेचे कामा करीता रक्कम रू.१,६०,८००/- चे अंदाजपत्रक सा.बां. विभाग औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ नुसार तयार करण्यात आले असून मा. आयुक्त यांनी दिनांक २०.६.९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच सदरील काम "म्हाडा अनुदानातून " करण्यांत येईल. प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.सिध्दार्थनगर वार्ड क्र.५९ येथे खडी रस्ते तयार करणेचे कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रू.१,६०,८००/-चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम म्हाडा अनुदानातून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७५/२०:**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला कि, आर्थिक वर्ष १९९६-९७ या वर्षासाठी स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करून छपाई निविदा मागविण्यात आल्या असता एकूण सहा (६) निविदा या कार्यालयास प्राप्त झाल्या, पैकी "महिला आर्थिक विकास महामंडळ म" यांनी कामधेनू योजने अंतर्गत निविदा भरलेली होती परंतू त्यांनी आवश्यक ती कागदपत्रे दाखल न केल्याने त्यांना या कार्यालयाचे पत्र क्र. १२६ दिनांक २१.३.९६ नुसार कागदपत्रे सादर करणेस कळविण्यात आले, परंतू विहित मुदतीत संबंधितानी कागदपत्रे सादर न केल्याने त्यांची निविदा विचारात घेण्यात आली नाही.

उर्वरित निविदाधारकांना मा. आयुक्तांचे आदेशानुसार दर कमी करणेस विनंती केली असता, कागदांचे भाव वाढल्याने एकानेही दर कमी करणेस नकार दिला.

करिता खालील निविदाधारकांसमोर त्यांचे नावासमोर दर्शविले आयटमचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी असल्याने तसे दर्शविण्यात आले आहे.

१में.श्री.गणेश मुद्रणालयआयटम क्र.१ ते ५,७ ते १७,२२ ते ३३, ३५,३६,३७,३९,४८,५०,५५,५७ ते ६१,६८ ते ७१,७६ ते ८७,९२,९३,९४,९६,९७,१००,१०१,१०२,१०४,१०५,१०७,१०८,११० (३) ,११३,११४,११५,११७ ते १२३ (१) इ.

२ मे.सुरत प्रिन्टर्स आयटम क्र.४२,४५,४६,४९,५१,१०९ इ.

३ मे.लिबर्टी प्रिटर्स आयटम क्र.४,२७,३४,२८,४०,४१,४३,४४,४७,५२,५३,५४,५६,६२,६४ ते ६७,७२ ते ७५,८६ ते९१ ,९५,१०६,११०(१),१११,(१ ते ५),११२,११६,१२३(२) इ.

४मे.रविराज प्रिटर्स आयटम क्र.६,१८ ते २१,६३,९०,९८,१००,११० (२ व ४) इ.

५मे.पुजा ऑफसेट आयटम क्र.११६ फक्त एकच आयटम तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी असलेने त्यांचे विनंती नुसार मे.लिबर्टी पिंटर्स यांनी त्यांचे दरात देण्यांचे मान्य केल्याने संबंधिताची अनामत रक्कम परत करण्यांत आली.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आर्थिक वर्ष १९९६-९७ या वर्षासाठी छपाईचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदा पत्रका पैकी खालील धारकांचे नावा समोर दर्शविलेले आयटमचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी असल्यामुळे त्यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१ में.श्री.गणेश मुद्रणालय आयटम क्र.१ ते ५,७ ते १७,२२ ते ३३, ३५,३६,३७,३९,४८,५०,५५,५७ ते ६१,६८ ते ७१,७६ ते ८७,९२,९३,९४,९६,९७,१००,१०१,१०२,१०४,१०५,१०७,१०८,११० (३) ,११३,११४,११५,११७ ते १२३ (१) इ.

२ मे.सुरत प्रिन्टर्स आयटम क्र.४२,४५,४६,४९,५१,१०९ इ.

३ मे.लिबर्टी प्रिटर्स आयटम क्र.४,२७,३४,२८,४०,४१,४३,४४,४७,५२,५३,५४,५६,६२,६४ ते ६७,७२ ते ७५,८६ ते९१ ,९५,१०६,११०(१),१११,(१ ते ५),११२,११६,१२३(२) इ.

४ मे.रविराज प्रिटर्स आयटम क्र.६,१८ ते २१,६३,९०,९८,१००,११० (२ व ४) इ.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७६/२९:**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जयलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.नागसेन कॉलनी आईस फक्टरी जवळ आर.सी.सी. गटार बांधणेच्या कामाकरीता अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,६०,०००/- चे तयार करण्यांत आले आहे, सदरील अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी विभागाच्या दरपत्रक सन ९४-९५ नुसार तयार करण्यात आले आहे.

सदरील काम भांडवली तरतुद ९६-९७ मधून प्रस्तावित असून सदर सदरील कामास मा. आयुक्तांनी दिनांक २०.६.९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तरी सदरील अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,६०,०००/- चे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.नागसेन कॉलनी आईस फॅक्टरी जवळ आर.सी.सी. आर.सी.सी.गटार बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यांत आलेले रक्कम रू.१,६०,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम भांडवली तरतुद ९६-९७ मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७७/२२:**

श्रीमती सुहासिनी घाग यांनी अर्ज देवून विनंती केली आहे कि, मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी त्यांचे पत्रक क्र.९६/झुभाकें/पुरवठा/का.वि/दिनांक २८.२.९६ अन्वये आर.टी.ओ. ऑफीस शेजारी झुणका भाकर केंद्रासाठी १०X१२ आकाराची जागा उपलब्ध करून द्यावी.

आर.टी.ओ.ऑफीस शेजारी जागा झुणका भाकर केंद्रासाठी देता येईल का ? याबाबत अतिरिक्त शहर अभियंता यांचा अभिप्राय मागविण्यात आला असता त्यांनी अहवाल दिला आहे कि, झुणका भाकर केंद्राची प्रस्तावित जागा ही आर.टी.ओ कार्यालयाचे दक्षिण पश्चिम भिंती लगतची असून विकास योजने नुसार १०० फुट रूंद रस्त्याने बांधित होणारी असून फुटपाथने बाधित होते. सध्या आर.टी.ओ. भिंती लगत ४.५ टपऱ्या चालू आहेत. त्यालाईन मध्येच सदरील जागा मोडते.

यापुर्वी दिनांक २९.२.९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीमध्ये संवाद काळात झालेल्या चर्चेमध्ये मा.सभापती यांनी निर्णय दिला आहे कि, झुणका भाकर केंद्रासाठी जागा देतांना ती फुटपाथवर दिली जाणार नाही याची संबंधित अधिकाऱ्यांनी काळजी घ्यावी.

तरी वरील कार्यालयीन टिपणी नुसार संबंधिताना झुणका भाकर केंद्रासाठी जागा आर.टी.ओ. ऑफीस शेजारी जागा द्यावी किंवा नाही या बाबत चर्चा होवून निर्णय घेण्यांत यावा.

**संवाद :**

**श्री.अ.रशिद खान मामू:** प्रस्तावित झुणका भाकर केंद्र चालू स्थितीत आहे मग अशा केंद्रासाठी मंजुरी का मागविण्यात येत आहे. प्रस्तुत प्रस्तावात दर्शविण्यात आलेल्या टपऱ्यांची संख्या जास्त असली तरी प्रत्यक्षात या ठिकाणी दोनच

टपऱ्या चालू आहेत.प्रस्तावात सभागृहाची दिशाभूल करणारा अहवाल दिला गेला आहे. सदर जागा ही १०० रोडवर आहे. सभागृहाची दिशाभूल करणारा अहवाल देणाऱ्या अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यांत यावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी यापुढे अहवाल देतांना खबरदारी घ्यावी. प्रस्तुत प्रस्तावात दिशाभूल करणारा अहवाल दिल्या बाबत चौकशी करण्यांत यावी. तथापि झुणका भाकर ही योजना शासनाची असल्यामुळे प्रस्तुत प्रस्तावास मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीमती सुहासिनी सुभाष घाग यांचे विनंती अर्जा नुसार मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी त्यांचे पत्रक क्र.९६/ झुभाकें/पुरवठा/का.वि./दिनांक २८.२.९६ अन्वये आर.टी.ओ. ऑफीस शेजारी झुणका भाकर केंद्र उघडण्यासाठी मंजुरी दिली असल्यामुळे त्यांना आर.टी.ओ.ऑफीस शेजारी झुणका भाकर केंद्रासाठी १०X१२ या आकाराची जागा उपलब्ध करून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७८/२३:**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जयलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.किलेअर्क येथील मशिदी लगत नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामा करीता रू.५,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील अंदाजपत्रक शहा कन्सलटंटच्या सेक्शन अनुसार व सा.बां. खात्याच्या सन ९२-९३ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले आहे. सदरील कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रू.५,००,०००/- मा.आयुक्तांनी दिनांक २०.६.९६ ला मंजुरी दिलेली आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रू.५,००,०००/- यास मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.किर्लेअर्क येथील मशिदी लगत नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामा करीता तयार करण्यांत आलेली रक्कम रू.५,००,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७९/२४:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, भावसिंगपूरा येथील स्मशान भुमी येथे बर्निंग रोड, रेस्टींग रोड तार फेसिंग इ. कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.२,००,०००/- प्रस्ताव विषय क्र.३५०/९ दिनांक ६.१.९६ अन्वये मंजुर झालेले आहे. त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करून काम हाती घेण्यांत आले सदर काम प्रगती पथावर आहे. तथापि ही जागा नालयाच्या पलिकडे असल्याने पावसाळयात या ठिकाणी अंत्यविधीसाठी जाणे अत्यंत अडचणीचे होणार आहे. नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीनातुन नाल्यावर १२०० मी.मी. व्यासाचे आर.सी.सी. पाईपचा नळाकांडी पुल करणे जरूरीचे आहे. या कामाचे अ.पं. रक्कम रू.२,००,०००/- तयार करण्यात आले काम तातडीने करणे असलयामुळे स्मशान भूमिच्या कामामध्ये त्याच गुत्तेदारा मार्फत (श्री.शेख शरीफ) करून घेणे बाबत तसेच मुळ अ.पं.२.०० लक्ष स्मशानभूमीचे कामाचे व २.०० लक्ष आर.सी.सी.पाईप नळकांडी पुलाचे एकूण

४,००,०००/- अंदाजपत्रकाच्या रक्कमेस तसेच स्मशानभुमीच्या निवेदेच्या दराने ०.२०% कमी दराने श्री.शेख शरिफ यांच्या मार्फत करून घेणे बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भावसिंगपूरा येथील स्मशान भुमी येथे बर्निंग रोड, रेस्टींग रोड तार फेसिंग इ. कामाचे प्रगती पथावर असून ही जागा नाल्याच्या पलिकडे असलयाने पावसाळयात या ठिकाणी अत्यंविधीसाठी जाणे अत्यंत अडचणीचे होणार नागरिकांच्या सोयीसाठी नाल्यावर १२०० मी.मी. व्यासाचे आर.सी.सी. पाईप नळकांडी पुल करणे जरूरी आहे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.२,००,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामा तातडीचे करणे असल्यामुळे स्मशान भुमीचे कामामध्ये त्याच गुत्तेदारा मार्फत (श्री.शेख शरीफ) करून घेणेस व मुळ अंदाजपत्रक २.०० लक्ष स्मशान भूमीचे कामाचे व २.०० लक्ष आर.सी.सी. पाईप नळकांडी पुलाचे एकूण ४,००,०००/- चे खर्चास व सदर काम स्मशानभूमीचे निविदेच्या ०.२०% कमी दराने श्री.शेख शरीफ यांचे मार्फत करून घेणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८०/२५:**

मालमत्ता अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला कि, मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे पत्रक क्र.९६/पुरवठा/झुभाकें/का.वि./ दिनांक २९.३.९६ अन्वये शहागंज बस स्थानकाजवळ चेअरमन, लोकहीत मागासवर्गीय सह. ग्राहक संस्थेच्या नावे झुणका भाकर केंद्र मंजुर केलेले आहे. तरी त्यांना झुणका भाकर केंद्रासाठी १०X१२ = १२० चौ.फुट जागा उपलब्ध करून द्यावी म्हणून विनंती केली आहे.

त्यानुसार कायालयातर्फे शहागंज भागाची पाहणी केली असता शहागंज स्टेट टॉकीजच्या पश्चिम कुंपन भिंतीच्या लगत १५ फुट जागा सोडून झुणका भाकर केंद्रासाठी खालील शर्ती नुसार देता येवू शकेल.

१ रस्ता रूंदीकरण मध्ये बाधित झाल्यास अथवा महानगरपालिकेस आवश्यक वाटेल त्यावेळी जागा परत घेण्याचा राहील.

२ नगर रचना विभागाची परवानगी घेतल्या शिवाय बांधकाम करण्यांत येवू नये.

तरी वरील कार्यालयीन टिपणी नुसार दर्शविलेली जागा संबंधितांना विना मुल्य देण्या बाबत प्रस्ताव स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे पत्रक क्र.९६/पुरवठा/झुभाकें/का.वि./दिनांक १९.३.९६ अन्वये शहागंज भागात बस स्थानका जवळ चेअरमन नावे झुणका भाकर केंद्र मंजुर केलेले असून त्यांना झुणका भाकर केंद्रासाठी १०X१२ =१२० चौ.फुं जागा उपलब्ध करून देणे बाबत विनंती केल्यानुसार संबंधितास शहगंज स्टेट टॉकीज च्या पश्चिम कुंपन भिंतीच्या लगत १५ फुट जागा सोडून झुणका भाकर केंद्रासाठी १०X१२=१२० चौ.फुट जागा १) रस्ता रूंदीकरणात बाधित झाल्यास अथवा महानगरपालिकेस आवश्यक वाटेल त्यावेळी जागा परत घेण्याचा अधिकार राहील. २) नगर रचना विभागाची परवानगी घेतल्या शिवाय बांधकाम करण्यात येवू नये या अटी व शर्ती नुसार मंजुर करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८१/२६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.आसेफिया कॉलनी (स्लम) येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे बाबत कामाकरीता सा. बां. खात्याच्या सन ९४-९५

च्या दरसुचीनुसार रू.३,८७,५२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते व त्यास प्रशासकीय तथा स्थायी समितीच्या मंजुरी नुसार या भागात डांबरीकरणाचे काम हाती घेण्यात येवून काम रक्कम रू.२,७०,३५५/- चे पूर्ण करण्यांत आले. मात्र येथील नागरिकांनी अतिक्रमण तोडण्यास संमती दिल्याने उर्वरित आतील भागाचे डांबरीकरणाचे काम शक्य झाले आहे. या उर्वरित कामासाठी सदरील कामाचेसाठी सदरील कामाचे दुरूस्त अंदाजपत्रक रक्कम रू. ९,२९,८०१/- चे तयार करण्यात आले आहे.

सदरील काम ठेकेदार श्री.आदित्य कन्स्ट्रक्शन हयांना अ.पं. दरापेक्षा ४% दरानेच देण्यांत आलेले आहे. वाढीव काम सदरील ठेकेदाराकडून मंजूर दरा प्रमाणेच करून घेण्यास मा. आयुक्त यांची मंजुरी दिनांक १२.६.९६ ला घेण्यांत आली आहे.

तरी दुरूस्त अंदाजपत्रक रू.९,२९,८०२/- ला मंजुरी मिळण्यास्तव व वाढीव काम सदरच्या कामाचे ठेकेदाराकडून पूर्वीच्या मंजुर निविदा दराप्रमाणे म्हणजे अ.पं. ४% जास्त दराने करून घेणेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद:**

**श्री.गौतम खरात:** प्रस्तुत प्रस्तावा नुसार फक्त १०/१२ गल्ल्यांचे काम झाले आहे. फक्त २/३ गल्ल्यात काम करणे बाकी आहे. मग अंदाजपत्रकात एवढा फरक कसा ? स्लम विभागाच्या संबंधित उप अभियंता यांचे लक्ष नाही. झालेले काम निकृष्ट दर्जाचे आहे.

**उप अभियंता (स्लम):** प्रस्तुत प्रस्तावाच्या भागात सहा गल्ल्यांचे काम करणे बाकी आहे. या भागातील दुकानाचे अतिक्रमण तोडण्याची परवानगी देण्यांत आली आहे. त्यानुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. अंदाजित खर्च कमी / जास्त होवू शकतो. प्रस्तुत कामाची सभागृह पाहणी करू शकते.

**श्री.महादेव सुर्यवंशी:** एवढया कामाचे अंदाजपत्रक ३ लाख रूपयाचे असेल तर त्यानुसार गुत्तेदाराकडून १% व २% अनामत रक्कम भरून घेतले जाते त्याच कामाचे सुधारित अंदाजपत्रक ६ लाख रूपये करण्यात आल्यानंतर वाढीव काम त्याच गुत्तेदाराकडून घेण्यांत येते अशा वेळी वाढीव कामाच्या अंदाजपत्रकाचे १% व २% अनामत रक्कम गुत्तेदाराकडून भरून घेतली जाते का ?

**शहर अभियंता :** प्रस्तुत प्रस्तावानुसार डांबरीकरणाचे आहे. पावसाळा संपल्यानंतर या कामासाठी वाढीव दराचे निविदा पत्रक येवू शकते. याचा विचार करून त्याच गुत्तेदाराकडून काम करून घेण्यांत येते. सुधारित अंदाजपत्रकाच्या मंजुरी नुसार २% अनामत रक्कम भरून घेण्यांत येते.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. आसेफिया कॉलनी (स्लम) येथील रस्त्याचें पुर्नडांबरीकरण करणे बाबतच्या उर्वरित कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.९,२९,८०२/- चे दुरूस्त अंदाजपत्रकास तसेच सदर वाढीव काम सदरच्या कामाचे ठेकेदारा कडून पुर्वीच्या मंजुर निविदा दराप्रमाणे म्हणजेच उ.पं. दरापेक्षा ४% जास्त दराने ठेकेदार श्री.आदित्य कन्स्ट्रक्शन यांचेकडून घेणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८२/२७:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो. घाटी जयभिमनगर येथील रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण करणे बाबत कामा करीता सा. बां. खाते यांच्या वर्ष ९४-९५च्या दरसुची नुसार रू.४,२९,१०५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले होते तेथील नागरीकांनी अतिक्रमण तोडण्यांस संमती दिल्याने उर्वरित आतील भागाचे डांबरीकरणाचे काम करणे शक्य झाले आहे. या उर्वरित कामासाठी दुरूस्त अंदाजपत्रक रक्कम रू. ५,४०,३४७/- तयार करण्यांत आले आहे. सदरील काम ठेकेदार अदिनाथ कन्सट्रक्शन हयांना अ.पं. द.पेक्षा ५% जास्त दराने देण्यांत आलेले आहे. वाढीव काम सदरील ठेकेदाराकडून मंजूर दराप्रमाणे करून घेण्यास्तव मा. आयुक्त त्यांची मंजुरी दिनांक ५.६.९६ ला घेण्यांत आली आहे.

तरी दुरूस्त अंदाजपत्रक रू.५,४०,३४७/- ला मंजुरी मिळणेस्तव व वाढीव काम सदरच्या कामाचे ठेकेदारा मार्फत पूर्वीच्याच मंजुर निविदा दराप्रमाणे म्हणजेच अ.प.दरापेक्षा ५% जास्त दराने करून घेण्याच्या प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

ठराव:

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.घाटी, जयभिमनगर येथील रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण करणेच्या उर्वरित कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रू.५,४०,३४७/- चे दुरुस्त अंदाजपत्रकास तसेच सदरील वाढीव काम सदरच्या कामाचे ठेकेदार श्री.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे मार्फत पूर्वीच्याच मंजुर निविदा दराप्रमाणे म्हणजेच अ.प.दरापेक्षा ५% जास्त दराने करून घेण्यांस सर्वानुमकते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८३/२५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.संजयनगर ,बायजीपूरा येथील रस्त्याचें डांबरीकरण करणे बाबत कामा करीता सा.बा.खात्याच्या वर्ष ९२-९३ च्या दरसुची नुसार रू.९,१८,९०७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले होते. त्यास मा. आयुक्त यांची मान्यता प्राप्त होती. आता पयंत रू.५,२९,७४७/- खर्च झाले आहे. या ठिकाणी ड्रेनेज लाईनचे व पाणी पुरवठा लाईनचे काम पूर्ण झाले आहे. नव्याने टाकलेल्या पा.पु. लाईनच्या खडडयात पाणी साचून पाणी दुषित होवून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण न होण्या करीता शिल्लक राहीलेल्या एकूण ४१०० मीटर लांबी रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण करणे आवश्यक असल्याने या कामाचे दुरूस्त अंदाजपत्रक रू. २७,९९,०६७/- तयार करण्यांत आले आहे. पुर्वीचे मंजुर अंदाजपत्रक हे ९२-९३ च्या दर सुची नुसार आहे व ते अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने मंजुर करण्यांत आले आहे. तुलनात्मकदृष्टया ९२-९३ च्या पेक्षा सध्याचे दर १८% ने जास्त वाढले आहे. या कामाचे मुळ ठेकेदार श्री.ए.सी.कोठारी यांना वाढीव काम करण्याबाबत विचारणा केली असता त्यांनी मुळ निविदा भरलेल्या दरानेच वाढीव काम करण्याची तयारी दर्शविली आहे. त्यामुळे सदरील वाढीव काम श्री.ए.सी.कोठारी यांच्या कडून मुळ निविदा भरलेल्या दरानेच काम करून घेतल्यास म.न.पा.च्या १५% फायदा होईल.

तरी या कामाचे दुरूस्त अंदाजपत्रक रू. २७,९९,०६७/- दरसुची नुसार तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्त साहेबांनी दिनांक २५.६.९६ रोजी मान्यता प्राप्त झाली आहे.

तरी दुरूस्त अंदाजपत्रक रू. २७,९९,०६७/- यांस मान्यतेचा व वाढीव काम पुर्वीच्याच ठेकेदारा मार्फत मंजुर निविदा प्रमाणे दर ३% अ.प.द.पेक्षा जास्त दराने करून घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.संजयनगर बायजीपूरा येथे ड्रेनेज लाईनचे व पाणी पुरवठा लाईनचे काम पूर्ण झालेलेअ सून पा.पु. लाईनच्या खडडयात पाणी साठून पाणी दूषित होवून नागकरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण न होण्या करीता शिल्लक राहीलेल्या एकूण ४१०० मीटर लांबी रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण करणे आवश्यक असल्याचे सदर कामासाठी तयारी करण्यांत आलेले रक्कम रूपये रू. २७,९९,०६७/- चे दुरूस्त अंदाजपत्रकास तसेच सदर वाढीव काम श्री.ए.सी.कोठारी या पुर्वीच्याच ठेकेदारामार्फत मंजुर निविदा प्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने करून घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९४/२९:**

मा.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.भिमनगर ,भावसिंगपूरा स्लम येथे शहाबादी फरशी बसविण्याचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.३,१२,५५६/- यांस मा.आयुक्त तथा स्थायी समितीच्या मंजुरी नुसार काम ३,५३,६५४/- चे काम पूर्ण करण्यांत आले आहे.  या ठिकाणी कामात नागरिकांनी अतिक्रमण ओटे तोडल्यामुळे येथील ड्रेनेज लाईनचे कामही पूर्ण झाले असल्याने कामाच्या परिणामात वाढ होत आहे. या वाढीव कामासह एकूण खर्च रू.५,२६,२०४/- खर्च येत असून या कामाचे मुळ ठेकेदार , श्री. संजय सरोदे यांनी वाढीव काम मुळ निविदेत भरलेल्या दरानेच म्हणजेच उ.प. दरापेक्षा १५% कमी दराने करण्याची तयारी दर्शविली आहे. सदरील वाढीव काम करण्यांस मा. आयुक्तांनी दिनांक १८.६.९६ रोजी मान्यता दिली आहे.

तरी वाढीव कामाचे अंदाजपत्रक रू.५,२६,२०४/-यांस मंजुरी मिळणेस्तव व वाढीव काम पुर्वीच्याच ठेकेदार श्री.संजय सरोदे हयांचे कडून मंजुर निविदा दराने म्हणजेच अ.प. द.पेक्षा १५% कमी दराने करून घेण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सदर कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावीत असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.८५/३०:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.हर्सुल गांव स्लम येथील रस्त्याचें डांबरीकरण करणे बाबत कामा करीता सा.बां. खात्याच्या सन ९२-९३ च्या दरसुची नुसार रू.३,००,४००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले होते. मात्र येथील नागरिकांनी अतिक्रमण तोडण्यांस संमती दिल्याने अंदाजपत्रकात नमुद असलेल्या रूंदीपेक्षा अधिक रूंदीचा रस्ता तयार करण्यांत आला. तसेच येथील स्मृती वनकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या मनपा शाळे समोर पुर्वी खडी रस्ता होता विद्यार्थी व पालकांना होणारा त्रास मिटविण्याकरीता शाळे समोरील रस्त्याचे नव्याने डांबरीकरण करण्यांत आले. काम प्रगतीपथावर असतांना दिनांक १५.६.९६ च्या मा. आयुक्त साहेबांच्या आदेशानुसार वाढीव काम या कामाचे मुळ गुत्तेदार आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांच्या कडून निविदेत असलेल्या दरानेच म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराने तातडीची गरज लक्षात घेवून करून घेण्यांत आले. त्यामुळे सदरील कामास आता पर्यंत ५,७४,८०८/- रू.खर्च करण्यांत आले आहे.  त्यामुळे सदरील कामास आता १२०० फुट लांबीच्या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम बाकी आहे. तरी या कामासाठी एकूण रू.७,५०,०००/- खर्च येत आहे व सदरील वाढीव कामांत मा. आयुक्त साहेबांनी दिनांक ५.६.९६ ला मंजुरी दिली आहे.

करिता या कामासाठी दुरूस्त अंदाजपत्रक रू.७,५०,०००/- यास मान्यतेस्तव वाढीव काम पूर्वीच्याच ठेकेदार आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांच्या कडून निविदा मंजुर दराप्रमाणे अ.प.द.पेक्षा ४% जास्त दराने करून घेण्यास मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.हर्सुल गांव स्लम येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे बाबत कामाकरीता येथील नागरिकांनी अतिक्रमण तोडण्यांस संमती दिल्याने अंदाजपत्रकात नमुद असलेल्या रूंदी पेक्षा अधिक रूंदीचा रस्ता तयार करण्यांत आला तसेच मनपा शाळेसमोर पुर्वी खडी रस्ता होता. विद्यार्थी व पालकांना होणारा त्रास मिटविण्यासाठी शाळेसमोरील रस्त्याचे नव्याने डांबरीकरण करण्यांत आले. या कामावर आता पर्यंत ५,७४,८०८/- रू.खर्च करण्यांत आला असून अद्याप या भागात १२०० फुट लांबीचा रस्त्याचे डांबरीकरणाचे काम बाकी आहे. सदर वाढीव कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रू.७,५०,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर काम पुर्वीचेच ठेकेदार श्री.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे कडून अ.प.द.पेक्षा ४% जास्त दराने करून घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८६/३१:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि,ह मो.तक्षशिला नगर स्लम येथे दहा बैठकीचे सार्वजनिक शौचालय बांधणे बाबत कामा करीता सा.बां.खात्याच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रू. ३,२०,९२३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम खुल्या गटारी बांधणे रू.१.०० कोटी या शिर्षकातून करण्यांत येईल.

सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दिनांक २७.६.९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामा करीता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रू. ३,२०,९२३/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.तक्षशिल नगर स्लम येथे दहा बैठकीचे सार्वजनिक शौचालय बांधणे बाबतचे कामा करीता सा.बां. खात्याच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यांत आलेले रक्कम रू.३,२०,९२३/-चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम खुल्या गटारी बांधणे रू.१.०० कोटी या शिर्षकातून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८७/३२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मा. गौतमनगर स्लम येथे खडी रस्ते तयार करणे बाबत कामा करीता सा.बां. खात्याच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रू.२,०४,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.

सदरील काम खडी रस्ते तयार करणे रू.२५.०० लाख या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दिनांक २७.६.९६ ला प्रशासकीय मंजुरी दिली आहे.

तरी सदरील कामा करीता तयार करण्यांत आलेले अंदापजपत्रक २,०४,०००/- मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.गौतमनगर स्लम येथे खडी रस्ते तयार करणे बाबतचे कामा करीता सा. बां.खात्याच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेले रक्कम रू.२,०४,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम खडी रस्ते तयार करणे रू.२५.०० लाख या शिर्षकातून करण्यांतस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८८/३३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, मो.सिडको एन-६ येथील मनपा केंद्रीय प्रा.शाळेला सुरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी सा.बां.विभागाचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.५,०४,३२०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास मा. आयुक्तांनी मान्यता दिली आहे. शाळेच्या इमारतीच्या संरक्षणासाठी सदरील भिंत बांधणे बाबत सदर शाळेच्या मुख्याध्यापकांनी मागणी केलेली आहे.

सबब सदर कामासाठी रू.५,०४,३२०/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर. सदर खर्च विकास इमारती व शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षकामधून सन ९६-९७ मध्ये करण्यांत येईल.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.सिडको एन-६ येथील मनपा के.प्रा.शाळेला सुरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी सा.बां. विभागाचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार तयार करण्यांत आलेले रक्कम रू.५,०४,३२०/-चे अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च विकास इमारती व शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षमधून सप ९६-९७ मध्ये करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८९/३४:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, मो.सिडको एन-११ येथील मनपा प्राथमिक शाळेला संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी सा.बां. विभागाचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.५,००,२७६/-चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास मा. आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. शाळेच्या इमारतीच्या संरक्षणासाठी सदरील भिंत बांधणे बाबत सदर शाळेच्या मुख्याध्यापकांनी मागणी केलेली आहे.

सबब सदर कामासाठी रू.५,००,२७६/-चे अंदाजपत्रकास प्रस्ताव मंजुरी व विचारार्थ सादर. सदरचा खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षकामधून सन ९६-९७ मध्ये करण्यांत येईल.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.सिडको एन-११ येथील मनपा प्राथमिक शाळेला संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी सा.बा. विभागाचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार तयार करण्यांत आलेले रक्कम रू.५,००,२७६/-चे अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च विकास इमातरी व शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षामधून सन ९६-९७ मध्ये करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९०/३५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, केंद्रीय प्रा.शाळा सिडको एन-९ येथील शाळेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी रक्कम रू.५,१८,५९०/- चे अंदाजपत्रक

तयार करण्यांत आली असून त्यास मा. आयुक्तांनी दिनांक १२.३.९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सबब सदर कामाचे रक्कम रू.५,१८,५९०/-चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर. सदरचा खर्च सन ९६-९७ या आर्थिक वर्षात विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षामधून करण्यांत येईल.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे केंद्रीय प्रा.शाळा सिडको एन-९ येथील शाळेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रू.५,१८,५९०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च सन ९६-९७ या आर्थिक वर्षात विकास इमारती शाळा दवाखाने बांधणे या लेखा शिर्षामधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९१/३६:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, गणेश कॉलनी आणि शबीस्थान कॉलनी भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार रक्कम रू.४,५०,६४०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ रस्ते देखभाल व दुरूस्ती या लेखा शिर्षकाखालील उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रू.४,५०,६४०/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गणेश कॉलनी भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यांत आलेले रक्कम रू.४,५०,६४०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या रस्ते देखभाल व दुरूस्ती या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९२/३७:**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, सन १९९६-९७ या वर्षी खालील ठिकाणी नविन बालवाडया सुरू केल्यास त्या ठिकाणच्या पालकांच्या पाल्यांची शिक्षणाची सोय होवू शकेल.

१ वाल्मी वाल्मी परिसरात सर्व वाल्मीचे अधिकारी व कर्मचारी राहतात. तेथे मनपा किंवा खाजगी शाळा नाही. त्यामुळे तेथे मनपा ची प्रा. शाळा सुरू केल्यास तेथील पालयाची सोय होईल.

२ वार्ड क्र.७६ सर्वसाधारण सभेने वार्ड क्र.७६ येथे नव्याने प्रा.शाळा सुरू करण्यांतस मान्यता दिली असून शाळा सुरू केली आहे तुर्त भाडयाची इमारत घेवून बालवाडी वालवाडी व इ.१ ली (मराठी) चा वर्ग सुरू करता येईल.

३ शताब्दीनगर गणेश कॉलनीच्या पुर्वेस शताब्दी नगर या भागात मनपाची किंवा खाजगी संस्थेची शाळा नाही १९९६-९७ या वर्षी मनपा येथील समाज मंदिरात मराठी बालवाडी चालवू शकेल. विद्यार्थी संख्या आहे, शक्य झाल्यास इ.१ ली चा वर्गही सुरू केला जाईल.

४. प्रबुध्द नगर पवनचक्कीच्या बाजूस प्रबुध्द नगर झोपडपट्टी आहे. तेथे मनपाची किंवा खाजगी संस्थेची शाळा नाही . वस्ती मोठी आहे. मान्य झाल्यास भाडयाची जागा घेवून तेथे बालवाडी (मराठी) चालवू शकेल.

५. के.प्रा.शा.मनपाच्या के.प्रा.शा. सिडको एन -६ या शाळेत मराठी माध्यमासाठी बालवाडीची संख्या मागील वर्षी ८० च्या वर गेली होती एका वालवाडीत ८० संख्या जास्त होते या वर्षीही संख्या १०० च्या जवळपास जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे तेथे मराठी माध्यामाची २ री बालवाडी सुरू करणे योग्य. याच शाळेत उर्दु बालवाडी नाही त्यामुळे तेथे उर्दु साठी १ स्वतंत्र बालवाडी सुरू करणे योग्य.

६ काला दरवाजा (किलेअर्क) स.नगरसेवक हमीद ताबा यांनी सदरील भागात एक मराठी बालवाडी सुरू करणे बाबत मागील वर्षी सुचविले होते पुर्वेस लेबर कॉलनी पश्चिमेस शाळा नाही. दक्षिणेस लोटा कारंजा व उत्तरेस कला महाविद्यालय असा परिसर आहे. किलेअर्कच्या समाज मंदिरात एक मराठी माध्यमाची बालवाडी सुरू करता येईल.

७. प्रा.शा.भडकलगेट उर्दु मनपाची उर्दू माध्यमाची १ ली ते ७ वी पर्यंतची शाळा आहे. तेथे बालवाडी नाही उर्दुची बालवाडी सुरू करणे योग्य ही शाळा सध्या ज्युबलीपार्कच्या इमारतीत भरते.

८. प्रा.शा.कैसर कॉलनी मनपाची ही मराठी व उर्दु माध्यमाची (मराठी १ ली ते ३ री व उर्दु १ ली ते ५ वी) शाळा असून तेथे मराठी व उर्दुची एकेक बालवाडी आहे. विद्यार्थ्यांची संख्या प्रमाणे दोन्ही माध्यमासाठी जादा एकेक बालवाडीची मागणी केली आहे. संख्येच्या आधारे बालवाडी मान्य करणे योग्य.

९. खत्रीनगर हर्सुल भागात खत्रीनगर भागात मनपाची शाळा नाही त्यामुळे तेथे इ. १ली व बालवाडी सुरू करता येईल.

१०. मोगलपुरा या भागाचे स.नगर सेवक श्री.रशिद खान मामू यांनी शिक्षणाची सोय व्हावी म्हणून एक बालवाडी सुरू करण्यासाठी सुचविले आहे.

११. रशिद मामू कॉलनी वरील प्रमाणे

१२. शांतीपूरा या भागाचे स.नगरसेविका यांनी या भागात एक बालवाडी सुरू करण्याबाबत सुचविले आहे.

१३. जयभिमनगर किलेअर्क स.नगरसेवक श्री.गौतम खरात यांनी या भागात शिक्षणाची सोय व्हावी म्हणून बालवाडया सुरू करण्याबाबत सुचित केले आहे.

१४. बुध्दविहार (चाचा नेहरू शाळेजवळ)

१५. आंबेडकर पुतळयाजवळ (जयभिमनगर) भाडयाची इमारत घेवून बालवाडी सुरू करावी लागेल. स.नगरसेवक श्री.गौतम खरात यांनी बालवाडी मागणी केली आहे.

१६. घाटी बालवाडी साठी खाजगी भाडयाची जागा पहावी लागेल. स.नगर सेवक गौतम खरात यांनी मागणी केली आहे.

१७. म्हाडा स.नगरसेविका यांनी मागणी केल्या प्रमाणे मान्य करणे योग्य.

**ठराव:**

**मा.सभापती :** प्रस्तुत प्रस्तावानुसार बालवाडी शाळे करीता पुरेशी विद्यार्थीसंख्या असल्याशिवाय बालवाडी शाळा सुरू करू नये. याशिवाय वाल्मी आणि शताब्दी नगर या भागात बालवाडीसह प्राथमिक शाळा सुरू करण्यांस मंजुरी देण्यांत येते.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९६-९७ या वर्षी खालील ठिकाणी नविन बालवाडया त्या ठिकाणच्या पालकांच्या पालयाची शिक्षणाची सोय होणे साठी सुरू करणे

करीता ज्या ठिकाणी समाज मंदिर उपलब्ध आहे तेथे समाज मंदिरात ज्या ठिकाणी मनपाची शाळा उपलब्ध आहे त्या शाळेत सतेच जेथे मनपाची शाळा नाही अशा ठिकाणी त्या त्या भागाचे स.नगरसेवकांचे मागणी नुसार भाडयाची जागा घेवून बालवाडया सुरू करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१) वाल्मी भागात बालवाडी सह प्राथमिक शाळा.
२) वार्ड क्र.७६येथे बालवाडी व १ ली (मराठी) चा वर्ग सुरू करणे.
३) शताब्दी नगर येथे बालवाडी सह प्राथमिक शाळा सुरू करणे.
४) प्रबुध्द नगर येथे बालवाडी (मराठी) सुरू करणे.
५) मनपा के.प्रा.शाळा सिडको एन-६ येथे मराठी माध्यमाची दुसरी बालवाडी सुरू करणे व याच शाळेत उर्दु बालवाडी सुरू करणे.
६) कालादरवाजा किलेअर्क येथे मराठी बालवाडी सुरू करणे.
७) प्रा.शा.भडकलगेट (उर्दु) येथे उर्दुची बालवाडी सुरू करणे.
८) प्रा.शा.कैसर कॉलनी येथे मराठी व उर्दुची एक एक बालवाडी संख्येच्या आधारे सुरू करणे.
९) खत्री नगर हर्सुल येथे इ.१ ली व बालवाडी सुरू करणे.
१०) मोगलपुरा व रशिद मामू कॉलनी भागात बालवाडी सुरू करणे.
११) शांतीपुरा भागात बालवाडी सुरू करणे.
१२) जयभिमनगर,किलेअर्क, बुध्द विहार (चाचा नेहरू स.नगर सेवकांचे मागणी प्रमाणे बालवाडया सुरू करणे. म्हाडा कॉलनी भागात स.नगरसेविका यांचें मागणी प्रमाणे बालवाडी सुरू करणेस मान्यता देण्यांत येते.

प्रस्तुत प्रस्तावानुसार बालवाडी शाळे करीता पुरेशी विद्यार्थी संख्या असल्या शिवाय त्या त्या भागात बालवाडी शाळा सुरू करण्यात येवू नये असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९३/३८:**

औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना १९७५ नुसार आणि प्रारूप विकास योजने नुसार ६० फुट रूंद दुतर्फा रस्ता दिल्लीगेट या प्रस्तावाने बाधित मिळकती पैकी दिल्लीगेट पुर्वे कडील बाजू खाजगी वाटाघाटीने १९९०-९१ मध्ये संपादन करून रस्ता वाहतूकीस खुली आहे. तसेच दिल्लीगेट पश्चिम बाजूच्या मिळकत धारकांना त्यावेळी बांधकाम मोडतोड खर्च देवून जागे बदद्ल पर्यायी जागा हिराखान रेखांकना मधील खुल्या जागेत खालील प्रमाणे देण्यांत आले आहेत.

| नांव | पर्यायी दिलेली जागा चौ.मी. |
|---|---|
| १ श्रीमती अनुसयाबाई भिमराव बनसोडे | १७३.०० चौ.मी. |
| २ सौ.कमलाबाई किशनराव सुस्ते | ०४७.२५ चौ.मी. |
| ३ श्री.पुंडलिक संपतराव मोरे | १०६.०० चौ.मी. |
| ४ श्री.सलिम खॉ.गौसखॉ व जब्बारखा गौसखॉं | १४१.७९ चौ.मी. |
| ५ श्री.शेख मतीनोद्यीन शे.मेहबुब व श्री.शेख मतीनोद्यीन शे. मेहबुब | ०९५.०० चौ.मी. |
| ६ श्री.अमित विठ्ठल गिरी | ०४७.२५ |
| एकूण: | ६१०.२५ चौ.मी. |

वरील मिळकत धारकांना महानगरपालिकेतर्फे देण्यांत आलेले पर्यायी जागेवर बांधकाम परवानगी सुध्दा दिलेली आहे. परंतु त्यांना घर बांधणेसाठी कर्ज काढावयाचे

असल्याने त्यांचे नांव पी.आर.कार्ड आवश्यक आहे. असे कर्ज देणाऱ्या संस्थे तर्फे सांगितल्या वरून त्यांनी नगर भुमापन कार्यालयात महानगरपालिकेने ताब्यात दिलेल्या ताबा पावती व बांधकाम परवानगी नुसार नगर भुमापन कार्याल्यात पि.आर.कार्ड नोंद होणे साठी विनंती अर्ज केला असता वरील कार्यालयाने महानगरपालिकाकडून दिलेल्या जागेची खरेदी खत करून घेतल्या नंतरच नोंद घेतली जाईल असे कळविले त्यामुळे वरील मिळकतधारक यांनी महानगरपालिकेकडे अर्ज देवून दिलेल्या पर्यायी जागेची रजिष्ट्री करून देण्यांस विनंती केलेली आहे, आणिप सदर रजिष्ट्रीच्या संपुर्ण खर्च महानगरपालिकेने करावा असे त्यांनी लेखी सांगितलेले असून सदर जागेची रजिस्ट्री साठी एकुण खर्च रू.८२,८८४/- (रू.ब्याएंशी हजार आठशे चौऱ्यांशी फक्त) येतो. वरील मिळकतधारकांची रजिस्ट्री करणेस मा. आयुक्तांनी संमती दिली आहे. तरी रजिस्ट्रीच्या खर्चास मंजुरी देण्यास्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना १९७५ नुसार आणि प्रारूप विकास योजने नुसार ६०फुट रूंद दुतर्फा रस्ता दिल्लीगेट या प्रस्तावाने बाधित मिळकती धारकांना त्यावेळी बांधांकन मोडतोड खर्च देवून जागेबदद्लपर्यायी जागा हिराखान रेखांकनातील खुल्या जागेत देण्यांत आलेली असून मिळकतधारकांना महापिालके मार्फत देण्यांत आलेल्या पर्यायी जागेवर बांधकाम परवानगी सुध्दा दिलेली आहे. त्यांना घर बांधणेसाठी कर्ज काढावयाचे असलयाने त्यांचे नांवे पी.आर.कार्ड आवश्यक असल्याने तसेच सदर जागेची रजिस्ट्री करून देण्यास विनंती केल्यानुसार सदर जागेच्या रजिस्ट्रीसाठी रक्कम रू.८२,८८४/-(ब्यांएंशी हजार आठशे़ चौऱ्यांशी फक्त) चे एकूण खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र.९४/३९:**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला कि, सन १९९६-९७ या आर्थिक वर्षासाठी कार्यालयास लागणारी स्टेशनरी खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यांत आल्या. एकूण ५ निविदा या विभागास प्राप्त झाल्या त्यापैकी मे.महिला आर्थिक विकास मंडळाची निविदा "कामधेनू" योजने अंतर्गत असलेने व त्यांनी आवश्यक ती कागदपत्रे विहित मूुदतीत न दिल्याने विचारात घेण्यांत आली नाही. इतर ४ निविदाधारकांना दरात वाटाघाटीसाठी मा.आयुक्तांनी बोलविले असता आलेल्या वाटाघाटी नुसार गत वर्षीच्या दरात १०% वाढ करून दर अंतिम केले आहेत.

१मे.इन्शाट्रेडिंगकंआयटम

क्र.१,६,११,१२,१५,२१,२८,३१,३५,४४,४६,४९,५३,५५,६०,६४,६६,६७,६८,६९,७०,७१,७२,९७,१००,१०१,१०५,१०६,१०७, व ११० कॉम्प्युटर स्टेशनरी आयटम क्र.३,६, व ८

२ मे.न्युभारतआयटम

क्र.२२,२३,३३,५४,६१,६२,७४,७५,८०,८१,८५,८६,८७,९१,९२,९३,९५, व ११३

कॉम्प्युटर स्टेशनरी आयटम क्र.२ व ७

३) सल्वा इंटरप्रायझेस आयटम क्र. ३, ४, ५, ९, १०, १३, १४, १६, १७, २०, २४, २९, ३२, ३८, ४७, ४८, ५०, ५१, ५६, ५८, ५९, ८४, ९६, ९८, ९९, १०२, १०३, १०८ व १११

कॉम्प्युटर स्टेशनरी आयटम क्र.१

३ मुरली स्टेशनर्स आयटम क्र. २, ७, ८, १४, १७, १८, १९, २५, २७, २९, ३०, ३४, ३६, ३७, ४०, ४१, ४२, ४३, ४५, ५२, ५७, ५८, ६५, ७६, ७७, ८३, ८९, ९७, १०४, १०९, ११२

कॉम्प्युटर स्टेशनरी आयटम क्र.४ व ५

कॉम्प्युटर स्टेशनरीमध्ये १९९६-९७ या वर्षात आलेल्या दरात ८% दर वाढ करून तुलनात्मकदृष्टया कमी दर असलेले आयटम त्या त्या निविदा धारका समोर दर्शविलेले आहेत तसेच सदरील दरास वाटाघाटी वेळी झालेल्या वर्षे नुसार संपूर्ण स्टेशनरी महिन्याचे आत खरेदी करणे आहे.करिता दर्शविले नुसार प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९६-९७ या आर्थिक वर्षासाठी कार्यालयास लागणारी स्टेशनरी खरेदीसाठी प्राप्त झालेल्या एकूण (४) निविदा धारकांना दरात वाटाघाटी मा. आयुक्तांनी बोलविले असता झालेल्या वाटाघाटी नुसार गत वर्षीच्या दरात १०% वाढ करून दर अंतिम केल्या नुसार खालील दर्शविल्या प्रमाणे त्या त्या निविदा धारकांचे नांवा समोर तुलनात्मक तक्ता नुसार सर्वात कमी दर असलेल्या साहित्यांचे क्रमांका नुसार तसेच कॉम्प्युटर स्टेशनरी मध्ये १९९६-९७ वर्षात आलेल्या दरात ८% दर वाढ करून तुलनात्मकदृष्टया कमी दर असलेले आयटम त्या त्या निविदा धारकां समोर दर्शविल्यानुसार संपुर्ण स्टेशनरी ३ महिन्याचे आत खरेदी करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१ मे.इन्शा ट्रेडिंग कं. आयटम क्र.१,६,११,१२,१५,२१,२८,३१,३५,४४,४६,४९,५३,५५,६०,६४,६६,६७,६८,६९,७०,७१,७२,९७,१००,१०१,१०५,१०६,१०७, व ११० कॉम्प्युटर स्टेशनरी आयटम क्र.३,६, व ८

२ मे.न्युभारत आयटम क्र.२२,२३,३३,५४,६१,६२,७४,७५,८०,८१,८५,८६,८७,९१,९२,९३,९५, व ११३
कॉम्प्युटर स्टेशनरी आयटम क्र.२ व ७

४ सल्वा इंटरप्रायझेस आयटम क्र.३,४,५,९,१०,१३,१४,१६,१७,२०,२४,२९,३२,३८,४७,४८,५०,५१,५६,५८,५९,८४,९६,९८,९९,१०२,१०३,१०८ व १११
कॉम्प्युटर स्टेशनरी आयटम क्र.१

५ मुरली स्टेशनर्स आयटम क्र.२,७,८,१४,१७,१८,१९,२५,२७,२९,३०,३४,३६,३७,४०,४१,४२,४३,४५,५२,५७,५८,६५,७६,७७,८३,८९,९७,१०४,१०९,११२
कॉम्प्युटर स्टेशनरी आयटम क्र.४ व ५ वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९५/४० :**

नगर सचिव यांनी प्रस्ताव सादर केला कि, सन ९६-९७ करीता महापालिका सर्वसाधारण सभेसाठी नाष्टा, चहापाणी व जेवण इत्यादी व्यवस्था करणे साठी दुसऱ्या वेळेस निविदा मागविण्यात आल्या असता श्रीमती मालिनी अ.किनी यांची एकच निविदा प्राप्त झाली आहे.

दोन वेळा निविदा प्रसिध्दा करूनही उक्त व्यवस्थेसाठी पंजीकृत संस्था कडून प्रतिसाद मिळाला नाही. श्रीमती मालिनी मिनी यांची संस्था पंजीकृत नसली तरी मनपाच्या अटी संबंधितास मान्यअसून यापुर्वीच्या वर्षीही याच संस्थेने सर्वसाधारण सभेच्या वेळी खादय पदार्थांचा पुरवठा केलेला आहे. या बाबींचा विचार करता स्थायी समितीने मंजुरी दिल्यास श्रीमती मालिनी किनी यांचे खादय पदार्थांचे दर विचारार्थ सादर.

वस्तुंचे दर खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | खादय पदार्थ | भाव प्लेट | खादया पदार्थ /गोड पदार्थ | भाव प्लेट |
|---|---|---|---|---|
| १ | खमंग ढोकळा | ४.०० | जिलेबी | ४.०० |
| २ | उपमा | ४.०० | श्रीखंड | ५.०० |
| ३ | बटाटा पोहे | ४.०० | गुलाबजामुन (२ नग) | ५.०० |
| ४ | कांदा भजे | ३.५० | बुंदी लाडू (२ नग) | ५.०० |
| ५ | नॉयलॉन चिवडा | ४.०० | रसगुल्ले (२ नग) | ७.०० |
| ६ | गोड शिरा | ४.५० | बासुंदी | ६.५० |
| ७ | बटाटा वडा (२ नग) | ४.५० | कलाकंद | ७.०० |
| ८ | समोसा (२ नग) | ४.५० | सोनपापडी (२ नग) | ४.५० |
| ९ | कचोरी (२ नग) | ४.५० | गोड खिचडी | ८.७५ |
| १० | साबुदाणा वडा (२ नग) | ४.५० | रसमलाई | १०.०० |
| ११ | इडली सांबार (२ नग) | ४.५० | मुगाचा शिरा | ८.०० |
| १२ | टोमॅटो आम्लेट (२ नग) | ४.५० | फ्रुट सलाड | १६.५० |
| १३ | भाकर वडी (२ नग) | ४.५० | चहा | २.०० |
| १४ | पालक भजे | ४.५० | दुध | ३.०० |
| १५ | मुंग भजे | ४.५० | कॉफी | ३.५० |
| १६ | मिक्स वडा | ५.०० | जेवण (व्हेज)(भात,पोळी वरण,चटणी,भाजी व लिमिटेड गोड) | २०.०० |
| १७ | वडा सांबार | ५.५० | जेवण (नॉन व्हेज)(चिकन १ प्लेट २ पीस तंदुरी रोटी -३ नग सलाड) थंड पेय तसेच बेकरी वस्तू व वेफर्स बाजार भाव | ३२.०० |
| १८ | गुतपांगळू | ५.५० | | |
| १९ | साधी मिसळ | ५.०० | | |
| २० | दही मिसळ | ५.५० | | |
| २१ | साधा डोसा | ६.०० | | |
| २२ | मसाला डोसा | ७.५० | | |
| २३ | साधी पुरी भाजी (५ नग) | ६.०० | | |
| २४ | मसाला पुरी (५ नग) | ६.५० | | |
| २५ | उत्तप्पा | ७.०० | | |
| २६ | कटलेट | ६.०० | | |
| २७ | पाव भाजी | १०.०० | | |
| २८ | रगडा पॅटीस | ६.०० | | |

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

**सौ.रजनी जोशी :** प्रस्तुत संस्थे तर्फे देण्यांत येणारा नाष्टा बरोबर नसतो.

**मा.सभापती :** प्रस्तावित नाष्टा व्यवस्थेसाठी लघु निविदा काढण्यात यावी आणि त्याच बरोबर शहरातील ३/४ कॅटर्स यांच्या कडूनही दर मागविण्यांत यावे. चांगलया प्रतीचा नाष्टा मिळेल अशी व्यवस्था नगर सचिव यांनी करावी.

प्रस्तुत व्यवस्थेसाठी लघु निविदा काढण्यात यावी शहरातील ३/४ केटर्स यांचे कडूनही दर मागविण्यांत यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.९६/४१:**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, महानगरपालिकेच्या खालील शाळा एकाच इमारतीत भरत असल्याने शालेय व्यवस्थापन अधिक चांगले व व्यवस्थित होणेसाठी प्रशासकीय दृष्टीकोनातून त्या एकत्र विलिन करण्यांत याव्यात. शाळा एकत्रीकरणामुळे (विलीनीकरण) जादा होणारे मुख्याध्यापक शिक्षक व कर्मचारी यांचे समायोजन त्यांचे स्थानांतर करून इतर शाळांवर रिक्त ठिकाणी करण्यांत येईल. एकाच इमारतीत भरणाऱ्या शाळांवर खालील प्रमाणे आहे.

१ प्रा.शा.बेगमपुरा बा.मं.
या इमारतीत प्र.शा. बेगमपुरा (बा.म.) के.प्रा.शा. बेगमपुरा व प्रा.शा.मुलींची बेगमपुरा यात तीन शाळा भरतात.प्रा.शा.बेगमपुरा बेगमपुरा (बा.म.) के.प्रा.शा.बेगमपुरा या एकत्र करून के.प्रा.शा. बेगमपुरा एकच शाळा करावी.

२ नुतन माध्यमिक शाळा :
या इमारतीत प्रा.शा.ज्युबलीपार्क , प्रा.शा.भडकल (उर्दु) व नुतन माध्यमिक शाळा या तीन शाळा भरतात. प्रा.शा.ज्युबली पार्क व नुतन माध्यमिक शाळा एकत्र करून ती नुतन माध्यमिक शाळा राहील.

३ के.प्रा.शाळा घाटी
या इमारतीत के.प्रा.शाळा घाटी व नुतन माध्यमिक शाळेची शाळा घाटी या दोन शाळा भरतात याऐवजी एकच के.प्रा.शा. घाटी राहील.

४ के.प्रा.शाळा बडी गिरणी
या इमारतीत के.प्रा.शाळा बडी गिरणी व प्रा.शा.कोतवालपुरा या दोन शाळा भरतात. त्याऐवजी एकच शाळा के.प्रा.शाळा बडी गिरणी राहील.

५ के.प्रा.शा.जुनाबाजार
या इमारतीत के.प्रा.शा.जुनाबाजार व प्रा.शा.शहाबजार (मराठी) या दोन शाळा चालतात. त्या ऐवजी के.प्रा.शा.जुनाबाजार ही एकच शाळा राहील.

६ मुलींची माध्यमिक शाळा औरंगपुरा
या इमारतीत मुलींची मा.शा. औरंगपूरा व प्रा.शा. औरंगपुरा (उर्दु) या दोन शाळा भरतात. त्याऐवजी मुलींची शाळा औरंगपुरा ही राहील.

सध्या मनपाच्या एकूण प्राथमिक शाळा ८७ आहेत. एकत्रिकरणाचा (विलीनीकरण) प्रस्ताव मान्य माझ्यास त्यांची संख्या ८२ होईल. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव:**

**श्री.अब्दुल रशिद खान (मामू) :** प्रस्तुत प्रस्तावास माझा विरोध आहे.

**शिक्षणाधिकारी :** प्रस्तुत प्रस्तावनुसार या शाळा एकाच इमारतीत भरत आहे. शाळेच्या विकासात कोणताही बदल नाही. १०/१२ विद्यार्थ्यांसाठी वेगळी शाळा चालविण्या ऐवज एकाच ठिकाणी महानगरपिालका शाळा रहाव्यात म्हणून हा प्रस्ताव ठेवलेला आहे.

**मा.सभापती :** ठरावास मंजुरी देण्यांत येते.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या खालील शाळा एकाच इमारतीत भरत असल्याने शालेय व्यवस्थापन अधिक चांगले व व्यवस्थीत होणेसाठी सदरील शाळेचे एकत्रीकरण (विलीनीकरण) करणेस होणारे मुख्याध्यापक , शिक्षक कर्मचारी यांचे त्यांचे स्थानांतर करून अन्य शाळेतील रिक्त ठिकाणी करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१ प्रा.शा. बेगपुरा बा.म.- या इमारतीत प्रा.शा. बेगमपुरा (बा.म.) के.प्रा.शा.बेगमपुरा व प्रा.शा. बेंगमपुरा व प्रा.शा.मुलींची बेगमपुरा या तीन शाळा एकत्र करून के.प्रा.शा. बेगपुरा ही एकच शाळा करण्यांत यावी.

2 नुतन माध्यमिक शाळा . या इमारतीत प्रा.शा. ज्युबली पार्क प्रा.शा. भडकल (उर्दु) व नुतन माध्यमिक शाळा या तीन शाळा एकत्र करून ती नुतन माध्यमिक शाळा राहील.

3 के.प्रा.शाळा.घाटी- या इमारतीत के.प्रा.शा.घाटी व नुमतन माध्यमिक शाळेची शाख घाटी या दोन शाहा ऐवजी के.प्रा.शा.घाटी ही एकच शाळा करण्यात यावी.

4 के.प्रा.शा.बडी गिरणी- या इमारतीत के.प्रा.शा.बडी गिरणी व प्रा.शा.कोतवालपुरा या दोन शाळा ऐवजी एकच के.प्रा.शा. बडी गिरणी करण्यांत यावी.

5 के.प्रा.शा.जुनाबाजार या इमारतीत के.प्रा.शा.जुनाबाजार व प्रा.शा. औरंगपुरा (उर्दु) या दोन शाळा ऐवजी मुलींची मा.शा. औरंगपुरा अशी एक शाळा करण्यात यावी.

6 सध्या महापालिकेच्या एकूण ८७ प्राथमिक शाळा ऐवजी त्यांची संख्या ८२ राहील.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९७/४२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, क्रांतीचौक झाशीच्या उद्याना शेजारील मनपाच्या प्रा.आरोग्य केंद्राच्या इमारतीच्या उपलब्ध जागेवर तळ अधिक दोन तीन मजली इमारत ज्यामध्ये तळ मजल्यावर, दुकाने, प्राथमिक आरोग्य केंद्र व विभागिय कार्यालय इ. साठी प्रशासकीय ठराव क्र.७०० दिनांक ३.१२.९४ अन्वये र.रू.३१,८८,०००/- चे अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झालेली आहे तसेच ठराव क्र.१ दिनांक ४.१.९५ अन्वये तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.५% जास्त दरास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झलेली आहे.इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून मुळ अंदाजपत्रका व्यतिरिक्त अतिरिक्त बाबी ज्यामध्ये दक्षिण-उत्तर बाजूस संरक्षित भिंत बांधणे ,रॅम्पचा स्लॅब, रॅम्प वरील स्लॅबचे छत फ्रंट इलेव्हेशन मध्ये ग्रव्हज डेकोरेटीव्ह आर.सी.सी.पाईप , संप टॅंक बांधणे तसेच फ्लोवरबेड, जी.आय.पाईप एम.एस.रेलिंग, बाजूचे रेलिंग शटर्स इ. बांधणे फलॉवर पॉट बाद झाल्यामुळे मुळ अंदाजपत्रकामध्ये रक्कम रू.६,७०,५९७/- ची वाढ झालेली आहे.

सदर अतिरिक्त वाढीव बांधकामासह र.रू.मुळ अंदाजपत्रक रक्कम रू.३१,८८,०००/- + ६,७०,५९७/- वाढीव काम एकूण रू.३८,५८,५९७/- चे सुधारित अंदाजपत्रक सदरील काम मुळ एजन्सी मे.एलोरा कन्स्ट्रक्शन यांचे कडून सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार, अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यांचा प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्यासाठी दिनांक ८.५.९६ अन्वये मा.आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

सबब सदर कामासाइी सुधारित अंदाजपत्रक रू.३८,५८,५९७/- ला तसेच वाढीव काम हे मुळ काम करणारी एजन्सी मे.एलोरा कन्स्ट्रक्शन यांचे कडून करून घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर. सदरचा खर्च (वाढीव) व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षामधून सन ९६-९७ या वर्षात करण्यात येईल.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीचौक झाशीच्या उद्याना शेजारील मनपाच्या प्रा.आरोग्य केंद्राच्या इमारतीच्या उपलब्ध जागेवर तळ अधिक दोन अशी तीन मजली इमारत ज्यामध्ये तळ अधिक दोन अशी तीन मजली इमारत ज्यामध्ये तळ मजल्यावर दुकाने प्राथमिक आरोग्य केंद्र व विभागीय कार्यालय इ. बांधणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले र.रू.३१,८८,०००/- चे अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी मिळाली होती. परंतु मुळ अंदाजपत्रका व्यतिरिक्त अतिरिक्त बाबी ज्यामध्ये दक्षिण उत्तर बाजुस संरक्षित भिंत बांधणे, , रॅम्प, रॅम्पचा स्लॅब रॅम्प वरील स्लॅबचे छत ,फ्रंट इलेव्हेशन मध्ये ग्रव्हज डेकोरेटीव्ह आर.सी.सी.पाईप, संप टँक बांधणे तसेच फलॉवरबेड जी.आय.पाईप , एम.एस.रेलिंग, बाजुचे रेलिंग शटर्स इ. वाढ झाल्यामुळे मुळ अंदाजपत्रका व्यतिरिक्त ६,७०,५९७/- ची वाढ झालेली असल्यामुळे वरील वाढीव कामासह एकूण रक्कम रू.३८,५८,५९७/- चे सुधारित अंदाजपत्रकास तसेच सदर वाढीव काम हे मुळ काम करणारी एजन्सी मे.ऐलोरा कन्स्ट्रक्शन यांचेकडून सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार अंदाजपत्रकीय दराने करून घेणेस व सदरचा खर्च (वाढीव) व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षामधून सन ९५-९६ या वर्षात करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९८/४३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.आंबेडकरनगर येथे ३०० मी.मी. व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार आर.सी.सी.गटार बांधणेच्या कामा करीता अं.पं. द.रू.१२,५०,०००/- सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन ९४-९५ च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यांत आले असून मा. आयुक्तांनी दिनांक ७.२.९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून सदरील कामासाठी निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/७०/९६ दिनांक १४.३.९६ अन्वये निविदा मागविलया असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांक १९.३.९६ पर्यंत एकूण १६ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या अंतिम दिनांक २८.३.९६ पर्यंत फक्त एकच मोहरबंद निविदा प्राप्त झाली व ती दिनांक ८.४.९६ रोजी उपस्थित गुत्तेदारा समक्ष उघडली असता ती श्री.आर.बी.चव्हाण यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१२% कमी दराची आहे.

सदरील काम झोपडपटट्री सुधारणा कार्यक्रम अंतर्गत "खुलीगटार" या शिर्षा अंतर्गत करण्याच्या प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.आंबेडकरनगर येथे ३०० मी.मी. व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार आ.सी.सी. गटार बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात अलेले रक्कम रू.१२,५०,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी प्राप्त झालेले एकमेव निविदापत्रक गुत्तेदार श्री.आर.बी.चव्हाण यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१२% कमी दराचे

निविदा पत्रकास तसेच सदरील काम झोपडपटट्‌ी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत "खुलीगटार" या शिर्षाअंतर्गत करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९९/४४:**

कार्यकारी अभियंता व ज.नि. यांनी हिमायत बाग ते पानचक्की पर्यंत ५००,६०० व ७०० मी.मी. व्यासाची मुख्य जलनि:स्सारण वाहिनी (सिव्हर बी-२) टाकण्याचे उर्वरित काम करण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २०,००,०००/- चे तयार करण्यात आले होते. सदरील कामास मा. प्रशासक साहेबांनी दिनांक ३०.१२.९४ ला प्रस्ताव क्र.७५१/९४ अन्वये मंजुरी दिली होती.

सदरील कामाची निविदा सुचना वर्तमान पत्रात प्रसिध्दीस दिली असता एकूण सहा (६) वेळोस फेर निविदा काढण्यात आली होती व सदरील दर अ.पं. दरापेक्षा ८० ते १००% जास्तीचे होते. नंतर सुधारित अंदाजपत्रकीय रककम रू.२४,८६,०००/- चे अंदाजपत्रक सन १९९४-९५ ला मंजुरी देवून सदरील प्रस्तावास स्थायी समिती च्या दिनांक ११.१.९६ च्या सभेत विषय क्र. ३८९/११ नुसार ठराव संमत झाला. सदरील कामाची निविदा वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देवून निविदा मागविली असता एकही निविदा प्राप्त झाली नाही. या नाल्यास (ओपन बर्ड रॉक) कठीण उघडा बडक आहे. मकबरा, पानचक्की व नालयाच्या कठडयावर लोकवस्ती असल्याने (प्लास्टींग) करण्याची परवागनी मिळणे शक्य नाही तसेच प्रत्यक्ष नाल्यास सामुग्री उदा.पाईप,खडी,रेती,विटा,किंवा खोदकाम करण्याची मशिन नेवू शकत नाही. या सर्व अडचणी असल्याने या कामास प्रतिसाद मिळत नाही. मिळाला तर दर योग्य दिले जात नाही.

या सर्व बाबी लक्षात घेता या विभागा मार्फत औरंगाबाद येथे बाहेरील गुत्तेदारांना जे कि, ड्रेनेजच्या कामात तज्ञ आहेत. (रेप्युटेड कॉन्टॅक्टर) त्यांना प्रत्यक्ष बोलावून चर्चा करून या कामा विषयी व काम घेण्या विषयी चर्चा केली एकुण ५ ते ६ गुत्तेदारांना रेट ऑफर करणे बाबत सुचविले त्यापेकी मे. राणा कन्स्ट्रक्शन यांनी हे काम ४०% जास्तीच्या दराने करण्यासाठी दिनांक १४.३.९६ ला पत्र देवून संमती दिली आहे. हे दर वाजवी वाटतात व काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने हे दर मान्य करणे योग्य तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव:**

**श्री.अब्दुल रशिद खान (मामू):** प्रस्तावित संचिकेवर कोणताही अभिप्राय न देता मा. ाअयुकत यांनी संचिका स्थायी समितीकडे पाठविली आहे. इतर संचिकांवर मंजुर अशी शिफारस असते. याचा विचार करता प्रस्तावित कामासाठी जास्त दराची निविदा आली असल्यामुळे मंजुर करण्यांत येते या अभिप्रायासह प्रस्तावास मंजुरी देण्यांत यावी.

**मा.सभापती :** प्रस्तुत प्रस्तावाची संचिका पाहिली असता या कामासाठी सन ९०-९१ चे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक तयार केले आहे. त्यानंतर तीन /चार वेळा दरपत्रके रिकॉल करीत करीत महापािलकेच्या अंदाजे ४ लाखाचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी प्रशासनास दोष देत आहे सदर काम कार्यालयातर्फे करून घेता येईल काय असा रिमार्क मा. आयुक्तांनी संचिकेवर दिला आहे. प्रस्तुत कामाच्या जागेच्या पृष्ठ भागापासून खडक असल्यामुळे लोकवस्तीच्या भागात सुरंग घेत येत नाही.

त्यामुळे निविदा दर जास्त आहेत.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हिमायतबाग ते पानचक्की पर्यंत ५००,६००,व ७०० मी.मी. व्यासाची मुख्य जलनि:स्सारण वहिनी (सिव्हर-बी-२) टाकण्याचे उर्वरित काम करण्यासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रू.२४,८६,०००/- चे सुधारीत अंदाजपत्रकास तसेच सदर काम मे.राणा कन्स्ट्रक्शनल यांनी ४०% जास्तीच्या दराने करण्यासाठी दिनांक १४.३.९६ ला पत्र देवून संमती दिली असूनही दर वाजवी वाटत असलेले त्यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१००/४५:**

कार्यकारी अभियंता पा.पु. व ज.नि. यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.विभाग क्र.३ येथील जलनि:सारण वाहिनीच्या देखभाल व दुरूस्ती करणे कामाकरीता सन १९९५-९६ देखभाल व दुरूस्ती अंतर्गत रक्कम रू.१९,९९,६००/- चे अंदाजपत्रकास ठराव क्र.४००/ दिनांक २८.८.९८ नुसार मंजुरी मिळाली होती. सदरीलकाम श्री.आर.एल.बारवाल यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने घेण्यास ठराव क्र.३२७/२५ दिनांक २८.४.९५ नुसार मंजुरी मिळाली होती. तसेच त्यापैकी सध्या एकूण खर्च रू.१२,५३,०००/- इतका झालेला आहे. व सध्या देखील मा. आयुक्त व विभागीय अधिकारी यांचे आदेशानुसार दुरूस्तीची कामे सुरू आहेत. आचार संहिता सुरू असल्यामुळे नविन अंदाजपत्रक निविदा काढणे शक्य वाटत नव्हते तसेच दैनंदिन दुरूस्ती अनिवार्य् असल्याने जुन १९९६ अखरे पर्यंत याच निविदेतून काम करून घेण्यास अधिक खर्च रक्कम रू. ३,००,०००/- पर्यंत अपेक्षित आहे. तरी सदरील प्रस्तावास व सदरील कामांची मुदतवाढ दिनांक २८.६.९६ पर्यंत देणे योग्य राहील. सदरील प्रस्तावास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

तरी र.रू.३,००,०००/- ला व श्री.आर.एल.बारवाल यांच्या कडून काम करून घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात प्रर्शविल्याप्रमाणे मो.विभाग क्र.३ येथील जलनि:सारण वाहिनीच्या देखीभाल व दुरूस्ती अंतर्गत रक्कम रू.१९,९९,६००/- चे अंदाजपत्रकास ठराव क्र.४०० दिनांक २८.४.९५ नुसार अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यांस मंजुरी मिळालेली असल्याने व सदरील काम श्री.आर.एल.बारवाल यांचे कडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यांतस मिळालेली असल्याने सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रू. ३,००,०००/- चे अपेक्षित खर्चाचे अंदाजपत्रकास व सदर कामे श्री. आर.एल.बारवाल यांचे कडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास व सदर कामाची मुदतवाढ दिनांक २८.६.९६ पर्यंत मंजुर करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०१/४६**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला कि, संजयनगर येथे ३०० मी.मी. व्यासाची जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९२-९३ ची दरसुची नुसार रक्कम रू.३,७१,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत येवून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आली आहे. सदरील कामाचा खर्च हा सन ९६-९७ या आर्थिक वर्षाच्या भांडवली खर्च या शिर्षकाखालील करण्यांत येणार आहे.

सदरील कामाची कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/७०/९६ दिनांक १४.३.९६ द्वारे स्थानिक वर्तमान पत्रातून जाहिरात देवून निविदा मागविण्यांत आल्या असता अठरा निविदा विक्री झाल्या व त्यापैकी चार (४)निविदा प्राप्त झाल्या असल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.धनेरा ए.दौलानी | १५.७५ अ.प.दरापेक्षा कमी |
| २ | श्री.बी.ए.काल्डा | १५.०१अ.प.दरापेक्षा कमी |
| ३ | श्री.शेख सलिम अहेमद | १०% अ.प.दरापेक्षा कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.७५% कमी दराची निविदा श्री.धरेश ए.दौलानी यांची आहे. सदरील निविदेस मा. आयुक्तांनी दिनांक १६.४.९६ ला मंजुरी दिलेली आहे.

तरी सदरील कामा करीता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रक्कम रू.३,७१,०००/- यास उपरोक्त निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर येथील ३०० मी.मी. व्यासाची जल निस्सारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रू.३,७१,०००/- चे अदांजपत्रकास तसेच सदरील कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.७५% कमी दराचे गुत्तेदार श्री.धनेश ए.दौलानी यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०२/४७:**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला कि, सन १९९६-९७ या वर्षासाठी लागणारे स्वच्छता साहित्य खरेदीस्तव वर्तमानपत्रातुन जाहिरात देवून निविदा मागविण्यांत आल्या. एकूण ४ निविदा या विभागास प्राप्त झाल्या. त्यापैकी मे.महिला आर्थिक विकास महामंडळाने कामधेनू योजने अंतर्गत निविदा भरली होती परंतु संबंधित एजन्सीने आवश्यक ती कागदपत्रे विहित मुदतीत सादर न केल्याने त्यांनी निविदा विचारात घेतली गेली नाही.

उर्वरित ३ निविदाधारीकांनी भरलेले दराचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडलेल्या नुसार सर्वात कमी दर (लाल रेखांकित ) ज्यांचे आहे त्या आयटमचे आयटम क्रमांक खाली निविदा धारकांच्या नावासमोर दर्शविल्या नुसार आहेत.

१) मे.इन्शा ट्रेनिंग कं. - आयटम क्र.२,५,७,८,९,१०,१२,१८,१९,२०, व २९ इ.
२) मे.न्यु भारत स्टोअर्स - आयटम क्र.१,१३,१५,१७ इ.
३) मे.सल्वा इंटरप्रायझेस - आयटम क्र.३,४,६,११,१२,१३,१४,१६ व आयटम क्र.१२ व १३ चे दोघांचे दर समान असलेने आदेशात साहित्य विभागून देण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९६-९७ या वर्षासाठी लागणारे स्वच्छता साहित्य खरेदी करणेसाठी प्राप्त झालेले ३ निविदाधारकांचे दरांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडल्यानुसार सर्वात कमी दर ज्यांचे आहेत त्या आयटमचे क्रमांक खालील निविदा धारकांच्या नावांसमोर दर्शविल्या नुसार खरेदी करणेस सर्वानुमते "मंजुरी देण्यांत येते"

१) मे.इन्शा ट्रेनिंग कं. - आयटम क्र.२,५,७,८,९,१०,१२,१८,१९,२०, व २९ इ.
२) मे.न्यु भारत स्टोअर्स - आयटम क्र.१,१३,१५,१७ इ.

३) मे.सल्वा इंटरप्रायझेस - आयटम क्र. १२ व १३,चे दोघांचे दर समान असलेले आदेशित साहित्य विभागून देण्यांत यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०३/४८ :**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मनपा गणवेश विनियम क्र.२५ दिनांक १८.६.९३ नुसार महानगरपालिका कर्मचाऱ्यांना (चतुर्थ श्रेणी व गणवेश परिधान करणारे तृतीय श्रेणी कर्मचारी) खालील साहित्य देय आहे.

१ गणवेश २ ड्रेस प्रत्येकी

२ चप्पल १ जोड प्रत्येकी

३ रेनकोट

४ स्वेटर- वास्तविक वुलनकोट पुरूषांसाठी व कंबल स्त्री कामगारांसाठी देय आहे परंतु त्यामुळे खर्च जास्त प्रमाणात होईल. त्याकरीता स्वेटर खरेदीचा प्रस्ताव ठेवण्यांत आलेला आहे.

५ छत्री

६ गणवेश साहित्य - जसे पी-कॅप, लेदर शुज, लेदर बेल्ट ,सॉक्स, ब्युल बॅरेट कॅप, केन लाठी इ.

यापुर्वी सदरील साहित्य खालील प्रमाणे देण्यांत आलेले आहे.

वाहन चालक - गणवेश - माहे ऑक्टो ९३
रेनकोट - नाही
स्वेटर - जानेवारी ९४
चतुर्थ श्रेणी कर्मचारी - गणवेश - एप्रिल ९४
रेनकोट - जुलै ९३
स्वेटर - जाने ९४
चप्पल - मार्च एप्रिल ९४

खालील प्रमाणे अंदाजित खर्च काढण्यात आलेला आहृे गणवेश (खाकी व पांढरा)

तृतिय श्रेणी कर्मचारीसाठी - अंदाजे कापड - खाकी १००० मीटर
अंदाजे कापड - पांढरा - ३०० मीटर
अंदाजे खर्च - २,२१,०००/-

चतुर्थ श्रेणी कर्मचारी अंदाजे कापड - खाकी - ३५०० मीटर
पांढरा - ९०० मीटर
निळा - ९०० मीटर

| | | |
|---|---|---|
| रेनकोट साठी अंदाजप खर्च | - | ३,६०,०००/- |
| स्वेंटर साठी अंदाजप खर्च | - | ५,६५,०००/- |
| छत्री साठी अंदाजप खर्च | - | ८०,०००/- |
| चप्पलसाठी साठी अंदाजप खर्च | - | १,००,०००/- |
| गणवेश साहित्य अंदाजप खर्च | - | १,००,०००/- |
| गमबुटसाठी साठी अंदाजप खर्च | - | ५६,०००/- |
| गणवेश शिलाई साठी अंदाजप खर्च | - | १,५०,०००/- |
| | | ------------------------------ |
| | | २१,०९,०००/- |

माहे जानेवारी ९७ मध्ये देय असणाऱ्यां साडी

शर्ट सलवारसाठी अंदाजे खर्च ४,००,०००/-
मागील पानावर दर्शविले नुसार एकूण २५,००,०००/- अंदाजित खर्च दर्शविण्यांत आलेला असून एकूण अंदाजपत्रकीय तरतुद रूपये १०,००,०००/- ठेवण्यात आलेली आहे.

एकूण दर्शविण्यात आलेले साहित्य देणे असल्यास पुन्हा रूपये रू.१५०० लक्षाची अतिरिक्त तरतुद करावी लागेल.

करिता वरील साहित्य खरेदी करणे झाल्यास अतिरिक्त रक्कमेची तरतुदीस तसेच वर्तमानपत्रातुन निविदा प्रसिध्दीस देणे बाबत मा. स्थायी समितीची मान्यता झाल्यास प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येईल. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा गणवेश विनियम क्र.२५/दिनांक १८.६.९३ अनुसार महापालिकेतील तृतिय श्रेणी व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना देय असलेले गणवेश व इतर साहित्य जेस चप्पल, रेनकोट, स्वेटर, छत्री, पी कॅप,लेदर शुज, लेअर बेल्ट,सॉक्स, ब्ल्युबॅरेट कॅप, केन लाठी, गमबुट, गणवेश शिलाई तसेच माहे जाने ९७ मध्ये देय असणाऱ्यां साडया, शट , सलवार इत्यादीसाठी रक्कम रू.२५,००,०००/- चे दर्शविण्यात आलेल्या अंदाजित खर्चास तसेच सदर साहित्य खरेदीसाठी एकूण अंदाजपत्रकीय तरतुद रू.१०,००,०००/- ठेवण्यांत आलेली असल्याने एकूण दर्शविण्यात आलेले साहित्य देणेसाठी पुन्हा रू.१५.०० लाखाची अतिरिक्त तरतुद करणेस व सदर साहित्य खरेदीसाठी वर्तमानपत्रातुन निविदा प्रसिध्दीस देणे व सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेस ठेवणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०४/४९:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारती मध्ये सर्व इमारतीसांठी वित्त पुरवठा करण्यास एकच ट्रान्सफार्मर बसविणे आहे.

सदरील कामासाठी आवश्यक असणाऱ्या खर्चासाठी रू.४,९७,०००/- रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदर कामाचा खर्च भांडवली इमारती या सदरातून करण्यात येईल. अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

तरी रू.४,९७,०००/- चे खर्चास मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारती मध्ये सर्व इमारतीसाठी विज पुरवठा करण्यास एकच ट्रान्सफार्मर बसविणेचे कामासाठी आवश्यक असणाऱ्या खर्चासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.४,९७,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामाचा खर्च भांडवली इमारती या सदरातून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र.१०५/५०:**

मालमत्ता अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी त्याचे पत्र क्र.९५/झुभायो/पुरवठा/का.वि./दिनांक ४.१.९६ अन्वये औरंगपूरा येथे श्रीमती कला सुरेश बोरामणीकर उत्कर्ष महिला गृह व लघु उद्योग सहकारी स.

मर्यादित, समर्थ नगर औरंगाबाद यांचे नांव झुणका भाकर केंद्र मंजुर केलेले आहे. तरी त्यांना झुणका भाकर केंद्रासाठी ८X१५=१२० चौ.फु. जागा उपलब्ध करून द्यावी म्हणून विनंती केली आहे.

त्यानुसार कार्यालयातर्फे औरंगपुरा भागाची पाहणी कली असता , एस.बी. कॉलेज बस थांबा ते गणती विसर्जन विहीरीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या उत्तर बाजुला नाल्याच्या भिंती लगत जागा झुणका भाकर केंद्रासाठी खालील अटी व शर्ती नुसार देता येवू शकेल.

१ झुणका भाकर केंद्राचे बांधकाम तात्पुरत्या स्वरूपाचे राहील पक्के बांधकाम करता येणार नाही.

२ जागे बाबत कायदेशिर अडचण निर्माण झाल्यास जागा परत घेण्याचा महानगरपालिकेस अधिकार राहील.

तरी वरील कर्यालयीन टिपणी नुसार दर्शविलेली जागा संबंधितांना विनामुल्य देण्या बाबत प्रस्ताव स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा. जिल्हाधिकारी , औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्र.९५/ झुभाकें/पुरवठा/का.वि./दिनांक ४.१.९६ अन्वये औरंगपूरा येथे श्रीमती कला सुरेश बोरामणीकर उत्कर्ष महिला गृह उद्योग सहकारी स.मर्यादित, समर्थनगर, औरंगाबाद यांचे नावे झुणका भाकर केंद्र मंजुर केलेले असून त्यांना ८X१२=१२० चौ.फुट जागा उपलब्ध करून देणे बाबत विनंती केल्या नुसार संबंधितास एस.बी. कॉलेज बस थांबा ते गणपती विर्सजन विहीरीकडे जाणाऱ्या रस्त्यांच्या उत्तर बाजुला नाल्याच्या भिंती लगत जागा

१ झुणका भाकर केंद्राचे बांधकाम तात्पुरत्या स्वरूपाचे राहील. पक्के बांधकाम करता येणार नाही. २) जागे बाबत कायदेशिर अडचण निर्माण झाल्यास जागा परत घेण्याचा महापालिकेस अधिकार राहील. या अटीवर विना मुल्य देण्यांस सर्वानुकते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०६/४१:**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत कि, पिरबाजार उस्मानपुरा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसविण्यासाठी चबुतऱ्याचे सुशोभिकरण करण्याचे कामासाठी यापुर्वी निविदा मागविण्यात आली होती. त्यानुसार सदरील कामास पुर्वी स्थायी समितीची मंजुरी होती. सदरील कामात रेड ग्रेनाईट बसविणे, हेरीटेज ट्रिटमेंट करणे तसेच कर्ल्डग्लेज्ड टाईल्स बसविणे व इ. आयटेमचा समावेश करण्यात आला असून त्यामुळे पुर्वी अंदाजपत्रकात रू.१,८२,७००/- रू.इतकी वाढ होत आहे. पूर्वीचे मंजूर अंदाजपत्रकात रू.२,५९,३००/- रू.मान्यता होती. सदरील वाढीव रक्कम रू.१,८२,७००/- मिळून सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.४,४२,०००/- इतके होत आहे. करीता अंदाजपत्रक रक्कम रू.४,४२,०००/- मंजुरीस्तव व सदरील निविदेतील बाबी निविदा दराने व अतिरिक्त बाबी अंदाजपत्रकीय दराने संबंधित ठेकेदाराकडून करून घेण्याबाबतचा सुधारीत अंदाजपत्रकीय प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.पिरबाजार उस्मानपुरा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसविण्याचा ओटा सुशोभिकरण करण्याच्या कामासाठी या पुर्वीच अंदाजपत्रक

र.रू. २,५९,३००/- ला मान्यता मिळाली होती. परंतु प्रस्तावात दखविलेल्या वाढीव कामासाठी १,८२,७००/- अंदाजपत्रकीय रक्कम मंजुरी देण्यांत येवून एकूण अंदाजपत्रक रक्कम रू. ४,४२,०००/- चे रूपयास व पुर्वीचे संबंधीत ठेकेदार यांचेकडून करून घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०७/५२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, मो.ब्रिजवाडी येथील प्रा.शाळेला दोन रूफची वाढ करून शौचालय व मुताऱ्या बांधणे च्या कामासाठी प्रशासकीय ठराव क्र. ३२९ दिनांक २८.४.९५ अन्वये रक्कम रू.३,२९,५५९/- चे अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झालेली आहे सदर काम हाती घेण्यासाठी स्थायी सिमती ठराव क्र.६३/१२ दिनांक ७.९.९५ अन्वये काम करणाऱ्या एजन्सीच्या नांवास मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर शाळेचे बांधकाम चालू असतांना मा. आयुक्त यांनी प्रत्यक्ष स्थळावर सुचना दिल्याप्रमाणे आणखी एका खोलीची वाढ करण्याबाबत आदेशित केल्यानुसार तसेच इतर नविन बाबी ज्यामुळे अंदाजपत्रकामध्ये नाहीत अशा बाबींची वाढ झाल्यामुळे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू. ४,८५,७४६/- तयार करण्यात आले असून सदरील कामे मुळ गुत्तेदार श्री.अब्दुल सत्तार खान यांचेकडून सुरू करून देण्यात आलेले आहे व त्यास स्थायी समिती समोर ठेवावे या अटीवर मा. आयुक्तांनी दिनांक १९.६.९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सबब सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक र.रू.४,८५,७४६/- ला तसेच एका खोलीसह वाढीव काम मुळ गुत्तेदार यांचेकडून सन ९५-९६ च्या जिल्हा दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यांचा प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.

सदरचा खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षकामधून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. ब्रिजवाडी येथील प्राथमिक शाळेच्या दोन रूम व शौचालय / मुताऱ्या बांधणेच्या कामासाठी आगोदरच ३,१९,५५९/- ला मंजुरी मिळालेली आहे. परंतु पहाणीअंती असे दिसून आले आहे कि, दोन खोल्या ऐवजी तीन खोल्या बांधकाम करणे आवश्यक आहे. त्यासाठी रू.१,५६,१९५/- असे एकूण ४,८५,७४६/- अंदाजपत्रकीय रक्कमेस तसेच सदरचे काम मुळ गुत्तेदार श्री.सत्तार खान यांचेकडून ९५-९६ च्या दरसुचीप्रमाणे अंदाजपत्रकीय दराने बांधकाम सुरू करून घेण्याची सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र.१०८/५३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.कटकटगेट (स्लम) भागात बॉक्स कलव्हर्ट या कामाकरिता सा.बां. खाते ९४-९५ च्या दरसुचीनुसार रू. २,११,५८२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते. या वार्डातील स.नगर सेविका सोबत मा.आयुक्त यांनी केलेली पाहाणी व दिलेल्या निर्देशानुसार , जुन्या व नव्या बॉक्स टाईप कलव्हर्ट मधील दक्षिणेकडील अपुर्ण संरक्षित भिंत २२ मिटर लांबीची बांधण्यात आली व तसेच श्री. नवाज खान मौसवाले गल्लीतील पुर्वीची दगडी खांडकी काढून त्या गल्लीत पावसाचे पाणी साचत असल्यामुळे भरती करण्यात आली. काम प्रगतीपथावर असतांना मा. आयुक्त साहेबांनी आदेश दिलयानुसार वाढीव काम या कामाचे मुळ गुत्तेदार श्री.गुलास रसुल यांच्या कडून

निविदेत असलेल्या दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.०१% कमी दराने तातडीची गरज लक्षात घेवून करून घेण्यात आले.

तरी वाढीव कामासाठी एकूण ३,६७,५८२/- खर्च येणार असून सदरील वाढीव कामास मा. आयुकातंनी दिनांक २४.६.९६ ला मान्यता मिळालेली आहे. करिता या कामासाठी दुरूस्त अंदाजपत्रक रू.३,६७,५८२/- यास मान्यतेस्तव व वाढीव काम पुर्वीच्या ठेकेदार श्री.गुलास रसुल यांच्या कडून निविदा मंजुर दराप्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.०१ % कमी दराने करून घेण्याची मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.कटकट गेट स्लम भागात बॉक्स कलव्हर्ट या कामाकरीता र.रू.२,११,५८२/- मंजुर करण्यांत आले आहे. परंतु जुन्या व नव्या बॉक्स टाईप कलव्हर्ट मधील अपुर्ण संरक्षित भिंत व श्री.नवाज खान मैसवाले यांच्या गल्लीतील जुनी व नवी खांडकी चे काम करण्यांत आले आहे. या वाढीव कामास अंदाजपत्रक रक्कम रू.१,५६,०००/- ला मंजुरी देण्यांत येवून एकूण अंदाजपत्रक र.रू.३,६७,५८२/- या रकमेस व गुत्तेदार श्री.गुलाम रसुल यांचे कडील १०.०१% कमी दराने काम करून घेण्यास मंजुरी व कार्योत्तर मंजुरी सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०९/५४:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.एकनाथ नगर येथे समाज मंदिर बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.२०५/२९ fnukad २२.१०.९५ ऐनवेळेचा विषय म्हणून र.रू.३,३३,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे. सदरील काम हाती घेण्यासाठी तीन वेळेस निविदा मागविण्यात आल्या होत्या तीन्ही वेळेस निविदा विक्रीही झाल्या. परंतु दर भरून एकही निविदा प्राप्त झालेली नाही.

अंदाजपत्रक दरानुसार जुनी असल्याने सन ९५-९६ सा.बा. खात्याचे दरसुची नुसार र.रू.३,६५,०००/- अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून स्थायी समिती समोर सादर करण्यांकरीता आयुक्तांनी दिनांक १७.६.९६ ला मंजुरी दिली आहे.

सबब सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक र.रू.३,६५,०००/- ला तसेच सदरील काम श्री.सतनामसिंग गोविंदसिंग गुल्हाटी उपलब्ध गुत्तेदार यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

सदरचा खर्च महानगरपालिकेच्या ५% कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजना या लेखा शिर्षामधून सन ९६-९७ या वर्षात करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.एकनाथनगर येथे समाज मंदिर बांधण्याच्या कामासाठी अगोदरच अंदाजपत्रकीय रक्कम रू.३,३३,०००/- मंजुर करण्यांत आले होते. परंतु सदर कामासाठी तीन वेळा निविदा मागविण्यांत आल्या होत्या परंतू एकही निविदा दर भरून प्राप्त झाली नाही. म्हणून सा.बां. खात्याच्या दरसुचीनुसार पुन्हा अंदाजपत्रकीय रक्कम रू.३,६५,०००/- तयार करण्यांत आले. सदर अंदाजपत्रकास व उपलब्ध गुत्तेदार श्री,संतनामसिंग गोंविंदसिंग गुल्हाटी यांचे कडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११०/५५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो. उत्तमनगर स्लम येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबत कामाकरीता सा.बां. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार ७२७८४०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम डांबरी रस्ते रू.११०.०० लाख या शिर्षातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांची दिनांक १२.३.९६ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. तथापी आचारसंहिता २२.६.९६ ला लागू होती. या दरम्यान रस्त्याची खराब व्यवस्था असलयाने तेथील नागरिकांनी मागणी केल्याने तसेच आचारसंहिता संपल्यावर पावसाळा सुरू होईल व त्यामुळे काम होणार नाही. म्हणून मा. आयुक्त साहेबांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(३) खाली त्यांच्या खाली त्यांच्या धिकारात तातडीची गरज म्हणून सदरील काम अंदाजपत्रकीय दराने सदरील भागात डांबरीकरणाचे काम करणेस ठेकेदार श्री.आदिनाथ कन्सट्रक्शन यांचेकडून करून घेण्यांस २४.६.९६ ला रोजी मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामा करीता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रू.७२७८४०/- व कामाची एजन्सी श्री.आदिनाथ कन्सट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याचे प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.उत्तमनगर स्लम येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रू.७,२७,८४०/- आणि सदर कामाचे गुत्तेदार श्री.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी .

**विषय क्र.१११/५६:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो. प्रकाशनगर गरमपाणी कोतवालपुरा या भागात खांडकी बसविणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या अंदाजपत्रकीय रक्कम रू. १,८२,७८०/- चे मंजुर रक्कमेमध्ये नव्याने वाढलेल्या कामामुळे वाढीव कामासाठी येणाऱ्या वाढीव खर्च रक्कम रू.१,२२,१९६/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम तातडीचे असल्याने सदर कामाच्या कंत्राटदाराकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.०० % कमी दराने करून घेण्यात येईल.

तरी वाढीव परिमाण व अतिरिक्त खर्चाचे रक्कम रू.१,२२,१९३/- अंदाजपत्रकास तसेच सदरील काम श्री.शेख उमर यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२% कमी दराने करून घेणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.प्रकाशनगर गरमपाणी कोतवालपुरा या भागातील खांडकी बसविण्याच्या कामासाठी र.रूपये १,८२,७६०/- अगोदरच मंजुर झालेले आहे. परंतु कामात वाढ झाल्यामुळे परत अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,२२,१९६/- च्या अंदाजपत्रकास व सादर कामाचे गुत्तेदार श्री शेख यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२% कमी दराने काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११२/५७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, गरवारे स्टेडियम ते नारेगांव जलकुंभा पर्यंत १०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे. यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.५,०६,७२४/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधून करण्यात येणार आहे. मा. आयुक्त यांच्या तजविज नुसार अल्प मुदतीची बी-१ नविदि सुचना काढण्यात येवून दै. वर्तमान पत्रात प्रसिध्दीस देण्यांत येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण पाच (५) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस दोन (२) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहेत.

१) श्री. एस चंद्रपाल - १८% जास्त

२) श्री.सलिम पटेल - अंदाजपत्रकीय दर

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्टया कमी दर श्री. सलिम पटेल यांचा आहे. म्हणजे अंदाजपत्रकीय दरानुसार असा दर आहे.

तरी श्री.सलिम पटेल यांची अंदाजपत्रकीय दरानुसारची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गरवारे स्टेडियम ते नारेगांव जलकुंभ १०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी अंदाजपत्रकीय एरक्कम रू.५,०६,७२४/- ला तसेच सर्वात कमी दराचे गुत्तेदार श्री.सलिम पटेल यांचे दर अंदाजपत्रकीय दरानुसार काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी .

**विषय क्र.११३/५८:**

महानगरपालिकेने भूतपूर्व औरंगाबाद नगर परिषदेच्या हदद्‌ीसाठी १९६९ व १९७५ न्वये मंजुर झालेल्या विकास योजनेतील ना विकास क्षेत्र वगळून व सिडको नियोजन प्राधिकरणाने अघोषित केलेल्या क्षेत्रासह विकास योजना सुधारीत करण्याचे सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.७ दिनांक १८.६.८८ अन्वये ठरविल्याप्रमाणे आता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) नुसार ठराव क्र.१८९ दिनांक १६.३.९५ अन्वये जा.क्र./मनपा/नरवि/वियो/सुटी१/ ७५२/९५ दिनांक १८.३.९५ नुसार प्रसिध्द करण्यात आलेल्या यआहे. याबाबतचा अधिसुचना स्थानिक वृत्तपत्रामध्ये दिनांक २२.३.९५ ला प्रसिध्द करण्यात आलेला आहे. नागरिकांतर्फे प्राप्त झालेल्या हरकती व सुचनांवर सुनावणी देवून त्यावर विचार करून निर्णय होण्यासाठी व त्यानुसार महानगरपालिकेस अहवाल सादर करण्यासाठी अधिनियमांच्या कलम २८ अन्वये नियोजन समितीची स्थापना करण्यांत आलेली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २८(२) नुसार स्थायी सिमतीमधील तीन सदस्यांची नियुक्ती सर्वसाधारण सभेने दिनांक ९.६.९५ रोजी दिलेल्या अधिकारानुसार स्थायी समितीने ठराव क्र.२० दिनांक ९.३.९५ नुसार तीन सभासदांची

नियुक्ती नियोजन समितीवर करण्यात आली होती. सदर स्थायी समिती मधील सदर नियोजन समितीमध्ये असलेले दोन सदस्य हे दिनांक ३०.३.९६ रोजी निवृत्त झालेले आहेत. त्यांचे जागी नविन सभासदांची नियुक्ती करून शासनास पाठविणे बाबतचा प्रस्ताव स्थायी समिती सभेचा मंजुरीसाठी सादर.

**ठराव:**

औरंगाबाद महानगरपालिकेने भूतपूर्वनगर परिषदेच्या हदद्‌ीसाठी मंजुर १९६९ व १९७५ च्या विकास योजनेतील ना . विकास क्षेत्र वगळून व सिडको नियोजन प्राधिकरणाने अघोषित केलेल्या क्षेत्रासह विकास योजना सुधारीत करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) नुसार प्रसिध्द केलेली आहे. सदरची अधिसूचना दिनांक २३.३.९५ रोजी स्थानिक वृत्तपत्रा मध्ये प्रसिध्द झालेली आहे. त्यानुसार मुदतीमध्ये नागरिकांतर्फे प्राप्त झालेल्या हरकती वचनांवर सुनावणी देवून त्यावर विचार करून निर्णय घेण्याकरीता व त्यानुसार सर्वसाधारण सभेपुढे अहवाल सादर करण्याकरीता उक्त अधिनियमांच्या कयलम २८ अन्वये नियोजन समितीची स्थापना करण्यात आलेली आहे.

सदर नियोजन समितीमध्ये शासनातर्फे ४ सदस्यांची नियुक्ती झालेली असून महानगरपालिकेतर्फे स्थायी समितीतील सदस्यांची नियुक्ती झालेली असून महानगरपालिकेतर्फे स्थायी समितीतील तीन सदस्यांची नियुक्ती सर्वसाधारण सभेने दिनांक ९.६.९५ रोजी स्थायी समितीस अधिकार प्रदान केल्यानुसार इराव क्र.२३ दिनांक ९.६.९५ नुसार (१) स.श्री.अ.रशिद खान (मामू) (३) स.श्री.बैनाडे हयांची नियुक्ती ठराव क्र.२० दिनांक ९.६.९५ अन्वये करण्यात आली होती.

परंतू स्थायी समितीतील स.सदस्यांची मुदत दिनांक ३०.३.९५ रोजी संपल्यास यापैकी दाने सदस्य स.श्री. प्रदिप कुमार जैस्वाल ,अ.रशिद खान (मामू) हे निवृत्त झाले. पैकी श्री. रशिद मामू हे पुन:श्च दिनांक ३०.३.९५ च्या सर्वसाधारण सभेतून स्थायी समिती सदस्य म्हणून निवडून आलेले आहेत.

दिनांक १२.६.९६ च्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये मांडलेला प्रस्ताव क्र. ५८ नुसार विद्यमान सदस्यांपैकी स.श्री.गिरजाराम हाळनोर सभापती स्थायी समिती व श्री. अ.रशिद मामू हयांची नियुक्तीस दर नियोजन समितीवर करण्यास मंजुरी देण्यांत आली आहे. तसेच सर्वसाधारण सभेला शिफारस करण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११४/५९:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, मनपा मधील विविध रोड व चौक मध्ये रहदारी नियंत्रणासाठी ट्रॅफिक सिग्नल लावलेले आहे. व त्या सिग्नलच्या देखभाल व दुरूस्तीचे काम सतत वेळ प्रसंगी करणे आवश्कय आहे. सदर कामासाठी सन १९९५-९६ वर्षा करीता हे काम मे. न्युक्लेयोनाक्स पुणे यांचेकडून करून घेण्यात येत होते त्यांचा दर प्रत्येक युनिट रू.१२०००/- देण्यांत आला व त्याचा खर्च संपूर्ण वर्षात २,४०,०००/- एवढा झाला.

सदर सिग्नल सतत चालु ठेवणे आवश्यक असल्याने व सन १९९५-९६ चा करार असल्याने ३० जून,१९९६ रोजी संपला असल्याने सिग्नल कायम चालु ठेवण्यास देखभाल व दुरूस्ती सन ९६-९७ वर्षासाठी मे.न्युक्लेयोनिक्स, पुणे यांचेकडून पुर्वीच्याच दराने

(सन ९५-९६) करून घ्यावयास मा. आयुक्त यांना खर्चास रू.२,४०,०००/- ला मान्यता दिलेली आहे.

करिता सन ९६-९७ या वर्षासाठी ट्रॅफिक सिग्नल दुरूस्ती काम पुर्वीचे दरावर मे.न्युक्लेयोनीक्स पुणे यांचे क डून करून घेण्यांचा प्रस्ताव व रू.२,४०,०००/- खर्च देखभाल दुरूस्ती मधून करण्यास विचारार्थ सादर.

**विषय क्र.११५/६०:**

पशुधन विकास अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला कि, महानगरपालका प्राणी संग्रहालयास सन १९९६-९७ या वित्तीय वर्षाकरीता बिफ , ल्युसर्न घास, बाटुक कडबा, मासोळी , पशुपक्षी , खाद्य कडबा कोंडवाडा भाजीपाला व फळफळावड ब्रेड व किराणा किरकोळ यांच्य निविदा मागविण्यात आल्या प्राप्त झालेल्या निविदाधारकांचे नांव त्यांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

१ बिफ

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव | भरलेले दर हडड्‌ी सहित | प्रति किलो रूपये विना हडड्‌ी |
|---|---|---|---|
| १ | श्री.शेख गफुर शे.इब्राहिम | ६.५० | १०.०० |
| २ | श्री.खाजामियाँ अब्दुल करीम | ६.७० | - |
| ३ | श्री.फिरोज खान अ.रहेमान खान | ७.०० | ८.०० |
| ४ | श्री.शे.इकबाल अहेमद कुरैशी | ९.०० | १४.०० |
| ५ | शे. खलील शे. चाँद | ९.३५ | १०.६५ |
| ६ | श्री.मो.शरीफ अ.करीम | १०.०० | १२.०० |
| ७ | श्री.महेमुद मुसीर चौधरी | १०.०० | १३.५० |
| ८ | श्री.शे.सलीम शे. हासू | ११.०० | १३.०० |
| ९ | श्री.मो.मुसा अ.करीम | १२.२० | - |

तुलनात्मकदृष्टीने श्री.शे.गफुर शे.इब्राहीम यांची निविदा हडड्‌ीसहीत ६.५० प्रतिकिलो दिले असता मा. आयुक्त यांनी दिनांक ११.४.९६ ते १०.७.९६ ( ३ महिने करीता) मंजुर केले होते व त्यांनी दिनांक ११.४.९६ ते १२.४.९६ दोन दविस पुरवठा केला व दिनांक १३.४.९६ पासून बंद केला. त्यामुळे पूर्ण निविदासाठी (अल्पमुदतीची ) जिल्हा निवडणूक अधिकारी यांचेकडून परवानगी घेवूनच निविदा धारकांचे नाव व त्यांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नावं | भरलेले दर हडड्‌ी सहित | प्रति किलो विनाहडड्‌ी |
|---|---|---|---|
| १ | श्री.मुसा अ.करीम | २५.५० | २७.०० |
| २ | श्री.खाजा मियाँ अ.करीम | २८.५० | ३०.५० |
| ३ | श्री.अब्दुल हाफीज अ.मजीद | २९.२५ | ३१.२५ |
| ४ | श्री.शेख खलील शे.चाँद | ३४०० | ३६.०० |

तुलनात्मकदृष्टया श्री.मुसा अब्दुल करीम यांची निविदा हडड्‌ीसहित रू.२५.५० (प्रतिकिलो) वि विनाहडड्‌ी रू.३०.०० असता मा. आयुक्त यांचे चर्चेनंतर रू.२०.०० प्रतिकिलो प्रमाणे देण्यास तयार झाल्यावर सदर निविदाधारकास दिनांक १.५.९६ ते १०.७.९६ पर्यंत

निविदा मंजुर करण्यांत आली सध्या बिफ प्रतिकिलो रू.२०/- चे भावाने खरेदी चालू असून एक बिफ दुकानदार मध्ये बिफ रू.१६/- प्रति किलो दराने पुरवठा करण्याबदद्ल अर्ज केला आहे. तरी अशा मधल्या काळात अशा प्रकारचे अर्जाचा विचाराबदद्ल किंवा पुर्ननिविदा मागविल्या बदद्ल किंवा सध्या रू.२०/- प्रति किलो प्रमाणे खरेदी वर्षभराकरीता चालू ठेवण्या बदद्ल प्रस्ताव सादर.

२.प्ल्युसर्न घास :

प्ल्युसर्न घाससाठी (७) कोऱ्या निविदा पत्रांची विक्री झाली पैकी (७) निविदा पत्रकधारकांचे नांव

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव | भरलेले दर प्रति किलो रू. |
|---|---|---|
| १ | श्री.जर्नादन कोंडाजी शेळके | १.९० |
| २ | श्री.रूपचंद कपूरचंद | २.१० |
| ३ | श्री.रामचंद्र भिकनसिंग | २.१५ |
| ४ | श्री.नामदेव महादु | २.२० |
| ५ | श्री.अख्तर हुसेन म.हुसेन | २.३० |

तुलनात्मकदृष्टीने श्री.जनार्दन कोंडाजी शेळके यांचे दर प्रतिकिलो १.९० असता चर्चेनंतर प्रतिकिलो १.८५ सर्वात कमी असल्याने दिनांक ११.४.९६ पासून खरेदी करण्यांत येत आहे.

३. बाट्क कडबा व कडबा

शाळू ज्वारी बाट्क /कडबा करीता (५) कोऱ्या निविदा पत्रकांची विक्री झाली असून पैकी (२) निविदा पत्रक प्राप्त झाले.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नाव | दर प्रतिटन शाळू-ज्वारी बाट्क |
|---|---|---|
| १ | श्री.जनार्दन कोंडाजी शेळके | ४०९०.०० |
| २ | श्री.शेख इसाक शे. फकीर महंमद | ४३००.०० |
| ३ | शे.रशिद शे. शहाबुद्दीन | ४५००.०० |
| ४ | श्री.अहेमद हुसेन महमंद हुसेन | ४८००.०० |
| ५ | श्री.अख्तर हुसेन महंमद हुसेन | ५०००.०० |

तुलनात्मकदृष्टीने श्री.जनार्दन शेळके रा.दौलताबाद सर्वात कमी रू.४०९०.०० प्रतिटन प्रमाणे खरेदी करण्यासाठी दिनांक ११.४.९६ पासून आदेशित करण्यात आले आहे. पुढील खरेदी करीता दिनांक ३१.३.९७ पर्यंत निविदा भाव मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

४. मासोळी:

मासोळी करीता (२) कोऱ्या निविदा पत्रकांची विक्री झाली असून (२) निविदा पुरवठाधारकांकडून प्राप्त झाल्या.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नाव | भरलेले दर प्रति किलो |
|---|---|---|
| १ | श्री.मुमताज अहेमद | कतला -५२.५० |

| | | |
|---|---|---|
| | बारूदगरनाला,औरंगाबाद | राहू - ५२.५०<br>मरगळ -५२.५० |
| २ | शे.मजहर शे. अफसर शहांगज,औरंगाबाद | कतला - ५९.५०<br>राहू - ५९.५०<br>मरगळ -५९.५० |

तुलनात्मकदृष्टीने श्री.मुमताज अहमद,औरंगाबाद याचे दर कमी असूनही त्यांना दर कमी करण्या विषयी विचारणा केली असता त्यांनी खालील प्रमाणे विचारलयानंतर कमी केले ले दर खालील प्रमाणे आहेत व ११.४.९६ पासून खरेदी करण्यात

कतला - ५०.०० }
राहू - ५०.०० } प्रति किलो
मरगळ - ५०.०० }

दर मंजुरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर

५. पशुपक्षी खाद्य : (अमृत)

सदर खाद्यासाठी कोरी (१) निविदा विक्री झाली असून मे.अरिहंत ट्रेडिंग कं. औरंगाबाद यांचेकडून प्राप्त झाली त्यांचे दर खालील प्रमाणे आहे.

पशुखाद्य - (अमृत) प्रति क्वींटल रू.६९५.००

सदर दर कमी करण्याकरीता संबंधितास चर्चेसाठी बोलविण्यात आले असता चर्चेनंतर त्यांचे दर प्रति क्विंटल रू.६८५.०० केले.

ॲटम नं.१,२,३,४ व ५ यांना आचारसंहितेमुळे मा. आयुक्त यांचे स्थरावर मुंबई प्रांतिक अधिनियम कलम ६७(३) (क) अन्वये दिनांक ११.४.९६ ते १०.७.९६ (३) महिन्याच्या काळात मंजुरी दिली. त्याअनुषंगाने खरेदी करण्यात येत आहे. तरी वरील दर्शविलेले खाद्य पदार्थ दिनांक १०.७.९६ पुढेही दिनांक ३१.३.९७ पर्यंत खरेदी संबंधी निविदांचे निश्चित दर चालू ठेवण्याबाबत विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खालील प्रमाणे प्राणी संग्रहालयातील प्राण्यांना (सन ९६-९७) देणाऱ्या खर्चासाठी मागविण्यांत आलेले निविदा दिनांक ११.४.९६ पासून ते ३१.३.९७ पर्यंत दरास मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नावं | हडड्ी सहित प्रति किलो | विनाहडड्ी प्रति किलो |
|---|---|---|---|
| १ बिफ | | | |
| १ | श्री.मुसा अ.करीम | २०.०० | २७.०० |
| २. प्ल्युसर्न घास | | | |
| १ | श्री.जर्नादन कोंडाजी शेळके | १.९५ प्रति किलो | |
| ३. बाट्क कडबा (शाळू) | | | |
| १ | श्री.जर्नादन कोंडाजी शेळके | ४०५०.०० प्रति टन | |
| ४. मासोळी | | | |
| १ | श्री.मुमताज अहेमद | ५०.०० प्र.किलो | |

| ५. पशु खाद्य - (अमृत) | | | |
|---|---|---|---|
| १ | मे.अरिहंत ट्रेडिंग कं. | ६८५.०० प्र.क्विंटल | |

वरील दर्शविलेले दराला दिनांक ११.०४.९६ ते ३१.३.९७(९६-९७) करीता सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११६/६१:**

अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मा. क्रांतीनगर स्लम भागात अर्धगोलाकार गटार बांधणे या कामाकरीता अंदाजपत्रक र.रू.११,९८,१००/- चे अंदाजपत्रक सा.बां. विभाग औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यात आली असून मा. आयुक्त यांनी दिनांक २९.२.९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून कार्यालयायाची प्रगट निविदा सुचना क्र.नपा/मुलेखा/नि/७०/९६ दिनांक १४.३.९६ द्वारे निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांक १९.३.९६ पर्यंत एकूण (७) सात कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या अंतिम तारख २८.३.९६ रोजी फक्त (४) चार मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा दिनांक ८.४.९६ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडल्या असता गुत्तेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

१ श्री.आर.एल.बारवाल १०% अ.पं.दरापेक्षा कमी
२ श्री.डी.सी.पंजाबी ७.३% अ.प.दरापेक्षा कमी
३ श्री.मिरजगोव कन्स्ट्रक्शन ३% अ.पं.दरापेक्षा कमी
४ श्री.ट्रीस्टार कन्स्ट्रक्शन ७% अ.पं. दरापेक्षा जास्त

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दराची श्री.आर.एल.बारवाल यांची निविदा सर्वानुमते मंजुरीस्तव व विचारार्थ सादर .

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.क्रांतीनगर स्लम भागात अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.११,९८,१००/- सा.बां. विभाग यांची दरसुची ९५-९६ प्रमाणे तसेच तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दराची श्री.आर.एल. बारवाल यांची निविदा सर्वानुमते मंजुर करण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११७/६२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.मसनतपुर (स्लम) येथे पुर्वेकडील नाल्याकरीता रिटेनिंग वॉल बांधणे या कामाकरीता अंदाजपत्रक र.रू,१७,०८,७५०/- तयार करण्यात आले होत व त्यास मा. आयुक्त यांनी दिनांक ८.१.९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देवून निविदा मागविण्यांत आल्या व त्यात सर्वात कमी दराची निविदा (म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा) श्री.अब्दुल सलाम यांची निविदा दिनांक २९.२.९६ च्या स्थायी समितीचा प्रस्ताव क्र.५१३/६१ अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर श्री.अब्दुल सलास यांना कार्यालयाचे कार्यादेश क्र.मनपा/स्लम-१/१०५४/९६/दिनांक १६.३.९६ अन्वये देण्यांत आले असून सदरील काम प्रगती पथावर आहे.

परंतू सदरील ठिकाणी रिटेनिंग वॉलचे काम करतांना मसनतपूर येथील सार्वजनिक गटारीचे पाणी महाराष्ट्र डिस्टलरीचे सांडपाणी रिटेनिंग वॉल मधून आर.सी.सी.पाईप टाकून नाल्यामध्ये मिळणे आवश्यक आहे. तसेच रिटेनिंग वॉल नाल्यालगतची घरे यामधील खोलगट भागामध्ये मुरूम भरती करणे जरूरीचे आहे. त्यामुळे संरक्षित भिंतीस धोका निर्माण

होणार नाही. करीता सदरील अंदाजपत्रकाची रक्कम रू. २,७८,९१८/- ने वाढविण्यात आलेली आहे व त्याबाबत मा. आयुक्तांनी दिनांक ८.७.९६ रोजी मान्यता दिलेली आहे. सदरील कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.१७,०८,७५०/- ऐवजी रू.१९,८७,६६८/- अशी आहे.

सदरील काम महाराष्ट्र शासनाने मंजुर केलेल्या १०.०० कोटी अनुदानातून करण्याबाबत यापुर्वीच प्रस्तावित केले आहे. विचारार्थ सादर.

**विषय क्र.११८/६३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.नागसेन नगर, कबीर नगर , मिलिंदनगर, गाडगे नगर वार्ड क्र.६५ येथील डांबरीकरणाच्या कामाकरीता अंदाजपत्रकीय र.रू.६,२७,२००/- सन ९४-९५ मध्ये तयार करण्यात आले होते. त्यानुसार निविदा काढून मे.गुरूनानक एजन्सी यांना देण्यात आले होते परंतु त्यांनी सदरील काम सुरू केले नसल्यामुळे त्यांची एफ.एस.डी. २% अनामत रक्कम रू.११,९५०/- जप्त करून पुन्हा निविदा मागविण्यात आली होती, त्यानुसार मे.ए.सी.कोठारी यांना काम ३.९४% जास्त दराने काम देण्यात आले होते,तत्पुर्वी सदरील काम सन ९०-९१ पासून प्रलंबित आहे कारण की, ९०-९१ पासून प्रलंबित आहे कारण कि ९०-९१ मध्ये मे.रे.कन्सट्रक्शन यांना काम देण्यांत आले होते. परंतू मे.व्यंकटेश कन्स्ट्रक्शन यांचे ड्रेनेजचे काम चालू असल्यामुळे व मोठया प्रमाणात माती व मुरूम असल्यामुळे व त्यानंतर सदरील भागामध्ये कन्व्हरजनचे काम सुरू असल्यामुळे ९०-९१ या कालावधीत प्रलंबित असल्यामुळे मे. कन्स्ट्रक्शन यांनीही काम केले नाही. व त्यानंतर मे.गुरूनानक एजन्सीज यांनीसुध्दा वर उल्लेख केल्या प्रमाणे गुरूनानक यांनीही काम केले नाही. त्यानंतर फेर निविदा मागवून मे.ए.सी.कोठारी यांना ३.९९% जास्त दराने देण्यांत आले होते. व सदरील काम फक्त नागसेननगर पर्यंत मर्यादित होते. त्या करिता वार्ड क्र.६५ मधील नागसेननगर मिलिंदनगर , कबीरनगर, गाडेनगर या भागाचे रस्त्यांचे डांबरीकरण कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रू.२५,६०,०००/- मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

तसेच त्यापैकी ५,९७,१३१/- निविदाची रक्कमाही मंजुरी देण्यांत आलेली आहे. उर्वरित अंदाजपत्रपक र.रू. १९,६२,८६९/- चे डांबरी करणाचे प्रस्ताव आवश्यक असल्यामुळे व मुळ अंदाजपत्रक सा.बां. यांची दरसुचीप्रमाणे तयार केलेले असून सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सध्या मंजुर झालेले ठेकेदाराचे दर ३.९९% जास्त (९२.०३) ची दरसुचीनुसार असून वर्ष ९०-९१ पासून सदरील काम रस्त्याचे दोन्ही बाजू मोठया ्रपमाणे अतिक्रमण असल्याने वरील नमूद केलेल्या कारणानुसार काम होवू शकले नाही त्यानंतर संपूर्ण अतिक्रमण काढून डांबरीकरणाचे काम हाती घेतलेले आहे.

सदरील काम करण्यासाठी वर्ष ९५-९६ मध्ये दरसुचीचे दर वर्ष ९२-९३ पेक्षा सरासरी २२% जास्त दराने वाढ झालेली आहे. व सदरील काम वर्ष ९५-९६ मध्ये श्री.ए.सी.कोठारी यांच्याकडून दरसुची ९२-९३ प्रमाणे ३.९९% जास्त दराने करून घेतल्यास रू.४,६१,०५६/- चा महानगरपालिकेस आर्थिक फायदा होईल, यासर्व बाबींचा विचार करून मा. आयुक्त साहेबांनी दिनांक ११.६.९६ रोजी सदर प्रककरणास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.नागसेननगर, कबीरनगर, मिलिंदनगर, या गाडेनगर वार्ड क्र.६५ येथील डांबरीकरणाच्या कामासाठी सन ९४-९५ मध्ये अंदाजपत्रक रक्कम रूपये

६,२७,२००/- तयार करण्यात आले होते. प्रस्तावात दर्शविलेल्या एजन्सीने तांत्रिक अडचणीमुळे ९४-९५ या कालावधीत डांबरीकरणाचे काम प्रलंबित राहीले. सदरील कामासाठी परत निविदा मागविल्या असता एकूण सुधारित अंदाजपत्रक रक्कम रू.२५,६०,०००/- त्यापैकी ५,९७,१३१/- रूपयात अगोदरच मंजुरी देण्यांत आलेली होती. उर्वरित अंदाजपत्रक रक्कम रू. १९,६२,८३९/- व एजन्सी श्री.ए.सी.कोठारी यांना दरसुची ९२-९३ सालाचे ३.९९% जास्त दराने काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११९/६४:**

मालमत्ता अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला कि, मा. जिल्हाधिकारी यांनी त्यांचे पत्रक क्र./९६/ पुरवठा /झुमायो/कावि/दिनांक ५.२.९६ अन्वये कळविले आहे. कि, श्री.कृष्णा बाबुराव भोसले रा.नारळीबाग यांना जिल्हा परिषद कार्यालया समोर फुटपाथवर झुणका भाकर केंद्र लावण्याची मंजुरी देण्यांत आली आहे.

करिता संबंधितांना झुणका भाकर केंद्रासाठी १२० चौ.फुट जागा उपलब्ध करून देण्यांत यावी.

कार्यालयातर्फे सदरील जागेची पाहाणी केली असता जागा ८० फुट रूंद रस्त्याच्या फुटपाथ मध्ये येते, तसेच रहदारीस सुध्दा अडथळा होणार आहे.

तरी वरील कार्यालयीन टिप्पणी नुसार जिल्हा परिषद कपांऊंड भिंतीस लागून जागा झुणका भाकर केंद्रासाठी द्यावी किंवा नाही या बाबत चर्चा होवून निर्णय घेण्यात यावा.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.जिल्हाधिकारी यांचे मंजुरीने जिल्हा परिषद कार्यालयासमोर फुटपाथवर झुणका भाकर केंद्र श्री. कृष्णा बाबुराव भोसले यांना १२० चौ.फुट जागेची खालील अटीवर मंजुरी देण्यांत येते.

अट नं.१ - झुणका भाकर केंद्राचे बांधकाम रहदारीस अडथळा होणार नाही.

अट नं.२ - पादचारी किंवा कुठल्याही स्थानिक नागरिकांनी आक्षेप घेतल्यास वरील जागे विषयी तक्रारी निर्माण झाल्यास मंजुरी रदद् करण्यांत येईल.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२०/६५:**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला कि, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत मनपाच्या सर्व शालेय विद्यार्थ्यांना गणवेश शिलाई करून पुरवठा करावयाची आहेत.

सदर गणवेश शिलाई करण्यासाठी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यांत आल्या होत्या. चार पुरवठा धारकांच्या निविदा प्राप्त झाल्या त्यांच्या दराचा तुलनात्मक तक्ता या प्रमाणे

| अ.क्र. | इयत्ता | खाकी हाफ पॅन्ट | प्रतिनग | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ ली २ री | रू.१५ | १२.१० | ९.०० | १२.०० |
| २ | ३ री व ४ थी | रू.१६ | १३.२० | ९.०० | १२.०० |
| ३ | ५ वी ६ वी | रू.१६.५० | १५.०० | ९.०० | १२.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | ७ वी | रू.१७.०० | १५.५० | ९.०० | १२.०० |
| २. स्कर्ट | | | | | |
| १ | १ ली २ री | रू.१४.५० | १०.२५ | ९.०० | १२.०० |
| २ | ३ री व ४ थी | रू.१५.५० | १०.०० | ९.०० | १२.०० |
| ३ | ५ वी ६ वी | रू.१६.३० | १२.१० | ९.०० | १२.०० |
| ४ | ७ वी | रू.१७.०० | १२.५० | ९.०० | १२.०० |
| ३.शर्ट/ब्लाऊज | | | | | |
| १ | १ ली २ री | रू.१७.०० | ११.२५ | ९.०० | ८.०० |
| २ | ३ री व ४ थी | रू.१६.०० | १२.३५ | ९.०० | ८.०० |
| ३ | ५ वी ६ वी | रू.१६.०० | १३.०५ | ९.०० | ८.०० |
| ४ | ७ वी | रू.१७.५० | १३.३० | ९.०० | ८.०० |
| ४. पंजाबी शर्ट | | | | | |
| १ | ३ री व ४ थी | रू. १४.५० | १२.२५ | ११.०० | १५.०० |
| २ | ५ वी ६ वी | रू. १६.०० | १२.७५ | ११.०० | १५.०० |
| ३ | ७ वी | रू.१६.५० | १३.६० | ११.०० | १५.०० |

मा. आयुक्त यांच्या सुचनेनुसार मा. सभापती स्थायी समिती त्यांच्याकडे दिनांक ९.७.९६ रोजी निविदा धारकांना शिलाई दरात वाटाघाटी करण्यासाठी बोलावण्यात आले होते. मा.सभापती सह, स्थायी समितीचे सदस्य यांनी शिलाईचे काम त्वरीत कोण पुर्ण करू शकेल तसेच टेलर्स कडून बँक गॅरंटी घेण्याबाबत चर्चा झाली.

श्री.जैस्वाल टेलर्स यांचे दर सर्वात कमी आहेत. परंतु सदर टेलर्स बँक गॅरंटी देण्याबाबत असमर्थता दर्शविली आहे तसेच ते विहित कालावधीत गणवेश शिऊन देवू शकत नाही. श्री.सुरेश टेलर्सनीही विहित मुदतीत गणवेश शिलाईचे काम पूर्ण करू शकत नसल्याचे लेखी दिले आहे. बँक गॅरंटी ते देवू शकत नाही तसेच उपलब्ध असलेले शिलाई यंत्रे काम पूर्ण करण्यास कमी असल्याचे जाणवेल. त्यानंतरचे कमी दर एम.आय.डी.सी. यांचे आहेत चर्चेत त्यांनी एक लाख बँक गॅरंटी देण्याचे मान्य केले तसेच खालील दराने विहित मुदतीत गणवेश शिलाई करून देण्यांची तयारी दर्शविलेली आहे.

शर्ट /ब्लाऊज १२.०० सर्व इयत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी
हाफ पॅन्ट /स्कर्ट १२.०० सर्व इयत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी
पंजाबी शर्ट १२.०० सर्व इयत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी
सलवार १२.०० सर्व इयत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी

मराठवाडा गारमेंन्ट दर सर्वात जास्त आहेत संबंधित प्रतिनिधी "कामधेनू" योजने अंतर्गत त्यांना काम देण्यां बाबत विनंती केली परंतू त्याबाबत आवश्यक ती कागदपत्रे सादर न केल्याने त्याबाबत विचार केला नाही.

तरी एम.एस.एस.आय.डी.सी. चे दर मान्य करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** दिनांक २८.६.९६ च्या सभेत १५ ऑगस्ट ९६ पुर्वी विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप होईल अशी सुचना मान्य झाली आहे. स्वातंत्र्य दिनी विद्या ार्थ्यांना गणेवश असावा. यासाठी फक्त एक महिन्याचा कालावधी राहीलेला आहे. अशा परिस्थितीत ठराव ठेवण्यांत आलेला नाही याचा विचार करता सुचने नुसार १५ ऑगस्टला विद्यार्थ्यांना गणवेश कसे मिळेल. मनपा शाळेत गरीब विद्यार्थी शिक्षण घेतात.

**शिक्षणाधिकारी:** गणवेश शिलाई बाबतची निविदा संचिका मा. आयुक्त यांचेकडे मंजुरीसाठी ठेवली आहे. नुतन आयुक्त यांच्याकडे प्रस्ताव ठेवला आहे.

**मा.सभापती :** गणवेश शिलाई बाबत प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवावा अशी सुचना आणि स्वाक्षरी झालेली असतांना पुन्हा मा. आयुक्तांकउे प्रस्ताव का पाठवला कोणता विषय केव्हा घ्यावयाचा हा अधिकार समितीचा आहे . एखादा निर्णय झाल्यानंतर पुन्हा मा. आयुक्त यांचेकडे कशी ठेवली गेली याचा खुलासा व्हावा.

**लेखाधिकारी :** गणवेश शिलाईच्या निविदेची संचिका आली असता त्यावर काही अभिप्राय दिले आहेत . १५ ऑगस्ट १९९६ पर्यंत मुलांना गणवेश देणे आहे. म्हणून प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवावे. शिक्षणाधिकारी यांनी संचिकेमध्ये बँक गॅरंटीचा उल्लेख केलेला नाही. प्रस्ताव सादर करतांना संचिकातील सुचना प्रस्तावात नमुद करणे आवश्यक आहे.

**मा.सभापती :** शिक्षणाधिकारी यांच्या वक्तव्या वरून असे दिसून आले कि, शिक्षणाधिकारी कार्यालयातील लिपीक यांच्या सांगण्या वरून काम करतात हे नियम बध्द नाही येत्या १५ ऑगस्ट ९६ ला मनपाच्या सर्व /मुला/मुलींना गणवेश शिवून घ्यावयाचे आहे आणि ते गणवेश शिवून द्यावयाचे आहे आणि ते गणवेश शिवून पाहिजे. लेखाधिकारी -१ यांनी अभिप्राय देताना ज्या काही सूचना केलेल्या होत्या त्या शिक्षणाधिकारी ने नोटींग मध्ये गणल्या शिवाय निविदा मागवितांना (टेंडर कॉल) कोणत्या क्वालिटीचा कपडा पाहिजे हे त्यात नमुद केलेले नव्हते.

हा प्रस्ताव अत्यंत महत्वाचा असल्यामुळे सभागृहाने चर्चा करून प्रस्तावास याच सभेत मंजुरी देवून कायम करावे.

**डॉ.भागवत कराड:** गणवेश शिलाईच्या कामासाठी चार निविदा आल्या असतील तर निविदाचे दर हरवून शिलाईचे काम विभागून देण्यांत यावे.

**मा.सभापती :** कुठल्याही प्रकारची परवानगी नसतांना सभापती संबंधित लिपीकांने निविदाधारकांना चर्चेसाठी माझ्या दालनांत बोलवले यानुसार तीन निविदा धारकांना चर्चेसाठी माझ्या दालनांत बोलावले त्यानुसार तीन निविदाधारक चर्चेसाठी आले होते मे.आर एस टेलर्स यांनी बँक गॅरंटी देण्याबाबत नकार दिला आहे वस्तुतः अशा प्रकारची अट निविदा सुचनेत दिलेली नाही. ही चुक शिक्षण अधिकाऱ्याची आहे मे. आर.एस.टेलर यांचे दर रू.९/- याप्रमाणे आहेत. ते योग्य वाटत नाही. मे.मराठवाडा गारमेन्ट यांचे दर रू.१५ ते १७ असे आहेत. मे.एम.एस.एस. दराची निविदा मान्य करावी. शासनाच्या परिपत्रकानुसार कमी दराची निविदा मान्य करावी. शासनाच्या परिपत्रकानुसार कमी दराची निविदा दरापेक्षा १५% जास्त या दराने एम.एस.एस. आय.डी.सी. यांना काम द्यावे असे निदेश आहेत. त्यानुसार खाकी हाफ पॅन्ट करीता १०-३५, स्कर्ट १०-३५ शर्ट/ब्लाऊज ९-२० , शर्ट पंजाबी ११.५० , सलवार १२.६५ , असे दर ठरविण्यात येतात. सर्व शिलाई धारकांना २० तारखेपर्यंत शिलाईसाठीचे कापड पुरवठा करण्यात यावा आणि शिलाई धाकरांनी १० ऑगस्ट पर्यंत त्यांना देण्यात आलेले गणवेश शिलाईचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र या ठिकाणी करण्यात यावे. गणवेश शिलाई करतांना त्यावर मनपाचे बोध चिन्ह शिलाई करून देण्यात

यावे यासाठी कोणताही आकार शिलाईधारकांना दिला जाणार नाही. शिलाईचे काम चालू असतांना समितीचे सदस्य कामाची पाहणी करतील गणवेश असलेला अपुरा वेळ आणि गणवेशाची संख्या लक्षात घेता सदर प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपाच्या सर्व सुलांना मुलींना गणवेश शिवून देण्याच्या कामासाठी मा.सभापती स्थायी समिती यांचे सोबत शिलाई दरांत वाटाघाटी तसेच बँक गॅरंटी घेणे बाबत चर्चा झाल्या वरून स्थानिक एम.एम.एस. आय.डी.सी.यांचे दर जे खालील प्रमाणे दर्शविले आहेत

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शर्ट /ब्लाऊज | १२.०० | सर्व इयत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी |
| २ | हाप पॅन्ट/शर्ट | १२.०० | सर्व इयत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी |
| ३ | पंजाबी शर्ट | १२.०० | सर्व इयत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी |
| ४ | सलवार | १२.५० | सर्व इयत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी |

परंतु शासन परिपत्रकानुसार निविदा दरापेक्षा १५% जास्त दराने एम.एस.एस.आय.डी.सी. यांना काम दयावे असे जरी असले तरी एम.एस.एस.आय.डी.सी. या संस्थेच्या चालकास बोलावून परत वाटाघाटी करून खालील प्रमाणे दर निश्चत करण्यात आले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | खाकी हाप पॅन्ट | १०.३५ | सर्व इयत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी |
| २ | स्कर्ट | १०.३५ | सर्व इयत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी |
| ३ | शर्ट /ब्लाऊज | ०९.२० | सर्व इयत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी |
| ४ | पंजाबी शर्ट | ११.५० | सर्व इयत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी |
| ५ | सलवार | १२.६५ | सर्व इयत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी |

एम.एस.एस.आय.डी.सी. ने शिलाईचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र याठिकाणी करण्यात यावे. शिलाई करतांना गणवेशावर मनपाचे बोधचिन्ह तयार करावे. बोधचिन्ह विनाशुल्क असेल सर्व गणवेश शिवून १० ऑगस्ट ९६ चे आंत मनपास सदर संस्थेने प्रदान करावे.

या अटीसह ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे. तसेच गणवेश शिलाई करतांना असलेला अपूरा वेळ आणि गणवेशाची संख्या लक्षात येता सदर प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज जन गण मन या राष्ट्रीय गिताने संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ३०.७.९६ रोजी सपंत्र झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त सभा दुपारी ठिक ३.०० सुरू झाली. सभेस मा. सभापतीसह स.सभासद व अधिकारी वर्ग उपस्थित होते.**

१ श्री.गौतम खरात
२ श्री.कवरसिंग बैनाडे
३ सौ.रजनी जोशी
४ डॉ.भागवत कराड
५ कु.माया लाडवाणी
६ श्री.विजयकुमार मेहेर
७ श्री.महादेव सुर्यवंशी
८ श्री.हमीदउद्यीन ताबा
९ श्री.भगवान घडामोडे
१० श्री.सुभाष टाकळकर
११ श्री.त्र्यंबक तुपे
१२ श्री.अभिमन्यु भालेराव
१३ श्री.कचरू नवपुते
१४ श्री.विकास जैन

सभेची सुरवात "वन्दे मातरम्" या गिताने झाली.

**संवाद:**

**श्री.गौतम खरात:** जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी अरूण आसफ अली यांचे निधना निमित्त सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**श्री.कंवरसिंग बैनाडे :** मा.जयसिंगराव गायकवाड यांचे बंधूचे दु:खद निधन झाले.

**श्री.भागवत कराड:** स्व. दौलतराव येळीकर यांनाही सभागृहातर्फे श्रध्दांजली वाहण्यांत यावी.

**मा.सभापती :** ठिक आहे.

सभागृहात वरील प्रमाणे ००.०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** शहरातील विविध झोपडपटट्यांमध्ये साफसफाई व्यवस्थित आहे किंवा नाही याकडे आरोग्य अधिकाऱ्यांचे लक्ष नाही. त्यामुळे गेल्या पंधरा दिवसात ब्रिजवाडी येथे गॅस्ट्रोची साथीचे लागण झाल्याचे दिसते. एका दैनिक वृत्तपत्रात आलेल्या बातमीनुसार पिसरवाडी येथे सौ.लव्हाळे नावाच्या महिलेचा मृत्यु झाला. त्यानंतर आपल्या अधिकाऱ्यांची पळापळी सुरू झाली मो.सिध्दार्थनगर येथे आरोग्याच्या दृष्टीने साफसफाई व्यवस्थित होत नाही. सदरील भाग हा स्लम आहे. याकडे आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांची विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. याकडे आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. मागिल वेळेस ब्रिजवाडी येथे अशाच प्रकारे दोन बालकांचा मृत्यु झाला होता. त्या मुलांच्या नातेवाईकांना महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत दिलेली होती. त्याच प्रमाणे सौ.लव्हाळे यांनाही

महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत देण्यांत यावी. तसेच आरोग्याच्यादृष्टीने साफसफाई बाबत संबंधित अधिकाऱ्यांना खुलासा करण्यांस सांगावे.

**मा.सभापती:** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** स.सदस्यांनी खुलासा केल्याप्रमाणे साफसफाई होत नाही हे म्हणणे खोटे आहे. मो.मिसारवाडी येथे मार्च महिन्यापासून आजपर्यंत साफसफाई व त्या ठिकाणी प्रत्यक्ष वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जावून पाहणी करीत आहेत आणि तेथिल नागरिकांना आरोग्याच्यादृष्टीने उपाययोजना करीत आहेत. त्याठिकाणी विहिर आहे. त्या विहिरीतले पाणी पिण्याचे लायक नाही अशा प्रकारची पाटीही आम्ही लावलेली आहे. वेळोवेळी फवारणी आणि गोळया औषधांचा वापरही करण्यांत येतो. तरीही विशेष लक्ष आमच्या विभागाचे असून तेथील एक महिला गॅस्ट्रोने दगावली नसून ती वयस्कर ८० वर्षाची असल्याने दगावली आहे.

**मा.सभापती:** वर्तमान पत्रात आलेली बातमी खोटी आहे काय ? याची माहिती द्यावी.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** मिसारवाडी वस्ती ही अनाधिकृत आहे व मृत पावलेली महिला ही ८० वर्षाची होती.

**मा.सभापती :** कोणतीही वस्ती अधिकृत असो किंवा अनधिकृत महानगरपालिकेच्या हदद्दीतील वस्त्यांमध्ये साफसफाई करणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य ओ तसेच सिध्दार्थनगर येथील नाला साफसफाई व्यवस्थित होत नसल्यास त्या ठिकाणी आवश्यक ती कार्यवाही त्वरीत करावी. याबाबत उपआयुक्त -२ यांनी विशेष लक्ष द्यावे.

**डॉ.भागवत कराड :** स्वच्छता पाहणी ही बाब ही तांत्रिक नाही. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून संबंधित अधिकाऱ्यांनी वेळोवेळी पाहणी करून आवश्यक ती कार्यवाही करणे आवश्यक बाब ओ आणि त्यांचे वर नियंत्रण असणारा एक वेगळा अधिकारी नेमून काम द्यावे.

**मा.सभापती :** आपल्या शहरात वेगवेगळे झोन आहेत. आणि त्या झोनमधील अधिकऱ्यांवर नियंत्रण ठेवणारे मा. आयुक्त आहेत. मागील वेळेस "डास निर्मुलन पंधरवाडा " करणार होते. त्याबाबत प्रत्यक्षात काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

**श्री.अभिमन्यु भालेराव :** आताच संबंधित अधिकऱ्यांनी सांगितले कि मृत पावलेली महिला ही ८० वर्षाची होती. म्हणून दगावली परंतु या पुर्वीही ब्रिजवाडी भागात याच कारणाने मृत्यु ओढवलेले होते. तेव्हा त्यावेळेस कोणती कार्यवाही केली होती किंवा वेळेपासून आजपर्यंत काय कार्यवाही केलेली आहे याची माहिती द्यावी.

**मा.सभापती :** संबंधित ठिकाणी महिलेचा मृत्यु हा गॅस्ट्रोनेच झालेला असल्याचे प्रमाण्पत्राद्वारे आढळल्यास महानगरपालिकेच्या तर्फे आर्थिक मदत देण्यांत येईल. तसेच त्या ठिकाणचे उघडया विहिरीवर जाळी बसविण्यात यावी. तेथील नागरिक पाणी पिण्यासाठी घेत असतील तर त्या बाबत आवश्यक ती कार्यवाही करून पाणी शुध्द राहणेसाठी औषध वगैरे टाकून काळजी घेणे आवश्यक आहे व पाणी पिण्यासाठी वापरत घ्यावयाचे नसलयास महानगरपालिकेतर्फे तशी नागरिकांना पाटी लावून सूचना द्याव्यात.

**श्री.गौतम खरात:** स.सदस्यांनी सुचीत केल्याप्रमाणे सर्वच बाबतीत प्रशासन जबाबदार असते असे नाही. त्यापेक्षा जेवढे स्लम भाग आहेत त्या भागात साफसफाई

व्यवस्थित होते किंवा नाही याकामी एक समिती नेमावी आणि त्या समितीने वेळोवेळी पाहणी करून आपला अहवाल सभागृहात दाखल करावा.

**उप आयुक्त -२:** प्रत्येक झोनमधील साफसफाई व्यवस्थित होते किंवा नाही यासाठी मागील वर्षाप्रमाणे एक झोनला एक अधिकारी वर्ग -१ ची नेमणूक करून अहवाल घेतला जातो. त्याप्रमाणे कार्यवाही करणे सुलभ होईल.

**मा.सभापती :** ठिक आहे याप्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री.कचरू नवपुते:** साफसफाई साठी प्रत्येक झोन मध्ये काम करणारे कर्मचारी कमी असल्याने साफसफाई व्यवस्थित होत नाही ज्येष्ठता यादीनुसार रोजंदारीवरील कर्मचारी वेळोवेळी घेवून कामे केल्या जातात. त्यमुळे कोणी शहगंज मधून चिकलठाणा येथे येणार तर कुणी चिकलठाण्याकडून रेल्वेस्टेशनकडे काम करणारे कामगार असतात. तेव्हा याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** माजी आयुक्त यांनी एका कामगाराने साफसफाई बाबत किती काम करावयाचा आराखडा दर्शविलेला होता. त्याप्रमाणे प्रत्येक झोनमध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी त्या कर्मचाऱ्याकडून काम घ्यावे आणि त्यानंतरही जर कर्मचारी कमी पडत असतील तर रोजंदारी वरील कर्मचारी घ्यावे व डास निर्मूलन पंधरवाडा दिनांक ५ ते २० ऑगस्ट पर्यंत घ्यावे असे डॉ.देशपांडे यांनी सुचित केले त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** झोन क्र.५ चिकलठाणा येथे १४ स्त्री,१३ पुरूष्य व २ स्विपर कर्मचारी काम करतात. आणि हे सर्व कर्मचारी गेल्या सात आठ वर्षापासून काम करीत आहेत. हा झोन फार मोठा आहे. तरी या ठिकाणी कामगार काम करण्यास अपुरा पडत असून आणखी कर्मचारी वाढवून द्यावे जेणे करून साफ सफाई व्यवस्थित होत राहील.

**श्री.कचरू नवपुते :** मा.सभापती यांनी झोन ५ चिकलठाणा येथे प्रत्यक्ष भेट देवून पाहणी करावी आणि या ठिकाणी सफाई काम करणारे कर्मचारी किती आहेत व हा भाग किती मोठा आहे. त्यामुळे साफसफाई दररोज नीट होत नाही आणि त्यामुळे महानगरपालिकेची बदनामी होत असते. यासाठी उप आयुक्त यांनी सुध्दा पाहणी करून या भागासाठी वाढीव सफाई कर्मचारी देण्यात यावे.

**श्री.कंवरसिंग बैनाडे :** दै.वेतनावर काम करणारे कर्मचारी झोन वाईज किती आहेत. याची माहिती द्यावी. माझ्याकडे एक निनावी पत्र आहे आहे. त्या पत्रात असे नमुद केलेले आहे कि, आपल्या काही अधिकारी वर्गाकडे त्यांच्या घरी काही कर्मचारी कामाला आहेत . त्यामुळे दर महिन्याला सात ते आठ हजार रूपये तोटा सहन करावा लागतो. याबाबत चौकशी करावी. ज्या अधिकाऱ्यांच्या घरी ते कर्मचारी काम करतात त्यांची नावे वाचून दाखविली.

१ डॉ.देशपांडे यांचे घरी
२ श्री.सि.एस.सोनी यांचे घरी
३ श्री.विजय जावरे यांचे घरी
४ श्री.शहाणे ,स्व.निरिक्षक यांचे घरी

**मा.सभापती :** याबाबत उप आयुक्त यांनी चौकशी करून अहवाल द्यावा.

**सौ.रजनी जोशी :** स्वच्छता निरिक्षक प्रत्येक झाने मध्ये वाढवून देणे बाबत वेळेस सुचना केलेली होती त्याबाबत काय झाले ?

**मा. सभापती :** याबाबत उप आयुक्त यांनी खुलासा करावा व याबाबत शासनाकडून स्वच्छता निरिक्षकांच्या पदास मंजुरी घेवूनच पदे भरावीत "डास निर्मुलन" बाबत काम केले याची माहिती द्यावी.

**स्वच्छता निरिक्षक :** दिनांक ५-२० ऑगस्ट दरम्यान "डास निर्मुलन" पंधरवाडा आराखडा करण्यांत येईल.

**मा.सभापती :** आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी याबाबत माहिती द्यावी.

**आरोग्य वै.अधिकारी :** डास निर्मुलन पंधरवाडया निमित्त सर्व तयारी करण्यात आली आहे. ज्यामध्ये कॉग्रिंग पावडर , गोळया औषध घरोघरी जावून ज्या ज्या ठिकाणी डबक्यांत पाणी साचलेले असेल त्यांना याबाबत माहिती देण्यांत येईल. व सांडपाण्या विषयी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल तसेच वर्तमानपत्रातून ही जाहिरात वगैरे देवून नागरिकांना माहिती देण्यांत येईल.

**श्री.कचरू नवपुते :** उप आयुक्त यांनी प्रत्येक झोन अधिकाऱ्यांची बैठक घेवून किती रोजंदारीवरील कर्मचारी साफसफाई साठी कमी पडतात याची माहिती द्यावी.

**मा.सभापती :** ठिक आहे . उप आयुक्त यांनी बैठक घेवून कार्यवाही करावी.

**श्री.गौतम खरात :** बनेवाडी येथील कामाबाबत काय कार्यवाही केली याची माहिती आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी करावी.

**आरोग्य वैद्यकिय अधिकारी :** बनेवाडी येथे ठिकठिकाणी पॉंडस् आहेत त्याठिकाणी ट्रिटमेंट करून प फॉगिंग करून आवश्यक ती कार्यवाही करण्यांत येत आहे.

**मा.सभापती :** आपण पुणे महानगरपालिका येथे पाहणी करण्यासाठी गेलो होते त्या ठिकाणी जी समक्ष चर्चा झाली आहे त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**डॉ.भागवत कराड :** डांस निर्मुलना बाबत आपण जो सप्ताह पंधरवाडा साजरा करणार आहोत त्याबाबत लोकांना घरोघरी माहिती पोहचेल अशी व्यवस्था व्हावी व झोनवाईज बैठका घ्याव्यात.

**मा.सभापती :** या बाबत एका झोनला दोन दिवस याप्रमाणे डांस निर्मुलना बाबत माहिती देण्यांत येईल.

**श्री.सुभाष टाकळकर :** सिडको एन -६ भागात ड्रेनेज लाईन टाकण्यांत आलेली आहे परंतु आता त्या ठिकाणचे काम बंद असल्याचे समजते आणि सिडकोकडून परवानगी का घेतली नाही याची माहिती कार्यवाही अभियंता (पापू) यांनी करावा.

**मा.सभापती :** या बाबत सिडकोचे मुख्य प्रशासक यांचेशी चर्चा करून कार्यवाही करावी तसेच फॉगिंग बाबतही कार्यवाही करावी.

**आरोग्य वै.अधिकारी :** सिडको कडून सतत विडींग वाहत येते . याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

**डॉ.भागवत कराड :** माझ्या असे लक्षात आले कि, बेगमपूरा स्मशान भूमित मृत पावलेल्या आणि जाळल्यानंतर तीन दिवसाने जी राख गोळा करण्याची क्रिया संबंधित ठिकाणी केली जाते, त्यावेळी तेथील राखच चोरली जाते ही बाब गंभीर आहे. याबाबत तेथील वॉचमन किंवा स्मशान जोगी यांना योग्य ते आदेश द्यावेत किंवा वॉचमन नसतील तर नेमणूक करावी.

**मा.सभापती :** याबाबत ज्या स्मशान भूमित स्मशानजोगी नसतील त्याठिकाणी नविन स्मशान लावून घ्यावेत व काळजी घेण्याचे करावे.

**श्री.गौतम खरात:** स्मशान भूमित जे कर्मचारी वॉचमन म्हणून काम करतात किंवा करीत असतील तर तशा कर्मचारी स्मशानजोगी यांची नेमणूक करावी. परंतु माझ्या मते बेगमपूरा स्मशान भूमितील जाळलेली राख तेथील विट भटट्यावाले नेत असतील. असा अंदाज आहे.

**मा. सभापती :** ही बाब गंभीर असून या बाबत ताबडतोब कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**श्री.हमीदउद्यीन ताबा :** महानगरपालिकेच्या स्विमिंग पूलाच्या ठिकाणी शेड टाकण्यांत यावे.

**मा.सभापती :** शेड पडलेला आहे तो बसविण्यांत यावा.

**श्री.हमीदउद्यीन ताबा :** लाईट टेंडर बाबत काय कार्यवाही केली.

**मा.सभापती :** संबंधित बाबतीत स्थायी समितीस मंजुरीस ठेवावे.

**श्री.कंवरसिंग बैनाडे :** क्रांतीचौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाजवळ अंधार आहे. तसेच एम.आय.डी.सी. येथील लाईट बंद आहेत. याबाबत काय कार्यवाही केली.

**मा.सभापती :** क्रांतीचौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाजवळ अंधार आहे. त्याबाबत उप अभियंता लाईट यांनी ताबडताब कार्यवाही करावी. जे लाईटचे मेंटेंनन्स बाबत ज्यांना कॉट्रक्ट दिलेला आहे त्यांना ताबडतोब सुचना दयाव्यात. नसता त्यांचेवर कार्यवाही करावी.

**श्री.भगवान घडामोडे :** बऱ्याच भागातील पोल मंजुर होवूनही बसविण्यांत आलेले नाहीत आणि ज्या ठिकाणी पोल बसविण्यांत आले त्याठिकाणी तारा ओढलेल्या नाहीत याबाबत माहिती दयावी.

**मा.सभापती :** आपल्या लाईटच्या भंडारात काय मटेरियल आहे याची माहिती दयावी.

**उप अभियंता (विद्युत):** ३-४ एजन्सीज् आहेत त्यांच्या मार्फत काम चालू आहेत.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** शताब्दीनगर येथे २-३ वर्षापासून पोल पडलेले आहेत परंतू वायर ओढलेले नाहीत याचे कारण काय ?

**उप अभियंता:** एम.एस.ई.बी. ने ३-४ पोल टाकलेले आहेत व त्याचा खर्च महानगरपालिकेने केलेला नाही तरी ते एम.एस.ई.बी. मार्फत वायर ओढण्यांत येतील.

**श्री.कंवरसिंग बैनाडे :** मो.विद्यानगर/विजयनगर येथे सन १९८८ मध्ये ८० फुट रोड होता तो आता रोड कमी झालेला आहे याची माहिती दयावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**सहा. संचालक :** संबंधित रोडची पाहणी केलेली आहे परंतु तेथील लोक कोर्टात गेलेले असल्याने हा प्रश्न प्रलंबित असून फार जुना आहे.

**श्री.कंवरसिंग बैनाडे :** भिमनगर येथे व संत एकनाथ रंग मंदिराजवळ महानगरपालिकेतर्फे वृक्षारोपण करून झाले लावण्यात यावीत.

**मा.सभापती :** याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी व या संदर्भात अनेक शैक्षणिक संस्थांचेही सहकार्य घ्यावे.

**डॉ.भागवत कराड :** जकाती बाबतचा अहवाल स्थायी समिती पुढे ठेवावे.

**मा.सभापती :** मागील वर्षाप्रमाणे या वर्षी सुध्दा जकात बाबतचा अहवाल ठेवावा.

**श्री.गौतम खरात :** महानगरपालिकेने औरंगाबाद शहर विकासा करीता ८० कोटीची योजना तयार केलेली होती व प्रस्ताव राज्य शासनाकडे दाखल करण्यात आलेला होता. परंतु राज्य शासनाने त्यापैकी फक्त १० कोटीची मदत शहर विकासा करीता मंजुर कले व त्या १० कोटीचा खर्च कसा करणार याबाबत प्रत्येक कामाच्या खर्चानुसार कृती आराखडा तयार करून शासनाकडे पाठविण्यांत

आलेला होता. शासनाने रू.१० कोटी महानगरपालिकेला दिले. परंतु शहरातील अनेक कामे व सौंदर्यीकरणाची कामे सुरू होत आहेत. नुकतेच एका वर्तमान पत्रात कोटीच्या मदतून सिडको विकासाकरीता देवू केले अशी बातमी प्रसिध्द झाली. सिडको ही वेगळी स्वयत्त संस्था असून ती व्यापारीदृष्टीने जागा व घरे विकून बलवान झालेली आहे. आणि मात्र औरंगाबाद शहर मात्र जुनेच असून आहे तशीच परिस्थिती आहे,तेव्हा रू.१० कोटी शासनाकडून आले त्यांचे करिता खर्च करण्यांत येवू नये. वाटल्यास मा.पालकमंत्र्यांनी पुन्हा सिडकोसाठी वेगळया १० कोटीची मागणी करावी. आमची काही हरकत नाही. परंतु शहर विकासासाठी आमचे पैसे इतरत्र नेवून जनतेची दिशाभूल करू नये.

**मा.सभापती :** शासनाकडून १० कोटी महानगरपालिकेला विकासाकरीता दिलेले आहेत आणि सिडको हा भाग महानगरपालिकेचाच अविभाज्य भाग आहे. शासनाकडून मिळालेल्या पैशाबाबत शहराच्या विकास कामा बाबत खर्च कसा करावा याबाबत मा. पालकमंत्री यांनी समिती नेमलेली आहे.

**श्री.गौतम खरात :** शासनाने जो जी.आर आधारे महानगरपालिकेस रू.१० कोटी दिलेले आहेत तसे सिडकोला लेखी शासनाकडून काही पत्र महानगरपालिकेकडे आलेले आहे. काय ते दाखववे. विनाकारण तोंडी बोलून रू.१ कोटी सिडकोस देवू असे बोलणे योग्य नाही. सिडको ही स्वायत्त संस्था असून तिच्याकडे महानगरपालिकेचीही अनेक भाडे थकलेले आहे. ती वसुल करणेही आवश्यक आहे.

**श्री.हमीदउद्यीन ताबा :** शाळा सुरू होवून दोन महिन्याचा अवधी संपलेला आहे. शिक्षकांच्या मुलाखती झाल्या परंतु अद्यापही निवड होवून भरती करण्यांत आलेली नाही. याचे कारण काय ? आज मी याच्या निषेधार्थ धरणे धरत आहे.

**मा.सभापती :** उप आयुक्त यांनी खुलासा करावा.

**मा.उप आयुक्त :** प्राथमिक शिक्षकांच्या नियुक्त्या रिक्रुटमेंट रूल पाहणी करूनच उद्या आदेश देण्यांत येत आहेत. प्रशासनाने एक समिती नेमून मुख्याध्यापक यांचे बाबतीत प्रलंबित कामे संदर्भात चर्चा झालेली आहे. सुपरवायझर बाबतीत काही शासनाच्या गाईडलाईन्स घेवून कार्यवाही करणे. उचित ठरले.

**श्री.हमीदउद्यीन ताबा :** बिल्डींग इन्स्पेक्टर व इमारत निरिक्षक यांच्या पदाबाबत काय झाले.

**मा.सभापती :** या प्रशासन कार्यवाही करीत आहेत. इतिवृत्त कायम झाल्यानंतर प्रशासन कार्यवाही करेल.

**श्री.हमीदउद्यीन ताबा :** मा.सभापतींनी आदेश दिल्यानंतर ही अंमलबजावणी होत नाही तर सभापतींचा अपमान होतो.

**मा.सभापती :** इतिवृत्त कायम झाल्यानंतरच प्रशासन योग्य ती कार्यवाही करेल.

**श्री.हमीदउद्यीन ताबा :** मा.सभापतींनी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी प्रशासन करीत नाही याचा मी उपआयुक्त -२ व संबंधित अधिकाऱ्यांचा निषेध करतो. तसेच आरोग्य विभागात गेल्या तीन महिन्यांपासून इंटरव्हयू होवूनही अद्याप कार्यवाही झालेली नाही. याची माहिती दयावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**मा.आयुक्त :** माझ्या मते आजच संबंधित बाबतीतील संचिका माझ्याकडे आलेली आहे. मी संचिका पाहून आठ दिवसात आदेश बाबत निर्णय घेण्यात येईल.

**मा.सभापती :** प्रशासनाने या बाबतीत कार्यवाही करून आदेश काढावेत तसेच पुढील बैठकीत वर्ग ३ व ४ यांचे किती पदे रिकामे आहेत आणि ते का भरलेले नाहीत यासह स्थायी समितीसमोर प्रशासनाने ठेवावे.

**श्री.हमीदउद्दीन ताबा :** शिक्षण विभागात जवळपास ५० कर्मचारी फिक्स पगारावर काम करीत आहेत अद्यापही त्यांचेवर कार्यवाही झालेली नाही .

**मा.सभापती :** याबाबत मा.आयुक्तांशी माझी चर्चा झाली आहे. मा. आयुक्त अशा सर्व प्रलंबित प्रशासनाबाबत मंत्रालय मुंबईला गेलेले होते तथापी अधिवेशन चालू असल्याने काहीही झालेले नाही.

**सौ.रजनी जोशी :** ऑडिट विभागात किती लोक काम करतात याची माहिती द्यावी.

**मुख्य लेखा परिक्षक :** ऑडिट विभागात एकूण ११ कर्मचारी काम करतात. ६ पदे ही मंजुरीनुसार असून मागिल सर्वसाधारण सभेत १५ पदांना मंजुरी दिली.

**मा.सभापती :** सहा आयुक्त -१ यांनी माहिती द्यावी.

**सहा.आयुक्त -१:** वेळोवेळी मागणी केल्याप्रमाणे संबंधित विभागास कर्मचारी दिल्या जातो.

**मा.सभापती :** पुढील बैठकीत सहा आयुक्त-१ यांनी याबाबत सविस्तर माहिती दयावी.

**डॉ.भागवत कराड :** मागिल बैठकीत १० पदास मंजुरी दिलेली होती त्यापैकी काय झाले.

**मुख्य लेखा परिक्षक :** शासनाकडे मंजुरीस्तव प्रस्ताव पाठविण्यांत आलेला आहे.

**मा.सभापती :** मी नगर सचिव यांना असे आदेशित करतो की, त्यांनी स्थायी समितीने केलेल्या विविध कामांबाबत व केलेल्या ठरावा बाबत काय कार्यवाही प्रशासनाने केली याची माहिती पत्राद्वारे प्रशासनाला विचारून वेळोवेळी बैठकीत ठेवावे.

**लेखाधिकारी -१:** लेखा ऑडिट विभागात कामाचा जादा भार असल्यामुळे १५ पदे निर्माण केलेली होती सेक्शन ५३ अन्वये आपण घेवू शकतो. दोन पदे रोजंदारीवर घेतलेले आहे.

**मुख्य लेखापरिक्षक** :आज जेवढे कर्मचारी माझ्याकडे कामास आहेत त्यामध्ये माझे काम व्यवस्थित होत आहे.

**मा.सभापती :** पंधरा दिवसात एकदा ऑडीट झालेले आणि मासिक ऑडीट झालेले सुध्दा पुढील बैठकीत स्थायी समिती समोर ठेवावे.

**श्री.हमीदउद्दीन ताबा :** सर्वसाधारण सभेने मंजुरी दिल्यानुसार अंमलबजावणी होत नाही.

**मा.सभापती :** याबाबत नगर सचिवांनी कार्यवाही करावी. बैठकीत ठरल्याप्रमाणे नगर सचिवांनी संबंधित विभागास पत्राने कळवावे व त्या पत्राचे उत्तर नगर सचिवांकडे विभाग प्रमुखांनी ताबडतोब उत्तर दयावे आणि ते उत्तर नगर सचिवांनी बैठकीत सादर करावे.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती दयावी.

**सहा आयुक्त-१:** आपल्याकडे ६ पदे टेलिफोन ऑपरेटरची असून ती सर्व पदाचे कर्मचारी टेलिफोन ऑपरेटर कोर्स केलेला आहे काय ? याची माहिती द्यावी.

**श्री.कंवरसिंग बैनाडे :** टेलिफोन ऑपरेटरनी कोणत्या व्यक्तीस कसे बोलावे याबाबत दक्षता घेणेची सुचना करावी.

**मा.सभापती :** याबाबत उप आयुक्त यांनी संबंधित टेलिफोन ऑपरेटर यांना काळजी घेण्याबाबत सूचना दयाव्यात.तसेच प्रत्येक विभागास फोन केला असता असे आढळून येते कि, त्याठिकाणी फोन प्रथम शिपाई उचलेले असे न करता

संबंधित विभाग प्रमुखांनी फोन उचलावा शिपायांना फोन उचलण्यास सांगू नये याची खबरदारी घ्यावी.

**डॉ.भागवत कराड :** तृतिय श्रेणी कर्मचाऱ्यांना दुसरा व चौथ्या शनिवारी काम केल्याचा मोबदला देणे बाबत काय झाले याची माहिती दयावी.

**सहाय्यक आयुक्त-१ :** याबाबत काही वाहन चालकांनी या दिवशी काम न करता बिले सादर केली. आता आम्ही लेखा विभागात सुचना केलेल्या आहेत कि, ज्या वाहन चालकांनी खरोखर काम केलेले आहेत कि, ज्या वाहन चालकांनी खरोखर काम केलेले असेल त्यांना त्यांच्या अधिकाऱ्यांच्या शिफारशी वरूनच तपासले जाईल व त्यानुसार त्यांची हजेरी पाहूनच त्यांना योग्य तो मोबदला दिला जाईल. अशी चर्चा होवून सुचना केल्या आहेत.

**श्री.गौतम खरात :** ज्या वाहन चालकांनी कामे न करता हजेरी पाठविल्या त्यांना नोटीसा बजवाव्यात.

**उप आयुक्त -१:** ठिक आहे.

**डॉ.भागवत कराड :** कर आकारणी बाबत पासबुक तयार करण्यांत आलेले होते या बाबत काय कार्यवाही केली.

**मा.सभापती :** उप आयुक्त -१ यांनी खुलासा करावा.

**उप आयुक्त -१:** याबाबत कार्यवाही प्रलंबित आहे. एक महिन्याच्या कालावधीत ते काम पूर्ण करण्यांत येईल.

**श्री.हमीदउद्यीन ताबा :** बिले कॉम्प्युटरद्वारा दिली जातात काय ?

**उप आयुक्त -१:** होय

**मा.सभापती :** आपल्याकडे कॉम्प्युटर प्रोग्रामर कर्मचारी नाहीत तेव्हा त्याठिकाणी उप आयुक्त यांनी कार्यवाही करावी.

**डॉ.भागवत कराडः** बिले तयार करण्यासाठी दोन कर्मचारी घ्यावे. परंतु कॉम्प्युटर करीता घेतलेल्या कर्मचाऱ्यांना घेवू नयेत .

**मा.सभापती :** कॉम्प्युटर ऑपरेटर ३-४ असतील पंरतु कार्यक्रम प्रोग्राम घावेत.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** मागील वेळेस कॉम्प्युटरच्या कामासाठी ३-५ लाखाची मंजुरी घेतलेली होती. परंतु त्यातुन काय खर्च केले याची माहिती दयावी.

**सौ.रजनी जोशी :** असे निर्दशनास येते कि, बरेच कॉट्रक्टर दुपारनंतर स्वतः फाईल घेवून अधिकाऱ्यांकडे जातात याचे कारण काय ?

**मा.सभापती :** स.स. यांनी सुचित केल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या संचिका काही कॉंट्रॅक्टर स्वतः होवून जात असतील असे निदर्शनास आल्यास संबंधित विभागाच्या उपअभियंता यांना दोषी धरून त्यांचेवर कार्यवाही करावी.

**श्री.कंवरसिंग बैनाडे :** फत्तेसिंगपुरा / किराडपुरा येथील पाण्याच्या टाकीबाबत अद्यापही कार्यवाही झालेली नाही.

**कार्यकारी अभियंता :** येथील पाण्याच्या टाकीच्या कामाबदद्ल कोर्ट स्टे आलेला आहे . त्यामुळे काम थांबलेले आहे.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** इतिवृत्तातील पान क्र.१० वर विद्युत पुरवठा खंडीत झाल्यानंतर महानगरपालिकेतर्फे किती इमरजन्सी लॅम्प खरेदी करून संबंधित त्या विभागांना दिले याची माहिती विचारणा केली होती त्याबाबत काय झाले ?

**मा.सभापती :** उप अभियंता विद्युत यांनी माझ्याकडे लेखी खुलासा सादर केलेला आहे. (तो वाचून दाखविला ) त्याचप्रमाणे मी मागील बैठकीत सुचित केल्याप्रमाणे

मा. आयुक्त , उप आयुक्त व संबंधित पदाधिकारी यांचे दालनात लाईट बाबत एक युनिट बसविण्या बाबत सांगितले त्या प्रमाणे काय कार्यवाही केली.

**उप अभियंता(विद्युत) :** कार्यवाही चालू आहे.

**मा.सभापती :** या बाबत त्वरीत कार्यवाही करावी. तसेच महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्र येथेही ऑपरेशन थिएटर येथेही एक युनिट बसवावे व जकात नाका. येथेही आवश्यक बाब म्हणून बसविण्यांत यावे.

**श्री.हमीदउद्दीन ताबा :**पान क्र.१२ मध्ये समातनगर भागात अधिकृत टपरी बाबत काय कार्यवाही केली.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी पाहणी केलेली आहे.

**सौ.रजनी जोशी :** इतिवृत्तातील पान क्र.१० मध्ये असे विचारणा केली होती कि, महानगरपालिकेमध्ये रोजंदारीवर काम करणाऱ्या वाहन चालकांना रु.६५/- व लिपीकांना रू.२५/- प्रमाणे रोजंदारी प्रतिदिन दिली जाते ते नियमाप्रमाणे आहे काय ?

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**लेखाधिकारी -१:** सदरची संचिका माझ्याकडे अद्यापही आलेली नाही.

**डॉ.विजयकुमार मेहेर:** पेट्रोलवर चालणाऱ्या गाडया ऐवजी डिझेलवर चालणाऱ्या गाडयांचा उपयोग मनपाने करावा जेणे करून मनपाचा आर्थिक खर्च कमी होईल.

**मा.सभापती :** स.स.सुचित केल्यानुसार डिझेल गाडयांचा वापर जास्तीत जास्त प्रकारे करणे योग्य होईल माझी सुध्दा गाडी पेट्रोलची न ठेवता डिझेल गाडी ठेवावी अशी माझी इच्छा आहे.

**डॉ.विजयकुमार मेहेर:** आपल्याकडे गाडया दुरूस्ती साठी न करता बाहेरून करून घेतल्या जाते. ते योग्य नाही. यांत्रिक विभागात कर्मचारी वर्ग लायक नाहीत असे दिसून येते.

**मा.सभापती :** यांत्रिकी विभागाकडे मॅकेनिक्स आहेत. तरीही बाहेरून करून घेणे मनपाला परवरडणारे नाही. याबाबत यांत्रिकी विभागाने खुलासा करावा.

**यांत्रिकी सहा.:** यांत्रिकी विभागात ३ मॅकेनिकल कर्मचारी आहेत.

**भगवान घडामोडे :** पान क्र.१० मध्ये मनपातील कर्मचाऱ्यांचे सेवाभरती नियमाबाबत कार्यवाही केली याची माहिती घ्यावी.

**मा.सभापती :** लेखाधिकारी -१ यांन खर्चा बाबतचा हिशेब सांगावा.

**लेखाधिकारी -१:** मनपातील सेवाभरती नियमान्वये ७ वर्षाप्रमाणे लागू करावयाचे झाल्यास रू.२.८६ लाख मासिक खर्च येण्याची शक्यता आहे.

**मा.सभापती :** सेवाभरती नियम कधी पासून लागू करण्यांत आली आणि त्या प्रमाणे किती कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळाला व सेवाभरती सर्वानाच लागू आहे किंवा नाही याची माहिती दयावी.

**लेखाधिकारी -१:** मनपातील सेवाभरती नियम सन १९९४ ला मंजुर झालेले आहेत आणि त्याप्रमाणे कर्मचाऱ्यांचे सेवाभरती व पदोन्नती बाबत कार्यवाही होत असते. एकंदर १८४ मध्ये सर्वच कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळाला आहे.

**मा.सभापती :** आपणांस पदोन्नती देतांना कोणत्या नियमाचा निकष लावण्यांत आला , जर सेवा भरती नियम लागू करून पदोन्नती झाली असेल किंवा भरती झाली असेल तर हे नियम सर्वांना लागू होणार नाहीत काय ?

लखाधिकारी-१: सेवाभरती नियमांचे गाईड लाईन्स घेवूनच पदोन्नती मिळाली आहे.

**मा.सभापती :** सेवाभरती नियमांचे गाईड लाईन्स घेतले म्हणजे आपल्याला लागू झाली तर हेच नियम सर्व कर्मचाऱ्यांना लागू राहतील. म्हणजेचे शासनाने सन १९९४ ला मंजुर केलेला सेवाभरती नियमाच्या आधारे सर्व कर्मचाऱ्यांना पदोन्नती असो किंवा समय श्रेणी / वेतनश्रेणी याचा लाभ यात कर्मचाऱ्यांचे रूजू झाल्याचे तारखेपासून सात वर्षांनी अंखंडीत सेवा धरूनच लागू करावी. व सन १९९४ला सेवाभरती नियम मंजुर झालेले महानगरपालिकेतील काम करणाऱ्यांना याचा लाभ व्हावा म्हणून आज स्थायी समिती सात वर्षाचा सेवा ज्यांची झाली असेल त्यांना लागू करून उर्वरित थकबाकी रक्कम त्या त्या कर्मचाऱ्यांनी निघेल ती जी पी एफ मध्ये जमा करून त्यांना हप्त्या हप्त्याने रक्कम अदा करावी असे आदेश देण्यांत येते व मंजुर झालेले सेवाभरती नियमांचा झेरॉक्स प्रत सर्व स.स. न. देण्यांत यावी.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** मनपामध्ये जे कर्मचारी ३-४ वर्षापासून सतत काम करीत आहेत त्यांना कायम करण्याबाबत कार्यवाही व्हावी. असे काही चतुर्थ श्रेणी कर्मचारी आहेत कि, त्यांना ५००/- महिना पगार दिला जातो. हा पगार आज कर्मचाऱ्यांना पुरतो काय ? त्यापेक्षा त्यामध्ये आणखी वाढ करण्यांत यावी .

**मा.सभापती :** याबाबत अस्था-१ व २ यांना माहिती देण्याविषयी सुचना केलेल्या आहेत.

**डॉ.भागवत कराड :** पान क्र.९ मध्ये मनपाच्या विद्या पॅनेल बाबत सुचना केलेली होती त्या बाबत काय झाले याची माहिती दयावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी याची माहिती दयावी.

**उप आयुक्त -१:** विधी सल्लागार आज कार्यालयात उपस्थित नाही. त्यामुळे चर्चा करून माहिती देता येईल.

**मा.सभापती :** पुढील बैठकीत माहिती देण्यांत यावी.

**डॉ.भागवत कराड:** मागील बैठकीत हाच मुदद्‌ा उपस्थित केलेला होता तरीही आज माहिती प्राप्त झाली नाही.

**उप आयुक्त -१:** पुढील बैठकीत माहिती देण्यांत येईल.

**महादेव सुर्यवंशी :** पान क्र.२८ मध्ये विषय क्र.८३/२८ यामध्ये मो.संजयनगर, बायजीपूरा येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे बाबत ९२-९३ च्या दरसुचीनुसार रू. ९,१८,९०७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले होते. तेव्हा सदरील आकडयात बदल दिसून येतो. याबाबत माहिती दयावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांना माहिती दयावी.

**शहर अभियंता :** दुरूस्ती अंदाजपत्रक रू.२७,९९,०६७/- चे होते त्यास मान्यता दिलेली आहे.

**मा.सभापती :** १. मंजुर

२. त्याचप्रमाणे पान क्र. ३० वर विषय क्र.८५/३० बाबत अंदाजपत्रकाबाबत फरक आहे. तेव्हा डी.एस.आर. दर ९५-९६ नुसार कार्यवाही करावी.

३. पान क्र.७ वर शाळेला भेट देणे संबंधित कमीटी तयार झाली आहे. त्यासाठी सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यांत यावे.

४. पान क्र.४ वर इमारतीची उंची बाबत नगर रचना विभगाने कार्यवाही करावी.

५. पान क्र.२ मध्ये शहर सौंदर्यीकरण बाबतच्या संचिका संबंधित कमिटीकडे पाठविण्यात यावे.

६. पोस्ट ऑडीट/प्रिऑडीट बाबत संबंधित अधिकऱ्यांना खुलासा करावा.

**मुख्य लेखा परिक्षक:** हिमायत बाग ते पानचक्की पर्यंत जलनिस्सरण वाहिनी टाकण्यांचे उर्वरित कामासंदर्भात दोन वेळेस टेंडर रिकॉल करण्यांत आली होते. मुंबई येथील गुत्तेदारांने १००% जादा दराने तर औरंगाबाद येथील गुत्तेदाराने /०% जादा दराने काम करण्यांस सुचित केले आहे आणि संबंधित भागात काम करणे अवघड असलयाने एक गुत्तेदार श्री.राजा यांनी ४०% जादा दराने काम करण्यांस तयार झालेला आहे आणि सदरीलदर हे डि.एस.आर. ९२-९३ प्रमाणे होते आता सुधारित दराने मंजुरी देणे आवश्यक राहील.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** ४०% दरास आमची काहीच हरकत नाही. कारण त्याठिकाणी मेहनतीला वाव दयावा मटेरीयला देवू नये.

**मा.सभापती :** संबंधित ठिकाणी पाहणी करूनच काम करणे साईचे होईल.

**कार्यकारी अभियंता :** सदरील कामाचे अंदाजपत्रक ९४-९५ चे डी.एस.आर.प्रमाणे तयार केलेले होते. आता ९५-९६ चे दराप्रमाणे करणे आवश्यक राहील.

**मा.सभापती :** मुख्य लेखा परिक्षक यांनी आणि कार्यकारी अभियंता , पापू यांनी दिलेल्या माहितीनुसार प्रस्तावास मंजुरी दिली जाते.

**श्री.हमीदउद्यीन ताबा:** पान क्र.३ मध्ये इतिवृत्तात मनपाचे कर्मचारी मयत श्री.वाईकर यांचे जागी अनुकंपा धर्तीवर त्यांचे भावांस नियुक्ती दिली त्या बाबत माहिति द्यावी तसे करता येते का ?

**मा.सभापती :** मी मा. आयुक्त यांचेशी चर्चा केलेली आहे. यामध्ये उप आयुक्त -१ खुलासा करतील.

**उप आयुक्त -१:** अनुकंपा धर्तीवर मयत श्री.वाईकर यांचे जागी त्यांचे अविवाहित भाऊ यांना घेण्यांत यावे याबाबत मी प्राथमिक चौकशी केली असता शासनाचे २००४ चे जी.आर. प्रमाणे नियुक्ती करणे बरोबर नाही.

**मा.सभापती :** तर चौकशी करून नियुक्ती दिलेला निर्णय रदद् करण्यात यावा.

**डॉ.भागवत कराड :** शहरातील वेगवेगळया पाण्याच्या टाक्यांवर संपर्क वेळेवर साधण्यासाठी वॉकी टॉकी संदर्भात काय झाले याची माहिती दयावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकऱ्यांनी खुलासा करावा.

**उप आयुक्त -१:** अनुकंपा धर्तीवर मयत श्री.वाईकर यांचे जागी त्याचे अविवाहीत भाऊ यांना घेण्यांत यावे त्याबाबत मी प्राथमिक चौकशी केली असता शासनाचे सन १९९४ चे जी.आर.प्रमाणे नियुक्ती करणे बरोबर नाही.

**मा.सभापती** : तर चौकशी करून नियुक्ती दिलेला निर्णय रदद् करण्यांत यावा.

**डॉ.भागवत कराड :** शहरातील वेगवेगळया पाण्याच्या टाक्यांवर संपर्क वेळेवर साधण्यासाठी वॉकी टॉकी संदर्भात काय झाले याची माहिती दयावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता :** संबंधित एजन्सीशी संपर्क साधून माहिती देता येईल व १५ दिवसात कार्यवाही करता येईल.

**मा.सभापती :** लवकर संपर्क साधून कार्यवाही करावी.

**सुभाष टाकळकर :** एकाच शाळेत बरेचसे शिक्षक गेल्या १०-१२ वर्षापासून नोकरीवर आहेत. त्यांचे बदल्या संदभा्रत काय कार्यवाही केली.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे अशा शिक्षकांच्या बदल्या करण्यांचे निर्णय झालेला आहे. परंतू आज शाळा सुरू होवून दोन महिने लोटले तरी पुढील शैक्षणिक वर्षात करण्यांचे ठरवावे.

मा.सभापती : याबाबत त्वरीत कार्यवाही करावी. दुसरे असे कि, आपल्या महानगरपालिकेचे ८४ कोटीचे बजेट आहे. तर त्यामध्ये खर्च कशा प्रकारे केल्या जातो याची माहिती मुख्य लेखा परिक्षक व लेखाधिकारी -१ यांनी पुढील बैठकीत दयावी.

**श्री.गौतम खरात :** इमारत निरिक्षक श्री.कुरैशी यांचे बाबतीत आस्था -१ च्या बदली प्रकरणी संचिकेस मुस्लीम असे बाबत उच्चारले आहे ते योग्य नाही.

**मा.सभापती :** अशा प्रकरची वाक्य संचिकेत उल्लेखित करणे योग्य नाही.

**श्री.हमीदउद्यीन ताबा :** महानगरपालिकेच्या एक कर्मचारी त्याचा मुलगा मरण पावला त्यास महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत दयावी.

**मा.सभापती :** अशा प्रकारची मदत देता येते काय खुलासा करावा.

**लेखाधिकारी -१:** अंशदान शिर्षाखालील आर्थिक मदत देता येते.

**मा.सभापती :** महानगरपालिकेचे कर्मचारी असल्यास त्यांचे नातेवाईकांना आर्थिक मदत देता येते.

**श्री.हमीदउद्यीन ताबा** :दुपार ३.०० नंतर कार्यालय प्रमुख व त्यांचे कर्मचारी वर्ग कार्यालयात उपस्थित राहणे बाबत सुचना दयाव्यात जेणे करून दुपारनंतर स.स. चे कामे वेळेवर, होण्यास मदत होईल.

**मा.सभापती :** याबाबत प्रशासनाने आदेश काढलेले आहेत.

**श्री.गौतम खरात :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर केंद्राचे काम फार धिम्या गतीने चालू आहे. याचे कारण काय ?

**मा.सभापती :** या संदर्भात मी स्वतः भेट दिली आहे. तेथील स्लॅब गळत असून काम निकृष्ठ दर्जाचे आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांच्या पगारातून पैस कपात करण्यांत येतील.

## ऐन वेळचा विषय

१ शिक्षक श्री.जयवळ यांनी दिनांक ३०.७.९६ रोजी स्थायी समितीस दिलेल्या अर्जा नुसार स्थायी मिती असा निर्णय देते कि, शासकीय परिपत्रक सा.प्र./जी.सी.डी.आर./१३७९/७२/ दिनांक १९.४.१९७९ अन्वये विभागीय चौकशीचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत सहा महिन्यापेक्षा अधिक नसावा असे असतांना त्यापेक्षाही ज्यादा कालावधी झालेला असल्याने, प्रशासनाने सदरील प्रकरण प्रलंबित ठेवल्याने त्यांना निर्दोष सोडण्यांत येते.

**श्री.गौतम खरात :** श्री.जयवळ यांच्या बाबतीत चर्चा होवू दयावी. एकतर्फी निर्णय घेण्यांत येवू नये. प्रशासनाने त्यांचेवर काय चार्जेस लावलेले आहेत त्याची माहिती मागवा व त्यावर चर्चा करूनच निर्णय घेणे योग्य.

**मा.सभापती :** प्रशासनाने गेल्या २० महिन्यात श्री.जयवळ यांचे बाबतीत काही चौकशी केलेली नाही . त्यामुळे सदरील जी.आर. च्या आधारे त्यांना निर्देष सोंडण्यांत येते.

**श्री.गौतम खरात :** आपण एकतर्फी घेतलेला निर्णय आम्हास मान्य नाही. कोणत्याही प्रकारची चर्चा न करता निर्णय घेणे योग्य नाही.

**मा.सभापती :** आम्ही निर्णय घेतलेला आहे. आपणास अमान्य असल्यास मतदान घ्यावे.

**श्री.गौतम खरात :** एकतर्फी निर्णयाचा आम्ही निषेध करतो. प्रशासनाला त्यांची बाजू मांडू दया आणि स्थायी समिती समोर सर्व स.स. ना चर्चा करू दयावी नंतरच निर्णय घ्यावा. नसता आम्ही "सभात्याग" करतो.

**मा.सभापती :** एकदा निर्णय घेतला आहे. परत निर्णय फिरविणे योग्य वाटत नाही.

**श्री.गौतम खरात :** श्री.जयवळ यांचे बाबतीत चुकीचा निर्णय घेत असून सभापती असून सभापती पदाचा अवमान करून घेत आहात एकूण आम्ही निषेध म्हणून सभात्याग करीत आहोत.( वेळ अंदाजे ५.५५ वाजता)

**मा.सभापती :** मिटींग विभागातील कर्मचारी हे कार्यालयात जादा काम करतात त्यांना अतिरिक्त भत्ता देण्यांस मंजुरी देण्यांत येते.

३. स्वाध्याय या पुस्तकाचे ना नफा ना तोटा बाबत महानगरपालिके तर्फे जकात माफी देण्यांत येते.

४. स्थायी समिती स.स. श्री.डॉ.भागवत कराड, डॉ.विजयकुमार मेहेर, श्री.कंवरसिंग बैनाडे, अभिमन्यु भालेराव ,सुभाष टाकळकर , त्र्यंबक तुपे ,सौ.रजनी जोशी आदींसह नाशिक , ठाणे, वाशी इत्यादी महानगरपालिकेस भेट देवून जकात बाबत पाहणी करून त्याबाबतचा पाहणी अहवाल स्थायी सिमतीस दयावा व सदरच्या कमिटीस जाणे येणेचा खर्च शासकीय नियमाप्रमाणे देय अदा राहील, मागील इतिवृत्त दिनांक १२.७.९६ चे इतिवृत्त कायम करणे यासह मंजुरी देण्यांत येते.

**विषय :**

दिनांक १२.७.९६ रोजी संपन्न झालेलया स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

१. आरोग्य विभागामार्फत डास निर्मुलन पंधरवाडा दिनांक ५.८.९६ ते २०.८.९६ पर्यंत साजरा करावा.

२. ज्या अधिकाऱ्यांच्या घरी कर्मचारी कामावर आहेत त्यांचे बाबतीत उप आयुक्त चौकशी करतील.

३. सभेमध्ये पारित झालेल्या कोणत्याही ठरावाच्या अनुषंगाने नगर सचिवांकडे परिपूर्ण माहिती दयावी व नगर सचिवांनी ते प्रत्येक बैठकीस सादर करावे.

४. महानगरपालिका सेवाभरती नियमावली १९९४ नुसार शासनाने मंजुरी दिलेली ती थकबाकी त्यांना दोन किंवा तीन हप्त्यांत रकमेस न देता जी.पी. एफ. मध्ये जमा करून दयावे.

५. पान क्र.२८ मध्ये विषय क्र.८३/२८ मध्ये दुरूस्ती सुचविलेली आहे त्यास मंजुरी देण्यांत येते.

६. दिनांक ३०.५.९६ चे इतिवृत्त यपान क्र.३० मध्ये विषय क्र.८५/३० बाबत अंदाजपत्रकात फरक आहे तो डि.एस.आर. दर सन ९५-९६ नुसार कार्यवाही करावी.

७. दिनांक ३०.७.९६ चे इतिवृत्त यपान क्र.७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकाच्या शाळांना भेटी संदर्भात समिती नेतली त्या समितीस सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव शिफारस करण्यांत येते.

८. दिनांक ३०.७.९६ चे इतिवृत्त पान क्र.४ मध्ये इमारतीची उंची बाबत संबंधित नगर रचना विभागाने कार्यवाही करावी.

९. दिनांक ३०.७.९६ चे इतिवृत्त पान क्र.२ मध्ये शहर सौंदर्यीकरण बाबतच्या संचिका संबंधित कमिटीकडे पाठविण्यात यावे.

१०. विषय क्र.९९/४४ हिमायत बाग ते पानचक्की येथील जलनि:सारण वाहिनी टाकण्याचे कामासंदर्भात मुख्य लेखा परिक्षक व कार्यकारी अभियंता (पापू) यांनी दिलेल्या माहितीनुसार मंजुरी देण्यांत येते.

११. उप आयुक्त-१ यांनी चौकशी प्रमाणे कार्यवाही व्हावी.

१२. पांच वर्षापेक्षा जादा कालावधी ज्या शिक्षकंना एकाच ठिकाणी झालेला आहे तयांची ताबडतोब बदली प्रशासनाने करावी.

१३. शिक्षक श्री.जयवळ यांनी दिनांक ३०.७.९६ रोजी स्थायी समितीस दिलेल्या अर्जानुसार स्थायी समिती असा निर्णय देते कि, शासकीय परिपत्रक दिनांक १९.४.७९ नुसार विभागीय चौकशीचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत सहा महिन्यापेक्षा अधिक नसावा असे असतांना त्यापेक्षा ज्यादा कालावधी झालेला असल्याने प्रशासनाने सदरील प्रकरण प्रलंबित ठेवल्याने श्री.जयवळ यांचे वरील सव्र आरोपांबाबत त्यांना निर्दोष सोडण्यांत येते.

१४. मिटींग विभागातील जे कर्मचारी कार्यालयीन वेळे व्यतिरिक्त थांबुन कार्यालयीन काम करतात. त्यांना १०% अतिरिक्त भत्ता देण्यांत येत असे , हा रदद् करून जे कर्मचारी कार्यालयीन वेळेनंतर थांबुन काम येत असे , हा रदद् करून जे कर्मचारी कार्यालयीन वेळेनंतर थांबुन काम करत असे हा रदद् करून जे कर्मचारी कार्यालयीन वेळे नंतर थांबवुन काम करीतील त्यांनाच मुळ वेतनावर नियमानुसार अतिरिक्त भत्ता प्रदान करण्याची सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

यासह दिनांक १२.७.९६ रोजी संपन्न झालेलया स्थायी समितीच्या इतिवृत्त व दुरूस्त्यासह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२२/२:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, झोन क्र.१,२,३ मधील विविध चौकातील रूंदीकरण करण्यांत आलेल्या फायनिंगचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी मा. आयुक्त यांचे पुर्वसुचने नुसार सा.बा. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रू.२,६६,८००/- चे तयार करुन सदर काम तातडीचे असल्याने श्री.जी.एम.कटारिया यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेतले आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते सन ९६-९७ या लेखा शिर्षकातून अंतर्गत उपलब्ध तरतुदी मधून करण्यांत येईल. सदर कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.२,६६,८००/- च्या अंदाजपत्रकास व सदरील काम श्री.जी.एम.कटारिया यांचे कडून अंदाजपत्रकीय दराने करून घेणे बाबतचा कार्योत्तर प्रस्ताव स्थायी समितीच्या विचाराथ्र तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार झोन क्र.१,२,३ मधील विविध चौकातील रूंदीकरण करण्यांत आलेल्या फायनिंगचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेले रक्कम रू.२,६६,८००/- चे अदांपजत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते सन ९६-९७ या लेखा शिर्षाअंतर्गत उपलब्ध तरतुदी मधून करण्यांत व सदर काम तातडीचे असल्याने

श्री.जी.एम.कटारिया यांचेकडून अंदापजत्रकीय दराने करून घेण्यांत आल्यामुळे श्री. जी.एम.कटारिया यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२३/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, विभाग क्र.१,२,३ मध्ये मा. आयुक्त यांच्या पूर्वसूचने नुसार तातडीने करून घेण्यात आलेल्या पॅचवर्कच्या कामासाठी श्री. पी.एम.कटारिया यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने घेण्यात आलेल्या पूचवर्कच्या मटेरियलसाठी सा.बा. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रूपये रू.२,४८,१८०/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च रस्ते दखभाल व दुरूस्ती या लेखा शिर्षाकामध्ये उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यात येईल.
तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आले ते रक्कम रू.२,४८,१८०/-चे अंदाजपत्रक मंजुरी बाबत व सदरील कामासाठी घेण्यात आलेले मटेरियल अंदाजपत्रकीय दराने श्री.पी.एम.कटारिया यांचेकडून करून घेणे बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार विभाग क्र.१,२,३ मध्ये मा. आयुक्त यांच्यापुर्व सुचने नुसार तातडीने करून घेण्यांत आलेल्या पॅचवर्कच्या कामासाठी सा.बा. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यांत आलेले रक्कम रू.२,४८,१८०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरूस्ती या लेखा शिर्षकामध्ये उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यास व सदरील कामासाठी घेण्यांत आलेले मटेरियल श्री.पी.एम.कटारिया यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने खरेदी करणेंस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२४/४:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, मो.नवाबजानी गल्ली, मुर्गीनाला भागात शहाबाद फरशी व खांडकी बसविणे या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार अ.पं. रक्कम रू.१,८८,८५०/- चे तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरूस्ती या सन ९६-९७ या लेखा शिर्षका अंतर्गत उपलब्ध तरतुदी मधून करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले अ.पं. रक्कम रू.१,८८,८५०/- च्या मंजुरी बाबतच्या प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.नवाबजानी गल्ली, मुर्गीनाला भागात शहाबाद फरशी व खांडकी बसविणेच्या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यांत आलेले रक्कम रू. १,८८,८५०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरूस्ती या सन ९६-९७ या लेखा शिर्षका अंतर्गत उपलब्ध तरतुदी मधून करणेत सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२५/५:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि,मो.काझीवाडा भडकलगेट भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रू.३,४४,२००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते सन ९६-९७ या लेखा शिर्षका अंतर्गत उपलब्ध तरतुदी मधून करण्यात येईल.

तरी अंदाजपत्रक रू.३,४४,२००/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समीतीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.काझी वाडा भडकलगेट भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यांत आलेले रक्कम रू.३,४४,२००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च भांडवली रसते सन ९६-९७ या लेखा शिर्षका अंतर्गत उपलब्ध तरतुदीमधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र.१२६/६:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, मो.बारामुल्ला भागातील खांडकीची दुरूस्ती करणे या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दर सुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रू.१,९७,६००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते सन ९६-९७ या लेखा शिर्षकांअतर्गत उपलब्ध तरतुदी मधून करण्यात येईल.

तरी अंदाजपत्रक रक्कम रू.१,९७,६००/-चे मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो. बारापुल्ला भागातील खांडकीची दुरूस्ती करणेच्या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९६-९७ या लेखा शिर्शका अंतर्गत उपलब्ध तरतुदी मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२७/७:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, कुँवारफल्ली राजाबाजार भागात खांडकी व शहाबाद फरशी यांची दुरूस्ती करणे व नविन बसविणे या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रू.२,१७,४४२/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरूस्ती सन ९६-९७ या लेखा शिर्षकाअंतर्गत उपलब्ध तरतुदी मधून करण्यात येईल तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रू.२,१७,४४२/-च्या मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार कुँवारफल्ली राजाबाजार भागात खांडकी शहाबाद फरशी दुरूस्ती करणे व नविन बसविणेच्या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची

नुसार तयार करण्यात आलेले रक्कम रू.२,१७,४४२/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरूस्ती सन ९६-९७ या लेखा शिर्षकार्तंगत उपलब्ध तरतुदी मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२८/८:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, मो. लक्कडमंडी ,मोतीकारंजा आणि लोहार गल्ली भागात शहबाद फरशी बसविणे व खांडकीची दुरूस्ती करणे या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रू.१,८०,४५४/- चे तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरूस्ती सन ९६-९७ या लेखा शिर्षकाअंतर्गत उपलब्ध तरतुदी मधून करण्यात येणार आहे. तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले अ.पं.रक्कम रू.१,८०,४५४/- च्या मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.लक्कडमंडी मोतीकारंजा आणि लोहार गल्ली भागात शहाबाद फरशी बसवणे व खांडकीची दुरस्ती करणेच्या कामासाठी स.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यांत आलेले रक्कमरू१,८०,४५४/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरूस्ती सन ९६-९७ या लेखा अंतर्गत उपलब्ध तरतुदी मधून करणेस मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२९/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, धावणी मोहल्ला भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी मा. आयुक्त यांनी पुर्वसुचित केल्यानुसार सा. बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाज पत्रक रक्कम रू.३,५७,२००/- तयार करून सदर काम वरिष्ठांच्या आदेशानुसार कंत्राटदार श्री.पी.एम.कटारीया यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यांत आलेले आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते सन ९६-९७ या लेखा शिर्षकाअंतर्गत उपलब्ध तरतुद मधून करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रक्कम रू.३,५७,२००/- च्या मंजुरीबाबतचा तसेच सदर काम श्री.पी.एम.कटारीया यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेणे बाबत या प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे धावणी मोहल्ला भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल रक्कम रू.३,५७,२००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते सन ९६-९७ या लेखा शिर्षाकाअंतर्गत उपलब्ध तरतुदी मधून करणेस व सदर काम वरिष्ठांच्या आदेशानुसार कंत्राटदार श्री.पी.एम.कटारीया यांचे कडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यांत आल्यामुळे त्यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३०/१०:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, बायजीपूरा येथील मनपा सिमेंट गोडवून शेजारी स्टोअर रूम बांधणेच्या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ चे जिल्हा दर सुची नुसार रक्कम रू.१,२०,०००/- अंदाजपत्रक तयार करण्यांत आली असून मा. आयुक्तांनी दिनांक १२.६.९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सबब सदर कामासाठी रक्कम रू.१,२०,०००/- चे अदांजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

सदरचा खर्च व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षामधून सन ९६-९७ या वर्षात करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार बायजीपुरा येथील मनपा सिमेंट गोडाऊन शेजारी स्टोअर रूम बांधणेच्या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार तयार करण्यात आलेले रक्कम रू.१,२०,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षामधून सन ९६-९७ या वर्षात करणेस सर्वानुमते मुंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३१/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, मो.आरेफ कॉलनी येथे प्रा.शाळेच्या मोडकळीस आलेल्या व मोडलेल्या कुंपन भिंतीस दुरूस्त करणे व पुन्हा बांधणेच्या कामासाठी सा.बां. खात्यचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.१,६९,६४०/- चे अंदापजत्रक तयार करण्यांत आले असून त्यास मा. आयुक्तांनी दिनांक १०.६.९६ ला मंजुरी दिली आहे.

सबब सदर कामाचे रक्कम रू.१,६९,६४०/-चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर. सदरचा खर्च सन ९६-९७ या वर्षात विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षा ामधून करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो. आरेफ कॉलनी येथे प्रा. शाळेच्या मोडकळीस आलेल्या व मोडलेल्या कुपन भिंतीसव दुरूस्त करणे व पुन्हा बांधणेच्या कामासाठी सा.बां. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार तयार करण्यात आलेले र. रू.१,६९,६४०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च सन ९६-९७ या वर्षात मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३२/१९:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, मो. नारेगांव येथील प्रा. आरोग्य केंद्राच्या इमारती शेजारी बालवाडी बांधणेच्या कामासाठी सा.बा.खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.१,३५,३३०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास मा. आयुक्तांनी दिनांक २५.६.९६ ला मंजुरी दिलेली आहे.

सबब सदर कामासाठी रक्कम १,३५,३३०/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च ५% कामकुवत घटकासाठी कल्याणकारी योजना या शिर्षामधून सन ९६-९७ या वर्षात करण्यांत येईल.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.नारेगांव येथील प्रा. आरोग्य केंद्राच्या इमारती शेजारी बालवाडी बांधणेच्या कामासाठी सा.बा. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार रक्कम १,३५,३३०/- चे अदांजपत्रक तसेच सदरचा खर्च ५% कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजना येते .

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३३/१३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, सिध्दार्थ उद्या ान प्राणी संग्रहालय येथील मत्सालया करिता काचेच्या पेटया व इतर कामे करण्याकरीता स्थायी समिती ठराव क्र.२७७४८ दिनांक २१.२.९५ अन्वये र रू.४,९५,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. तसेच ठराव क्र.४३१/४ दिनांक १३.२.९६ अन्वये काम करणारी एजन्सीचे दरास मान्यता मिळालेली आहे परंतु सदर कामात वास्तुशास्त्रज्ञाच्या सल्ल्यानुसार काही बाबींची वाद झालेली आहे. त्यानुसार रक्कम रू.१,१९,५६०/- ची वाढ होत आहे. सदरील वाढीव बाबी मुळ अंदाजपत्रकात नसल्यामुळे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.६,१४,५६०/- चे झाले असून मा. आयुक्तांनी दिनांक २८.५.९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सबब सदरचे कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.६,१४,५६०/- चे झाले असून त्यास मा. आयुकतांनी दिनांक २८.५.९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सबब सदरचे कामांचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.६,१४,५६०/- ला तसेच वाढीव काम चालु वर्षाच्या दरसुची नुसार अंदपाजपत्रकीय दराने मुळ गुत्तेदार श्री. बारवाल आर.एल. यांचेकडून करून घेण्यांच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

प्राणी संग्रहालय विकसित करणे या लेखा शिर्षामधून करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालय येथील मत्सालय करीता काचेच्या पेटया व इयतर कामे करण्याकरीता सदर कामात वास्तु तज्ञांच्या सल्ल्यानुसार काही बाबींची वाढ झालेली असून वाढीव कामा बाबत तयार करण्यांत आलेले रक्कम रू.६,१४,५६०/- चे सुधारीत अंदाजपत्रकास तसेच वाढीव काम चालू वर्षाच्या दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय दराने मुळ गुत्तेदार, श्री.बारवाल आर.एल. यांचे कडून करून घेण्यात व सदरचा खर्च सन ९६-९७ या आर्थिक वर्षात प्राणी संग्रहालय विकसित करणे या लेखा शिर्षामधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३४/१४:**

मा.कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, झोन क्र.२ स्टेशन वार्ड क्र .१ मधील नाल्या / गटारींची देखभाल व दुरूस्ती कामाबाबत या कामासाठी रू.२,१३,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून ते सन ९४-९५ च्या परिसर अभियांयत्रिकी यांच्य दरसुचीनुसार आहे. सदरील काम हे देखभाल व दुरूस्ती ९६-९७ या

शिर्षकाअंतर्गत घेण्यात आलेले आहे. तरी उपरोक्त कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रू.२,१३,२००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार झाने क्र.२ स्टेशन वार्ड नं.१ मधील नाल्या / गटारींची देखभाल वसुली बाबतचे कामासाठी ९४-९५ च्या परिसर अभियांत्रिकी यांच्या दर सुची नुसार तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.२,१३,२००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम देखभाल व दुरूस्ती ९६-९७ या शिर्षकास अंतर्गत घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३५/१५:**

मा.कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, ड्रेनेज देखभाल दुरूस्ती अ झोन क्र.२ स्टेशन वार्ड क्र.१ कामाबाबत या कामासाठी रू.२,५०,४५०/- इतक्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून ते सन ९४-९५ च्या परिसर अभियांत्रिकी यांच्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेले आहे.सदरील काम हे देखभाल व दुरूस्ती ९६-९७ च्या शिर्षकाअंतर्गत घेण्यांत आलेले आहे.

तरी उपरोक्त कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु.५०,२५०/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळणे साठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

ठराव : प्रस्तावात दर्शविल्यानुसार ड्रेनेज देखभाल दुरूस्ती झाने क्र.२ स्टेशन वार्ड क्र.१ बाबतचे कामासाठी सन ९४-९५ च्या परिसर अभियांत्रिकी यांच्या दर सुचीनुसार

तयार करण्यांत आलेले रक्कम रूपये २,५०,४५०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम देखभाल व दुरूस्ती ९६-९७ च्या शिर्षकाअंतर्गत घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

नोट : ठराव क्र.१३६ आणि १३७ हे ठराव क्र. सभेच्या शेवटच्या पानावर वाचण्यांत यावे.

**विषय क्र.१३८/१८:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.तक्षशिल नगर स्लम येथे बॉक्स टाईप कल्व्हर्ट बांधणे बाबत कामाकरीता सा. बां. खाते यांच्या वर्ष ९४-९५ च्या दरसुची नुसार रू. १,०९,८१६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामे खडी रस्ते आणि कलव्हर्ट रू.४५.०० लाख शिर्षकामतून करण्यांत येईल.

सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दिनांक ६.७.९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

करिता सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रू.१,०९,८१६/- यांस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. तक्षशिल नगर स्लम येथे बॉक्स टाईप कलव्हर्ट बांधणेच्या कामासाठी सा.बां. खाते यांच्या वर्ष ९४-९५ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेले रक्कम रू.१,०९,८१६/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम खडी रस्ते आणि कलव्हर्ट रू.४५.०० लाख या शिर्षकातुन करण्यांतस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३९/१९:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, पाणी पुरवठा विभाग -१ अंतर्गत येणाऱ्या जलवाहिन्या दुरूस्ती व दैनंदिन किरकोळ कामासाठी लागणारे १०० व १५० मी.मी.व्यासाचे सी.आय.डी. जाईन्टस खरेदीसाठी स्थायी समिती ठराव क्र.९०/६ दिनांक ११.९.९५ नुसार मंजुरी देण्यात आली त्याप्रमाणे दोनदा निविदा मागविण्यात आली अंतिम निविदे मध्ये मे.सुरज इंटरप्रायजेस यांनी निविदा डी.एस.आर.९३-९४ चे दरानुसार एकूण रक्कम रू.१,०८,५००/- किंमतीवर ४१.९३% जास्त दराची आहे. परंतु ९५-९६ च्या डी.एस.आर. नुसार तुलनात्मकदृष्टया पाहिले असता सदर साहित्याची किंमत १,३८,५००/- एवढी होते. हया रक्कमेवर सुध्दा पुरवठा दराचे ११.३७% जास्त असल्यामुळे पुरवठा दरास सदर साहित्याचे दराच्या वाटाघाटीसाठी मा. आयुक्तां यांचे दालनात दिनांक ८.७.९६ रोजी वाटाघाटीसाठी बोलविण्यांत आले. वाटाघाटीअंती सदर साहित्य ९५-९६ चे डी.एस.आर.नुसार पुरवठा करण्याचे पुरवठादार मे.सुरज इंटरप्रायझेस यांनी मान्य केले.

तरी ९५-९६ चे डी.एस.आर. नुसार अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,३८,५००/- एवढयाचे मंजुरीस्तव व सदर साहित्य मे.सुरज इंटरप्रायझेस यांचे कडून खरेदी करणे विषयी मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार पाणी पुरवठा विभाग १ अंतर्गत येणाऱ्या जलवाहिन्या दुरूस्ती व दैनंदिन किरकोळ कामासाठी लागणारे १०० व १५० मी.मी. व्यासाचे सी.आय.डी.जाईन्टस खरेदी करणेसाठी ९५-९६ चे डी.एस.आर नुसार तयार करण्यांत आलेले रक्कम रू.१,३८,५००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर साहित्य पुरवठादार मे.सुरज इंटरप्रायजेस यांनी ९५-९६ चे डी.एस.आर. नुसार पुरवठा करणेस वाटाघाटी अंती मान्य केल्यामुळे मे. सुरज इंटरप्रायजेस यांचेकडून खरेदी करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषयक्र.१४०/२०:**

शहर अभियंता यानी प्रस्ताव सादर केला आहे कि, सिध्दार्थनगर येथे कच्च्या रस्त्यावर शहाबाद फरशी बसविणे कामा करिता रक्कम रू.१,६५,७००/- चे अंदापजत्रक सा.बा. विभाग औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ रोजी मान्यता दिली आहे. तसेच सदरील काम म्हाडा अनुदानामधुन करण्यांत येईल . प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो. सिध्दार्थनगर येथे कच्च्या रस्त्यावर शहाबाद फरशी बसविणे कामा करीता सा. बां. विभाग ,औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यांत आलेले रक्कम रू.१,६५,७००/-चे अंदाज पत्रकास तसेच सदरील काम म्हाडा अनुदाना मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४१/२१:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, सौ.रूख्मिणीबाई लोखंडे वार्ड क्र.१ भावसिंगपूरा मधील पडेंगाव येथे चामडी गोदाम बांधणेच्या कामासाठी प्रशासकीय ठराव क्र.२८ दिनांक १७.१.९५ अन्वये रक्कम रू.११,२०,१२८/- ला मान्यता मिळालेली असून सदर कामासाठी निविदा दिनांक २४.३.९६ ला मागविण्यात आली असून प्रशासकीय ठराव क्र.३३३ दिनांक २८.४.९५ अन्वये मे.खर्डीकर कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दराची निविदा (दराचे वाटाघारटीनुसार) मंजुरी प्राप्त झाली आहे. करारनामा व निविदा फॉर्म दिनांक ६.५.९६ ला मा. आयुक्तांकडे स्वाक्षरीस्तव सादर केला त्या वेळेस मा. आयुक्तांनी चर्चा करा असे आदेश देवून सदर कार्यवाही काही काळ थांबवावी असे आदेश देवून सदर कार्यवाही काही काळ थांबवावी असे आदेश दिनांक १०.५.९६ दिले. करिता स्थायी समिती ठराव क्र.१८९/२ दिनांक ४.११.९५ अन्वये किती लाभधारकांनी भुखंड व गोदामासाठी रक्कमेचा लाभांश भरणा केला यासाठी पत्रव्यवहार व संचिका अनामत रक्कमे बाबत पशुधन विकास अधिकारी यांचेकडे पाठवावी लागली त्यांचे अभिप्रायानंतर असे कळले कि, (९) लोकांनी भूखंड व भूखंडासह गोदामासाठी रक्कम रू.१,०२,०००/- भरणा केलेला आहे. ज्या लाभ धारकांनी पहिला हप्ता भरणा केलेला आहे अशा लाभ धारकांचे काम हाती घेण्यासाठी मा. आयुक्तांनी दिनांक ११.४.९६ रोजी आदेशित केलेले आहे. त्यानुसार मक्तेदारास कार्यालयाकडून कार्यादेश देण्यांत आला असता सदर कामाचे दर हे सन ९२-९३ चे असल्यामुळे व आजच्या ९५-९६ च्या दरसुची नुसार तुलना केल्यास रक्कम रू.१,२३,७१५/- ची वाढ होत आहे. त्यासाठी मक्तेदाराने कार्यालयात लेखी विनंती केली आहे कि, सध्या बाजारात मटेरियल, मजुर इ. ची वाढ झालेली आहे व त्यांना चालू दरसुची नुसार ९५-९६ अन्वये दर मिळणेसाठी चर्चा करून दिनांक ९.७.९६ ला वाढीव अंदाजपत्रकासह सुधारित अंदाजपत्रक रक्कम रू.१२,४३,९०३/- ला मंजुरी दिलेली आहे.

सबब सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक रक्कम रू.१२,४३,९०३/- ला तसेच सदर काम मुळ मक्तेदार यांचेकडून सन ९५-९६ च्या अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सदरचा खर्च सन ९६-९७ चामडी गोदाम या लेखा शिर्षकामधून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या नुसार सौ.रूख्मिणीबाई लोखंडे वार्ड क्र.१ भावसिंगपूरा मधील पडेंगाव येथे चामडी गोदाम बांधणेच्या कामासाठी ९५-९६ च्या चालु दरसुचीनुसार सदर कामाचे तयार करण्यात आलेले सुधारित रक्कम रू.१२,४३,९०३/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर काम मुळ मक्तेदार मे.खर्डीकर कन्स्ट्रक्शन यांचे कडून ९५-९६ च्या अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास व सदरचा खर्च ९६-९७ चामडी गोदाम या लेखाशिर्षामधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४२/२२ :**

मा.कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, झाने क्र.४ येथील ड्रनेज लाईनचे देखभाल व दुरूस्तीचे काम करणे या कामासाठी दिनांक ७.४.९५ रोजी निविदा मागविल्या असता सदरील कामाची निविदा ही श्री.आर.एस.भाटीया यांचे नावे मंजुर झाल्याने सदरीलकाम त्यांना देण्यांत आले होते. परंतु कामात दिरंगाई झाल्यामुळे त्यांना काळया यादीत टाकण्यांत आले होते व गुत्ता रद्य करण्यांत आला होता. त्यानंतर सदरील काम हे देखभाल व दुरूस्तीचे असल्याने अत्यंत तातडीचे काम करणे आवश्यक असते. त्यामुळे

कामाचे महत्व लक्षात घेता उपलब्ध गुत्तेदार श्री.सलिम अहेमद यांचे मार्फत अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याची मा. आयुक्तांची दिनांक ६.७.९६ रोजी मान्यता मिळाली आहे. सदरील काम हे देखभाल व दुरूस्ती ९५-९६ मधील आहे.

उपरोक्त कामाचे गुत्तेदार श्री.सलिम अहेमद यांचे उर्वरित काम रू.२,४६,९३३/- रक्कमेस उपलब्ध गुत्तेदार श्री.सलिम अहेमद यांच्या नावास मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार झोन क्र.४ मधील ड्रेनेज लाईनचे देखभाल व दुरूस्तीचे उर्वरित कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रू.२,४६,९३३/- चे अंदाजपत्रकीय दराने देखभाल व दुरूस्ती ९५-९६ मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४३/२३:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, एम.आय.डी.सी.सिडको येथील गरवारे स्टेडियमच्या इमारती करीता विद्युत पुरवठा करावयाचा असल्याने सदर कामासाठी सन ९५-९६ सा.बां. खात्याचे दर सुचीनुसार (विद्युत) अंदाजपत्रक रू.४,९६,०००/- चे तयार करण्यांत आलेले आहे.

तरी सदर कामासाठी खर्चाच्या अंदाजपत्रकीय रककम रू.४,९६,०००/- (इमारती विद्युतीकरण असल्याने) भांडवली खर्चातुन करण्यास प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एम.आय.डी.सी.सिडको येथील गरवारे स्टेडियमच्या इयमारती करीता विद्युत पुरवठा करावयाचा असल्याने सदर कामासाठी सन ९५-९६ सा.बां. खात्याचे दर सुचीनुसार (विद्युत) अंदाजपत्रक रू.४,९६,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च (इमारती विद्युतीरकण असल्याने) भांडवली खर्चातुन करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४४/२४:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, दादा कॉलनी येथे १५० व १०० मी मी. व्यासाची ए.सी. व सी.आय.जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी रक्कम रू.२,९५,४००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येवून बी-१ निविदा मागविण्यांत आल्या होत्या त्यास स्थायी समितीचा ठराव क्र.५५/४ दिनांक २९.८.९५ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे. सदर भागात खडक असल्यामुळे ब्रेकर लाईन खोदाई करावी लागत आहे. तसेच दत्तनगर पर्यंत जल वाहिनी वाढवावयाची आहे त्यासाठी सुधारित अंदाजपत्रक रक्कम रू.४,१८,०००/-एवढयाचे परिसर अभियांत्रिकी विभागाशी दरसुची सन ९२-९३ नुसार तयार करण्यात आले आहे.

तरी सदरील कामासाठी वाढीव अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,२२,६००/- यांस मंजुरी व सदरचे काम वरील ठरावा नुसार मंजुर झालेली निविदाधारक श्री.सलिम पटेल यांच्या तर्फे मंजुर दरामध्ये म्हणजेच अंदाजपत्रकीय दरानुसार काम करून घेण्यांच्या मंजुरीस्तव व प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार दादा कॉलनी येथे १५० व १०० मी मी. व्यासाची ए.सी. व सी.आय.जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी रक्कम रू.१,२२,६००/- चे वाढीव अंदाजपत्रकास तसेच सदरचे काम स्थायी समिती ठराव क्र.५५/४ दिनांक २९.८.९५ अन्वये मंजुरी मिळाल्यानुसार निविदाधारक श्री.सलिम पटेल यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४५/२५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, बायजीपुरा येथे महानगरपालिका नाका परिसरात ३० टनी वजनाचा वजन काटा बसविणे करीता फौंडेशन व एक खोली व इतर कामे करण्याकरीता सा. बां. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.१,५०,०००/-चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून मागविण्यात आलेल्या ३०टन वजन काटयासाठी उपरोक्त काम वजन काटा बसविण्या अगोदर करणे आवश्यक होते.त्यामुळे उपलब्ध गुत्तेदार श्री. एस.एन. नवाब यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने काम सुरू करनू घेण्यांत आले आहे. व त्यास मा.आयुक्तांनी स्थायी समितीच्या कार्योत्तर मान्यतेस्तव सादर करणेचे अटीवर दिनांक २८.५.९६ ला मान्यता दिली आहे. सबब सदर कामाचे रक्कम रू.१,५०,०००/- ला तसेच सदरील काम श्री.एस.ए.नवाब यांचे कडून अंदाजपत्रकीय दरावर करून घेण्यात आल्याचा प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार बायजीपुरा येथे महानगरपालिका नाका परिसरात ३० टनी वजनाचा वजन काटा बसविणे करिता फौंडेशन व एक खोली व इतर कामे करण्या करिता सा.बां. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार तयार करण्यात आलेले रक्कम रू.१,५०,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर काम उपलब्ध गुत्तेदार श्री.एस.ए.नवाब यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात आलेमुळे सदर प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४६/२६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, कैलासनगर स्मशानभूमी येथे बसण्यासाठी शेड बांधणे बाबत सदर कामाचे अंदाजपत्रक र.रू.७२,३००/- चे सा.बां. खात्याचे सन ९४-९५ च्या दरसुची अन्वये तयार करण्यात आले होते. सदर दर मा. आयुक्त यांच्या पुढे मंजुरीस्तव सादर करण्यात आले त्यावर मा. आयुक्त यांनी दराच्या वाटाघाटी केली त्यात श्री.सलिम पटेल यांनी अंदाजपत्रकीय दराने काम करण्याचे मान्य केले. त्या अनुषंगाने काम सुरू केले. काम चालू असतांना मा. आयुक्त यांनी पुर्वी ४०० चौ.फुट आकाराचे शेड बांधण्याच्या कामाची पाहणी केली.पाहणी अन्वये आदेशित केले कि, शेडची साईज वाढवावी त्या अनुषंगाने ४०० चौ.फुट हून ७५०.०० चौ.फुटाचे शेड तयार करण्यांत येत आहे. याकरिता सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यांत आले. यापुर्वीच्या अंदाजपत्रकापेक्षा ७०,१००/- जास्त झाले. अशी एकूण सुधारीत अंदाजपत्रक एकूण रू.१,४२,४००/- झाली आहे. सदर काम चालू असलेल्या गुत्तेदारामार्फत त्याच दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दरात

करून घेण्यास्तव सदर खर्च स्मशान भूमी (४०,००,०००) या तरतुदी मधून करण्यांत येणार आहे.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार कैलासनगर स्मशानभूमी येथे बसण्यासाठी शेड बांधणे बाबत सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रू.१,४२,४००/- चे सुधारीत अंदाजपत्रकास तसेच सदर काम गुत्तेदार श्री.सलिम पटेल यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास व सदर खर्च स्मशान भूमी (४०,००,०००) या तरतुदी मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४७/२७:**

ज्या झोपडपट्टी भागात आरोग्य केंद्र नाही अशा भागाकरीता एक फिरता दवाखाना सुरू करण्यात यावा असा प्रस्ताव आहे. यासाठी एक ॲम्ब्युलन्स खरेदी करावयाची आहे. सध्या विविध कंपन्यांच्या ॲम्ब्युलन्स उपलब्ध आहेत. वाहनाची मजबुती, स्पेअर पार्टची उपलब्धता व अब्युलन्स मधील व्यवस्था लक्षात घेता टाटा ४०७/३१ अम्ब्युलन्स खरेदी करणे योग्य होईल. त्यासाठी टाटा कंपनीचे स्थानिक अधिकृत विक्रेते मे.सतिश मोटर्स लि.औरंगाबाद यांचेकडून सरकारी रेट प्रमाणे दरपत्रक मागविण्यात आले.

१) टाटा-४०७/३१ ॲम्ब्युलन्स १ नग ५,१७,१८५/-
एकूण: ५,१७,१८५/-

वरील प्रमाणे एक ॲम्ब्युलन्स खरेदी करण्यासाठी रूपये ५,१७,१८५/- खर्च येतो हे दर जकात कर वगळून आहेत. तसेच वाहनाचा पुरवठा करतांना किंमत असेल त्या प्रमाणे रक्कम अदा करावी लागेल. फिरता दवाखाना सुरू करण्यासाठी रू.१०.००लाखाची वेगळी तरतुद आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार ज्या झोपडपट्टी भागात आरोग्य केंद्र नाही अशा भागांकरीता एक फिरता दवाखाना सुरू करण्यात यावा असा प्रस्ताव असल्याने यासाठी एक ॲम्ब्युलन्स खरेदी करणेसाठी येणाऱ्या ५,१७,१८५/- चे खर्चास तसेच सदर वाहनाची मजबुती, स्पेअर पार्टची उपलब्धता व ॲम्ब्युलन्स मधील आतील व्यवस्था लक्षात घेता टाटा-४०७/३१ ही ॲम्ब्युलन्स टाटा कंपनीचे स्थानिक अधिकृत विक्रते मे.सतिश मोटर्स ,लि, औरंगाबाद यांचेकडून सरकारी रेट प्रमाणे खरेदी करणेस सदर खर्च फिरता दवाखाना सुरू करण्यासाठी ठेवलेल्या रू.१०.०० लाखाचे तरतुदी मधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४८/२८ :**

शहरातील बऱ्याच भागात अरूंद रस्ते असल्यामुळे कचरा ट्रक आत पर्यत जावू शकत नाही. पर्यायाने सफाई कामगारांना घमेल्यामध्ये किंवा हातगाडीने कचरा भरून मुख्य रस्त्यावर आणावा लागतो. सध्या प्रायोगिक तत्वावर सहा झोन करीता लोडींग रिक्षा खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

लोडिंग रिक्षा पेट्रोल व डिझेलवर चालणाऱ्या उपलब्ध आहेत डिझेल रिक्षासाठी इंधनाचा होणारा खर्च कमी असला तरी दुरूस्ती खर्च जास्त आहे तसेच आवाज व हवेचे प्रदुषण जास्त होते. किंमत सुध्दा पेट्रोल रिक्षा पेक्षा खुपच जास्त आहे. करीता बजाज पिकअप व्हॅन खरेदी करणे योग्य होईल.

बजाज पिक अप व्हॅन ६ नग ४५,१७४ २,७१,०४४/-

एकूण २,७१,०४४/-

वरील प्रमाणे एकुण सहा पेट्रोल लोडिंग रिक्षा खरेदी करण्यासाठी रू.२,७१,०४४/- खर्च येतो. वाहनाची पुरवठा करतांना जी किंमत असेल त्याप्रमाणे रक्कम अदा करावी लागेल. रिक्षा खरेदी करीता रू.३.०० लाखाची तरतुद आहे प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहरातील बऱ्याच भागात अरूंद रस्ते असल्याने कचरा ट्रक आत पर्यंत जावू शकत नाही. त्या करीता प्रायोगिक तत्वावर सहा झोन करीता लोडिंग रिक्षा खरेदी करणेसाठी बजाज पिक अप व्हॅन खरेदी करणे योग्य असल्याने ६ नग पेट्रोल लोडिंग रिक्षा खरेदी करण्यासाठी रक्कम रू.२,७१,०४४/- चे खर्चास व रिक्षा खरेदी करीता रू.३.०० लाखाचे तरतुदीमधून सदर खर्च करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.१४९/१:**

मा.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, वार्ड क्र.७५ मो.प्रियदर्शनी इंदिरानगर येथील दगडी गटारीमध्ये फरशी बसविणे व गटारी रहदारीच्या ठिकाणी आर.सी.सी. स्लॅब टाकणे जरूरी असल्याने उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक सा.बा.विभागाचे दरसुची ९५-९६ नुसार अंदापजत्रक र.रू.२,४८,०००/- चे तयार करण्यांत आले असून सदरील काम सन ९६-९७ च्या "खुली गटार" बांधणे या शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीतून करण्यांत येईल. विचारार्थ सादर.

**मा.सभापती :** सदरील भाग स्लम असल्याने सदरील काम त्वरेने करावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.७५ मो.प्रियदर्शनीनगर येथील दगडीगटारी मध्ये फरशी बसविणे व गटारी रहदारी च्या ठिकाणी आर.सी.सी.स्लॅब टाकणे जरूरी असल्याने कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.२,४८,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५०/२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मा. महापौर निवासस्थानामध्ये दुरूती करणे व रंगकाम करणे बाबत रक्कम रूपये १,५०,०००/- चे अंदाजपत्रक सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असून सदर अंदापजत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दिनांक २४.४.९६ रोजी उपलब्ध गुत्तेदाराच्या नावासहित अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याची मान्यता दिलेली आहे. सदर काम तातडीचे असल्याने व या कालावधीमध्ये

निवडणूक आचारसंहिता चालू असल्याने सदर कामाकरीता निविदा न बोलाविल्यामुळे सदरील काम हे गुत्तेदार श्री.देवीदास जिवनलाल यांचे मार्फत अंदाजपत्रकीय दराने कार्यालयीन कार्यादेश जा.क्र./मनपा/उआ(इ)/३७५/९६ दिनांक २६.४.९६ अन्वये करून घेण्यांत आले आहे.

१ निवासस्थानाचे आतील रंगकाम घासून काढणे

२ किरकोळ प्लास्टरिंग करणे

३ हॉल ,बेडरूम आणि किचन करीता ऑईलपेंट करणे त्या आगोदर पी.ओ.पी.ने भिंतीची फिनिशिंग करणे.

४ हॉल बेडरूम व किचनला प्लॅस्टीक पेंट

५ उर्वरित खोल्यांना वॉशेबल ऑईलबॉड डिस्टेंपर करणे

६ दरवाजे खिडक्यांना ऑईल पेंट लावणे

७ सिलिंगला व्हाईट वारा लावणे

८ बाहेरून वॉटरप्रुफ सिमेंट पेंट करणे

९ बाथरूममध्ये फुटलेल्या रंगीत ग्लेझड टाईल्स बदलणे

१० दरवाजे खिडक्यांची किरकोळ दुरूस्ती करणे .

११ खिडक्यांचा फुटलेल्या काचा नविन बसविणे

१२ मुख्य दरवाज्याचे जुने शटर्स काढून त्याठिकाणी शटर्स बसविणे.

१३ बाथरूममध्ये शॉवर रोझ बसविणे.

१४ मेगनेटची किरकोळ दुरूस्ती करणे.

१५ हॉलमध्ये अॅल्यसुमिनियम दरवाजा बसविणे.

१६ मच्छरापासून बचाव होण्यासाठी खिडक्यांना जाळी बसविणे.

१७ खिडक्यांच्या काचांना गरवारे फिल्म बसविणे.

१८ दरवाज्याच्या हॉड्रॉलिक डोअर फ्फलोझर बसविणे. इत्यादी कामे करून घेण्यांत आलेली आहेत.

सबब सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये १,५०,०००/- ला तसेच सदरचे काम अंदापजत्रकीय दराने करून घेण्यांत आलेले आहे. त्याचे कार्योत्तर मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च इमारत दुरूस्ती व देखभाल या लेखा मधून सन ९६-९७ मध्ये करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा. महापौर निवासस्थाना मध्ये दुरूस्ती करणे व रंगकाम करणे बाबत क्र. १ ते १८ पर्यंत करण्यांत आलेल्या कामाचे अंदाजपत्रकीय र. रू. १,५०,०००/- च्या अंदापजत्रकास व उपलब्ध गुत्तेदार श्री.देविदास जिवनलाल यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यांत आलेल्या कामास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५१/३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, श्री.विकास जैन स.नगर सेवक यांचे वार्ड क्र.६४मधील बन्सीलालनगर प्राथमिक शाळेच्या पहिल्या मजल्यावर दोन खोल्या बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.३४७/६ दिनांक ६.१.९६ रक्कम रू.३,५४,२००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर काम हाती घेण्यासाठी

कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/६३/९६ दिनांक १९.२.९६ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (८) निविदा विक्री झाल्या निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (२) निविदा दर भरून प्राप्त झाल्या त्या दिनांक १४.३.९६ ला उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.निसार अहेमद | ०८% जास्त दराने |
| २ | श्री.सिध्दीकी एस.झेड | १५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा आठ टक्के जास्त दराची श्री.निस्सार अहेमद यांची निविदा आहे. सदरील दर जास्त वाटत असल्यामुळे संबंधितास दराचे वाटाघाटीस दिनांक १८.३.९६ पर्यंत बाोलवता आले नाही . दिनांक १९.३.९६ ला आचार संहिता असल्यामुळे मक्तेदारास वाटाघटीसाठी दिनांक ६.७.९६ चे मा. आयुक्तांचे आदेशान्वये वाटाघाटीस मा. आयुक्तांचे दालनांत बोलविण्यांत आले असता दिनांक ९.७.९६ ला दराचे वाटाघाटी होवून सदरील काम हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराऐवजी ४% जास्त दराने काम करण्यांस मक्तेदाराने कबुल केले आहे. व त्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. सबब सदर कामासाठी तुलनात्कदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा (८%) आठ टक्के जास्त ऐवजी दराचे वाटाघाटी नुसार ४% जास्त दराची श्री. निस्सर अहेमद यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ६४ मो.बन्सीलालनगर येथील प्राथमिक शाळेच्या पहिल्या मजल्यावर दाने खोल्या बांधणेच्या कामासाठी अंदाजपत्रकीय र.रू.३,५४,२००/- च्या अंदाजपत्रकास व तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे च ८% जास्त दराची निविदा यमा. आयुक्तांनी वाटाघाटी केल्यानुसार श्री.निस्ससार अहेमद यांची ८% ऐवजी ४% जास्त दराची निविदास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५२/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, मा.महापौर यांचे निवासस्थामध्ये रंगकाम व इतर दुरूस्ती करणे बाबत रक्कमरू१,५०,९००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. सदर काम तातडीचे असल्याने उपलब्ध मक्तेदार यांचेकून अंदाजपत्रकीय दराने काम करून घेण्याबाबत मा. आयुक्तांनी दनांक २४.४.९६ ला अंदाजपत्रकासह मान्यता दिलेली आहे. दरम्यान मा. महापौर साहेबांनी सदर ठकाणी आणखी नवीन कामे सुचवली ज्यामध्य मोकळया जागेत कॉकंटींग करणे, गॅरेजच्या बाजूस असलेल्या रोलींग शटर्सच्या जागी वटाची भिंत उचलून खिडकी बसविणे, फलोरींग अद्यावत करणे, ग्रॅनाईटचा किचन ओटा व सिंग बसवून क्लींमिंगची कामे करणे, मार्बल स्टोनचे देवघर तयार करणे, बेडरूम व प्रस्तावित (मिटींग हॉल (पुर्वीचे गॅरेज) ला फॉल्स सिलिंग करणे इ. बाबींसाठी र.रू.१,१७,०००/- चे स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे व सदरील काम हे भांडवली इमारत हया लेखा शिर्षा अंतर्गत प्रस्तावित करण्यांत आले आहे.

व सदर अंदाजपत्रकाच्या मुळ संचिकेवर मा. आयुक्त साहेब यांनी यापुर्वीचा प्रस्ताव व सदर प्रस्ताव एकत्रित करण्या बाबतचे अभिप्राय दिलेले आहेत. परंतु यापुर्वीचे अंदापजत्रक इमारत दुरूस्ती व देखभाल व लेखाशिर्षाअंतर्गत करण्यात आले आहे. व सदर काम हे भांडवली इमारती या लेखा शिर्षाअंतर्गत प्रस्तावित करण्यांत आले आहे. दोन्ही

कामाचे लेखाशिर्षक वेगवेगळे असल्यामुळे तसे करण्यांत आले आहे. सदर अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,१७,०००/- चे कामाची तातडी मा. महापौर यांनी दर्शविली असल्यामुळे उपलब्ध गुत्तेदार श्री.देविदास जिवनलाल यांचे मार्फत अंदाजपत्रकीय दराने सुरू करण्यांत आले आहे.

अंदाजपत्रक रक्कम रू.१,१७,०००/- मान्यतेस्तव सुरू केलेल्या कामास अंदाजपत्रकीय दराने श्री.देविदास जिवनलाल यांचे मार्फत पूर्ण करुन घेण्याच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा. महापौर यांच्या निवासस्थानामध्ये रंगकाम व इतर दुरूस्ती करणे बाबत र.रू.१,५०,९००/- चे तयार करण्यात आले होते परंतु सदरील काम भांडवली इमारती या लेखा शिर्षाअंतर्गत आणि मा. महापौर यांनी केलेली सूचना ची तातडीने काम सुरू करण्यात आले असून सदर कामाचे अंदाजपत्रक र.रू.१,१७,०००/- च्या अंदाजपत्रकास आणि उपलब्ध गुत्तेदार श्री.देविदास जिवनलाल यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५३/५:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, मोरेश्वर सोसायटी गारखेडा अंतर्गत रस्त्याचे रिमेटनिंग करणे व संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.२,८९,६५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च सन १९९६-९७ च्या भांडवली रस्ते या शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यात येईल. तरी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**मा.सभापती :** सदरील काम तातडीने करण्यांत यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.मोरेश्वर सोसायटी गारखेडा अंतर्गत रस्त्याचे रिमोलिंग करणे व संरक्षित भिंत बांधणे बाबतच्या कामाकरीता रक्कम रू.२,८९,६५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५४/६:**

समर्थनगर हया मंजुर रेखांनातील भुखंड क्र.२९१ चे पश्चिमेस नाल्यास लागून असलेल्या खुल्या जागेपैकी नाला ट्रेचिंगचे काम पूर्ण झाल्यानंतर जागेवर प्रत्यक्ष उपलब्ध असलेला १५ मी. x २४ मी. आकाराचा त्रिकोणी भूखंड भाडेपटट्यावर मिळावा म्हणून मराठवाडा इंन्सिटीटयुट फॉर ट्रेनिंग रिसर्च एज्युकेशन ॲन्ड एम्पॉलयमेंट (मैत्री) या संस्थेने मागणी केलेली आहे. सदर संस्था सध्या लगतच्या भुखंड क्र.२९१ मध्ये कार्यरत आहे.

नाल्यालगतच्या खुल्या जागेपैकी नाला ट्रेचिंगचे बांधकामानंतर नाल्यास गेलेल्या खुल्या जागेचे क्षेत्रामधून उर्वरित क्षेत्र जे १५.० मी.x २४.० मी. असे त्रिकोणी आहे. हया भुखंड क्र.२९१ ला लागून आहे. त्याचा इतर कोणत्याही कारणास्तव वापर करणे शक्य नसल्यामुळे व त्याचा अनाधिकृत वापर/गैरवापर टाकण्याच्या दृष्टीने तो भूखंड खुल्या

जागेचा भागां लगतच्या भूखंड क्र.२९१ मधील संस्थेस त्यांच्या मागणी संबंधाने खालील अटीवर देण्याच्या प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

१ भाडेपटट्यावर देण्यांत येणारे १८० चौ.मी. एवढे क्षेत्र संबंधित संस्थेने उद्यान म्हणून विकसीत करावी.

२ सदरील खुली जागा नेहमी करीता खुली ठेवावी त्यामध्ये कसलेही बांधकाम करू नये.

३ भाडेपटट्यावर देण्यात येणाऱ्या क्षेत्राचे १०% एवढे अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र लगतच्या भूखंड क्र.२९१ करीता वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक म्हणून वापर करण्यांत यावे.

४ सदर जागेच्या भाडेपटट्याचा दर रू.३३५०/- प्रति वर्ष असा राहील व सदरील दर दर पाच वर्षांनी सुधारीत करण्यांत येईल. आकारण्यात आलेले भाडे संबंधितांनी प्रतिवर्षी आगाऊ रक्कम म्हणून जमा करावी लागेल.

५ भाडेपटट्याचा कालावधी ३० (तीस) वर्षाचा राहील.

६ या शिवाय इतर नेहमीच्या अटी व शर्ती संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

यानंतर मा. सभापती यांचे सुचनेनुसार "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा सपंल्याचे जाहिर केले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समर्थनगर हया मंजुर रेखांकनामधील भुखंड क्र.२९१ चे पश्चिमेकडील नाल्यांचे लगतच्या खुल्या जागेपैकी नाला ट्रेनिंग काम पूर्ण झाले नंतर उर्वरित जागा १५ मी.x २४ मी. आकाराची भाडेपटट्यावर मराठवाडा इन्स्टिन्युट फॉर ट्रेनिंग रिसर्च एज्युकेशन ॲन्ड एम्प्लॉयमेंट (मैत्री) हया संस्थेस प्रस्तावामधील १ ते ६ अटींवर देण्याची मान्यता सर्वानुमते देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५५/७**

मा.कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, ड्रेनेज देखभाल दुरूस्ती क्र.२ स्टेशन वार्ड क्र.१ कामाबाबत या कामासाठी रू.२,५०,४५०/- इतक्याचे अं.प. तयार करण्यांत आले असून ते सन ९४-९५ च्या परिसर अभियांत्रिकी यांच्या दरसुची नुसार आहे. सदरील काम हे देखभाल दुरूस्ती ९६-९७ च्या शिर्षकांअंतर्गत घेण्यांत आले आहे.

तरी उपरोक्त कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रू.२,५०,४५०/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार ड्रेनेज देखभाल, दुरूस्ती झोन क्र.२ स्टेशन वार्ड क्र.१ कामा बाबत सन ९४-९५ च्या परिसर अभियांत्रिकी यांच्या दर सुचीनुसार देखभाल व दुरूस्ती ९६-९७ च्या शिर्षकांअंतर्गत घेण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरित/-
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

स्वाक्षरित/-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ९.८.९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. शुक्रवार दिनांक ९.८.९६ रोजी दुपारी ठिक ३.०० वाजता मा. सभापती स्थायी समिती श्री.गिरजाराम हाळनोर यांचे अध्यक्षते खाली स्थायी सभा संपन्न झाली. या सभेत स.सदस्य व अधिकारी उपस्थित होते.**

१ स.स.श्री. गौतम खरात
२ स.स.श्री.कंवरसिंग बैनाडे
३ स.स.सौ.रजनी जोशी
४ स.स.डॉ. भागवत कराड
५ स.स.कु. माया लाडवाणी
६ स.स.श्री.विजयकुमार मेहेर
७ स.स.श्री.महादेव सुर्यवंशी
८ स.स.श्री.हमीदउद्यीन ताबा
९ स.स.श्री.सुभाष टाकळकर
१० स.स.श्री.त्र्यंबक तुपे
११ स.स.श्री.अभिमन्यु भालेराव
१२ स.स.श्री.कचरू नवपुते
१३ स.स.श्री.विकास जैन

सभेची सुरवात "वंदे मातरम्" या गीताने झाली.

**श्री.कॅंवरसिंग बैनाडे :** मागील सभेतच इमरजन्सी नाईटची व्यवस्था करावयास संबंधित अधिकाऱ्यांना सुचविण्यांत आले होते तथापी अद्यापही कार्यवाही झालेली नाही.

**मा.सभापती :** मी स्वत: या संदर्भात सुचना केलेली होती. परंतु अजुनही व्यवस्था न होण्यास कारण काय ?

**उप अभियंता :** एकूण अंदाजपत्रक ८.३० लाखाचे होते व त्याप्रमाणे कोटेशन मागविण्यात आले असता संबंधित एजन्सीचे जादा दराचे कोटेशन प्राप्त झालेले आहे.

**मा.सभापती :** या संदर्भाने ताबडतोब व्यवस्था करण्यास सुचित केले होते. तरीही व्यवस्था झालेली नाही.

**उप अभियंता :** याच संदर्भाने कोटेशन मागविण्यात आलेले आहे.

**श्री.हमीदउद्यीन ताबा :** जर कोटेशन मागविण्यात आले तर फायनल न होण्याचे कारण काय ?

**मा.सभापती :** आपल्याकडे कोटेशन केव्हा आले व त्यानंतरही अंतिम मंजुरी घेवून पुढील कार्यवाही केली नाही.

**उप अभियंता :** आपल्याकडे ५.८.९६ ला कोटेशन प्राप्त झाले परंतु जादा दर असल्याने संबंधित एजन्सीला सुचना देणे आहे.

**मा.सभापती :** प्रशासनाने दिरंगाई करू नये अशा कामांमध्ये वेळ लक्षात घेणे आवश्यक आहे.

**श्री.हमीदउद्यीन ताबा :** आजही शहरात वऱ्याच भागात अंधाराचे साम्राज्य आहे. मागील बैठकीत सुध्दा या बाबत सुचना केलेल्या होत्या तथापि काहीही कार्यवाही झालेली नाही.

**मा.सभापती :** काय कार्यवाही केली संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती दयावी.

**उप अभियंता (विद्युत):** संबंधित एजन्सीजचे टेंडर आलेले आहे.व नविन टेंडरचे दराबाबत कंपनीला पाठविण्यांत आलेले आहे.

**मा.सभापती :** डायरेक्ट कंपनीकडूनच सर्वमाल विकत घ्यावा. जेणे करून संबंधित कपंनी इलेक्ट्रीक मालास काही प्रमाणात सुटही देवू शकेल व त्यामुळे महानगरपालिकेला फायदाही होईल. याची दक्षता घ्यावी.

**श्री.हमीदउद्यीन ताबा :** अजून किती कालावधी लागेल याची माहिती दयावी.

**मा.सभापती :** आपल्या विद्युत विभागातील भांडारात इलेक्ट्रिक सामानांची कशी स्थिती आहे. मिती बल्ब सध्या उपलब्ध आहेत इलेक्ट्रिक मटेरियल संपण्यापूर्वी आपण संबंधित एजन्सीज कडून किंवा डायरेक्ट कंपनी संपर्क साधून माल मागविणे आवश्यक असते. जेणे करून जनतेच्या पैशाची उधळपटट्ी होणार नाही.

**सौ.रजनी जोशी :** "सुंदर शहर स्वच्छ शहर " हे महानगरपालिकेचे ब्रिद वाक्य आहे परंतू एका कामामध्ये ४०.०० लाखाचा भ्रष्टाचार झाला या बाबतचा खुलासा स्थायी समितीस सादर झालेला नाही.

**मा.सभापती :** रू.४०.०० लाख महानगरपालिकेचे कामाचे संदर्भात खर्च झालेला आहे. तो भ्रष्टाचार नसून या कामाबाबत स्थायी समितीस माहिती दयावी.

**अति.शहर अभियंता :** ठिक आहे.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** रेल्वे स्टेशन रोडवर एन.एस.ई.बी.ला डी.पी. टाकणेसाठी महानगरपालिके तर्फे परवानगी कुणी दिली याची माहिती दयावी.

**उप अभियंता (विद्युत):** संबंधित स्थळा जवळील पोल हटवून रोड क्रॉसिंग होवू नये म्हणून त्या ठिकाणी डी.पी.बसविण्यात येत आहे.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** ज्या ठिकाणी एम.एस.इ.बी. तर्फे डी.पी. बसविण्यात येत आहे. ती जागा बरोबर नसून त्याठिकाणी रहदारी जास्तीची आहे. त्यामुळे दुर्घटना कधीही होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**मा.सभापती :** जरी एम.एस.ई.बी. डी.पी.बसवित असली तरी डी.पी.बसवावी कुठे याबाबतचा अधिकार व जागा ही महानगरपालिकेच्या मालकीची असते त्यामुळे नागरिकांना त्रास होणार नाही. याची काळजी घेणे आवश्यक आहे.

**श्री.विकास जैन :** मी संबधित वार्डचा नगरसेवक आहे. त्याठिकाणी नागरिकांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही.

**मा.सभापती :** ज्याठिकाणी डी.पी. बसविण्यांत येते. त्याठिकाणावरून रहदारी व त्यामुळे नागरिकांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** एवढया वेळेस रहदारीच्या वाढत्या व्यापामुळे खांबावरील तार एखादयास स्पर्श झाला तर मनुष्यहानी होवू शकते. त्यामुळे तेथील डि.पी. हलवून अन्य ठिकाणी बसविण्याची व्यवस्था करावी.

**मा.सभापती :** पद्मपूरा जवळील कोकणवाडीच्या चौकाच्या एका कोपऱ्यावर त्रिकोणी जागा आहे. त्या ठिकाणी महानगरपालिकेची जागा असल्यास तेथे डी.पी. बसविण्याची व्यवस्था करावी.

**श्री.कंवरसिंग बैनाडे :** संबंधित ठिकाणी डी.पी.टाकलेली हलविण्यांत येवू नये, कारण त्याच ठिकाणी एका वकीलाची हॉटेल आहे.

**श्री.विकास जैन :** त्या ठिकाणी रोड वाईडींग होत नाही. त्यामुळे तेथील डी.पी. हवलू नये.

**श्री.कंवरसिंग बैनाडे :** या ठिकाणचा रस्ता रूंदीकरणाबाबत काही आहे काय याची माहिती द्यावी.

**मा.सभापती :** या ठिकाणी प्रथमत: पाहणी करावी व महानगरपालिकेच्या मालकीची जागा असल्यासच इतर ठिकाणी डी.पी. बसवावी.

**श्री.कंवरसिंग बैनाडे :** त्या रस्त्यात हॉटेल येत असल्यास.

**मा.सभापती :** रस्ता रूंदीकरण करते वेळी हॉटेल वगैरे येत असल्यास नियमाप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**श्री.हमीदउद्यीन ताबा :** शिक्षक भरती बाबत मागील सभेत सुचित केले होते त्याप्रमाणे अद्यापही कार्यवाही झालेली दिसत नाही. दुसरे असे कि, जिल्हा परिषद कार्यालयीन शिक्षकांना महानगरपालिकेच्या सेवेत समावून घेवू नये तरीही माझ्या माहितीप्रमाणे सात आठ जिल्हा परिषदेतील शिक्षकांना आपण घेतले आहात याचे कारण काय ?

**मा.सभापती :** उप आयुक्त -१ यांनी खुलासा करावा.

**उप आयुक्त-१:** काही प्राथमिक शिक्षक यांची निवड झाली ते रूजू झालेले आहेत. शिक्षणाधिकारी सुटट्ीवर असल्याने थोडासा उशिर झालेला आहे. जिल्हा परिषदेमधून महानगरपालिकेकडे शिक्षक समावून घेवू नये असा ठराव झालेला होता. परंतु त्यावेळेस तेरा शिक्षकांच्या जागा रिक्त होत्या त्या वेळी महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे जिल्हा परिषदेकडून " ना हरकत प्रमाणपत्र" सुध्दा अनेकांनी घेतले होते. आणि म्हणून ४३ शिक्षकांना महानगरपालिकेचे सेवाभरती नियमाद्वारे सरळ सेवा वर्ग करावयाचे काही व ही शिक्षक भरती करीत असतांना ३५ जागा रिक्त असल्याने त्या जागांसाठी जाहिरात दिली व सेवा योजना कार्यालय तथा समाज कल्याण विभागाकडे यादी मागविण्यांत आलेली होती आणि त्या प्रमाणे शैक्षणिक पात्रता त्यात नमुद करण्यात आलेली होती आणि त्याप्रमाणे डी.एड.ची यादी प्राप्त झाल्यानंतर संबंधित उमेदावारांच्या लेखी व तोंडी परिक्षा घेण्यांत आल्या त्या गुणानुक्रमे व रोस्टर पध्दतीप्रमाणे उमेदवारांची निवड करण्यांत आलेली आहे.

**श्री.हमीदउद्यीन ताबा :** सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव असा मंजुर झाला होता की, कोणत्याही जिल्हा परिषदेतून महानगरपालिकेमध्ये शिक्षकांना सामावून घेवू नये.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** अशा प्रकारचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत पारित झालेला असतांनाही प्रशासनाने ही चूक का करावी जिल्हा परिषदेमधून शिक्षकांना न घेता नविन बेरोजगार युवक आहेत त्यांना पात्रतेनुसार घेणे आवश्यक होते.

**श्री.हमीदउद्यीन ताबा :** माझे या बाबतीत कुणीही नातेवाईक नाहीत. तरीही मी आज बोलत आहे कारण सर्वसाधारण सभेत मंजुर झालेला प्रस्ताव असतांनाही जिल्हा परिषद शिक्षकांना महानगरपालिकेत का समावून घेत नाही.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** जिल्हा परिषद येथील शिक्षक त्या ठिकाणी राजीनाम देवून महानगरपालिकेच्या सेवेत येतील तर त्या शिक्षकांची किती वर्षाची सेवा झालेली असेल ते शिक्षक अर्धवट नौकरी करून उर्वरित वयाचे

महानगरपालिकेत नोकरी करतील तर ते थोडया कालावधीत रिटायर होतील. त्यापेक्षा नवीन उमेदारांना संधी देणे योग्य व सर्वसाधारण सभेने पारीत केलेला कालावधीत डवलून प्रशासनाने अशी चूक का केली.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** जिल्हा परिषदेकडील शिक्षक नोकरीवर असतील परंतु डी.एड ची यादी मात्र सेवायोजन कार्यालय व समाजकल्याण विभाग यांचेकडून आलेले आहेत.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** जे शिक्षक जिल्हा परिषद येथे नोकरी करीत असतांनाही त्यांची सेवायोजन / समाजकल्याण कार्यालयाकडून यादीमध्ये नांवे आलेली आहेत अशा जिल्हा परिषद कार्यालयातील शिक्षकांवर क्रिमीनल केस करण्यात याव्यात ज्यामुळे त्यांनी शासनाची घोर फसवणूक केलेली आहे.

**श्री.हमीदउद्यीन ताबा :** सभेने पारित केलेल्या प्रस्तावाच्या विरूध्द निर्णय घेणे बरोबर नाही.

**मा.सभापती :** सर्वसाधारण सभेमध्ये जो निर्णय झालेला आहे तो मी वाचून दाखविला (प्रस्ताव व पारित झालेला ठराव दोन्हीही सभागृहात वाचून दाखविला.)

**उप आयुक्त-१:** प्रस्ताव मंजुर झालेला होता परंतु आपल्या नियमाप्रमाणे संबंधित सेवायोजन / समाजकल्याण कार्याल्याकडून यादी मागविलेली होती आज ही शासनाचे कोणतेही कर्मचारी / अधिकारी असोत ते त्यांचे भविष्य उजळविण्यासाठी प्रयत्न करतात. त्यामुळे शासनाने ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे कर्मचाऱ्यांना/ अधिकाऱ्यांना त्यांचे भविष्य घडविण्यासाठी कोणत्याही ठिकाणी प्रयत्न करून शकतात व त्यात त्यांना यश मिळाले तर ते अवश्य त्याचा फायदा घेवू शकतात. त्याप्रमाणे नियमान्वये आलेल्या उमेदवाराच्या लेखी व तोंडी मुलाखाती घेण्यात आलेल्या होत्या. नियमाप्रमाणे व गुणानुक्रमे जे पास झालेत त्यांना घेण्यात आलेले आहेत.

**श्री.कचरू नवपुते :** जिल्हा परिषद मधून मिी शिक्षकांना घेण्यांत आलेले आहेत.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** नविन भरती प्रमाणे त्यांना वेतनश्रेणी देणार काय ? त्यापेक्षा नविन उमेदवारांचीच निवड करणे योग्य होते.

**डॉ.भागवत कराड:** ज्या जिल्हा परिषद शिक्षकांची निवड महानगरपालिकेमध्ये झालेली आहे त्यांना अशा सूचना द्याव्यात कि, महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेमध्ये जिल्हा परिषदेच्या शिक्षकांनाच महानगरपिलेमध्ये घ्यावयाचे नाही असा प्रस्ताव मंजूूर झालेला आहे. तेव्हा आम्ही यावर सध्या विचार करू शकत नाही. असे कळविणे योग्य.

**मा.सभापती :** ठिक आहे.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुर झालेला होता व माझ्या मते त्या प्रस्तावातील ठरावात बदल झालेला दिसतो तेव्हा त्याची माहिती घ्यावी व जे जिल्हा परिषदेतील शिक्षक म्हणून कार्यरत असतांनाही सेवायोजन/ समाजकल्याण कार्यालयाकडून यादीत नावे आणतात व मुलाखती देतात अशा कर्मचारी वर्गांनी शासनास फसवणूक केली म्हणून नियमा प्रमाणे त्यांचेवर कार्यवाही करावी.

**श्री.हमीदउद्यीन ताबा :** मागील वेळेपासून जिल्हा परिषद शिक्षकांकडून भरतीसाठी रू.५० हजार काही कर्मचारी / अधिकारी यांनी घेवून ठेवलेली होते. त्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

**श्री.गौतम खरात :** ज्या शिक्षकांचे मुलाखती घेवून निवड केलेली आहे अशा जिल्हा परिषद शिक्षकांना आता डावलणे योग्य होणार नाही. कारण ते उद्याला कोर्टात जावू शकतील.

**मा.सभापती :** सर्वसाधारण सभेचा ठराव दिनांक २८.८.९५ ला झालेला ओ व हा प्रस्ताव सेवा वर्ग करण्याच्या प्रस्ताव होता. पंरतु ठराव असा केलला आहे कि, महानगरपालिकेने कार्यवाही करून शिक्षक भरती करावी असे आहे.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** माझ्या मते सदरील ठरावात शब्दांचा बदल झालेला दिसून येतो. आता एका वर्षाच्या कालावधी झालेला आहे. तेव्हा तो तपासून पहावा.

**मा.सभापती :** ज्यावेळी सदरील प्रस्ताव मंजुर झाला व दुसऱ्या बैठकीच्या वेळेत इतिवृत्त कायम होते त्यावेळी चुक दुरुस्ती का नाही केली?

**डॉ.भागवत कराड,डॉ.विजयकुमार मेहेर, श्री.हमीदउद्दीन ताबा :** जिल्हा परिषद कार्यरत असतांना त्या शिक्षकांनी महानगरपालिकेमध्ये एका बाँड पेपरवर करारनामा लिहून दिलेला आहे हा एक प्रकारे गुन्हा दिसून येतो, नियमाप्रमाणे कार्यवाही त्यांचेवर करण्यांत यावी.तसेच सेवायोजन / समाजकल्याण विभाग यांचेंवरही कार्यवाही करावी कि, अशा प्रकारे कार्यरत असलेल्या जिल्हा परिषद शिक्षकांना पुन्हा नोकर भरती बाबतचे यादीत नाव का पाठविले ?

**मा.सभापती :** ठिक आहे. परंतु महानगरपालिकेतर्फे नियमाप्रमाणे मुलाखती घेवून त्यांची निवड करून त्यांना बोलावणे बाबत पत्राने कळविले आहे.

**श्री.हमीदउद्दीन ताबा :** सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुर झालेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करावी. जर होत नसल्यास ते चूक आहे संबंधित शिक्षकांनी सर्वसाधारण सभेच्या ठरावास व महानगरपालिकेस धोका दिलेला आहे. तेव्हा आपल्या कर्मचारी / अधिकारी यांनी नियमाप्रमाणे कार्यवाही का नाही केली त्यास जबाबदार कोण याची तपासणी करावी.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** शिक्षकांच्या किती जागा उपलब्ध होत्या व किती लोकांना आदेश दिलेत याची माहिती दयावी.

**उप आयुक्त -१:** ज्यावेळी सर्वसाधारण सभेसाठी प्रस्ताव दाखल झाला होता. त्यावेळी शिक्षकांच्या तेरा जागा भरावयाच्या होत्या आता एकूण सदतीस (३७) जागा रिक्त होत्या. त्यापैकी मेरिट लिस्ट मधून निवड करण्यांत आलेल्या शिक्षकांपैकी दहा शिक्षक हे जिल्हा परिक्षदेत कार्यरत असलेले घेण्यांत आलेले आहेत.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** जिल्हा परिषदेतील शिक्षकांना महानगरपालिका सेवेत घेणे बाबातचा पुळका कोणास होता याची माहिती दयावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकऱ्यांनी खुलासा करावा.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** संबंधित अधिऱ्यांनी खुलासा करावा असे म्हणून त्यांचे जागी ते उभे राहीले.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी या बाबत खुलासा करीत आहेत आपण आपल्या जागी उभे न राहता खाली बसून घ्यावे. संबंधित अधिकाऱ्यांना मी विचार करतो कि, ज्या दहा जिल्हा परिषेदेतील शिक्षकांना घेण्यांत आले आहेत ते मेरिट लिस्ट प्रमाणे घेतलेले आहेत काय ? याची माहिती दयावी.

**उप आयुक्त -१:** ज्या दहा शिक्षकांना घेण्यांत आलेले आरहेत ते सर्व मेरिट लिस्ट प्रमाणे घेतलेले आहेत. दिनांक १७.१२.९५ रोजी एकूण २१६ उमेदवारांच्या परिक्षा घेतलेल्या आहेत.

**मा.सभापती :** स.स. दोनदा तीनदा सुचना देवूनही त्यांचे जागेवर उभेच आहेत ते योग्य वाटत नाही यासाठी ००.०५ मिनिट सभा तहकूब करण्यांत येते (अंदाजे वेळ ४.१० वा.)

(सभेला सुरूवात अंदाजे ४.२० वा.)

**डॉ.विजयकुमार मेहेर :** सर्वसाधारण सभेत झालेल्या ठरावाची कॅसेट वाजवून दाखवावे. सभागृहाची दिशाभूल होत आहे . शिक्षकांच्या भरती बाबत जो कर्मचारी / अधिकारी काम पाहात आहेत त्यांनी या कामी भ्रष्टाचार केलेला आहे. तेव्हा दोषी कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** स.स.च्या सुचनेप्रमाणे जर जिल्हा परिषदेतील दहा शिक्षकांना महापालिका सेवेत भरती करते वेळी ज्या कर्मचारी / अधिकारी यांनी जाणून बुजून डोळेझाक केलेली असेल तर अशा कर्मचाऱ्यांवर आवश्यक ती कार्यवाही करण्यांत येईल.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** मागील सर्वसाधारण सभेमध्ये जी संभाषण झालेली आहेत आणि त्या प्रमाणे निर्णय झालेला होता तो चुकीचा आहे असा निकष लागतो.

**डॉ.भागवत कराड :** जिल्हा परिषदेतील ज्या दहा शिक्षकांना महानगरपालिका सेवेत घेणेसाठी आदेश काढलेले असल्यास ते ताबडतोब थांबवावे.

**मा.सभापती :** ठिक आहे. प्रशासनाने याबाबत ताबडतोब कार्यवाही करून आदेश थांबवावे.

**उप आयुक्त -१:** संबंधित शिक्षकांचे आदेश काढण्यात आलेले आहेत. त्यापैकी काही शिक्षक जिल्हा परिषद सेवेतून राजीनामा देवून महानगरपालिकेकडे रूजू झाले आहेत. आणि त्यांना रूजू करून घेण्यात आलेले असून फक्त त्यांची पोस्टींग दयावयाचे बाकी राहीलेले आहे.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** असे किती शिक्षक जिल्हा परिषेदतील या ठिकाणी रूजू झालेले आहे ते महानगरपालिका सेवेत रूजू होण्यापुर्वी "शपथपत्रात " सविस्तर माहिती /लिहून दयावी, तसेच काही शिक्षकांनी लिहून दिलेले आहे.

**श्री.हमीदउद्यीन ताबा,डॉ.भागवत कराड :** यावरून असे लक्षात येते कि, जिल्हा परिषदेतील घेतलेल्या शिक्षकांकडून अगोदरच "शपथपत्र" लिहून घेतलेले दिसते व नंतर महानगरपालिकेत घ्यावयाचे वेळी फक्त रेकार्ड ठेवावयाची व नंतर काढून टाकायचे यावरून अशा संबधित कर्मचारी / अधिकारी यांचेवर महानगरपालिकेने कार्यवाही करावी.

**श्री.गौतम खरात :** त्यावेळी तेरा (१३) शिक्षक लोकांना घेणे बाबतचा प्रस्ताव प्रशासनाने ठेवलेला होता व दिनांक १७.१२.९५ ला २१६ उमेदवारांच्या परिक्षा घेतलेल्या होत्या. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली होती. परंतु सर्वसाधारण सभेत कधी ठराव झालेला होता याची माहिती दयावी.

**उप आयुक्त -१:** सर्वसाधारण सभेसाठी दिनांक १८.८.९५ ला प्रस्ताव मंजुर झालेला आहे.

**श्री.गौतम खरात :** दिनांक २८.८.९५ रोजी सर्वसाधारण सभेत शिक्षक भरती बाबत ठराव पास झाल्यानंतर सेवायोजन कार्यालय / समाज कल्याण कार्यालयाकडून उमेदारांची यादी कधी प्राप्त झाली.

**उप आयुक्त -१:** दिनांक २८.८.९५ च्या नंतर उमेदवारांची यादी प्राप्त झाली.

**श्री.गौतम खरात :** संबंधित शिक्षक जर जिल्हा परिषदेत नोकरीवर असून सुध्दा त्यांची नावांची यादी सेवा योजन / समाज कल्याण कार्यालया कडून प्राप्त झाली तर सेवा योजन समाज कल्याण कार्यालयाने यादी तपासणी न करता का पाठविली, म्हणून आपण काहीही करू शकत नाही. परंतु मेरिट लिस्ट

प्रमाणे ज्या दहा जिल्हा परिक्षदेतील शिक्षक लोकांना घेण्यांत आलेले आहेत, त्यापैकी काहीही जिल्हा परिषदेतील शिक्षक लोकांना घेण्यात आलेले आहेत.त्यापैकी काहींनी जिल्हा परिषदेत राजीनामा देवून महानगरपालिका सेवेत रूजू झालेले आहेत. त्यामुळे त्यांना दिलेले आदेश आपण थांबवू शकत नाही. जर अशी काही कार्यवाही केली तर उद्या ाला ते सर्व कोर्टात जाण्याची शक्यता आहे. ज्यावेळी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुर झालेला होता त्याचवेळी इतिवृत्त कायम करतेवेळी असे लक्षात आणून दयावयाचे होते कि, जिल्हा परिषदेतील शिक्षकांना महानगरपालिका सेवेत समावून न घेता नविन नियुक्ती नुसार यावयास तयार झाले असेले तरीही त्यांना महानगरपालिकेकडे घेण्यांत येवू नये. अशी दुरूस्ती करणे आवश्यक होते. तरीही याबाबत विधि सल्लागार याचां अभिप्राय मागवून कार्यवाही व्हावी. ज्या शिक्षकांची नियुक्ती झालेली आहे त्यांना आपण रूजू होण्यास थांबवू शकती नाही आणि ते लोकशाही मार्गाने योग्य नाही.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** जिल्हा परिषदेतील शिक्षकांना सरळ सेवेत महानगरपालिकेत भरती करू नये यास माझा आक्षेप आहे ज्या १० शिक्षकांना महानगरपालिकेत घेणेसाठी पात्र ठरविले आहे त्या कर्मचारी / अधिकाऱ्यांवर नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** ज्यावेळी सर्वसाधारण सभेत जिल्हा परिषदेतून महानगरपालिका सेवेत शिक्षक समावून न घेण्याबाबत प्रस्ताव मंजुर झालेला होता त्याचवेळी इतिवृत्त कायम करतेवेही अजून दुरूस्ती स.स.नी. करणे आवश्यक होते. ते झालेले नाही.

**श्री.हमीदउद्यीन ताबा :** सर्वसाधारण सभेतील त्या वेळेसची कॅसेट वाजवून पहावे.

**मा.सभापती :** ठिक आहे संबंधित बाबतीत मा. महापौरांच्या कक्षेतील बाब असल्याने त्यांना विचारणा करूनच त्या सर्वसाधारण सभेतील कॅसेट वाजवून पहावे.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** सर्वसाधारण सभेत १३ (तेरा) शिक्षकांच्या पदांना भरती करणे बाबतचा प्रस्ताव होता तो साफ फेटाळला गेला व जिल्हा परिषदेतील कोणतेही शिक्षक महानगरपालिका सेवेत वर्ग करावयाची नाही असे ठरलेले होते.परंतु कार्यालयाने पुढे नियमाप्रमाणे सेवायोजन कार्यालय व समाज कल्याण कार्यालयाकडून शैक्षणिक पात्रता बाबत उमेदवारांच्या यादया मागविल्या व त्या उमेदवारांच्या लेखी परिक्षा घेण्यांत येवून त्या परिक्षेत गुणानुक्रमे उमेदवारांच्या नवनियुक्तीचे आदेश नियमाप्रमाणे देण्यांत आलेत.

यामध्ये जिल्हा परिषदेतून तर काही इतर संस्थेमधूनही शिक्षक लोक आहेत. शासनाचे नियमाप्रमाणे कर्मचाऱ्यांच्या पुढील चांगल्या भविष्यासाठी जर इतर ठिकाणी नियुक्ती झालेली असेत तर त्यांना अगोदरच्या ठिकाणा वरून राजीनाम देवून नियुक्ती झालेल्या ठिकाणी रूजू होता येते. यामध्ये गैर काहीच नाही आणि ही कार्यवाही माझ्या मते महानगरपालिका कार्यालयाने केलेली आहे. जर ज्या ठिकाणी शिक्षक काम करीत होते त्या कार्यालयाने सेवायोजन कार्यालय किंवा समाज कल्याण कार्यालयास त्या कर्मचाऱ्यांचे नांव कळवावयास पाहिजे होते. परंतु तसे नसतांनाही ज्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती झाली त्यांनी "शपथपत्रात" लिहून दिलेले आहे.

**डॉ.भागवत कराडः** जिल्हा परिषदेतील शिक्षक महानगरपालिकेमध्ये नियुक्ती झालेल्यांच्या बाबतीत संबंधित कार्यालयास महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने ठरविल्यानुसार जि.पं. मधील शिक्षकांना घ्यावयाचा नाही असा ठराव पारित

झाल्याचे कळविणे योग्य राहील तयरीही याबाबत विधी सल्लागार यांचा खुलासा घ्यावा.

**श्री.कंवरसिंग बैनाडे ,हमीदउद्यीन ताबा :** सर्वसाधारण सभेने ठरविल्याप्रमाणे जिल्हा परिषद मधील शिक्षकांना घ्यावयाचे नाही. तरीही तेथील नोकरीवर असलेल्या शिक्षकांना महानगरपालिकेमध्ये नियुक्ती करून घेण्यात आले ते शिक्षक महानगरपालिकेत रूजू होतात हा नियमाप्रमाणे गुन्हा आहे.

**डॉ.विजयकुमार मेहेर:** सर्वसाधारण सभेने ठराव केलेला असूनही त्यात बदल झालेले आहे तर बदल कुणी केला काय ? याची माहिती घ्यावी. असे असतानांही शिक्षणाधिकारी यांची चुक झालेली दिसून येते.

**मा.सभापती :** सर्वसाधारण सभेत ठराव मंजुर झाल्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करावयास पाहिजे होती. ती केलेली नाही सभेने ठरल्याप्रमाणे त्या वेळेसची कॅसेट मा. महापौर यांचे परवानगीने ऐकून घ्यावे व काही बदल झाले आहे काय ते पहावे.

**डॉ.भागवत कराड:** कॅसेट ऐकतांना स्थायी समितीचे २-३ स.सदस्य यांनाही सोबत ठेवावे.

**श्री.हमीदउद्यीन ताबा :** जे शिक्षक नियुक्ती घेवून महानगरपालिकेत रूजू होत असतील त्यांना सध्या पोस्टींग देवू नये.

**उप आयुक्त -१:** सध्या जिल्हा परिषद शिक्षकांमधून ८(आठ) शिक्षक रूजू झालेले आहेत.

**श्री.हमीदउद्यीन ताबा :** संबंधित अधिकारी दिशाभूल करीत आहेत.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** स.स.श्री.हमीदउद्यीन ताबा वेळोवेळी बोलत आहेत की, महापालिकेने जिल्हा परिषद मधील घेतलेल्या शिक्षकांची भरती अयोग्य आहे. परंतु ते सर्व नियमाप्रमाणे करण्यांत आलेले आहेत.

**श्री.कंवरसिंग बैनाडे :** नविन शिक्षकांना घेणे आवश्यक होते. सध्या सुशिक्षीत बेरोजगार बरेच असतांनाही जिल्हा परिषद मधून शिक्षक घेणे अयोग्य आहे.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** आता याबाबतची चर्चा इथेच थांबविण्यात यावी.

**श्री.कचरू नवपुते :** चिकलठाणा व इतर आठवडी बाजाराचा कॉंट्रॅक्ट एक वर्षाचा आहे. तरीही संबंधित गुत्तेदार हे वाजवीपेक्षा जादा दराने बाजारातून पैसा वसूल करतात याबाबत संबंधितावर कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती :** या बाबत उप आयुक्त यांनी खुलसा करावा आणि या संदर्भात चौकशी करून संबंधित गुत्तेदारांवर नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री.कचरू नवपुते :** चिकलठाणा औद्योगिक क्षेत्रात अंदाजे ४१० कारखाने कार्यरत आहेत. परंतु त्यापैकी जवळपास २७८ कारखाने सध्या चालू असून बऱ्याचशा कारखानदारांकडे महानगरपालिकेच्या टॅक्स लाखो रूपयांनी थकीत आहे. ज्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. कित्येकांने कारखाने न्यायालयाचे मार्गाने जावून कोर्ट स्टे आणू पहातो. तेव्हा याबाबत महानगरपालिकेने कार्यवाही करून जवळपास २३ कारखान्यांचे २३,२५,२३७/- लाख रूपयांची थकीत वसूली करणे आवश्यक आहे.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** झोनकडे लक्ष दिले असता प्रॉपर्टी टॅक्सची जवळपास रू.३०.००कोटीची वसूली थकीत आहे. याबाबत झोनमधील टॅक्स इन्सपेक्टर व कर्मचाऱ्यांनी आवश्यक ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**श्री.कचरू नवपुते :** मी सांगितलेल्या माहितीनुसार जवळपास २३ कारखान्यांची टॅक्स वसुली फार मोठया प्रमाणात थकलेली आहे याबाबत काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

**मा.सभापती :** याबाबतची माहिती विधी सल्लागारांकडून घेण्यांत येईल. परंतु विधी सल्लागार कोर्टात गेलेले आहेत. मा. महापौरांचे निवडणूक विषयक कोर्ट केस असल्याने ते गैरहजर आहेत. पंरतु कारखान्यांकडे रू.३०.०० कोटीची थकबाकी आहे. तेव्हा याबाबत विधी सल्लागार यांनी महाराष्ट्र शासनाकडून गाईड लाईन्स मागवून नियमाप्रमाणे कार्यवाही करावी व कोर्ट केसेस प्रलंबित ठेवण्यापेक्षा खाजगी वाटाघाटीद्वारे काही प्रमाणात निर्णय लागू शकतात काय याची तपासणी करावी.

**श्री.कचरू नवपुते :** ज्या कारखान्याकडे टॅक्सची वसुली थकीत आहे त्यांचे बाबतीत झोन अधिकारी पैसे मागण्यासाठी कमी पडतात तेव्हा ४१० कारखान्यांच्या बाबतीत प्रशासनाने टॅक्ससाठी विशेष पथक तयार करावे.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** नियमाप्रमाणे टॅक्सच्या नोटीसा बजावून थकीत वसूल बाबत कार्यवाही जलद गतीने करावी. त्याशिवाय दहशत बसुच शकत नाही.

**मा.सभापती :** माजी आयुक्त यांनी याबाबत झोन अधिकारी व टॅक्स इन्स्पेक्टर यांचे वर अंकुश ठेवून टॅक्स बाबत बराच प्रयत्न केलेला आहे.

**श्री.कंवरसिंग बैनाडे :** क्रांती चौकाच्या बाजुला असलेली जागा लिजवर दिलेली होती परंतु २० वर्षानंतरही काहीही कार्यवाही केलेली नाही याची माहिती दयावी.

**मा.सभापती :** अशा शहरातील लहान-सहान जागांच्या बाबतीत महानगरपालिकेतर्फे त्वरीत कार्यवाही करावी.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** दै.देवगिरी तरूण भारत " या वृत्तपत्रात आलेल्या बातमीचा निषेध करतो.

**मा.सभापती :** दै.देवगिरी तरूण भारत " या वृत्तपत्राने महानगरपालिके बाबत बातमी छापली ती योग्य वाटत नाही. माझी एक विनंती आहे कि, बातमी पत्राबाबत वस्तुनिष्ठपणा असणे आवश्यक आहे. मी स्वतः दररोज सकाळी ५.३० पासून ते रात्री ८.०० ते ९.०० पर्यंत कार्यालयीन व जनतेच्या कामासाठी झटत असतो त्याचप्रमाणे अधिकारी काही सकाळी साइटवर असतात. व दुपारून कार्यालयात येतात. परंतु दुपारनंतरही त्यांना कुणीतरी पदाधिकारी अथवा मा. आयुक्त वगैरे कडे बोलविणे अथवा बैठका होत असतात. तशा वेळी त्याचेंकडून काही कामे त्यादिवशी होत नाही. मग जादा वेळ बसूनच व संबंधित गुत्तेदारांशी कामाविषयी चर्चा करूनच निर्णय घ्यावा लागतो. तेव्हा जादा वेळ कार्यालयात जनतेच्या कामासाठी बसणे हा गुन्हा आहे काय ? त्यामुळे संचिका जास्त कालावधी पर्यंत पडून राहू शकत नाही. वृत्तपत्राने वस्तुस्थितीला धरून बातमी द्यावी असे माझे मत आहे. त्यामुळे संबंधित "देवगिरी तरूण भारत " या वृत्तपत्राने माफी मागावी.

**डॉ.भागवत कराड :** संबंधित गुत्तेदार जर संबंधित अधिकाऱ्यांच्या समोर बसून राहत असतील तर ते योग्य नाही. त्यामुळे वर्तमानपत्रात आलेली बातमी योग्य आहे असे मला वाटते. याची चौकशी करावी.

**मा.सभापती :** गुत्तेदार व अधिकारी यांनी वेळेव्यतिरिक्त कामे करीत असतील तर कार्यालय सोडून कुठे करतील. अशा प्रकारची बातमी छापणे बरोबर नाही.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** त्याच प्रमाणे आजच्या नवा मराठा या वृत्तपत्रात आजच्या सभेची बातमी छापून आलेली आहे.

**श्री.हमीदउद्दीन ताबा :** सदरील वर्तमानपत्र हा सायं दैनिक आहे. त्यामुळे बातमी येणारच.

**मा.सभापती :** मागील बैठकीच्या वेळेस सुध्दा माजी शिक्षणाधिकारी यांचे बाबतीतले वृत्त छापून आलेले होते.

**कु.माया लाडवाणी :** कैलासनगर विद्युत दाहिनीचे बाबतीत काय झाले ?

**अति.शहर अभियंता :** या बाबतचे काम जोरदार चालू आहे.

**श्री.गौतम खरात :** काही गुत्तेदार जर दिलेल्या वेळेच्या आंत काम करीत नसतील तर त्यांना फाईन करावे. आतापर्यंत किती गुत्तेदारांना फाईन लावले आहेत.

**अति.शहर अभियंता :** बऱ्याच गुत्तेदारांना फाईन लावले आहेत. व बिले सुध्दा दिलेले नाहीत.

**मा.सभापती :** संबंधित गुत्तेदारास काम करण्याबाबतचा कालावधी कितीचा दिलेला होता.

**अति.शहर अभियंता :** संबंधितास दोन वर्षाचा कालावधी कामाचा होता. त्यामुळे त्यास फाईन लावण्यात आलेला आहे. दोन वर्षाच्या कालावधीत ते काम पूर्ण होईल. व अंतिम बिले देतांना फाईन कपात करून घेण्यात येईल.

**मा.सभापती :** अंतिम बिल देतांना संबंधित गुत्तेदाराचे फाईन केलेली वसुली करावी.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** जादा फाईन असल्यास काय करावे ?

**मा.सभापती :** रू.५० हजारांची वसुली करावयाची असल्यास अशा गुत्तेदारांना ब्लॅक लिस्ट मध्ये नांव टाकावे.

**श्री.हमीदउद्यीन ताबा:** इंदिरानगर येथील दगडी गटारीमध्ये फरशी बसविणे बाबतचा विषय क्र.१४९/१ पान क्र.३१, याची लघुनिविदा काढाव्यात.

**मा.सभापती :** १) विषय क्र.१४९/१ पान क्र.३१ च्या ठरवा संदर्भात लघुनिविदा काढुन काम त्वरेने करावे.

२) त्याच प्रमाणे विषय क्र.१५३/५ पान क्र.३४ मध्ये मोरश्वर सोसायटी गारखेडा येथील कामा बाबतही लघुनिविदा काढणेस मंजुरी देण्यांत येते.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** पान क्र.२२ विषय क्र.१३२/१२ बाबत x टेंडर काढून तातडीचे काम करावे.

**मा.सभापती :** टेंडर काढून नियमा प्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री.कंवरसिंग बैनाडे :** पान क्र.३ मध्ये सिडको एन -८ च्या दवाखान्यात डॉक्टर रोगांवर इलाज करू शकत नाही याबाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**आरोग्य वेद्यकीय अधिकारी :** दवाखान्यातील डॉक्टर हे एम.बी.बी.एस आहेत आणि गायनाकलॉजिस्ट आहेत. तरीही रोगांचे निराकरण करून शकतात. परंतु मागणी नुसार संबंधित रोगांचे डॉक्टर घेणे आवश्यक आहे.

**मा.सभापती :** एन-८ च्या दवाखान्यात किती डॉक्टर काम करतात.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** सिडको एन-८ च्या दवाखान्यात फिक्स पे वर डॉक्टर लावलेले आहेत. आपण आपल्या महानगरपालिकेतर्फे शासनाकडे मंजुरीस्तव प्रस्ताव पाठविलेला आहे. मंजुरी प्रस्तावाप्रमाणे डॉक्टर्स आहेत व बाकी फिक्स पे वर कार्यरत आहेत. सध्या एन-८ च्या दवाखान्यात ३ डॉक्टर्स कार्यरत आहेत.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** गॅस्ट्रोची लागण झालेल्या रूग्णंना ताबडतोब कार्यवाही व्हावयाची असते एम.बी.एस.डॉक्टरर्सना अशा रूग्णांना नाकरू नये.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** बरोबर आहे.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** गॅस्ट्रोचे रूग्ण दवाखान्यात आल्यानंतर त्यांचे निदान प्रथमोचार करून नंतरच इतर दवाखान्यात पाठवावे परंतु तसे न करता हाकलून लावणे योग्य नाही.

**आरोग्य वेद्यकीय अधिकारी :** आपण सुचित केंल्या प्रमाणे तसे करणे बरोबर नाही.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** गेल्या वेळेस आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी सभागृहात चूकीची माहिति दिली व दिशाभूल केली.

**मा.सभापती :** गॅस्ट्रो हा एक संसर्गजन्य रोग आहे, तेव्हा संबंधित डॉक्टरांनी निदान करणे आवश्यक आहे. आपण ट्रीटमेंट न देता ताबडतोब रूग्णाला हाकलून देणे बरोबर नाही. आणि जर अशा परिस्थितीत रूग्ण वाटेत मरण पावला तर त्यास जबाबदार कोण यासाठी डॉक्टरांनी काळजी घेणे आवश्यक आहे.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** आमच्याने निदान होत नाही घाटीच्या दवाखान्यात न्या असे बोलून रूग्णास हाकलून देणे त्यास जबाबदार कोण ?

**मा.सभापती :** प्राथमिक ट्रिटमेंट घेवून नंतरच इतर ठिकाणी पाठवावे.

**डॉ.भागवत कराड :** सिडको एन-८ च्या दवाखान्यात येणाऱ्या रूग्णांना अगोदर व्यवस्थित ट्रिटमेंट देवून नंतरच इतर ठिकाणी पाठवावे. अनेक भागांमध्ये दवाखाने नाहीत तेव्हा नविन दवाखाने उघडून ५-६ डॉक्टर्स नविन घ्यावेत.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** महानगरपालिकेचे डॉक्टर्स काहीही ट्रिटमेंट देत नाहीत.

**मा.सभापती :** मी सांगु इच्छितो कि, बरेसचे स.सदस्य दर वेळेस बोलतात की माझ्या वार्डात २५ खटांचा दवाखाना सुरू व्हावा परंतु तज्ञ डॉक्टर्स मिळणे आवश्यक आहे.

पान क्रमांक २ मध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी बोलतांना हे म्हणणे खोटे आहे अशी शब्द रचना केली तेव्हा या ऐवजी ते चूकीचे आहे असे म्हणावे.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी अशा प्रकारचे वक्त्यव्य करणे बरोबर नाही.

**डॉ.भागवत कराड :** पान क्र.१ मध्ये अनेक मृत व्यक्तींना श्रंध्दांजली वाहण्यात आली . त्या बाबतीत संबंधिताचे नातेवाईकास महापालिकेतर्फे संदेश पाठवावा.

**मा.सभापती :** ठिक आहे . संदेश पाठवावा.

**डॉ.भागवत कराड :** स्थायी समिती सभेचा अंजडा सर्व स.सदस्यांना द्यावे.

**मा.सभापती :** आवश्यकता नाही कारण स्थायी समितीचे १६ सदस्य हे ८२ सदस्यांचे प्रतिनिधीत्व करतात.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** इतिवृत्तातील पान क्र.४ वर काही अधिकाऱ्यांचे घरी कर्मचारी काम करतात या बाबतीत काय ?

**मा.सभापती :** याबाबत गोपनिय माहिती असून त्याचा चौकशी अहवाल प्राप्त होईल.

**डॉ.भागवत कराड :** मा.आयुक्त, उप आयुक्त तसेच वर्ग-१ चे अधिकारी यांचे निवासस्थायी कर्मचारी कामास ठेवू शकतात असा शासनाचा जी.आर.आहे.

**मा.सभापती :** जर शासनाचे जी.आर आधारे आपल्या महानगरपालिकेचे अधिकारी त्यांचे निवासस्थानी एक कर्मचारी द्यावे.

**डॉ.भागवत कराड :** त्याच प्रमाणे मा.महापौर/ उप महापौर व सभापती यांचे कडेही एक कर्मचारी द्यावा.

**मा.सभापती :** या बाबत मी सहमत नाही. सर्वसाधारण सभेत चर्चा करून निर्णय घ्यावा.

**डॉ.भागवत कराड :** पान क्र.५ मध्ये स्मशानजोगी बाबत काय कार्यवाही केली.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**श्री.गौतम खरात :** आस्था-२ या विभागाचे अधिकारी वेळोवेळी सुटट्रीवर असतात व त्याचां चार्ज कुणाकडेही दिलेला असतो . त्यामुळे कामे वेळेवर होत नाही.

**मा.सभापती :** ज्या ठिकाणी स्मशान भूमीत आवश्यक असलेल्या स्मशान जोगी कर्मचाऱ्यांची नेमणूक व्हावी व नव्याने सेवा भरती नियमा प्रमाणे कार्यवाही करावी.

**मा.आयुक्त -१:** स्मशानजोगी यांना मानधनावर काम देण्यांत येतात.

**श्री.कंवरसिंग बैनाडे :** एन-६ येथील स्मशानजोगी यांना रू.४५० मानधन देण्यांत येते तेव्हा त्यांच्यात वाढ करण्यांत यावी.

**श्री.कचरू नवपुते :** स्मशानजोगी हे त्या ठिकाणी मृत पावलेले नातेवाईक यांचेकडून पैसे घेतात त्यामुळे त्यांच्या मानधनात वाढ करू नये.

**श्री.विजयकुमार मेहेर :** जकात मधील हमाल यांना रू.३५/- प्रमाणे भत्ता मिळावा व रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांचे वेतनवाढ व्हावी.

**मा.सभापती:** नियमाप्रमाणे देण्यात येईल. त्याच प्रमाणे पान क्र.४ मध्ये डास निर्मुलन पंधरवाडया बाबत काय झाले.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** "डास निर्मुलन पंधरवाडा" ५ ऑगस्ट पासून सुरू करण्यांत आलेला आहे. शहरात विविध ठिकाणी जनजागरण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. दिनांक ११ ऑगस्ट रोजी वसंत भुवन येथे मा. ना.श्री.चंद्रकांतजी खैरे, पालक मंत्री यांच्या हस्ते जनजागरण शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. आणि त्यानुसार घरोघरी जावून माहिती देणे आवश्यक आहे याच प्रमाणे कार्य संपूर्ण पंधरवाडयात करण्यांत येणारे आहे डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ट्रिटमेंट करणार आहेत.

**मा.सभापती :** या प्रोग्राम बाबत स्लम भागात जावून माहिती देणे आवश्यक आहे.

**श्री.गौतम खरात :** सात आठ महिन्यापुर्वी एक इंटरनॅशनल व्यक्ती डासांच्या संदर्भात काय इलाज होतो याबाबत माहिती घेणेसाठी भेट दिली होती त्याबाबत काय झाले.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** आपण शहरात सर्वत्र फवारणी करतो, त्यामुळे प्रदुषण होते डासांच्या आळया पाण्यामध्ये साचतात आणि त्या आळयाद्वारे त्यांचे परिचय होतो अशा अनेक सुचना त्यांनी केलेल्या आहेत यावर इलाज करण्यासाठी औषधी फवारणी करणे आवश्यक आहे.

**श्री.गौतम खरात :** प्राथमिक स्टेजला डास होणार नाहीत याची कोणती काळजी घ्यावी.

**मा.सभापती :** या डास निर्मुलन पंधरवाडयात घेरोघरी जावून आरोग्य विभागाने योग्य ती काळजी घ्यावी तसेच जनजागरण मोहिमेद्वारे आणि वृत्तपत्रात जाहिरात देवूनही योग्य ती कार्यवाही करावी. त्यानंतरही या कार्यक्रमात ज्या काही स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था शैक्षणिक संस्था आणि कार्यकर्ते यांनाही सहभागी करून घेणे आवश्यक आहे.

**श्री.विजयकुमार मेहेर :** नुकतेच बाल सेविकांना या वर्षी प्रशिक्षण दिलेले आहे तेव्हा त्यांना घरोघरी जावून पाहणी करण्या बाबतचे सांगितल्यास बरे होईल.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** फॉगिंग मशिनचे काय झाले ?

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** सात आठ हजाराला मशिन आहे तरी मागविण्यांत येईल.

**मा.सभापती :** लागत असेल तर मागविण्यास हरकत नाही.

**श्री.कंवरसिंग बैनाडे :** प्रत्येक झोनला दोन दोन दिवस शिबिर आयोजित करावे. आणि त्या ंनंतर सिडको भागातही अधिक कालावधी द्यावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** होय प्रत्येक झोन ला दोन दोन दिवस .माहिती देणार आहेत.

**डॉ.भागवत कराड :** पान क्र.६ मध्ये क्रांतीचौक पुतळया जवळ लाईट नाही याबाबत काय कार्यवाही केली.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता (विद्युत):** सदरचे काम करण्यात आलेले आहे.

**श्री.कंवरसिंग बैनाडे :** शहरात विविध ठिकाणी चौकात पाण्याचे कारंजे आहेत ते नेहमी बंद असतात ते चालू असावेत.

**मा.सभापती :** संपुर्ण कारंजे दररोज चालू ठेवावेत.

**डॉ.भागवत कराड :** सतिष मोटर्स जवळील आयलँडच्या फोकस बंद आहे.

**उप अभियंता (विद्युत):** स्ट्रिट लाईट बंद असल्यास ते फोकस बंद असतो.

**मा.सभापती :** ज्या ज्या आयलँडचे ठिकाणी कारंजें आहेत त्या त्या ठिकाणी रंगित पाण्याचे कारंजे उडतील याची काळजी घ्यावी.

**अति.शहर अभियंता :** संबंधित ठिकाणी सोडीयम व्हेपरचे दिवे असल्याने अशा प्रकारचे रंग स्पष्टपणे दिसू शकत नाही.

**मा.सभापती :** जकात बाबतची पांच महिन्याची या ठिकाणी प्राप्त झालेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | एप्रिल | १९९५-९६ | २.२ कोटी |
| १९९६-९७ | | | २.५० कोटी |
| २ | मे | १९९५-९६ | २.२८ कोटी |
| १९९६-९७ | | | २.२८ कोटी |
| ३ | जून | १९९५-९६ | २.२३ कोटी |
| १९९६-९७ | | | २.४५ कोटी |
| ४ | जुलै | १९९५-९६ | २.७८ कोटी |
| १९९६-९७ | | | २.५७ कोटी |
| ५ | ऑगस्ट ८.८.१९९५ पर्यंत ६४,६६,९९६/- | | |
| १९९५-९६ | | | ६७,४३,६९५/- |

म्हणजे ९९,२७,९४८/- रूपयाची वाढ असून ८.१५ कोटी अधिकचे आहेत.

**डॉ.भागवत कराड :** शहराच्या टक्केवारी प्रमाणे जकातीचे उत्पन्न वाढणे आवश्यक आहे.

**मा.सभापती :** आणखी जाकत वाढविण्याच्या दृष्टीकोनातून वायरलेस घ्यावयाचे आहेत. जकात मधल्या पांच जिप्स लिलावात काढून नविन जिप्स घेण्यांत येणार आहेत.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** जकात नाक्यावर मोजमाप काटा विसविण्यात यावा. त्यामुळे आपले बरेचसे नुकसान होते. तेव्हा मोजमाप काटा बसवून लवकर सुरूवात करावी, त्यामुळे कमीत कमी रू.१५/- हजाराचा फरक दिसून येईल. कारण एका ट्रकचे रू.४०/- घ्यावे.

**श्री.सुभाष टाकळकर :** आता सभागृहात जी जकात बाबत माहिती वाटप केलेली आहे ती सर्व स. सदस्यांना देण्यांत यावयास पाहिजे होती ती दिली गेली नाही.

**मा.सभापती :** ठिक आहे. सभागृहात सर्व स. सदस्यांना माहिती दयावी.

**गौतम खरात :** जकातीचे वार्षिक उत्पन्न किती गेलेले आहे.

**लेखा अधिकारी :** एकूण ४६ कोटीचे आहे.

१ ९५-९६ मध्ये रू.३५ कोटी आणि रिवाईज रू.३२ कोटी आणि प्रत्यक्षात वसुली रू.३० कोटीची झालेली आहे.

२ ९६-९७ मध्ये रू.४६ कोटीची आहे.

**मा.सभापती :** आपण रू.८४ कोटीचे कोट ठेवलेले आहे, त्यमुळे रू.१० कोटी शासनाचे आणि ८ कोटी महाराष्ट्र डिस्टिलरीजचे असे मिळून गृहित धरलेले आहेत.

**गौतम खरात :** महापालिका अर्थसंकल्पाचा ९५-९६ चा आकडा म्हणूनच फुगलेला आहे.

**लेखाधिकाकारी -१:** शासनाकडे जकात कर वाढीचा प्रस्ताव पाठविलेला आहे.

**मा.सभापती :** शासनाकडे जकात वाढी बाबतचा प्रस्ताव पाठविलेला आहे, जर मंजुरी मिळाली तर अंदाजे १५ कोटींची वाढ अपेक्षित आहे आणि नाही मिळाली तर ४-५ कोटीचा फरक दिसणार आहे. महाराष्ट्र डिस्ट्रलरीजचे रू.१ कोटी यात नमुद केलेले आहे.

**श्री.गौतम खरात :** रू.४६ कोटी जकातीचे उदिष्ट आहे तर आता पर्यंत रू.१२ कोटी वसुली झाली तर उदिष्ट पुर्ण होणार काय ?

**लेखा अधिकारी -१:** रिव्हाईज अंदाजपत्रकाच्या वेळेस याबाबत विचार करण्यांत येईल.

**मा.सभापती :** पान क्र.६ मध्ये एम.एस.ई.बी. ने वायर ओढलेले नाहीत काय झाले.

**उप अभियंता (विद्युत):** या बाबत एम.एस.ई.बी. शी संपर्क साधलेला आहे आणि कार्यवाही चालू आहे.

**मा.सभापती :** सदरील पोलवर वायर ओढतेवेळेस स.सदस्यांना बोलवावे.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** असे मसजले कि, काही नागरिकांकडून पोल टाकून घेणंच्या संदर्भात रू.३३००/- प्रमाणे काही लोक घेत आहेत त्यामुळे नागरिकांची फसवणूक होत आहे.

**मा.सभापती :** या संदर्भात महापालिकेतर्फे वर्तमानपत्रात खुलासा छापून नागरिकांना माहिती देण्यांत येईल तसेच आरोग्य विभागातील पिरचारीका बाबत काय झाले.

**मा.उप आयुक्त-१:** परिचारीकांचे आदेश काढण्यांत येत आहेत.

**मा.सभापती :** संगणक कक्षात कॉम्प्युटर आहे परंतु कॉम्प्युटर प्रोंग्रामर नाहीत या बाबत काय कार्यवाही केली याची माहिती दयावी.

**मा.आयुक्त -१:** या बाबत कार्यवाही करण्यांत येईल.

**मा.सभापती :** कॉम्प्युटर प्रोग्रामर बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**अति.शहर अभियंता :** पोस्ट क्रियेट नसल्याने कार्यवाही करता येत नाही.

**श्री.हमीदउद्यीन ताबा :** संगणक कक्षात प्रोग्रामर बाबत आवश्यक तेवढया लवकर कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती:** ठिक आहे नियमाप्रमाणे कार्यवाही करून नविन उमेदवार घेवून कार्यवाही करावयाचे असल्यास तसे करावे.

**श्री.गौतम खरात :** शासनाने रू.१० कोटी दिलेले होते त्याबाबत काय झाले.

**मा.सभापती :** मा. आयुक्तांनी पत्राद्वारे विचारणा केलेली आहे. शासनाकडून मार्गदर्शन आल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करणे उचित ठरेल. त्याच प्रमाणे पान क्र.१० मध्ये (सभापती यांच्या वाक्यात) संबंधित पदाधिकारी असा शब्द आलेला आहे तो वगळण्यांत यतो आणि उप अभियंता (विद्युत) यांनी प्रत्येक दालनात बैठकीत सुचित केल्याप्रमाणे एक युनिट बसविण्यात यावेत.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** पान क्र.८ मध्ये अस्था-१ व २ मध्ये किती पदे रिकामे आहेत याची माहिती विचारणा केलेली होती.

**मा.सभापती :** स्थायी समितीने दिलेल्या निर्णयानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** पान क्र.८ मध्ये मुख्य लेखा परिक्षकांकडून ऑडिटची माहिती प्राप्त झालेली नाही.

**मुख्य लेखा परिक्षक :** तीन महिन्याचा अहवाल मा.सभापती यांचेकडे सादर केलेला आहे. आता १ ते १५ जुलै पर्यंतचा अहवाल पुढील बैठकीत सादर करण्यात येईल. तसेच पान क्र.०८ मध्ये शासनाकडे मंजुरीस्तव प्रस्ताव पाठविलेला आहे तसे नाही त्यात दुरूस्ती करावी.

**श्री.कंवरसिंग बैनाडे :** पान क्र.६ मध्ये मो.विद्यानगर ,विजयनगर येथील १२० फुटी रोड असतांनाही ३० फुट रोड लोकांनी अतिक्रमण करून घेतलेले आहेत. तेव्हा ८० फुट ऐवजी १२० फुट रोड अशी दुरूस्ती व्हावी.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** विद्यानगर बाबतीत तेथील जागेच्या संदर्भात लोकांनी संपूर्ण जागा घेतलेली आहे आणि काहींनी कोर्टात स्टे आणलेला आहे. याबाबत बसुन किंवा चर्चा करून महापालिकेने कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी त्या प्रमाणे गारखेडा येथील एका जागेचे (डिस्पूट) मध्ये होते त्या ठिकाणी प्रत्यक्षात जावून जामीन ताब्यात घेवून कार्यवाही करण्याचे सांगितले होते. तेव्हा अद्यापही कार्यवाही झालेली दिसत नाही. तेव्हा त्वरीत कार्यवाही प्रशासनाने करावी.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** वकिल पॅनल बाबत काय कार्यवाही केली.

**उप आयुक्त -१:** या बाबतचे निकष काय आहेत ही तपासणी करून संबंधित कमिटी ठरविल.

**श्री.कचरू नवपुते:** इमारत निरिक्षकांबाबत काय झाले ?

**मा.सभापती :** याबाबत त्वरीत कार्यवाही व्हावी. तसेच पान क्र.११ मध्ये वाहन चालकांना रू.६५ व लिपीकांना रू.५०/- प्रतिदिन पैसे दिले जातात असे आहे. त्या ऐवजी लिपीकांना रू.४०/- अशी दुरूस्ती व्हावी.

**श्री.हमीदउद्यीन ताबा :** समता नगर येथील टपरी बाबत काय झाले.

**मा.सभापती :** १) प्रशासकीय अधिकारी या बाबत पुढील बैठकीत माहिती देतील.

२) किराणा चावडी बाबतचा अहवाल सादर करावा.

३) पान क्र.१५ मध्ये श्री.जयवळ यांचे बाबतीत जो निर्णय झालेला आहे कि चौकशीचा कालावधी जो होता तो संपलेला आहे. तेव्हा त्यांना दिलेली शिक्षा नियमाप्रमाणे रद्य करावी व चौकशी खारीज करून केलेली शिक्षा रद्य करावी अशी दुरूस्ती करण्यात येते.

**श्री.गौतम खरात :** प्रशासनाने खुलासा करू द्या ावा असे माझे मत होते आणि त्यानंतरही राज्य शासनाकडे प्रशासन मुदतवाढ मागवू शकते.

**मा.सभापती :** स्थायी समिती ही सर्वोच्च आहे. समितीने घेतलेला निर्णय हा प्रशासनास बंधनकारक असून त्याप्रमाणे अंमलबजावणी करणे आवश्यक असते असा उच्च न्यायालयाचा निर्णय आहे.

**उप आयुक्त -१:** गेल्या वेळेस श्री.जयवळ यांचे बाबत निर्णय झालेला आहे त्यांचे बाबतीत प्रशासन असा खुलासा करते कि, श्री.जयवळ यांचे बाबतीत दिनांक २८.४.९४ ला चौकशी करण्या करीता मा. आयुक्त यांनी मान्यता दिली व दिनांक २८.४.९४ ला डॉ.देशपांडे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना चौकशी अधिकारी म्हणून दिनांक १.८.९४ ज्ञापन देवून त्यांचेवर चार्जेस लावण्यांत आले व दिनांक १.८.९४ ला शिक्षणाधिकारी श्री.पंडीत यांची सादरकर्ता

अधिकारी म्हणून नियुक्ती केली व चौकशीचा संपूर्ण अहवाल दिनांक २८.११.९४ ला मा. आयुक्त यांना सादर केला त्यात १) पदावन्नत २) दक्षतारोध रद्य करणे व ३) भविष्यात कधीही अधिकारी पद किंवा वरिष्ठ पदावर न घेणे अशी शिक्षा दिलेली आहे.

**मा.सभापती :** श्री.जयवळ यांच्या चौकशीचा कालावधी किती होता.

**मा.आयुक्त-१:** श्री. जयवळ यांना दिनांक ८.२.९६ ला आदेश दिले, त्यांना कळविण्यांस विलंब लागला कारण त्यांचेवर जे आरोप होते ते फार गंभीर स्वरूपाचे होते. तरीही स्थायी समिती मध्ये मा.सभापती यांनी श्री.जयवळ यांची शिक्षा रद्य केलेली आहे ती निर्दोष न करता कमी करावी.

**मा.सभापती :** श्री.जयवळ यांचे विरूध्दचा विभागीय चौकशी कालावधी जास्तीचा होता व शासनाच्या जी.आर.प्रमाणे कालावधी सहा महिन्याच्या वर लागला तर संबंधित चौकशी रद्य समजण्यात यावी. त्यानुसार समितीचा निर्णय घेतलेला आहे. (शासनाचा जी.आर. वाचून दाखविल) यानंतरही अशी अनेक प्रकरणे कर्मचाऱ्यांवर अन्याय झाल्याचे अपील स्थायी समितीकडे आलेले आहेत. जर प्रशासनाने अशाच चुका पुन्हा केल्या तर स्थायी समिती कर्मचाऱ्यांच्या बाजुने निर्णय होईल.

**श्री.गौतम खरात:** मागील बैठकीत मी विचारणा केलेली होती कि, प्रशासनाची बाजू ऐकून घ्यावे.

**मा.सभापती :** प्रशासनाने जादा कालावधी लावलेला आहे त्यामुळे बाजु ऐकण्याचा प्रश्नच येत नाही.

**श्री.हमीदउद्दीन ताबा :** प्रशासनात अशा काही अधिकाऱ्यांकडे एखादी चौकशी दिली नाते त्यांचीच चौकशी इतरांकडे चालू असते ही बाब योग्य वाटत नाही.

**उप आयुक्त -१:** हे अधिकार मा. आयुक्त यांचे आहेत. मात्र काय झाले याची कल्पना नाही.

**मा.सभापती :** ज्या कर्मचारी अधिकाऱ्यांची चौकशी चालू असते. तेव्हा पुन्हा त्यांचेकडेच इतरांची चौकशी करण्यांत येवू नये.

**डॉ.भागवत कराड :** ज्या कर्मचारी /अधिकाऱ्यांची चौकशी चालू आहेत त्यांचे बाबतीत लवकरात लवकर निर्णय घ्यावा.

**मा.सभापती :** प्रशासनाने या बाबतीत अशा प्रलंबित प्रकरणी त्वरीत कार्यवाही करावी व अस्था-१ व २ यांचेकडे मी पत्राने कळविले आहे कि, ज्यांची चौकशी चालू आहे व ज्यांनी समितीकडे अपिल केले आहे त्यांच्या संचिका माझ्याकडे पाठवाव्यात.

**सौ.रजनी जोशी :** पान क्र.१६ मध्ये नाशिक ठाणे व वाशि येथील महापालिकेस स्थायी समितीचे स.सदस्य भेट देणार आहेत. त्यामध्ये कु.माया लाडवाणी यांनाही घ्यावे.

**मा.सभापती :** ठिक आहे.

**श्री.हमीद ताबा :** महापौर निवासस्थानी जो कामाचा खर्च दाखविलेला आहे तो अगोदर स्थायी समितीत मंजुरी न घेता अगोदर काम करून नंतर मंजुरीस्तव आला ही बाब योग्य वाटत नाही आणि एकंदरीत झालेला खर्चही मोठा वाटतो. प्रत्येक वर्षी अशा प्रकरचा खर्च होतो ते बरे नाही.

**मा.सभापती :** त्यावेळी मा.महापौरांना हाहावयास जावयाचे असल्याने सदरच्या कामाचा खर्च करणे भाग पडले आणि त्यामुळेच या खर्चास मंजुरी दिलेली आहे.

१) कोणत्याही प्रस्तावात ज्या भागातील काम असेल त्या ठिकाणी स.सदस्यांचे नावाचा उल्लेख करू नये.

२) मालमत्ता अधिकारी यांची प्रशासकीय कामगिरी योग्य वाटत नाही . त्याची इयतर ठिकाणी बदली करण्यांत यावी. त्यांना संत एकनाथ रंग मंदिर / सुपर मार्केट/ क्रांतीचौक येथील भाडयाने देणे बाबत अनेकदा सांगुनही त्यांना समजु शकले नाही आणि त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.तेव्हा त्याची इतरत्र बदली करण्यांत यावी.

३) विषय क्र.४ मध्ये मो.मोगलपुरा ऐवजी बारापुल्ला असे असावे.

**श्री.गौतम खरात :** संबंधित अधिकाऱ्यांना कामा बाबत अगोदर विचारणा करावी.

**मा.सभापती :** या बाबत मी अनेकदा सुचना केलेल्या आहेत.

**विषय १५५/१ :**

दिनांक ३०.७.९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

१) जिल्हा परिषदेतील ज्या दहा शिक्षकांच्या नव्याने नियुक्ती देण्यांत आलेली आहे त्यांची पोस्टींग देण्यांत येवू नये.

२) विषय क्र.१४९/१ या बाबतची लघु निविदा काढून काम त्वरेने करावे.

३) विषय क्र.१३२/१२ टेंडर काढून तातडीने काम करावे.

४) पान क्र.२ मध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खोटे आहे असे वक्तव्य बोलतांना केले त्या ऐवजी चुकीचे आहे असे वाचावे.

५) सभागृहात मृत व्यक्तींना श्रध्दांजली वाहण्यात येते त्यांच्या नातेवाईकास संदेश पाठवावा.

६) पान क्र.१० मध्ये मा.सभापती यांच्या वाक्यात संबंधित पदाधिकारी असा उल्लेख आहे तो वगळण्यात येतो.

७) पान क्र.८ मध्ये शासनाकडे प्रस्ताव मंजुरीस्तव पाठविण्यात आल यामध्ये दुरूस्ती करण्यांत येते.

८) श्री.जयवळ यांची चौकशी खारिज करून केलेी शिक्षा रद्य करण्यांत येते अशी दुरूस्ती करण्यांत येते.

९) नाशिक ,ठाणे व वाशी येथिे पाहणी दौऱ्यात स.सदस्य कु.माया लाडवाणी यांनाही घ्यावे या व इतर दुरूस्त्यांसह दिनांक ३०.७.९६ च्या इतिवृत्तांस मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५६/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.भिमनगर भावसिंगपूरा येथे श्री.अमृत फळे यांच्या घरा जवळ लोखंडी पुल बांधणे,फरशी बसविणे बाबत कामा करीता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार र.रू.१,३७,१५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम खडीरस्ते आणि कलव्हर्ट रू.४५.०० लाख या शिर्षकातून करण्यांत येईल सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेयबांनी दिनांक २५.६.९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामा करीता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रू.१,३७,१५०/- यांस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

ठरावः प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.भिमनगर भावसिंगपूरा येथे श्री.अमृत फळे यांच्या घराजवळ लोखंडी पुल बांधणे , फरशी बसविणे बाबत कामा करीता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार र.रू.१,३७,१५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे सदरील काम खडीरस्ते आणि कल्व्हर्ट रू.४५.०० लाख या शिर्षकातून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.भिमनगर भावसिंगपुरा येथे श्री.अमृत फळे यांच्या घराजवळ लोखंडी पुल बांधणे, फरशी बसविणे बाबतचे कामासाठी सा.बां.खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले रक्कम रु. १३७१५०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम खडी रस्ते आणि कल्व्हर्ट रु. ४५.०० लाख या शिर्षकातून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५७/३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, सिध्दार्थ उद्यान उद्यान येथे पार्किंग करीता सपाटीकरण करणे व तार कुंपण गेट, भरती इ. कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.४४,६००/- चे सा.बां. खात्याचे सन ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यांत आले. त्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिली त्या अनुषंगाने नियमाने "बी-१" नमुन्यात निविदा पत्रके मागविण्यांत आले. कोरे निविदा एकूण १९ विक्रीच्या तारखे पर्यंत विकले गेले व स्विकारण्याच्या तारखे पर्यंत दर भरून सिलबंद पाकीटात (५) निविदा प्राप्त झाली. सदरील निविदा पत्रकात सर्वात कमी तुलनात्मकदृष्टया श्री.एच.ए.पाचपिंडे गुत्तेदार यांचे अ.प.दरापेक्षा १८% कमी दराचे दर होते. त्याअनुषंगाने काम सुरू करण्यांत आले परंतु मा. आयुक्त यांनी सदर ठिकाणी पहाणी अन्वये आदेशित केले कि, सदरील ठिकाणी पावसाळयात नागरिकांच्या गाडया पार्किंग करीता जागा बरोबर नसलयाने तया ठिकाणी फरशी बसविणे व रेलिंग करणे जरूरीचे आहे ते त्वरीत करावे त्यासाठी वाढीव अंदाजपत्रक तयार करून रक्कम रू.१,५८,०००/- चे व पुर्वीचे मंजुर अंदाजपत्रक रक्कम रू.४४,६००/- अशी एकूण रू.२,०२,६००/- इतकी झाली आहे. रक्कम रू.२,०२,६००/- चे एकूण अंदाजपत्रक रक्कमेस मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे. व त्याच गुत्तेदारामार्फत दिलेल्या दरात काम करून घेण्यास्तव मंजुरी अन्वये सदर खर्च शासकीय अनुदान सन १९९५-९६ च्या १० कोटी अंतर्गत मधून करण्यात येईल. करीता वाढीव अंदाजपत्रक रक्कमेस रू.१,५८,०००/- व त्याच गुत्तेदारा मार्फत १८% कमी दराने करून घेण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथे पार्किंग करीता सपाटीकरण करणे तार कुंपण गेट, भरती इ. कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रू.१,५८,०००/-चे वाढीव अंदाजपत्रकास तसेच सदर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% कमी दराचे गुत्तेदार श्री.एच.ए.पाचपिंडे त्यांचे कडून करून घेण्यास सदर खर्च शासकीय अनुदान सन ९५-९६ च्या १० कोटी अंतर्गत मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५८/४:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, मो.मोगलपुरा स्लम येथे डांबरी रस्ते तयार करणे बाबात कामा करीता सार्वजनिक बांधकाम खाते यांचया वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार रूपये ४,४८,८८५/- अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम डांबरी रस्ते रू.७०.०० लाख या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दिनांक ३.७.९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामा करीता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रू.४,६४,१२८/-यांस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोगलपुरा स्लम येथील रस्त्याचे पुर्नःडांबरीकरण करणे बाबतचे कामा करीता तयार करण्यांत आलेले रक्कम रू.४६४१२८/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम डांबरी रस्ते रू.७०.०० लाख या शिर्षकातून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६०/६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, मो. कांचनवाडी स्लम (अ) मध्ये अर्धगोलाकार गटार बांधकाम करणे करीता रक्कम रू.४,४०,०००/- चे अंदाजपत्रक सा.बां. विभाग,औरंगाबाद यांचे दरसुची सन १९९५-९६ नुसार तयार करण्यात आले असून मा. आयुक्त यांनी दिनांक २६.७.९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.सदरील काम "म्हाडा अनुदान" अंतर्गत करण्याचे प्रस्तावति आहे. करिता मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.कांचनवाडी स्लम (अ) मध्ये अर्धगोलाकार गटार बांधकाम करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रू.४,४०,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम म्हाडा अनुदानां अंतर्गत करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६१/७:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.हर्षनगर स्लम येथील शौच्यालयासाठी दुरूस्ती करणे बाबत कामा करीता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार रू.१,६९,३४३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम देखभाल व दुरूस्ती रू.१०.०० लाख या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दिनांक २६.७.९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तरी सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले अंदासजपत्रक रू.१६९३४३/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.हर्षनगर स्लम येथील शौचालयासाठी दुरूस्ती करणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रू.१६९३४३/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम देखभाल व दुरूस्ती रू.१०.०० लाख या शिर्षकातून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६२/८:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, नविन उस्मानपुरा व पन्नालालनगर व रमानगर स्मशानभूमी यांना जोडणाऱ्या पाईप कलव्हर्ट बांधण्याचे अंदाजपत्रक र.रू.१,४२,६५५/-चे सार्वजनिक बांधकाम खाते सन ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यांत आले. सदरठिकाणी स्मशानभूमीची सर्व कामे करण्यांत आले. सदर ठिकाणी स्मशानभूमीची सर्व कामे नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने पूर्ण करण्यांत आले आहे, परंतू स्मशानभूमीला अत्यंविधीचे कार्यक्रमासाठी एकच रस्ता जालना रोड वरूनच आहे. नागरिकांच्या अडचणी लक्षात घेवून जे क्रांतीचौकला वळसा घालून येण्याची आवश्यकता राहणार नाही. करिता हॉटेल डर्लिंग पासून आत वळून सरळ स्मशानभूमी मध्ये जाता येईल. सदर काम पावसाच्या त्रासाच्या दृष्टीकोनातून त्वरीत चालू करण्याकरीता यश्री.नंदकुमार घोडेले गुत्तेदार मार्फत अंदाजपत्रकीय दरात करून घेण्या करीता सदर खर्च स्मशान भूमी तरतुद ३८ लाख मधून करण्यांत येईल. करीता अंदाजपत्रकास व काम करून घेण्यांच्या एजन्सीच्या नांवाचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नविन उस्मानपुरा , पन्नालालनगर व रमानगर स्मशानभूमी यांना जोडणाऱ्या पाईप कलव्हर्टचे बांधकामासाठी तयार करण्यात आलेले र.रू.१,४२,६५५/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर काम पावसाच्या त्रासाच्या दृष्टीकोनातून त्वरीत चालू करण्याकरीता गुत्तेदार श्री.नंदकुमार घोडेले यांचे मार्फत अंदापजत्रकदराने करून घेण्यांस व सदरचा खर्च स्मशानभूमी तरतुद ३८ लाख मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६३/९:**

शहर अभियंता यानीं प्रस्ताव सादर केला कि, प्रियदर्शनी इंदिरानगर (स्मशानभूमी) जवळ असलेल्या कब्रस्थान येथे रेस्टींग रोड संरक्षित तार कुंपण करण्या करीता सार्वजनिक बांधकाम खात्याचे ९५-९६ सालाच्या दरसुची नुसार रक्कम रू.१,४७,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले . सदर खर्च स्मशानभूमी या तरतुदीमधून करण्यात येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्रियदर्शनि इंदिरानगर (स्मशानभूमी) जवळ असलेल्या कब्रस्थान येथे रेस्टींग रोड, संरक्षित तार कुंपण करण्याकरीता सा.बां.खात्याचे सन ९५-९६ सालाच्या दरसुचीन नुसार तयार करण्यात आलेले रू.१,४७,५००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च स्मशानभूमी या तरतुदी मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६४/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.६२ मो.इटखेडा येथे स.नगर सेवक श्री.तरविंद्रसिंग धिल्लन यांचे स्वेच्छा निधीतून ४०,०००/- व १,७०,०००/- ५% कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजना या लेखा शिर्षकातून समाज मंदिर बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक १३.२.९६ ठराव क्र.४२९/५ अन्वये रक्कम रू.२,१०,०००/- चे अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरील काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/७०/९६ दिनांक १४.३.९६ अन्वये

बी"१" नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण पाच (५) निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त एकच (१) निविदा दर भरून प्राप्त झाली. सदरील निविदा दिनांक ८.४.९६ ला उघडण्यात आली. सदरील निविदा ही मे.एस.एच. असोसियेटस यांची अं.पं.दरापेक्षा ७% जास्त दराची होती. दर जास्त असल्यामुळे त्यांना दराचे वाटाघाटी बाबत मा. आयुक्त यांचे दालनात वाटाघटीस्तव दिनांक ८.७.९६ ला बोलावण्यात आले. दराचे वाटाघाटी होवून सदरील काम अ.पं. दरापेक्षा ७% जास्त ऐवजी ३% जास्त दराने काम करण्यास गुत्तेदाराने संमती दिली व त्यास मा. आयुक्तांनी स्थायी समिती समोर ठेवणे करीता दिनांक ९.७.९६ मंजुरी दिलेली आहे. सबब सदर कामासाठी प्राप्त मे.एस.एच.असोसिएटस यांनी निवदा दर अ.पं. दरापेक्षा जास्त ऐवजी दराचे वाटाघाटी अन्वये अ.पं. दरापेक्षा ३% जास्त दराची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव:**

**मा.सभापती :** स्थळ पाहणी करून पुढील बैठकीत मंजुरी देता येईल. या ठिकाणी समाज मंदिर न बांधत आभ्यासिका केंद्र /वाचनालय बांधण्यास परवानगी देण्यांत येते.

**ठराव :**

स्थळ पाहणी करून पुढील बैठकीत मंजुरी देता येईल. या ठिकाणी समाज मंदिर न बांधता आभ्यासिका केंद्र / वाचनालय बांधण्यास परवानगी देण्यांत येते असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १६५/११:**

मा.कार्यकारी अभियंता महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, पाणी पुरवठा-१, अंतर्गत येणाऱ्या विविध व्यासाचे जल वाहिनी दैनंदिन देखभाल व दुरूस्तीसाठी लागणारे विविध आकाराचे सी.आय.डी. जाईन्ट खरेदीसाठी सन ९६-९७ या आर्थिक वर्षा करिता ४७९७५०/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर खर्च देखभाल व दुरूस्ती या लेखा शिर्षाखाली करण्यांत येईल. सदर साहित्य खरेदीसाठी दै.वर्तमानपत्रात प्रसिध्दी करून डी फार्म वर अधिकृत विक्रते किंवा अधिकृत पुरवठादार यांचेक्डून यांचे कडून निविदा मागविणे बाबत तसेच अंदाजपत्रक रू.४,७९,७५०/- चे मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार पाणी पुरवठा विभागा अंतर्गत येणाऱ्या विविध व्यासाचे जलवाहिनी दैनंदिन देखभाल व दुरूस्ती साठी लागणारे विविध आकाराचे सी.आय.डी. जाईन्ट खरेदीसाठी सन ९६-९७ च्या आर्थिक वर्षाकरीता साहित्य खरेदी साठी दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी करून डी.फॉर्मवर अधिकृत विक्रते किंवा अधिकृत पुरवठादार यांचेकडून निविदा मागविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६६/१२:**

मा.कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो. जाधवमंडी येथील सुंदर टी सेंटर पासून नॅशनल बांबू डेपो पर्यंत ६"/ एस.डब्ल्यु.जी. या ऐवजी १०" ० आर सी सी लाईन टाकणे बाबात या कामासाठी १,४५,८००/- रू.अंदापजत्रक करण्यात आले आहे.

उपरोक्त काम हे दुरूस्ती व देखभाल ९६-९७ या शिर्षकाअंतर्गत परिसर अभियांत्रिकी यांची ९४-९५ ची दर सुचीनुसार तयार करण्यात आलेले आहे.

तरी रू. १,४५,८००/-च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.जाधवमंडी येथील सुंदर टी सेंटर पासून नॅशनल बांबू डेपो पर्यंत ६"/ एस.डब्ल्यु.जी. या ऐवजी १०" ० आर सी सी लाईन टाकणे बाबातच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम १,४५,८००/-चे अंदापजत्रकास तसेच उपरोक्त काम हे दुरूस्ती व देखभाल ९६-९७ शिर्षकाअंतर्गत परिसर अभियांत्रिकी यांची ९४-९५ ची दरसुची नुसार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६७/१३:**

पाणी पुरवठा विभाग क्र.२ अंतर्गत झोन क्र.७ आणि झोन क्र.५ अंतर्गत येणाऱ्या जलवाहिन्यांच्या देखभाल व दुरूस्तीच्या कामासाठी सी.आय.स्पेशल साहित्य खरेदी करण्यासाठी रक्कम रू.२,५२,०००/-चे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी यांच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असून सदरील कामावर होणारा खर्च देखभाल व दुरूस्तीच्या लेखा शिर्षकातील तरतुदी मधून करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.२,५२,०००/- अंदापजत्रकास मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी पुरवठा विभाग क्र.२ अंतर्गत येणाऱ्या जलवाहिन्यांच्या देखभाल व दुरूस्तीच्या कामासाठी सी.आय.स्पेशल साहित्य खरेदी करण्यासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रू.२,५२,०००/- चे अंदाजपनत्रकास तसेच सदरील कामावर होणारा खर्च देखभाल व दुरूस्तीच्या लेखा शिर्षकातील तरतुदी मधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६८/१४:**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला कि, १९९६-९७ या वर्षासाठी महानगरपालिका कार्यालयास लागणारे किटकनाशके खरेदीसाठी वर्तमानपत्रातुन जाहिरात प्रसिध्दीस देवून निविदा मागविण्यात आल्या होत्या, एकूण तीन (३) निविदा या कार्यालयास प्राप्त झाल्या. तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर असेलल्या निविदा खालील प्रमाणे

१ मे.इन्शा ट्रेडिंग कं. बीएचसी १०% पावडर (५० किलोची बॅग)
रू.२७५/- प्रति बॅग
नोव्हान - रू.४२५/- प्रति लिटर प्रमाणे
फिनेल - रू.१४.१० प्रति लिटर प्रमाणे

फिनेल मध्ये सर्वात कमी दर मे.सल्वा इंटरप्रायझेस यांचे रू.१४.१० प्रति लिटर प्रमाणे होते.परंतु संबंधिताने कागदपत्रांची पुर्तता न केलयाने सेकंड लोवेस्ट निविदाधारक मे. इन्शा ट्रेडिंग कं. यांना विनंती करून वरील देणेस तशी संमती घेतली आहे.तसेच फिनेलचा नमुना तपासणीस्तव मा. आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडे पाठविण्यात आला होता. त्यांचे

अभिप्रायानुसार "पब्लिक हेल्थ लॅब" हे आरडब्ल्युसी - काढत नाही. संबंधितास रिपोर्ट सादर करणेस सांगावे पुढे रॅंडम सॅम्पल घेवून आ.वै.अधिकारी यांचे अभिप्राय घेवून नंतरच देयक तयार सादर करावे असे नमुद करण्यात आल्याने वरील दरास मान्यता घेणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सन १९९६-९७ वर्षासाठी महानगरपालिका कार्यालयास लागणारे किटकनाशके खरेदी करणेसाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी असलेले मे.अन्शा ट्रेडिंग यांचे कडून बी.एच.सी.१०% पावडर २७५/- प्रति बॅग, नोव्हॉन रू.४२५/- प्रति लि. व फिनेल १४-१० प्रति लिटर या दराने खरेदी करणे व तसेच रॅंडम सॅम्पल घेवून आ. वैद्यकीय अधिकारी यांचे अभिप्राय घेवून नंतरच देयक सादर करावे या अटीवर सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६९/१५:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर करीत आहे कि, सिल्क मिल कॉलनी येथील अरूंद गल्ल्यांमध्ये शहाबाद फरशी बसविणेच्या कामाचे सन १९९५-९६ चे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर. दराने रक्कम रू.५,८४,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यात मा. आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च सन १९९६-९७ च्या भांडवली रस्ते या शिर्षकाखालील उपलब्ध असलेलया तरतुदी मधून प्रस्तावित आहे. सदरील कामासाठी निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण २० निविदा पत्रके विक्री झाल्या असून निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण आठ निविदा पत्रके दर भरून प्राप्त झाली असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.पारस कन्स्ट्रक्शन | १६.०० % कमी दराने |
| २. | श्री.बी.ए.काल्डा | १५.७६% कमी दराने |
| ३. | मे.अब्दुल माजिद ॲन्ड कंपनी | १५.००% कमी दराने |
| ४. | श्री.निस्सार अहेमद फत्ते अहमद | १४.०५% कमी दराने |
| ५. | श्री.ए.एम.फारूकी | १४.००% कमी दराने |
| ६. | श्री.कुलवंतसिंग | १३.७०% कमी दराने |
| ७. | मे.ट्रीस्टार कयन्स्टक्शन | १२.४०% कमी दराने |
| ८. | श्री.राजसिंग कौसल | ००.०५% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदापजत्रकीय दरापेक्षा १६.००% कमी दराने मे. पारस कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. तरी सदर कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र.रू.५,८४,७००/- च्या अयंदापजत्रकास सदरील काम मे.पारस कन्स्ट्रक्शनच्या कडून १६.००% कमी दराने करून घेण्या बाबतचा प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सिल्क मिल कॉलनी येथील अरूंद गल्ल्यामध्ये शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी तयार करण्यता आलेल्या रक्कम रू. .रू.५,८४,७००/-चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.००% कमी दराने गुत्तेदार मे.पारस कन्स्ट्रक्शन यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७०/१६:**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत कि, राजनगर मयुरबन कॉलनी व शितल नगर मधील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे सन १९९५-९६ चे सार्वजनिक बांधकाम खातयचे डी.एस.आर.दराने रक्कम रू.८,८७,५४५/-चे अंदापजत्रकात तयार करण्यांत आले असून मा. आयुक्तांची मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते ९६-९७ मधून असलेल्या तरतुदी मधून प्रस्तावित आहे.
सदरील कामासाठी निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके अंतिम तारखे पर्यंत एकूण दहा निविदा पत्रके विक्री झाल्या असून निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सात निविदा पत्रके दर भरून प्राप्त झाल्याअसून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | एम.एस.जग्गी | १५.००% कमी दराने |
| २ | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ०७.००% कमी दराने |
| ३ | मे.रे.कन्स्ट्रक्शन | ०६.००% कमी दराने |
| ४ | मे.व्यंकटेश कन्स्ट्रक्शन | ००.०१% कमी दराने |
| ५ | श्री.डी.अजितसिंग | ०३.५०% कमी दराने |
| ६ | श्री.भिमराव वसंतराव पवार | ०४.८०% कमी दराने |
| ७ | मे.मस्कट कन्स्ट्रक्शन | ००.००% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.००% कमी दराने श्री.एम.एस.जग्गी यांची निविदा आहे. सदर कामा करीता तयार करण्यात आलेल्या रू.८,८७,४४५/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम श्री.एम.एस.जग्गी यांच्या कडून १५.००% कमी दराने करून घेण्याबाबतच्या प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार राजनगर ,मयुरबन कॉलनी, शितलनगर अंतर्गत रस्त्याचें डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम .रू.८,८७,४४५/-चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामा साठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.००% कमी दराचे गुत्तेदार श्री.एम.एस.जग्गी यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७१/१७:**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करित आहेत की, ज्योतीनगर रेखांकनामधील रस्त्यांचे डांबरीकरणाचे कामाचे सन १९९५-९६ चे सार्वजनिक बां. खात्याचे डी.एस.आर. दराने रक्कम रू.८,२३,०१०/- चे अंदापजत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण आठ निविदा पत्रके दर भरून प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मकतक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.एम.एस.जग्गी | १७.०० % कमी दराने |
| २ | श्री.के.बी.पाथ्रीकर | १५.२१ % कमी दराने |
| ३ | मे.रे.कन्स्ट्रक्शन | ०३.०० % कमी दराने |
| ४ | श्री.भिमराव वसंतराव पाटील | ०४.८० % कमी दराने |
| ५ | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ०३.००% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| ५ | श्री.डी.अजितसिंग | अंदाजपत्रकीय दराने |
| ६ | मे.व्यंकटेश कन्स्ट्रक्शन | ००.०१% कमी दराने |
| ७ | मे.मस्कट कन्स्ट्रक्शन | ००.००% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% कमी दराने श्री.एम.एस.जग्गी यांची निविदा आहे. तरी सदर कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र.रू.८,३३,०१०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम श्री.एम.एस.जग्गी यांच्या कडून १७.००% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**विषय क्र.१७२/१८:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, टाऊन हॉल ते अंजली सिनेमा या रस्त्याचे विद्युतीकरण करण्याच्या कामा करीता तयार करण्यात आलेले र.रू.४४७७६५/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.४९६/४४दिनांक १९.२.९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदरील कामा करीता निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दहा कोरी निविदा पत्रके विकल्या गेल्या व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दहा कोरी निविदा पत्रके विकल्या गेल्या व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन निविदा दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके दिनांक १७.७.९६ रोजी उघडण्यात आली त्यांचा तपशिल खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | मे.हाईटेक इलेक्ट्रीकल | १५.०० % जास्त दराने |
| २ | मे.प्रगत इलेक्ट्रीकल | ०९.९९ % जास्त दराने |
| ३ | मे.लूना इलेक्ट्रीकल | १०.१० % जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रका पैकी मे.प्रगत इलेक्ट्रीकल यांची निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०९.९९% जास्त आहे. परंतु सदरील दर जास्त वाटत असल्याने मे.प्रगत इलेक्ट्रीकल यांना पत्र क्र.मनपा/विद्युत/अराअ/२९८/९६ अन्वये सदरील कामाचे दराबाबत वाटाघाटी स्तव बोलावले असता वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे मे.प्रगत इलेक्ट्रीकल हे सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९९% जास्त दरापऐवजी ५.००% जास्त दराने करण्यास तयार आहे. व सदर दरास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे. तरी सदरील काम मे.प्रगत इलेक्ट्रीकल यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.००% जास्त दराने करून घेणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**मा.सभापती :** रिकॉल करण्यात येतो.

**ठराव:**

सदरील कामाची निविदा रिकॉल करण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१७३/१९:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, श्री.वसंत देशमुख, स.नगरसेवक यांचे वार्ड क्र.३१ मधील जिन्सी येथील प्राथमिक शाळेवर पहिला मजला बांधण्याच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.५८९/४ दिनांक ८.३.९६ अन्वये र.रू.७,७३,३७०/- चे अंदापजत्रकास मान्यता मिळाली आहे. सदरील काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/८०/९६ दिनांक २१.६.९६ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविले असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण ५ (पाच) निविदा विक्री झाल्या निविदा

स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या त्या दिनांक १७.६.९६ रोजी उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

१) श्री.मन्नानखान १२% जास्त दराने.

२) श्री.आर.एल.बारवाल १५% जास्त दराने.

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदापजत्रकीय दरापेक्षा १२% जास्त दराची श्री.मन्नानखान यांची निविदा आहे. सदर निविदा दर खूपच जास्त असल्यामुळे त्यांना मा. ाअयुकतांचे दालनात दिनांक ५.८.९६ ला दराचे वाटाघाटी साठी बोलविण्यात आले. दिनांक ५.८.९६ ला मा. आयुक्त यांचे दालनात गुत्तेदारा सोबत दराची वाटाघाटी होवून सदरील काम हे अं.प. दरापेक्षा १२% जास्त ऐवजी ६% जास्त दराने करण्यास मक्तेदाराने संमती दर्शविली व मा. आयुक्तांनी मंजुरी दिली. सबब सदर कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी अ.पं. दरापेक्षा १२% जास्त दराऐवजी वाटाघाटी नुसार ६% जास्त दराची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार श्री.वसंत देशमुख स. नगरसेवक यांचे वार्ड क्र.३१ मधील जिन्सी येथील प्राथमिक शाळेवर पहिला मजला बांधण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अ.पं. दरापेक्षा १२% जास्त दराऐवजी वाटाघाटी नुसार ६% जास्त दराचे गुत्तेदार श्री.मन्नानखान यांनी सदर काम करणेस संमती दर्शविल्यानुसार श्री.मन्नानखान यांच्या निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७४/२०:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, श्री.विकास जैन, स.नगर सेवक यांचे वॉर्डातील मो.बन्सीलाल नगर येथील मनपा अग्निशमन दल विभाग येथील मोटार गॅरेजला कॉंक्रीट करून गेट बसविण्याचे कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार रक्कम रूपये ३,३२,४९६/-चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास दिनांक ६.७.९६ अन्वये मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. सबब सदर कामाचे रक्कम रूपये ३,३२,४९६/-चे अंदापजत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर. सदरचा खर्च व्यापारी संकुल व इतर इमारती यालेखा शिर्षकामधून सन ९६-९७ मध्ये करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार श्री.विकास जैन स.नगर सेवक यांचे वार्डातील मो.बन्सीलालनगर येथील मनपा अग्निशमन दल विभाग येिील मोटार गॅरेजला कॉक्रीट करून गेट बसविण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेली रक्कम रू.३,३२,४१६/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च व्यापारी संकुल व इयतर इमारती या लेखाशिर्षामधून सन ९६-९७ मध्ये करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७५/२१:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, मो. कैसर कॉलनी जिन्सी येथील समाज मंदिरास संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९५-९६ चे जिल्हा दर सुची नुसार रक्कम रू.१,०६,७००/- चे अंदापजत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्त यांनी प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवा या अटीवर दिनांक १६.७.९६ अन्वये मान्यता दिलेली आहे. सबब सदर कामासाठी रक्कम

रू.१,०६,७००/- या अंदापजत्रकास मंजुरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर. सदरचा खर्च व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षामधून सन ९६-९७ या वर्षात करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.कैसर कॉलनी जिन्सी येथील समाज मंदरिास संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी सा.बां. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार तयार करण्यात आलेली रक्कम रू.१,०६,७००/- च्या अंदापजत्रकास तसेच सदरचा खर्च व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षामधून सन ९६-९७ या वर्षात सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७६/२२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, दिल्ली गेट येथील वर्ग -१ ते वर्ग-४ निवास्थानाची एकत्रित दुरूस्ती करण्याचे कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.५४०/५ दिनांक ८.३.९६ अन्वये रक्कम रू.२,२५,०००/- चे अंदापजत्रक सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरील निवासस्थानाची छताची पाणी गळती पावसाळया आगोदर बंद होणे आवश्यक असल्यामुळे व इतरही निवासस्थानातील किरकोळ दुरूस्ती करण्याकरीता मुख्य लेखा परिक्षक श्री.सोनार, मालमत्ता अधिकारी श्री.जरारे, शिक्षणाधिकारी श्री.पंडीत , डॉ.गायकवाड, विभागीय अधिकारी श्री.वाहूळ व इतर कर्मचाऱ्यांनी मागणी केल्यानुसार व मा.स्थायी समिती सभापती यांचे सदरील बाब निदर्शनास आणून देवून काम तातडीचे आवश्यक असल्यामुळे विना निविदा सदरील काम उपलब्ध मक्तेदाराकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास मा. आयुक्त व मा. सभापती यांनी मंजुरी दिलेली आहे व त्यानुसार सदरीलकाम श्री.एस.एल.नवाब, गुत्तेदार यांचेकडून काम अंदापजत्रकीय दराने करून घेण्याबाबत सुरू करण्यात आले आहे व मंजुर अंदाजपत्रकीय रक्कमे पर्यंतचे काम झालेले ही आहे ही बाब स्थायी समितीकडे कार्योत्तर मंजुरीस्तव सादर करण्याचे अटीवर मा. आयुक्तांनी व मा. सभापतींनी आदेशित केल्या प्रमाणे सदर काम विना निविदा अंदाजपत्रकीय दराने व मंजूर रक्कमेपर्यंत उपलब्ध गुत्तेदार श्री.एस.एम.नवाब यांचे कडून करून घेण्यास्तव प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीस्तव व विचारार्थ सादर. सदरचा खर्च सन ९६-९७ च्या अर्थ संकल्पीय तरतुदीच्या इमारत देखभाल व दुरूस्ती या सदराखाली प्रस्तावित आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार दिल्लीगेट येथील वर्ग-१ ते वर्ग-४ निवासस्थानाची एकत्रित दुरूस्ती करण्याचे कामासाठी सदरील निवासस्थानाची छताची पाणी गळती पावसाळया अगोदर बंद होणे आवश्यक असल्यामुळे व इतरही निवासस्थानातील किरकोळ दुरूस्ती करणे बाबत येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मागणी केल्यानुसार काम तातडीचे व आवश्यक असल्यामुळे व आचार संहिताही असल्यामुळे सदरील काम उपलब्ध मक्तेदार श्री.एस.एल.नवाब यांचे अंदाजपत्रकीय दराचे निविदा पत्रकात तसेच सदरचा खर्च सन ९६-९७ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीच्या इमारत देखभाल व दुरूस्ती खाली करून घेण्यास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७७/२३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, बायजीपूरा येथील मनपा कर्मचारी यांनी मनपा निवासस्थानाची अत्यावश्यक दुरूस्ती बाबत केलेल्या मागणी नुसार सदर कामासाठी रक्कम रू.१,८०,०००/- चे अंदापजत्रक तयार करण्यांत आले असून सदर कामे

पावसाळया पूर्वी होणे आवश्यक असल्यामुळे व आचार संहिता असून सदर काम बिना निविदा उपलब्ध गुत्तेदार याचेकडून अंदाज पत्रकीय दराने करून घेण्यास मा. आयुक्त व मा.सभापती यांची मंजुरी दिली आहे व सदर बाब स्थायी समितीकडे कार्योत्तर मंजुरीस्तव सादर करा असे आदेश दिले त्यानुसार सदर कामाचे र. रू.१,८०,०००/- च्या अंदाजपत्रकास व सदरील काम अंदाजपत्रकीय दराने उपलब्ध गुत्तेदार श्री.एस.एल.नवाब यांचे मार्फत करून घेण्याचा प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.

सदरचा खर्च इमारत दुरूस्ती देखभाल या सदरातून सन ९६-९७ मध्ये करण्यांत येईल.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार बायजीपूरा येथील महापालिका कर्मचारी यांनी मनपा निवास्थानाची अत्यावश्यक दुरूस्ती बाबत केलेल्या मागणी नुसार आकारण्यात आलेले रक्कम रू.१,८०,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामे पावसाळयापूर्वी होणे आवश्यक असलयामुळे व आचार सहिंताही असल्यामुळे सदर काम उपलब्ध गुत्तेदार श्री.एस.एल.नवाब यांचे कडून अंदापजत्रकीय दराने व देखभाल या सदरातून सन ९६-९७मध्ये करणेस सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७८/२४:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, श्री.हमीदउद्यीन ताबा स.नगरसेवक ,वार्ड क्र.४१ मधील मो.मंजुरपुरा येथील मनपा प्रा.शाळेवर माळा बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.५६९/३ दिनांक १८.३.९६ अन्वये र.रू.३,४६,२७०/- चे अंदापजत्रकास मंजुरी मिळालेली आहे. सदर काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/लेखानि/८०/९६ दिनांक ११.३.९६ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण २ निविदा विक्री झाल्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण २ निविदा विक्री झाल्या निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण फक्त एक निविदा दर भरून प्राप्त झाली. सदरची निविदा ही श्री.मन्नानखान यांची अंदापजत्रकीय दरापेक्षा ७% जास्त दराची आहे. दर जास्त वाटत असल्यामुळे मक्तेदारास मा. आयुक्त यांचे दालनात दिनांक ५.८.९६ ला दराचे वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता मक्तेदाराने दराचे वाटाघाटी होवून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% जास्त दरा ऐवजी अंदापजत्रकीय दराने करण्यास मक्तेदाराने संमती दर्शविली व त्यात आयुक्तांनी मंजुरी दिली आहे. सबब सदर कामासाठी अंदापजत्रकीय दरापेक्षा ७% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दराची (वाटाघाटी नुसार ) श्री.मन्नान खान यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार श्री.हमीदोद्यीन ताबा स.नगर सेवक ,वार्ड क्र.४१ मधील मंजुरपुरा येथील मनपा प्रा.शाळेवर पहिल माळा बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेले एकमेव निविदा पत्रक गुत्तेदार श्री.मन्नान खान यांचे अंदाजपत्रकीय दराचे निविदा पत्रक असून वाटाघाटीअंती ते सदर काम अंदापजत्रकीय दराने करणेस तयार असल्यामुळे श्री. मन्नान खान यांचे अंदाजपत्रकीय दराचे निविदा पत्रकास मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७९/२५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.गांधीनगर स्लम येथील फरशी बसविणे बाबत कामा करीता सार्वजनिक बां. खाते यांच्या वर्ष ९४-९५ च्या दरसुची नुसार रू.३,३६,०००/- चे अंदापजत्रक तयार करण्यात आले आहे. त्यास मा. आयुक्त साहेबांनी दिनांक १२.२.९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे व सदरील अंदाजपत्रकास दिनांक २९.२.९६ रोजी स्थायी समितीची मान्यता मिळाली आहे.प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आले असता अंतिम तारखेपर्यंत एकूण पाच निविदा प्राप्त झालया.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.अब्दुल खालेख | १६% कमी |
| २ | श्री.शेख उमर | १३.०५% कमी |
| ३ | श्री.विपुल कन्स्ट्रक्शन | १३% कमी |
| ४ | श्री.सय्यद रफिकोद्यीन | १२% कमी |
| ५ | श्री.एस.पी.सरवदे | ०८% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदापजत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराची निविदा श्री.अब्दुल खालेक यांची आहे. सदरील काम तातडीने असल्याने विशेष बाब म्हणून मा. आयुक्त साहेबांनी काम त्वरीत सुरू करण्याबाबत दिनांक १५.५.९६ रोजी आदेशित केल्याप्रमाणे कामाचे कार्यादेश देण्यांत आले असून काम प्रगती पथावर आहे.

तरी सदरील कामासाठी श्री.अब्दुल खालेक यांची अंदापजत्रकीय दरापेक्षा १६% कमी असल्याची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.गांधीनगर स्लम येथे फरशी बसविणे बाबत कामा करिता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदापजत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराचे गुत्तेदार श्री.अब्दुल खालेक यांचे निविदा पत्रकास सार्वनुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८०/२६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, सौ.उषा गायकवाड, स.सदस्या वार्ड क्र.९ मधील मो.सिध्दार्थनगर भागातील भगवान गौतमबुध्द पुतळा व समाज मंदिर परिसरातील उपलब्ध जागेवर संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दर सुची नुसार र.रू.२,९०,०००/-चे अंदापजत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्तांनी दिनांक २७.६.९६ ला मान्यता दिलेली आहे. सदरील जागा मनपा ची आहे काय ? या बाबत मालमत्ता अधिकारी यांना विचारणा करण्यात आली असता मालमत्ता अधिकारी यांनी अभिप्राय दिला आहे कि, या जागेत पुतळा लोकांनी बसविला आहे म्हणजे जागा सार्वजनिक दिसते व सिध्दार्थ नगर स्लम घोषित आहे किंवा नाही या याबाबत प्रकल्प संचालक यांचे मत घेण्यास मालमत्ता अधिकारी यांनी कळविल्यानुसार प्रकल्प संचालक यांनी अभिप्राय दिला ओ कि, सिध्दार्थ नगर ही वस्ती घोषित स्लम आहे, परंतु जागेच्या मालकी बाबत त्यांच्याकडे माहिती उपलब्ध यनाही. परंतु सदरील काम ५% कमकुवत घटकांसाठी कल्याणकारी योजना या शिर्षखालील घेण्यास प्रकल्प विभागाने मान्यता दर्शविली आहे. उपलब्ध जागेवर अतिक्रमण होवू नये म्हणून अंदापज पत्रकास मान्यता प्राप्त झाली आहे. पंरतु अद्याप मनपाची मालकीची कागदपत्र या विभागास प्राप्त झाली नाहीत.

सबब सदर कामाचे र..रू.२,९०,०००/-चे अंदापजत्रक मंजुरीसाठी प्रस्ताव विचारार्थ तथा योग्य त्या आदेशास्तव सादर. सदरचा खर्च ५% कमकुवत घटक यासाठी कल्याणकारी योजना या लेखा शिर्षकातून सन ९६-९७ या वर्षात करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सौ.उषा गायकवाड स.सदस्या वार्ड क्र.९ मधील मो.सिध्दार्थनगर भागातील भगवान गौतम बुध्द पुतळा व समाज मंदिर परिसरातील उपलब्ध जागेवर संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी सा.बां. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दर सुची नुसार तयार करण्यात आलेले रक्कम .रू.२,९०,०००/-चे अंदापजत्रकास तसेच सदरचा खर्च ५% कमकुवत घटक यासाठी कल्याणकारी योजना या लेखा शिर्षकातुन सन ९६-९७ या वर्षात करण्यात सर्वानुते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८१/२७:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, श्री.मोहंमद अब्दुल रऊफ यांचे वार्ड क्र.४२ मधील लोटाकारंजा येथे मनपा जागेवर (अ) सर सय्यद हॉलचे आधुनिकरण करणे रू.४.०० लाख (ब) शाळा व वाचनालय यासाठी रू.८.०० लाख व (क) बीफ मार्केट ७.०० लाख असे एकत्रित र.रू.२०.०० लाखला मा. सर्वसाधारण सभा दिनांक १६.३.९६ ठराव क्र.२०७/१० अन्वये अंदापजत्रकास मंजुरी मिळालेली आहे. पैकी (क) बीफ मार्केटचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयाने निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/८५/९६ दिनांक ३.७.९६ अन्वये बी-१, नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण २ निविदा विक्री झालया. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण २ निविदा दर भरून प्राप्त झाल्या त्या दिनांक १७.७.९६ ला उघडण्यात आल्या, त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | मे.एलोरा कन्स्ट्रक्शन कंपनी | १३.५० %जास्त दराने |
| २ | श्री.शेख उमर | १८.९० %जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदापजत्रकीय दरापेक्षा १३.५० % जास्त दराची मे.एलोरा कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा आहे. दर खुपच जास्त असल्यामुळे मक्तेदारास पत्र देवून मा. आयुक्तांचे दालनात दराचे वाटाघाटीसाठी बोलवण्यात आहे . मा. आयुक्तांचे दालनात दराचे वाटाघाटी होवून सदरील काम अंदापजत्रकीय दरापेक्षा १३.५०%जास्त दरा ऐवजी ८% जास्त दराने काम करण्यास मक्तेदाराने संमती दर्शविली व त्यात मा. आयुक्तांनीही मंजुरी दिली. सबब सदर कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजत्रकीय दरापेक्षा १३.५०%जास्त ऐवजी ८% जास्त दराची (वाटाघाटीनुसार) मे.एलोरा कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा दर मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलयानुसार श्री.मोहमद अब्दुल रऊफ वार्ड क्र.४२ मधील लोटाकारंजा येथे महापालिकेच्या जागेवर बीफ मार्केट कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराचे पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८२/२८:**

मोहल्ला गारखेडा येथील सर्व्हे क्रमांक १/३ मधून ८० फुट रूंद रस्ता आणि फॉगिंगसाठी जमिन संपादन करणेसाठी अतिरिक्त शहर अभियंता यांनी कळवुन सदर

प्रस्तावासाठी १२४५.५ चौ.मी.जमिन अतिरिक्त शहर अभियंता यांनी ताब्यात घेवून ८० फुट रूंद रस्ता आणि फॉगिंगचे काम पुर्ण केलेले आहे.

सदर प्रकरणात मुल्यांकन करून एकूण मोबदल्याची रक्कम रू.४,९७,४२५/- (रू.चार लाख सत्याण्णव हजार चारशे पंचविस फक्त) निश्चित करण्यात आलेली आहे. वरील १२४५.५ चौ.मी. क्षेत्राचे खरेदीखत करून घ्यावयाची असल्याने खरेदी खतासाठी एकूण रू.८८,५००/- (रू.अठयाऐंशी हजार पाचशे फक्त) इतका येतो.

मिळकतधारकांनी वरील मोबदल्यांची रक्कम घेण्यास मान्य केले असून रजिस्ट्री खर्च महानगरपालिकेने पूर्ण करावा अशी विनती केलेली आहे. सदरील खरेदी खताची रक्कम महानगरपालिकेने करावयास मा. आयुक्तांनी मंजुरी दिली आहे.

सबब मोबदल्याची एकूण रक्कम रू.४,९७,४२५/- (रू.चार लाख सत्याण्णव हजार चारशे पंचविस फक्त) मिळकतधारक श्री.त्रिंबक मारूती जाधव यांना देणे साठी आणि खरेदीखत करून घेणेसाठी अग्रीम रक्कम रू.८८,५००/- (रू.अठयाऐंशी हजार पाचशे फक्त) श्री.डी.डी.कालेले , शाखा अभियंता यांना देणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

**मा.सभापती :** सदरील प्रस्ताव स्थगित ठेवून पाहणी साठी ठेवावे.

**ठराव :** सदरील प्रस्ताव स्थगित ठेवून पाहणीसाठी ठेवावे असे सर्वानुमते ठरले.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळचा विषय**

**विषय क्र.१८३/९:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, मा.सभापती यांच्या वापरात असलेली पेट्रोल कार जुनी झालेली असून पेट्रोलचे दर डिझेल पेक्षा जास्त असल्यामुळे इंधनावर जास्तीचा खर्च होत आहे. त्यामुळे पेट्रोल कार ऐवजी डिझेल कार खरेदी करणे आहे. सध्या डिझेलवर चालणाऱ्या विविध कंपन्यांच्या कार्स आहेत. मा. आयुक्त यांनी ११८ एम ई डिझेल कार खरेदी करण्यासाठी शिफारस केली आहे.तथापी मा.सभापती यांनी टाटा इस्टेट डिझेलची कारची मागणी केलेली आहे.

प्रस्ताव विचारार्थ सादर

**मा.सभापती :** माझ्याकडे जी पेट्रोल कार आहे तिला महिन्याकाठी अपेक्षेपेक्षा जास्त खर्च येतो. त्यासाठी डिझेल कार खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**डॉ.विजयकुमार मेहेर :** माझी कार नेहमी नादुरूस्त होते उप महापौर पदासाठी नविन कार खरेदीचा विचार व्हावा.

**लेखाधिकारी :** जास्तीच्या कार खरेदी करावयाचे असल्यास पुरवणी अर्थसंकल्पात तरतुद करावी लागेल.

**मा.सभापती :** प्रस्तुत प्रस्तावात टाटा इस्टेट डिझेल कार खरेदी करण्यात यावी तसेच मे.सतिश मोटर्स लि.औरंगाबाद या एजन्सीकडून खरेदी करावयास अनुमती देण्यांत येते. जीची किंमत रू.४,९९,८४६/- या रक्कमेस प्रस्तुत एजन्सीला अदाई करण्याची मंजुरी देण्यांत येते. इतर खर्च अपेक्षित असल्यास तीही गृहीत धरण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मा.सभापती यांच्या वापरातील पेट्रोल कार फार जुनी झालेली असून तीला नेहमी जास्तीचा खर्च येत आहे. याशिवाय अपेक्षेपेक्षा पेट्रोलचा खर्च जास्त वाढत असल्यामुळे या पेट्रोल कार ऐवजी मे.सतिश मोटर्स लि.औरंगाबाद या

एजन्सीकडून टाटा कंपनीची टाटा इस्टेट डिझेल कार किंमत रू.४,९९,८४६/- स मंजुरी देण्यात येवून इतर खर्च अपेक्षित असलयास तोही गृहीत धरण्यात येतो. या सर्व बाबीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८४/२:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, स. सदस्यांच्या स्वेच्छा निधीमधून त्यांच्या वार्डात लावण्याकरीता १५० वॅट साोडीयम व्हेपर दिव्यांची मागणी होते अशा वेळी स.सदस्यांचे पत्र प्राप्त झाल्यानंतर संचिका तयार करून त्यास मंजुरी घेणे, निविदा सुचना काढणे, व दर निश्चित झाल्यावर कार्य आदेश देणे इत्यादी कामे घेण्याकरीता बराचसा कालावधी लागतो, व त्यामुळे स.सदस्यांची मागणी पूर्ण करण्यास विलंब होतो.

करिता स.सदस्यांच्या मागणीनुसार त्वरीत कारवाई होण्याच्या दृष्टीने १५० वॅट फिटींगचे दर निश्चित करून पूर्ण, आर्थिक वर्षाकरीता निश्चित केलेल्या दरानुसार वेळोवेळी सोडियम फिटींग घेवून सदस्यांची मागणी त्वरीत पूर्ण करणे शक्य होईल.

करिता फिलिप्स, क्रॉम्प्टन व बजाज या नामांकित कंपन्याच्या अधिकृत विक्रेत्याकडून स्थानिक वृत्तपत्रात दरपत्रक सुचना प्रसिध्दीस देवून १५० वॅट सोडियम फिटींगचे दर निश्चित करण्याकरिता प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**मा.सभापती :** टेंडर न काढता अधिकृत विक्रेत्याकडून डायरेक्ट संपर्क साधून परचेस करण्यांत यावा याबाबत उप आयुक्त यांनी पुणेशी संपर्क साधावा व त्यानुसार कार्यवाही करण्यात मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार स.सदस्यांच्या स्वेच्छा निधीतून त्यांच्या वॉर्डात त्यांचे मागणीनुसार १५० वॅटचे सोडीयम व्हेपर फिटींग लावण्याकरीता व त्वरीत कार्यवाही होणेसाठी टेंडर न काढता अधिकृत विक्रेत्याकडून डायरेक्ट संपर्क साधून फिलिप्स, क्रॉम्प्टन व बजाज या नामांकित कंपनिचे सोडीयम व्हेपर फिटींग खरेदी करण्यास व त्याकरीता मा. उप आयुक्त यांना पुणे येथे संपर्क साधून त्यानुसार कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८५/३:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, मित्रनगर ,लिमयेवाडी मधील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामाचे सन ९५-९६ चे सा.बां. खात्याच्या डी.एस.आर.दराने रक्कम रू.३,१७,४३२/- चे अंदापजत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळाली आहे. सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदा पत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण नऊ निविदा पत्रक विक्री झाल्या असून निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चार ,निविदापत्रके दर भरून प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मकतक्ता खालीलप्रमाणे आहे

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.एम.एस.जग्गी | १७% कमी दराने |
| २ | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ५.७७% कमी दराने |
| ३ | श्री.डी.अजितसिंग | ९.२५ %जास्त दराने |
| ४ | श्री.भिमराव वसंतराव पाटील | १४.००% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदापजत्रकीय दरापेक्षा १७% कमी दराची श्री.एम.एस.जग्गी यांची निविदा आहे.

तरी सदर कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रू.३,१७,४३२/- च्या अंदापजत्रकास तसेच सदरील काम श्री.एम.एस.जग्गी यांच्या कडून १७% कमी दराने करून घेण्या बाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मित्रनगर लिमयेवाडी मधील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सन ९५-९६ च्या सा.बां. खात्याच्या डी.एस.आर. दराने तयार करण्यात आलेलया अंदापजत्रक रक्कम रू.३,१७,४३२/- ला व सदरचे काम तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी असलेलया म्हणजेच अंदापजत्रकीय दरापेक्षा १७% कमी श्री.एम.एस.जग्गी यांचेकडून करून घेण्यास भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८६/४:**

लेखाधिकारी -१ यांनी प्रस्ताव सादर केला कि, सिकंदर अली वज्द मेमोरियल ट्रस्ट, औरंगाबाद यांना महानगरपालिके तर्फे रू.१०.०० लक्ष आर्थिक मदत करण्याबाबत पूर्वी प्रशासकीय ठराव झालेला असून हया अनुषंगाने सदर संस्थेत सन १९९२-९३ मध्ये अंत्यंत गरज असल्यामुळे शिल्लक राहिलेले रू.५.०० लक्ष हे संस्थेस देण्यांत आलेले आहे. त्यानंतर उर्वरित रू.५.०० लक्षसाठी संस्थेस पैशाची अत्यंत गरज असल्यामुळे शिल्लक राहिलेले रू.५.०० लक्ष हे संस्थेस अदा करण्यात यावे. संस्थेने खर्चाचे हिशोब सादर केलेले आहे.

सन ९६-९७ या अर्थसंकल्पात सिकंदर अली वज्द मेमोरियल ट्रस्टसाठी रू.५.०० लक्षची तरतुद करण्यात आलेली आहे. त्या तरतुदीमधून सदर संस्थेस उर्वरित रू.५.०० लक्षची आर्थिक मदत देणे बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** सदरील प्रस्तावातील संपूर्ण माहिती द्यावी.

**डॉ. विजय कुमार मेहेर :** संबंधित ट्रस्टचा झालेल्या खर्चाची किंवा त्यांच्या बाबतीतली माहिती पुढील बैठकीत सादर करावी.

**श्री.गौतम खरात :** मंजुर करण्यास हरकत नाही.

**मा.सभापती :** सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. परंतू ट्रस्टने दाखल केलेल्यांची माहिती सभागृहात द्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिकंदर अली वज्द मेमोरियल ट्रस्ट ,औरंगाबाद यांना महानगरपालिकेतर्फे रू.१०.०० लक्ष आर्थिक मदत करण्याबाबात पूर्वी प्रशासकीय ठराव झालेला होता. त्यापैकी सन १९९२-९३ मध्ये ५.०० लक्ष ट्रस्टला देण्यात आले होते. आता उर्वरित रक्कम रू.५.०० लक्ष संस्थेस आर्थिक मदत म्हणून देण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८७/५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, श्री.मो.अब्दुल रऊफ स.नगरसेवक वार्ड क्र.४२,लोटा कारंजा येथील अस्त्ीत्वात असलेल्या सर सय्यद हॉलचे

आधुनिकीकरणासाठी ५.०० लक्ष (ब) शाळा व वाचनालय ८.०० लाख (क) बीफ मार्केट ७.०० लाख असे एकत्रित २०.००लाखाचा मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.२०७/१० दिनांक १६.३.९६ अन्वये रक्कम रू.२०,००,०००/- चे अंदापजत्रकास मान्यता मिळालेली आहे. पैकी (अ) सर सय्यद हॉलची आधुनिकीकरण करणेचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/८५/९६ दिनांक ३.७.९६ अन्वये बी" नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (३) निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखे पर्यंत दोन (२) निविदा प्राप्त झाली त्या दिनांक १७.७.९६ ला उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | मे.एलोरा कन्स्ट्रक्शन कंपनी | १८% जास्त दराने |
| २ | श्री.शेख उमर | ११.९९% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदापजत्रकीय दरापेक्षा ११.९९ जास्त दराची श्री.शेख उमर यांची निविदा आहे. दर जास्त असल्यामुळे मक्तेदारास दराचे वाटाघाटीसाठी मा. आयुक्तांचे दालनात दिनांक ५.८.९६ ला बोलावण्यात आले असता दराचे वाटाघाटी होवून सदरील काम हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.९९% जास्त ऐवजी (दराचे वाटाघाटीनुसार) अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार श्री.मो.अब्दुल रऊफ स.नगरसेवक यांचे वार्ड क्र.४२ लोटा कारंजा येथील अस्तित्वात असलेल्या सर सैय्यद हॉलचे आधुनिकीकरणासाठी ५.०० लाख (ब) शाळा व वाचनालय ८.०० लाख (क) बीफ मार्केट ७.०० व असे एकत्रित २०.००लाखाला मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र.२०७/१० दिनांक १६.३.९६ अन्वये मान्यता मिळालेली आहे. पैकी (अ) सर सय्यद हॉलचे आधुनिकीकरण करणेच्या काम हाती घेवून त्यासाठी बल -१ निविदा मागविल्या असता प्राप्त निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदापजत्रकीय दरापेक्षा १२.९९ % जास्त दराची श्री.शेख उमर यांची निविदा आहे. परंतु दर जास्त वाटत असल्यामुळे मा. आयुक्तांचे दालनात झालेल्या वाटाघाटीच्या चर्चेअंती मक्तेदार सदर काम अंदापजत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८८/६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.७० ज्योतीनगर प्रभागात मनपा वाचनालयावर एक हॉल बांधणेसाठी, ज्याच्या उपयोग ज्योतीनगर परिसरातील होतकरू विद्यार्थ्यांना अभ्यासिका म्हणून देखिल उपयोगात आणता येईल. बाबत सा.बां. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दर सुची नुसार रक्कम रू.२,८३,८८०/- चे अंदापजत्रकात तयार करण्यात आले आहे व त्यास मा. आयुक्तांनी दिनांक ९.८.९६ अन्वये मंजुरी दिली आहे. सबब सदर कामाचे रक्कम रू.२,८३,८८०/- चे अंदापजत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर. सदर कामाचा खर्च सन ९६-९७ या वर्षात इतर वाचनालय या लेखाशिर्षकामधून करण्यात येईल.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार वार्ड क्र.७० ज्योतीनगर प्रभागात मनपा वाचनालयावर एक हॉल बांधणेसाठी, ज्याचा उपयोग ज्योती नगर परिसरातील होतकरू विद्यार्थ्यांना अभ्यासिका

म्हणून देखील उपयोगात आणता येईल या कामाकरीता सा. बां. खात्याचे जिल्हा दरसुची नुसार र.रू.२,८३,८८०/- च्या अंदापजत्रकात व सदर कामाचा खर्च सन ९६-९७ या वर्षात इतर वाचनालय या लेखा शिर्षामधून करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८९/७:**

जकात अधिक्षक यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, औरंगाबाद महानगरपालिका स्थायी आदेश अनुसूची "एम" प्रमाणे महानगरपालिका हदद्‌ीतील प्रवेश करणाऱ्या व शहराबाहेर जाणाऱ्या वाहनासाठी जकात बाबत रहदारी की(ट्राझिट की) ही शासन निर्णय क्र.ए.एम.सी./१६९१/६७३७/सीआर-१३४/९१/नवि-२४, मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ५ ऑक्टोंबर १९९१, अन्वये प्रत्येक वाहनासाठी हरदारी की म्हणून रक्कम रू.१०.०० (दहा फक्त) आकारण्यात येत आहे.

परंतू सन १९९६-९७ च्या मुळ अंदापजत्रकात रहदारी की (ट्रांझिट की) मध्ये वाढ दर्शवून शहरात प्रवेश करणाऱ्या आणि शहराबाहेर जाणाऱ्या वाहनांवर रू.१०.०० प्रति वाहनऐवजी रू.२०.०० अशी वाढ करून या वाढीमुळे महानगरपालिकेस दरवर्षी ७५ लाखाचे अतिरिक्त उत्पन्न मिळेल असे नमुद केले आहे तेव्हा सन १९९६-९७ या आर्थिक वर्षाकरीता दिनांक १९.२.९६ ला स्थायी समिती सभागृहाने मान्यता देवून सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभा दिनांक ११.३.९६ रोजी भरलेल्या सभेत मान्यतेस्तव ठेवण्यात आलेला होता त्यात विषय क्र.१६०/१ वर सविस्तरपणे विचार विनिमय होवून दिनांक १२.३.९६ च्या सर्वसाधारण सभेत सन १९९६-९७ च्या मुळ अंदापजत्रकात सर्वानुमते ठरावास मान्यता दिलेली आहे.

परंतु मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४६६(१) व (२) अन्वये रहदारी फी (ट्राझिंट फि)मध्ये वाढ करीत असतांना सदरच्या सुधारित अनुसूचि "एम" ला उक्त कलम ४६६(१) च्या (अ) ,(क) व (२) प्रमाणे शासनाची मंजुरी घेण्यासाठी एक स्वतंत्र अंतिम ठराव पारित करून प्रस्ताव शासनास वाढविण्यासाठी स्थायी समिती सभागृहापुढे प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका स्थायी समिती अनुसुचि "एम" प्रमाणे महानगरपालिका हदद्‌ीमध्ये प्रवेश करणाऱ्या व शहराबाहेर जाणाऱ्या माला साहित्य किंवा नविन वाहनासाठी रहदारी फी (ट्राझिंट फि) रू.१०.०० प्रस्तावित शासनाच्या निर्णयाप्रमाणे होती. वर्ष १९९६-९७ चे अंदाजपत्रकीय महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा दिनांक ११.३.९६ व दिनांक १२.३.९६ मध्ये मुळ अंदाजपत्रकाच्या ठरावास सर्वसाधारण सभेने ७५ लाखाच्या अतिरिक्त (वर्षाकाठी) उत्पन्न वाढण्याच्या दृष्टीकोनातून रहदारी फी (ट्राझिंट फि) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६६(१) व (२) अन्वये रहदारी फी (ट्राझिंट फि) १०/- रूपया वरून २०/- रूपये सुधारित अनुसूची "एम" व कलम ४६६(१) च्या (अ) (फ) व २ अन्वये सर्वानुमते मंजुरी देण्यांत येवून सदरील ठराव शासनास पाठविण्यात यावे.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९०/८:**

लेखाधिकारी -१ यांनी प्रस्ताव सादर केला कि, महानगरपालिकेचे पशुधन विकास अधिकारी हे म्हैसुर येथे प्राणी संग्रहालयासाठी हत्ती आणण्याकरीता गेले आहेत. त्यांनी फक्सद्वारे संदेश देवून कळविले आहे कि, हत्तीवर स्वारी करण्यासाठी आवश्यक लागणारे साहित्य सर्व करासहित रू.४५,१३१/- किंमतीचे आहे करिता सदरील साहित्य तात्काळ खरेदी करण्यास्तव स्थायी समितीची मान्यता व्हावी. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार महानगरपालिकेने पशुधन विकास अधिकारी हे म्हैसुर येथे प्राणी संग्रहालयासाठी हत्ती आणण्याकरीता गेले आहेत हत्तीवर स्वारी करण्यासाठी आवश्यक लागणारे साहित्य म्हैसुर येथून खरेदी करण्याकरीता आलेला खर्च र.रू.४५,१३१/- या सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "जन गण मन " या राष्ट्रगिताने सभा संपली.

स्वाक्षरित /-
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

स्वाक्षरित /-
सभापती ,
स्थायी समिती
महानगरपालिका औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ३०.८.९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त शुक्रवार दिनांक ३०.८.९६ रोजी दुपारी ठिक ३.०० वाजता मा. सभापती स्थायी समिती श्री.गिरजाराम हाळनोर यांचे अध्यक्षतेखालील स्थायी समिती सभा संपन्न झाली. सभेस निम्ननिर्दिष्ट स.सभासद तसेच मनपा अधिकारी उपस्थित होते.**

स.स.श्री. गौतम खरात
स.स.सौ. रजनी जोशी
स.स.डॉ.भागवत कराड
स.स.श्री.कंवरसिंग बैनाडे
स.स.कु.माया लाडवाणी
स.स.श्री.विजयकुमार मेहेर
स.स.श्री.महादेव सुर्यवंशी
स.स.श्री.हमीदउद्यीन ताबा
स.स.श्री.भगवान घडामोडे
स.स.श्री.सुभाष टाकळकर
स.स.श्री.अभिमन्यु भालेराव
स.स.श्री.कचरू नवपुते
स.स.श्री. विकास जैन
स.स.श्री.रशिद खान (मामू)
सभेची सुरवात वंदे मातरम् या गीताने झाली.

**संवाद:**

**श्री.विकास जैन:** अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना २४ तास काम करावे लागते लिडींग ऑफीसर व सर्व ऑफीसर यांना प्रतिमहा अनुक्रमे ३०० व ४०० रूपये अतिरिक्त भत्ता देण्यांत यतो. तसेच वाळूज एम.आय.डी.सी. मधील अनेक जागा रिक्त आहेत. त्या केव्हा भरणार कर्मचाऱ्यांना सध्या अतिरिक्त भत्ता देण्यांत येत नाही. याबाबत खुलासा व्हावा.

**अग्निशमन अधिकारी :** चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना आठ तास डयुटी करावी लागते. लिडींग फायरमन व सब ऑफीसर यांच्या कार्यपध्दतीत बाबत इतर मनपांकडून माहिती मागविण्यात आलेली आहे. इतर मनपांकडून जादा कामासाठी स्पेशल अलाउन्स दिला जातो. या संदर्भाने आयुक्तांशी चर्चा झालेली आहे. १२ तास काम करण्यासाठी लिडींग फायरमन तयार झालेले आहेत. आठ तासापेक्षा जादा झालेल्या कामाचा त्यांना नियमाप्रमाणे भत्ता देण्यांत येईल.

**मा.सभापती :** मनपातील विविध पद भरण्यासाठी शासनाची मंजुरी आवश्यक आहे. शासनाकडे या संदर्भाने पाठपूरावाही करण्यांत येत आहे याच आठवडयात या संदर्भाने मंत्रालयात मा. मंत्री महोदया समवेत बैठक झालेली आहे. मंजुरी मिळताच जागा भरण्याची कार्यवाही व्हावी.

**उप आयुक्त-१:** शासनाकडे २०० सफाई कामगाराची पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव फार पुर्वीच सादर करण्यात आालेला आहे. त्यात शासनाकडून काही मुद्यांवर सविस्तर

अहवाल मागितलेला आहे. अग्निशमन विभागातील पदांचीही मागणी स्वतंत्ररित्या करण्यांत आलेली आहे.

**श्री.रशिद खान (मामू),हमीदउद्यीन ताबा :** २०० पदे भरण्याबाबतचे प्रस्तावावर शासनाकडून फार पूर्वीच कचेरी आलेली आहे त्याचे उत्तर देण्यांत विलंब का झाला.

**डॉ.मेहेर:** मनपा मध्ये काही कर्मचारी मागील अनेक वर्षापासून ठराविक वेतनावर काम करत आहेत. त्यांना मनपा अस्थापनेवर सामावून घेण्याबाबत विचार व्हावयास हवा. अन्यथा त्यांना वयाधिकयामुळे नोकरीस मुकावे लागेल.

**मा.सभापती :** हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मांडावा लागेल अर्थसंकल्पाच्या किती टक्के खर्च अस्थापनेवर करता येतो या संदर्भाने शासनाचे नियम आहेत. विविध पदे भरत असतांना त्याचाही विचार करावयास हवा.

**श्री.हमीद ताबा :** शिक्षण विभागातील चौकीदाराच्या तसेच पाणी पुरवठा विभागातील लाईनमनच्या जागा अनेक वर्षापासून रिक्त आहेत त्या भरण्याची कार्यवाही का केली जात नाही.

**मा.सभापती :** रिक्त जागा भरण्याबाबत प्रशासनाने त्वरीत कार्यवाही करावी.

**श्री.गौतम खरात :** मुख्य अग्निशमन अधिकारी यांची प्रथम नियुक्ती स्टेशन ऑफिसर म्हणून झालेली होती. औरंगाबाद महानगरपालिकेत मुख्य अग्निशमन अधिकाऱ्यांची गरज आहे का ? एकूण वर्क लोड किती याचा विचार करूनच मुख्य अग्निशमन अधिकारी पदाच्या आवश्यकतेबाबत विचार व्हावयास हवा. शासकीय नियमाप्रमाणे बारा वर्षाच्या सेवेनंतर कर्मचाऱ्यांस पुढील वेतनश्रेणी मिळावयास हवी. मात्र अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना अद्यापपावेतो ही वेतनश्रेणी देण्यांत आलेली नाही. अग्निशमन अधिकारी श्री.झनझन यांनी याबाबत खुलासा करावा. कोर्टात स्टेटमेंट दिल्या नंतरही कर्मचाऱ्यांचा ओव्हर टाईम बंद करण्यात आलेला आहे.

**मा.सभापती :** आर.आर.बाबत निर्णय घेण्यास सर्वसाधारण सभा सक्षम आहे. कायद्याच्या चौकटीत सर्व साधारण सभा आर आर संदर्भाने योग्य तो निर्णय देईल.

**श्री.रशिद मामू :** आर आर मुळे काही विशिष्ट अधिकारी/ कर्मचारी यांना अनावश्यक कायदा मिळालेला आहे.

**हमीद ताबा :** आर आर ला अर्थ मंत्रालयाची मंजुरीही मिळालेली नाही त्यमुळे तो रदद् करण्यात यावेत व आर आर मुळे ज्यांना अनावश्यक फायदे मिळालेले आहेत तेही परत काढून घेण्यात यावेत.

**डॉ.कराड :** आर आर बनविण्यासाठी एक स्वतंत्र कमेटी स्थापन करण्यात यावी.

**मा.आयुक्त :** अग्निशमन दलातील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या सेवा या अत्यावश्यक आहेत. आपल्या मनपातील अग्निशमन दलाने विविध दुर्घटनांच्या वेळी चांगल्याप्रकारे काम केलेले आहे. या विभागातील कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित केले गेले पाहिजे. या विभागातील कर्मचाऱ्यांना ओव्हर टाईम कशाप्रकारे देता येईल याचा निश्चितपणे विचार केला जाईल. या संदर्भाने मुख्य अग्निशमन अधिकारी , उप आयुक्त -२ लेखाधिकारी-१, यांची कमेटी स्थापण्यात येते. त्यांनी अहवाल सादर करावा. त्यावर प्रशासन विचार करेल. आर आर च्या संदर्भाने वेगळी चर्चा करावयास पाहिजे अनेक रिक्त पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेले आहे . मंजुरी बाबत पाठपुरावाही करण्यात येत आहे.

**डॉ.कराड :** पाणी पुरवठा, अग्निशमन यांच्या सेवा बरोबरच आरोग्य विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांच्याही सेवा अत्यावश्यक समजावयास हव्यात अनेक प्रकारच्या आपत्कालीन परिस्थितीत त्यांनाही काम करावे लागते. त्यांच्या सेवा व अलाउन्सेस याबाबतही विचार करण्यात यावा.

**रशिद मामू :** आपल्या कडील दवाखाने चोवीस तास चालू नसतात. त्यामुळे त्यांनी अतिरिक्त काम करण्याचा प्रश्नच येत नाही.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी:** सिडको एन-८ येथे मनपातर्फे आरोग्य केंद्र चालविले जाते ते चोविस तास चालू असते मात्र तेथे कर्मचाऱ्यांना आठ आठ तास काम वाटून दिलेले आहे.

**गौतम खरात :** शिक्षण विभागासाठी शासनाकडून अनुदान मिळत असतांनाही या विभागातील सेवकांची पदे भरली जात नाहीत. आज मनपात चतुर्थश्रेणीत दैनिक वेतनावर ६०० लोक काम करत आहेत. या जागा तातडीने भरावयास पाहिजेत अन्यथा लोक एजबार त्यांना नोकरी पासून मुकावे लागेल.

**मा.सभापती :** कोर्टाच्या आदेशाप्रमाणे प्रतिक्षा यादी तयार करण्यात आलेली आहे. त्यातुनच या जागा भरल्या जातील. दैनिक वेतन कर्मचाऱ्यांना वेतन कर्मचाऱ्यांना वेतनवाढीच्या संदर्भाने शासनाचे नॉर्मस पाळले पाहिजेत. सध्या मनपाच्या अस्थापनेवर ३७% खर्च होत आहे.

**हमीद ताबा :** लाईनमनच्या जागा मागील दिड वर्षापासून भरल्या गेल्या नाहीत. त्या जागा भरल्या गेल्या पाहिजेत जी.प.तील शिक्षकांना मनपा सेवेत घेवू नये. असा निर्णय झाला. असतांनाही तो निर्णय पाळला गेला नाही. शिक्षक भरती संदर्भात आयुक्तंचा काही संदर्भ येत नाही. परंतु सर्वसाधारण सभेच्या निर्णयाप्रमाणे जे जिल्हा परिषदेतील शिक्षक आहेत त्यांना का काढण्यात आले नाही.

**उप आयुक्त :** सचिवाकडून ठराव प्राप्त झालेला नाही.

**सचिव :** मा. महापौर बाहेर गावी गेलेले असल्याने सर्वसाधारण सभेच्या ठरावावरती त्यांची स्वाक्षरी झालेली नाही. मा. महापौरांची इतिवृत्तावरती स्वाक्षरी प्राप्ती नंतर सदरील ठराव प्रशासनाकडे पाठविण्याची व्यवस्था करता येईल.

**गौतम खरात:** स.सभापतींच्या मुंबई दौऱ्याबाबत तरूण भारतमध्ये बातमी प्रसिध्द झालेली आहे. आपल्या स्वीय सहाय्यकांनी मुंबईस जाण्यासाठी प्रशासनाची परवागनी घेतली होती काय ? संचिका अशा प्रकारे मुंबईस नेता येतात काय ? आपले खाजगी सचिव हे काम करू शकतात काय ?

स.सभापती : स्थायी समिती सभेची तारीख पुर्वीच ठरलेली होती व विकासाची कामे केवळ मंजुरी अभावी प्रलंबित राहू नयेत यासाठी मी संचिका मुंबईस मागविल्या होत्या. माझे स्वीय सहाय्यक श्री.संगमकर यांनी प्रशासनाची रितसर परवानगी घेतलेली आहे. अशा प्रकारची कामे खाजगी सचिवास सांगण्याचा प्रश्नच येत नाही. प्रशासनाची कामे प्रशासनाचे अधिकारी कर्मचारी पार पाडतात. या दौऱ्यासाठी स्थायी समितीतच ठराव झालेला आहे. आम्ही स्टडी टूरवर जात आतसंना श्री.गौतम खरातांनी जाकत अधिक्षकांकडे काही कामांच्या संदर्भाने चर्चा केलेली होती. बहूदा ती झाली नसावीत याचा त्यांना राग आलेला दिसतो.

**गौतम खरात :** आपण प्रशासकीय कामे आपल्या खाजगी सचिवामार्फत करून घेता ही बाब बरोबर नाही. संचिका कार्यालयाच्या बाहेर पाठविता येतात काय याचा आयुक्तांनी खुलासा करावा.

**हमीद ताबा :** वृत्तपत्रातील बातम्यांनी आपणावर गंभीर आरोप लावलेले आहेत. दैनिक एकमत निधी बातमीचा आपण खुलासा करावा इतर मनपा आपल्या मनपाकडूनच अनेक प्रश्नांवर मार्गदर्शन घेत असतांना आपण त्या मनपांना भेट कशासाठी द्यावयाची.

**महादेव सुर्यवंशी :** स.स.श्री. हमीद ताबा यांचे म्हणणे चुक आहे. इतर मनपा आपल्याकडून काही प्रश्नांवर मत मागवित असल्या तरी आपल्या मनपा बरोबरच अस्तित्वात आलेल्या मनपाची विशेषतः ठाणे, नाशिक मनपांची आर्थिक परिस्थिती आपल्याप्रक्षा खूपच चांगली आहे. आज आपल्या मनपाची मालमत्ता कराची तीस कोटी रूपयाची थकबाकी आहे. वृत्तपत्रातील बातम्यांची सत्यता प्रथम पडताळून पहावयास पाहिजे.

**घडामोडे :** झालेल्या खर्चाचा हिशोब मागण्याचे अधिकार सर्वानाच आहेत. वृत्तपत्रात नेहमीच पदाधिकाऱ्यांच्या संदर्भाने बातम्या येतात.यामुळे सर्वच बातम्या या पूर्ण सत्य नसतात. त्यामुळे सभागृहाचा व पदाधिकाऱ्यांचा अपमान होतो. सभागृहाचा मान राखला जाईल असे सर्वानीच वर्तन करावयास हवे. जनतेने आपणास त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी या सभागृहात पाठविलेले आहे.

वृत्तपत्रातून पदाधिकाऱ्यांवर काही आरोप होत असतील तर प्रथम त्यांची सभागृहाची माहिती दयावयास हवी. उलट सुलट बातम्यामुळे जनतेच्या मनातही संभ्रम निर्माण होतो.

**रशिद मामू :** स्थायी समितीच्या निर्णयासाठी आलेल्या संचिकांची संपूर्ण माहिती सभापतींनी सभागृहाला दयावयास हवी त्यांनी संचकिा, प्रलंबित ठेवू नये.

**मा.आयुक्त :** मनपाच्या तीन स्टॅटयुटरी बॉडीज आहेत जनरल बॉडी ही सर्वोच्च बॉडी आहे. त्यानंतर स्थायी समिती व त्यानंतर आयुक्तांचे प्रशासन जनरल बॉडीच्या बैठका या नेहमीच होवू शकत नाहीत म्हणून दैनंदिन विकासाची कामे पार पाडण्यासाठी स्थायी समितीची निर्मिती झालेली आहे.

**मा.सभापती :** कोणते विषय सभेसमोर ठेवावयाचे हे अधिकार सभापतीचे आहेत.

**हमीद ताबा :** काही दिवसांपुर्वी एका युनीयनला त्यांचा बोर्ड लावण्याबाबत मनपा प्रांगणात जागा देण्यात आली. कायदयाने मनपा अशा प्रकारे जागा देवू शकते का ?

**मा.सभापती :** यानंतर असे प्रकार घडणार नाही याची खबरदारी घेतली जाईली संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना बोलावून बोर्ड मनपा प्रांगणाबाहेर लावण्याबाबत विनंती केली जाईल. स्थायी समितीत शहर विकासाचे प्रश्न चर्चिले जावेत इतर विषयांवरती चर्चा होवू नये अशी माझी विनंती आहे.

**रशिद मामू :** पशुखाद्या संदर्भाने काही दिवसांपूर्वी प्राणी संग्रहालयात काही प्रश्न निर्माण झाले होते. एक नगरसेवक स्वतःच तेथे पशुखाद्य पुरवू इच्छितात. या संदर्भाने उप आयुक्तांची भेट दिल्यानंतर व तेथील बीफची परत माजणी वगैरे झाल्यानंतर त्यांचा पंचनामा झाला होता काय ? याबाबत काही पोलिस केस वगैरे झाली आहे काय ?

**पशुधन विकास अधिकारी :** प्राणी संग्रहालयात येणाऱ्या पशुखाद्यावरती मा.नगरसेवकांनी काही शंका घेतल्या होत्या पशुखाद्याची क्वालीटी चांगली होती. आम्ही करत असलेल्या कामावरती अविश्वास दाखविण्यात येवू नये.

**उप आयुक्त -२:** पशुखाद्या संदर्भाने प्राणी संग्रहालयास भेट दिली त्यावेळी शासनाचे सह संचालकही उपस्थित होते. त्यांच्या समक्ष बिफची पाहणी करण्यात आली. बिफमध्ये हडड्ीचे प्रमाण ६०.४० असावे असा संकेत आहे. मी बिफ मोजून पाहिले असता ते बरोबर निघाले पंचनामा करण्यात आला नाही.

**मा.सभापती :** नगर सेवकांनी अधिकाऱ्यांना माहिती आवश्य विचारावी मात्र त्यांच्या कामावर अविश्वास दाखवू नये. जर कोणी नगरसेवक अधिकाऱ्यांना विनाकारण त्रास देत असेल तर त्यांनी अशा गोष्टी मा. आयुक्तांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व त्यावर आयुक्तांनी कार्यवाही करावी.

**भालेराव :** मनपा सिध्दार्थ उद्यानात मनपा शाळेतील जे विद्यार्थी सहलीसाठी जातात त्यांच्या कडून प्राणी संग्रहालय पाहण्यासाठी फीस आकारण्यात येवू नये याच बरोबर शिक्षकांना घरे बांधण्यासाठी मनपाने जागा तसेच कर्ज उपलब्ध करून द्यावे.

**स.सभापती :** तृतियश्रेणी कर्मचाऱ्यांना घरे मिळावीत यासाठी सासायटी स्थापण्यांत यावी व त्यांना लिजवर जागा देण्यांत यावी. अशा सोसायटीस एचडीएफसी ,एमएसएफसी कडून कर्ज उपलबध करून देवून घरे बांधण्यासाठी मदत करण्यात यावी.

**हमीद ताबा :** विद्युत विभागात मटेरीयल नसल्याने शहरातील बऱ्याच भागात अंधार असतो. मटेरियल सप्लाय करण्यासाठी औरंगाबादच्या डिलर्सना ऑडर्स का दिल्या जात नाहीत.

**मा.सभापती :** विद्युत मटेरीयल खरेदी करण्यासाठी मोठया प्रमाणावर खर्च येतो स्थानिक डिलर स्वतःचा नफा काढून घेवूनच मटेरियल पूरवतात. कंपीनकडून माल घेतल्यास कंपनी मनपास काही प्रमाणात डिसकाऊंट देते. त्यामुळे मनपाचा आर्थिक फायदा होते. मटेरीयल पर्चेस करण्यासाठी कंपनीकडून कोटेशन मागविण्याबाबत आदेश दिलेले आहेत तथापी अत्यावश्यक साहित्य मा. आयुक्तांनी खरेदी करावे.

**डॉ.कराड :** जे साहित्य कंपनीकडून कमी दराने मिळते त्यांच्याकडून खरेदी करण्यात यावे. इतर साहित्य लोकल डिलरकडून खरेदी करण्यांत यावे.

रंग मंदिरातील खुर्च्या फॅन चांगलया स्थितीत नाहीत. नेहरू भवन मधील खुर्च्या व इतर साहित्य अंत्यंत मोडकळीस आलेले आहेत ते तातडीने दुरूस्त करण्यात यावे.

**मा.सभापती :** रंग मंदिराची पाहणी करून दुरूस्ती बाबत आदेश दिलेले आहेत.

**उप अभियंता :** स.सभापतींच्या आदेशानुसार खुर्च्या पडदे बदलण्याची कार्यवाही चालू आहे या संदर्भाने संचिका तयार करण्यात आलेली आहे.

**उप अभियंता (विद्युत):** रंग मंदिरातील संपूर्ण लाईटस् सुरू करण्यांत आलेल्या आहेत. १०० वॅटचे अतिरिक्त बल्बही देण्यांत आलेले आहेत. बुकींग कॅबीनचे कामही करण्यांत आलेले आहे.

**स.सभापती :** संत एकनाथ रंग मंदिरातील साऊंड सिस्टीम बरोबर नसल्याने ती बदलण्यात यावी.

**घडामोडे :** मागणी झाल्यानंतरच काम व्हावयास पाहिजे अशी पध्दत नसावी. अधिकाऱ्यांनी स्वतः पाहणी करून कामे करवून घ्यावीत.

**डॉ.कराडः** प्रोग्रामसाठी ठेवण्यात आलेले डिपॉझीट परत करण्यापुर्वी मोडतोड झालेल्या मटेरीयलची पाहणी करून तेवढे पैसे डिपॉझिट मधून कपात करून घेण्यात यावेत.

**स.सभापती :** मा. आयुक्तांनी यांची दखल घ्यावी. रंग मंदिर ,नेहरूभवन आदि ठिकाणी नेहमीच कार्यक्रम होतात. फर्निचरची मोडतोड पाहता ते वेळीच दुरूस्त व्हावे. यासाठी एक कारपेंटर घेण्यात यावा. या कामाबरोबरच कार्यालयातील किरकोळ दुरूस्तीची कामेही तो करू शकेल.

**नवपुते :** मनपाच्या शाळांना अनेक शाळांमधून पुरेसे फर्निचर नाही. फर्निचरचा शाळांना त्वरीत पुरवठा करण्यात यावा.

**मा.सभापती :** मनपाच्या शाळांना चांगल्या दर्जाचे पुरविण्यात यावे.

**सुभाष टाकळकर :** अमरप्रीत ते चेतनानगर डी.पी.रस्त्याचे काम चालू असतांना व हे काम १५ टक्के कमी दराचे असतांना यातील तीन लाख रूपयाचे ाकम श्री.कुलदिपसिंग या कंत्राटदारास का देण्यात आले. तेही इस्टीमेट रेटने कसे दिले होते.

**शहर अभियंता :** टेंडरमधील कामांना उशिर लागेल म्हणून हे काम आयुक्तांचे परवानगीने दिलेले आहे.

**मा.सभापती :** मा. आयुक्तांनी सदरील संचिका मागवून सभागृहात माहिती दयावी.

**हमीद ताबा** : रंगारगल्लीतील रस्त्याची प्रस्तावित रूंदी कमीकरण्यात येणार आहे. या संदर्भाने बैठकही झालेली आहे. माझ्या वॉर्डातीलही रस्ता ४० फुट ऐवजी ३० फुट करावा अशी त्या भागातील नागरिकांची मागणी आहे. या रस्त्यांतील बांधित होणाऱ्या ५० टक्के मालमत्ता मनपाने संपादित केलेल्या आहेत. उर्वरित मालमत्ता तातडीने संपादित मालमत्तांवरही अतिक्रमणे वाढत जातात मालमत्ता संदादित करण्या संदर्भाने मी वारंवार नगर रचना अधिकाऱ्यांच्या भेटी घेतलेल्या आहेत. तेव्हा या प्रकरणातही लक्ष घालून रस्ता रूंदीकरणाचे काम पूर्ण करण्यात यावे.

**मा.सभापती :** रंगारगल्ली रूंदीकरणाचा प्रश्न सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाने सोडविण्यात आलेला आहे. तथापी रस्त्यांची रूंदी किती असावी याबाबत सुप्रीम कोर्टाचे आदेश नाहीत. श्री.हमीद ताबा यांनी मांडलेल्या मागणीवरही प्रशासनाने विचार करून निर्णय घ्यावा.

**मा.आयुक्त :** रंगार गल्लीतील रस्ता ५० फुट होता या रस्ता रूंदीकरण संदर्भाने मागील १५-२० वर्षापासून कार्यवाही चालू आहे. सुप्रीम कोर्टाच्या निकालानंतर हा रस्ता ४० फुट की ४५फुट ठेवावा. याबाबत वाद चालू होता. या संदर्भाने अशातच या भागातील नागरिकांची एक बैठक बोलावण्यात आली होती. बैठकीत नागकरिकांनी हा रस्ता ४० फुटाचा असावा अशी मागणी केली. हा अधिकार सर्वसाधारण सभेचा आहे. प्लॅनिंग कमेटीस योग्य वाटले तर त्यांनी हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवावा व तो सर्वसाधारण सभेत संमत झाल्या नंतर तो शासनाकडे सादर केला जाईल व शासनास मंजुरीनंतर पुढील कार्यवाही केली जाईल. विकास आराखडयाप्रमाणे विविध ठिकाणच्या जागा संपादित करण्यासाठी २०० कोटी पेक्षा जास्त पैसा लागण्याची शक्यता आहे ज्यांचे अक्वायर्ड डिक्लेअर झालेले आहे अथवा जेथे रस्त्यांची कामे प्राधान्याने हाती घेण्यांत येणार आहेत.

**रशिद खान मामू :** रंगारगल्लीतील रस्त्यात बाधित होणाऱ्या मालमत्ता रंगारगल्लीच्या पुढे ५० फुटासाठी संपादित केलेल्या आहेत. तर मग हाही रस्ता रंगारगल्ली बरोबर ४० फुट होणार का ? रस्ता जर ४० फुट होणार असेल तर दिल्या गेलेल्या संपादीत जागेच्या मोबदल्याचे काय ?

**मा.सभापती :** संपादीत जागेचा मावेना पुर्णपणे पैशात देण्या ऐवजी मागणी केल्यास पर्यायी जागा, एफएसआय वाढवून देणे आदी वादींचाही विचार केला जाईल.

**गौतम खरात :** शासनाकडून मायनर मॉडीफिकेशनची परवानगी मिळालेली नसतांनाही जीवनबाई तपाडीया चॅरिटेबल ट्रस्टला वृध्दाश्रम बांधण्याची परवागनी कशी देण्यात आली. याचा खुलासा व्हावा.

**स.सभापती:** ही शासनाची योजना आहे. नियमानुसारच कंडिशनल परवानगी देण्यांत आलेली आहे.

**हमीद ताबा :** झुणका भारक केंद्रासाठी देण्यात येणाऱ्या जागेबाबत मनमानी चालू आहे अशा प्रकारच्या संचिका नगर रचना विभागाकडून यावयास पाहिजेत. शहागंज भाजी मंडईत झुणका भाकर केंद्रासाठी जागा मागण्यात आलेली आहे. यासाठी नगर रचना विभागाचे अभिप्राय हवेत असे मालमत्ता अधिकारी यांचे म्हणणे आहे.

**मालमत्ता अधिकारी :** या ठिकाणी झुणका भाकर केंद्रासाठी पडक्या बांधकामाची परवानगी मागितलेली आहे. अशा प्रकारची परवानगी नगर रचना विभागाकडूनच दिली जाते.

**डॉ.मेहेर:** सदरच्या झुणका भाकर केंद्रा शे्जारी अनेक अनाधिकृत टपऱ्या आहेत त्यांचया सदरच्या झुणका भाकर केंद्रासाठी विरोध आहे. या केंद्रासाठी बाजूला जागा देण्यांत यावी. असा मा. आयुक्तांना समोर निर्णय देण्यांत यावा असा मा. आयुक्तांसमोर निर्णय देण्यांत आलेला आहे. बांधकाम थांबविण्यासाठी संबंधितांनी पत्र द्या ावे असे मालमत्ता अधिकारी यांनाही सांगण्यात आले होते.

**मा. अधिकारी :** सदरची संचिका उप आयुक्त-२ यांचेकडे पाठविण्यात आलेली आहे काम बंद करावत असे आदेश सदर संचिकेत नाहीत.

**डॉ.मेहेर :** सदरच्या प्रकरणात काही कायदेशिर गुंतागुंत निर्माण होवू नये म्हणून वेळीच कार्यवाही करण्यात यावी.

**हमीद ताबा :** झुणका भाकर केंद्रासाठी जागा घेण्याबाबत प्रथम नगर रचना विभागाचे अभिप्राय घेण्यात यावेत. सध्या फुटपाथ्वर, मंत्र्यांजवळ जागा देण्यात येत आहे. हे बरोबर नाही. स्टेशन परिसरात मुत्रीजवळच झुणका भाकर केंद्रासाठी जागा देण्यात आलेली आहे. आरोग्याच्या दृष्टीकोनातुन बरोबर नाही. ती तेथून हटविण्यात यावी.

**स.सभापती :** स्टेशन भागातील झुणका भाकर केंद्राजवळ मुत्री हटविण्याची कार्यवाही प्रशासकीय अधिकारी यांनी करावी.

**मा.आयुक्तः** शहागंज येथे झुणका भाकर केंद्रासाठी स्थायी समितीनेच जागा मंजुर केलेली आहे. त्या भागातील स.नगरसेवक श्री.जावेद रज्जाक व ३०,४० नागरीक माझ्याकडे आले होते. सदरच्या झुणका भाकर केंद्रास त्यांनी विरोध दर्शविला. कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न यामुळे निर्माण होईल अशी भूमिका मा. आमदार श्री.बसैये बंधू व डॉ.मेहेर यांनी घेतली ही योजना शासनाची असल्याने त्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही. यांची

खबरदारी घ्यावयास हवी. या दृष्टीकोनातून तेथेच थोडीबहूत आजूबाजूस जागा पहावी अशा सूचना संबधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या होत्या. मनपा केंद्रासाठी जागा देत असली तरी केंद्रासाठी मंजूरी जिल्हाधिकारी देत असतात.

**सुभाष टाकळकर :** औरंगपूरा भाजी मंडईत २४ नंबरचा एक गाळा अपंग महिलेस दिलेला आहे परंतु सदरची महिला अपंग नाही. या गाळावाटपाची माहिती देण्यांत यावी.

**मा. आयुक्त :** पूर्वी हा गाळा एका महिलेस चालविण्यासाठी दिलेला होता मागील एक दिड वर्षापासून त्याचे भाडे भरले गेलेले नव्हते. या गाळयाची मागणी या गाळयाच्या बाजूस असलेल्या गाळेधारकाने केलेली होती. तेव्हा सदरच्या महिलेने सर्व भाडे भरण्याची तयारी दर्शविली.

**श्री.गौतम खरात:** प्रथम श्रीमती सुशीला राजपत यांनी गाळयाची मागणी केलेली होती. परंतू ही महिला अपंग नाही.

**उप आयुक्त -२:** प्रत्यक्षात गाळा चालविणारी महिला ही अपंग आहे.

**डॉ.कराड :** गाळा चालविण्यासाठी ज्या महिलेस दिला ती जर अपंग नसेल तर गाळा देण्यात अर्थ नाही.

**रशिद मामू :** काही लोकांनी मनपाची जागा किरायाने घेवून व्यापारासाठी इतरांना दिलेल्या आहेत अशा जागा मनपाने परत घेतल्या पाहिजेत.

**सौ.जोशी :** कामधेनू सहाकरी गृहनिर्माण संस्थेतील भूखंड धारकांनी मनपाकडे शंभर टक्केविकास कर भरलेलो आहे. मात्र या भागात मनपाने नागरी सुविधा पुरविलेल्या नाहीत. अशातच या भागात दरोड पडला होता. तेव्हा या भागात विद्युत दिवे लावण्याची तात्काळ व्यवस्था करावी.

**स.सभापती :** उप अभियंता (विद्युत) यांनी या भागात विद्युत व्यवस्था करण्यात यावी.

**रशिद मामू :** बारापुल्ला रस्त्यावर नेहमी ड्रनेज वहात असते. काही नागरिकांनी अनाधिकृत बांधकामे करून रस्त्याची जागा बळकावली आहे. ही अतिक्रमणे का काढली जात नाहीत. एका नागरीकाने मनपाच्या ड्रनेज लाईनवरच अतिक्रमण केलेले असल्याने मनपा तेथून लाईन टाकू शकत नाही.

**का.अभियंता (पापू):** या भागातून एक जुनी सीवर लाईन गेलेली आहे. गेटला लागून एक मालमत्ता आहे. मालमत्ता धारकाने जागेबाबत वाद निर्माण केलेला आहे. व कोर्टाचा स्टे आणलेलो आहे. तो व्हॅकेट भरण्याबाबत प्रयत्न करण्यात येत आहेत.

**स.सभापती :** सदरचा स्टे लवकर व्हॅकेट करण्याबाबत प्रयत्न करण्यात यावेत.

**गौतम खरात :** अशातच दोन तीन कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आलेले आहे. त्यांना सेवेत परत घेण्याबाबत सहानुभुतीपूर्वक विचार व्हावा.

**विषय क्र.१९१/१:**

दिनांक ९.८.९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**डॉ.मेहेर :** रेल्वे स्टेशन रस्त्यावरील डि.पी. हलवून इतरत्र यावी. अशी मी गत स्थायी समिती बैठकीत मागणी केली होती.

**मा.आयुक्त:** या रस्त्यावरील ट्रॅफीक पाहता ती हलविणे जरूरीचे आहे कारण ही डी.पी.रोड वाईडिंग मध्ये येते. अग्निशमन कार्यालयात एक १०X १२ फुटाची

जागा आहे. ज्या जागेत डी.पी.बसविण्याचा केवळ मानस आहे. यावर अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.

**स.सभापती :** अतिरिक्त शहर अभियंता यांनी पाहणी करावी व योग्य ठिकाणी जागा उपलब्ध करून दयावी.

**डॉ.कराड :** डी.पी.कंपाऊंड मध्ये करण्या बाबत.

**डॉ.मेहेर :** आपल्या अग्निशमन कार्यालयाजवळ बरीच मोठी जागा उपलब्ध आहे . तेथे डी.पी. बसविण्यात यावी.

**कचरू नवपुते :** दिनांक ९.८.९६ च्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ९ औद्योगिक वसाहतीतील कारखान्याकडून मालमत्ता कराची थकबाकी वसुल करण्या संदर्भाने प्रस्ताव मांडला होता. मालमत्ता कराच्या बऱ्याचशा केसेस न्यायप्रविष्ठ आहेत. टॅक्स वसुलीबाबत एक स्वॉड निर्माण करण्यात यावा.

**डॉ.मेहेर :** मालमत्ता कराचा थकबाकी पाहता मालमत्ता कराची वसुलींचा आढावा स्थायी सामिती बैठकीत घेण्यात यावा.

**सुर्यवंशी :** दिनांक ९.८.९६ च्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र.१० लाईन ९ वरील " संबंधित गुत्तेदाराशी कामाविषयी चर्चा करून निर्णय घ्यावा लागतो" या वाक्यात "गुत्तेदाराशी " ऐवजी अधिकऱ्यांनी असा शब्द असावयास पाहिजे.

**स.सभापती :** तशी दुरूस्ती करण्यात यावी.

**महादेव सुर्यवंशी :** दिनांक ९.८.९६ च्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र.११ वरती मागील स्थायी समिती बैठकीतील विषय क्र.१५३/५ मध्ये मोरेश्वर सोसायटी गारखेडा येथील कामाबाबत लघू निविदा काढाव्यात असे ठरले होते. परंतु इतिवृत्तात टेंडर म्हटले आहे तशी दुरूस्ती व्हावी.

**मा.सभापती :** ठराव क्र.१५३/५ मोरेश्वर सोसायटी गारखेडा येथील कामाबाबत टेंडर ऐवजी लघू निविदा अशी दुरूस्ती करण्यात यावी.

**डॉ.कराड:** स्मशान भूमीतील स्मशान जोगी नेमण्याबाबत काय कार्यवाही झाली तसे सौंदर्यीकरण अंतर्गत बऱ्याचशा चौकातून अभरण्यात आलेल्या ऑयलॅडस् मधील बरेचसे फोकस बंद आहेत ते चालू करण्याबाबत सूचना दिलेल्या होत्या परंतू ते अद्याप चालू झालेले नाहीत.

**अ.शहर अभियंता :** आपल्याकडे लाईनमनची संख्या भरपूर असली तरी विद्युत मंडळा कडून पुरेसा स्टॉफ मिळत नाही. यासाठी आपल्याकडे हायड्रॉनिक अँडर पाहिजे. येत्या आठ दिवसांत सर्व कामे पूर्ण होतील.

**स.सभापती:** एकदा टेंडर फायनल झाल्यानंतर सात दिवसांचे आत संचिका सचिवाकडे पाठविल्या गेली पाहिजे तसेच वॉर्डातील विद्युत आदिची कामे झाल्यानंतर संबंधित नगर सेवकांचे तसे पत्र घ्यावे.

**महादेव सुर्यवंशी :** पोल टाकण्याच्या संदर्भाने वृत्तपत्रात जाहिरात देण्यात येणार होते त्याचे काय झाले.

**ठराव:**

दिनांक ९.८.९६रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती इतिवृत्तात खालील दुरूस्त्यासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१ इतिवृत्तातील पृष्ठ क्र.९ वरती संबधित गुत्तेदारांशी चर्चा करून निर्णया घ्यावा लागतो या वाक्यात गुत्तेदार ऐवजी अधिकारी हा शब्द टाकण्यात यावा.

२ विषय क्र.१५२/५ मोरेश्वर सोसायटी गारखेडा कामाबाबत टेंडर ऐवजी शॉर्ट टेंडर अशी दुरूस्ती करण्यात येते.

३ दिनांक ९.८.९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तातील स्थगित ठराव क्र.१८२/२८ ला सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९२/२:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, मो. नागेश्वरवाडी येथील फुटब्रिज जवळ रिटेनिंग वॉल बांधणे या कामासाठी स.न.सेविका सौ.लता दलाल यांच्या विनंती नुसार व मा. आयुक्त यांचे आदेशानुसार पावसाचे पाणी नागरीकांच्या घरात घूसून होणारे संभाव्य हानी टाळणे करीता सदरील काम उपलब्ध कंत्राटदार श्री.पी.पी.फुजवरे यांचे कडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात आलेले आहे. सदर कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदापजत्रक र.रू.६४,७६३/- चे तयार करण्यात आले असून सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते सन १९९६-९७ या लेखा शिर्षकातून करण्यांत आलेला आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेली रक्कम रू.६४,७६३/- चे अंदापजत्रकास व सदरील काम उपलब्ध कंत्राटदार श्री.पी.पी.फुलवटे यांचेकडून अंदापजत्रकीय दराने करून घेण्यात आलेल्या कामास कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती यांचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार नागेश्वरवाडी येथील फुटब्रीज जवळील रिटेनिंग वॉल बांधण्यास स.न.सेविका सौ.लता दलाल यांनी विनंती केल्या नुसार नागरिकांचे घरात पाणी घुसून होणारी संभाव्य हानी टाळणे करीता सदरील काम उपलब्ध कंत्राटदार श्री.पी.पी.फुजवजे यांचेकडून अंदापजत्रकीय दराने र.रू.६४,७६३/- मध्ये सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार करवून घेण्यात आलेल्या कामास सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९३/३:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, सांस्कृतिक मंडळ समोरील खडकेश्वर भागातील रोडचे पुर्णडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.४,५४,७००/- च्या अंदापजत्रकास स्थायी समिती विषय क्र.५८६/२० दिनांक २८.६.९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्या नुसार सदरील कामाकरीता निविदा पत्रके मागविली असता निविदापत्रक विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (नऊ) ९ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत या पैकी फक्त (चार) ४ निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दिनांक रोजी उघडयांत आली त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन कं. | ७.७७% कमी दराने |
| २ | मे.रे कन्स्ट्रक्शन | ६.६०% कमी दराने |
| ३ | मे.भास्कर कन्स्ट्रक्शन | ४.०० % कमी दराने |
| ४ | श्री.भिमराव वसंतराव पाटील | १४.८०% जास्त दराने |

तरी प्राप्त निविदा पत्रकापैकी मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन कं. यांच्या निविदापत्रकाचा दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदापजत्रकीय दरापेक्षा ७.७७% कमी आहे.

तरी मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन कं. यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.७७% कमी दर मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सांस्कृतिक मंडळा समोरील खडकेश्वर भागातील रोडचे डांबरीकरण करण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र.५८६/२० दिनांक २८.६.९६ अन्वये र.रू.४,५४,७००/- च्या अंदापजत्रकास मंजुरी देण्यांत आल्यानुसार प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्राप्त निविदापैकी मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.७% कमी असल्याने मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा सर्वानुमते स्विकारण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९४/४:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, कोहिनूर कॉलनी बारापूल्ला भागातील रोडचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यत आलेल्या र.रू.३,९६,९२५/- च्या अंदापजत्रकास स्थायी समिती विषय क्र.५८८/२२ दिनांक २८.६.९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदा पत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सहा ६ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत या पैकी फक्त तीन (३) निविदा पत्रकाचे दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके दिनांक १२.७.९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मे.मस्कट कन्स्ट्रक्शन | ४.००% कमी दराने |
| २ | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ३.००% कमी दराने |
| | ३ श्री.व्ही.व्ही.श्रीरामवार | १५.८०% |

तरी प्राप्त निविदापत्रकापैकी मे. मस्कट कन्स्ट्रक्शन यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदापजत्रकीय दरापेक्षा ४.००% कमी आहेत.
तरी मे.मस्कट कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.००% कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार कोहिनुर कॉलनी बारापुल्ला भागातील रोडचे डांबरीकरण करणेच्याकामासाठी स्थायी समिती ठराव क्र.५८८/२२ दिनांक २८.६.९६ र.रू.३,९६,९२५/- अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे. प्राप्त निविदापैकी मे.मस्कट कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदापजत्रकीय दरापेक्षा ४.००% कमी असल्याने त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र१९५/५:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला मो.बेगमपुरा डिंबर गल्ली येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.५,५०,३००/- च्या अंदापजत्रकास स्थायी समिती विषय क्र.५९६/३० दिनांक २८.६.९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्या नुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सात (७) कोरी निविदापत्रके विकल्या गेल्या व निविदापत्रके स्विकृतिच्या

अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त पाच (५) निविदा पत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दिनांक १२.७.९६ रोजी उघडण्यात आली त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मे.मस्कट कन्स्ट्रक्शन | ८.००% कमी दराने |
| २ | श्री.एम.एस.जग्गी | ७.००% कमी दराने |
| ३ | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ५.७७% कमी दराने |
| ४ | मे.रे.कन्स्ट्रक्शन कं. | ५.३०% कमी दराने |
| ५ | श्री.भिमराव वसंतराव पाटील | १४.८०% जास्त दराने |

तरी प्राप्त निविदेपैकी मे.मस्कट कन्स्ट्रक्शन यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रककीय दरापेक्षा ८.००% कमी आहेत.

तरी मे.मस्कट कन्स्ट्रक्शन कं. यांचे अदाजपत्रकीय दरोपक्षा ८.००% कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार बेगमपुरा डिंबरगलली रस्त्याचे डांबरीकरण करण्याकरीता र. .रू.५,५०,३००/- च्या स्थायी समिती ठराव क्र.५९६/३० दिनांक २८.६.९६ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे. प्रापत निविदा पैकी मे.मस्कट कन्स्ट्रक्शन कं. यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदापजत्रकीय दरापेक्षा ८.००% कमी असल्याने मे.मस्कट कन्स्ट्रक्शन कं. यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९६/६:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि मो. बेगमपुरा आणि भावसिंगपुरा भागात शहाबाद फरशी बसविणे व जुनी खांडकी दुरूस्त करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू. ६,४४,३००/- च्या अंदापजत्रकास स्थायी समिती विषय क्र.५८३/१७ दिनांक २८.६.९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्या नुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १९ कोरी निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दिनांक १२.७.९६ रोजी उघडण्यात आली त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.एम.ए. फारूक | २५.२५% कमी दराने |
| २ | मे.पारस कन्स्ट्रक्शन | २२.९२% कमी दराने |
| ३ | मे.बसटा कन्स्ट्रक्शन | २२.३०% कमी दराने |
| ४ | श्री.डी.एन.पंजाबी | २१.३% कमी दराने |
| ५ | न्यु.सुपर कन्स्ट्रक्शन | २१.१% कमी दराने |
| ६ | श्री.आर.बी.चव्हाण | २१.००% कमी दराने |
| ७ | श्री.राजेंद्र च शिंदे | १७.०१% कमी दराने |
| ८ | श्री अब्दुल सलिम | १५.००% कमी दराने |
| ९ | मे.राणा कन्स्ट्रक्शन | २७.००% कमी दराने |
| १० | मे.एलोरा कन्स्ट्रक्शन | १४.५% कमी दराने |
| ११ | श्री.शेख शरीफ | १३.८६% कमी दराने |
| १२ | श्री.कुलवंतसिंग | १०.१०% कमी दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी श्री.एस.ए.फारूकी यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदापजत्रकीय दरोपक्षा २५.२५% कमी आहेत.

तरी श्री.एस.ए.फारूकी यांचे अंदापजत्रकीय दरापेक्षा २५.२५% कमी दर मंजुरी बाबातचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या नुसार बेगमपुरा व भावसिंगपूरा भागात शहाबाद फरशी बसविणे व जुनी खांडकी दुरूस्त करण्याच्याकामासाठी स्थायी समिती ठराव क्र.५८ दिनांक २८.६.९६ अन्वये र.रू. ६,४४,३००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत आलेली आहे. प्राप्त निविदापैकी श्री.एस.ए. फारूकी यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.२५ कमी असल्याने सदर कंपनीच्या निविदा स्विकृतीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९७/७:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला नारळीबाग,संतोषीनगर नारायणनगर घनमंडी आणि जुनाबाजार भागातील डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.६,७७,५००/- अंदाजपत्रकीय स्थायी समिती विषय क्र.५०७/५५ दिनांक ८.३.९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्या नुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सहा (६) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतिच्या अंतिम तारखेपर्यंत या पैकी फक्त तीन (३) निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दिनांक १२.७९६ रोजी उघडण्यात आल्या त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१) मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन कं. ४.७७% टक्के कमी दराने
२) मे.मस्कट कंन्स्ट्रक्शन कं. ४.०० % टक्के कमी दराने
३) श्री.भिमराव वसंतराव पाटील ८.९०% टक्के कमी दराने

तरी प्राप्त निविदापत्रकापैकी मे.अदिनाथ कन्स्ट्रक्शन यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अदाजपत्रकीय दरोपक्षा ४.७७% कमी आहेत.

तरी आदिनाथ कन्स्ट्रक्शन कं. यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.७७% कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार नारळी बाग , संतोष नगर ,धनमंडी ,जुनाबाजार भागातील डांबरीकरणासाठी र.रू.६,७७,५००/- च्या अंदापजत्रकास स्थायी समिती ठराव क्र.५००/५५ दिनांक ८.३.९६ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे. प्राप्त निविदापैकी मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांच्या पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदापजत्रकीय दरापेक्षा ४.७७% कमी असल्याने त्याच्या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९८/८:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला मो.चेलीपूरा, मुलमची बाजार व मुर्गीनाला भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू. ३,४२,०००/-च्या अंदापजत्रकास स्थायी समिती विषय क्र.१३६/२० दिनांक २८.९.९५ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन (३) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके

स्विकृतीच्या अंतिम तारखेपय्रंत या पैकी फक्त दाने (२) निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दिनांक १२.७.९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मे.मस्कट कन्स्ट्रक्शन कं. | ५.०० % कमी दराने |
| २ | श्री.व्ही.ही.श्रीरामवार | ३०.८० % जास्त दराने |

तरी प्राप्त निविदापत्रके मे.मस्कट कंन्सन्ट्रक्शन कं. यांच्या निविदापत्रकाचे वर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदापजत्रकीय दरापेक्षा ५.००% कमी आहेत.

तरी मे.मस्कट कन्स्ट्रक्शन कं. यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.००% कमी दर मंजुरी बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार चेलीपुरा, मुलमची बाजार व मुर्गीनाला भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या र.रू.३,४२,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठरव क्र.१३६/२० दिनांक २८.९.९५ अन्वये मंजुरी प्रदान करण्यांत आलेली आहे. प्राप्त निविदापैकी मे.मस्कट कन्स्ट्रक्शन कं. यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.००% कमी असल्याने मे.मस्कट कंन्स्ट्रक्शन कं. यांच्या निविदा स्विकृतीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९९/९:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, निराला बाजार येथे बालाजी अपार्टमेंट समोर सौंदर्यीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या १९९५-९६ च्या दरसुची नुसार अंदापजत्रक र.रू. ५०,२६०/- चे तयार करण्यांत आलेले आहे. सदरील काम कलात्मक असल्यामुळे या कामातील अनुभवी व ज्यांनी महापालिकेतील अनेक सौंदर्यीकरणाची कामे यशस्वीपणे चांगलया प्रकारे पूर्ण केली आहेत असे श्री.शेख मसूद यांचे कडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यांत येत आहे. सदरील कामाचा खर्च शहर सौंदर्यीकरण सन १९९६-९७ या लेखाशिर्षका अंतर्गत करण्यांत येत आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र.रू.५०,२६०/- च्या अंदाजपत्रकीय व सदर काम श्री. शेख मसूद यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेणे साठी कार्योत्तर मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

**घडामोडे :** प्रस्ताव दर्शविल्यानुसार निराला बाजार येथे बालाजी अर्पाटमेंट समोर सौंदर्यीकरण करण्याच्या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेल्या र.रू.५०,२६०/- च्या अंदाजपत्रकास व सदरील काम कलात्मक असल्यामुळे या कामात अनुभवी श्री.शेख मसुद यांच्या कडून अंदापजत्रकीय दराने केलेल्या कामास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**घडामोडे :** एवढया मोठया रक्कमेचे काम टेंडर न मागविता का करण्यांत आले.

**शहर अभियंता :** सौंदर्यीकरणाची कामे स्पेसिफीकेशनची असतात व ती स्थायी समिती लोकच करू शकतात त्यामुळे टेंडर मागविण्यांत आले नाही.

**विषय क्र.२००/१०:**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावावित केले आहे कि, सन १९९६-९७ औषधी व शल्य साहित्य खरेदी करण्यांकरीता निविदा मागविण्यासाठी सर्वसाधारण सभेने मंजुरी केल्याप्रमाणे समिती नियुकत केली होती. परंतु मार्च ते जुन पर्यंत आचारसंहिता असल्यामुळे निविदा मागविण्यात आलेल्या नाहीत.

औषधी साहित्याची अत्यंत आवश्यकता असल्याकरणे व साथ प्रतिबंध उपाय म्हणून औषधी साहित्य जिवन रक्षणासाठी म्हणून खरेदीसाठी एप्रिल ९६ मध्ये दान साहित्याचा साठा म्हणून सन ९५-९६ च्या ठराव क्र.३८० दिनांक २८.४.९५ नुसार मा.प्रशासकांनी मंजुरी केलेले दर एजन्सीज १) अल्ट्रा फार्मा व २) किंकरे ब्रदर्स कडून पुर्वीच्या दराने मा. आयुक्तांचे आदेशानुसार खरेदी करण्यास आले आहे. या खरेदीची एकूण रक्कम रू.४,४२,३४०/- इतका खर्च झाला आहे. या खर्चास मंजुरी देण्यासाठी व नविन वर्षासाठी निविदा मंजुर होईपर्यंत वरील प्रमाणे प्रस्तावित केलेल्या एजन्सी व दराने खरेदीस मंजुरी द्यावी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

**डॉ.मेहेर :** औषधी खरेदी समिती दर डॉ.कराड यांना घेण्यांत यावे.

**स.सभापती :** प्रशासकीय पातळीवरील प्रश्न आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार १९९६-९७ सालासाठी औषधी व शालेय साहित्य खरेदी करण्याकरीता निविदा मागविण्यासाठी सर्वसाधारण सभेने मंजुरी केल्याप्रमाणे नियुक्त करण्यात आलेल्या समितीस मार्च ते जून पर्यंत नाहीत. साथप्रतिबंधक उपाय योजना म्हणून खरेदीसाठी एप्रिल ९६ मध्ये दोन महिन्यासाठी साठा म्हणून ९५-९६ च्या ठराव क्र.२८० दिनांक २८.४.९५ नुसार मा. प्रशासकांनी मंजुर केलेले दर व एजन्सी १ अल्ट्रा फार्म व २. किंकरे ब्रदर्स काढून पुर्वीच्याच दराने मा. आयुक्तांचे आदेशानुसार खरेदी करण्यात आले आहे. या खरेदीस एकूण र.रू.४,४२,३४०/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते व नविन वर्षासाठी निविदा देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०१/११:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, आंबेडकर नगर सिडको येथील स्मशान भूमी येथे वॉचमन क्वॉटर व बोरवेल खोदणे इत्यादी कामाचे अंदाजपत्रक र.रू.४३,१५०/- चे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दर सुची अन्वये तयार करण्यात आले. मा. आयुक्तांच्या मंजुरी सदर कामाचे बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आली. विक्रीच्या तारखेपर्यंत एकच कोरी निविदा विकली गेली व स्विकारण्याच्या तारखेपर्यंत सील बंद पाकिटात निविदा प्राप्त झाली या त्यात दिलेले दर अंदाजपत्रकीय दराने मंजुरी करीता मा. आयुक्त यांच्या कडे सादर करण्यात आले.

त्यावर मा. आयुक्त यांनी तजविज केली कि, वॉचमन क्वॉर्टर ऐवजी बसण्याकरीता शेड बांधणे अधिक महत्वाचे त्या अनुषंगाने वाढीव अंदापजत्रक र.रू.९०,०००/- चे तयार करण्यात आले पुर्वीचे मंजुरी आता र. .रू.४३,१५०/- वाढीव अंदापजत्रक रू.९०,०००/- = १,३३,१५०/ इतकी झाली सदर रक्कममेस व निविदा प्राप्त झालेल्या गुत्तेदाराच्या अंदापजत्रकीय दराच्या दरात काम करून घेण्यास्तव तसेच सदर काम स्मशान भूमी या तरतुदी मधून खर्च करणार आहे.

करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**महादेव सुर्यवंशी :** प्रस्तावात कंत्राटदाराच्या नावाचा उल्लेख नसल्याने काम कोणाकडून करून घेणार याचा बोध होत नाही.

**शहर अभियंता :** हे काम कंत्राटदार बी.एस.तोरणे यांच्या कडून करून घेण्यांत येणार आहे.

**मा.सभापती :** तशी प्रस्तावात दुरूस्ती करण्यांत यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार आंबेडकर नगर सिडको येथील स्मशान भूमी वॉचमन क्वॉर्टर व बोंअरवेल खोदण्याच्या कामासाठी सा. बा. खात्याच्या ९५-९६ च्या दरसुची अन्वये रू.४३,१५०/- ची अंदापजत्रक बनविण्यात आले होते. मा. आयुक्त यांनी सदर ठिकाणी वॉचमन ऐवजी बसण्याकरीता शेड बांधण्याबाबत तजविज केल्याने रू.९०,०००/- चे अंदाजपत्रक व सुधारित अंदापजत्रक एकूण रू.१,३३,१५०/- ला व सदरचे काम निविदा प्राप्त झालेल्या बी.एस.तोरणे अंदाजपत्रकीय दराने करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०२/१२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.मिटमिटा गांव येथे पादचारी पूल बांधणे बाबत कामाकरीता सा.बां.खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार र.रू.१,१८,०००/- चे अंदापजत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम अठरा खेडी विकास योजने अंतर्गत करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दिनांक १८.८.९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेले अंदापजत्रक रू.१,१८,०००/- यात मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मिटमिटा गांव येथे पादचारी पूल बांधण्याकरीता ९५-९६ च्या दरसुचीनुसार १,१८,०००/- च्या अंदापजत्रकास सदरचे काम अठरा खेडी विकास योजने अंतर्गत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र.२०३/१३:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, ज्युबलीपार्क चौक येथे ट्रॅफिक चॅनलायझर बनविणे व सौंदर्यीकरण करणे या कामासाठी तेीि होणार संभाव्य अपघात व नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातूने मा. आयुक्त यांचे तोंडी आदेशानुसार सदर काम तातडीने उपलब्ध कंत्राटदार श्री.सोहेल सिध्दीकी यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने सुरू करण्यात आले आहे. सदर कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदापजत्रक रू.९९,०५५/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च शहर सोंदर्यीकरण सन ९६-९७ या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येत आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यायत आलीले रू.९९,०५५/-चे अंदापजत्रकीय तसेच सदरील काम उपलब्ध कंत्राटदार श्री.साहेल सिध्दीकी यांचेकडून अंदापजत्रकीय दराने सुरू करण्यात आले आहे. तरी कामास कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार जुब्ल्युपार्क चौक येथे ट्राफिक चॅनलवर बनविणे व सौंदर्यीकरणाचे काम मा. आयुक्तांच्या तोंडी सुचनेवरून उलपब्ध कंत्राटदार श्री.सोहेल सिध्दीकी यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार करून घेण्यास

कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. रक्कम रू.९९,०५५/- च्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०४/१४:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, स.नं.१ भाग गारखेडा अशोकनगर येथील मनपाच्या खुल्या जागेवर संरक्षित भिंत, तार कुंपण खेळणी बसविणे सपाटीकरण ३० कामाचे अंदापजत्रकीय रक्कम रू.१,८५,०००/- चे सा.बां. खात्याचे सन ९५-९६ च्या दरसुची अन्वये तयार करण्यात आले. सदर खर्च विकास योजना अंतर्गत भुखंडाचे संरक्षण या तरतुदी मधून करण्यात येणार आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार स.न.१ भाग गारखेडा, अशोकनगर येथील मनपा च्या खुल्या जागेवर संरक्षित भिंत , तार कुंपण, खेळणी बसविणे सपाटीकरण करणे आदी कामासाठी सा. बां. खात्याच्या ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१,८५,०००/- च्या अंदाजपत्रकास व सदरचा खर्च विकास योजना अंतर्गत भुखंडाचे संरक्षण या तरतुदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०५/१५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.पडेगांव स्लम येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबत कामाकरीता सा.बां. खाते यांच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रू.३,७०,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम अठरा खेडी विकास योजना अंतर्गत करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुकत साहेबांनी दिनांक १८.८.९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रू.३,७०,२००/- यांस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलयानुसार पडेगांव स्लम येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याबाबत सा. बां. खात्याच्या ९५-९६ च्या दरसाुचीनुसार बनविण्यात आलेल्या रू. रू.३,७०,२००/-ला सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०६/१६:**

मा. कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, खोकडपूरा येथील श्री.व्ही.डी.गायकवाड यांचे घरापासून ते दलालवाडी पर्यंत १५० मी.मी.व्यासाची लाईन काढून १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी.लाईन टाकणे या कामासाठी प्रथम १,२०,०००/- चे अंदापजत्रक तयार करण्यात आले. होते. त्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी मिळाली आहे. त्यानुसार उपरोक्त कामासाठी एकूण तीन (३) निविदा १०% जास्त दराने प्राप्त झाली होती.

परंतू सदरील काम हे (हार्ड रॉक) असल्याने निविदा धारकोने स्विकारले नाही. आता मुळ अंदाजपत्रक रू.१,२०,०००/-च्या ऐवजी १,४२,०००/- चे सुधारित अंदाज पत्रक तयार केले असून त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळाली आहे.

सदरील भाग खडकाळ असल्याने उघडया खडकांवर खोदकाम करणेचे आहे. शिवाय निविदा बोलावून प्राप्त होत नाही. त्यामुळे उपरोक्त काम हे उपलब्ध गुत्तेदार मार्फत अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,४३,०००/- यांस मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार खोकडपूरा येथील श्री.व्ही.डी.गायकवाड यांच्या घरापासून ते दलालवाडी पर्यंत १५० मी.मी. व्यासाची लाईन काढून २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. लाईन टाकण्यासाठी बनविण्यात आलेल्या सुधारित अंदाजपत्रका रू.१,४३,०००/- ला व हे काम उपलब्ध गुत्तेदारा कडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०७/१७:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, कुंभारवाडा कैसर कॉलनी १०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार र.रू.१,८७,०००/-एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधून करण्यात येणार आहे. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार कुंभारवाडा कैसर कॉलनी येथे १०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकण्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाच्या सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या र.रू.१,८७,०००/- व सदरचे काम भांडवली कामाच्या तरतुदी तून करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०८/१८:**

मा.कार्याकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, कोकणवाडी केसरसिंगपुरा येथे १५०/२५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी रू. १,३५,३००/- चे अंदापजत्रक तयार करण्यात आले असून ते सन ९५-९६ च्या परिसर अभियांत्रिकी यांच्या दरसुचीनुसार आहे.

सदरील कामाचा होणारा खर्च हा " भांडवली कामे " ९६-९७ या शिर्षका अंतर्गत प्रस्तावित आहे.

तरी उपरोक्त कामासाठी तयार करण्यात आलेल्या रू.१,३५,३००/- च्या अंदापजत्रकास मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार कोकणवाडी केसरसिंगपुरा येथे १५०/२५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी ९५-९६ च्या परिसर अभियांत्रिकी च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रू.१,३५,३००/- च्या अंदाजपत्रकास व सदरचे काम भांडवली कामे ९६-९७ शिर्षका अंतर्गत करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०९/१९:**

मा.कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, सादातनगर स्लम भागात १५०/२५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकरणे या कामासाठी रू.४,०२,०००/- चे अंदाजपत्रक तयार केले असून ते परिसर अभियांत्रिकी यांच्या सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार बनवण्यात आलेले आहे.

सदरील कामासाठी होणारा खर्च हा झोपडपटट्ी सुधारणा ९६-९७ या लेखा शिर्षकाअंतर्गत घेण्यात आलेला आहे.

तरी उपरोक्त कामासाठी तयार करण्यात आलेल्या रू.४,०२,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेसाठी रू.४,०२,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सादतनगर स्लम भागात १५०/२५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी ९४-९५ च्या परिसर अभियांत्रिकी च्या दरसुचीनुसार तयार करण्यापत आलेल्या रू.४,०२,०००/- च्या अंदापजत्रकास तसेच सदरचा खर्च झोपडपटट्ी सुधारणा ९६-९७ या लेखा शिर्षाअंतर्गत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१०/२०:**

मा. कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, झोन क्र.४ अंतर्गत अस्तित्वात असलेल्या गटारींची दुरूस्ती करणे या कामासाठी रू.२,४४,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून ते परिसर अभियांत्रिकी यांची ९४-९५ च्या सुचीनुसार आहे.

सदरील कामावर होणारा खर्च हा देखभाल व दुरूस्ती ९६-९७ या लेखा शिर्षका अंतर्गत घेण्यात आलेला आहे.

तरी उपरोक्त कामासाठी तयार करण्यात आलेल्या रू.रू.२,४४,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार विभाग क्र.४ अंतर्गत अस्तित्वात असलेल्या गटारींची दुरूस्ती करण्यासाठी ९४-९५ च्या परिसर अभियांत्रिकीच्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या र.रू.२,४४,०००/- च्या अंदापजत्रकास व सदरचा खर्च देखभाल व दुरूस्ती ९६-९७ या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.२११/१:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, नेहरू प्लेस येथे खडी रस्ते तयार करून कल्वर्ट बांधणे या कामासाठी स.नगरसेवक यांनी अर्ज देवून सदरील काम लवकरात लवकर करणे बाबत कार्यालयास विनंती केल्यानुसार सा. बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक र.रू.२,०३,०७७/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन ९५-९६ भांडवली रस्ते ( खडी रस्ते ) या लेखाशिर्षकातून उपलब्ध तरतुदी मधून करण्यात येणार आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रू.२,०३,०७७/- चे मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समिती विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार नेहरू प्लेस येथे खडी रस्ते तयार करून कल्व्हर्ट बांधणे या कामासाठी सा.बां. खात्याच्या ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या र.रू.२,०३,०७७/- तसेच सदरचे काम तातडीचे असल्याने उपलब्ध गुत्तेदार श्री.कुलकर्णी

यांना अंदापजत्रकीय दरापेक्षा २% कमी दराने देण्यास व भांडवली रस्ते (खडी रस्ते ) या लेखा शिर्षकाअंतर्गत काम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१२/२:**

पशुधन विकास अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला कि, सध्या प्राणी संग्रहालयात वेगवेगळे प्राण्यांचे आगमन झाल्यामुळे वार्षिक खर्चात वाढ झाली आहे. सध्याचे प्रवेश फी द्वारे उत्पन्न कमी असल्यामुळे प्रवेश फी मध्ये वाढ करण्यासाठी खालील प्रमाणे प्रस्ताव विचारार्थ सादर.

| तिकीटाचे दर | मुलांसाठी (३ ते १२ वर्षे) | प्रौढांसाठी |
|---|---|---|
| सध्याचे दर | रू.००.५० | रू. १.५० |
| प्रस्तावित दर | रू.१.०० | रू. ३.०० |

सदर प्रस्ताविक दर दिनांक १.९.९६ पासून अंमलात आणण्यात येईल.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्राणी संग्रहालय पाहण्यासाठी येणाऱ्या प्रेक्षकांना खालील प्रमाणे फी १.९.९६ पासून आकारण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

मुलांसाठी ३ ते १२ वर्षे १.०० रूपया
प्रौढांसाठी २.०० रूपये

**विषय क्र.२१३/३:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, क्रांती चौक येथील वाहतुक बेटात हायमास्ट बसविण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र.रू.१०.०० लाखाच्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.९६६/५९ दिनांक २१.१२.९५ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदर कामाकरीता निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सात कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चार निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दिनांक २७.८.९६ रोजी उघडण्यात आली त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१ मे.जे.ढी.इलेक्ट्रिक वर्क्स ३.७०% जास्त दराने.
२ मे.दानिश सेल्स कार्पोरेशन ३.१२% जास्त दराने.
३ मे.ग्लोब इंजिनिअरिंग ३.००% जास्त दराने.
४ मे.रॉयल इलेक्ट्रीकल्स पुणे १.३० % कमी दराने.

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. रॉयल इलेक्ट्रीकल्स पुणे यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदापजत्रकीय दरापेक्षा १.३०% कमी आहेत.

तरी मे.रॉयल इलेक्ट्रीकल्स यांचे अंदापजत्रकीय दरापेक्षा १.३०% कमी दराचे निविदापत्रक स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार क्रांतीचौक वाहतुक बेटात हायमास्ट बसविण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रू.१०.०० लाखाच्या अंदापजत्रकास स्थायी समिती

ठराव क्र.२६६/५९ दिनांक २१.१२.९५ अन्वये मंजुरी`दिल्यानुसार प्राप्त निविदापैकी मे.रॉयल इलेक्ट्रीकल्स पुणे यांच्या निविदापत्रकाचे दरापेक्षा १.३०% कमी दराचे असल्याने त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१४/४:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, सध्या मा. महापौर, उप महापौर, मा.सभापती स्थायी समिती, मा.सभागृह नेता ,मा.विरोधी पक्ष नेता या पदाधिकाऱ्यांच्या व अधिकाऱ्यांच्या वाहनासाठी इंधन खर्च मर्यादा खालील प्रमाणे विहित करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | पदाधिकारी / अधिकारी | इंधन मर्यादा दरमहा |
|---|---|---|
| १ | मा.महापौर | ३०० लिटर पेट्रोल दरमहा (रू.६०००.०० प्रति माह) |
| २ | मा.आयुक्त | ३०० लिटर पेट्रोल दरमहा (रू.६०००.०० प्रति माह) |
| ३ | मा.उप महापौर | ३०० लिटर पेट्रोल दरमहा (रू.६०००.०० प्रति माह) |
| ४ | मा.सभापती,स्थायी समिती | ३०० लिटर पेट्रोल दरमहा (रू.६०००.०० प्रति माह) |
| ५ | मा.सभागृह नेता | ३०० लिटर पेट्रोल दरमहा (रू.६०००.०० प्रति माह) |
| ६ | मा.विरोधी पक्ष नेता | ३०० लिटर पेट्रोल दरमहा (रू.६०००.०० प्रति माह) |

| अ.क्र. | पदाधिकारी / अधिकारी | इंधन मर्यादा दरमहा |
|---|---|---|
| १ | मा. उप आयुकत-१ | १२५ लिटर पेट्रोल दरमहा (रू.२६००.०० प्रति महा) |
| २ | मा. उप आयुकत-२ | १२५ लिटर पेट्रोल दरमहा (रू.२६००.०० प्रति महा) |
| ३ | शहर अभियंता | १२५ लिटर पेट्रोल दरमहा (रू.२६००.०० प्रति महा) |
| ४ | अति.शहर अभियंता | १२५ लिटर पेट्रोल दरमहा (रू.२६००.०० प्रति महा) |
| ५ | कार्यकारी अभियंता | १२५ लिटर पेट्रोल दरमहा (रू.२६००.०० प्रति महा) |
| ६ | आरोग्य वैद्यकीय अधिकारी | १२५ लिटर पेट्रोल दरमहा (रू.२६००.०० प्रति महा) |
| ७ | सहा. संचालक नगर रचना | १२५ लिटर पेट्रोल दरमहा (रू.२६००.०० प्रति महा) |

| अ.क्र. | पदाधिकारी / अधिकारी | इंधन मर्यादा दरमहा |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | मुख्य लेखा परिक्षक | १०० लिटर पेट्रोल दरमहा (रू.२०००.०० प्रति महा) |
| २ | विधी सल्लागार | १०० लिटर पेट्रोल दरमहा (रू.२०००.०० प्रति महा) |
| ३ | जलगृह अभियंता-१ | १२५ लिटर डिझेल |
| ४ | जलगृह अभियंता -२ | १२५ लिटर डिझेल |
| ५ | उप अभियंता (विद्युत) | २०० लिटर डिझेल |
| ६ | जकात विभागातील सर्व जीप | ३५० लिटर डिझेल दरमहा |
| ७ | या व्यतिरिक्त इतर अधिकारी | १०० लिटर डिझेल दरमहा |

सर्व प्रकारच्या डिझेल वाहनासाठी डिझेलचे वाटप मनपा कार्याशाळेतील पंपावरून करण्यात येते. पेट्रोल कारसाठी सर्व पदाधिकारी व अधिकारी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे दरमहा अग्रिम रक्कम देण्यात येते. पेट्रोल च्या दरात माहे जुलै पासून २५% वाढ झालेली असल्यामुळे त्या प्रमाणात इंधन खर्च मर्यादित वाढ करण्या बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मा.महापौर मा. उप महापौर, मा.सभापती, स्थायी समिती सभागृह नेता विरोधी पक्ष नेता या पदाधिकाऱ्यांच्या व अधिकाऱ्यांच्या वाहनासाठी प्रस्तावात दर्शविल्यानुसार इंधन पुरविण्यात येते. इंधन दरातील वाढ पाहता त्या प्रमाणत इंधन खर्च मर्यादा वाढविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. स.सभापती यांच्याकडे डिझेलची गाडी त्यांनी प्रतिमहा ३००लिटर डिझेल मनपा पेट्रोल पंपावरून देण्यात यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१५/५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, मो.किराडपुरा येथील सार्वजनिक लायब्ररी बांधण्याच्या कामासाठी रक्कम रू.४,६०,०००/-चे अंदापजत्रक सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे. तसेच ठराव क्र.५६१/२६ दिनांक ८.३.९६ अन्वये सदर काम अंदापजत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने श्री.सय्यद जमीर गुत्तेदार यांचेकडून करून घेण्यास मंजुरी प्राप्त झालेली आहे. परंतु सदरील ठिकाणी जे बांधकाम करावयाचे आहे त्यामध्ये तळमजला व पहिला मजला बांधकाम करण्याची तरतुद होती. पंरतु कार्यादेश दिल्यानंतर मार्कआऊट दिला असता स.नगरसेवक यांनी पहिला मजला व तळ मजला ऐवजी फक्त तळ मजल्याचेच बांधकामामध्ये मोठा हॉल बांधणे बाबत मागणी केलेली आहे. या बाबत मा. आयुक्त साहेब यांनी सुधारित प्रस्ताव स्थायी समितीचे मान्यतेस्तव ठेवणे बाबत आदेश दिलेले आहे. त्यामुळे परिसूची मध्ये काही बाबींच्या परिमाणामध्ये वाढ होणार आहे. मा. शहर अभियता यांचे आदेशान्वये गुत्तेदाराची लेखी संमती वाढीव बाबींची परिमाणेसाठी चालू वर्षाच्या दरसुची प्रमाणे दर न घेता त्याच दराने करण्याची घेण्यात आलेली आहे. कामासाठी रक्कमेपेक्षा जास्त रक्कम लागणार नाही सबब सदर कामासाठी पहिला मजला न बांधता तळ मजल्याच्या क्षेत्रफळात वाढ करून बांधण्याकरीता प्रस्ताव विचारार्थ व कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार किराडपुरा येथील सार्वजनिक लायब्ररी बांधण्याच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.३३५/३१ दिनांक २८.१२.९५ अन्वये र.रू. ४,६०,०००/- या अंदापजत्रकास तसेच ठराव क्र.५६२/२६ दिनांक ८.३.९६ अन्वये सदरचे काम

अंदापजत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने श्री.स.जमीर कंत्राटदार यांचेकडून करून घेण्यांस सर्वानुते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१६/६:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, भावसिंगपूरा येथे सर्व्हे नं.५१/२ मधील रोडचे खडीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.३,७१,२००/- च्या अंदापजत्रकास मा. स्थायी समिी विषय क्र.५८१/१५ दिनांक २८.६.९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त सहा (६) निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली निविदापत्रके दिनांक १२.७.९६ रोजी उघडण्यात आली. त्याचा तुलनात्मकतक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.एस.बी.राठोड | १५.००% कमी दराने |
| २ | श्री.एम.एम.देशमुख | १५.००% कमी दराने |
| ३ | श्री.राहूल कन्स्ट्रक्शन | १४.९५% कमी दराने |
| ४ | श्री.एस.एम.मंडोरे | १३.५% कमी दराने |
| ५ | श्री.शेख शरीफ | १२.८६% कमी दराने |
| ६ | मं.संचार कन्स्ट्रक्शन | २.१% कमी दराने |

वरील प्राप्त निविदा पैकी श्री.एस.बी. राठोड आणि श्री.एस.ए.देशमुख या दोघांच्याही निविदा पत्रकाचे दर सारखे असल्यामुळे त्यांना चर्चेस बोलावले असता श्री.एस.बी.राठोड हे सदर काम अंदाजत्रकीय दरापेक्षा १५.१० % कमी दराची यनिविदा सर्वानुमते मंजुर करण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**डॉ.भागवत कराड:** प्रस्ताव सादर करत असतांना प्रस्तावित काम पूर्वी केव्हा करण्यात आले होते याचा प्रस्तावात उल्लेख करण्यात यावा.

**मा.सभापती :** सर्व विभाग प्रमुखांनी याची नोंद घ्यावी व प्रस्तावित काम पूर्ण केव्हा करण्यात आले होते याचा प्रस्तावात उल्लेख करावा.

राष्ट्रगितानंतर ६.३० वाजता बैठकीचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १७.९.९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त दिनांक १७.९.९६ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. सभापती स्थायी समिती श्री.गिरजाराम हाळनोर यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १ | स.स.श्री. गौतम खरात | सभासद |
| २ | स.स.श्री.कंवरसिंग बैनाडे | सभासद |
| ३ | स.स.सौ.रजनी जोशी | सभासद |
| ४ | स.स.श्री.डॉ.भागवत कराड | सभासद |
| ५ | स.स.कु.माया लाडवाणी | सभासद |
| ६ | स.स.श्री.महादेव सुर्यवंशी | सभासद |
| ७ | स.स.श्री.हमीदउद्यीन ताबा | सभासद |
| ८ | स.स.श्री.भगवान घडामोडे | सभासद |
| ९ | स.स.श्री.सुभाष टाकळकर | सभासद |
| १० | स.स.श्री.अभिमन्यु भालेराव | सभासद |
| ११ | स.स.श्री.विकास जैन | सभासद |
| १२ | स.स.श्री.अ.रशिद खान मामु | सभासद |

**संवादः**

**श्री.अ.रशिद खान मामु :** १५ दिवसांपूर्वी बाफना यांनी महापालिका हद्दीत आणलेल्या गाडया वरती जाकत भरली नाही. म्हणून धाड टाकण्यात आली होती. वृत्तपत्रातुन आलेल्या बातम्या व प्रशासनाकडून देण्यात येणारी माहिति यात बरीच श्री. बाफना हे फक्त औरंगाबाद शहरासाठीच गाडयांचे डिलर आहेत. जे कर्मचारी तीन वर्षापेक्षा जादा काळापासून जकात विभागात काम करत आहेत. अशा कर्मचाऱ्यांच्या त्या विभागातून बदल्या करण्या बाबतचा प्रस्ताव प्रशासनातर्फे मागेच तयार करण्यात आला होता असे समजावे तो अद्यापही अमलात आला नाही.

पैठणहून औरंगाबाद शहरास पाणी पुरवठा करण्यासाठी स्वतंत्र जलवाहिनी परिसर अभियांत्रिकी विभागाने टाकलेली आहे. मात्र ही जलवाहिनी नेहमीच फुटत असते ही जलवाहीनी अद्याप महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आलेली नसली तरी फुटल्यानंतर महापालिका कर्मचाऱ्यांनाच धावपळ करावी लागते. जलवाहिनी फुटल्यानंतर परिसर अभियांत्रिकी विभागातर्फे महापालिकेत लवकर कळविले जात नाही. मागील दोन तीन दिवसापासून शहरास पाणी पुरवठा झालेला नाही. परिसर अभियांत्रिकी विभागात पाणी पुरवठा झालेला परिसर अभियांत्रिकी विभागात पाणी पुरवण्या संदर्भाने काम करणारे कर्मचारी जबाबदारीचे काम करीत नाहीत. ही जलवाहिनी महापिलकेस हस्तांतरीत होत असतांना काही कर्मचारीही महापालिकेत घेतले जाणार आहेत. मात्र परिसर अभियांत्रिकी तर्फे टाकण्यात आलेली जवाहिनी व तीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची काम

करण्याची पध्दत पाहता त्यांना महापालिका सेवेत सामावून घेण्यात येवू नये. तसेच जलवाहिनीचे निकृष्ट दर्जाचे काम पाहता यी चौकशी करण्याबाबत व दोषी व्यक्तींविरूध्द न्यायालयात केस करण्याबाबत शासनास लिहीण्यात यावे.

**श्री.गौतम खरात :** दारूच्या गाडया व त्यावरील जकाती संदर्भाने वृत्तपत्रात बातम्या आल्या होत्या. तसेच श्री.बाफना यांनी महात्मा फुले महामंडळाच्या गाडया म्हणून जकात चोरलयानंतर या गाडया बरोबरच महामंडळाकडे गेलेल्या आहेत काय याची तपासणी करावयास हवी. मध्यंतरी जकात विभागाच्या पाहणीत चार लाख रूपयांची कमी कॅश दिसून आली व ही बाब वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कक्षात येताच संबंधित कर्मचाऱ्यांने ते पैसे कार्यालयात भरले ही बाब बरी आहे काय ?

**सौ.रजनी जोशी :** सध्या सणासुदीचे दिवस आहेत. मागील २-३ दिवसांपासून सिडको भागात पाणी नाही. सणासुदीच्या दिवसात नागकरीकांना किमान वेळेवर पाणी मिळेल यी खबरदारी घ्यावयास हवी.

**श्री.कंवरसिंग बैनाडे :** पाण्या संदर्भाने मागील २-३दिवसांत वारंवार विभाग क्र.७ ला फोन केला परंतू तेथे कोणीही अधिकारी , उप अभियंता भेटत नाहीत. अधिकारी साईटवर गेलेले आहेत अशी नेहमी उत्तरे दिली जातात.

**मा.सभापती :** जकात हे महापालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत आहे. वृत्तपत्रात काही उलट सुलट बातम्या येत असतील व त्याचा परिणाम जाकत वसुली वर हात असेल तर अशा बातम्यांची शहानिशा करावी लागेल. आजच्या बैठकीत जाकती संबंधाने पूर्ण माहिती मिळू शकणार नाही. तथापि आगामी बैठकीत जकात वसुली , आत्तापर्यंत जकात चुकविणाऱ्यांविरूध्द केलेली कार्यवाही यांची संपूर्ण माहिती जाकत अधिक्षक यांना घ्यावी. जे कर्मचारी जकात विभागात ३ वर्षापासून कार्यरत आहेत यांची माहिती आगामी बैठकीत देण्यांत यावी.

शहरात सध्या गणेशोत्सव चालू आहे. यामुळे मोठया प्रमाणावर नागरीक कार्यक्रम पाहण्यासाठी रात्री गर्दी करतात. शहरातील विद्युत दिवे सर्वत्र चालू राहतील याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी योग्य ती खबरदारी घ्यावी. याचबरोबर शहरात जेथे पाणी साचून राहते, चिखल होतो अशा ठिकाणी तातडीने मुरूम टाकण्यात यावा यासाठी येणाऱ्या खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यांत येईल.

श्री.कंवरसिंग बैनाडे यांनी डोळयांच्या साथीचा प्रश्न व त्या निमित्ताने पंधरवाडा साजरा करण्याबाबत सुचना मांडली आहे. या संदर्भाने आरोग्य विभागास सुचना देण्यांत आलेल्या आहेत. यासाठी आवश्यक ती दर्जेदार औषधी खरेदी करण्यात यावी व या साथीवर मात करण्याबाबत शहरात निरनिराळया भागात कॅम्पस् घेण्यात यावे.

औरंगाबाद शहरात पाणी पुरवठा करणारी जलवाहिनी पैठण परिसर अभियांत्रिकी खात्या मार्फत टाकण्यात आलेली आहे. मागे या जलवाहिनीचे काम अत्यंत निकृष्ट प्रतिचे झाल्याचे दिसले. या दृष्टीने कामाची चौकशी करून संबंधितावर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत महाराष्ट्र शासनास विनंती करण्यात येईल. सदरची जलवाहिनी महापालिकेस हस्तांतरीत होत असतांना या विभागातील कर्मचारी वर्ग महापालिकेकडे हस्तांतरीत करून

घेण्यात येवू नये याबाबत सर्वसाधारण सभेत पॉलिसी डिसीजन घेण्यात येईल. सध्याचे सणासुदीचे दिवस लक्षात घेता पाणी पुरवठया बाबत स्पेशल स्वॉड स्थापण्यात यावा.

**श्री.अभिमन्यु भालेराव :** एम.आय.डी.सी.एरिया व माझ्या वॉर्डातील विद्युत दिव्या संदर्भाने मी मागील दोन तीन महिन्यांपासून तक्रारी येत आहे. तथापि येथील विद्युत दिवे लावले जात नाही. यामुळे नगरसेवकांना त्रास होतो.

**उप अभियंता विद्युत:** एम.आय.डी.सी.एरियात लावण्यासाठी सोडियम व्हेपरच्या फिटींग्ज अशातच आलेल्या आहेत. एक दोन आठवडयात ही कामे होतील.

**कार्यकारी अभियंता:** पाणी पुरवठया संदर्भाने नेहमीच नक्षत्रवाडी फारोळया पर्यंत कचरा माराव्या लागतात तेव्हा या विभागाच्याच गाडीसाठी डिझेल वाढवून देण्यांत यावे व ती मर्यादा २०० लिटर करण्यांत यावी.

**मा.सभापती :** सध्या शहरात गणेशोत्सव सुरू आहे. तेव्हा या बाबत काही महत्वाची कामे हाती घ्यावयाची असल्यास प्रथम ते ठराव सभागृहात मांडण्यात यावे म्हणजे त्यावर विचार करता येईल.

**विषय क्र.२१७/१:**

अति.शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, शहरातील टयुब लाईट फिक्चर्स दुरूस्ती करिता विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी स्थायी समितीचा विषय क्र.

र.रू.४,९९,०००/- च्या अंदापजत्रकास मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार सदरील साहित्य खरेदी करण्यासाठी दरपत्रके मागविली असता दरपत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण आठ कोरी पत्रके विकल्या गेली व दरपत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त पाच दरपत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त दरपत्रके दिनांक १२.७.९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | साहित्याचे नांव | |
|---|---|---|---|
| | | फलोरोसेंट टयुब लाईट | ४० वॅट टयुब लाईट |
| १ | मे.किरण इलेक्ट्रीक स्टोअर्स | ४१.०० | १०.०० |
| २ | मे.मल्टी लाईट इंटरप्रायझेस | ४४.०० | ११.०० |
| ३ | मे.सत्य इलेक्ट्रीकल्स | ३९.९५ | ८.२५ |
| ४ | मे.पगारिया इंटरप्रायझेस | ४०.२५ | ८.५० |
| ५ | मे.मोनार्च इंटरप्रायझेस | ४१.२५ | ८.४५ |

वरील दर्शविलेल्या तक्त्यात दोन्हीही ॲटम करीता मे. सत्य इलेक्ट्रकल्स यांच्या दरपत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच फलोरोसेंट टयुब रॉय करीता रू.३९.९५ व ४० वॅट टयुब स्टार्टर करीता रू.८.२५ असे आहेत. तरी या दराने मे.सत्य इलेक्ट्रकल्स यांच्या कडून १०.००० नगर टयुब रॉड व ७००० नग टयुब स्टार्टर खरेदी करावयाचे झाल्यास रू.४,५६,९००/- इतका खर्च येणार आहे.

त्यानंतर मा. आयुक्त यांनी फिलिप्स , क्रॉम्प्टन व बजाज या कंपनी कडून सदर साहित्याचे दर मागवावेत असे आदेशित केले आहे. त्यानंतर सदरील कंपन्यांकडून दर मागविली असता फक्त बजाज व क्रॉम्प्टन कंपनीचे दर प्राप्त झाले. फिलिप्स कंपनीचे दर प्राप्त झाले नाहीत. बजाज व कॉम्टन कंपनी कडून प्राप्त दराचा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | एजन्सीचे नांव | ४० वॅट टयुब रॉड | ४० वॅट टयुब स्टार्टर |
|---|---|---|---|
| १ | मे.बजाज इलेक्ट्रीकल्स | ४४.०० प्रति नग | ७.५० प्रति नग |
| २ | मे.कॉम्टन ग्रिव्हीज | ४५.०० प्रति नग | १०.०० प्रति नग |

वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे दोन्ही ॲटम करीता मे.बजाज इलेक्ट्रकल्स या कंपनीचे दर तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व वर दर्शविल्याप्रमाणे आहेत. या प्राप्त कमी दरानुसार साहित्य मे.बजाज इलेक्ट्रीकल्स यांच्याकडून खरेदी करावयाचे झाल्यास रू. ४,९२,७००/- २% जाकत कर रू.९८५०/- म्हणजे एकूण र.रू.५,०२,३५०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

त्यानंतर लेखाधिकारी व उप अभियंता (विद्युत) यांनी बजाज व क्रॉम्प्टन व फिलिप्स या कंपनीना प्रत्यक्ष भेट देवून व पत्र देवून दर कमी करणे बाबत विनंती केली असता बजाज व फिलिप्स कंपन्यांनी आपले सुधारीत दर दिले आहेत त्याचा तक्ता पुढील प्रमाणे

| अ.क्र | एजन्सीचे नांव | ४० वॅट टयुब रॉड | ४० वॅट टयुब स्टार्टर |
|---|---|---|---|
| १ | मे.बजाज इलेक्ट्रीकल्स | ३९.९५ प्रति नग | ८.०० प्रति नग |
| २ | फिलिप्स इंडिया लि. | ३४.०० प्रति नग | ६.०० प्रति नग |

वरील तक्त्यावरून असे दिसते कि, फिलिप्स इंडिया लि. यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर दर्शविल्याप्रमाणे आहेत.

वर दर्शविल्याप्रमाणे मे.बजाज इलेक्ट्रीकल्स यांच्याकडून सदर साहित्य खरेदी केल्यास बजाज कंपनीने वर दिलेल्या दरावर आणखी ३% सुट देण्याची तयार दर्शविली आहे. म्हणजे सदर साहित्य ४,४४,५५१/- मध्ये पुरविण्यास बजाज इलेक्ट्रीकल्स तयार आहेत.

तर फिलिप्स इंडिया लि. या कंपनीकडून सदरील साहित्य खरेदी केल्यास रू.३,८२,०००/- र% जकात कर रू.७६४०/- व अधिक १०% सेल टॅक्स रू. ३८,२००/- असे एकूण रू.४,२७,८४०/-इतका खर्च अपेक्षित आहे. म्हणजेच फिलिप्स इंडिया लि. यांचे दर तुलनात्मक दृष्या सर्वात कमी आहेत. तरी मे.फिलिप्स इंडिया लि. यांच्या कडून १०,००० नग टयुब रॉड व ७००० नगर टयुब स्टार्टर रू.४,२७,८४०/- रक्कमेत खरेदी करण्या बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**डॉ.भागवत कराड :** बजाज व फिलिप्स कंपनीच्या टयुबरॉड क्वॉलिटीत काही फरक आहे काय ?

**श्री.अ.रशिद खान मामू :** टयुब्जवरती महापालिकेचे बोधचिन्ह व नांव कंपनीकडून टाकण्यात यावे म्हणजे त्यांची चोरी होणार नाही.

**मा.सभापती :** टयुब्जवरती महापालिकेचे बोधचिन्ह व नांव टाकण्यांत येत आहे. याची खबरदारी घ्यावी. विद्युत साहित्य खरेदी संदर्भाने प्रत्यक्ष कंपनीशी संपर्क साधून वाटाघाटी केल्याने या खरेदीत महापालिकेचा एक लाख रूपयांचा फायदा झालेला आहे.

**श्री.हमीदउद्यीन ताबा:** स.सभापतींनी घेतलेल्या निर्णया बदद्ल सभागृहातर्फे त्यांचे अभिनंदन!

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहरातील टयुबालईट फिक्शचर्स दुरूस्ती करीता विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी स्थायी समितीने रू.४,९९,०००/- च्या अयंदापजत्रकास मान्यता दिलेली आहे. सदर साहित्य खरेदीसाठी दरपत्रके मागविण्यता आल्या नुसार पांच दरपत्रके प्राप्त झाली. मा. आयुक्तांनी आदेशित केल्यानुसार फिलिप्स ,कॉम्प्टन व बजाज यांच्याकडून दरपत्रके प्राप्त झाली. उपरोक्त कंपन्यांनशी लेखाधिकारी व उप अभियंता विद्युत यांनी प्रत्यक्ष संपर्क साधून दर कमी करण्याबाबत विनंती केल्यानुसार आलेल्या दरापैकी फिलिप्स इंडिया लि. यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे ४० वॅट टयुब रॉड साठी रू.३४ व ४० वॅट स्टार्टरसाठी ६.०० असे आहेत. फिलिप्स इंडिया कंपनी कडून प्रस्तावात दर्शविल्यानुसार १०००० नग टयुब रॉड व ७००० नग स्टार्टर रक्कम रू.४,९७,८४०/- मध्ये खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. सदरचा प्रस्तावातील साहित्य गणेशोत्सव लक्षात घेता तातडीने खरेदी करणे असल्याने याच बैठकीत सदर प्रस्ताव सर्वानुमते कायम करण्यात येतो.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१८/२:**

मा. अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, स.सदस्य स्वेच्छा निधीतून १५० वॅट फिटींग लावण्यासाठी निविदा मागविल्या असता एकूण पाच निविदा विक्री झाल्या व चार निविदा प्राप्त झाल्या आहेत. ज्याचे दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मे.पगारिया इंटरप्रायझेस औरंगाबाद | ३५७३ प्रतिनग |
| २ | मे.जायको पुणे | २८५० प्रतिनग |
| ३ | मे.मोनार्च मुंबई | ३२२६ प्रतिनग |
| ४ | मे.सत्य इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद | २९७५ प्रतिनग |

तुलनात्मकदृष्टया मे.जायको इंटरप्रायजेस, पुणे यांचे दर सर्वात कमी म्हणजे रू.२८५०/- प्रतिनग प्रमाणे १०० फिटींगचे एकूण रू.२,८५,०००/- होतात तरी मे. जायको पुणे तर्फे फिटींग खरेदीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा.सभापती :** नगर स्वेच्छा निधीतून खर्च करण्याबाबत जे प्रस्ताव प्रशासनाकडे येतात त्या प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करण्यांत यावी.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे १५० वॅट फिटींग लावण्यासाठी मागविण्यात आलेल्या निविदांमध्ये मे. जायको इंटरप्रायजेस यांचे दर सर्वात कमी म्हणजे रू.२८५०/- प्रतिनग प्रमाणे असल्याने सदर एजन्सी कडून १०० फिटींग रू.२,८५,०००/- मध्ये खरेदी करण्यास व सदरचा प्रस्ताव याच बैठकीत कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१९/३:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरातील सोडियम व्हेपर दिवे दुरूस्ती करीता विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू. ४,९७,५००/- च्या अंदापजत्रकास स्थायी समिती मंजुरी प्राप्त झाली आहे. त्या नुसार सदरील साहित्य खरेदी करण्यासाठी दरपत्रके मागविण्यांत आली असता कोरी दरपत्रके

विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण फक्त पांच दरपत्रके भरून प्रापत झाली . प्राप्त दरपत्रके दिनांक १२.७.९६ रोजी उघडण्यांत आली त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ क्र | साहित्याचे नांव | एजन्सीचे नांव | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नग | मे.किरण इले. | मोनार्च इले. | मे.सत्य इले. | मल्टीलाईट इंटरप्रायझेस | पगारीतया इंटरप्राझेस | एकूण येणारा खर्च |
| १ | १५० वॅट सोडीयम व्हेपर दिवे | २०० | ७१० | ६६१ | ६५५ | ७५० | ६५० | १,३०,०००.०० |
| २ | २५० वॅट सोडीयम व्हेपर दिवे | २०० | ८७५ | ७८० | ७८९ | ८८० | ७८१ | १,५६,०००.०० |
| ३ | १५० वॅट सोडियम दिव्याकरीता चोक | १०० | ७१० | ६१२ | ६१२ | ६५० | ६१० | ६१,०००.०० |
| ४ | २५० वॅट सोडियम दिव्याकरीता चोक | ८० | ९२० | ८६० | ८६५ | ९४० | ८६९ | ६८,८००.०० |
| ५ | १५०/२५० वॅट सोडियम दिव्याकरीता इग्नेटर | २०० | ३०५ | २९९ | २९५ | ३४० | २९९.९९ | ५९०००.०० |

वरील दर्शविलेल्या प्रमाणे ॲटम क्र.१ व ३ साठी मे.पगारिया इंटरप्रायजेस ॲटम क्र.२ व ४ साठी मे.मोनार्च इंटरप्रायझेस वॲटम क्र.५ करीता मे.सत्य इलेक्टींकल्स यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी आहेत. वरील प्राप्त कमी दरानुसार सदरील साहित्य खरेदी करावयाचे झाल्यास र.रू.४,७४,८००.०० इतका खर्च लागणार आहे.

मा. आयुक्त यांना आदेशित केल्याप्रमाणे फिलिप्स बजाज व कॉम्टन या कंपन्याकडून सदर साहित्या करीता दर मागविण्यांत आले असता फक्त बजाज व कॉम्प्टन या दोनच कंपनीचे दर प्राप्त झाले फिलिप्स कंपनीचे दर प्राप्त झाले नाहीत. तरी प्राप्त दोन्ही कंपन्याचे दर दर्शविणारा व येणारा खर्च दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | साहित्याचे नांव | नग | कंपनीकडून प्राप्त दर (जकात करासहित) | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बजाज | येणारा खर्च | कॉम्टन | येणारा खर्च |
| १ | १५० वॅट सोडीयम व्हेपर बल्ब | २०० | ५६१ | ११२२०० | ६२७.३० | १२५४६०.०० |
| २ | २५० वॅट सोडीय व्हेपर बल्ब | २०० | ६४६.६८ | १२९३३६ | ७२९.३० | १४५८६० |
| ३ | १५० वॅट सोडीयम दिव्याकरीता चोक | १०० | ६७८.३० | ६७८३०.०० | ७५४.८० | ७५४८०.०० |
| ४ | २५० वॅट सोडियम दिव्याकरीता चोक | ८० | ९४५.५४ | ७५६४३.०० | १०७१.०० | ८५६८०.०० |
| ५ | १५०/२५० वॅट सोडियम दिव्या करीता इग्नेटर | २०० | २६० | ५२००० | ३९२.७० | ७८५४० |
| | एकूण | | | ४३७००९ | | ५११०२० |

वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे बजाज इलेक्ट्रीकल्स या कंपनीचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी आहेत. परंतू बजाज कंपनीने वरील तक्त्यात दर्शविलेल्या ॲटम क्र.५ साठी १०% विक्रीकर आकारला जाईल असे कळविले आहे. त्यानुसार सदरील साहित्य बजाज इलेक्ट्रीकल्स या कंपनीकडून सदरील साहित्य खरेदी केल्यास र.रू.४३७००९/- + ॲटम क्र.५ वरील १०% सेल टॅक्स र.रू.५२००/- असे एकूण र.रू.४,४२,२०९/- इतका खर्च येणार आहे.

त्यानंतर प्रत्यक्ष लेखाधिकारी व उप अभियंता विद्युत यांनी प्रत्यक्ष फिलिप्स व कॉम्प्टन व बजाज या कंपनीशी प्रत्यक्ष भेट दिली असता पुन्हा पत्र देवून दिलेले दर कमी करणे बाबत विनंती केली असता फक्त बजाज व फिलिप्स यांनी त्यांचे सुधारीत दर दिलेले आहेत ते खालील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे आहेत.

| अ.क्र | साहित्याचे नांव | नग | कंपनीने दिलेले सुधारीत दर | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बजाज | येणारा खर्च | फिलिप्स | येणारा खर्च |
| १ | १५० वॅट सोडीयम व्हेपर दिवे | २०० | ५६१ | ११२२०० | ४५५ | ९१००० |
| २ | २५० वॅट सोडीय व्हेपर दिवे | २०० | ६४६.६८ | १२९३४० | ५३० | १०६००० |
| ३ | १५० वॅट सोडीयम दिव्याकरीता चोक | १०० | ६१०.०० | ६१००० | ८५० | ८५००० |
| ४ | २५० वॅट सोडियम दिव्याकरीता चोक | ८० | ८६० | ६८८०० | १०७५ | ८६००० |
| ५ | १५०/२५० वॅट सोडियम दिव्या करीता इग्नेटर | २०० | २८० | ५६१०० | ४७० | ९४००० |
| | एकूण | | | ४२७४४० | | ४६२००० |

(-) ३- सूट १२८२३.०० + १० % विक्री कर ४६२००.००

५०८२००.००
रू. ४१४६१७.०० + २% जकात १०१६४.००
रू.
५१८३६४.००

वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे साहित्य कमी दराच्या मे.बजाज इलेक्ट्रकल्स या कंपनीकडून खरेदी केल्यास एकूण र.रू.४,१४,६१७/- इतक्या खर्च होणार आहे.

तरी मे.बजाज इलेक्ट्रीकल्स यांच्याकडून वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे साहित्य र.रू.४,१४,६१७/- मध्ये खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहरातील सोडीयम व्हेपर दिवे दुरूस्तीकरीता विद्युत साहितय खरेदी करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.४,९०,५००/-० च्या अंदापजत्रकास स्थायी समितीची मान्यता मिळाल्यानुसार निविदा मागविण्यात आल्या मा. आयुक्तांनी आदेशित केल्यानुसार मे.फिलिप्स बजाज व कॉम्प्टन या कंपन्याकडून दर मागविण्यात आले असता केवळ बजाज इलेक्ट्रीकल्स व कॉम्प्टन ग्रीव्हज या कंपन्याचे प्रस्तावात दर्शविल्यानुसार दर प्राप्त झाले. लेखाधिकारी व उपअभियंता विद्युत यांना सदर कंपन्यांशी सपर्क साधून वाटाघाटी केल्यानुसार प्राप्त झालेल्या दरामध्ये मे.बजाज इलेक्ट्रीकल्स यांचे दर तुलनात्मकदृष्टया कमी असून त्यांनी दिलेल्या दरावर कंपनीचे पुन्हा ३% कमी दर देण्याचे मान्य केल्याचे प्रस्तावात दर्शविलेले साहित्य मे. बजाज इलेक्ट्रीकल्स यांच्याकडून रू.४,१४,६१७/- मध्ये खरेदी करण्यास तसेच सदरच्या प्रस्ताव साहित्य तातडीने खरेदी करावयाचे असल्याने प्रस्ताव याच बैठकीत कायम करण्यांतस सर्वानुमते मंजुरी देण्यांत यते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२०/४:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, शहरातील मक्युरी विद्युत दिवे दुरूस्ती करीता विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रू.४,७८,२५०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार सदरील साहित्य खरेदी करण्याकरीता दरपत्रके मागविण्यात आली असता दरपत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण आठ कोरी दरपत्रके विकल्या गेली व दरपत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत यापैकी फक्त पांच दरपत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त दरपत्रके दिनांक १२.७.९६ रोजी उघडण्यात आली त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | नग | एजन्सीकडून प्राप्त दर | | | | | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे.पगारिया इंटरप्राझेस | मे.सत्य इलेक्ट्रीकल | मे.मल्टी लाईट इंटरप्रायझेस | मे.किरण इले.स्टोअर्स | मे.मोनार्च इंटरप्रायझेस | |
| १ | १२५ वॅट मक्युरी बल्ब | ६०० | १८४.०० | १८५.०० | १९५.०० | १८८.०० | १८६.०० | ११०४७० |
| २ | २५० वॅट मर्क्युरी बल्ब | ३०० | ४६६.०० | ४६५.०० | ४९९.०० | ४९३.०० | ४६०.०० | १३८००० |
| ३ | १२५ वॅट मर्क्युरी चोक | १०० | ४५५.०० | ४५५.०० | ४९०.०० | ४९५.०० | ४५०.०० | ४५००० |
| ४ | २५० वॅट मक्युरी चोक | ५० | ६५५.०० | ६५२.०० | ७२५.०० | ७०५.०० | ६५०.०० | ३२५०० |
| ५ | टयुब लाईट होल्डर | २००० | १०.५० | १०.०० | १२.०० | ११.०० | ११.०० | २०००० |
| ६ | टेप बंडल | १००० | ११.२७ | ११.२५ | १२.६५ | १२.०० | १२.२५ | ११२५० |
| ७ | २x२.५० मी.मी.ॲल्यु.वायर कॉईल. | १५० | ४५१.०० | ४५०.०० | ६००.०० | ४७३.०० | ४५०.०० | ६७५०० |
| ८ | ४० वॅट टयुब करीता चोक | १००० | १४५.०० | १४८.०० | १७५.०० | १६०.०० | १५५.०० | १४५००० |

वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे ॲटम क्र.१,८ करीता मे. पगारिया इंटरप्रायझेस ॲटम क्र.५,६,७ करीता मे. सत्य इलेक्ट्रीकल्स व ॲटम क्र.२,३,४ करीता मे. मोनार्च इंटरप्रायझेस यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर असलेल्या एजन्सीकडून सदरील साहित्य खरेदी करावयाचे झाल्यास रू.५६९६५०/- इतका खर्च येणार आहे.

मा. आयुक्त यांनी आदेशित केल्यानुसार फिलिप्स कॉम्प्टन व बजाज कंपनीकडून दर मागविण्यात आले असता फक्त बजाज व कॉम्प्टन या कंपनीचे दर प्राप्त झाले आहेत. फिलिप्स कंपनीचे दर प्राप्त झाले नाहीत तरी प्राप्त दराचा तुलनात्मक तक्ता व अपेक्षित खर्च पुढील प्रमाणे आहे.

| अ.क | साहित्याचा तपशिल | नग | कंपनीकडून प्राप्त दर | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बजाज | एकूण खर्च | कॉम्प्टन | एकूण खर्च |
| १ | १२५ वॅट मक्युरी बल्ब | ६०० | १६३.२० | ९७९२०.०० | १६८.३० | १००९८० |
| २ | २५० वॅट मर्क्युरी बल्ब | ३०० | ४२८.८० | १२८५२०.०० | ४३८.६० | १३१५८० |
| ३ | १२५ वॅट मर्क्युरी चोक | १०० | ४२२.२८ | ४२२२८.०० | ४२३.३० | ४२३३० |
| ४ | २५० वॅट मक्युरी चोक | ५० | ६८८.५० | ३४४२५.०० | ७७०.१० | ३८५०५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | टयुब लाईट होल्डर | २००० | ७.१५ | १४३००.०० | दर दिलेले नाही | |
| ६ | टेप बंडल | १००० | दर दिलेले नाही | -- | दर दिलेले नाही | |
| ७ | २x२.५० मी.मी.ॲल्यु.वायर कॉईल. | १५० | दर दिलेले नाही | -- | दर दिलेंले नाही | |
| ८ | ४० वॅट फलोरोसंट टयुब चोक | १००० | १५३.०० | १५३००० | १८३.६० | १८३६०० |
| | | | | ४७०३९३ | | ४९६९९५ |
| | | | | ७८६५० | | ९८७५० |
| | | | एकूण | ५४९१४३ | | ५९५७४५ |

ज्या ॲटमचे दर कंपनीने दिले नाहीत ते ॲटम कमी दराच्या एजन्सीकडून खरेदी केल्यास येणारा खर्च वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे मे.बजाज इलेक्ट्रीकल्स यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी आहत. कंपनीने ॲटम क्र.५ वर दिलेल्या दराव्यतिरिक्त १०% सेल टॅक्स जास्त आकारल्या जाईल असे कळविले आहे. त्यानुसार सदरील साहित्य मे.बजाज इलेक्ट्रीकल्स कडून खरेदी केल्यास र.रू.५४९१४३/- + ॲटम क्र.५ वरील १०% सेल टॅक्स र.रू.१४३०/- असा एकूण र.रू.५,५०,५७३/- इतका खर्च येणार आहे.

त्यानंतर लेखाधिकारी व उप अभियंता (विद्युत) यांनी फिलिप्स कॉम्प्टन व बजाज कंपनीस प्रत्यक्ष भेट देवून दर कमी करणे बाबत विनंती केली असता बजाज व फिलिप्स या कंपन्यांनी आपले सुधारित दर दिले आहेत. त्यानुसार तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क | साहित्याचा तपशिल | नग | कंपनीकडून प्राप्त दर | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बजाज | एकूण खर्च | फिलिप्स | एकूण खर्च |
| १ | १२५ वॅट मक्युरी बल्ब | ६०० | १६३.२० | ९७९२०.०० | १२०.०० | ७२००० |
| २ | २५० वॅट मर्क्युरी बल्ब | ३०० | ४२८.८० | १२८५२०.०० | ३१५.०० | ९४५०० |
| ३ | १२५ वॅट मर्क्युरी चोक | १०० | ४२२.२८ | ४२२००.०० | ४९०.३० | ४९००० |
| ४ | २५० वॅट मक्युरी चोक | ५० | ६५०.०० | ३२५००.०० | ७२०.०० | ३६००० |
| ५ | टयुब लाईट होल्डर | २००० | ७.८५ | १५७००.०० | ६.५० | १३००० |
| ६ | टेप बंडल | १००० | दर दिलेले नाही | -- | दर दिलेले नाही | |
| ७ | २x२.५० मी.मी.ॲल्यु.वायर कॉईल. | १५० | दर दिलेले नाही | -- | दर दिलेंले नाही | |
| ८ | ४० वॅट फलोरोसंट टयुब चोक | ९००० | १४५.०० | १४५००० | १४०.०० | १४००० |
| | | | | ४६१८७० | | ४०४५०० |
| | | | ३% सूट | १३८५६ | + १०%विक्री कर | ४०४५० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण | ४४८०११४ | | ४४४९५० |
| | | | | ७८७५० | +२%जकात कर | ८८९९ |
| | | | | ५२६७६४ | | ४५३८४९ |
| | | | | | | ७८७५० |
| | | | | | एकूण | ५३२५९९ |

ज्या ॲटमचे दर कंपनीने दिले नाही ते ॲटम कमी दराच्या एजन्सी कडून खरेदी करावयाचे झाल्यास येणारा खर्च ज्या ॲटमचे दर दिले नाहीत ते ॲटम कमी दराच्या एजन्सीच्या दरानुसार पुरविण्यास फिलिप्स कंपनी तयार आहे याची र.रू.७८७५०.००
वरील तक्त्यात दर्शविलयाप्रमाणे मे बजाज इलेक्ट्रीकल्स यांचे दर तुलनात्मकदृष्टया कमी आहेत म्हणजे बजाज इलेक्ट्रीकल्स सदरील साहित्य र.रू. ४४८०१४/- मध्ये पुरविण्यास तयार आहे व ॲटम क्र.६ व ७ एजन्सी कडून खरेदी करावे लागतील त्यांचा खर्च र.रू.७८७५०/- येईल असे एकूण रू.५,२६,७३४/- इतका खर्च येणार आहे. व फिलिप्स कंपनी कडून सदरील संपूर्ण साहित्य खरेदी केल्यास र.रू.५,३२,५९९/- इतका खर्च येणार आहे. परंतु मा. आयुक्त बरोबर फिलिप्स कंपनीचे प्रतिनिधी बरोबर प्रत्यक्ष चर्चा झाली असता ते फिलिप्स इंडिया लि. हे सर्व साहित्य र.रू.५,३२,५९९/- ऐवजी ५,२५,०००/- मध्ये पुरविण्यास तयार आहेत.

तरी वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे साहित्य मे.फिलिप्स इंडिया लि.कंपनी कडून रक्कम रू.५,२५,०००/- मध्ये खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहरातील मर्क्युरी दिवे दुरुस्ती करीता विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी स्थायी समिती विषय क्र. दिनांक अन्वये रक्कम रु. ४,७८,२५०/- च्या अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त झाल्यानुसार निविदा मागविण्यांत आल्या. निविदा मधील दर जास्त वाटत असल्याने मा.आयुक्तांनी आदेशित केल्यानुसार मे. फिलिप्स बजाज व क्रॉम्प्टन या विद्युत साहित्यातील नामांकीत कंपन्यांची दरपत्रके मागविण्यात आली असता केवळ बजाज इलेक्ट्रीकल्स व क्रॉम्प्टन ग्रीव्हज या कंपन्यांची दरपत्रके प्राप्त झाली.

लेखाधिकारी व उपअभियंता (विद्युत) यांनी सदर कंपन्यांची भेट दिली असता त्यांनी सुधारीत दरपत्रके दिलेली आहेत. फिलीप्स इंडीया लि. कंपनीच्या प्रतिनिधी यांनी मा.आयुक्तां समवेत प्रत्यक्ष चर्चा करुन प्रस्तावात दर्शविण्यात आलेले साहित्य रु. ५,२५,०००/- मध्ये पुरविण्याची तयारी दर्शविल्याने प्रस्तावित साहित्य मे. फिलीप्स इंडीया लि. कंपनी कडून रक्कम रु. ५,२५,०००/- मध्ये खरेदी करण्यास व सदरचा प्रस्ताव याच बैठकीत कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र २२१/५**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, महापालिकेच्या बांधकामाकरीता सिमेंटची अत्यंत गरज आहे. त्यासाठी ४३ ग्रेड आय.एस.आय. ८११२-१९८९(ओ.पी.सी.) सिमेंटचे अंदापजत्रक तयार करून सर्वसाधारण सभेत ठेवले असता त्यास २०.७.९६ रोजी विषय क्र.२ अन्वये मंजुरी मिळाली आहे.

त्याआधारे सिमेंट खरेदीची निविदा स्थानिक व राज्यस्तरीय वर्तमानपत्रातून प्रसिध्द करावे असे ठरले. त्याप्रमाणे विश्वमित्र, सामना, औरंगाबाद टाईम्स् व सकाळ या वर्तमानपत्रात प्रसिध्द केली त्यात २४.७.९६ ते १२.८.९६ निविदा विकण्यांची तारीख ठेवण्यांत

आली व त्या कालावधीत एकूण दहा (१०) निविदा विकल्या गेल्या व दिनांक १६.८.९६ रोजी १० निविदा प्राप्त झाल्या त्या उपस्थितांसमोर उघडल्या असता त्यांचा दर व अटी खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मोदी सिमेंट | जकात सहित | १२५.०० |
| | | जकात सहित | ३.७५ |
| | | ३% प्रमाणे | १२८.७५ प्रती गोणी |

२ सदरील दर हे १५.१०९६ पर्यंत बंधनकारक राहतील.
३ काही नैसर्गिक आपली आल्या पुरवठा करण्यांत अडचण झाल्यास दंडाची कार्यवाही करू नये.
४ राज्य शासन व केंद्रीय सरकारने दरात वाढ केल्यास ती मनपास सोसावी लागेल.
५ ५०० मे.टन सिमेंट पुरवठा झाल्यावर त्याचे बिल अदा झाल्यास दुसरा पुरवठा करण्यांत येईल नसता सिमेंट पुरवठा थांबविण्यात येईल.

२ मुद्रा इंटरप्रायझेस मे.प्रतिटन २६२० म्हणजेच प्रतीगोणी १३१.००
(सी.सी.आय.सिमेंट) सर्व करासहित

३ सिमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया
१. प्रती मे.टन २६२८.०० म्हणजेच प्रतिगोणी १३१.००
२. सदरील दर हा १६.१०.९६ पर्यंत बंधनकारक राहील.
३. विविध कारणाने शासकीय करात वाढ झाल्यास ती कार्यालयास सोसावी लागेल.

४) **ग्रासिम सिमेंट :-** अटी प्रति. मे. टन २६७८ प्रति गोणी १२३=९० सर्व करासहित.

५) **ओरियंट सिमेंट :-**
१) प्रति. मे. टन २७५६=०० प्रति गोणी १३७=८०
२) सदरील दर हा ३१-१०-९६ पर्यंत बंधनकारक राहतील.
३) शासनाच्या करात काही वाढ झाल्यास ती मनपास सोसावी लागेल.
४) नैसर्गिक आपत्ती व वाहतुकीचे साधन न मिळाल्यास पुरवठा वेळेवर होऊ शकणार नाही.
५) जकात कर सोडून

**६) एलोरा कन्स्ट्रक्शन**
१) प्रति मे. टन २७८०=०० प्रति गोणी १३९=००
२) पुरवठा केलेल्या मालाचा (३) तीन दिवसात बील अदा केल्यास ००-२५ सुट देण्यास येईल.
३) इतराच्या दरापेक्षा आमचे दर जास्त वाटत असल्यास तर आम्हास दराच्या वाटाघाटीस बोलवावे.
४) माणिकगढ सिमेंट वेळेवर उपलब्ध झाले नाहीतर त्याच दर्जाचे दुसऱ्या कंपनीचे सिमेंट देण्याची मी ग्वाही देतो (आय एस आय ४३ ग्रेड)

**७) ए.सी.सी. कंपनी**
१) रु. २८०० प्रति मे. टन प्रति गोणी १४०=००
२) सोबत अनामत भरलेली नाही.
३) १००% ॲडव्हान्स दिल्यास सिमेंट पुरवठा करण्यांत येईल.

**८) व्ही.ए.ट्रडींग कंपनी**

१) प्रतिगोणी १४२=०० (सी.सी. आय. कंपनी)
२) २०० मे.टन सिमेंट पुरवठा केल्यास त्याचे बील तीन (३) दिवसात अदा करावे.
३) चाचणी अहवाल पी.डब्ल्यु डी. या देण्यांत येईल.
४) इ.एम.डी. सोबत जोडली आहे.

**९) एल ॲन्ड टी.**
१) रु. २८६८ प्रति मे. टन व १४३=४० प्रति गोणी
२) इ.एम.डी. सोबत जोडली नाही.
३) १००% अडव्हान्स देण्यांत यावा.
४) सदरील दर हा ३०-९-९६ पर्यंत बंधनकारक राहतील.
५) शासनाच्या दरात वाढ झाल्यास ती कार्यालयास सोसावी लागेल.

१०) पिडस अग्रो माकेर्टींग
१) रु. १५५=०० प्रति गोणी
२) राजश्री विक्रम ४३ ग्रेड यांचा पुरवठा करु.

वरीलप्रमाणे तुलनात्मकदृष्टया व अटी पाहता मोदी सिमेंट लि. यांचे दरपत्रक सर्वात कमी आहे. त्याचे दर व अटी पाहता मा. आयुक्त साहेबांनी दि. २-९-९६ रोजी आदेश दिला की, मोदी सिमेंट यांना दि. ७-९-९६ रोजी दराच्या बोलवावे त्या आधारे त्यांना कार्यालयीन पत्रक क्र. २८७/९६ दि. २-९-९६ अन्वये बोलवण्यात आले असता मोदी सिमेंटचे प्रतिनिधी दि. ७-९-९६ रोजी हजर हजर होऊन मा. आयुक्त साहेबांच्या दालनात चर्चा करण्यांत आली व त्यांना सर्व करासहित व निविदेतील शर्ती व अटीनुसार रु. १२६=०० प्रति गोणी (एकशे सव्वीस रु.) दर मान्य करण्यांचे ठरले आहे. त्या आधारे मोदी सिमेंट लि. नागपुर यांच्याकडुन वरील दराने सिमेंट खरेदी करुन व त्याचा रक्कम रु. ६२.५० लाख अदा करण्यास्तव सादर.

करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद**

**स.स.श्री.हमीद ताबा :** मोदी सिमेंट आता पावेतो कोणत्या शासकीय कार्यालयात वा इतर मोठया यंत्रणेकडुन वापरलेले आहे. अथवा त्याचे रिपोर्टस याबाबत काहीही उपलब्ध नाही. मनपातर्फे मोठे बांधकामे हाती घेण्यात येतात. तेव्हा असा सिमेंटचा वापर करुन विचार करुन व्हावयास हवा.

**स.सभापती :** मोदी सिमेंटपेक्षा सी.सी.आय.कंपनीने प्रतिगोणी एक रुपयाने दर कमी केलेले आहे. मोदी सिमेंटचा वापर मनपाने यापुर्वी केलेला नाही. मे मोदी सिमेंट की. यांचे दर सर्वात कमी आहेत. मा. आयुक्तांशी मोदी सिमेंट लि. कंपनीच्या प्रतिनिधीने चर्चा करुन १२६/- प्रतिगोणी या दराने सिमेंट पुरविण्याचा तयारी दर्शविली. मे.सी.सी. आय कंपनीचे औरंगाबादसाठी अधिकृत डिलर नाहीत व कंपनी स्वत: सिमेंट पुरवठा करु इच्छिते अशी ऑफर दिल्याचे सी.सी. आय.कंपनी प्रतिनिधीने वाटाघाटीअंती रु. १२५/- प्रति गोणी (सर्व करासह) सिमेंट पुरवठा करण्याची तयारी दर्शविल्यानुसार सर्व सभासदांना मंजुर असेल तर मुंबई प्रा. मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे पोटकलम २ नुसार स्थायी समितीस प्राप्त अधिकांन्वये मनपाचे

आर्थिक हीत लक्षात घेता व यापुर्वीही मनपाने सी.सी. आय. कंपनीचे सिमेंट वापरलेले असल्याने सी.सी. आय. सिमेंट कंपनीने दिलेल्या दरापेक्षा एक रुपया कमी दराने १२५/- प्रमाणे ५० हजार गोण्या सिमेंट खरेदी करण्यांस मंजुरी देण्यांत येते.

**स. सभापती :** सर्व स्थायी समिती सदस्यांनी मंजुरी दर्शविल्या नुसार सी.सी. आय कंपनीकडुन सिमेंट खरेदी करण्यांस मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि. २०-७-९६ च्या सर्वसाधारण सभेत विषय क्र. २ अन्वये ४३ ग्रेड आय.एस.आय. ८११२-१९८९ (ओपीसी) सिमेंट खरेदी करण्यांत मान्यता दिल्या नुसार सिमेंट खरेदी संदर्भाने निविदा प्रकाशित करण्यांत यावी. प्राप्त १० निविदामध्ये तुलनात्मकदृष्टया मे मोदी सिमेंट कंपनी लि. यांचे दर सर्वात कमी आहेत. मा. आयुक्तांशी मोदी सिमेंट लि. कंपनीच्या प्रति निधीने चर्चा करुन १२६/- प्रति गोणी या दराने सिमेंट पुरविण्याची तयारी दर्शविली मे. सी.सी.आय. कंपनीने दि. १७-९-९६ रोजी पत्र देऊन मे. मुद्रा एंटर प्रायजेस हे सी.सी.आय. कंपनीचे औरंगाबाद साठी अधिकृत डिलर नाहीत व कंपनी स्वत: सिमेंट पुरवठा करु उच्छीते अशी ऑफर दिल्याने सी.सी.आय. कंपनी प्रतिनिधीने वाटाघाटीअंती रु. १२५/- प्रतिगोणी (सर्व करासह) सिमेंट पुरवठा करण्यांची तयारी दर्शविल्यानुसार मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे संविदा चे कलम २ पोटकलम २ च्या प्राप्त अधिकारानुसार मनपाचे आर्थिक हित लक्षात घेता मे. सी.सी.आय. कंपनीकडुन रु. १२५/- प्रतिगोणी या दराने रु. ६२.५० लाखाचे सिमेंट खरेदी करण्यास स्थायी समिती सर्वानुमते मंजुरी देणे. तसेच सिमेंटची आवश्यकता लक्षात घेता ठराव कायम करण्यांस मंजुरी देण्यात येते.

**स. सभापती :** आजच्या सभा २१-९-९६ पर्यंत स्थगित करण्यांत येते. २१-९-९६ रोजी दुपारी २.०० वाजता स्थायी समितीची तहकुब सभा परत घेण्यात येईल. सदर सभेस स.सभासदांनी जकात प्रश्नासंबंधाने उपस्थित केलेल्या मुद्यावरती जकात अधिकाऱ्यांनी माहिती घ्यावी.

राष्ट्रगीत झाल्यानंतर ४.३० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापतीनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**शनिवार दिनांक २१-०९-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त.**

**शनिवार दि. २१-०९-९६ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. सभापती स्थायी समिती श्री.गिरजाराम हाळनोर यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभा संपन्न झाली सभेस निम्ननिर्दिष्ट सभासद तसेच महापालिका अधिकारी उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. गौतम खरात | सभासद |
| २) | स.स.श्री. कंवरसिंग बैनाडे | --//-- |
| ३) | स.स.सौ. रजनी जोशी | --//-- |
| ४) | स.स.कु. माया लाडवाणी | --//-- |
| ५) | स.स.श्री. श्री. विजयकुमार मेहेर | --//-- |
| ६) | स.स.श्री. महादेव सुर्यवंशी | --//-- |
| ७) | स.स.श्री. हमीदउद्दीन ताबा | --//-- |
| ८) | स.स.श्री. भगवान घडामोडे | --//-- |
| ९) | स.स.श्री. सुभाष टाकळकर | --//-- |
| १०) | स.स.श्री. त्र्यबंक तुपे | --//-- |
| ११) | स.स.श्री. कचरु नवपुते | --//-- |
| १२) | स.स.श्री. विकास जैन | --//-- |
| १३) | स.स.श्री. अ.रशिद खान (मामु) | --//-- |

**संवाद :**

**मा. सभापती :** दि. १७-९-९६ रोजी तहकुब करण्यांत आलेली बैठक आज पुन्हा सुरु होत आहे. "वंदेमातरम्" या गिताने सभेची सुरुवात करण्यात येते.

**श्री. गौतम खरात :** पद्मश्री दया पवार यांचे दु:खद निधन झाले आहे. सभागृहातर्फे या थोर साहित्यीकास दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दाजंली अर्पण करण्यांत यावी.

**मा. सभापती :** अमरनाथ यात्रेस देशभरात अनेक यात्रेकरु गेलेले होते. या यात्रेत नैसर्गिक आपत्तीने बरेचसे यात्रेकरु मृत्यमुखी पडलेले आहेत. त्यांनाही या सभेत श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

पद्मश्री दया पवार व अमरनाथ यात्रेत मृत्युमुखी पडलेल्या यात्रेकरुंना सभागृहात दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली. स. सभासदांनी सुचना केल्या नुसार संबंधिताच्या नातेवाईकांना महापालिकेतर्फे सचिवांनी शोकसंदेश पाठविण्याच्या सुचना स. सभापतींनी सचिवांना दिल्या.

**श्री. अ. रशिद खान (मामु) :** मा. आयुक्तांना अशातच पदोन्नती मिळालेली आहे. सभागृहातर्फे खात्याचे हार्दिक अभिनंदन.

**मा. सभापती :** मा. आयुक्त हे त्यांना पदोन्नती मिळाल्यानंतर प्रथमच या सभागृहात येत आहेत. महाराष्ट्र शासनास आम्ही विनंती करु की, शासनाने मा. वैद्य साहेबांच्या कार्याचा गौरव केलेला आहे. परंतु त्यांचे प्रमोशन शासनास आम्ही परी त्यांना अपग्रेड करुन या शहराचा विकास चांगलया प्रकारे व्हावा. यासाठी अशा तत्पर अधिकाऱ्यांस याच महापालिकेत ठेवण्यात यावे.

**मा. आयुक्त :** स.सभासदांचे मी अभार मानतो.

**श्री. कंवरसिंग बैनाडे :** आपल्या महापालिकेचा किती पैसा फिक्स डिपॉझिटमध्ये आहे व तो कोणकोणत्या बैंकांमध्ये ठेवण्यात आलेला आहे. जर एखादी बॅक इतर बॅकापेक्षा जास्त व्याजदर देत असेल तर अशा बॅकाकडे का पैसा ठेवण्यात येऊ नये. यामुळे एकप्रकारे महापालिकेचे हितच आहे. अशा बैंका विकासात्मक कामासाठी हातभार लावू शकतील.

**श्री. कचरु नवपुते :** स्टेट बॅक ऑफ इंडिया ही नॅशनलाईज्ड बॅक आहे. तिच्यातही पैसा ठेवण्यात यावा. आज विविध बॅकांमध्ये महापालिकेचे ७-७५ कोटी रुपये फिक्स डिपॉझिट स्वरुपात आहेत. यातील बॅकापैकी युनाटेड वेस्टर्न बॅक ही २.५% व्याज दर जास्त देते. को ऑपरोटिव्ह बॅकाकडे शासनाच्या आदेशानुसार विशिष्ट रक्कमेपर्यतचाच पैसा ठेवता येतो. नॅशनलाईज्ड बॅकाचा व्याजदर इतर बॅकापेक्षा कमी असतो तर शेडयुल्ड बॅकांचा व्याजदर त्यापेक्षा जास्त असतो. त्यामुळे को. ऑपरेटिव्ह बॅकामध्ये जास्त पैसा ठेवता येत नाही.

**मा. सभापती :** बॅकामध्ये फिक्स डिपॉझिट स्वरुपात पैसा ठेवतांना त्यात नियमाप्रमाणे स्थायी समितीची मंजुरी घ्यावयास पाहिजे. यानंतर स्थायी समितीची मंजुरी घेवून नंतरच बॅकांमध्ये फिक्स डिपॉझिट स्वरुपात पैसा ठेवण्यात यावा. एखादया बॅकेचा व्याजदर कमी असला तरी जर ती बॅक शहर विकास कार्यक्रमात सहभागी होत असेल तर त्याच्याकडे डिपॉझिट ठेवण्यास हरकत नसावी.

**मा. आयुक्त :** बॅकामध्ये पैसा ठेवत असतांना केवळ किती व्याज मिळते हे पाहता येणार नाही हे पैसे कसे आणि कोठे इनव्हेस्ट करावेत याबाबत शासनाने नियम बधने घातलेली आहेत. नॅशनलाईज्ड अथवा शेडयुल्ड बॅंकेचा रेट कमी असतो. आपले नुकसानही होणार नाही व आपल्या कार्यात एखादी बॅक सहभाग नोंदवू शकेल अशा बॅकेचा विचार करता येईल.

**श्री. रशिद खान (मामु) :** जकात वसुलीच्या संदर्भाने प्रत्येक महिन्यास स्थायी समितीस माहिती दयावयास हवी होती. तसेच मुख्य लेखापरिक्षक यांनी केलेले विभागांच्या ऑडिटचाही अहवाल सभागृहास दयावयास हवा मात्र असे अहवाल सभागृहात दिले जात नाहीत. मध्यंतरी जकात कर बुडवून १२ गाडया शहरात आल्या होत्या त्याचा अहवाल सभागृहात देण्यांत यावा.

**मा. सभापती :** जकातीचा मासिक अहवाल सर्व सभासदांना देण्यात यावा. तसेच ऑडिटचाही अहवाल सर्व सभासदांना देण्यांत यावा. जकाती बाबत जकात अधिक्षक खुलासा करतील.

**जकात अधिक्षक :** जकात वसुलीचा मासिक अहवाल सादर करण्यांत येतो. दि. २०-८-९६ रोजी बी.एम. पॉवर केबल तर्फे शहरात १२ गाडया २ आयशर टॅंकर १ मिनी बस जकात चुकवून आल्याचे समजल्यानंतर मा. उप आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली जप्त करुन मध्यवर्ती नाक्यावर आणण्यात आले. दि. २१-८-९६ रोजी कागदपत्रे सादर करण्यासाठी कैलास एजन्सीज यांना तीन दिवसांचा अवधी देण्यात आला २२-८-९६ रोजी श्री. कैलास एजन्सीजच्या प्रतिनिधी नी खुलासा सादर केला १२ कार लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळास मुंबई येथे पुरवावयाच्या आहेत. २ आयशर टॅकर विना परवाना जकात हद्दीत आलेले होते. व एक मिनी बस विना परवाना जकात हद्दीत

झालेले होते. आयशर टॅकर हे हैद्राबादचे होते. जप्त करण्यांत आलेल्या वाहनांपैकी सहा वाहनाच्या रक्कमेच्या १०% जकातीचा भरणा आधीच केलेला होता. सदरील वाहणे संबंधित एजन्सीने महापालिका हद्दीबाहेर जाणारी असल्याने महापालिका हद्दीबाहेरच उभी करावयास पाहिजे होती. पार्टीने या बाबीचे उल्लंघन केलेले असल्याने खालील प्रमाणे जकात वसुल करण्यांत आली. सहा वाहनांची जकात रक्कमेच्या १०% जकात भरणा केल्याचे दिसून आल्याने सदर वाहनांवरील संपुर्ण जकात घेण्यात आली. इतर वाहने विनापरवाना महापालिका हद्दीत उभी केलेली असल्याने व ती बाहेर जाणारी असल्याने जकातीच्या १% रक्कम घेण्यांत आली. आयशर टॅकर बाबत व मिनी बस बाबत रहदारी १० रुपये व रु. १०००/- दंड अशी जकात घेण्यात आली.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामु) :** महापालिका हद्दीबाहेर जाणारे वाहन एकदा महापालिका हद्दीत आले तर जास्तीत जास्त किती काळ शहरात थांबू शकते. ही वाहने शहरात येऊन एक महिना झाला मग पुर्ण जकात का घेतली गेली नाही. काही आपण महापालिका हद्दीबाहेर जाणार होतो तर मग त्यांच्यावरही जकात का आकारली गेली हे प्रकरण आपण सर्वसाधारण सभेकडे का पाठवले नाही.

**जकात अधिक्षक :** तिमोट्रेड ट्रॉझिट मध्ये तीन तासात गाडया शहराच्या बाहेर जावयास पाहिजेत.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** शासनातर्फे सुशिक्षित बेकारांना उद्योग धंदे मिळवून देण्यासाठी या गाडया अण्णाभाऊ साठे महामंडळातर्फे बेकारांना देण्यात येणार होत्या. व हा कार्यक्रम औरंगबाद येथे घेण्यात येणार होता. या गाडया बाहेर गावच्या होत्या. यासाठी महापालिकेने जो काही दंड घेतला असेल ता परत करावा. कारण याची रक्कम शेवटी गाडया घेणाऱ्याकडुन वसूल केली जाईल.

**उप. आयुक्त-१ :** बी.एम.पॉवर केबल तर्फे काही गाडया जकात चुकवून शहरात आलेल्या आहेत अशी माहिती मिळाल्यानंतर व काही बाबतीत संशय आल्याने त्या गाडया जप्त करण्यांत आल्या. एक सुरक्षितेची बाब म्हणुन या गाडया जकात नाक्यावर आणण्यात आल्या मुळे कागदपत्रांची पहाणी केली असता बी.एम. पॉवर केबलने अण्णाभाऊ साठे महामंडळाकडे गाडया बाहेरगांवी जावयाच्या आहेत अशी माहिती संबंधितानी महापालिकेत द्यावयास पाहिजे होती. नियमाप्रमाणे तीन तास माल शहरात ठेवता येतो. यापैकी दोन टँकर्स हैद्राबादच्या व एक मिनीबस डेमॉनस्ट्रेशनसाठी आलेली होती, या बाबीची चौकशी अंती खात्री पटल्यामुळे परंतु नियमाचे उल्लंघन झालेले असल्याने जकात व एक पट दंडाची रक्कम आकारण्यात आली जकातीची चोरी केल्याने १० पट दंड आकरण्यात येतो. उद्देश नसल्याचे दिसून आल्याने १० पट दंड आकारला नाही.

**श्री. अ. रशिद खान (मामु) :** जकात घ्यावयाची असती वृत्तपत्रात फोटो, बातम्या प्रसिध्द करण्यात आल्या परंतु प्रकरणात पुढे काय झाले हे वृत्तपत्रात पुढे काहीच झाले नाही. या प्रकरणात चौकशी व्हावयास पाहिजे. हैद्राबादला जाणारी गाडी औरंगाबादला एवढे दिवस का थांबली.

**डॉ. विजय कुमार मेहेर :** बिलावर चेसिस नंबर होता का तसेच बिलावर आण्णाभाऊ साठे महामंडळाचे नांव होते का?

**उप आयुक्त :** चेसिस नंबर बिलावर होते तसेच बिलावर अण्णाभाऊ साठे महामंडळाचे नांव होते. एक ट्रक सर्व्हिससाठी स्टेशनमध्ये झालेल्या होता. तो हैद्राबादला जाणार होता.

**श्री. अ. रशिद खान (मामु) :** प्रकरणांत परत चौकशी व्हावयास पाहिजे. या संदर्भाने उलट सुलट बातम्या ऐकावयास येतात.

**मा. आयुक्त :** प्रकरणांत फेर चौकशी करण्यांत येऊन अहवाल सभागृहापुढे ठेवला जाईल.

**मा. सभापती :** स.स.श्री. रशिद मामु यांनीही चौकशी कामी त्यांच्याकडे असलेली महिति प्रशासनास दयावी.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामु) :** अशातच जकातीचे उत्पन्न बरेच घटलेले आहे. ते का? जकात वसुलीची माहिती देण्यांत यावी.

**उप आयुक्त :** १-४-९५ ते १९-९-९५ या काळात १२ कोटी ८९ लक्ष रुपये उत्पन्न जकातीपासून मिळाले होते. यावर्षी उपरोक्त काळात १३ कोटी ९८ लक्ष रु. करापोटी मिळालेले आहेत. मागच्या वर्षीच्या तुलनेत १-४-९६ ते १९-९-९६ या काळात एक कोटी पेक्षा जास्त उत्पन्न जकाती पासुन मिळालेले आहे. अशातच झालेल्या पावसामुळेही शहरात येणाऱ्या मालावर परिणाम झालेला आहे. असे जकात अधिक्षक यांचे म्हणणे आहे.

**श्री. अ. रशिद खान (मामु) :** मागील वर्षाच्या तुलनेत शहरातील लोकसंख्या व्यापार यात वाढ झालेली आहे. असे असतांनाही जकातीचे उत्पन्न वाढत नाही. जकात विभागात जे कर्मचारी तीन वर्षापेक्षा जास्त काळापासुन कार्यरत आहेत. त्यांच्या बदल्या करावयात असे पुर्वीचे ठरले होते. त्यांची अंमलबजावणी का होत नाही.

**श्री. हमीद उद्दीन ताबा :** अनेक व्यापाऱ्यांचे गोडाउन्स शहराबाहेर आहेत तरीही जकात न भरता माल शहरात येते ही बाब जकात विभागातील कर्मचाऱ्यांना माहित आहे पुर्वी जकात विभागात भरारी पथक होते तो बद का करण्यात आला टु व्हिलर श्री. व्हीलर यांच्या विक्रेत्याकडुन जकात घेतली जाते का?

**उप. आयुक्त-१ :** टु व्हीलर व थ्री व्हीलर वरील जकात मुळातच कमी असली तरी ती भरुन घेतली जाते याची खात्री करण्यात आलेली आहे. जकात नाक्यांना वारंवार अचानक भेटी देवून त्यांची तपासणी करण्यात आलेली आहे.

**मा. सभापती :** जे तीन वर्षापेक्षा जास्त काळापासून जकात विभागात कामे करत आहेत. त्या सर्वाच्या बदल्या करण्यात याव्यात.

**श्री. रशिद खान (मामु) :** सोने कॅनेरा यांच्या वरीलही जकात कमी झालेली आहे.

**उप आयुक्त-१ :** तीन वर्षापेक्षा जास्त काळापासून जकात विभागाने कार्यरत असलेल्या सर्वाच्या बदल्या करुन येत्या स्थायी समिती बैठकीत अहवाल देण्यांत येईल.

**मा. आयुक्त :** प्रशासनाने केलेल्या बदल्यात इंटरफियन्स होणार नाही याचे अश्वासन असावे.

**श्री. गौतम खरात :** जकात वसुलीच्या संदर्भात सभागृहात देण्यात आलेला चार्ट पाहिला असता जकातीत १ एप्रिल ते १९-९-९६ या काळात मागच्या वर्षापेक्षा १ कोटी रुपयाचे दिसून येते. या आकडेवारी बरोबर ९४-९५ चे पाहिले तर जकातीच्या उत्पन्नाची खरी माहिती मिळु शकेल. वस्तुचे भाव सात्यत्याने वाढत आहेत. सध्याचे जकात अधिक्षक २०% दरवाढ लक्षात घेतली तर जकातीचे उत्पन्न गतवर्षीपेक्षा यावर्षी ३२ लाखाने कमी आहे. सध्याचे जकात अधिक्षक त्यांच्या वयोमानामुळे पाहिजे. तेवढया धडाडीने काम करु शकत

नाहीत. तेव्हा कार्यक्षम व सक्षम जकात अधिक्षक देण्यांत यावा यामुळे मा. आयुक्तांनाही त्यांच्या कामात मदत होईल. याचबरोबर काही जकात निरिक्षकही त्यांच्या वयोमानामुळे जकात विभागात कामे करु. शकत नाहीत. त्यांनाही इतरत्र काम देण्यांत यावे. कॅमेरा जकात वसुली बाबत सखोल चौकशी व्हावयास पाहिजे. तसेच भरारी पथकातही काही अधिकाऱ्यांचाही समावेश करण्यांत यावा. व वेळोवेळी जकात नाके चेक करण्यांत यावेत. तरच जकात उत्पन्नात वाढ होऊ शकेल.

**मा. सभापती :** आयुक्तांनी बाबींची दखल घ्यावी.

**श्री. कंवरसिंग बैनाडे :** वि.क्र. ३ च्या ऑडीट रिपोर्टवर काय कार्यवाही करण्यात आली. याची माहिती देण्यांत यावी.

**उप आयुक्त :** दि. १६-९-९६ रोजी मुख्य लेखा परिक्षक यांची विभाग क्र. ३ ला भेट देऊन कार्यालयीन कागदपत्रांची तपासणी केली असता रोखपाल शेख जाहिर यांनी महापालिकेच्या १२,४८९/- चा अपहार केल्याचे दिसून आले. याबाबत त्यांचे लेखी बयाणही घेतलेले आहे. ही बाब गंभीर असल्याने त्यांचे स्टेटमेंट घेण्यांत आले. मा. आयुक्त यावेळी दौऱ्यावर असल्याने शेख जहीर यांची तात्काळ विभाग क्र. ३ मधून बदली करण्यात आली. सध्या त्यांना निलंबीत करण्यांत आले आहे.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामु) :** अशा प्रकारणातील लोकांना शिक्षा ही मिळालीच पाहिजे.

**श्री. कंवरसिंग बैनाडे :** विभागीय अधिकारीही एकाच विभागात बऱ्याच वर्षापासुन कार्यरत आहेत. त्यांच्याही बदल्या व्हावयास पाहिजेत.

**श्री. अब्दुल रशिद खान (मामु) :** मिटींग विभागातील वरीष्ठ लिपीक श्री. संगमकर यांची दोन वर्षात पाच वेळा बदली झाली. ते एक चांगले कर्मचारी आहेत. अशा कर्मचाऱ्यास जकात विभागात देण्यांत यावे.

**मा. सभापती :** संगमकरांनी ऑडिट विभागाची मागणी होती. त्याच्या कामा बाबत मीही प्रशंसा केलेली आहे.

**श्री. हमीद उद्दीन ताबा :** विभागीय अधिकाऱ्यांच्या काही जागा सध्या रिक्त आहेत. त्या का भरल्या जात नाहीत.

**मा. आयुक्त-१ :** प्रमोशन कमेटिची बैठक झालेली आहे विभागीय अधिकारी लेखाधिकारी कार्यालय अधिक्षक वरिष्ठ लिपीक यांच्या रिक्त जागा भरण्या बाबत कार्यवाही चालू आहे.

**श्री. कचरु नवपुते :** झुणका भाकर केंद्रासाठी बरेचशा प्रकरणांना जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिलेली आहे. परंतु बरीचशी प्रकरणे नगर रचना विभागाकडे प्रलंबित आहेत. वेळीच अशा प्रकरणांत कार्यवाही व्हाववयास हवी.

**उप आयुक्त-२ :** महापालिकेकडे एकुण ३१ प्रकरणे आली होती. पैकी ६ प्रकरणे मंजुर झालेली आहेत. बाकीच्या प्रकरणांत ट्रफिकच्या दृष्टीकोनातुन विचार करण्यात येत आहे. याबाबत अति. शहर अभियंता यांच्याकडुन स्क्रटीनी करण्यात येत आहे. या संचिका लवकरच स्थायी समितीकडे ठेवण्यात येत आहे. या संचिका लवकरच स्थायी समितीकडे ठेवण्यात येतील.

**मालमत्ता अधिकारी :** झुणका भाकर केंद्रासाठी १४ अर्ज आलेले होते. ९ जागेसाठी अर्ज आलेले नाहीत.

**श्री. अ. रशिद खान (मामु) :** एक महिन्याच्या आत जागा ॲलॉट करण्यात आली नाही तर शासना निर्णया प्रमाणे ती ऑर्डर रद्द होते.

**मा. आयुक्त :** झुणका भाकर योजना शासनाने केलेली असली तरी महापालिकेने तिची अंमलबजावणी करावयाची आहे. जिल्हाधिकारी यांनी ३१ झुणकाभाकर केंद्राची यादी पाठवलेली होती याबाबत उपआयुक्त-२ यांना आदेश दिलेले आहेत. परंतु काही ठिकाणी जागा देतांना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उत्पन्न झाला. यामुळे मा. पालिकमत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत महापालिकेने आपली भुमिका स्पष्ट केली महापालिका कार्यालयातही यासाठी जागा मागितलेली आहे. तो प्रस्तावही स्थायी समितीकडे पाठविण्यात येत आहे. अशा प्रकरणात अगदीच गेटच्या जवळ जागा देणे शक्य होणार नाही. अशा प्रकरणांत रहदारीच्या दृष्टीकोणातुन पोलिस कमिशनर नगर रचना अति शहर अभियंता यांचे ना हरकत प्रमाणपत्र असणे जरुरीचे आहे.

**श्री. हमीद उद्दीन ताबा :** शहागंज भागात झुणका भाकर केंद्रासाठी जागा देण्याबाबतही संचिका चुकीच्या पध्दतीने हाताळली गेली. जिल्हाधिकारी यांनी संबंधिताचे नावाने यादी पाठवलेली असतानांही या ठिकाणी जागा देता येईल. काय याची पाहणी केली जाते. याठिकाणी बांधकामासाठी नगर रचना विभगाची परवानगी घ्यावी अशी अट टाकली जाते. तर काही लोकांची बांधकाम परवानगी मिळण्यापुर्वीच बांधकाम सुरु केले जाते. शहागंज भागात जागा देण्यासाठी नगर रचना विभागाचा अहवाल प्रथम घेतला गेला नाही म्हणुन वाद उत्पन्न झाला.

**मा. सभापती :** प्रशासनाने याबाबींची दखल घेऊन नियमाप्रमाणे संचिका लवकरात लवकर स्थायी समितीकडे पाठवाव्यात.

**श्री. कचरु नवपुते :** संचिका मंजुर होण्यात दिरंगाई झाली तर संबंधिताचे बरचसे नुकसान होते. कारण जिल्हाधिकाऱ्यांनी यादर दिल्यानुसार एक महिन्याच्या आत संचिका मंजुर न झाल्यास ती यादी रद्द होते. ही बाब विचारात घेऊन संचिका लवकरात लवकर मंजुर कराव्यात.

**श्री.अ.रशिद खान (मामु) :** स्टेशन रोडवरती मुत्रीच्या बाजुस झुणका भाकर केंद्रासाठी जागा दिलेली आहे. आरोग्याच्या दृष्टकोणातुन ही बाब बरोबर नाही. तेव्हा यासाठी दुर जागा देण्यात यावी.

**मा. सभापती :** स्टेशन वर मुत्री व झुणका भाकर केंद्र यांच्या मध्ये एक उंच भिंत बांधण्यात यावी. तसेच उप आयुक्त-२ यांनी झुणका भाकर केंद्रासाठी मंजुर करवयाच्या संचिका संदर्भाने संबंधित अधिकाऱ्यांनी सयुक्त बैठक घेऊन संचिका तात्काळ मंजुर कराव्यात.

**श्री. कंवरसिंग बैनाड :** जळगाव रोडवरती जाधववाडीजवळ बरेचसे लोक खडी रेतीचा व्यवसाय करतात. ही खडी रेती रोडवरच साठवली जाते यामुळे रहदारीसही अडथळा होतो हे व्यावसायिक व्यवसायासाठी महापालिकेची परवानगी घेतात का? तसे महापालिकेकडे जागेचा किराया भरतात का?

**मा. सभापती :** महापालिकेच्या परवानी शिवाय व महापालिकेच्या जागेवर ते व्यवसाय करत असतील तर त्यांच्या विरुध्द रितसर कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. सुभाष टाकळकर :** सर्वसाधारण सभेने स्थापन केलेल्या टपरी कमिटीने अहवाल सर्वसाधरण सभेत सादर केला होता. परंतु यावर पुढे काहीही कार्यवाही झालेली नाही. प्रकरणात सध्या काय कार्यवाही चालु आहे याचा खुलासा व्हावा..

**उप आयुक्त -**२ : टपरी कमिटीने शहरात कुठे टपऱ्या द्याव्यात यासाठी पॉईट फिक्स केले होते अशा टपऱ्या देण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. पोलिस विभागाकडुन यासाठी नाहरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे. फॉर्म वाटपाची प्रतिक्रिया १५ दिवसात सुरु करण्यात येईल.

**री. हमीदउद्यीन ताबा :** महापौर शहरात अनधिकृत बांधकामासाठी चिठ्ठया देत आहेत. मोढयांतील काही अतिक्रमणे पाडण्यासाठी प्रशासकीय अधिकारी गेले. असता त्यांना महापौरांची चिठ्ठी दाखवून अनधिकृत बांधकाम तोडण्यापासुन रोखले गेले.

**प्रशासकीय अधिकारी :** मोंढा भागात अनाधिकृत बांधकाम पाडण्यासाठी गेलो असता घोडके नावाच्या गृहस्थाने सदरची चिठ्ठी महापौरांची असल्याचे सांगितले. जागेवर युनुस यांच्यातर्फे बांधकाम करण्यात येत होते. चिठ्ठी कोणाची होती हे मी सांगु शकत नाही.

**मा. सभापती :** कोणतेही पदाधिकारी शहरातील अनाधिकृत बांधकामासाठी प्रोत्साहन देत नाहीत ही बाब स्पष्ट आहे. चिठ्ठी महापौरांचीच कशावरुन संबंधिताने दिशाभुल केली असेल. टपऱ्यांच्या संदर्भाने १५ ऑक्टोबर ९६ पुर्वी प्रोसिजर पुर्ण करण्यात यावे.

**श्री. अब्दुल रशिदखान मामु :** जे लोक १०-५० वर्षापासुन टपऱ्या टाकुन बसलेले आहेत परंतु त्यांची नावे टपरी कमिटीच्या यादीतुन सुटलेली असतील त्यांचाही टपऱ्या वाटप करतांना विचार करण्यात यावा.

**मा. सभापती :** टपरी कमेटीच्या सर्व्हेतून एखादया टपरी धारकाचे नाव सुटले असेल तर प्रशासनाने त्यांचे समाधान होईल अशा प्रकारे व्हेरिफिकेशन करुन त्यांच्या नावाचा टपऱ्यासाठी परमिशन दयावी.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** मालमत्ता कराची मोठया प्रमाणावर थकबाकी वसुल होणे आहे. अभियंत्याच्या वसुलीच्या संदर्भाने काही दिल्याचे समजते. उप अभियंत्याना साईटवर जाण्यासाठी गाडया देण्यात याव्यात उप अभियंत्याना काढुन घेण्यात आलेल्या आहेत. त्यांना परत गाडया देण्यात याव्यात.

**श्री. हमीदउद्यीन ताबा :** महापालिकेमध्ये एका युनियनचा बोर्ड लावलेला आहे. तो काढण्यात येईल असे आपण म्हटले होते त्याचे काय झाले?

**मा. सभापती :** सध्या प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने त्यावर चर्चा न करणेच ठिक राहिल.

**लेखाधिकारी -**१ : उप अभियंत्याच्या कर्ज देण्या संबंधिताने मा. आयुक्तांनी संचिका मंजुर केलेल्या आहेत. गाडी घेण्यासाठी कंपनीच्या नावाने धनादेश देण्यांत येणार आहे.

**मा. आयुक्त :** मालमत्ता कराची वसुली चांगल्याप्रकारे व्हावी. यासाठी मागील वर्षापुर्वीच गाडया देण्यात आलेल्या आहेत. अशास कोणत्याही त्याची गाडी काढण्यात झालेली नाही. विभागीय अधिकाऱ्यांना वसुली साठी गाडी आवश्यक आहेत.

**श्री. कचरु नवपुते :** विभाग क्र. ५ ची गाडी बऱ्याच दिवसांपासुन बंद आहे. त्यामुळे वसुलीवर परिणाम होतो. त्यांना दुसरी गाडी देण्यांत यावी.

**श्री. गौतम खरात :** महापालिकेत १६ अधिकारी रॅकचे आहेत. राज्य शासनाने त्यांच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना दिलेली वेतनश्रेणी महापालिका त्यांच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना देईल असा पुर्वीच ठराव झालेला आहे. मग याच अधिकाऱ्यांना राज्य शासनाच्या वेतनश्रेणी प्रमाणे वेतनश्रेणी का देण्यात येत नाही. उप अभियंत्यानाही शासनाच्या जी.आर. प्रमाणे वाढीव वेतनश्रेणी

मंजुर करण्यात आलेली आहे. तथापि तिही दिली जात नाही. यात दिरंगाई का होत आहे.

**उप आयुक्त-१ :** शाखा/उप अभियंता यांना वेतनश्रेणी देण्याच्या पुर्वी पासूनच प्रलंबित होतो. यात मुख्य लेखा परिक्षकांचे अभिप्राय घेण्यात आलेले आहेत. १६ अधिकाऱ्यांना राज्य शासनाच्या निर्णयाप्रमाणे वेतनश्रेणी देण्या बाबत व्हेरिफिकेशन चालु आहे.

**मा. सभापती :** आगामी स्थायी समितीत सदरचे प्रस्ताव ठेवण्यात यावेत. वाहन चालकांनी वेतनश्रेणी बाबत केलेल्या मागणीची माहिती आगामी स्थायी समिती बैठकीत माहिती देण्यात यावी. सॅनिटरी इन्स्पेकटरचा प्रस्ताव प्रशासनाकडे पाठवला होता. त्याबाबतही प्रशासनाने विचार करावा. कर्मचाऱ्यांना सात वर्षाची वेतनश्रेणी देण्या बाबत नियम बनवून आर.आर. संदर्भाने सर्वसाधारण सभेकडे प्रस्ताव पाठवावा.

**उप आयुक्त-१ :** आर.आर. बाबत वेगवेगळे रिप्रेझेटेशन्स आलेले आहेत. परत सर्वाचे ऑब्जेशन्स विचारात घेऊन सर्वधारण सभेकडे प्रस्तात पाठविला जाईल.

**श्री. हमीद उद्यीन ताबा :** औरंगपुऱ्यांत भाजीमंडई जवळ ३०-४० दुकाने बांधण्यात आलेली आहेत. मात्र ती अद्याप बंद आहेत. ती का विकली जात नाहीत.

**मा. सभापती :** रंगारगल्ली रस्ता रुंदीकरणात जी दुकाने बाधित होतात त्यांच्यासाठी ही दुकाने बांधलेली आहेत.

**श्री. हमीदउद्यीन ताबा :** रंगारगल्ली भागातील पुर्वीच्या बऱ्याचशा लोकांनी जागा सोडलेल्या आहेत तेव्हा या भागाचा परत सर्व्हे करण्यात यावा. क्रांती चौकातीलही बरीचशी जागा लोकांनी अडवून ठेवलेली आहेत ती का दिली जात नाहीत. भालेश्वर मार्केटचेही काम बंद आहे.

**उप अभियंता (इमारती) :** भोलेश्वर मार्केटचे काम चालु आहे. तेथे मटेरियल टाकण्यासाठी जागा नसल्याने मध्यतरी काम बंद होते.

**स.सभापती :** ५-५ वर्षाच्या लिजवर दुकाने देता येत असतील तर डिपॉझिट व भाडे त्याच प्रमाणे ठेवता येईल काय हे आयुक्तांनी तपासून पहावे.
पावसाळा संपल्यानंतर शहरातील अनाधिकृत बांधकामे अतिक्रमणे महापालिकेतर्फे पाडण्यात येणार आहेत. याकामी सर्व स. नगरसेवकांनी प्रशासनास मदत करावी.

**श्री. अ. रशिद खान (मामु) :** नाथ मार्केटमध्ये एम.एस.ई.बी. एक गाळा मागत आहे. नाथ मार्केटमध्ये बरेच गाळे खाली आहेत. एम.एस.ई.बी. का एखादा गाळा दिल्यास या भागातील लोकांची फ्युज कॉल सेंटरमुळे सोय होऊ शकेल.
पुर्वी महापालिकेस युनानी होमीयोपॅथी, आयुर्वेदिक डॉक्टर घेण्याचे ठरले होते त्याची अंमलबजावणी आतापावेतो झालेली नाही.

**उप आयुक्त-२ :** नाथ मार्केटमधील ६ दुकाने लिलाव पध्दतीने देण्यात येणार आहेत. लिलावासाठी २१ तारीख ठेवण्यात आलेली आहे. शासकीय कार्यालयांना लिलाव पध्दतीने जागा देण्यात येत नाहीत.

**श्री. अ. रशिद खान (मामु) :** नाथ मार्केटमध्ये वरच्या बाजुस एक हॉल मोकळा आहे त्यात फ्युज कॉलसाठी जागा देण्यात यावी.

**विषय क्र. २२२/१ :**

दि. ३०-८-९६ व १७-९-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद**

**श्री. महादेव सुर्यवंशी :** दि. ३०-८-९६ च्या स्थायी समिती सभेतील इतिवृत्ताचे पृष्ठ क्र. २२ अति. शहर अभियंता शहर अभियंता कार्यकारी अभियंता यांना १२५ लिटर पेट्रोल ऐवजी १५० लिटर अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**मा. आयुक्त :** पेट्रोलच्या दरवाढीच्या प्रमाणात रक्कम वाढवीण्यात यावी. असा मुळ प्रस्ताव आहे. पदाधिकारी यांना ३०० लिटर पेट्रोल किंवा रु. ६०००/- प्रति महा अशी मर्यादा ठेवण्यात यावी. उप आयुक्त व शहर अभियंता अति शहर अभियंता कार्यकारी अभियंता आरोग्य वैद्यकीय अधिकारी, सहा. संचालक नगर रचना यांना १२५ लिटर पेट्रोल अथवा रु. २६००/- प्रतिमहा खर्च अशी मर्यादा ठेवता येईल. इतर अधिकाऱ्यांना प्रस्तावात दर्शविल्यानुसार मर्यादा देण्यात आलेली आहे. ही मर्यादा वाढवतांना आर्थिक बोजाही वाढणार आहे. लिटरमध्ये वाढ करण्यात यावी. व यात वाढ करावयाची किंवा कसे याचा अभ्यास करुन अंदाजपत्रक सादर करतांना तसा प्रस्तावही सादर करण्यात येईल.

**मा. सभापती :** पेट्रोल दरात वाढ झालेली असल्याने प्रस्तावातील आर्थिक मर्यादित २५% वाढ करण्यात यावी. पाणी पुरवठा वगैरेच्या वाहनांना डिझेल वाढवून देण्यांबाबत स्वतंत्ररित्या प्रस्ताव ठेवावा.

**श्री. हमीद उद्दीन ताबा :** पृष्ठ क्र. २ चौकीदारीच्या व पाणी पुरवठा लाईनमनच्या जागा भरण्यासंदर्भाने मी मागील स्थायी समिती बैठकीत प्रश्न उपस्थित केलेला होता परंतु विचारलेला प्रश्न जसाच्या तसा इतिवृत्तात आलेला नाही.

**मा. सभापती :** पाणी पुरवठा विभागात ज्यांनी १० वर्ष काम केलेले असेल त्यांनाच लाईनमन म्हणुन घेण्यात येत आहे. या संदर्भाने आर.आर. मध्येही नियम घालून देण्यात आलेले आहेत. त्यानंतरच कार्यवाही करण्यात येत आहे.

**मुख्य लेखा परिक्षक :** सरळ सेवा भरती करत असतांना या पदासाठी उमेदवार किमान आय.टी. आय. पास पाहिजे. सध्या ही पदे पदोन्नतीने भरण्यात भरण्यात येत आहेत. पदोन्नतीसाठी काही क्वालीफिकशेन नाही. मात्र तो मंजुर पाणी पुरवठा विभागात सतत दहा वर्ष मंजुर म्हणुन काम करत असला पाहिजे.

**श्री. हमीद उद्दीन ताबा :** जे लोक १५-१५ वर्षापासुन चौकीदार म्हणुन काम करत आहेत त्यांना फक्त पे स्केल मधील बेसिक पे देण्यात येत आहे. त्यांना वेतनवाढ का दिली जात नाही. या चौकीदारांना वर्षभरात एक दिवसाचा गॅप देऊन पुन्हा कामावर घेतले जाते.

**उप आयुक्त :** शिक्षण विभागात ३० जागा फिक्स पे वर भरल्या जात होत्या या जागांना शासनाने मंजुरी दयावी म्हणुन उप संचालक (शिक्षण) यांच्या कडे पत्रव्यवहार चालू होता.

**श्री. हमीद उद्दीन ताबा :** या चौकीदारांना ग्रेड पुर्ण पे देण्यांत यावा.

**शिक्षणाधिकारी :** १० चौकीदारांना ग्रेड दिलेला आहे मात्र त्यांना वार्षिक वेतनवाढ देण्यात येत नाही. आज चौकीदार हे फिक्स पेवर आहेत.

**मा. सभापती :** आयुक्तांनी स्वतःच प्रकरणात लक्ष घालून पुढील बैठकीत अहवाल ठेवावा.

**श्री. अ.रशिद खान (मामु) :** श्रीमती व्ही के वाघमारे या उस्मानपुरा आभ्यासिका केंद्रात दैनिक वेतनवावर काम करत आहेत. सध्या त्यांना ३००/- मानधन देण्यात येते त्यांच्याबरोबर कामावर असलेल्या काही जणांना रु. १०००/- मानधन देण्यात येते मग श्रीमती वाघमारे यांनाच का नाही. दैनिक वेतन वाढ बाबत त्यांचाही विचार करण्यात यावा.

**मा. सभापती :** उप आयुक्त-२ यांनी चौकशी करुन पुढील बैठकीत अहवाल द्यावा.

**श्री. विकास जैन :** गत स्थायी समिती बैठकीत अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना देण्यात येत असलेल्या अतिरिक्त कामाच्या मोबदल्याबाबत मी प्रश्न विचाराला होता. त्याबाबत खुलासा व्हावा.

**अग्निशमन अधिकारी :** लिडींग फायरमनला १२ तासाची डयुटी देण्यात आलेली आहे. ८ तासाच्या डयुटीनंतर ४ तासाचा अतिरिक्त मोबदला त्यांना देण्यात येतो जादा काम करणाऱ्या इतर कर्मचाऱ्यांना स्पेशल डयुटी अलाऊन्स देण्यांत येतो.

**श्री. गौतम खरात :** जादा काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या नोंदी रजिस्टरमध्ये असतात. अग्निशमन अधिकारी सभागृहाची दिशाभुल करीत आहेत. रु. ७५/- हा रिस्क अलाऊन्स आहे. हा अतिरिक्त भत्ता नाही. ८ तासापेक्षा जादा काम करण्याऱ्या कर्मचाऱ्यांना त्या कामाचा मोबदला दिला गेला पाहिजे.

**मा. सभापती :** जे चतुर्थश्रेणी कर्मचारी ठराविक वेळेपेक्षा जास्त काम करत असतील त्यांना नियमानुसार अतिरिक्त कामाचा मोबदला देण्यात यावा.

**श्री.अ.रशिदखान मामु :** अग्निशमन तसेच इतर कामकाजाची माहिती घेण्याचा दृष्टीकोनातुन पिंप्री चिंचवड व इतर महानगरपालिकेच्या अभ्यास दौरा काढण्यात यावा.

**मा. सभापती :** यासाठी डॉ. मेहेर हमीदउद्यीन ताबा, रशिद मामु गौतम खरात, भालेराव यांनी नाशिक, ठाणे, पिप्री चिंचवड आदी महापालिकेस भेट देण्यासाठी एक समिती बनविण्यात येते त्यास सर्वसाधारण सभेची मंजुरी घ्यावी. उपरोक्त महापालिकांना भेटी देऊन अग्निशमन दल व इतर सर्व कामकाजांसंबंधी समिती सदस्यांची माहिती गोळा करावी. समितीस अभ्यास दौऱ्यावर जाण्यासाठी सर्वसाधारण सभेची मंजुरी घेण्यात यावी.

**श्री. हमीद उद्यीन ताबा :** इतिवृत्त पृष्ठ क्र. ३-१९९६ पासुन लाईनमनच्या ५० जागा रिक्त आहेत असे मी म्हटले होते व लाईनमनच्या १३ जागा रिक्त आहेत असे म्हटले होते. या जागा भरण्या बाबत कार्यवाही का करण्यात येत नाही.

**मा. सभापती :** लाईनमनच्या ५० जागा भरल्या आहेत १३ जागा ज्या रिक्त आहेत. त्या सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या आहेत. त्या अनुकंपा धर्तीवर भरण्यात आलेल्या आहेत. ते कर्मचारी शैक्षणिक पात्रता पुर्ण करत असतील तर त्यांना लाईनमनचे पद देण्यात यावे.

स्थायी समिती व सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त घेण्यासाठी मिटींग बैठकांचे इतिवृत्त घेण्यासाठी स्वतंत्र लघुलेखक देण्यात यावा. महापालिका कर्मचाऱ्यांमधुन कोणी लघुलेखनाच्या परिक्षा दिल्या असतील तर त्यांना प्रधान्य देण्यांत यावे. मराठी/इंग्रजीचे १२० स्पीड व टायपिंगची इंग्रजी ५० व मराठी ४० ची स्पीड असलेला उमेदवार घेण्यात यावा. अशाप्रकारे दोन जागा सहा महिन्यांसाठी भरण्यासाठी मंजुरी देण्यांत येते. त्यांना हिंदी लघुलेखनाचे ही ज्ञान असावे.

**सौ. रंजनी जोशी :** पाणी पुरवठा विभागातील लाईनमन नाही बरेच काम करावे लागते. त्यांनाही जादा कामाचा मोबदला देण्यांत यावा.

**मा. सभापती :** जादा कामाबाबत संबंधित अधिकाऱ्यांने तसे प्रमाणपत्र द्यावयास हवे.

**श्री. सुभाष कच्छवाह :** गत स्थायी समितीत ठरल्यानुसार हॉटेल अमरप्रित ते शहानुरमियॉ दर्गा रोडच्या कामा बाबतचा अहवाल देण्यात यावा.

**अति. शहर अभियंता :** या कामासाठी १५ लाखाचे ईस्टमेंट तयार करण्यात आले होते. या रस्त्याच्या जागेवर अतिक्रमण होऊ नयेत यासाठी जागेचे सपाटीकरण करण्याचे काम चालु करण्यात आले होते. टेंडर मधील आयटेम क्र. १ व २ एक्झिक्युट झाल्याचे टेंडर मधुन वगळण्यात आलेले आहेत. कामासाठी आयुक्तांची मंजुरी घेतलेली होती.

**श्री. गौतम खरात :** इतिवृत्तातील पृष्ठ चार वरील "आम्ही स्टडी टुरवर जात असतांना श्री. गौतम खरातांनी जकात अधिक्षकांकडे कामांच्या संदर्भाने चर्चा केली होती. बहुधा ती झाली नसावीत याचाच त्यांना राग आलेला दिसतो." हा भाग इतिवृत्तातुन वगळण्यात यावा.

**मा.सभापती :** सदरील वाक्ये इतिवृत्तातुन वगळण्यात यावीत विषय क्र. १६४/१० स्थगित ठेवण्यात आलेला होता त्यास मंजुरी दि. ३०-८-९६ च्या इतिवृत्तास मंजुरी देण्यांत येते.

**स. सभापती :** दि. १७-९-९६ च्या बैठकीत सिमेंट खरेदीचा विषय मांडण्यात आला होता तो विषय हा आज या ठिकाणी आपल्या समोर ऐनवेळी जो विषय मांडण्यात आलेला आहे फेरविचारार्थ सादर म्हणुन यात मा. आयुक्तांनी आपले म्हणणे मांडले आहे. शहर अभियंता यांनी दि. १७-९-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीकडे सिमेंट खरेदी बाबत प्रस्ताव सादर केला होता दि. २४-९-९६ रोजी सिमेंट खरेदी बाबत निविदा मागविल्या असता एकुण १० निविदा प्राप्त झाल्या. तुलनात्मकदृष्टया मोदी सिमेंट कंपनी यांचे दर सर्वात कमी म्हणजे रक्कम रु. १२८.७५/- प्रतिगोणी हे सर्व करासंहित असे प्राप्त झाल्यानुसार मा. आयुक्त यांनी ८-९-९६ रोजी मे. मोदी सिमेंट यांच्याशी दराबाबत वाटाघाटी करुन रु. १२६ प्रतिगोणी सर्व करासंहित मान्य केल्याप्रमाणे स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर केला. त्यावर स्थायी समितीने १७-९-९६ रोजी ठराव क्र. १२१/५ अन्वये मुळ निविदेतील तिसऱ्या क्रंमाकाच्या पुरवठा धारकाने वाटाघाटी अंती रु. १२५/- प्रतिगोणी सर्व करासंहित दर दिल्याने तिसऱ्या क्रमांकाच्या पुरवठा धारकांस सी.सी. आय. कंपनीचे सिमेंट खरेदी करण्यास मंजुरी दिली आहे. मा. आयुक्तांनी मोदी सिमेंट यांचा प्रस्ताव १२६/- प्रति गोणी वाटाघाटी अंती स्थायी समिती समोर ठेवला होता. मोदी सिमेंट यांनी १८-९-९६ रोजी मा. आयुक्त यांना १२३/- प्रतिगोणी सर्व करासंहित सिमेंट पुरविण्यास तयार असल्याचे कळविले आहे. व कायदेशीर नोटीस देऊन स्थायी समितीने आम्हास चर्चेस बोलविले नसल्याने आमच्यावर अन्याय झाल्याचे म्हटले आहे. ते रु. १२३/- प्रतिगोणी प्रमाणे सर्व करासंहित सिमेंट तयार आहेत व त्यामुळे महापालिकेस फायदा होत आहे. असे कळविले आहे. त्यामुळे सदर प्रकरणी स्थायी समिती दि. १७-९-९६ ठराव क्र. २२१/५ बाबत महापालिकेचा आर्थिक व इतर सर्व बाबींचा सर्वांगीण विचार करता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**श्री. हमीद उद्यीन ताबा :** मोदी सिमेंट हे शहरात इट्रॉडयुस झालेले नाही. या डिलरने जालन्यात जि.प. कडे सिमेंट सप्लाय करत असतांना त्या बरोबर रेतीच्या गोण्याही टाकल्या होत्या त्यामुळे महापालिकेचेही नुकसान होऊ शकेल ही बाब लक्षात घेऊन मोदी सिमेंट यांना कंत्राट देऊ नये असे आम्ही म्हटले होते.

**श्री. अ. रशिद खान (मामु) :** मोदी सिमेंट ही संस्था गव्हर्नमेंट अंडरटेकिंग नाही सी.सी. आय. ही कंपनी गव्हर्नमेंट अंडरटेकींग आहे. ग्वहर्नमेंट अंडरटेकिंग संस्थाकडुन माल खरेदी करावा असे शासनाचेही आदेश आहेत.

**शहर अभियंता :** मोदी सिमेंटचया माल शहरात झालेला नाही त्यांनी १२३/- रु. प्रतिगोणी प्रमाणे सिमेंट पुरवठा करण्याची तयारी दर्शविली आहे.

**स. सभापती :** एकदा स्थायी समितीने ठराव मंजुर केल्यानंतर पुन्हा कोणाशी रेट निगोशिएट करता येतात काय याबाबत विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

**विधी सल्लागार :** प्रशासनामार्फत जे टेंडर सभागृहापुढे सादर केले ते मंजुर न होता कमी दराचे टेंडर स्थायी समितीने मंजुर केले प्रश्न असा उपस्थित होती की एकाच वेळी दोन ठिकाणी निगोशिएशन्स करता येतात का?

**मा. आयुक्त :** प्रश्न असा आहे की प्रशासनातर्फे स्टॅडिंग कमेटी समोर जो प्रस्ताव आलेला आहे तो मान्य न करता स्टॅडिंग कमेटीस निगोशिएटस करता येतात का प्रशासनाने पाठवलेला प्रस्ताव मंजुर नसेल तर स्थायी समितीने तो नामंजुर करावा व आपले म्हणने प्रशासनास कळवावे. आपण येथे निगोशिएट्स करु नका असे मला म्हणावयाचे आहे.

**श्री. हमीद उद्यीन ताबा :** स्थायी समितीने एकदा निर्णय घेतलेला आहे तो बदलता येतो का?

**मा. सभापती :** आयुक्तांशी ऐखादे रेट निगोशिएट करुन पाठवले तर ते स्थायी समितीने स्विकारणे बंधनकार आहे का?

**मा. आयुक्त :** हमीद ताबा यांनी मोदी सिमेंट यांनी जालना जि.परिषदेस सिर्मेट बरोबर रेतीच्या गोण्या पुरविल्या असा गंभीर आरोप केलेला आहे. या बाबत यांना एवढी मोठी ऑर्डर द्यावयाची की नाही याचा विचार करावाच लागणार त्याचे व्हेरिफीकेशन करावे लागेल सी.सी.आय. कडुन सिमेंट घ्यावयाचे असेल तर तसा स्पेसिफीक ठराव घ्यावा लागेल. गव्हर्नमेंट ऑफ इंडियाच्या उपक्रमास एनकरेज करण्यासाठी त्यांच्याकडुन सिमेंट घ्यावे असता ठराव घ्यावा लागेल. ओपन टेंडर आल्यानंतर निगोशिएन्स निगोशिएशन्स करुन आपणांस कमी रेट मिळालेले आहेत ते मान्य करण्या शिवाय पर्याय नाही. यावर गंभीर्याने विचार व्हावा.

**श्री. कचरु नवपुते :** सेकंड लोएस्ट बरोबर निगोशिएशन्स करुन त्यांच्याकडुन माल घेता येतो अशी आमची धारणा आहे.

**श्री. अ. रशिद खान (मामु) :** टेंडर कॅन्सल करण्यात यावे. व आयुक्तांना नविन टेंडर मागविण्यात यावेत.

**मा. आयुक्त :** निगोशिएशन्स करुन पाठविण्यांत आलेले टेंडर नामंजुर करतांना त्याची कारणे दयावयास पाहिजेत. त्यास ठोस पुरावे असावेत.

**स. सभापती :** फर्स्ट लोएस्टला टेंडर न देता सेंकड लोएस्ट बरोबर निगोशिएशन्स करण्याचे अधिकारी स्थायी समितीस आहेत काय याचा विधी सल्लागारांनी खुलासा करावा.

**विधी सल्लागार :** विथ रिझनिंग अधिकार आहेत.

**स. सभापती :** १७-९-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये सिमेंट खरेदी बाबत मा. आयुक्तांनी शिफारस केलेले मोदी सिमेंट कंपनीच्या दरापेक्षा सी.सी.आय. कंपनीने स्थायी समितीकडे दिलेल्या पत्रानुसार (या काळात मा. आयुक्त शहरात नव्हेत म्हणुन त्यांनी हे पत्र स्थायी समितीस दिले होत) सदरील कंपनीकडुन रु. १२५/- प्रतिगोणी प्रमाणे सिमेंट खरेदी करण्यास स्थायी समितीने मंजुरी दिली आज दि. २१-९-९६ रोजी मोदी कंपनीचे दिलेले दर रु. १२३/- प्रति गोणी प्रमाणे सदरील कंपनी कडुन सिमेंट खरेदी करण्याबाबत मा. आयुक्त यांच्या कडुन प्रस्तावित करण्यात आले मोदी कंपनीने पुर्वी त्यांचे दर १२६/- प्रति गोणी प्रमाणे मा. आयुक्तांकडे सादर केले होते. आता त्याच कंपनीने रक्कम रु. १२३/- प्रति गोणी प्रमाणे सिमेंट पुरविण्यास मंजुरी दिलेली आहे. (सदरील मोदी कंपनीचे दिलेली ऑफर सद्यपरिस्थितीत बोनाफाईड दिसुन येत नाहीत अशी समितीची धारणा आहे. त्यामुळे सदरील कंपनी बरोबर सिमेंट पुरविण्याबाबत करार करणे संयुक्तिक होणार नाही. सध्या महानगरपालिकेने शासकीय अनुदान तुन बरीचशी कामे हाती घेतलेली आहेत. रस्ते ड्रेनेज इमारती इत्यादी कामासाठी चांगल्या प्रतीचे व मुदतीत सिमेंट मिळणे आवश्यक आहे. म्हणुन स्थायी समिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुचीचे प्रकरण २ चे नियम २ चे परंतु काच्या अधिन राहुन मा. आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात येते की, कामाची निकडच कामाचा दर्जा सुरक्षित राहण्याचे दृष्टीने हा महापालिकेचे हित लक्षात घेऊन दोन्ही कंपन्याची प्रस्तावित केलेले दर विचारात घेता सी.सी. आय. कंपनी ही गव्हर्नमेंट अंडरटेकिंग असल्याने महापालिकेत सिमेंट खरेदी करण्याबाबत सी.सी.आय. कंपनी कडुन करारनामा करण्यात यावा. मा. आयुक्तांनी सी.सी.आय. कंपनीशी वाटाघाटी करावी.

पान क्र. १२ वरती सध्या शहरात गणेशोत्सव सुरु आहे. तेव्हा याबाबत काही महत्वाची कामे हाती घ्यावयाची असल्यास प्रथम ते ठराव सभागृहात मांडण्यात यावेत म्हणजे त्यावर विचार करता येईल. असे म्हटले आहे. त्या ऐवजी गणेशोत्सवाचे दिवस सुरु झालेले आहेत. त्यादृष्टीकोनातुन महत्वाची कामे मरुम टाकणेवगैरे जी करावयाची आतील ती संबंधित अधिकाऱ्यांनी करुन घ्यावीत व कार्योत्तर मंजुरीसाठी पाठवावीत त्यास मंजुरी देण्यात येईल. असे पाहिजे.) त्यास बरोबर प्रथमतः एजन्सीने आणलेले दर रद्द करण्यात येत आहेत. कंपनीचे झालेले दर मान्य करण्यात येत आहेत. अशी दुरुस्ती करावी.

**ठराव :**

१) दि. ३०-८-९६ च्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ४ वरील आम्ही स्टडी टुरवर जात असतांना श्री. गौतम खरातांनी जकात अधिक्षकांकडे काही कामांच्या संदर्भीने चर्चा केलेली होती. बहुदा ती झाली नसावीत याचाच त्यांना राग आलेल्या दिसतो. ही वाक्ये इतिवृत्तातुन वगळण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

२) पृष्ठ क्र. १९ वरील या काळात मा. आयुक्त शहरात नव्हते म्हणुन त्यांनी पत्र स्थायी समितीस दिले होते.

३) दि. १७-९-९६ च्य इतिवृत्तात पृष्ठ क्र. १३ वरती सध्या शहरात गणेशोत्सव सुरु आहे. तेव्हा याबाबत काही महत्वाची कामे हाती घ्यावयाची असल्यास प्रथम ते ठराव सभागृहात मांडण्यात यावेत म्हणजे त्यावर विचार करता येईल. असे म्हटले आहे.
त्यऐवजी गणेशोत्सवाचे दिवस सुरु झालेले आहेत. त्या दृष्टीकोनातुन महत्वाची कामे मुरुम टाकणे वगैरे जी करावयाची असतील ती संबंधित अधिकाऱ्यांनी करुन घ्यावीत. व कार्योत्तर मंजुरीसाठी पाठवावीत त्यास मंजुरी देण्यांत येईल असे पाहिजे.
त्याच बरोबर प्रथमतः एजन्सीने आणलेले दर रद्द करण्यात येत आहेत व कंपनीचे दर मान्य करण्यात येत आहेत अशी दुरुस्ती करावी. उपरोक्त दुरुस्त्यासह दि. ३०-८-९६ व १७-९-९६ च्या स्थायी समिती बैठकीच्या इतिवृत्तात सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२३/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर करीत आहेत की, विशाल नगर मधील अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामा करिता सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९५-९६ च्या दरसुची नुसार र.रु. १,५६,९२६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामास मा. आयुक्त यांनी मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च सन १९९६-९७ चे "भांडवली रस्ते" या शिर्षकामधुन प्रस्तावित आहे. तरी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विशाल नगर येथील अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी सा.बां. खात्याच्या ९५-९६ च्या दर सुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु. १,५६,९२६/- च्या अंदाजपत्रकास व सदरील काम ९६-९७ च्या भांडवली रस्ते या शिर्षका मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२४/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मो. रेगंटीपुरा रोहिदासपुरा भागात अरुंद गल्ल्यांमध्ये खांडकी दुरुस्त करणे व रुंद गल्ल्यामध्ये खडीरस्ते तयार करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक र.रु. २,१८,२५४/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल व दुरुस्ती सन १९९६-९७ या लेखा शिर्षका अंतर्गत उपलब्ध तरतुदी मधुन करण्यात येणार आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. २,१८,२५४/- चे मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समिती यांचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार रेगंटीपुरा रोहीदासपुरा भागात अरुंद गल्यां मध्ये खांडकी दुरुस्त करणे व रुंद गल्ल्यामध्ये खडीरस्ते तयार करणेच्या कामासाठी सा.बां. खात्याच्या ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,१८,२५४/- च्या

अंदाजपत्रकास तसेच सदरचे कामाचा खर्च ९६-९७ च्या अंदाजपत्रकातुन रस्ते देखभाल व दुरुस्ती या शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२५/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला मो. चेलीपुरा भागातील रोडचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ५,२०,५९७/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ६१६/५० दि. २८-६-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामा करिता निविदापत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण सहा (६) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन (३) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दि. १२-७-९६ रोजी उघडण्यात आली त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | ७.७७% | कमी दराने |
| २. | मे. मस्कट कंन्स्ट्रक्शन | ६.००% | --//-- |
| ३. | श्री. भिमराव वसंतराव पाटील | २०.८०% | जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं. याच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.७७% कमी आहेत.

तरी मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं. यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.७७% कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चेलीपुरा भागातील रोडचे डांबरीकरण करण्यासाठी ५,२०,५९७/- चे अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ६१६/५०/ दि. २८/६/९६ अन्वये मंजुरी देण्यांत आल्या नुसार मागविण्यात आलेल्या निविदा मध्ये मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं. यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.७७% कमी असल्याने मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कंपनीच्या दर स्विकृतीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२६/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, रशिदपुरा आणि त्रिवेणी नगर भागातील रोडचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ७,६१,८८१/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्रंमाक ५९१/२५ दि. २८-६-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामा करिता निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण (७) कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त चार (४) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली.

प्राप्त निविदापत्रके दि. १२-७-९६ रोजी उघडण्यात आली असता त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मस्कट कंन्स्ट्रक्शन कं. | १२.००% | कमी दराने |
| २. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं. | ४.७७% | कमी दराने |
| ३. | श्री. एस.एस. जग्गी | १०.००% | --//-- |
| ४. | श्री. व्ही.व्ही. श्रीरामनगर | ४.८०% | जास्त दराने |

तरी प्राप्त निविदापत्रकापैकी मे. मस्कट कंन्स्ट्रक्शन कं. यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.००% कमी आहेते. दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलेल्या कामाची पहाणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २२७/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला एस.टी.कॉलनी आणि दमडी महल भागातील रोडचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ४,११,८२२/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ५८५/१९ दि. २८-६-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामा करिता निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण सात (७) कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त चार (४) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दि. रोजी उघडण्यात आली त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एम.एस.जग्गी | १०.००% | कमी दराने |
| २. | श्री. भिमराव वसंतराव पाटील | ९.८०% | जास्त दराने |
| ३. | मे. मस्कट कंन्स्ट्रक्शन कं. | ५.००% | कमी दराने |
| ४. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं. | -- | अंदाजपत्रकीय दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी श्री. एम.एस. जग्गी यांच्या निविदापत्रकाचे दर यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.००% कमी आहेत. तरी श्री. एम.एस. जग्गी यांचे अंदाजपत्रकीय दरपेक्षा १०.००% कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एस.टी. कॉलनी दमडी महल भागातील रोडचे डांबरीकरण करण्यासाठी तयार करण्यात आलेले रु. ४,११,८२२/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. ५८७/१९ दि. २८-६-९६ अन्वये मंजुरी दिल्या नुसार बोलविण्यात आलेल्या निविदा मध्ये श्री. एम.एस. जग्गी यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया

सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.००% कमी असल्याने सदरची निविदा स्विकृतीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२८/७ :**

पाणी पुरवठा विभाग क्र. २ (सिडको) झोन ७ झोन ५ अंतर्गत येणाऱ्या जलवाहिनी व नविन जलवाहिनी साठी वॉल्व खरेदीसाठी अंदाजपत्रक र.रु. ४,८२,१००/- चे तयार करण्यात आलेले असुन सदरील कामावर येणारा खर्च भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखा शिर्षकातील तरतुदी मधुन करण्यात येणार आहे. रु. ४,८२,१००/- चे अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे. तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. ४,८२,१००/- चे अंदाजपत्रकास मंजुरी बाबतच्या प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी पुरवठा विभाग-२ सिडको झोन ७ झोन ५ अंतर्गत येणाऱ्या जलवाहिन्या व नविन जलवाहिन्या साठी वॉल्व खरेदी करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ४,८२,१००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखा शिर्षकातील तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२९/८ :**

पाणी पुरवठा विभागात क्र. २ (सिडको) झोन क्र. ५ आणि झोन क्र. ७ अंतर्गत येत असलेल्या जलवाहिन्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी १००,१५० व २०० मी.मी. व्यासाचे ऐ.सी.पाईप व जाईन्ट खरेदी करण्यासाठी परिसर अभियांत्रिकी सार्वजनिक बांधकाम खाते याच्या १९९५-९६ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक र.रु. ३,६२,५००/- चे तयार करण्यात आलेले असून सदरील कामावर होणार खर्च देखभाल व दुरुस्ती या लेखा शिर्षाकातील तरतुदी मधुन करण्यात येणार आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले र.रु. ३,६२,५००/- चे अंदाजपत्रकास मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार पाणी पुरवठा विभाग क्र. २ (सिडको) झोन क्र. ५ आणि ७ अंतर्गत असलेल्या जलवाहिन्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी १००,१५० व २०० मी.मी. व्यासाचे ए.सी.पाईप व जॉईन्ट खरेदीसाठी रक्कम रु. ३,६२,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. आय.एस.आय. मार्क साहित्य पुरविण्याऱ्या शिफारशी वाटाघाटी करुन जे अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने प्रस्तावातील साहित्य पुरविण्यास तयार असतील त्यांच्या कडुन प्रशासनाने ते खरेदी करावे. सदर खरेदीस नंतर कार्योत्तर मंजुरी देण्यांत येईल असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३०/९ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण हयांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दादा कॉलनी येथे मुख्य गटारीत जागोजागी दुरुस्ती करुन स्लॅब टाकणेच्या कामाकरिता परिसर अभियांत्रिकीच्या दरसुची नुसार रक्कम रु. ३,४०,२३६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरील काम "झोपडपट्टी व शहरातील इतर भागात खुल्या गटारी बांधणे हया लेखा शिर्षकाखाली करण्यात येईल. सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ३१-८-९६ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तरी सदरील कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र.रु. ३,४०,२२६/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार दादा कॉलनी येथे मुख्य गटारीस जागोजागी दुरुस्ती करुन स्लॅब टाकण्याच्या कामा करिता परिसर अभियांत्रिकीच्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु. ३,४०,२३६/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे काम झोपडपट्टी व शहरातील इतर भागात खुल्या गटारी बांधणे या लेशा शिर्षकातुन करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३१/१० :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे. की मो. जाधवमंडी येथील गटार दुरुस्ती करुन गटारींवर स्लॅब टाकणे कामा करिता परिसर अभियांत्रिकीचे सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. १,७६,८९६/- चे तयार करण्यात आले आहे.

सदरील काम झोपडपट्टी व शहरातील इतर भागात खुल्या गटारी बांधणे हया लेखा शिर्षकाखाली करण्यांत येईल. सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी ३०-८-९६ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तरी सदरील कामा करिता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रक्कम रु. १,७६,८९६/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार जाधवमंडी येथील गटार दुरस्ती करुन गटारीवर स्लॅब टाकण्याच्या कामाकरिता परिसर अभियांत्रिकीच्या ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेल्या रु. १,७६,८९६/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च झोपडपट्टी व इतर भागात खुल्या गटारी बांधणे या लेखा शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३२/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, संजय नगर मुकुंदवाडी व रोहीदास नगर येथील खुल्या जागेस सुरक्षित भिंत व फरशी बसविणे बाबत सदर कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९५-९६ च्या दर सुची अन्वये र.रु. १,१०,०००/- चे तयार करण्यात आले आहे.

सदर कामाचे खर्च विकास योजना अंतर्गत भुखंडाचे संरक्षण या तरतुदी मधुन करण्यात येणार आहे.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार नुसार संजय नगर मुकुंदवाडी व रोहिदास नगर येथील जागेस संरक्षित भिंत व फरशी बसविण्या बाबत सा.बां. खात्याच्या ९५-९६ च्या दरसुची अन्वये बनविण्यात आलेल्या रक्कम रु. १,१०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे काम विकास योजना अंतर्गत भुखंडाचे सरंक्षण या तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३३/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. गांधीनगर स्लम येथे मनपा शाळे जवळ संरक्षित भिंत बांधणे व खडी रस्ते तयार करणे बाबत कामा करिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या ९५-९६ च्या दर सुची नुसार र.रु. २,२७,१६३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम खडी रस्ते तयार करणे या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ८-८-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामा करिता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रक्कम रु. २,२७,१६३/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार गांधीनगर स्लम येथे महापालिका शाळे जवळ संरक्षित भिंत बांधणे व खडी रस्ते तयार करणे बाबत सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या सुची नुसार तयार करण्यात आलेल्या र.रु. २,२७,१३६/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे कामांचा खर्च खडी रस्ते तयार करणे या शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३४/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हडको एन-११ येथील प्रा. शाळेला संरक्षित भिंत बांधणेच्या स्थायी समिती बैठक ठराव क्र. ८९/३४/ दिनांक १२-७-९६ अन्वये र.रु. ५,००,२७६/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/९०/९६ दि. १-८-९६ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकुण २० निविदा विक्री झाल्या निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यात एकुण (५) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्या दि. २७-८-९६ ला उघडण्यात आल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन | २३.२५% | कमी दराने |
| २. | मे. एस.एच. असोशिएटस | २२.२२% | --//-- |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्री. रिचपालसिंग बींद्रा | १०.१७% | कमी दराने |
| ४. | श्री. कुलवंतसिंग | १३.१०% | --//-- |
| ५. | श्री. शेख सलिम | १९.९१% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.२५% कमी दराची मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा स्विकारणेस्तव स्थायी समितीकडे ठेवणे योग्य अशी लेखाकारी-१ यांनी शिफारस केली व त्यास मा. आयुक्त यांनी दि. ३-९-९६ मंजुरी दिल्या नुसार विचारार्थ त्या आदिनाथ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार एन-१ हडको येथील प्रा. शाळेला संरक्षित भिंत बांधण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र. ८९/३४/ दि. १२-७-९६ अन्वये रक्कम रु. ५,००,२५६/- ला मंजुरी दिल्या नुसार बोलावण्यात आलेल्या निविदा प्रमाणे प्राप्त निविदा पैकी मे. एलोरा कन्स्ट्रक्शन कंपनीची निविदा दर तुलनात्मकदृष्टयाम्सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.२५% कमी असल्याने सदर कंपनीचे दर स्विकृतीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३५/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिडको एन-७ येथील शालेय इमारतीस संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि. १८-३-९६ ठराव क्र. ५६८/२ अन्वये रक्कम रु. ५,०२,४२०/- प्रस्ताव व इतिवृत्तात एन-७ ऐवजी एन-६ असा उल्लेख झालेल्या आहे. कारण एन-६ शाळेच्या संरक्षित भिंतीचे बांधकाम करण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र. ८८/३३ दि. १२-७-९६ अन्वये हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८०/९६ दि. २१-६-९६ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकुण २५ निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखपर्यंत एकुण (८) दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. १७-७-९६ ला उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. के.जे. शेलार | १४.५०% | कमी दराने |
| २. | श्री. राजासिंग कौशल | १५.८% | --//-- |
| ३. | श्री. सरवदे एस.पी. | १९.१% | --//-- |
| ४. | श्री. कुलवंतसिंग | १०.७% | --//-- |
| ५. | श्री. प्रकाश वाघ | ५.१२% | --//-- |
| ६. | मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन | १७.६% | --//-- |
| ७. | श्री. सि.डी. लव्हेकर | ७.२१% | --//-- |
| ८. | मे. विपुल कंन्स्ट्रक्शन | २०.२५% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.२५% कमी दराची निविदा मे. विपुल कंन्स्ट्रक्शन यांची असुन विभागाने दिलेल्या अभिप्राय कोणताही विचार न करता मान्य करण्यास हरकत नाही. कामाचा दर्जा बाबत विभागाने काळजी घ्यावी अशी

शिफारस लेखाधिकारी-१ यांनी केली व त्यास मा. आयुक्तांनी दिनांक ७-९-९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे. १) केंद्रीय प्राथमिक शाळा एन-६ असा नावात जो बदल झालेला व २) अंदाजपत्रकीय दरापेक्षा (२०.२५%) कमी दराची निविदा बाबत उपरोक्त मंजुरी नुसार विचारार्थ व योग्य त्या आदेशास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलेल्या कामाचाी पाहणी करण्यात येऊन नंतर त्यास मंजुरी देण्यांत येईल. असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३६/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, केंद्रीय प्रा. शाळा सिडको एन-९ येथील शालेय इमारतीस संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. ९०/३५ दि. १२-७-९६ अन्वये रक्कम रु. ५,१८,५९०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदर काम हाती घेण्यासाठी कार्यलयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/९०/९६ दि. १-८-९६ अन्वये विक्रीच्या तारखे पर्यंत एकुण (२४) निविदा विक्रीझाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण (८) निविदा भरुन प्राप्त झाल्या त्या दि. २७-८-९६ ला उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. चौधरी कंन्स्ट्रक्शन | २१.३३% | कमी दराने |
| २. | मे. एलोरा कंस्ट्रक्शन | २३.२५% | --//-- |
| ३. | मे. एस.एच. असोसिएट | २०.१% | --//-- |
| ४. | श्री. आ.एल. बारवाल | १८.१% | --//-- |
| ५. | श्री. मेराज अली | ११.३०% | --//-- |
| ६. | श्री. विजय वाघ | १५.०१% | --//-- |
| ७. | श्री. शेख सलिम | १८.९०% | --//-- |
| ८. | श्री. एस.एम. मंडोरे | १५.२५% | --//-- |

तुलात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.२५% कमी दराची मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा असुन त्यास मान्य करण्यास हरकत नाही व स्थायी समिती पुढे ठेवणे योग्य अशी शिफारस लेखाधिकारी-१ यांनी केली आहे व त्यास मा. आयुक्त यांनी दि. ७-९-९६ रोजी मान्यता दिली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ व योग्य त्या आदेशास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे के. प्रा.शा. सिडको एन-९ येथील शालेय ईमारतीस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी समिती ठराव क्र. ९०/३५ दि. १२-७-९६ अन्वये रु. ५,१८,५९०/- च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळाल्या नुसार बोलाविण्यात आलेल्या निविदा मध्ये मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन कंपनीची निविदा तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.२५% कमी असल्याने सदर कंपनीचे निविदा पत्रक स्विकृतीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३७/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बसैय्ये नगर भागातील अंतर्गत रोडचे आणि सिडको हद्दी पर्यंतच्या ५० फुट विकास रस्त्या डांबरीकरण करणे. या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ९,११,११०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ५८४/१८ दि. २८-६-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामा करिता निविदा पत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण नऊ (९) कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत यापैकी फक्त सहा (६) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दि. १२-७-९६ रोजी उघडण्यात आली त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एम.एस.जग्गी | १७.००% | कमी दराने |
| २. | मे. आदिनाथ कंस्ट्रक्शन | ७.७७% | --//-- |
| ३. | मे. भास्कर कंन्स्ट्रक्शन | ५.००% | --//-- |
| ४. | मे. व्यंकटेश कंन्स्ट्रक्शन | ००.०१% | --//-- |
| ५. | मे. व्ही.व्ही. श्रीरामवार | ४.८०% | जास्त दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदा पैकी श्री. एम.एस.जग्गी यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.००% कमी आहेत. तरी श्री. एम.एस. जग्गी यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार बसैय्ये नगर भागातील अंतर्गत रोडचे सिडको हद्दी पर्यंतच्या ५० फुट विकास रस्त्यांचे डांबरीकरण करण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र. ५८४/१८ दि. २८-६-९६ अन्वये बोलविण्यात आलेल्या निविदा मध्ये प्राप्त निविदांपैकी श्री. एम.एस. जग्गी यांचे निविदा दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.००% कमी असल्याने सदर निविदा स्विकृतीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३८/१७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ गेट समोरील चौकाचे सौंदर्यीकरण करणे या कामा साठी मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रतिकृती नुसार सुबक व आकर्षक आणि देखभालीस सोपे राहील असे ब्रॉस घातु मधील कामासाठी प्रसिध्द शिल्पकार श्री. पी.आर. सासमकर यांचे कडुन सदर प्रतिकृतीसाठी रक्कम रु. २,१५,०००/- चे अंदाजपत्रक प्राप्त झाले होते. तरी श्री. पी.आर. सासमकर शिल्पकार यांना वाटाघाटीस बोलावले असता व त्यांचेशी झालेल्या प्रत्यक्ष चर्चेनुसार त्यांनी प्रतिकृती प्रमाणे सर्व मॉडेल रक्कम रु. १,९५,०००/- मध्ये उभे करुन देणे बाबत संमती दर्शविली आहे. तरी सदर कामासाठीचे अंदाजपत्रक रक्कम रु. १,९५,०००/-

मंजुरी बाबत तसेच सदरील काम शिल्पकार श्री.पी.आर.सासमकर यांचे कडुन अंदाजत्रकीय दराने करुन घेणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर. सदरील कामाचा खर्च शा.अ.सन ९५-९६ (वाहतुक बेटे सौदर्यीकरण) या लेखा शिर्षका मधुन करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी शिल्पकार श्री.पी.आर. सासमकर यांनी दिलेल्या रक्कम रु. १,९५,०००/- च्या अंदाजपत्रक मंजुरी बाबत सदर काम शिल्पकार श्री. सासमकर यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ गेट समोरील चौकाचे सौंदर्यीकरण करण्यांच्या कामासाठी मा. आयुक्तांनी मंजुर केलेल्या नुसार शिल्पकार श्री. पी.आर. सासमकर यांच्या कडुन अंदाजपत्रकीय दराने रु. १,९५,०००/- मध्ये करुन घेण्यास व सदरचा खर्च शा. अ. ९५-९६ (वाहतुक बेटे सौदर्यीकरण) या लेखा शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३९/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बन्सीलालनगर येथे मुख्य रस्त्यास रुंदीकरण (खडीकरण) करणे व शिल्प नगरचा खडी रस्ता तयार करणेच्या कामाचे सन ९५ चे सा.बां. खात्याचे दर सुची नुसार रक्कम रु. १,२३,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च "रस्ते दुरुस्ती व देखभाल" या लेखा शिर्षा मधुन सन ९६-९७ साठी असलेल्या तरतुदी मधुन प्रस्तावित आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,२३,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार बन्सीलालनगर येथे मुख्य रस्त्यास रुंदीकरण खडीकरण करणे व बांधकाम खात्याच्या ९५ च्या दर सुची नुसार तयार करण्यात आलेल्या रु. १,२३,०००/- च्या अंदाजपत्रकास व सदरचा खर्च रस्ते दुरुस्ती व देखभाल शिर्षातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४०/१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिडको एन-६ येथील के.प्रा. शाळेला संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक ठराव क्र. ८८/३ दि. १२-७-९६ अन्वये रक्कम रु. ५,०४,३९०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. तसेच सदरील काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८०/९६ दि. १-८-९६ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखे पर्यंत एकुण (२०) निविदा विक्री झाल्या निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (९) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दि. २७-८-९६ ला उघडण्यात आल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. अ. सलीम | १८.१८% | कमी दराने |
| २. | श्री. मेराज अली | ११.०५% | --//-- |
| ३. | श्री. एस.एच. असोसिएट | २१.२१% | --//-- |
| ४. | श्री. देशमुख एस.ए. | १०% | --//-- |
| ५. | श्री. देशपांडे एस.आर. | २०.६५% | --//-- |
| ६. | श्री. एलोरा कंन्स्ट्रक्शन कं. | २३.२५% | --//-- |
| ७. | श्री. आर. एल. बारवाल | १८% | --//-- |
| ८. | श्री. विजय वाघ | १५% | --//-- |
| ९. | श्री. एस.ए. नवाब | १३.१३% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.२५% कमी दराची मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा मान्य करण्यास हरकत नसावी. व प्रस्ताव स्थायी समिती पुढे ठेवणे योग्य अशी शिफारस लेखाधिकारी यांनी केली आहे. त्यास मा. आयुक्त यांनी दि. ७-९-९६ रोजी मंजुरी दिली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा आदेशास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सिडको एन-६ येथील केंद्रीय प्रा. शाळेला संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी स्थायी समितीने दि. १२-७-९६ च्या ठराव क्र. ८८/३३ अन्वये मंजुरी दिल्यानुसार निविदा बोलावल्या असता प्राप्त निविदांपैकी मे. एलोरा कन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.२५% कमी दराची असल्याने सदरची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४१/२० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. बनेवाडी भागात अर्धगोलाकार व दगडी गटार बांधणेच्या कामा करिता अंदाज पत्रकीय रक्कम रु. ६,८२,५००/- सा.बां. विभाग औरंगाबाद यांची दरसुची ९३-९४ प्रमाणे तयार करण्यात आले असून मा. आयुक्त यांनी दि. ८-३-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून सदरील काम महानगरपालिकेच्या अर्थसंकल्प ९५-९६ च्या झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत (खुली गटार" या शिर्षा अंतर्गत सदरील काम करण्यात येईल.

तसेच मा. आयुक्त व स्थायी समितीच्या विषय क्र.     दि. १८-३-९६ अन्वये मंजुर झाल्या प्रमाणे सदरील काम करिता कार्यालयाची प्रगट निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८०/९६ दि. २१-६-९६ रितसर प्रसिध्दी वृत्तपत्रात देऊन निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण वीस (२०) कोऱ्या निविदा विकल्यागेल्या व स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त पाच (५) मोहबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा दि. १७-७-९६ रोजी उपस्थित गुत्तेदारा समक्ष उघडण्यात आल्या असता गुत्तेदारांनी दिलेले दर पुढील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. आर.एल. बारवाल | ११.५१% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| २. | श्री. मेराज अली | ११.००% | --//-- |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्री. ए.एम. फारुकी | १०% | --//-- (ईएडी नाही.) |
| ४. | श्री. कुलवंतसिंग | १३% | --//-- जास्त |
| ५. | मे. बसरा कंन्स्ट्रक्शन | २२% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.५१% कमी दराची निविदा श्री. आर.एल. बारवाल यांची निविदा आहे.

करिता मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार बनेवाडी भागात अर्धगोलाकार व दगडी गटार बांधणेच्या कामा करिता सा.बां. विभागाच्या ९३-९४ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या स्थायी समिती ठराव क्र.       दि. १८-३-९६ अन्वये मंजुर दिल्यानुसार निविदा बोलाविण्यात आल्या असता प्राप्त निविदा मध्ये श्री. आर.एल. बारवाल यांची निविदा तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.५१% कमी दराची असल्याने सदर निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४२/२१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. हमालवाडा स्लम भागात डांबरी रस्ते तयार करणे करिता रक्कम रु. ६,२८,०००/- चे अंदाजपत्रक सा.बां. विभाग यांची दर सुची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यात आले असुन मा. आयुक्त यांनी दि. ५-६-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असुन सदरील काम महानगरपालिकेच्या सन ९६-९७ अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत "डांबरी रस्ते" हया शिर्षा अंतर्गत करण्यात येईल.

तसेच मा. आयुक्त व स्थायी समिती दि. २८-६-९६ विषय क्र. ३८ व्दारे मंजुरी अनुसार सदरील कामा करिता कार्यालयाची प्रगट निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८८/९६ दि. १६-७-९६ अन्वये निविदा मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण तीन (३) कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या अंतिम तारखेस फक्त तीन (३) निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा रोजी उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या असता गुत्तेदारांनी दिलेले दर पुढील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. रे. कंन्स्ट्रक्शन | १७% | अं.प. दरापेक्षा कमी |
| २. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | ८.७७% | --//-- |
| ३. | श्री. भिमराव वसंतराव पाटील | ४.१% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% कमी दराची निविदा मे.रे. कंन्स्ट्रक्शन यांची आहे. करिता मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार हमालवाडा स्लम भागात डांबरी रस्ते तयार करण्या करिता बनविण्यात आलेल्या र.रु. ६,२८,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव

क्र. ८८/९६ दि. १६-७-९६ अन्वये मंजुरी दिल्या नुसार निविदा बोलवल्या असता मे. रे. कंन्स्ट्रक्शन यांची निविदा सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% कमी असल्याने सदर निविदा स्विकृतीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४३/२२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, लक्ष्मीवाडी पदमपुरा येथे दुषित पाणी पुरवठा नागरिकांना होवून कावीळची लागण झाली होती. सदर भागात २५ ते ३० वर्ष पुर्वीची आर.सी.सी. जलवाहिनी ही बदलुन त्या ठिकाणी नविन सी.आय.व ए सी जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ च्या दर सुची नुसार रक्कम रु. १,३४,८००/- एवढण्याचे अंदाजपत्रक लागण झाल्यामुळे जुनी जलवाहिनी बंद करण्यात येवून टॅकर व्दारे पाणी पुरवठा करण्यात आला. पाणी पुरवठा बंद असल्यामुळे हे काम तातडीने ६७(३) क अंतर्गत हाती घेऊन उपलब्ध गुत्तेदार श्री. ए.ए. आबेदी यांची मार्फत करुन घेण्यास व अंदाजपत्रक रक्कम रु. १,३४,८००/- मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार लक्ष्मीवाडी पदमपुरा येथील २५-३० वर्षा पुर्वीची आर.सी.सी. जलवाहिनी बदलुन त्या ठिकाणी नविन सी.आय. हा ए.सी. जलवाहिनी टाकण्यासाठी परिसर अभियांत्रिकीच्या ९४-९५ व ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु. १,३४,८००/- च्या अंदाजपत्रकास व या भागातील पाणी पुरवठा बंद असल्यामुळे हे काम तातडीने ६७(३) क अंतर्गत उपलब्ध गुत्तेदार श्री. ए.ए. आबेदी यांच्या कडुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४४/२३ :**

मालमत्ता अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, भडकलगेट येथील अब्दुल मजिद अ. रहिम यांच्या मालकीची जागा १०० फुट रुंद रस्ता भडकलगेट सिटी क्लब विकास योजनेत बाधित झाल्यामुळे ती जागा मनपातर्फे संपादित करण्यात आली होती व घर मालकांना पर्यायी जागा म्हणुन कटकट दरवाजा येथे मनपा तर्फे पर्यायी जागा देण्या बाबत जे भुखंड नगर रचना विभागा तर्फे तयार करण्यांत आले होते त्यापैकी भुखंड क्रमांक २२,२४ हे श्री. अब्दुल मजिद अब्दुल रहीम यांना देण्यांत आले आहेत व त्यांच्या कडुन भुखंडाचे किंमत वसुल करण्यात आली आहे. ज्यापैकी २२ व त्यांनी घर बांधलेले आहे.

श्री. अब्दुल मजिद अ. रहिम यांना जे भुखंड देण्यांत आले होते त्यापैकी भुखंड क्र. २३-२४ मधुन रस्ता मनपा तर्फे टाकण्यात आलेली जलनिःसारण वाहिनी (ड्रेनेज लाईन) गेलेली आहे. त्यामुळे प्लॉट क्र. २३,२४ बाधित झालेली आहे. करिता त्यांनी कार्यालयास भुखंडाऐवजी मनपाच्या मालकीची तेवढीच जागा जिचा भुमापन क्र. ११३१३ आहे. त्यापैकी जागा देण्यांत यावी म्हणुन विनंती केली आहे.

कार्यालया तर्फे वरील बाबीची चौकशी करण्यात येवून संबंधितास नगर भुमापन क्र. ११३१३ मधील "२२X३३" फुट आकाराची जागा देण्यात हरकत नसावी तरी त्या बाबत चर्चा होऊन जागा देण्या बाबत प्रस्ताव स्थायी समिती पुढे मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार भडकगेट येथील श्री. अब्दुल मजिद अ. रहिम यांच्या मालकीची जागा १०० फुट रुंद भडकलगेट ते सिटी क्लब विकास योजनेत बाधित होत असल्याने ती मनपा तर्फे संपादित करण्यात आली. पर्यायी जागा म्हणुन कटकट दरवाजा येथे मनपा तर्फे जे भुखंड तयार करण्यांत आले.त्यापैकी भुखंड क्र. २२,२३ व २४ हे अ. मजिद अ. रहिम यांना देण्यांत आले व भुखंडाची किंमत वसुल करण्यात आली अ. मजिद यांना देण्यांत आलेल्या भुखंडापैकी भुखंड क्र. २३]२४ मधुन मनपा तर्फे टाकण्यात आलेली जलनि:सारण वाहिनी गेलेली आहे. करिता त्यांनी प्लॉट क्र. २३,२४ बाधित झालेला आहे. करिता त्यांनी सदर भुखंडा ऐवजी मनपाच्या मालकीची तेवढीच जागा जिचा भुमापन क्र. ११३१३ आहे देण्याची विनंती केल्या नुसार कार्यालयातर्फे वरील बाबींची चौकशी करण्यांत येऊन संबंधितास न.भु. क्र. ११३१३ मधील २२x२३ फट आकाराची जागा देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४५/२४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. तक्षशिला नगर येथे नविन शाहबाद फरशी बसविणे बाबत कामा करिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार र.रु. ४,४४,१९०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "नविन खांडकी बसविणे" या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ५-६-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. व दि. २८-६-९६ रोजी स्थायी समिती सदरच्या अंदाजपत्रकास मान्यता मिळाली आहे. त्यानंतर प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आले असता अंतिम तारखे पर्यंत एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | एम.एम. फारुकी | ०.०१% | कमी दराने |
| २. | एलोरा कंन्स्ट्रक्शन | २% | जास्त दराने |
| ३. | कुलवंतसिंग | ५% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची निविदा श्री. ए.एम. फारुकी यांची होती. परंतु मा. आयुक्त साहेबांनी आदेशित केल्या प्रमाणे ठेकेदारास दराच्या वाटाघाटीसाठी बोलावल्यानंतर सदरील काम ठेकेदाराने अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने करण्यास संमती दर्शविली आहे.

तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी असलेली श्री. ए.एम. फारुकी यांच्या निविदेस प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे तक्षशिला नगर स्लम येथे नविन शहाबाद फरशी बसवण्याच्या रु. ४,४४,१९०/- च्या अंदाजपत्रकास दि. २८-६-९६च्या स्थायी समितीत मंजुरी दिल्यानुसार निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदामध्ये श्री. एम.एम.फारुकी यांची निविदा तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराची असल्याने सदर निविदा स्विकृतीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४६/२५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. रहेमानिया कॉलनी किराडपुरा स्लम येथे खडी रस्ते तयार करणे बाबत तयार करणे बाबत कामा करिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार र.रु. ५,५४,७०४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "खडी रस्ते आणि कलव्हर्ट या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ६-३-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच दि. १८-३-९६ ला स्थायी समितीत मंजुरी मिळाली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आले असता अंतिम तारखे पर्यंत एकुण एकच निविदा प्राप्त झाली.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | बसरा कंन्स्ट्रक्शन | १३% | कमी दराने |

तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३% कमी दराने असलेली श्री. बसरा कंन्स्ट्रक्शन यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार रहेमानिया कॉलनी किराडपुरा स्लम येथे खडी रस्ता तयार करण्याच्या रु. ५,५४,७०४/- च्या अंदाजपत्रकास दिनांक १८-३-९६ च्या स्थायी समितीने मंजुरी दिल्या नुसार बोलविण्यात आलेल्या निविदा व प्राप्त झालेल्या निविदा मध्ये एकच निविदा व प्राप्त झालेल्या व ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३ कमी दराची असल्याने सदर निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४७/२६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्राणी संग्रहालय सिध्दार्थ उद्यान रोडचे डांबरीकरण करणेचे कामासाठी र.रु. ५,४५,०००/- चे अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. ५७४/८/दि. १८-३-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८०/९६/ दि. २१-६-९६ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकुण सात (७) निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण पाच (५) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. १७-७-९६ ला उपस्थिता समोर उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. | १७.८६% | कमी दराने |
| २. | मे. रे. कंन्स्ट्रक्शन कं. | १०.३०% | कमी दराने |
| ३. | मे. व्यंकटेश कंन्स्ट्रक्शन कं. | १७.७१% | --//-- |
| ४. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं. | ३.९९% | --//-- |
| ५. | मे. एम.एस. जग्गी | १८% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री. एम.एस. जग्गी यांची निविदा आहे. सबब तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% कमी दराची श्री. एम.एस. जग्गी यांची निविदा आहे. सबब तुलनात्मकदृष्टया मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्रमाणे संग्रहालय सिध्दार्थ उद्यान येथे रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. ५७४/८/ दिनांक १८-३-९६ अन्वये रु. ५,४५,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळाल्यानुसार निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदा पैकी श्री. एम.एस. जग्गी यांची निविदा तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% कमी दराची असल्याने सदर निविदा स्विकृतीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४८/२७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. मोगलपुरा बारापुल्ला स्लम येथील खांडकी दुरुस्त करणे नविन खांडकी बसविणे खडी रस्ते तयार करणेबाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार र.रु. ४,४६,३७९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "खांडकी रस्ते" या शिर्षकातुन करण्यास येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २६-८-९६ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तरी सदरील कामा करिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु. ४,४६,३७९/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मोगलपुरा बारापुल्ला स्लम येथील जुनी खांडकी दुरस्त करणे. नविन खांडकी बसविणे खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी ९५-९६ च्या सा.बां. खात्याच्या दर सुची नुसार बनवण्यात आलेल्या रक्कम रु. ४,४६,३७९/- चे अंदाजपत्रकास व सदरचे काम खांडकी रस्ते या शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४९/२८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रामगोपाल नगर पडेगांव येथील मनपा च्या खुल्या जागेस संरक्षित भिंत व कुंपन करणे बाबत अंदाजपत्रक सन ९५-९६ च्या दर सुची अन्वये र.रु. १,३६,५००/- तयार करण्यात आले सदरचा खर्च विकास योजना अंतर्गत भुखंडाचे संरक्षण या तरतुदी मधुन करण्यात येणार आहे.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रामगोपाल नगर पडेगांव येथील महापालिकेच्या खुल्या जागेत संरक्षित भिंत व कुंपन तयार करण्याच्या बाबत ९५-९६ च्या दर सुचीनुसार तयार

करण्यात आलेल्या रु. १,३६,५००/- च्या अंदाजपत्रकास व सदर खर्च विकास योजना अंतर्गत भुखंडाचे संरक्षण या तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५०/२९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, स्वानंद नगर येथील म.न.पा. च्या खुलया जागेस संरक्षित भिंत तयार करणे, कुंपन करणे व खेळणी बसविणे इत्यादी कामाचे अंदाजपत्रक सन १९९५-९६ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दर सुची अन्वये र.रु. २०४९२५/- चे तयार करण्यात आले आहे. सदर कामाचे खर्च विकास योजना अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या तरतुदी मधुन करण्यात येणार आहे.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार स्वानंद नगर येथील महापालिकेच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेचे कामासाठी सा.बां. खात्यांच्या ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २०४९२५/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च विकास योजना अंतर्गत भुखंडाचे संरक्षण या तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५१/३० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. पहाडसिंगपुरा स्लम येथे फरशी बसविणे गटार बांधणे व खांडकी दुरुस्त करणे बाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते सन ९५-९६ च्या दरसुची नुसार र.रु. १,५९,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम व खांडकी रस्ते" या शिर्षकातुन करण्यात येईल सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २१-८-९६ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तरी सदरील कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र.रु. १,५९,३००/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पहाडसिंगपुरा स्लम येथे फरशी बसविणे गटार बांधणे व खांडकी दुरुस्त करण्याच्या कामासाठी ९५-९६ च्या सा.बां. खात्याच्या दर सुचीनुसार तयार केलेल्या अंदाजतपत्रक र.रु. १,५९,३००/- ला तसेच सदरचे काम खांडकी रस्ते या शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५२/३१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. इंदिरा नगर, बायजीपुरा वार्ड.क्र. २४ येथे गल्ली नंबर १२ ते १९ मध्ये गटार दुरुस्त करणे बाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार र.रु. २,४५,४००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरील काम "खुली गटार बांधणे" या शिर्षकातुन करण्यात येईल सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २६-८-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामा करिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु. २,४५,४००/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार इंदिरा नगर बायजीपुरा वार्ड २४ येथे गल्ली नंबर १२ ते १९ मध्ये गटार दुरुस्ती साठी सा.बां. खात्याच्या ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,४५,४००/- चे अंदाजपत्रकास व हे काम खुली गटार बांधणे या शिर्षकातुन करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५३/३२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. संजयनगर, बायजीपुरा स्लम वार्ड क्र. ३१ येथे बॉक्स टाईप कलव्हर्ट तयार करणे बाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार र.रु. ४,१८,९२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरील "खडी रस्ते" या शिर्षकांतुन करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ३१-८-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली. आहे. तरी सदरील कामाकरिता अंदाजपत्रक र.रु. ४,१८,९२५/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो. संजयनगर, बायजीपुरा स्लम वार्ड क्र. ३१ येथे सा.बां. खात्याच्या ९५-९६ दरसुची नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रु. ४,१८,९२५/- ला तसेच सदरचे काम खडी रस्ते या शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५४/३३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जकात विभागातील दोन जि.प. सन १९९१ मध्ये खरेदी केलेल्या असुन सध्या नेहमी नादुरुस्त होतात त्यामुळे जकात वसुलीवर परिणाम होतो. जकात अधिक्षकांनी नविन दोन जिप/जिप्सी ची मागणी केलेली आहे. जिप्सी डी.जी.एस.ॲंड दरानुसार खरेदी केल्या बुकींग रक्कम भरल्या नंतर ४ ते ६ महिन्या नंतर वाहनाचा ताबा मिळेल त्यामुळे जिप्सी खरेदीसाठी मारुती उद्योग एजन्सीचे स्थानिक अधिकृत सिक्रेते मे. ऑटूमोटीव्ह मॅनिफॅक्चरस लि. औरंगाबाद यांच्या कडुन मार्केट दरानुसार दर पत्रक गोळा केले. महिंद्र जीप खरेदी साठी महिंद्रा ॲंड महिंद्रा कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. रत्नप्रभा मोटर्स औरंगाबाद यांच्या कडुन डी.पी. एस. ॲंड डी दरानुसार दरपत्रक गोळा केले जिप्सी व जीप करिता खालील प्रमाणे खर्च येतो.

| | | |
|---|---|---|
| १. | मारुती जिप्सी (सॉफ्ट टफ) | ३,०७,६९४/- |
| २. | महिंद्रा एम. एम. ५४०/- डीपी/२ डब्ल्यु/एसटी जीप. | २,८६,४५२/- |
| ३. | महिंद्रा सीएल ५०० डी. आय एमडी २ डब्ल्यु डी/एसटी | २,८६,१५०/- |

वरील वाहना पैकी एक जिप्सी व एक जीप खरेदी करणे आहे. हे दर सध्याचे असुन यात बदल होऊ शकतो. वाहनाचा ताबा घेताना जी किंमत असेल त्याप्रमाणे रक्कम अदा करावी लागेल नविन वाहन खरेदी शिर्षामध्ये तरतुद नाही. तथापि हा खर्च उपलब्ध साठा निधीतुन करता येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जकात विभागातील दोन जीप नेहमी नादुरुस्त होत असल्यामुळे नविन एक जिप्सी व एक महिंद्रा एम.एम.५४० जीप खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. मारुती उद्योग लि. चे स्थानिक अधिकृत विक्रेते मे. ऑटोमोटीव्ह मॅनुफॅक्चरर्स लि. औरंगाबाद यांच्या कडुन जिप्सी खरेदी करण्यासाठी येणाऱ्या रक्कम रु. ३,०७,६९४/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच महिंद्रा अॅड महिंद्रा कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. रत्नप्रभा मोटार्स, औरंगाबाद यांच्या कडुन महिंद्रा एम.एम. ५४० डी.पी./२डब्ल्यु/एसटी जीपसाठी येणाऱ्या रक्कम रु. २,८६,४५२/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५६/३५ :**

मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी अग्निशमन विभागासाठी सन १९९६-९७ च्या वर्षी अग्निशमन सांहित्य होज पाईप्स खरेदी रु. ११,४४,८३५/- करावयाची आहे. त्यासाठी आर्थिक तरतुद रु. २१ लाख ठेवण्यात आली आहे. अग्निशमन विभागात नविन अग्निशमन फायर टेंडर आलेले आहेत ते चिकलठाणा एम.डी.सी. साठी आलेले आहेत.

जाहिर निविदा नुसार इन्सा ट्रेडिंग औरंगाबाद यांचे दर सर्वात कमी आहेत. तरी मंजुर दरानुसार व मा. आयुक्तांच्या मान्यते नुसार होज पाईप व साहित्य खरेदीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अग्निशमन विभागासाठी १९९६-९७ या वर्षी रु. ११,४४,८३५/- चे अग्निशमन साहित्य होज पाईप खरेदी मे. इशा ट्रेडिंग, औरंगाबाद यांचे कडुन खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५७/३६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. कोहीनुर कॉलनी येथे मनपाच्या खुल्या जागेवर तळ मजल्यावर एक छोटे कार्यक्रम गृह व पहिल्या मजल्यावर वाचनालय तसेच समोरील छोटया मोकळया जागेवर संरक्षित भिंतीसह सुशोभिकरण करणे इत्यादी कामा करिता स्थायी समिती ठराव क्र. ३७८/३७/दिनांक ६-१-९६ अन्वये रु. ४,४४,०००/- चे सन ९५-९६ च्या दरसुचीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. तसेच सदर काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा लेखा/नि/८०/९६/ दिनांक २१-६-९६ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखे पर्यंत एकुण पाच (५) निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण

दोन (२) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. १७-७-९६ ला उघडण्यात आल्या त्यांच्या तुलनत्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. कुलवंतसिंग | १०.८५% | जास्त दराने |
| २. | श्री. एस.ए. देशमुख | ७.१५% | --//-- |

**विषय क्र. २५८/३७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कमी मुकुंदवाडी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र बांधणेचे कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. २९२/१४ दि. १९-१-९६ अन्वये रक्कम रु. ४.५० लाखाचे सन ९५-९६ च्या दर सुचीनुसार अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे. मा. स्थायी समिती बैठक दि. २८-६-९६ अन्वये फेर निविदाचे आदेश दिले म्हणुन पुन्हा निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/९३/९६ दि. ९-८-९६ अन्वये (दुसरी वेळी) बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखे पर्यंत एकुण पाच (५( निविदा विक्री झाल्या निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण फक्त दोन (२) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. २८-८-९६ ला उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एस.एम. मंडोरे | १०% | जास्त दराने |
| २. | मे. अमिर कंन्स्ट्रक्शन | ४.७८६% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.७८६% जास्त दराच्या मे. अमित कंन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीसाठी सादर केली असता शहर अभियंता यांनी ४.७८६% जास्त दराची शिफारस केली परंतु रेट अनालिसीसहस समक्ष चर्चेस बोलविण्यासाठी लेखाधिकारी -१ यांनी मा. आयुक्त महोदयांचेकडे शिफारस केली व सदर काम अंदाजपत्रकीय दराने करण्याबाबत मा. आयुक्त महोदय यांनी दि. ७-९-९६ अन्वये मानयता दिली. प्रस्ताव अंदाजपत्रकीय दराने मान्यतेस्तव तथा पुढील आदेशास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंकुदवाडी येथे प्राथमिक आरोग्य क्र. बांधण्याच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. ३९२/१४/दि. १९-१-९६ अन्वये रु. ४.५० लाखाच्या अंदाजपत्रकास मान्यता दिल्या नुसार निविदा मागविल्या असता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.७८६% जास्त दराची निविदा मे. अमित कंन्स्ट्रक्शन यांनी चर्चेअंती अंदाज पत्रकीय दराने काम करण्याची तयारी दर्शविल्याने मे. अमित कंन्स्ट्रक्शन यांचे कडून सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५९/३८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. काझीवाडा भडकल गेट अभ्यासिका केंद्र बांधणे या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. ३५६/१५ दिनांक ६-१-९६ अन्वये र.रु. ३,७५,०००/- चे सन ९५-९६ च्या दर सुची नुसार अंदाजपत्रकास मान्यता

मिळालेली आहे. सदर काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/९३/९६ अन्वये र.रु. ३,७५,०००/- चे सन ९५-९६ च्या दर सुची नुसार अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे. सदर काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/९३/९६ दि. ९-८-९६ अन्वये बी-१" नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखे पर्यंत एकुण दोन (२) निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण दोन (२) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. २८-८-९६ ला उघडण्यात आल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एम.ए. कुरैशी | ९% | जास्त दराने |
| २. | श्री. सय्यद अथर अली | १५% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९% जास्त दराची श्री. एम.ए. कुरेशी यांची निविदा आहे. सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करण्या बाबत मा. आयुक्तांनी दि. ७-९-९६ अन्वये मान्यता दिली आहे. तरी प्रस्ताव पुढील योग्य त्या आदेशास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार काझीवाडा भडकलगेट येथे अभ्यासिका केंद्र बांधण्याच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. ३५६/१५/ दि. ६-१-९६ अन्वये रक्कम रु. ३,७५,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी दिल्यानुसार बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या.प्राप्त निविदापैंकी श्री. एम.ए.कुरेशी यांची निविदा तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९% जास्त दराची निविदा आहे. वाटाघाटीअंती त्यांची सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करण्याचे मान्य केले असल्याने सदरील काम श्री. एम.ए.कुरेशी यांच्या कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६०/३९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ३३ रविंद्र नगर येथे मोकळया लागेवर फंक्शन हॉल बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक ८-३-९६ ठराव क्र. ५३८/३ र.रु. ५,००,०००/- (पाच लक्ष) चे सन ९५-९६ च्या दर सुचीच्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी पहिल्या वेळेस मागविण्यात आलेल्या निविदा रद्द करुन पुन्हा निविदा मागविणे बाबत स्थायी समिती बैठक दि. २८-६-९६ अन्वये आदेशित केल्यामुळे पुन्हा कार्यालयीन सुचना क्र. मनपा/लेखा/नि/९३/९६ दि. ९-८-९६ अन्वये दुसरी वेळ बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखे पर्यंत एकुण (२) तारखे पर्यंत झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण (२) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. दि. २८-८-९६ रोजी उघडण्यात आल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. शिबा कंन्स्ट्रक्शन | १०% | जास्त दराने |
| २. | श्री. फारुकी मुमताह | ८% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराची श्री. फारुकी माताह यांची निविदा मंजुरीस्तव सादर केली असता प्रस्तुत काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक ७-९-९६ अन्वये मंजुरी दिली आहे. प्रस्ताव विचारार्थ तथा योग्य त्या आदेशास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार वार्ड क्र. ३३ रविंद्रनगर येथे मोकळया जागेवर हॉल बांधण्याच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. ५३८/३/दिनांक ८-३-९६ अन्वये रु. ५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास मान्यता दिल्या नुसार निविदा मागविण्यात आल्या. प्राप्त निविदा मध्ये श्री. फारुकी मुमताह यांची निविदा तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराची आहे. वाटाघाटी अंती त्यांनी हे काम अंदाजपत्रकीय दराने करण्याचे मान्य केले असल्याने सदरील काम श्री. फारुकी मुमताह यांच्या कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६१/४० :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की महानगरपालिकेच्या सर्व शाळा मधुन फर्निचरची नितांत आवश्यकता आहे. यासाठी निविदा पत्रके मागविण्यात आली होती. त्यांचा तपशील खालील प्रमाणे

| **अ. क्र.** | **एजन्सीचे नांव** | **लाकडी टेबल** | **लाकडी खुर्ची** | **लाकडी फळा** |
|---|---|---|---|---|
| १. | जनसेवा ग्रामोद्योग सहकारी औद्योगिक संस्था | १९५०/- | १३५०/- | ११२५०/- |
| २. | वर्षा मेटल वर्कस | १९५०/- | १२५५/- | १०९०/- |
| ३. | इन्शा ट्रेडिंग | १८७५/- | १२४०/- | १०५०/- |

शिक्षण विभागाच्या फर्निचर खरेदी साठी (९६-९७ वर्षा साठी) १२ लाख रुपयांची तरतुद करण्यात आलेली आहे.

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर इन्सा ट्रेडिंग कंपनी यांचे आहेत. तरी आठ लाख रुपये फर्निचर खरेदीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार महापगरपालिकेच्या सर्व शाळा मधुन फर्निचर पुरविण्यासाठी निविदा पत्रके मागविण्यात आली. मा. आयुक्तांनी वाटाघाटी अंती खालील प्रमाणे दर निश्चित केले.

मे. इन्शा ट्रेडिंग लाकडी टेबल रु. १५००/- लाकडी खुर्ची रु. १०००/- लाकडी फळा रु. ९००/- तुलनात्मकदृष्टया मे. इन्शा ट्रेडिंग यांचे दर सर्वात कमी असल्याने रु. आठ लाखाचे फार्निचर खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६२/४१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जवाहर कॉलनी येथे भाजी मंडी बांधणेच्या कामासाठी रक्कम रु. १,०६,२७८/- चे अंदाजपत्रक दि. २८-२-९६ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. मुलेच/६५/९५ दि. २८-२-९५ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकुण (१४) निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (६) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्यामध्ये तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.५५% कमी दराचे श्री.बी. ए. काल्डा यांचे निविदास दि. ३१-३-९५ ला प्रशासकीय मंजुरी प्राप्त झालेली आहे. तसेच ४-५-९६ ला कार्यादेश देण्यात आला. जागेचे वादामुळे बऱ्याच कालानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यांत आली. सदर कामामध्ये फक्त १२ दुकाने बांधण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. १,०६,२७८/- तयार करीण्यात आले होते. परंतु सहा दुकाने वाढविण्यासाठी व पुरुष महिला यांचेसाठी शौचालय व गटार बांधणे इ. कामे स्थळ पाहणीच्या वेळेस करण्याबाबत मा. आयुक्त महोदयांनी आदेशित केले. त्यानुसार मुळ दुकानाचे बांधकामात २,२०,९१०/- ची वाढ झालेली आहे. एकुण सुधारित अंदाजपत्रक र.रु.३,२७,१८८/- झालेला आहे. सदर मुळ कामात झालेली वाढ रक्कम रु. १,३१,२१९/- चे काम मंजुर दरप्रमाणे म्हणजेच १५.१५% कमी दराने व अतिरिक्त बाबी ज्या रक्कम रु. ८९६१२/- हे चालु दरसुची ९५-९६ अंदाजपत्रक दराने करण्यासाठी विभागाने प्रस्ताव सादर केला असता लेखाधिकारी-१ यांनी सदर प्रस्ताव स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्याचे प्रस्तावित केले व त्यास मा. उपआयुक्तांनी दि. ७-९-९६ अन्वये मंजुरी दिली.

सबब सदर कामासाठी सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु. ३,२७,१८६/- ला तसेच सदर काम मुळ कामात झालेले सहा दुकानाची वाढीसह हे मुळ मंजुर निविदा दराप्रमाणे (१५.१५% कमी दराने) व अतिरिक्त बाबीची कामे हे सन ९५-९६ चे चालु दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय दराने मुळ गुत्तेदार श्री. बी.ए. कल्डा यांचे कडुन करुन घेण्यात आले असल्याने कार्योत्तर मंजुरीस्तव सादर. सदरचा खर्च ९६-९७ च्या व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षामधुन करण्याचे प्रयोजन आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार जवाहर कॉलनी येथे भाजी मंडई मार्केट बांधण्याच्या कामासाठी रु. १,०६,२७८/- तयार करण्यांत आलेल्या अंदाजपत्रकास रुपये २८-२-९६ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार निविदा मागविण्यांत आल्या असता प्राप्त निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.५५% कमी दर श्री. बी.ए. काल्डा यांच्या दरास ३१-३-९५ ला प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदर १२ दुकानाच्या कामात सहा दुकाने व शौचालय गटार इ. वाढीव बांधकामाबाबत एकुण सुधारित अंदाजपत्रक रु. २,२०,९१०/- तयार करण्यांत आल्या नुसार सदर काम मुळ कामात झालेले सहा दुकाने वाढीव सह मुळ निविदा दराप्रमाणे (१५.१५% कमी दराने) व अतिरिक्त बाबींचे काम ९५-९६ चे चालु दरसुचीनुसार अंदाजपत्रक दराने मुळ मक्तेदार श्री. बी.ए. काल्डा यांचे कडुन करुन घेण्यात आल्याने त्यास कार्यात्तर मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६३/४२ :**

महानगरपालिका विभाग क्र. ३ शहागंज या झोन चे श्रेत्रफळ व कार्यक्षेत्र हे इतर झोनच्या खुप मोठे असल्याने प्रशासकीय दृष्टया ते गैरसोईचे आहे. या झोनवर एक विभागीय

अधिकारी सर्व कामावर योग्य नियंत्रण ठेवु शकत नाही. अशी महानगरपालिकेची धारणा झालेली आहे.

साफसफाई व इतर स्वच्छतेची कामे, मालमत्ता कर व पाणी पट्टीची वसुली तसेच इतर नागरी मुलभुत सेवा तत्पतेने व वेळीच पुरविण्याचे दृष्टीकोणातुन विभाग क्र. ३ चे विभाजन करणे अत्यावशक झाले आहे. त्या अनुषंगाने विभाग क्र. ३ चे विभाजन विभाग क्र. ३ (अ) व विभाग क्र. ३ (ब) असे प्रस्तावित करण्याचे ठरविण्यांत आले आहे. नविन क्र. ३ (अ) व ३ (ब) मध्ये येणारा भाग खालील प्रमाणे आहे.

| विभाग क्र. ३ (अ) | विभाग क्र. ३ (ब) |
|---|---|
| चेलीपुरा भाग-१, शहागंज मंडी, बुक्कल गुडा, रणमस्तपुरा इंदिरानगर, जुना बायजीपुरा, काही भाग संजयनगर, रेगंटीपुरा, नवाबपुरा, गवळीपुरा, राजाबाजार, जाधवमंडी, नवा मोंढा, मोंढा जाफर गेट लक्कडमंडी, लक्ष्मणचावडी, गांधीनगर, बहादुरपुरा, बंजार कॉलनी, हॉटेल अमरप्रित, पर्यंत भवानीनगर, निजामगंज, दादा कॉलनी, कैलासनगर, जालना रोड हॉटेल अमरप्रित ते सेव्हन हिल पर्यंत. | काचीवाडा, चेलीपुरा भाग-२ भोईवाडा चाऊस कॉलनी, शहाबाजार, शहाबाजार स्लम, महाराष्ट्र हाऊसिंग सोसायटी, निजामोद्यीन दर्गा रोड, कैसर कॉलनी खासगेट, नागेसन कॉलनी, सिध्देश्वर कॉलनी, समी कॉलनी, मॉर्डन कॉलनी, बारी कॉलनी, वाहेद कॉलनी, जसवंतपुरा मध्यवर्ती जकात नाका, करीम कॉलनी मुजीब कॉलनी, आझम कॉलनी, मकसुद कॉलनी, युनुस कॉलनी, आलमगीर कॉलनी, गणेश कॉलनी, रशिदपुरा, मजनुहिल कॉलनी, रोजाबाग, हर्सुल, सिध्दार्थनगर, कटकट गेट, हस्तेसिंगपुरा, नहेरुनगर, जिव्हेश्वर कॉलनी, यशोधरा कॉलनी, वैशालीनगर इ. |

उपरोक्त प्रस्तावित केलेल्या विभाग क्र, ३ (अ) व ३ (ब) बाबत विभाग क्र. ३ चे विभाजन अंतिमरित्या प्रस्तावित करण्यांचे दृष्टीने प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्रशासकीयदृष्टया कामकाजाच्या सोईसाठी विभाग क्र. ३ (अ) व विभाग क्र. ३ (ब) मध्ये विभाजन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६४/४३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. नारेगांव येथील प्रा. शाळेवर पहिल्या मजल्यावर तीन खोल्या बांधणेच्या कामासाठी रक्कम रु. ३,६०,०००/- चे अंदाजपत्रकात स्थायी समिती बैठक दि. २८-९-९५ ठराव क्र. १२८/१२ अन्वये मंजुरी प्राप्त झ ाालेली आहे. विभागाने सदरील कामाकरिता रक्कम रु. ४,६१,१७५/- चे अंदाजपत्रक समिती मध्ये प्रस्ताव मांडताना केला होता. सदरचे काम हाती घेण्यासाठी प्राप्त निविदा मधुन तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा (दराचे वाटाघाटी नुसार) २% दराचे निविदास स्थायी समिती दि. ६-१-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेले आहे. तसेच सदर काम हे प्राथमिक शाळेच्या जुन्या इमारती लगत नविन जीना बांधुन पहिल्या मजल्यावर

पत्र्याच्या छत्ताच्या तीन खोल्या बांधण्याच्या प्रस्ताव होता. त्याप्रमाणे बांधकामची कार्यवाही पुर्ण करण्यांत आली. परंतु प्रत्यक्षात काम करत असतांना मंजुर रक्कम रु. ३,६०,०००/- ही तीन खोल्या व जीना करिता अपुरी पडत असल्याबद्दल मा. आयुक्त महोदय यांचे निदर्शनास आणुन दिली असता मा. आयुक्त महोदयांनी स्थळावर सुचविले की, सदरील तीन खोल्याचे काम मे. १९९६ अंतिम पर्यंत पुर्ण करावे व तसा प्रस्ताव सादर करावा. गुत्तेदारा मार्फत तीन खोल्या व जीन्याचे उद्घाटनाचे दिवशी मा. आयुक्त महोदय व स. नगरसेवक यांनी आणखी दोन खोल्या चालु असलेल्या कामाचे मक्तेदारा मार्फत सन ९५-९६ च्या चालु अंदाजपत्रकीय दराने बांधून देण्याच्या सुचना प्रत्यक्ष स्थळांवर दिल्या आहेत. तसेच संपुर्ण इमारतीच्या भोवती संरक्षणाचे दुष्टीने तडे जाऊ नये म्हणुन प्लींय प्रोटेक्शन देखील त्याच गुत्तेदारामार्फत सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार करुन घेण्याच्या देखील सुचना दिल्या आहेत. मुळ कमाकरिता स्थायी समितीने रक्कम रु. २,६०,०००/- ला यापुर्वीच मंजुरी दिलेली आहे. परंतु प्रत्यक्षात मुळ काम करण्याकरिता रक्कम रु. ५,०९,८८१/- खर्च झालेला आहे. म्हणजेच १,५९,९८१/- मंजुर रक्कमे व्यतिरिक्त जादा खर्च झालेला आहे. तसेच तीन खोल्या व जीना बांधलेल्या वाढीव इमारतीचे उद्घाटन देखील पार पडले आहे. परंतु अद्याप कार्योत्तर मंजुरी प्राप्त झाल्यामुळे गुत्तेदाराचे अंतिम देयक अदा करता आलेले नाही. रक्कम रु. ५,१९,८८१/- च्या एकुण झालेल्या कामात रक्कम रु. १,५९,८८१/- च्या वाढीव खर्चास कार्योत्तर प्रशासकीय मान्यतेकरिता व झालेल्या खर्चास मा. स्थायी समिती समोर सादर करण्या बाबत लेखाधिकारी-१ यांनी शिफारस केल्यानुसार मा. आयुक्तांनी दि. ३१-८-९६ रोजी उपरोक्त शिफारसीला स्विकृती दिली आहे. बांधकाम झालेल्या तीन खोल्या व्यतिरिक्त आणखी दोन खोल्यासाठी रक्कम रु. ३,४४,८२८/- चे वाढीव अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर कामाचे मुळ कामात र.रु. १,५९,८२८/- ची झालेली वाढ कार्योत्तर मंजुरीस्तव तसेच तीन खोल्या आणि जिन्या व्यतिरिक्त वाढीव दोन खोल्या बांधणेचे व इमारतीस प्लीथ प्रोटेक्शन करण्याचे वाढीव कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ३,४४,८२८/- चे वाढीव खोल्याचे काम मुळ एजन्सी मार्फत सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार करुन घेण्याच्या सुचना प्रत्यक्ष स्थळावर उद्घाटनाच्या दिवशी दिल्यानुसार प्रस्ताव सादर करण्यात आला असता या करिता स्थळ पाहणी करुन निर्णय घेणे बद्दल लेखाधिकारी यांनी शिफारस केली व त्या शिफारशीला मा. आयुक्त महोदयांनी स्थायी समिती समोर ठेवा असे दि. ३१-८-९६ रोजी आदेश दिल्यानुसार प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार नारेगांव येथील प्रा. शाळेवर पहिला मजल्यावर तीन खोल्या बांधण्याच्या कामासाठी रु. ३,६०,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती बैठक दि. २८-९-९५ ठराव क्र. १२८/१२ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सदरील कामाचे उद्घाटनाचे दिवशी मा. आयुक्त महोदय हा स. नगर सेवक यांनी आणखी दोन खोल्या चालु असलेल्या मक्तेदामार्फत ९५-९६ च्या चालु अंदाजपत्रकीय बांधुन देण्याच्या सुचना दिल्या तसेच इमारती भोवती संरक्षणाच्या दृष्टीने तडे जाऊ नयेत म्हणुन प्लीय प्रोटेक्शनही त्याच गुत्तेदारामार्फत ९५-९६ च्या दरसुचीनुसार करुन घेण्याच्या सुचना दिल्या यासाठी रक्कम रु. १,५९,८८१/- च्या मुळ अंदाजपत्रकी पेक्षा जास्त खर्च झालेल्या आहे. वाढीव खर्च रु. १,५९,८८१/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६५/४४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पडेगांव कत्तलखाना येथे जी जनावराची कत्तल होते. तेथे निघणाऱ्या व्यर्थ व प्रदुषित साहित्या बाबत अनेक तक्रारी होत्या. त्यामुळे पशुधन विकास अधिकारी यांनी सदर प्रदुषण बंद करण्यासाठी नागपुर येथील "निरी" (भारतीय प्रदुषण संशोधन अभियांत्रिकी संस्था) जी केंद्रीय सरकारशी संलग्न आहे. त्या संस्थेचे च्या संस्थेचे मार्गादर्शन घेण्याबाबत सुचविल्यानुसार संबंधित संख्येशी प्रत्यक्ष नागपुर येथे संपर्क साधला असता सदर संस्थेने औरंगाबाद येथील पडेगांत कत्तल खान्याकरिता इंकलगुंट ट्रीटमेंट प्लॅट करिता डिसाईन पॅकज तयार करण्याचे कबुल केले. परंतु या करिता पाच लक्ष रुपये शुल्क मनपाने "निरा" कडे अगावु भरणा करावा असे दि. ६-५-९६ च्या पत्राव्दारे सुचविले आणि सदर ठिकाणी इक्ल्युट ट्रीटमेंट प्लॉट बांधण्यासाठी सुचना दिल्या. कारण नागरिकांचे आरोग्याचे दृष्टीने कत्तलखाना परिसरातील बिघडलेले प्रदुषण नियंत्रण करणे अंत्यत आवश्यक आहे. व याकरिता सदर संस्थेकडुन ५ लक्ष शुल्क अदा करुन डिझाईन पॅकेज घेणे व स्थानिक तज्ञ सल्लागाराकडुन नियोजित बांधावयाचे नकारशे तयार करुन घेवून त्वरीत इप्ल्युंट ट्रिटमेंट प्लॅट बांधवे आवश्यक आहे. सध्याचे व्यर्थ निघणाऱ्या साहित्याचे बॉयोलॉलिकल ऑक्सीजन डिमांड (बी.ओ.डी.) व इतर संबंधित पॅरामिप्सच्या किंमती बरोबर सर्वसाधारण किंमतीच्या तुलना केल्यास संध्याच्या किंमती अत्यंत गंभीर स्वरुपाच्या आहेत. असे मत निराच्या उपसंचालक यांनी दिले व अशा परिस्थितीत सदरील प्रकरण न्याय प्रविष्ठ झाल्यास कत्तलखाना बंद करावा लागेल असे देखील त्यांचे मत आहे.

म्हणुन सदर संस्थेस ठरल्याप्रमाणे शुल्क रक्कम रु. ५.०० लक्ष देणे आवश्यक होते. सदर कार्यवाही अचासंहिता चालु असतांना केलेली आहे. त्यामुळे तेव्हा मा. स्थायी समितीची मंजुरी घेता येणार नसल्याने प्रथम रक्कम रु. ५.०० लक्ष निरी या संस्थेस शुल्क म्हणुन दयावे व नंतर स्थायी समितीची मान्यता द्यावी या अटीवर मा. आयुक्तांनी दि. ३१-५-९६ ला मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार संबंधित संस्थेस ५.०० लाखाचे डी.डी. क्र. ७७९८३८ दि. १८-६-९६ सोबत पत्रक/एएमसी/सीई/२०१/९६ दि. २९-६-९६ अन्वये अदा करण्यात आलेले आहे.

पाच लक्ष शुल्क प्राप्त झाल्या बाबत सदरील संस्थेची पोच पावती क्र. १००६३. दि. ५-७-९६ अन्वये प्राप्त झालेली आहे.

सबब सदरील संस्थेला अदा करण्यात आलेल्या ५.०० लक्ष रक्कमेस मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार पडेगांव कत्तलखाना येथे जनवराची कत्तल होते. येथे होणाऱ्या प्रदुषणा बाबत अनेक तक्रारी आहेत. यासाठी इन्फल्युट ट्रीटमेंट प्लॅट डिझाईन पॅंकेज नागपुर येथील "नीरी" (भारतीय प्रदुषण संशोधन अभियांत्रिकी संस्था) जी केद्र सरकारशी संलग्न आहे. त्यांचेकडुन तयार करवुन घेण्यासाठी सदर संस्थेकडे भरलेल्या र.रु. ५.०० लक्षास मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६६/४५ :**

अति. शहर अभियंता प्रस्ताव सादर करित आहेत की, जयभवानीनगर येथे पावसामुळे खुप चिखल होत आहे व त्यामुळे तेथील नागरिकांना जाण्या येण्यांस त्रास होत

आहे. त्यामुळे तेथे हार्ड मुरुम टाकावा अशी तेथील स. नगरसेविका सौ. मंदा काळुसे यांची मागणी होती. त्यानुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले. सदरील कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ८७,८००/- आहे. सदरील भाग हा सिडको नोटी फाईड क्षेत्रात असुन सदरील कामास सिडको नोटीफाईड क्षेत्रात असल्याने अंदाजपत्रक स्थायी समितीचे विचारार्थ सादर. मान्यता झाल्यास सदरचा खर्च रस्ते दुरुस्ती व देखभाल ९६-९७ मधुन करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार जयभवानी नगर येथे हार्ड मुरुम टाकण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रु. ८७,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. सध्या गणेशोत्सवाचे दिवस चालु असल्याने मा. आयुक्तांनी स्वत:चे अधिकार वापरुन सदरचे काम तातडीने करुन घ्यावे. त्यास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येईल.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६७/४६ :**

पोलिस आयुक्त औरंगाबाद यांचे अर्धशासकीय पत्र क्र.क. अ. /५/१ मनपा/चौकी/१९९६ दि. १-८-९६ अन्वये कळविले आहे की मा. नामदार श्री. गोपीनाथ मुंडे उप मुख्यमंत्री व गृह राज्य मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या समोर दि. २८-७-९६ रोजी मा. श्री. बारवाल, महापौर, श्री. गिरजाराम हाळनोर, सभापती स्थायी समिती मनपा औरंगाबाद व औरंगाबाद जिल्हयाचे पालकमंत्री मा.ना. श्री. चंद्रकांतजी खैरे यांची औरंगाबाद महानगरपालिका परिसरात एक पोलिस चौकी असावी अशी मागणी केली आहे. मा. उपमुख्य मंत्री महोदयांनी पोलिस चौकी उघडण्या संबंधात ताबडतोब प्रस्ताव पाठविण्यास सुचित केली आहे.

पोलिस आयुक्त औरंगाबाद यांनी मा. उप मुख्यमंत्री महोदय यांच्या सुचनेनुसार कळविले आहे की, औरंगाबाद महानगरपालिका कार्यालय परिसरासाठी स्वंतत्र पोलिस चौकी स्थापन करावयाची असल्यास

| | |
|---|---|
| पोलिस उप निरिक्षक | एक जागा |
| पोलिस हवालदार | चार जागा |
| पोलिस शिपाई | बारा जागा |

अशी पदे नव्याने निर्माण करावी लागतील व ती पदे मंजुर करण्यासाठी सदरच्या पदासाठी वेतन व भत्ते, पोलिस चौकीची इमारत, पोलिस अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी कार्यालयीन फर्निचर, निवास स्थान व चौकीस दुरध्वनी महापालिकेने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे सदरहु चौकीसाठी येणारा आवर्ती व अनावर्ती खर्च मनपास करावा लागेल.

करिता सदरचे प्रस्ताव पोलिस कार्यालयास पाठविण्याची विनंती केली आहे. या संदर्भात मा. आयुक्त यांची मा. श्री. सामरा साहेब महासंचालक महाराष्ट्र राज्य व श्री. उल्हास जोशी, पोलिस मा. आयुक्त यांच्याशी चर्चा दि. ६-९-९६ रोजी झाली त्यानुसार मनपा तर्फे खालील बाबी मान्य करुन देता येतील असे ठरवले.

१) पोलिस चौकी साठी जागा उपलब्ध करुण देण्यांत यावी.
२) कार्यलयीन फर्निचर पुरविण्यात यावे.
३) दुरध्वनी पुरविण्यात यावे.

तसेच पगार भत्ते प्रवास भत्ते व निवासस्थाने महानगरपालिकेस उपलब्ध करुन देता येणार नाही.

तरी वरील संदर्भात चर्चा होवुन निर्णय घेण्यासाठी मा. स्थायी समिती समोर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. रशिदखान (मामु) :** सदरील चौकी फक्त गेटवरच राहणार का? हे मनपाला दैनंदिन कामात सभामध्ये बंदोबस्तसाठी येणार यात लेडी कॉन्स्टेबल सही घेण्यांत याव्यात त्यांना गाडया किंवा देणार.

**मा. आयुक्त :** मनपातर्फे वेळोवेळी शहरातील अतिक्रमण अनाधिकृत बांधकामे, पाडण्याची कार्यवाही हाती घेण्यात असते अशावेळी पोलिस बंदोबस्ताची आवश्यकता भासते. यासाठी प्रामुख्याने पोलिस चौकीची मागणी आहे. त्यांचे वेतन व भत्ते महापालिका देणार नाही. महानगरपालिका केवळ जागा, फर्निचर दुरध्वनी देईल.

**श्री. कचरु नवपुते :** अतिक्रमणे काढण्यासाठी वेळीच पोलिस बंदोबस्त मिळत नाही. त्यामुळे ती वेळेवर काढता येणार नाहीत. यासाठी महापालिकेत, पोलिस चौकी असावयास पाहिजे.

**श्री. हमीद उद्यीन ताबा :** याचे कार्यक्षेत्र नेमके काय असेल.

**स. सभापती :** महापालिकेमध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या पोलिस चौकीत महिला पोलिसही असतील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार महापालिका परिसरात पोलिस चौकी स्थापन करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. त्यानुसार सदर चौकीसाठी महानगरपालिकेतर्फे सदर पोलिस पोलिस चौकीसाठी जागा उपलब्ध करुन देणे. कार्यालयीन फर्निचर पुरविणे, दुरध्वनी पुरविणे यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. याच बरोबर सदर पोलिस चौकीत पुरुष कॉन्स्टेबल सह लेडी कॉन्स्टेबलसही घर असाव्यात असे बैठकीत ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६८/४७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग क्र. (झोन क्रमांक) एक ते सात मधील प्रकारच्या मनपाच्या इमारतीची (परिसरासहित) वार्षीक पध्दतीने दुरुस्ती करण्यासाठी प्रथम मा. आयुक्तांची दि. १४-६-९६ रोजी मंजुरी घेण्यांत आली आणि दुरुस्तीच्या लहान प्रत्येक कामासाठी वेगवेगळे अंदाजपत्रक तयार करणे सदर पत्रके मागविले, प्रत्येक वेळेस वेगवेगळा करारनाम करणे कार्यादेश देणे इ. प्रक्रिया कराव्या लागतात व या सर्व प्रक्रिया प्रत्येक कामासाठी प्रत्येक वेळेस करण्यासाठी कार्यालयाचा बराच कालावधी खर्च होतो त्यामुळे लहान लहान कामे सुध्दा प्रंलबित होतात. जर वार्षिक पध्दतीने कामे दिवसात ज्या दिवशी दुरुस्ती बाबत मिळालेली सुचना अथवा तक्रार आल्यास लगेच दुसऱ्या दिवशी सदरील काम सुरु करता येईल. व त्यामुळे दुरुस्तीच्या बाबतीत तक्रारीचे प्रमाण कमी होईल व कार्यालयाचा बराच वेळ वाचेल व तो इतर कार्यालयीन कामास लावता येईल व कामात सुसुत्रता येईल.

सदरील प्रकारच्या एकत्रित वार्षिक पध्दतीच्या प्रस्तावामुळे मनपाचा आर्थिक फायदा देखील होण्याची शक्ता नाकारता येत नाही.

निविदा बोलवतांना खालील अतिरिक्त अटी निविदा सुचने सोबत टाकण्यात येतील

(१) सदर कामाच्या निविदा बोलविल्या इमारती विभागामध्ये या पुर्वी केलेल्या कामाचा अनुभव कामाची गती व इ. बाबींचा इतिहास तपासुन गुत्तेदारास निविदा देण्याची शिफारस करण्यांत येईल.

(२) नियम व अटी नुसार प्रत्येक बाबीच्या २५% पेक्षा जास्त परिमाणाचे काम करता येत नसेल तर सदरील बाबतीत अटी शिथील करुन वेळ प्रंसगी व दुरुस्तीचे कामाचे स्वरुप पाहुन अंदाजपत्रकीय कोणतीही बाब कितीही परीने वाढली अथवा कमी झाली किंवा निरंक झाली तरी तसे करुन घेता येईल. व तसे करण्यास संबंधित गुत्तेदार बंधनकारक राहतील. व त्या करिता गुत्तेदारास कोणत्या. प्रकारचा अतिरिक्त मोबदला दिला जाणार नाही.

(३) ज्या बाबी परिसुची "ब" मध्ये समाविष्ट नाही परंतु प्रत्यक्ष स्थळावर दुरुस्ती करणे अती आवश्यक आहे अशा बाबतीत प्रत्यक्ष स्थळावर दिलेल्या सुचनेनुसार गुत्तेदार त्या बाबी करण्यास बंधनकारक राहतील व त्या बाबी अतिरिक्त बाबी म्हणुन गणल्या जातील.

(४) आर्थिक वर्षाच्या अंतिम दिनांकापर्यंत किंवा पुढील वर्षी एजन्सी निश्चित होणेच्या तारखेपर्यंत संबंधित गुत्तेदार निविदेतील स्विकृत दराप्रमाणे काम करण्यास बंधनकारक राहील.

(५) एकुण प्रस्तावित काम पुर्ण करणे करिता जरी कोणतीही कालमर्यादा दिली असेल तरी उद्‌भवलेल्या दुरुस्ती कामाची सुचना मिळाल्यास बरोबर दुरुस्तीची स्वरुप व त्यापासुन उद्‌भवणाऱ्या समस्याचा विचार करुन क्षेत्र अधिकारी ठरवातील त्या विहीत काळात संबंधित गुत्तेदारास निघालेल्या दुरुस्त्या समाधान कारक पुर्ण करुन वेळोवेळी कामपुर्ती तसेच करण्यास गुत्तेदाराचे टाळाटाळ केल्यास किंवा दुरुस्ती वेळेवर न केल्यामुळे मनपा चे नुकसान झाल्यास सर्व नुकसान भरपाई संबंधित गुत्तेदारास विरुध्द पुढील कार्यवाही प्रस्तावित करण्यांत येईल. सबब सदर वार्षिक दुरुस्तीच्या कामासाठी प्रत्येक विभागाचे (झोनचे) रितसर अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन अंदाजपत्रकात जास्तीत जास्त बाबी ढोवळ मानाने घेण्यात आले आहे. पैकी सदर अंदाजपत्रक हे विभाग क्र. (झोन क्रमांक) अेक च्या अंतर्गत विविध इमारती व त्याचे परिसर दुरुस्तीचे असुन सा.बां. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार तयार केले असुन रक्कम रु. ५.०० लक्ष (पाच लक्ष) चे आहे व अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेस्तव स्थायी समितीपुढे विचारार्थ ठेवण्यास्तव लेखाधिकारी-१ यांनी शिफारस केलेली आहे. व त्यास विभाग (झोन क्रमांक) एकच्या मधील विविध इमारती व त्यांचे परिसर दुरुस्तीच्या कामासाठी रक्कम रु. ५.०० लक्षाचे (पाच लक्ष) अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरच्या खर्च इमारत दुरुस्ती व देखभाल या लेखा शिर्षातुन सन ९६-९७ मध्ये करण्यांत येईल.

**संवाद :**

**स. सभापती :** या ठरावा बाबत मा. आयुक्तांचे विशेष अभिनंदन या मुळे वर्षभराची कामे एकत्रित होतील. स्टेशनरीवरील खर्चही वाचणार आहे.

**लेखाधिकारी :** प्रस्तावातील अट क्र. २ मध्ये दर्शविल्यानुसार कामे करवून घेतांना मा. आयुक्तांची पुर्वपरवानगी घेणे बंधन कारक राहिल.

**मा. सभापती :** लेखाधिकारी यांच्या म्हणण्याची सहमत आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी हा एक चांगला उपक्रम असल्याने या सर्व प्रस्तावात शॉर्ट टेंडर करुन कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या नुसार विभाग क्र. अेक चे वार्षिक पध्दतीने दुरुस्ती करण्यासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या जिल्हा दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या र.रु.५ लाखाच्या अंदाजपत्रकास व प्रस्तावत दर्शविलेल्या अटी व शर्तींना सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

तसेच सदरचा खर्च इमारत दुरुस्ती व देखभाल या शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६९/४८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग क्रं. (झोन क्रमांक) एक ते सात मधील सर्व प्रकारच्या मनपाच्या इमारतीची (परिसरासहित) वार्षिक पध्दतीने दुरुस्ती करण्यासाठी प्रथम मा. आयुक्तांची दि. १४-६-९६ रोजी मंजुरी घेण्यात आली, आणि दुरुस्तीच्या लहान लहान प्रत्येक कामासाठी वेगवेगळे अंदाजपत्रक तयार करणे दर पत्रके मागविणे प्रत्येक वेळेस वेगवेगळा करारनामा करणे, कार्यादेश देणे इ. प्रक्रिया कराव्या लागतात व या सर्व प्रक्रिया प्रत्येक कामासाठी प्रत्येक वेळेस करण्यासाठी कार्यालयाचा बराच कालावधी खर्च होतो त्यामुळे लहान लहान कामे सुध्दा प्रलंबित होतात. जर वार्षिक पध्दतीने कामे दिल्यास ज्या दिवशी दुरुस्ती बाबत मिळालेली सुचना अथवा तक्रार असल्यास लगेच दुसऱ्या दिवशी सदरील काम सुरु करता येईल. व त्यामुळे दुरुस्तीच्या बाबतीत तक्रारीचे प्रमाण कमी होईल व कार्यालयाचा बराच वेळ वाचेल व तो इतर कार्यालयीन कामास लावता येईल हा कामात सुत्रता येईल.

सदरील प्रकारच्या एकत्रित वार्षिक पध्दतीच्या प्रस्तावामुळे मनपा चा आर्थिक फायदा देखिल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. निविदा बोलवतांना खालील अतिरिक्त अटी व निविदा सुचने सोबत टाकण्यात येतील.

१) सदर कामाच्या निविदा बोलविल्या इमारती विभागामध्ये या पुर्वी केलेल्या कामाचा अनुभव कामाची गती केलेल्या प्रलंबनाचा इ. बाबींचा इतिहास तपासुन गुत्तेदारास निविदा देण्याची शिफारस करण्यात येईल.

२) नियम व अटी नुसार प्रत्येक बाबीच्या २५% पेक्षा जास्त परिमाणाचे काम करता येत नसेल तर सदरील बाबतीत अटी शिथिल करुन वेळ प्रसंगी व दुरुस्तीचे कामाचे स्वरुप पाहुन अंदाजपत्रकातील कोणतीही बाब कितीही परीने वाढली अथवा कमी झाली किंवा निरंक झाली तरी तसे करुन घेता येईल व तसे करण्यास संबंधित गुत्तेदार बंधनकारक राहतील व त्या करिता गुत्तेदारास कोणत्याच प्रकारच्या अतिरिक्त मोबदला दिला जाणार नाही.

३) ज्या बाबी परिसुची "ब" मध्ये समाविष्ट नाही परंतु प्रत्यक्ष स्थळावर दुरुस्ती करणे अति आवश्यक आहे. अशा बाबतीत प्रत्यक्ष स्थळावर दिलेल्या सुचनेनुसार गुत्तेदार त्या बाबी करण्यास बंधनकारक राहील व तया बाबी अतिरिक्त बाबी म्हणुन गणल्या जातील. सदरील अती बाबीचे परिमाणे व रक्कम देखील अंदाजपत्रक रक्कमेच्या कोणत्याही प्रमाणबध्द टक्केवारी पर्यंत निश्चित नसेल.

४) आर्थिक वर्षाच्या अंतिम दिनांका पर्यंत किंवा पुढील वर्षात एजन्सी निश्चित होणेच्या तारखेपर्यंत संबंधित गुत्तेदार निविदेतील स्विकृत दराप्रमाणे काम करण्यास बंधनकारक राहतील.

५) एकुण प्रस्तावित काम पुर्ण करणे करिता जरी कोणतीही कालमर्यादा दिली असेल तरी उद्भवलेल्या दुरुस्तीच्या कामाची सुचना मिळाल्यास बरोबर दुरुस्तीचे स्वरुप व त्यापासुन उद्भवणाऱ्या समस्यांचा विचार करुन क्षेत्र अधिकारी ठरवितील त्या विहीत काळात संबंधित कामपुर्ती अहवाल निघालेल्या दुरुस्त्या समाधान कारक पुर्ण करुन वेळेवेळी कामपुर्ती अहवाल कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. तसेच करण्यास गुत्तेदाराने टाळाटाह केल्यास किंवा दुरुस्ती वेळेवर न केल्यामुळे मनपा चे आर्थिक नुकसान किंवा इतर कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास सर्व नुकसान भरपाई संबंधित गुत्तेदारांकडुन वसुल करुन घेण्यास येईल व गुत्तेदारा विरुध्द पुढील कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

सबब सदर वर्षीक दुरुस्तीच्या कामासाठी प्रत्येक विभागाचे (झोनचे) रितसर अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकात जास्तीत जास्त बाबी घेण्यात आल्या असून प्रत्येक बाबीचं परिमाण हे निव्वळ ढोबळ मानाने घेण्यात आले आहे. पैकी सदर अंदाजपत्रक हे विभाग क्र. (झोन क्रमांक) दोन च्या अंतर्गत विविध इमारती व त्याचे परिसर दुरुस्तीचे असुन सा.बां. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार तयार केले रक्कम रु. ५.०० लक्ष (पाच लक्ष) चे आहे व अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेस्तव स्थायी समितीपुढे विचारार्थ ठेवण्यास्तव लेखाधिकारी-१ यांनी शिफारस केली आहे. व त्यास मा. आयुक्तांनी दि. ७-९-९६ ला मान्यता दिली आहे. सबब विभाग (झोन क्रमांक) दोन च्या मधील विविध इमारती व त्याचे परिसर दुरुस्तीच्या कामासाठी रक्कम रु. ५.०० लाखाचे (पाच लक्ष) अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च इमारत दुरुस्ती व देखभाल या लेखा शिर्षकातुन एन ९६-९७ मध्ये करण्यात येईल.

**संवाद :**

**स. सभापती :** या ठरावा बाबत मा. आयुक्तांचे विशेष अभिनंदन या मुळे वर्षभराची कामे एकत्रित होतील. स्टेशनरी वरील खर्च वाचणार आहे.

**लेखाधिकारी :** प्रस्तावातील अट क्र. २ मध्ये दर्शविल्यानुसार कामे करवून घेतांना मा. आयुक्तांची पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

**स. सभापती :** लेखाधिकारी यांच्या मनाशी सहमत आहेत. त्याप्रमाणे कार्यावाही करण्यात यावा. हा एक चांगला उपक्रम असल्याने या सर्व प्रस्तावात शॉर्ट टेंडर करुन कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार विभाग क्र. दोन चे वार्षिक पध्दतीने दुरुस्ती करण्यासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या जिल्हा दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या र.रु. ५ लाखाच्या अंदाजपत्रकास व प्रस्तावात दर्शविलेल्या अटी व शर्तीची सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच सदरचा खर्च इमारत दुरुस्ती व देखभाल या लेखा शिर्षकातुन करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७०/४९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग क्र. (झोन क्रमांक) एक ते सात मधील सर्व प्रकारच्या मनपाच्या इमारतीची (परिसरासहित) वार्षिक पध्दतीने दुरुस्ती करण्यासाठी प्रथम मा. आयुक्तांची दि. १४-६-९६ रोजी मंजुरी घेण्यात आली. आणि दुरुस्तीच्या लहान लहान प्रत्येक कामासाठी वेगवेगळे अंदाजपत्रक तयार करणे व दर पत्रके मागविणे प्रत्येक वेळेस वेगवेगळे अंदाजपत्रक तयार करणे. व दर पत्रके मागविणे प्रत्येक वेळेस वेगवेगळा करारनामा करणे कार्यादर्श देणे इ. प्रक्रिया कराव्या लागतात व या सर्व प्रक्रिया सर्व प्रक्रिया प्रत्येक कामासाठी प्रत्येक वेळेस करण्यासाठी कार्यालयाचा बराच कालवधी खर्च होतो त्यामुळे लहान लहान कामे सुध्दा प्रलंबित होतात. जर वार्षिक पध्दतीने कामे दिल्यास ज्या दिवशी दुरुस्ती बाबत मिळालेली सुचना अथवा तक्रार असल्यास लगेच दुसऱ्या दिवशी सदरील काम सुरु करता येईल. व त्यामुळे दुरुस्ती च्या बाबतीत तक्रारीचे प्रमाण कमी हाईल व कार्यालयाचा बराच वेळ वाचेल व तो इतर कार्यालयीन कामास लावता येईल व कामात सुत्रता येईल.

सदरील प्रकारच्या वार्षिक पध्दतीच्या प्रस्तावामुळे मनपा चा आर्थिक फायदा देखील होण्याची शक्यता नाकरता येत नाही. निविदा बोलवतांना खालील अतिरिक्त अटी निविदा सुचने सोबत टाकण्यात येतील.

१) सदर कामाच्या निविदा बोलविल्या इमारती विभागामध्ये या पुर्वी केलेल्या कामाचा अनुभव, कामाची गती व पुर्वी केलेल्या कामाच्या पध्दतीचा व कामाबाबत केलेल्या प्रंलबनाचा इ. बाबींचा इतिहास तपासुन गुत्तेदारास देण्यांची शिफारस करण्यात येईल.

२) नियम व अटी नुसार प्रत्येक बाबींच्या २५% पेक्षा जास्त परिमाणाचे काम करता येत नसेल तर सदरील बाबतीत अटी शिथिल करुन वेळ प्रसंगी व दुरुस्तीचे स्वरुप पाहुन अंदाजपत्रकातील कोणतीही बाब कितीही परीने वाढली अथवा कमी झाली किंवा निरंक झाली. तरी तसे करुन घेता येईल व तसे करण्यांत संबंधित गुत्तेदार बंधनकारक राहतील व त्या करिता गुत्तेदारास कोणत्याच प्रकारचा अतिरिक्त मोबदला दिला जाणार नाही.

३) ज्या बाबी परिसुची "ब" मध्ये समाविष्ट नाही परंतु प्रत्यक्ष स्थळावर दुरुस्ती करणे आणि आवश्यक आहे अशा बाबतीत प्रत्यक्ष स्थळावर दिलेल्या सुचनेनुसार गुत्तेदार त्याबाबी करण्यास बंधनकारक राहतील व त्या बाबी अतिरिक्त बाबी म्हणुन गणल्या जातील. सदरील अनी बाबीचे परिमाणे व रक्कम देखील अंदाजपत्रक रक्कमेच्या कोणत्याही प्रमाणबध्द टक्केवारी पर्यंत निश्चित नसेले.

४) आर्थिक वर्षाच्या अंतिम दिनांका पर्यंत किंवा पुढील वर्षी एजन्सी निश्चित होणेच्या तारखेपर्यंत संबंधित गुत्तेदार निविदेतील स्विकृत दराप्रमाणे काम करण्यास बंधनकारक राहील.

५) एकुण प्रस्तावित काम पुर्ण करणे करिता जरी कोणतीही काल मर्यादा दिली असेल जरी कोणतीही कालमर्यादा दिली असेल तरी उद्‌भवलेल्या दुरुस्तीच्या कामाची सुचना मिळाल्यास बरोबर दुरुस्तीचे स्वरुप व त्यापासुन उद्‌भवणाऱ्या समस्याचा विचार करुन क्षेत्र अधिकारी ठरवतील त्या विहित काळात संबंधित गुत्तेदारास निघालेल्या दुरुस्त्या समाधान कारक पुर्ण करुन वेळोवेळी कामपुर्ती अहवाल कार्यालयास सादर करणे बंधनकार राहील. तसेच करण्यास गुत्तेदाराने टाळाटाळ केल्यास किंवा दुरुस्ती वेळेवर न केल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान किंवा इतर कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास सर्व नुकसान भरपाई संबंधित गुत्तेदाराकडुन

वसुल करुन घेण्यांत येईल व गुत्तेदारा विरुध्द पुढील कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

सबब सदर वार्षिक दुरुस्तीच्या कामासाठी प्रत्येक विभागाचे (झोनचे रितसर अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकात जास्तीत जास्त बाबी घेण्यात आल्या असुन प्रत्येक बाबीचे परिमाण निव्वळ ढोबळ मानाने घेण्यात आले आहे. पैकी सदर अंदाजपत्रक हे विभाग क्र. (झोन क्रमांक) तीन च्या अंतर्गत विविध इमारती व त्याचे परिसर दुरुस्तीचे असुन सा.बां. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार तयार केलेले असुन रक्कम रु. ५.०० लक्ष (पाच लक्ष) हे आहे व अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेस्तव स्थायी समितीपुढे विचारार्थ ठेवण्यास्तव लेखाधिकारी-१ यांनी शिफारस केली आहे व त्यास मा. आयुक्तांना दि. ७-९-९६ ला मान्यता दिली आहे. सबब विभाग (झोन क्रमांक) तीनच्या मधील विविध इमारती व त्याचे परिसर दुरुस्तीच्या कामासाठी रक्कम रु. ५.०० लाखाचे (पाच लक्ष) अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च इमारत दुरुस्ती व देखभाल या लेखा शिर्षकातुन करण्यात येईल.

**संवाद :**

**स. सभापती :** या ठरावा बाबत मा. आयुक्तांचे विशेष अभिनंदन या मुळे वर्षभराची कामे एकत्रित होतील. स्टेशनरील खर्चही वाचणार आहे.

**लेखाधिकारी :** प्रस्तावातील अट क्र. २ मध्ये दर्शविल्या नुसार कामे करवुन घेतांना मा. आयुक्ताचे पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

**स. सभापती :** लेखाधिकारी यांच्या मनाशी सहमत आहोत. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी हा एक चांगला उपक्रम असल्याने या सर्व प्रस्तावास शॉर्ट टेंडर करुन कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार विभाग क्र. तीन चे वार्षिक पध्दतीने दुरुस्ती करण्यासाठी सा.बां. खात्याच्या सन १९९५-९६ च्या जिल्हा दरसुची नुसार तयार करण्यात आलेल्या र.रु. ५ लाखाच्या अंदाजपत्रकास व प्रस्तावात दर्शविलेल्या अटी व शर्तीनां सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच सदरचा खर्च इमारत दुरुस्ती व देखभाल या लेखा शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७१/५० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग क्र. (झोन क्रमांक) एक ते सात मधील सर्व प्रकारच्या मनपाच्या इमारतीची (परिसरासहित) वार्षिक पध्दतीने दुरुस्ती करण्यासाठी प्रथम मा. आयुक्तांची दि. १४/६-९६ रोजी घेण्यात आली. आणि दुरुस्तीच्या लहान लहान प्रत्येक कामासाठी वेगवेगळे अंदाजपत्रक तयार करणे दरपत्रके मागविणे, प्रत्येक वेगवेगळे करारनामा करणे कार्यादेश देणे इ. प्रक्रिया कराव्या लागतात व या सर्व प्रक्रिया प्रत्येक कामासाठी प्रत्येक वेळेस करण्यासाठी कार्यालयाचा बराच कालावधी खर्च होतो. त्यामुळे लहान लहान कामे सुध्दा प्रलंबित होतात. जर वार्षिक पध्दतीने कामे दिल्यास ज्या दिवशी दुरुस्ती बाबत मिळालेली सुचना अथवा तक्रार असल्यास लगेच दुसऱ्या दिवशी बाबत काम सुरु करता येईल व त्यामुळे दुरुस्ती च्या दिवशी तक्रारीचे प्रमाण कमी होईल व

कार्यालयाचा बराच वेळ वाचेल व तो इतर कार्यालयीन कामास लावता येईल व कामात सुत्रता येईल.

सदरील प्रकारच्या एकत्रित वार्षिक पध्दतीच्या प्रस्तावामुळे मनपा चा आर्थिक फायदा देखील होण्याची शक्यता नाकरता येत नाही. निविदा बोलवतांना खालील अतिरिक्त अटी निविदा सुचने सोबत टाकण्यात येतील.

१) सदर कामाच्या निविदा बोलविल्या इमारती विभागामध्ये या पुर्वी केलेल्या कामाचा अनुभव कामाची गती व पुर्वी केलेल्या कामाच्या पध्दतीचा व कामाबाबत केलेल्या प्रलंबनाचा इ. बाबींचा इतिहास तपासुन गुत्तेदारास निविदा देण्याची शिफारस करण्यात येईल.

२) नियम व अटी नुसार प्रत्येक बाबीच्या २५% पेक्षा जास्त परिमाणाचे काम करता येत नसेल तर सदरील बाबतीत अटी शिथील करुन वेळ प्रसंगी व दुरुस्तीचे कामाचे स्वरुप पाहुन अंदाजपत्रकातील कोणतीही बाब कितीही परीने वाटली अथवा कमी झाली किंवा निरंक झाली तरी तसे करुन घेता येईल व तसे करण्यास संबंधित गुत्तेदार बंधनकारक राहतील व त्या करिता गुत्तेदारास कोणत्याच प्रकारचा अतिरिक्त मोबदला दिला जाणार नाही.

३) ज्या बाबी परिसुची "ब" मध्ये समाविष्ट नाही परंतु प्रत्यक्ष स्थळावर दुरुस्ती करणे अति आवश्यक आहे. अशा बाबतीत प्रत्यक्ष स्थळावर दुरुस्ती करणे अति आवश्यक आहे. अशा बाबतीत प्रत्यक्ष स्थळावर दिलेल्या सुचनेनुसार गुत्तेदार त्या बाबी. करण्यास बंधन कारक राहील व त्या बाबी अतिरिक्त बाबी म्हणुन गणल्या जातील सदरील अती बाबींचे परिमाणे व रक्कम देखील अंदाजपत्रक रक्कमेच्या कोणत्याही प्रमाणबध्द टक्केवारी प्रर्यत निश्चित नसेल.

४) आर्थिक वर्षाच्या अंतिम दिनांका पर्यंत किंवा पुढील वर्षी एजन्सी निश्चित होणेच्या तारखेपर्यंत संबंधित गुत्तेदार निविदेतील स्विकृत दराप्रमाणे काम करण्यास बंधनकारक राहील.

५) एकुण प्रस्तावित काम पुर्ण करणे. करिता जरी कोणतीही कालमर्यादा दिली असेल तरी उद्‌भवलेल्या दुरुस्तीच्या कामाची सुचना मिळाल्यास बरोबर दुरुस्तीची स्वरुप व त्यापासुन उद्‌भवलेल्या समस्याचा विचार करुन क्षेत्र अधिकारी ठरवतील त्या विहीत काळात संबंधित गुत्तेदारास निघालेल्या दुरुस्त्या समाधान कारक पुर्ण करुन वेळोवेळी कामपुर्ती अहवाल कार्यालयास सादर करणे. बंधनकारक राहील. तसेच करण्यास गुत्तेदाराने टाळाटाळ केल्यास किंवा दुरुस्ती वेळेवर न केल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाल्यास सर्व नुकसान भरपाई संबंधित गुत्तेदाराविरुध्द पुढील कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

सबब सदर वार्षिक दुरुस्तीच्या कामासाठी प्रत्येक विभागाचे (झोनचे) रितसर अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकात जास्तीत जास्त बाबी घेण्यात आल्या असुन प्रत्येक बाबीचे परिमाण हे निव्वळ मानाने घेण्यात आले आहे. पैकी सदर अंदाजपत्रक हे विभाग क्र. (झोन क्रंमाक) चार या अंतर्गत विविध इमारती व त्यांचे परिसर दुरुस्तीचे सा.बां. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुचीचे सा.बां. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार तयार केले असुन रक्कम रु. ५.०० लक्ष (पाच लक्ष) चे आले व अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेस्तव स्थायी समितीपुढे विचारार्थ ठेवण्यास्तव लेखाधिकारी-१ यांनी शिफारस केली आहे. व त्यास मा. आयुक्तांना दि. ७-९-९६ ला मान्यता दिली आहे. सबब विभाग (झोन क्रंमाक) चारच्या मधील विविध इमारती व त्याचे परिसर दुरुस्तीच्या

कामासाठी रक्कम रु. ५.०० लक्षाचे (पाच लक्ष) अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च इमारत दुरुस्ती व देखभाल मा. लेखाशिर्षकातुन सन ९६-९७ मध्ये करण्यात येईल.

**संवाद**

**स.सभापती :** या ठरावाबाबत मा. आयुक्तांचे विशेष अभिनंदन या मुळे वर्षभराची कामे एकत्रित होतील स्टेशनरील खर्चही वाचणार आहे.

**लेखाधिकारी :** प्रस्तावातील अट क्र. २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे कामे करवून घेतांना मा. आयुक्तांची पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

**स. सभापती :** लेखाधिकारी यांच्या मनाशी सहमत आहोत. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. हा एक चांगला उपक्रम असल्याने या सर्व प्रस्तावात शॉर्ट करुन कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार विभाग क्र. चार ते वार्षिक पध्दतीने दुरुस्ती करण्यासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या जिल्हा दुरुस्तीनुसार तयार करण्यात आलेल्या र.रु. ५ लाखाच्या अंदाजपत्रकास व प्रस्तावात दर्शविलेल्या अटी व शर्तीना सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच सदरचा खर्च इमारत दुरुस्ती व देखभाल या लेखा शिर्षातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७२/५१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग कं. (झोन क्रमांक) एक ते सात मधील सर्व प्रकारच्या मनपाच्या इमारतीची (परिसरासहित) वार्षिक पध्दतीने दुरुस्ती करण्यासाठी प्रथम मा. आयुक्तांनी दि. १४-६-९६ रोजी मंजुरी घेण्यात आली आणि दुरुस्तीच्या प्रत्येक कामासाठी वेगवेगळे अंदाजपत्रक तयार करणे दर पत्रके मागविणे. प्रत्येक वेळेस वेगवेगळा करारनामा करणे कार्यादेश देणे इ. प्रक्रिया कराच्या लागतात व यासर्व प्रक्रिया प्रत्येक कामासाठी प्रत्येक वेळेस करण्यासाठी कार्यालयाच्या बराच कालावधी खरी होती. त्यामुळे लहान लहान कामे सुध्दा प्रलंबित होतात. जर वार्षिक पध्दतीने काकमे दिल्यास ज्या दिवशी दुरुस्ती बाबत मिळालेली सुचना अथवा तक्रार आल्यास लगेच दुसऱ्या दिवशी काम सुरु करता येईल व त्यामुळे दुरुस्ती च्या बाबतीत तक्रारींचे प्रमाण कमी होईल व कार्यालयाचा बराच वेळ वाचेल व तो इतर कार्यालयीन कामास लावता येईल व कामात सुत्रता येईल.

सदरील प्रकारच्या एकत्रित वार्षिक पध्दतीच्या प्रस्तावामुळे मनपा चा आर्थिक फायदा देखील होण्याची शक्यता नाकारता येत नाही. निविदा बोलवतांना खालील अतिरिक्त अटी निविदा सुचने सोबत टाकण्यात येतील.

१) सदर कामाच्या निविदा बोलविल्या इमारती विभागामध्ये या पुर्वी केलेल्या कामाचा अनुभव कामाची गती व पुर्वी केलेल्या कामाच्या पध्दतीचा व कामाबाबत केलेल्या प्रलंबनाचा इ. बाबीचा इतिहास तपासुन गुत्तेदारास निविदा देण्याची शिफारस करण्यात येईल.

२) नियम व अटी नुसार प्रत्येक बाबीच्या २५% पेक्षा जास्त परिमाणाचे काम करता येत नसेल तर सदरील बाबतीत अटी शिथील करुन वेळ प्रसंगी व दुरुस्तीचे कामाचे स्वरुप पाहुन अंदाजपत्रकातील कोणतीही बाब कितीही परीने वाटली अथवा कमी झाली किंवा निरंक झाली तरी तसे करुन घेता येईल व तसे करण्यास संबंधित गुत्तेदार बंधनकारक राहतील व त्या करिता गुत्तेदारास कोणत्याच प्रकारचा अतिरिक्त मोबदला दिला जाणार नाही.

३) ज्या बाबी परिसुची "ब" मध्ये समाविष्ट नाही परंतु प्रत्यक्ष स्थळावर दुरुस्ती करणे अति आवश्यक आहे. अशा बाबतीत प्रत्यक्ष स्थळावर दुरुस्ती करणे अति आवश्यक आहे. अशा बाबतीत प्रत्यक्ष स्थळावर दिलेल्या सुचनेनुसार गुत्तेदार त्या बाबी. करण्यास बंधन कारक राहील व त्या बाबी अतिरिक्त बाबी म्हणुन गणल्या जातील सदरील अती बाबींचे परिमाणे व रक्कम देखील अंदाजपत्रक रक्कमेच्या कोणत्याही प्रमाणबध्द टक्केवारी प्रर्यत निश्चित नसेल.

४) आर्थिक वर्षाच्या अंतिम दिनांका पर्यंत किंवा पुढील वर्षी एजन्सी निश्चित होणेच्या तारखेपर्यंत संबंधित गुत्तेदार निविदेतील स्विकृत दराप्रमाणे काम करण्यास बंधनकारक राहील.

५) एकुण प्रस्तावित काम पुर्ण करणे. करिता जरी कोणतीही कालमर्यादा दिली असेल तरी उद्‌भवलेल्या दुरुस्तीच्या कामाची सुचना मिळाल्यास बरोबर दुरुस्तीची स्वरुप व त्यापासुन उद्‌भवलेल्या समस्याचा विचार करुन क्षेत्र अधिकारी ठरवतील त्या विहीत काळात संबंधित गुत्तेदारास निघालेल्या दुरुस्त्या समाधान कारक पुर्ण करुन वेळोवेळी कामपुर्ती अहवाल कार्यालयास सादर करणे. बंधनकारक राहील. तसेच करण्यास गुत्तेदाराने टाळाटाळ केल्यास किंवा दुरुस्ती वेळेवर न केल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाल्यास सर्व नुकसान भरपाई संबंधित गुत्तेदाराविरुध्द पुढील कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

सबब सदर वार्षिक दुरुस्तीच्या कामासाठी प्रत्येक विभागाचे (झोनचे) रितसर अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकात जास्तीत जास्त बाबी घेण्यात आल्या असुन प्रत्येक बाबीचे परिमाण हे निव्वळ मानाने घेण्यात आले आहे. पैकी सदर अंदाजपत्रक हे विभाग क्र. (झोन क्रंमाक) चार या अंतर्गत विविध इमारती व त्यांचे परिसर दुरुस्तीचे सा.बां. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुचीचे सा.बां. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार तयार केले असुन रक्कम रु. ५.०० लक्ष (पाच लक्ष) चे आले व अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेस्तव स्थायी समितीपुढे विचारार्थ ठेवण्यास्तव लेखाधिकारी-१ यांनी शिफारस केली आहे. व त्यास मा. आयुक्तांना दि. ७-९-९६ ला मान्यता दिली आहे. सबब विभाग (झोन क्रंमाक) चार च्या अधील विविध इमारती व त्याचे परिसर दुरुस्तीच्या कामासाठी रक्कम रु. ५.०० लक्षाचे (पाच लक्ष) अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च इमारत दुरुस्ती व देखभाल मा. लेखाशिर्षकातुन सन ९६-९७ मध्ये करण्यात येईल.

**संवाद**

**स. सभापती :** या ठरावा बाबत मा. आयुक्तांचे विशेष अभिनंदन या मुळे वर्षभराची कामे एकत्रित होतील. स्टेशनवरील खर्चही वाचणार आहे.

**लेखाधिकारी :** प्रस्तावातील अट क्र. २ मध्ये दर्शविल्या कामे करवून घेतांना मा. आयुक्तांची पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

**स. सभापती :** लेखाधिकारी यांच्या मनाशी सहमत आहोत. त्याप्रमाणे कार्य वाही करण्यात यावा. हा एक चांगला उपक्रम असल्याने या सर्व प्रस्तावात शॉर्ट टेंडर करुन कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार विभाग क्र. पाच चे वार्षिक पध्दतीने दुरुस्ती करण्यासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या जिल्हा दुरुस्तीनुसार तयार करण्यात आलेल्या र.रु. ५ लाखाच्या अंदाजपत्रकास व प्रस्तावात दर्शविलेल्या अटी व शर्तीना सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच सदरचा खर्च इमारत दुरुस्ती व देखभाल या लेखा शिर्षातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७३/५२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग क्र. (झोन क्र.) एक ते सात मधील सर्वप्रकारच्या मनपाच्या इमारतीची (परिसरासहित) वार्षिक पध्दतीने दुरुस्ती करण्यासाठी प्रथम मा. आयुक्तांची दि. १६-६-९६ रोजी मंजुरी घेण्यात आली. आणि दुरुस्तीच्या लहान लहान प्रत्येक कामासाठी वेगवेगळे अंदाजपत्रक तयार करणे दर पत्रके मागविणे, प्रत्येक वेळेस वेगवेगळा लागतात व या सर्व प्रक्रिया प्रत्येक कामासाठी प्रत्येक वेळेस करण्यासाठी कार्यालयाचा बराच कालावधी खर्च होतो. त्यामुळे लहान लहान कामे सुध्दा प्रलंबित होतात. जर वार्षिक पध्दतीने कामे दिल्यास ज्या दिवशी दुरुस्ती बाबत मिळालेली सुचना अथवा तक्रार असल्यास लगेच दुसऱ्या दिवशी सदरील काम सुरु करता येईल व त्यामुळे दुरुस्ती च्या बाबतीत तक्रारीचे प्रमाण कमी होईल व कार्यालयाचा बराच वेळ वाचेल व तो इतर कार्यालयीन कामास लावता येईल व कामात सुत्रता येईल.

सदरील प्रकारच्या एकत्रित वार्षिक पध्दतीच्या प्रस्तावामुळे मनपाचा आर्थिक फायदा देखील होण्याची शक्यता नाकारता येत नाही. निविदा बोलवतांना खालील अतिरिक्त अटी निविदा सुचने सोबत टाकण्यात येतील.

१) सदर कामाच्या निविदा बोलविल्या इमारती विभागामध्ये या पुर्वी केलेल्या कामाचा अनुभव कामाची गती व पुर्वी केलेल्या कामाच्या पध्दतीचा व कामाबाबत केलेल्या प्रलंबनाचा इ. बाबीचा इतिहास तपासुन गुत्तेदारास निविदा देण्याची शिफारस करण्यात येईल.

२) नियम व अटी नुसार प्रत्येक बाबीच्या २५% पेक्षा जास्त परिमाणाचे काम करता येत नसेल तर सदरील बाबतीत अटी शिथील करुन वेळ प्रसंगी व दुरुस्तीचे कामाचे स्वरुप पाहुन अंदाजपत्रकातील कोणतीही बाब कितीही परीने वाटली अथवा कमी झाली किंवा निरंक झाली तरी तसे करुन घेता येईल व तसे करण्यास संबंधित गुत्तेदार बंधनकारक राहतील व त्या करिता गुत्तेदारास कोणत्याच प्रकारचा अतिरिक्त मोबदला दिला जाणार नाही.

३) ज्या बाबी परिसुची "ब" मध्ये समाविष्ट नाही परंतु प्रत्यक्ष स्थळावर दुरुस्ती करणे अति आवश्यक आहे. अशा बाबतीत प्रत्यक्ष स्थळावर दुरुस्ती करणे अति आवश्यक आहे. अशा बाबतीत प्रत्यक्ष स्थळावर दिलेल्या सुचनेनुसार गुत्तेदार त्या बाबी. करण्यास बंधन कारक राहील व त्या बाबी अतिरिक्त बाबी म्हणुन गणल्या जातील सदरील अती बाबींचे परिमाणे व रक्कम देखील अंदाजपत्रक रक्कमेच्या कोणत्याही प्रमाणबध्द टक्केवारी पर्यंत निश्चित नसेल.

४) आर्थिक वर्षाच्या अंतिम दिनांका पर्यंत किंवा पुढील वर्षी एजन्सी निश्चित होणेच्या तारखेपर्यंत संबंधित गुत्तेदार निविदेतील स्विकृत दराप्रमाणे काम करण्यास बंधनकारक राहील.

५) एकुण प्रस्तावित काम पुर्ण करणे. करिता जरी कोणतीही कालमर्यादा दिली असेल तरी उद्‌भवलेल्या दुरुस्तीच्या कामाची सुचना मिळाल्यास बरोबर दुरुस्तीची स्वरुप व त्यापासुन उद्‌भवलेल्या समस्याचा विचार करुन क्षेत्र अधिकारी ठरवतील त्या विहीत काळात संबंधित गुत्तेदारास निघालेल्या दुरुस्त्या समाधान कारक पुर्ण करुन वेळोवेळी कामपुर्ती अहवाल कार्यालयास सादर करणे. बंधनकारक राहील. तसेच करण्यास गुत्तेदाराने टाळाटाळ केल्यास किंवा दुरुस्ती वेळेवर न केल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाल्यास सर्व नुकसान भरपाई संबंधित गुत्तेदाराविरुध्द पुढील कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

सबब सदर वार्षिक दुरुस्तीच्या कामासाठी प्रत्येक विभागाचे (झोनचे) रितसर अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकात जास्तीत जास्त बाबी घेण्यात आल्या असुन प्रत्येक बाबीचे परिमाण हे निव्वळ मानाने घेण्यात आले आहे. पैकी सदर अंदाजपत्रक हे विभाग क्र. (झोन क्रंमाक) चार या अंतर्गत विविध इमारती व त्यांचे परिसर दुरुस्तीचे सा.बां. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुचीचे सा.बां. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार तयार केले असुन रक्कम रु. ५.०० लक्ष (पाच लक्ष) चे आले व अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेस्तव स्थायी समितीपुढे विचारार्थ ठेवण्यास्तव लेखाधिकारी-१ यांनी शिफारस केली आहे. व त्यास मा. आयुक्तांना दि. ७-९-९६ ला मान्यता दिली आहे. सबब विभाग (झोन क्रंमाक) चार च्या अधील विविध इमारती व त्याचे परिसर दुरुस्तीच्या कामासाठी रक्कम रु. ५.०० लक्षाचे (पाच लक्ष) अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च इमारत दुरुस्ती व देखभाल मा. लेखाशिर्षकातुन सन ९६-९७ मध्ये करण्यात येईल.

**संवाद**

**स. सभापती :** या ठरावा बाबत मा. आयुक्तांचे विशेष अभिनंदन यामुळे वर्षभराची कामे सुत्रीत होतील. स्टेशनरील खर्च वाचणार आहे.

**लेखाधिकारी :** प्रस्तावातील अट क्र. २ मध्ये दर्शविल्या नुसार कामे करवुन घेतांना मा. आयुक्तांची पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

**स.सभापती :** लेखाधिकारी यांच्या मनाशी सहमत आहोत. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. हा एक चांगला उपक्रम असल्याने या सर्व प्रस्तावास शॉर्ट टेंडर करुन कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार विभाग क्र. सहा चे वार्षिक पध्दतीने दुरुस्ती करण्यासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या जिल्हा दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या र.रु.५ लाखाच्या अंदाजपत्रकास व प्रस्तावात दर्शविलेल्या अटी व शर्तींना सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७४/५३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग क्र. (झोन क्र.) एक ते सात मधील सर्वप्रकारच्या मनपाच्या इमारतीची (परिसरासहित) वार्षिक पध्दतीने दुरुस्ती करण्यासाठी प्रथम मा. आयुक्तांची दि. १४-६-९६ रोजी मंजुरी घेण्यात आली. आणि दुरुस्तीच्या लहान लहान प्रत्येक कामासाठी वेगवेगळे अंदाजपत्रक तयार करणे दर पत्रके मागविणे, प्रत्येक वेळेस वेगवेगळा करणे कार्यदेश देणे. इ. प्रक्रिया कराव्या लागतात व या सर्व प्रक्रिया प्रत्येक कामासाठी प्रत्येक वेळेस करण्यासाठी कार्यालयाचा बराच कालावधी खर्च होतो. त्यामुळे लहान लहान कामे सुध्दा प्रलंबित होतात. जर वार्षिक पध्दतीने कामे दिल्यास ज्या दिवशी दुरुस्ती बाबत मिळालेली सुचना अथवा तक्रार असल्यास लगेच दुसऱ्या दिवशी सदरील काम सुरु करता येईल व त्यामुळे दुरुस्ती च्या बाबतीत तक्रारीचे प्रमाण कमी होईल व कार्यालयाचा बराच वेळ वाचेल व तो इतर कार्यालयीन कामास लावता येईल व कामात सुत्रता येईल.

सदरील प्रकारच्या एकत्रित वार्षिक पध्दतीच्या प्रस्तावामुळे मनपा चा आर्थिक फायदा देखील होण्याची शक्यता नाकारता येत नाही. निविदा बोलवतांना खालील अतिरिक्त अटी निविदा सुचने सोबत टाकण्यात येतील.

१) सदर कामाच्या निविदा बोलविल्या इमारती विभागामध्ये या पुर्वी केलैल्या कामाचा अनुभव कामाची गती व पुर्वी केलेल्या कामाच्या पध्दतीचा व कामाबाबत केलेल्या प्रलंबनाचा इ. बाबीचा इतिहास तपासुन गुत्तेदारास निविदा देण्याची शिफारस करण्यात येईल.

२) नियम व अटी नुसार प्रत्येक बाबीच्या २५% पेक्षा जास्त परिमाणाचे काम करता येत नसेल तर सदरील बाबतीत अटी शिथील करुन वेळ प्रसंगी व दुरुस्तीचे कामाचे स्वरुप पाहुन अंदाजपत्रकातील कोणतीही बाब कितीही परीने वाटली अथवा कमी झाली किंवा निरंक झाली तरी तसे करुन घेता येईल व तसे करण्यास संबंधित गुत्तेदार बंधनकारक राहतील व त्या करिता गुत्तेदारास कोणत्याच प्रकारचा अतिरिक्त मोबदला दिला जाणार नाही.

३) ज्या बाबी परिसुची "ब" मध्ये समाविष्ट नाही परंतु प्रत्यक्ष स्थळावर दुरुस्ती करणे अति आवश्यक आहे. अशा बाबतीत प्रत्यक्ष स्थळावर दुरुस्ती करणे अति आवश्यक आहे. अशा बाबतीत प्रत्यक्ष स्थळावर दिलेल्या सुचनेनुसार गुत्तेदार त्या बाबी. करण्यास बंधन कारक राहील व त्या बाबी अतिरिक्त बाबी म्हणुन गणल्या जातील सदरील अती बाबींचे परिमाणे व रक्कम देखील अंदाजपत्रक रक्कमेच्या कोणत्याही प्रमाणबध्द टक्केवारी प्रर्यत निश्चित नसेल.

४) आर्थिक वर्षाच्या अंतिम दिनांका पर्यंत किंवा पुढील वर्षी एजन्सी निश्चित होणेच्या तारखेपर्यंत संबंधित गुत्तेदार निविदेतील स्विकृत दराप्रमाणे काम करण्यास बंधनकारक राहील.

५) एकुण प्रस्तावित काम पुर्ण करणे. करिता जरी कोणतीही कालमर्यादा दिली असेल तरी उद्‌भवलेल्या दुरुस्तीच्या कामाची सुचना मिळाल्यास बरोबर दुरुस्तीची स्वरुप व त्यापासुन उद्‌भवलेल्या समस्याचा विचार करुन क्षेत्र अधिकारी ठरवतील त्या विहीत काळात संबंधित गुत्तेदारास निघालेल्या दुरुस्त्या समाधान कारक पुर्ण करुन वेळोवेळी कामपुर्ती अहवाल कार्यालयास सादर करणे. बंधनकारक राहील. तसेच करण्यास गुत्तेदाराने टाळाटाळ केल्यास किंवा दुरुस्ती वेळेवर न केल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाल्यास सर्व नुकसान भरपाई संबंधित गुत्तेदाराविरुध्द पुढील कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

सबब सदर वार्षिक दुरुस्तीच्या कामासाठी प्रत्येक विभागाचे (झोनचे) रितसर अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकात जास्तीत जास्त बाबी घेण्यात आल्या असुन प्रत्येक बाबीचे परिमाण हे निव्वळ मानाने घेण्यात आले आहे. पैकी सदर अंदाजपत्रक हे विभाग क्र. (झोन क्रंमाक) चार या अंतर्गत विविध इमारती व त्यांचे परिसर दुरुस्तीचे सा.बां. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुचीचे सा.बां. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार तयार केले असुन रक्कम रु. ५.०० लक्ष (पाच लक्ष) चे आले व अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेस्तव स्थायी समितीपुढे विचारार्थ ठेवण्यास्तव लेखाधिकारी-१ यांनी शिफारस केली आहे. व त्यास मा. आयुक्तांना दि. ७-९-९६ ला मान्यता दिली आहे. सबब विभाग (झोन क्रंमाक) चार च्या अधील विविध इमारती व त्याचे परिसर दुरुस्तीच्या कामासाठी रक्कम रु. ५.०० लक्षाचे (पाच लक्ष) अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च इमारत दुरुस्ती व देखभाल मा. लेखाशिर्षकातुन सन ९६-९७ मध्ये करण्यात येईल.

**संवाद**

**स. सभापती :** या ठरावा बाबत मा. आयुक्तांचे विशेष अभिनंदन यामुळे वर्षभराची कामे सुत्रीत होतील. स्टेशनरील खर्च वाचणार आहे.

**लेखाधिकारी :** प्रस्तावातील अट क्र. २ मध्ये दर्शविल्या नुसार कामे करवुन घेतांना मा. आयुक्तांची पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

**स.सभापती :** लेखाधिकारी यांच्या मनाशी सहमत आहोत. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. हा एक चांगला उपक्रम असल्याने या सर्व प्रस्तावास शॉर्ट टेंडर करुन कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार विभाग क्र. सहा चे वार्षिक पध्दतीने दुरुस्ती करण्यासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या जिल्हा दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या र.रु. ५ लाखाच्या अंदाजपत्रकास व प्रस्तावात दर्शविलेल्या अटी व शर्तींना सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच सदरचा खर्च इमारत दुरुस्ती देखभाल या लेखा शिर्षातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळेचे विषय*

**विषय क्र. २७५/१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, चंपा मस्जिद समोरील वाहतुक बेटाचे सौदर्यीकरण करणेस्तव तसेच कलात्मक भांडयाची प्रतिकृती त्यावरील खर्च बारकाव्यासह करण्याचे ठरले.

यानुसार शहरातील विविध शिल्पकार आर्टीस्ट यांचेकडे प्रत्यक्ष जाऊन विचारणा करुन त्यांचेकडुन या कामाची दरपत्रके मागविली असता खालील विविध कलाकारांना त्यांची दरपत्रके आणुन दिली त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.पी.आर. सासमकर | र.रु. २,२००००/- |
| २. | हॉरीझोन आर्ट स्टुडियो | र.रु. २,२८,०००/- |
| ३. | गिरीष आर्ट औरंगाबाद | र.रु. २,६५,०००/- |

वरील प्रमाणे दराचे अवलोकन केले असता श्री. पी.आर. सासमकर यांचेकडुन काम विविध टाईल्स व मार्बलचा चुरा एकत्र करुन त्या मटेरीयल मध्ये करुन घेण्याचे ठरले आहे. व त्याचे दर रक्कम रु. २,२००००/- एवढे असल्याने यांना वाटाघाटी साठी बोलवले असता मा. आयुक्त व मुख्य लेखा परिक्षक यांचे समोर चर्चा झाली असता श्री.पी.आर. सासमकर यांनी हे काम र.रु. १,९०,०००/- मध्येय करुन देण्याचे मान्य केले.

तरी श्री.पी.आर. सासमकर यांचे दरपत्रक र.रु. १,९०,०००/- मंजूरीस्तव व हे काम त्यांचे कडून टर्न की बेसीसवर करुन घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

तसे या कामासाठी वाहतुक बेट तयार करणे व इतर खर्च (डाळी विद्यूत दिवे इ.) साठी अंदाजे र.रु. १,२५,०००/- एवढा खर्च येणार आहे हे काम उपलब्ध अनुभवी कंत्राटदार श्री. दिलावर खान यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांत येईल.

तरी या कामाचा एकुण अंदाजीत खर्च र.रु. ३,१५,०००/- ला व प्रस्तावित केल्यानुसार काम करुन घेण्यास मंजुरी मिळावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार चंपा मस्जीद समोरील वाहतुक बेटाचे सौंदर्यीकरण करणेस्तव तसेच कलात्मक भांडयाची प्रतिकृती त्यावरील सर्व बारकाव्यासह करण्यासाठी प्राप्त दरपत्रकांमध्ये पी.आर. सासमकर यांचे दर हे काम विविध टाईल्स व मार्बलच्या चुरा एकत्र करुन त्या मटेरीलयल मध्ये करण्यासाठी २,२०,०००/- असे होते. तथापी चर्चेअंती त्यांनी सदरचे काम रु. १,९०,०००/- मध्ये श्री. पी. आर. सासमकर यांच्या कडुन टर्न की बेसीसवर करुन घेण्यासाठी तसेच या कामासाठी वाहतुक बेट तयार करणे व इतर खर्च (जाळी विद्युत दिवे.) साठी अंदाजे रु. १,२५,०००/- एवढयाचे खर्चाचे काम श्री. दिलावर कंत्राटदार यांच्याकडुन करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७६/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेज समोरील चौकात सौदर्यीकरण करणेस्तव यांनी येथील स्तुपाच्या एका स्तंभाची प्रतिकृती त्यावरील सर्व बारकात्यासह करण्यांचे ठरले.

त्यानुसार शहरातील विविध शिल्पकार, अर्टीस्ट यांचेकडे प्रत्यक्ष जावुन विचारणा करुन त्यांचेकडुन या कामाची दरपत्रके मागविली असता खालील विविध कलाकारांना त्यांची दरपत्रके कार्यालयात आणुन दिली असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

**१) गिरीष आर्ट :**

अ) स्तभांचे उंची १८ फुट व रुंदी ४ फुटX४ फुट राहिल. वरील बाजुस चार मुर्ती यक्षाच्या राहतील व चारही बाजुना नक्षी काम राहील. सिमेंट कॉंक्रीटच्या माध्यमात हे काम करण्याचा खर्च रु. २,२०,०००/-

ब) वरील प्रमाणे सर्व काम करुन चार मुर्ती फायबर ग्लास माध्यमात करणे व अतिल बाजुस क्रॉकीट पट्टीकरणे र.रु. २,८४,०००/-

क) वरील प्रमाणे सर्व काम व चार मुर्ती ब्रॉझ धातुच्या एकुण खर्च रु. ३,७५,०००/-

**२) मॉडेल आर्ट वर्क :**

अ) वर वर्णन केलेले काम व सिमेंट कॉंक्रीटचे चे माध्यामात करण्याचा खर्च रु. २,१५,०००/-

ब) वरील प्रमाणे वर्णन केलेले काम फायबर ग्लासचे माध्यम वापरुन मुर्त्यासह काम करणेचा खर्च रु. २,८०,०००/-
क) बॉझ धातुचे कामाचे दर दिले नाही.

**३) श्री. पी.आर. सासमकर :**
अ) वरील प्रमाणे सर्व काम सिमेंट कॉक्रीटचे माध्यम खर्च र.रु. २,१०,०००/-
ब) वरील प्रमाणे सर्व काम फायबर ग्लासचे माध्यम खर्च र.रु. २,७५,०००/-
क) वरील प्रमाणे सर्व काम आतील बाजुस सिमेंट कॉक्रीटची "४" जाडीची व बाहेरुन ब्रॉझ धातुचे काम एकुण रु. ३,७५,०००/-

वरील प्रमाणे दरांचे अवलोकन केले असता श्री. पी.आर. सासमकर यांचे कडुन हे काम ग्लासच्या माध्यमात करुन घेण्याचे ठरले. व त्यांचे दर रु. २,७५,०००/- एवढे असल्याने त्यांना वाटाघाटीस्तव कार्यालयात बोलावले असता मा. आयुक्त यांचे व मुख्य लेखा परिक्षक यांचे समोर चर्चा झाली असता श्री. सासमकर यांनी हे काम र.रु. २,५०,०००/- मध्ये करुन देण्याचे मान्य केले.

तरी श्री. सासमकर यांचे दरपत्रक र.रु. २,५०,०००/- चे मंजुरीस्तव व हे काम यांचेकडुन टर्न की बेसीसवर करुन घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

तसेच या कामासाठी वाहतुक बेट तयार करणे व इतर खर्च (जाळी, विद्युत दिवे इ.) साठी अंदाजे रु. ८२,५५०/- एवढा खर्च येणार आहे हे काम उपलब्ध अनुभवी कंत्राटदार श्री. प्रदिप पाटील यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात येईल.

तरी या कामाचा एकुण अंदाजीत खर्च रक्कम रु. ३,३२,५५०/- ला व प्रस्तावित केल्यानुसार काम करुन घेण्यांस मंजुरी मिळावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेज समोरील चौकात सौदर्यीकरण करण्यास्तव एका स्तभाची प्रतिकृती त्यावरील बारकाव्यासह करण्यांत येणार आहे. प्राप्त दर पत्रकांत व वाटाघाटी अंती श्री. पी.आर. सासमकर यांनी सदर काम फायबर ग्लासमध्ये रु. २,५०,०००/- मध्ये करुन देण्यास संमती दिली आहे. तसेच या कामासाठी वाहतुक बेटे तयार करणे व इतर खर्च (जाळी विद्युत दिवे इ.) साठी अंदाजे रु. ८२,५५०/- च्या खर्चास व अनुभवी उपलब्ध कंत्राटदार श्री. प्रदिप पाटील यांच्या कडुन करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७७/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, लक्ष्मणचावडी येथील चौकाचे सौदर्यीकरण करुन शेती औद्यगिक प्रगतीवर आधारित प्रतिकृती व त्यावरील सर्व बारकाव्यासह करण्याचे ठरले.

त्यानुसार शहरातील विविध शिल्पकार, आर्टीस्ट यांचेकडे प्रत्यक्ष जावुन विचारणा करुन या कामाची दरपत्रके मागविली. असता खालील विविध कलाकारांना त्यांची दरपत्रके कार्यालयात आणुन दिली त्याचा तुलनात्मकदृष्टया तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | हॉरीझोन आर्ट स्टुडियो | रु. २,००,०००/- |
| २. | श्री. पी.आर. सासमकर | रु. २,०५,०००/- |
| ३. | गिरीष आर्ट | रु. २,२०,०००/- |

वरील प्रमाणे दराचे अवलोकन केले असता मे हॉरिझोन आर्ट स्टुडिओ यांचे कडुन हे काम करुन घ्यावयाचे ठरले आहे. त्यांचे दर र.रु. २,००,०००/- एवढे असल्याने त्यांना वाटाघाटीस्तव कार्यालयात बोलावले असता मा. आयुक्त यांचे व मुख्य लेखापरिक्षक यांचे समोर चर्चा झाली असता मे. हॉरीझन आर्ट स्टुडियो यांनी काम र.रु. १,७५,०००/- मध्ये करुन देण्याचे मान्य केले.

तरी मे. हॉरीझन आर्ट स्टुडियो यांचे दरपत्रक र.रु. १,७५,०००/- चे मंजुरीस्तव व काम त्यांचेकडुन टर्न की बेसिसवर करुन घेण्याचा प्रस्ताव मंजुरी घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

तसेच या कामासाठी वाहतुक बेट तयार करणे व इतर खर्च (जाळी विद्युत दिवे इ.) साठी अंदाजे र.रु. १,२५,०००/- एवढा खर्च येणार आहे. हे काम उपलब्ध अनुभवी कंत्राटदार श्री. साई कंन्स्ट्रक्शन कंपनी यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांत येईल.

तरी या कामाचा एकुण अंदाजीत खर्च र.रु. ३,००,०००/- प्रस्तावित केल्या नुसार काम करुन घेण्यास मंजुरी मिळावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार लक्ष्मण चावडी येथील चौकाचे सौदर्यीकरण करणे शेती व औद्यगिक प्रगतीवर अधारीत प्रतिकृती त्यावरील सर्व बारकाव्यासह करण्यासाठी प्राप्त दरपत्रकापैकी व चर्चेअंती मे. हॉरीझोन आर्ट यांना रु. १,७५,०००/- मध्ये करण्याची संमती दर्शवली आहे. त्यानुसार सदरचे काम मे. हॉरीझन आर्ट यांच्याकडुन टर्न की बेसीसवर रु. १,७५,०००/- मध्ये करवुन घेण्यांस तसेच सदर कामासाठी वाहतुक बेट तयार करणे व इतर खर्च (जाळी विद्युत दिवे इ.) चे काम रु. ३,००,०००/- मध्ये उपलब्ध गुत्तेदार श्री साई कंन्स्ट्रक्शन कंपनी कडुन करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७८/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महेशनगर कॉर्नरचे सौंदर्यीकरण करुन "करकोचा" पक्षची प्रतिकृती फायबर ग्लास माध्यमात त्यावरील सर्व बारकाव्यासह तयार करण्याचे ठरले.

त्यानुसार हे काम कलात्मकरित्या करण्याचे असल्याने तातडीने दरपत्रक मागविले असता मे. डेकोरेटीव्ह प्रॉडस्टस यांनी ४ फुट उंचीचे फायबरची करकोचा पक्षाची प्रतिकृतीसाठी र.रु. १७०००/- चे दरपत्रक तसेच या कामासाठी वाहतुक बेट तयार करणे व इतर खर्च (जाळी विद्युत दिवे इ.) साठी अंदाजे र.रु. ९५०००/- एवढा खर्च येणार आहे. ही काम उपलब्ध अनुभवी कंत्राटदार श्री. साहेल सिद्यीकी याचे कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात येईल व पक्षाचा प्रतिकृती मे. विलेता डेकोरेटीव्ह प्रॉडक्ट यांचे कडुन करुन घेण्यांत येईल.

तरी या कामाचा एकुण अंदाजे खर्च र.रु. १,१२,०००/- ला प्रस्तावित केल्यानुसार काम करुन घेण्यांस मंजुरी मिळावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार महेशनगर कॉर्नरचे सौदर्यीकरण करुन करकोचा पक्षाची ४ फुट उंचीची कलात्मक प्रतिकृती फायबर ग्लास माध्यमात उभारण्यासाठी येणाऱ्या

रु. १७,०००/- च्या खर्चास व हे काम मे विजेता डेकोरेडीव्ह प्रॉडक्ट यांच्या कडुन करवुन घेण्यांस तसेच या कामासाठी वाहतुक बेट तयार करणे व इतर खर्च (जाळी विद्यूत रोषनाई इ.) साठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. ९५०००/- तसेच हे काम उपलब्ध अनुभवी कंत्राटदार श्री. सोहेल सिद्दीकी यांच्याकडुन करवुन घेण्यास(कामाची एकुण अंदाजीत खर्च रु. १,१२,०००/- सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७९/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हॉटेल कार्तीकी समोरील वाहतुक बेटाचे सौदर्यीकरण करुन तेथील अगोदरचा शेतकऱ्यांच्या पुतळा काढुन त्याऐवजी ब्रॉझ धातुमध्ये शेतकऱ्याची प्रतिक्रते यावरील सर्व बारकाव्यासह तयार करण्याचे ठरले.

त्यानुसार शहरातील विविध शिल्पकार आर्टीस्ट यांचेकडे प्रत्यक्ष जाऊन विचारणा करुन त्यांचेकडुन या कामाची दरपत्रके कार्यालयांत आणुन दिली त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | ऊज्वला आर्टस | र.रु. १,२५,०००/- |
| २. | भडीलगेकर आर्ट स्टुडियो | र.रु. १,७५,०००/- |
| ३. | मुर्तिकला उद्योग औरंगाबाद | र.रु. १,९२,०००/- |
| ४. | मॉडेल आर्टस वर्क्स (औरंगाबाद) | र.रु. २,००,०००/- |
| ५. | पी.आर. सासमकर (औरंगाबाद) | र.रु. २८,०००/- |
| ६. | गिरीष आर्ट औरंगाबाद | र.रु. २,०३,०००/- |

वरीलप्रमाणे दराचे अवलोकन केले असता श्री. भडीलगेकर यांचे कडुने हे काम ब्रॉझच्या माध्यमात करुन घेण्याचे ठरले व त्यांचे दर रक्कम रु. १,७५,०००/- एवढे असल्याने त्यांना वाटाघाटीस्तव कार्यालयात बोलावले असता श्री. भडीलगेकर यांनी हे काम र.रु. १५०००/- मध्ये करुन देण्याचे मान्य केले.

तरी श्री. भडीलगेकर यांचे दरपत्रक र.रु. १,५०,०००/- मंजुरीस्तव हे काम त्यांचेकडुन टर्न की बेसीसवर करुन घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

तसेच कामासाठी या कामासाठी वाहतुक बेट तयार करणे (जाळी विद्युत दिवे इ.)साठी अंदाजे र.रु. १,५०,०००/- एवढा खर्च येणार आहे हे काम उपलब्ध गुत्तेदार श्री. शेख मसुद यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांत येईल.

तरी या कामाचा एकुण अंदाजीत खर्च र.रु. ३,००,०००/- ला प्रस्तावित केल्यानुसार काम करुन घेण्यांस मंजुरी मिळाली.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार हॉटेल कार्तिकी समोरील वाहतुक बेटाचे सौंदर्यीकरण करुन तेथील अगोदरचा शेतकऱ्याचा पुतळा काढुन त्याऐवजी ब्रॉझ धातुची शेतकऱ्याची प्रतिकृती त्यावरील बारकाव्यासह करण्यासाठी दरपत्रके मागविण्यांत आली असता श्री. भडीलगेकर यांचे दर रु. १,७५,०००/- एवढे आहेत. वाटाघाटीअंती श्री. भडीलगेकर यांची सदरचे काम श्री. १,५०,०००/- मध्ये करुन देण्यांची तयारी दर्शविली, त्यानुसार सदरचे काम श्री. भडीलगेकर यांच्याकडुन रक्कम रु. १,५०,०००/- मध्ये टर्न की बेसीसवर करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

तसेच या कामासाठी वाहतुक बेट तयार करणे व इतर (जाळी विद्युत दिवे इ.) साठी तयार करण्यांत आलेला अंदाजे रु. १,५०,०००/- च्या खर्चास व हे काम उपलब्ध अनुभवी गुत्तेदार श्री. शेख मसुद यांच्याकडुन घेण्यास(एकुण अंदाजे खर्च रु. ३,००,०००/-) सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८०/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, टि.बी.हॉस्पीटल ते फोर्टवाल पर्यंतच्या ६० फुटी डी.पी. रोडचे रुंदीकरण करणे आणि रिटेनिंग वाल बांधणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. २८,४०,०००/- च्या अंदाजपत्रकास मा. सर्वसाधारण सभा विषय क्र. २०१/४ दि. १६-३-९६ मा. सर्वसाधारण सभा विषय क्र. २०१/४ दि. १६-६-९६ अन्वये मंजुरीस्तव झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरिता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण एकविस (२१) निविदापत्रके विकल्या गेली, या निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण आठ (८) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दि. १९-७-९६ रोजी उपस्थित कंत्राटदासमक्ष उघडण्यात आली. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. न्यु सुपर कंन्स्ट्रक्शन | २२.१% | कमी दराने |
| २. | मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन | १८.८% | --//-- |
| ३. | मे. राहुल कंन्स्ट्रक्शन | १५.९५% | --//-- |
| ४. | मे. एस.एम. मंडोरे | १४.७०% | --//-- |
| ५. | अब्दुल सलीम | १३.७०% | --//-- |
| ६. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | १२.००% | --//-- |
| ७. | मे. साबरा कंन्स्ट्रक्शन | ४.००% | --//-- |
| ८. | मे. एस.एच. असोशिएटस | २.००% | --//-- |

वरील प्राप्त निविदापैकी मे. न्य सुपर कंन्स्ट्रक्शन यांच्य निविदापत्रकाचे दर सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.१% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने आहे. परंतु मे. न्यु सुपर कंन्स्ट्रक्शन यांना डॉक्टरचे मेडीकल सर्टीफिकेट जोडुन त्यांच्या प्रकृती अस्वास्थामुळे सदरील काम करु शकणार नाही. अशा आशयाचे पत्र कार्यालयास देवुन दुसऱ्या एजन्सी कडुन करुन घेण्यांत माझी काहीही हरकत नाही असे कळविले आहे. त्यामुळे द्वितीय क्रमांकाचे निविदाधारकास मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन यांना प्रथम क्रमांकाच्या निविदा दरात काम करणे बाबत विचारणा केली असता त्यांनी सदर काम प्रथम क्रंमाकाच्या निविदा दरात म्हणजेच २२.१% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने करण्यांस संमती दर्शविली आहे.

तरी सदरील काम मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन कं. यांचेकडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.१% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीने विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टि.बी. हॉस्पीटल ते फोर्टबाल पर्यंतच्या ६० फुटी डी.पी. रोडचे रुंदीकरण करणे आणि रेटेनिंग वाल बांधण्याच्या रु. २८,४०,०००/- च्या कामासाठी

सर्वसाधारण सभा ठराव क्र. २०१/४ दि. १६-३-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झाल्यानुसार मागविल्या असता प्राप्त निविदा पैकी मे. न्यु सुपर कंन्स्ट्र. यांच्या निविदापत्रकाचे दर सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.१% कमी आहे.

तथापी प्रस्तावात दर्शविल्यानुसार त्यांना सदरचे काम करण्यांस असमर्थता दर्शविल्याने द्वितीय क्रंमाकाचे निविदाधारक मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन यांना सदरचे काम प्रथम क्रमांकाच्या निविदा दरात करण्याचे मान्य केल्यानुसार सदरचे काम मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.१% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८१/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मो. हिमायत बाग (आरेफ कॉलनी जवळील) भागात रस्त्याचे खडीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु. १,२६,८५०/- चे तयार करण्यांत आलेले आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते या सन १९९६-९७ लेखाशिर्षका अंतर्गत उपलब्ध तरतुदी मधुन करण्यांत येणार आहे.

तरी अंदाजपत्रक र.रु. १,२६,८५०/- चे मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समिती यांचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार हिमायतबाग (आरेफ कॉलनी जवळील) भागात रस्त्याचे खडीकरण करण्यांसाठी सा.बां. खात्याच्या ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेल्या रु. १,२६,८५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८२/८ :**

शहर अभियंता यांनी दि. १७-९-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीकडे सिमेंट खरेदी बाबत प्रस्ताव सादर केला होता दि. २४-९-९६ रोजी सिमेंट बाबत निविदा मागवल्या असता एकुण (१०) निविदा विकल्या गेल्या व दि. १६-८-९६ रोजी (१०) निविदा प्राप्त झाल्या तुलनात्मकदृष्टया मोदी सिमेंट कंपनी यांचे दर सर्वात कमी म्हणजे रु. १२८.७५ प्रति गोणी सर्व करासहित असे प्राप्त झाल्यानुसार मा. आयुक्त यांना दि. ७-९-९६ रोजी मोदी सिमेंट यांचेशी दराबाबत वाटाघाटी करुन रु. १२६/- प्रति गोणी सर्व करासहित मान्य केल्या प्रमाणे स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर केला. त्यावर समितीने दि. १७-९-९६ ठराव क्र. २२१/५ अन्वये मुळ निविदेतील तिसऱ्या क्रंमाकाच्या पुरवठा धारकाने वाटाघाटीअंती रु. १२५/- प्रतिगोणी सर्व करासहित दर दिल्याने तिसऱ्या क्रंमाकाच्या पुरवठाधारकास सी.सी.आय. कंपनीचे सिमेंट खरेदी करण्यांस मंजुरी दिली आहे. मा. आयुक्तांना स्थायी समितीसमोर मोदी सिमेंटचा प्रस्ताव रु. १२६/- प्रतिगोणी वाटाघाटीअंती ठेवला होता. मोदी सिमेंट यांना दि. १८-९-९६ रोजी मा. आयुक्त यांनी रु. १२३/- प्रति गोणी सर्व करासहित प्रमाणे सिमेंट देण्यांस तयार असल्याचे कळवले आहे. व कायदेशीर नोटीस देऊन आम्हाला स्थायी समितीने चर्चेस बोलावले नसल्याने आमच्यावर अन्याय झाल्याचे म्हणले आहे रु. १२३/- प्रतिगोणी सर्व करासहित देण्यांस तयार आहे व त्यामुळे मनपाचा फायदा होत आहे असे कळविले आहे त्यामुळे सदर प्रकरणी स्थायी समिती दि. १७-९-९६ ठराव क्र. २२१/५ बाबत महापालिकेच्या आर्थिक फायदा व इतर बाबीचा सर्वागीण विचार करता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**सभापती रुलींग :**

दि. १७-९-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये सिमेंट खरेदी बाबत मा. आयुक्तांना शिफारस केलेले मोदी सिमेंटच्या दरापेक्षा सी.सी.आय. या कंपनीने दिलेल्या पत्रानुसार (स्थायी समितीस) सदरील कंपनीचे दर रु. १२५/- प्रतिगोणी खरेदी करण्यांस स्थायी समितीने मंजुरी दिली. आज दि. २१-९-९६ रोजी मोदी कंपनीने दिलेले दर रु. १२३/- प्रतिगोणी प्रमाणे सदरील कंपनी कडुन सिमेंट खरेदी बाबत मा. आयुक्त यांचे कडुन प्रस्तावित करण्यांत आले मोदी कंपनीने पुर्वी त्यांचे दर रु. १२६/- प्रतिगोणी प्रमाणे मा. आयुक्त कडे सादर केले होते. आता त्या कंपनीने १२३/- प्रमाणे सिमेंट पुरविण्यास मंजुरी दिली आहे. सदरील मोदी कंपनीने दिलेले ऑफर सध्य परिस्थितीत बोनाफाईज दिसुन येत नाही. अशी समितीची धारणा आहे. त्यामुळे सदरील कंपनीशी सिमेंट पुरविणे बाबत करार करणे संयुक्तीक होणार नाही. सध्या महानगरपालिकेत शासकीय अनुदानातुन बरीचशी कामे हाती घेतील आहे. तसे रस्ते ड्रेनेज, इमारत इ. त्यासाठी चांगल्या प्रतिची व मुदतीत सिमेंट मिळणे आवश्यक आहे. म्हणुन स्थायी समिती अनुसुचीचे प्रकरण चे नियम (२) चे परंतु केस अधिन राहुन मा. आयुक्त यांना अधिकारप्रदान करते की कामाची निकड व कामाचा दर्जा सुरक्षित राहणेचे दृष्टीने व महानगरपालिकेचे हित लक्षात घेऊन दोन्ही कंपन्यानी प्रस्तावित केलेले दर विचारात घेता सी.सी.आय. ही कंपनी गव्हमेंट अंडरटेकींग असल्याने महापालिकेस खरेदी करावयाचे सिमेंट सी.सी.आय. कंपनीकडुन खरेदी करणे करारनामा करण्यांत यावा. मा. आयुक्तांना सी.सी.आय. बरोबर वाटाघाटी करावी.

**ठराव :**

सदरचा प्रस्ताव इतिवृत्तात देण्यात आलेला आहे.

**विषय क्र. २८३/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराणा प्रताप चौक शहर सौदर्यीकरणाचे कामी सदरील चौकात फायबरची "चेतक" घोडयाची प्रतिकृती बसविण्याचे ठरले. त्यानुसार सदरील कामात अनुभवी असलेले मारुती फायबर यांचेकडुन कोटेशन घेण्यांत आले. त्यात त्यांनी घोडा बसविण्यासाठी लागणाऱ्या चबुतऱ्याचे कामासहीत रु. १,१६,०००/- चे कोटेशन दिले होते. मा. आयुक्तांनी संबंधितास प्रत्यक्ष चर्चेस बोलावून सदरील काम त्यांनी ९८०००/- मध्ये करावयास सुचविले. संबंधिताने त्यास संमती दिली. त्यानुसार सदरील काम मारुती फायबर यांचेकडुन टर्न की बेसीसवर करुन घेण्याचे मान्यतेस्तव सादर.

सदरील कामाचा खर्च अनुदान सन ९५-९६ मधुन प्रस्तावित आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार महाराणा प्रताप चौक येथे फाबरची चेतक घोडयाची प्रतिकृती या कामातील अनुभवी मे. मारुती फायबर यांच्याकडुन रु. ९८०००/- मध्ये टर्न फी बेसीसवर करुन घेण्यास व सदरील कामाचा खर्च शासकीय अनुदान ९५-९६ मधुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८४/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, शहानुरमियाँ दगा्र चौकाचे सौदर्यीकरण करण्याचे दृष्टीने मा. आयुक्त यांचे बरोबर सदरील चौकाची पहाणी करण्यांत आली. पाहणी अंती सदरील ठिकाणी राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक म्हणुन विविध चार

व्यक्ती व त्यांचे हातात राष्ट्र ज्यांत (मशाल) बसविण्याचे ठरले सदरील प्रतिकृती ही ब्रांझची तयार करण्याचे ठरले त्यानुसार चर्चा करुन मोजमाप ठरवून नकाशा तयार करण्यांत आला व सदरील नकाशानुसार या कामात अनुभवी असलेल्या एजन्सीकडुन कामाची दरपत्रके मागविली असता कलाकारांना खालील प्रमाणे दर सादर केले.

| | | |
|---|---|---|
| १. | शिल्पा "नु" भव कला मंदी | रु. ७,८५,०००/- |
| २. | माडेल आर्ट वर्क्स | रु. ७,४५,०००/- |
| ३. | मडीलगोकर्स आर्ट स्टुडियो | रु. ७,०५,०००/- |

सर्वात कमी दर मेडीलगेकर्स आर्ट स्टुडियो यांचे असल्याने त्यांना मा. आयुक्त यांचे प्रत्यक्ष वाटाघाटीस बोलावले असता मा. आयुक्त यांना त्यांना दर कमी करुन सदरील काम रु. ५,५०,०००/- त करण्यास सुचविले व संबंधिताने त्यास संमती दिली. करिता सदरील काम मडीलगेकर्स आर्ट स्टुडियो यांचे कडुन टर्न की बेसीसवर करुन घेण्याचे मान्यतेस्तव सादर.

तसेच कामासाठी वाहतुक बेट तयार करण्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले सदरील कामाचा अंदाजपत्रकीय रक्कम रु. ६०,१००/- असुन अंदाजपत्रक स्थायी समितीचे मान्यतेस्तव सादर.

तरी या कामाचे एकुण खर्च रु. ६,१०,१००/- मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहानुरमियाँ दर्गा चौकाचे सौंदर्यीकरण करण्यांसाठी सदरील ठिकाणी राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक म्हणुन विविध राष्ट्रज्योत (मशाल) बनविण्याचे ठरविण्यात आल्यानुसार प्राप्त दरपत्रकानुसार सर्वात कमी दर मे मडीगेकर्स आर्ट स्टुडियो यांचे रु. ५,५००,०००/- प्राप्त झाल्यानुसार सदर काम मडीगेकर्स आट स्टुडियो यांच्या कडुन हा वाहतुक बेट तयार करण्यांचे कामास रु. ६०,१००/- सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८५/११ :**

अतिरिक्त शहर अभियंताय यांनी प्रस्ताव सादर केला की उत्सव मंगल कार्यालय चौकाचे सौदर्यीकरणचे दृष्टीने मा. आयुक्त यांचे बरोबर सदरील चौकाची पाहणी करण्यांत आली. पाहणीअंती सदरील चौक हा एकनाथ रंग मंदिर जवळ असल्याने तेथे टाळ मृदंग वीणा हे बांझ या धातुमध्ये तयार करुन बसविलयाचे ठरले त्यानुसार चर्चा करुन मोजमाप ठरवून नकाशा तयार करण्यांत आला व सदरील नकाशानुसार त्या कामात अनुभवी असलेल्या एजन्सीकडुन कामाची दरपत्रके मागविली असता कलाकारांनी खालील प्रमाणे दर सादर केले.

| | | |
|---|---|---|
| १. | मॉडेल आर्ट वर्क्स | रु. ३,३०,०००/- |
| २. | शिल्पा "नु" भव कलामंदिर | रु. ३,४८,०००/- |
| ३. | मडीलगेकर आर्ट स्टुडियो | रु. २,९०,०००/- |

सर्वात कमी दर मडीलगेकर्स आर्ट स्टुडियो यांचे असल्याने त्यांना मा. आयुक्त यांचे समोर प्रत्यक्ष वाटाघाटीस बोलावले असता मा. आयुक्तांनी संबंधितास सदरील काम रु. २,५०,०००/- रु. त करण्यांस सुवविले संबंधिताने त्यास संमती दिली, करिता सदरील काम मडीलगेकर्स आर्ट स्टुडियो यांचेकडुन टर्न की बेसिसवर करुन घेण्याचे मान्यतेस्तव सादर.

तसेच या कामासाठी वाहतुक बेट तयार करण्यांचे अंदाजपत्रक रक्कम रु. १,७१,३००/- असुन अंदाजपत्रकास स्थायी समितीचे मान्यतेस्तव सादर.

तरी या कामाची एकुण खर्च रु. ४,२१,३००/- मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उत्सव मंगल कार्यालय चौकाचे सौदर्यीकरण करण्याच्या दृष्टीने सदर चौकात ब्राझ मध्ये टाळ मृदंग, वीणा बसविण्याबाबत दरपत्रके मागविण्यात आली असता प्राप्त दरपत्रकात मडीलगेकर्स आर्ट स्टुडियो यांचे दर सर्वात कमी असल्याने व प्रत्यक्ष वाटाघाटीस त्यांनी सदरचे काम रु. २,५०,०००/- मध्ये करण्याचे मान्य केल्यानुसार त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच या कामासाठी वाहतुक बेट तयार करण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या १,७१,३००/- च्या अंदाजपत्रकास एकुण खर्च रु. ४,२१,३००/- सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८६/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, एस.एम.सी बोर्ड चौकाचे सौदर्यीकरण करण्यांचे दृष्टीने मा. आयुक्त यांचेबरोबर प्रत्यक्ष स्थळपाहणी केली. पाहणीअंती सदरील ठिकाणी हात लेखणी वही दौत ३ लेखनशिल्प हे काम ब्रॉझमध्ये तयार करण्यांचे ठरले . त्यानुसार चर्चा करुन मोजमाप ठरवून नकाशा तयार करण्यात आला व सदरील नकाशानुसार या कामात अनुभवी असलेल्या एजन्सीकडुन कामाची दरपत्रके मागविली असता कलाकारांनी खालील प्रमाणे दर सादर केले.

| | | |
|---|---|---|
| १. | मडीलगेकर आर्ट स्टुडियो | रु. ३,२५,०००/- |
| २. | शिल्पा "नु" भव कलामंदिर | रु. ३,८०,०००/- |
| ३. | मॉडेल आर्ट वर्क्स | रु. ३,४२,०००/- |

सर्वात कमी दर मडीलगेकर्स आर्ट स्टुडियो यांचे असल्याने त्यांना मा. आयुक्त यांचे समोर वाटाघाटीसह बोलवले असता मा.आयुक्त यांना त्यांनी दर कमी करुन सदरील काम २.७५ लाखात करावे असे सांगितले, त्यानुसार संबंधिताने सदरील काम रु. २.७५ लाखात करावयास संमती दिली करिता सदरील काम मडीलगेकर्स आर्ट स्टुडियो व यांचेकडुन टर्न फी बेसीसवर करुन घेण्यांचे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

तसेच सदरील काम वाहतुक बेट तयार करण्यांचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले सदरील कामाचा अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४५,३००/- असुन अंदाजपत्रक स्थायी समितीचे मान्यतेस्तव सादर.

तरी या कामाचा एकुण खर्च रु. ३,२०,३००/- मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार एस.एस.सी. बोर्ड चौकाचे सौदर्यीकरण करण्यासाठी सदर ठिकाणी हात लेखणी वही, दौत इ. लेखनशिल्प ब्रॉझमध्ये बसविण्यासाठी दरपत्रके मागविली असता प्राप्त दरपत्रकात मडीलगेकर्स आर्ट स्टुडियो यांचे दर सर्वात कमी असुन वाटाघाटीअंती त्यांचे सदरचे काम रु. २.७५ लाखात टर्न फी बेसीसवरती करण्यांस संमती दर्शविल्या नुसार सदर काम मडिलगेकर्स आर्ट स्टुडियो यांच्या कडुन रु. २.७५ लाखात करुन घेण्यास तसेच सदरच्या कामासाठी वाहतुक बेट तयार करण्यास आलेल्या अंदाजपत्रकास रु. ४५,३००/- एकुण खर्च रु. ३,२०,३००/- सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८७/१३ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हॉली डेकॉप ने नागसेननगर या रोडवर स्ट्रीट लाईट दिवे लावण्याचे काम चालु आहे. सदरील कामामध्ये नागसेनगर येथेपर्यंत ८ पोल जास्तीचे लागणार आहेत ज्याचेमुळे रु. २,७६,५४०/- जास्तीचे रु. १,५६,२६७/- असे आहे व सदरील काम मुळ कामाशी संबंधित असल्यामुळे संबंधित मंजुर एजन्सी ने बी.जे. इले. तर्फे मंजुर दरावर अंदाजपत्रकीय दरावर १% कमीने मंजुरीस्तव सादर तसेच सदरील एजन्सीतर्फे काम करणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉली डेकॅप नागसेननगर रस्त्यावर नागसेननगर पर्यंत स्ट्रीट लाईट बसविण्यासाठी ८ जास्तीचे पोल लागणार आहेत. यामुळे मुळ अंदाजपत्रक रु. २,७६,५४०/-, रु. १,५६,२६७/-ची वाढ होणार ची वाढ होणार आहे. सदरचे वाढीव काम मुळ कामाशी संबंधित असल्याने संबंधित मंजुर एजन्सी मे. बी. जे इले. कंपनी तर्फे मंजुर दरावर अंदाजपत्रकीय दरावर १% कमीने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८८/१४ :**

अति.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की प्रकाशनगर व जयभारत नगर येथे रस्त्यावर चिखल असल्याने नागरिकांना जाण्यायेण्यास त्रास होत आहे. व तेथे रस्त्यावर हार्ड मुरुम टाकावा अशी स. नगरसेवक श्री. घडामोडे यांची मागणी होती. त्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन सदरील कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. ६४,५००/- आहे. त्यास मा. आयुक्त यांची मान्यता मिळाली आहे. परंतु सदरील भाग हा सिडको नोटीफाईड क्षेत्रात असल्याने अंदाजपत्रक स्थायी समितीचे विचारार्थ साद.

मान्यता झाल्यास सदरचा खर्च रस्ते दुरुस्ती व देखभाल ९६-९७ मधुन करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्रकाशनगर व जयभारत नगर येथे रस्त्यावर हार्ड मुरुम टाकण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या रु. ६४,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८९/१५ :**

श्री. शाम सुंदर बन्सीलाल गट्टाणी यांनी अर्ज देवून विनंती केली मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी त्याचे पत्र क्रंमाक/९६ झुभाया/पुरवठा दि. १२-८-९६ अन्वये जकात नाका बायजीपुरा येथे झुणका भाकर केंद्र चालविण्यासाठी मंजुरी दिली आहे. त्यानुसार मध्यवर्ती जकात नाक्याचे पुर्वेकडील गेटच्या आतिल बाजुस कुंपणभिंत लगत १०X१३ चौ.फुट आकराच्या जागा झुणका भाकर केंद्रासाठी देणे बाबत शहर अभियंता यांना अभिप्राय मागविण्यात आला होता. शहर अभियंता यांना वरील ठिकाणी झुणका भाकर केंद्रा साठी १२० चौ.फुट जागा देण्यास हरकत नाही. म्हणुन अभिप्राय दिला आहे. तरी शहर अभियंता यांच्या शिफारशी नुसार तसेच मध्यवर्ती जकात नाक्यामध्ये येणारा जड वाहणे यांच्या रहदरीस अडथळा होणार नाही. तसेच पार्किंगला अडथळा होणार नाही. या अटीवर संबंधितांना विनामुल्य जागा देण्या बाबत चर्चा होवून मा. स्थायी समिती समोर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्र. ९६/झुभायो/पुरवठा/दि. १२-८-९६ अन्वये जकात नाका बायजीपुरा येथे श्री. शामसुंदर बन्सीलाल गट्टाणी यांचे नावे झुणका भाकर केंद्र मंजुरी केलेले आहे. तसेच मध्यवर्ती जकात नाक्यात पुर्वे कडील गेटच्या आतिल बाजुस कुंपनभिंत लगत १०x१२=१२० चौ. फुट आकाराचा जागा देण्यास हरकत नाही. असा अभिप्राय शहर अभियंता यांनी दिली आहे. त्याचे शिफारशी नुसार व जकात नाक्या मध्ये येणरी जड वाहने यांचे रहदारीस व येथील पार्किंगला अडथळा होणार नाही या अटीवर संबंधितास विनामुल्य जागा प्रदान करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. २९०/१६ :**

श्री. अरुण हरीप्रसाद शुक्ला यांनी अर्ज देवून विनंती केली आहे की, मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी त्याचे पत्र क्रंमाक/९६ झुभायो/पुरवठा/ दि. १२-८-९६ अन्वये मिलकॉर्नर येथे झुणका भाकर केंद्र चालविण्यासाठी मंजुरी दिली आहे. मिलकॉर्नर येथील औरंगाबाद मिलच्या उत्तरेकडील भिंतीलगतची जागा १२० चौ.फुट झुणका भाकर केंद्रासाठी देता येईल का? या बाबत मा. सहाय्यक संचालक नगर रचना यांचा अभिप्राय दिला आहे की, झुणका भाकर केंद्राची प्रस्तावित जागा हि मिलकार्नर ते मिलींद हायस्कुल ३० मी. विकास योजनेत रस्ता रुंदीकरण करण्यात येत आहे. व सध्या मिलच्या कंपाऊंडला लागुन रस्त्याच्या जागेवर बऱ्याच टपऱ्या टाकलेल्या आहे. हया टपऱ्याच्या रेषेत सदरील जागा मोडते. सध्याच्या रस्त्याच्या वापर व बारापुल्ला गेट मुळे हया रस्त्याचा जमीनीचा न होणार वापर लक्षात घेता प्रस्तावित हया जागी झुणका भाकर केंद्रास १२० चौ.फुट जागा विनामुल्य खालील अटी-शर्ती नुसार देण्यास हरकत नाही.

१. मनपास रस्ता रुंदीकरणाच्या वेळी जेव्हा जागेची आवश्यकता भासेल त्यावेळी सदरील जागा मनपास ताब्यात घेण्यात घेण्याचा अधिकार राहील.
२. रहदारीस कोणत्याही प्रकारच्या अडथळा होणार नाही याची दक्षता घेण्यांत यावी.

तरी वरील कार्यलयीन टिपणी नुसार झुणका भाकर केंद्रासाठी जागा संबंधितास देण्याबाबत चर्चा होऊन मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी पत्र क्र/९६/झुभायो/पुरवठा/ दि. १२-८-९६ अन्वये मिलकॉर्नर येथे श्री. अरुण श्रीप्रसाद शुक्ला यांनी झुणका भाकर केंद्र चालविण्यास मंजुरी दिली असुन त्यानुसार मिलकॉर्नर स्थित औरंगाबाद मिलच्या उत्तरे कडील भिंती लगत १२० चौ.फुट जागा देणे बाबत सहाय्यक नगर रचना यांचे कडुन अभिप्राय मागविला असता प्रस्तावित जागा मिलकार्नर ते मिलींद हायस्कुल या ३० मी. विकास योजना रस्ता रुंदी करणात येत असुन

१. मनपास रस्ता रुंदीकरणाच्या वेळी जेव्हा जागेची आवश्यकता भासेल त्यावेळी सदरील जागा मनपास ताब्यात घेण्यात घेण्याचा अधिकार राहील.
२. रहदारीस कोणत्याही प्रकारच्या अडथळा होणार नाही याची दक्षता घेण्यांत यावी.

या अटीवर संबंधितास विनामुल्य जागा प्रदान करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९१/१७ :**

श्री. यशवंतराव ओक रा. नारळी बाग यांनी अर्ज केला की, त्यांना जिल्हाधिकारी औरंगाबाद त्याचे पत्रक क्र./९६ झुभायो/पुरवठा/ ९६-९७ दि. १२-८-९६ अन्वये

महानगरपालिका कार्यलय येथे झुणका भाकर केंद्र चालविण्यासाठी मंजुरी देण्यांत आली आहे. महानगरपालिकेच्या परिसरात आलेल्या पुर्वेकडील इमारतीच्या खालील असलेल्या कन्टीनच्या बाजुला डावीकडुन भाग (उत्तरे) जागा देता येऊ शकेल. तरी संबंधितांना वरील ठिकाणी ८X१५ आकाराची जागा झुणका भाकर केंद्र चालविण्यासाठी खालील अटीवर विनामुल्य देण्यास हरकत नाही.

१. प्रशासकीय कामात अडथळा होणार नाही.
२. अस्वच्छता होणार नाही.

तरी कार्यालयीन टिपणी नुसार जागा देण्याबाबत मा. स्थायी समिती मध्ये चर्चा होऊन मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना पत्र क्र./९६ झुभायो/पुरवठा/ ९६-९७ दि. १२-८-९६ नुसार श्री. यशवंत केशवराव ओक यांना महानगरपालिका कार्यालय येथे झुणका भाकर केंद्र चालविण्यास मंजुरी दिली असुन त्या नुसार महानगरपालिकेच्या परिसरातील पुर्वे कडील इमारतीच्या खालील असलेल्या कॅन्टीनचे बाजुला डावी कडील (उत्तरेस) संबंधितांस ८X१५ या आकाराची जागा झुणका भाकर केंद्रसाठी

१. प्रशासकीय कामात अडथळा होणार नाही.
२. अस्वच्छता होणार नाही.

या अटी वर प्रदान करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

सौंदर्यीकरणाच्या प्रस्तावाबाबत अतिरिक्त शहर अभियंता यांनी सभागृहात थोडक्यात माहिती दिली.

**श्री. कचरु नवपुते :** मनपात १८ खेडयांचा समावेश झालेला आहे या खेडयाचांही विकास या दृष्टीकोनात विकासात्मक व सौंदर्यीकरणाची कामे या १८ खेडयातुनही करण्यात यावीत विमानतळासमोर विमानाची प्रतिकृती बनविण्यात यावी.

**रशिद खान (मामु) :** मंजुरपुऱ्या जवळ असलेल्या चौकात सुरईची प्रतिकृती उभारण्यात यावी. याच बरोबर जुन्या हायकोर्ट बिल्डींग समोर हातात तराजु धरलेली न्याय देवता व रेल्वेस्टेशन बसस्टँड समोर प्रसगोपात्र सौंदर्यीकरणाची कामे हाती घेण्यात यावीत.

**स.सभापती :** टाऊनहाल चौकात पत्र चोचीत होऊन उडणारा पक्षी याची प्रतिकृती उभारण्यात यावी.

**श्री. हमीद ताबा :** रेल्वेस्टेशन समोरील चौकात औरंगाबाद शहरातील महत्वाची ऐतिहासिक स्थळे एकत्रितरित्या दाखवावीत.

**श्री. रशिद खान (मामु) :** सौंदर्यीकरणाअंतर्गत ज्युब्ली पार्क चौकाचाही विचार करण्यात यावा तसेच शहरात जे हायमस्ट लावले जाणार आहेत त्या पैकी स्टेशन व स्टँडवरील रहदारी विचारात घेणे तेथे लावण्यात यावा.

**श्री. गौतम खरात :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ हायमस्ट लावण्यात यावा.

**सौ. जोशी :** शहराबरोबरच सिडको भागाचाही सौंदर्यीकरणाबाबत विचार करण्यात यावा.

**स. सभापती :** सिडकोत मजनु हिल उद्यानात स्वामी विवेकानंदाचा पुतळा बसविण्यात येणार आहे. तेथे काही सौंदर्यीत्मक कामे असतील तर आपण तशा सुचना कराव्यात.

**मा. आयुक्त :** ही कामे विशिष्ट प्रकारची असल्याने हया कामाचे टेंडर काढता येत नाहीत कारण ही कामे सर्वजण करु शकत नाहीत.

**स. सभापती :** या प्रस्तावांना मंजुरी दिली आहे. दोन चार वृत्तपत्रातुन जाहिरात देऊन जर कोणी ब्युटीफिकेशन स्पॉट ॲडाप्ट करण्यास तयार असतील आपण स्पॉन्सरशिप द्यावयास तयार असतील तर त्यांच्या जाहिराती घेऊन ब्युटीफिकेशन कामी त्यांचेही सहाय्य घ्यावे. स. सभासदांनी सौंदर्यीकरणा कामी केलेल्या सुचनांची नोंद घ्यावी.

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा व बसस्टँड जवळ हायमस्ट बसविण्यात यावेत यासाठी आवश्यक ती आर्थिक तरतुद करण्यात यावी.

**श्री. रशिद खान (मामु) :** टपऱ्याचे भाडे व्यवस्थितरित्या वसुल होत नाही स्टँडजवळ रस्त्यातच बऱ्याचशा टपऱ्या लागलेल्या आहेत.

**स. सभापती :** टपऱ्याचे भाडे वसुल करण्याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी.

राष्ट्रगिता नंतर ७.०० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे स. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद.